# पुस्तपालन आणि लेखाकर्म

## इयत्ता बारावी



# भारताचे संविधान

**भाग ४ क**

## नागरिकांची मूलभूत कर्तव्ये

**अनुच्छेद ५१ क**

**मूलभूत कर्तव्ये – प्रत्येक भारतीय नागरिकाचे हे कर्तव्य असेल की त्याने –**

(क) प्रत्येक नागरिकाने संविधानाचे पालन करावे. संविधानातील आदर्शांचा, राष्ट्रध्वज व राष्ट्रगीताचा आदर करावा.

(ख) स्वातंत्र्याच्या चळवळीला प्रेरणा देणाऱ्या आदर्शांचे पालन करावे.

(ग) देशाचे सार्वभौमत्व, एकता व अखंडत्व सुरक्षित ठेवण्यासाठी प्रयत्नशील असावे.

(घ) आपल्या देशाचे रक्षण करावे, देशाची सेवा करावी.

(ङ) सर्व प्रकारचे भेद विसरून एकोपा वाढवावा व बंधुत्वाची भावना जोपासावी. स्त्रियांच्या प्रतिष्ठेला कमीपणा आणतील अशा प्रथांचा त्याग करावा.

(च) आपल्या संमिश्र संस्कृतीच्या वारशाचे जतन करावे.

(छ) नैसर्गिक पर्यावरणाचे जतन करावे. सजीव प्राण्यांबद्दल दयाबुद्धी बाळगावी.

(ज) वैज्ञानिक दृष्टी, मानवतावाद आणि जिज्ञासूवृत्ती अंगी बाळगावी.

(झ) सार्वजनिक मालमत्तेचे जतन करावे. हिंसेचा त्याग करावा.

(ञ) देशाची उत्तरोत्तर प्रगती होण्यासाठी व्यक्तिगत व सामूहिक कार्यात उच्चत्वाची पातळी गाठण्याचा प्रयत्न करावा.

(ट) ६ ते १४ वयोगटातील आपल्या पाल्यांना पालकांनी शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून द्याव्यात.

शासन निर्णय क्रमांक : अभ्यास-२११६/(प्र.क्र.४३/१६) एसडी-४ दिनांक २५.४.२०१६ अन्वये स्थापन करण्यात आलेल्या समन्वय समितीच्या दि. ३०.१.२०२० रोजीच्या बैठकीमध्ये हे पाठ्यपुस्तक सन २०२०-२१ या शैक्षणिक वर्षापासून निर्धारित करण्यास मान्यता देण्यात आली आहे

# पुस्तपालन आणि लेखाकर्म

## इयत्ता बारावी

२०२०

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे - ४११ ००४.

V2X3I2

आपल्या स्मार्टफोनवरील DIKSHA APP द्वारे पाठ्यपुस्तकाच्या पहिल्या पृष्ठावरील Q. R. Code द्वारे डिजिटल पाठ्यपुस्तक व पाठासंबंधित अध्ययन अध्यापनासाठी उपयुक्त दृक्-श्राव्य साहित्य उपलब्ध होईल.

प्रथमावृत्ती : 2020
दुसरे पुनर्मुद्रण : 2022

© महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ पुणे - ४११ ००४.

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळाकडे या पुस्तकाचे सर्व हक्क राहतील. या पुस्तकातील कोणताही भाग संचालक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ यांच्या लेखी परवानगीशिवाय उद्‌धृत करता येणार नाही.

**वाणिज्य शाखा मुख्य समिती**

**डॉ. नरेंद्र पाठक**
**(अध्यक्ष वाणिज्य समिती)**

| | |
|---|---|
| श्री. सुरेंद्र निरगुडे | (सदस्य) |
| डॉ. मुकुंद तापकीर | (सदस्य) |
| डॉ. प्रशांत साठे | (सदस्य) |
| सीएस्. महेश आठवले | (सदस्य) |
| श्री. नारायण पाटील | (सदस्य) |
| डॉ. ज्योती गायकवाड | (सदस्य) |
| श्री. मोहन साळवी | (सदस्य) |
| श्री. अनिल कापरे | (सदस्य) |
| श्रीमती अनंतलक्ष्मी कैलासन | (सदस्य) |
| श्रीमती लक्ष्मी पिल्लई | (सदस्य) |
| श्रीमती मृणाल फडके | (सदस्य) |
| डॉ. संगीता मांडके | (सदस्य) |
| श्रीमती उज्ज्वला गोडबोले | (सदस्य-सचिव) |

**पुस्तपालन व लेखाकर्म- राज्य अभ्यासगट सदस्य**

**श्री. सुरेंद्र निरगुडे**
**(पुस्तपालन व लेखाकर्म: अध्यक्ष आणि समन्वयक)**

| | |
|---|---|
| सीए. विलास पोतदार | डॉ. अनघा काळे |
| श्रीमती लक्ष्मी रा. अय्यर | श्री. संजीव मोरे |
| श्री. आप्पासाहेब दोरकर | श्री. बी.एस्. कुंभार |
| श्रीमती ज्योती भोरे | श्री. गणेश चन्ना |
| श्री. अब्दुल राऊफ | श्री. संजय पंदीकर |
| श्री. अनिल कदम | श्री. सुभाष मोरे |
| डॉ. डी. आर. बाहेती | |

**भाषांतरकार**

| | |
|---|---|
| श्री. अब्दुल राऊफ | डॉ. अनघा काळे |
| श्री. संजय पंदीकर | श्री. अनिल कदम |
| डॉ. डी. आर. बाहेती | |

**समीक्षक**

श्री. अनिल कापरे — श्री. सुरेंद्र निरगुडे

**मुखपृष्ठ व सजावट**

श्री. संदिप कोळी, चित्रकार, मुंबई
श्री. गणेश चन्ना, सोलापूर

**अक्षरजुळणी**

बलदेव कॉम्पुटर्स, मुंबई

**समन्वयक**

**उज्ज्वला श्रीकांत गोडबोले**
प्र. विशेषाधिकारी गणित,
पाठ्यपुस्तक मंडळ, पुणे.

**निर्मिती**

**सचिन मेहता**
मुख्य निर्मिती अधिकारी
**संजय कांबळे**
निर्मिती अधिकारी
**प्रशांत हरणे**
सहायक निर्मिती अधिकारी

**कागद**

७० जी.एस.एम.क्रीमवोव्ह

**मुद्रणादेश**

**मुद्रक**

**प्रकाशक**

**विवेक उत्तम गोसावी, नियंत्रक**
पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळ,
प्रभादेवी, मुंबई २५

# भारताचे संविधान

## उद्देशिका

**आम्ही, भारताचे लोक, भारताचे एक सार्वभौम समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य** घडविण्याचा व त्याच्या सर्व नागरिकांस:

सामाजिक, आर्थिक व राजनैतिक **न्याय;**
विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा
व उपासना यांचे **स्वातंत्र्य;**
दर्जाची व संधीची **समानता;**

निश्चितपणे प्राप्त करून देण्याचा
आणि त्या सर्वांमध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा
व राष्ट्राची एकता आणि एकात्मता
यांचे आश्वासन देणारी **बंधुता**
प्रवर्धित करण्याचा संकल्पपूर्वक निर्धार करून;

**आमच्या संविधानसभेत**
आज दिनांक सव्वीस नोव्हेंबर, १९४९ रोजी
**याद्वारे हे संविधान अंगीकृत आणि अधिनियमित करून स्वत:प्रत अर्पण करीत आहोत.**

## राष्ट्रगीत

जनगणमन–अधिनायक जय हे
भारत–भाग्यविधाता ।
पंजाब, सिंधु, गुजरात, मराठा,
द्राविड, उत्कल, बंग,
विंध्य, हिमाचल, यमुना, गंगा,
उच्छल जलधितरंग,
तव शुभ नामे जागे, तव शुभ आशिस मागे,
गाहे तव जयगाथा,
जनगण मंगलदायक जय हे,
भारत–भाग्यविधाता ।
जय हे, जय हे, जय हे,
जय जय जय, जय हे ।।

## प्रतिज्ञा

भारत माझा देश आहे. सारे भारतीय माझे बांधव आहेत.

माझ्या देशावर माझे प्रेम आहे. माझ्या देशातल्या समृद्ध आणि विविधतेने नटलेल्या परंपरांचा मला अभिमान आहे. त्या परंपरांचा पाईक होण्याची पात्रता माझ्या अंगी यावी म्हणून मी सदैव प्रयत्न करीन.

मी माझ्या पालकांचा, गुरुजनांचा आणि वडीलधाऱ्या माणसांचा मान ठेवीन आणि प्रत्येकाशी सौजन्याने वागेन.

माझा देश आणि माझे देशबांधव यांच्याशी निष्ठा राखण्याची मी प्रतिज्ञा करीत आहे. त्यांचे कल्याण आणि त्यांची समृद्धी ह्यांतच माझे सौख्य सामावले आहे.

# प्रस्तावना

प्रिय विद्यार्थी मित्रांनो,

शैक्षणिक वर्ष २०२०-२१ पासून इयत्ता बारावीच्या पुनर्रचित अभ्यासक्रमानुसार तयार करण्यात आलेले पुस्तपालन व लेखाकर्म या विषयाचे क्रमिक पुस्तक आपणास सादर करताना विशेष आनंद होत आहे.

अकरावीच्या अभ्यासक्रमात प्रामुख्याने स्वामित्व संस्थेचे लेखांकन व लेखांकनाच्या मूलभूत संकल्पनांचा समावेश आहे. बारावीच्या अभ्यासक्रमात प्रामुख्याने भागिदारी संस्था व नफा न कमविणाऱ्या संस्थांच्या लेखांकनाचा समावेश आहे. तसेच प्रमंडळ लेखांकनामध्ये भागांचे लेखांकन, वित्तीय विवरणांचे विश्लेषण, विनिमय विपत्र, लेखांकनात संगणकाचा उपयोग इत्यादींचा समावेश केलेला आहे.

विविध संकल्पना व घटकांची माहिती सादर करताना विद्यार्थ्यांना ती सहज, सोप्या पद्धतीने समजेल याची योग्य काळजी घेतलेली आहे. तसेच ज्या विद्यार्थ्यांची वाणिज्य शाखांची पूर्व पार्श्वभूमी नाही आणि वाणिज्य शाखेत पुढील शिक्षण घेण्याची इच्छा आहे अशा विद्यार्थ्यांनाही हा विषय सहजपणे समजण्यास मदत होईल. कौशल्य व उपयोजनावर आधारित विविध प्रात्यक्षिक उदाहरणांचा समावेश या क्रमिक पुस्तकात करण्यात आलेला आहे.

घटकाच्या शेवटी दिलेल्या स्वाध्यायावरून विविध प्रकारच्या संकल्पनांबाबत स्पष्टता अचूकपणे सिद्ध होण्यास मदत होईल. यातूनच विद्यार्थ्यांच्या कौशल्य व उपयोजित ज्ञानास चालना मिळाल्यामुळे भविष्यात पुढील शिक्षणासाठी त्याला प्रोत्साहन मिळेल.

**आपणांस सूचित करण्यात येत आहे की या पुस्तकातील काही उदाहरणे व स्वाध्यायांची रचना अधिक सर्वसमावेशक करण्यात आलेली आहे. त्यामुळे प्रश्नपत्रिका तयार करताना गुणानुसार सदर उदाहरणांमध्ये बदल करणे आवश्यक आहे.**

अभ्यासक्रमातील उपघटकांच्या कागदपत्रांचे नमुने व आवश्यक माहिती पुस्तकाच्या सुरुवातीला क्यू. आर. कोडच्या माध्यमातून देत आहोत. जेणेकरून अध्ययन व अध्यापन परिणामकारक होईल.

या पुस्तकाचे समिती सदस्य, अभ्यासगट सदस्य, समीक्षक, गुणवत्ता परीक्षक आणि ज्यांनी या पाठ्यपुस्तक निर्मितीसाठी सहकार्य केले त्या सर्वांचे मनःपूर्वक आभार !

शिक्षणतज्ज्ञ व विद्यार्थी या क्रमिक पुस्तकाचे स्वागत करतील अशी अपेक्षा आहे.

पुणे
दिनांक : २१ फेब्रुवारी २०२०
भारतीय सौर : २ फाल्गुन १९४१

**(विवेक गोसावी)**
**संचालक**
महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती
व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे

| घटक क्र | क्षमता विधाने |
|---|---|
| १ | *या प्रकरणाचा अभ्यास केल्यानंतर विद्यार्थी सक्षम होतील :*<br>● भागीदारीचा अर्थ व वैशिष्ट्ये समजून घेण्यास.<br>● भागीदारी कायदा १९३२ च्या तरतुदी समजून घेण्यास.<br>● भागीदारी कराराचे अर्थ व महत्त्व ओळखण्यास.<br>● भागीदारी कराराचे अभावी लागू होणाऱ्या तरतुदी समजण्यास.<br>● भागिदारांची भांडवल खाती कशा प्रकारे ठेवली जातात याची माहिती मिळण्यास.<br>● अंतिम खात्याचा अर्थ, गरज आणि महत्त्व<br>● अंतिम खात्यामधील समयोजनांचे प्रभाव<br>● व्यापार खाते, नफातेटा खाते आणि ताळेबंदाचा अर्थ<br>● व्यवसायाचे आर्थिक परिणाम कशाप्रकारे शोधावेत. |
| २ | *या प्रकरणाचा अभ्यास केल्यानंतर विद्यार्थी सक्षम होतील :*<br>● नफा न कमविणाऱ्या संस्थेचा अर्थ व वैशिष्ट्ये समजतो.<br>● प्राप्ती शोधन खात्याचा अर्थ व वैशिष्ट्ये सांगतो .<br>● उत्पन्न खर्च खात्याचा अर्थ समजून नफा-तोटा खाते व उत्पन्न - खर्च यातील फरक जाणतो.<br>● नफा कमविणाऱ्या व नफा न कमविणाऱ्या संस्थेतील फरक जाणतो.<br>● उत्पन्न खर्च खाते व ताळेबंद तयार करण्यासाठी आवश्यक ती कौशल्ये आत्मसात करतो. |
| ३ | *या प्रकरणाचा अभ्यास केल्यानंतर विद्यार्थी सक्षम होतील :*<br>● भागीदारीच्या पुनर्रचेनेचा अर्थ व प्रकार समजतो.<br>● भागीदाराच्या प्रवेशचा अर्थ व गरज समजतो.<br>● भागीदाराच्या प्रवेशासंबंधी समायोजनांचा अभ्यास करतो.<br>● नफा-तोटा वाटपाचे व त्यागाचे नवीन प्रमाण काढतो.<br>● ख्यातीचे मूल्य काढण्याच्या विविध पद्धती व हाताळणी जाणतो.<br>● संचित नफा/ तोट्याची लेखांकीय हाताळणी जाणतो.<br>● संपत्ती व देयतांच्या पुनर्मूल्यांकनाच्या समायोजन नोंदीची आवश्यकता समजून घेतो.<br>● नवीन नफा विभाजनाच्या प्रमाणात भांडवलाचे समायोजन करतो. |
| ४ | *या प्रकरणाचा अभ्यास केल्यानंतर विद्यार्थी सक्षम होतील :*<br>● भागीदारी व्यवसायातून निवृत्त होणाऱ्या भागीदाराचा संबंधीचा अर्थ समजतो.<br>● निवृत्त भागीदारीशी संबंधित असणाऱ्या विविध अनुपतांची गणना करता येईल.<br>● ख्यातीची हाताळणी करण्या संबंधीचे ज्ञान प्राप्त होईल. राखीव निधी, संचित नफा किंवा तोट्यासंबंधीचे होणारे परिणाम समजतो.<br>● संपत्तीचे पुनर्मूल्यांकन आणि देयतेची पुनर्निश्चितीचे परिणाम संबंधीची माहिती होईल.<br>● निवृत्तीनंतर भागीदारीत असलेल्या भागीदारांच्या भांडवलाचे समायोजन करण्यासंबंधीची माहिती होईल.<br>● निवृत्त भागीदाराला द्यावयाच्या अंतीम राशी शोधनाच्या विविध पर्यायांची माहिती होईल. |

| | |
|---|---|
| ५ | *या प्रकरणाचा अभ्यास केल्यानंतर विद्यार्थी सक्षम होतील :*<br>● विविध अनुपातांची गणना कशा प्रकारे करावी हे जाणतील.<br>● मृत भागीदाराच्या मृत्यू तिथीपर्यंतच्या लाभातील हिश्याची गणना करू शकतील.<br>● मृत भागीदाराच्या ख्यातीतील हिश्याचे आगणन करू शकतील.<br>● मृत भागीदाराच्या वारसदाराला देय असलेल्या रकमेची निश्चिती करू शकतील.<br>● वारसदाराचे खाते कशाप्रकारे समायोजित करावे याची माहिती होईल. |
| ६ | *या प्रकरणाचा अभ्यास केल्यानंतर विद्यार्थी सक्षम होतील :*<br>● भागीदारी संस्थेच्या विसर्जनाचा अर्थ आणि कारणे.<br>● भागीदारी संस्थेच्या विसर्जनाचे परिणाम.<br>● खाती बंद करतांना लेखांकन हाताळणी / मांडणी<br>● साधे विसर्जन आणि भागीदाराच्या दिवाळखोर परिस्थितीतील विसर्जनाबाबत लेखांकन प्रक्रिया. |
| ७ | *या प्रकरणाचा अभ्यास केल्यानंतर विद्यार्थी सक्षम होतील :*<br>● विद्यार्थी विनिमय विपत्राचा अर्थ समजण्यास पात्र ठरतील.<br>● विद्यार्थ्यांना विनिमय विपत्राच्या संकल्पना समजल्यामुळे प्रत्यक्ष ते त्याचा उपयोग करतील.<br>● विद्यार्थी विनिमय विपत्राचा मसुदा तयार करतील आणि त्याचे प्रकार समजून घेतील.<br>● देयदिनांकपर्यन्त विपत्र स्वतःजवळ ठेवणे, राशिसंग्रहणाकरिता बँकेत पाठविणे, नूतनीकरण व विपत्राचे निवर्तन इ. बाबी समजून घेतील.<br>● विनमय विपत्राची विविध परिस्थित लेखांकीय हाताळणी शिकतील. |
| ८ | *या प्रकरणाचा अभ्यास केल्यानंतर विद्यार्थी सक्षम होतील :*<br>● भागांचे प्रकार आणि भाग भांडवलाची माहिती होईल.<br>● भागांचे सार्वजनिक अभिदान आणि खाजगीरित्या वितरण समजतो.<br>● भागांचे अधिक किंवा कमी भागांसाठी प्राप्त अभिदान आणि सममूल्यावर अधिमूल्यावर व कसरीवर भागांचे निर्गमन ह्या संकल्पनांशी परिचित होतील.<br>● कमी किंवा जास्त भागांसाठी प्राप्त अभिदान, तसेच अप्राप्त आणि पूर्वप्राप्त याचना (मागणी) संबंधीची विभिन्न लेखांकन हाताळणीशी परिचित होतील. |
| ९ | *या प्रकरणाचा अभ्यास केल्यानंतर विद्यार्थी सक्षम होतील :*<br>● वित्तीय विवरण विश्लेषणांचा अर्थ,उद्देश आणि मर्यादा जाणून घेण्यास समर्थ होतील.<br>● वित्तीय विवरण विश्लेषणांची साधने समजतो.<br>● सामान्य आकाराची तुलनात्मक विवरणे आणि रोख प्रवाह विवरणे विद्यार्थ्यांना तयार करता येतील.<br>● लेखांकीय आणि विश्लेषणात्मक अनुपातांचा अर्थ,उद्देश आणि वर्गीकरणाची माहिती विद्यार्थ्यांना मिळेल. |
| १० | *या प्रकरणाचा अभ्यास केल्यानंतर विद्यार्थी सक्षम होतील :*<br>● संगणकीय लेखांकन व त्याचे घटक समजतो.<br>● संगणकीय लेखांकनाची वैशिष्ट्ये, महत्त्व आणि मर्यादा समजतो.<br>● लेखांकनाच्या विविध विवरणे संगणकाद्वारे समजून घेवू शकतो.<br>● विविध संगणकीय पॅकेजेस वापरण्यास सक्षम होतो. |

# अनुक्रमणिका


| घटक | शीर्षक | पान क्र |
|---|---|---|
| १ | भागीदारीची ओळख व भागीदारीची अंतिम खाती (Introduction of Partnership and Partnership Final Accounts) | १ |
| २ | नफा न कमविणाऱ्या संस्थांची खाती (Accounts of Not for Profit Concerns) | ६५ |
| ३ | भागीदारीची पुनर्रचना (Reconstitution of Partnership) भागीदाराचा प्रवेश (Admission of Partner) | १२९ |
| ४ | भागीदारीची पुनर्रचना (Reconstitution of Partnership) भागीदाराची निवृत्ती (Retirement of Partner) | १७२ |
| ५ | भागीदारीची पुनर्रचना (Reconstitution of Partnership) भागीदाराचा मृत्यू (Death of Partner) | १९५ |
| ६ | भागीदारीचे विसर्जन (प्रविलयन किंवा समाप्ती) (Dissolution of Partnership) | २१५ |
| ७ | विनिमय विपत्र किंवा हुंडी (Bills of Exchange) | २६१ |
| ८ | प्रमंडळ खाती (Company Accounts) भागांचे लेखांकन (Issue of Shares) | ३१८ |
| ९ | वित्तीय विवरणांचे विश्लेषण (Analysis of Financial Statement) | ३५७ |
| १० | लेखांकनात संगणकाचा उपयोग (Computer in Accounting) | ३९५ |
| | उत्तरसूची (Answer Key) | ४०५ |

# १. भागीदारीची ओळख व भागीदारीची अंतिम खाती
## (Introduction of Partnership and Partnership Final Accounts)

**अभ्यास घटक**

*१.१ भागीदारीचा अर्थ आणि व्याख्या*

*१.२ भारतीय भागीदारी कायदा १९३२.*

*१.३ भांडवल खात्याची पद्धती*

**क्षमता विधाने**

❑ *या प्रकरणाचा अभ्यास केल्यानंतर विद्यार्थी सक्षम होतील :*

- *भागीदारीचा अर्थ व वैशिष्ट्ये समजून घेण्यास.*
- *भागीदारी कायदा १९३२ च्या तरतुदी समजून घेण्यास.*
- *भागीदारी कराराचे अर्थ व महत्त्व ओळखण्यास.*
- *भागीदारी कराराचे अभावी लागू होणाऱ्या तरतुदी समजण्यास.*
- *भागीदारांची भांडवल खाती कशा प्रकारे ठेवली जातात याची माहिती मिळण्यास.*

### प्रास्ताविक (Introduction) :

एकल स्वामित्व व्यवसायाला मर्यादा असतात जसे मर्यादित भांडवल, मर्यादित व्यवस्थापन अर्हता, अमर्याद देयता, स्थैर्य नसणे, विशेषिकरणाचा अभाव इत्यादी म्हणून जेव्हा व्यवसाय सुरळीत सुरू होतो तेव्हा जास्त भांडवल आणि जास्त धोका संभवतो, दोन किंवा अधिक व्यक्तींनी एकत्र येऊन तो कमी करता येतो ते भांडवल विभागण्यास तयार असतात, व्यवस्थापन व धोका आणि व्यवसायातील नफा विभागण्यास तयार असतात त्याला भागीदारी असे म्हणतात. भागीदारी संस्थेत सहभागी होण्याऱ्या व्यक्तीला "भागीदार" असे म्हणतात. त्या व्यक्तीच्या परस्परातील संबंधाना "भागीदारी संस्था" म्हणतात.

### १.१ भागीदारीचा अर्थ आणि व्याख्या (Meaning and Definition of Partnership) :

भागीदारी ही एक व्यवसाय संघटना आहे. ही दोन किंवा जास्त व्यक्तीची संघटना होय. भागीदारीत या सर्व व्यक्ती व्यवसाय करण्याच्या हेतूने आणि व्यवसायातील नफा तोटा आपसात वाटून घेण्याच्या हेतूने एकत्रित येतात.




### व्याख्या (Definition) :

भारतीय भागीदारी कायदा १९३२ कलम ४ नुसार- "सर्वांनी किंवा सर्वांतर्फे एकाने चालविलेल्या व्यवसायातील नफ्याची आपसात वाटणी करण्याचे ज्या व्यक्तींनी मान्य केले आहे त्या व्यक्तींच्या परस्परातील संबंधांना भागीदारी असे म्हणतात."

**प्रो. हॅन्डी** यांच्यामते,"करार करण्यास सक्षम असणारे आणि जे सर्वांनी मिळून कायदेशीर व्यवसायाचे माध्यमाने नफा प्राप्त करण्याचे हेतूने एका पेक्षा अधिक व्यक्ती एकत्रित येत असतील तर त्यांचेमधे प्रस्थापित होणाऱ्या संबंधाला भागीदारी असे म्हणतात."

**भागीदारीची वैशिष्ट्ये (Features of Partnership Firm)**




१) **करार (Agreement):-** भागीदारीची निर्मिती ही करारातून होते. हा करार लेखी किंवा तोंडी असू शकतो. भविष्यकालीन संघर्ष टाळण्यासाठी भागीदारी करार हा लिखित स्वरूपात असणे हितावह ठरते. या लेखी करारालाच भागीदारी विलेख/करार (Partnership Deed) असे म्हणतात.

२) **भागीदारांची संख्या (Number of Partners) :-** भागीदारी संस्थेच्या निर्मितीसाठी कमीत कमी दोन सभासदांची आवश्यकता असते. आणि जास्तीत जास्त संख्या ही ५० एवढी असू शकते. (कंपनी कायदा २०१३, सुधारीत २०१४ अनुसार)

३) **कायदेशीर व्यवसाय (Lawful business) :-** भागीदारी ही कायद्याने परवानगी असलेल्या व्यवसायाचे संचालन करू शकते. अवैध व्यवसाय हे कायदयाने मान्य नाही. भागीदारी संस्थेच्या व्याख्येत सुद्धा कोणत्याही अवैध संघटनेला मान्यता नाही.

४) **नफा तोटा विभागणी (Sharing of Profit and Losses) :-** भागीदारीचा हेतू जास्तीत जास्त नफा कमविणे हा असतो. भागीदारी करारामध्ये नफा/वाटपाचे प्रमाण हे दिलेले असते. सर्व भागीदार हे त्याच प्रमाणात नफा तोटा वाटून घेतील असे अपेक्षित असते. जर भागीदारी करारामध्ये नफा तोटा वाटपाचे प्रमाण दिले नसेल तर सर्व भागीदार नफा-तोटा समान प्रमाणात वाटून घेतील.

५) **अमर्यादित जबाबदारी (Unlimited Liability) :-** सर्व भागीदारांची जबाबदारी अमर्यादित असते. सांघिकपणे व वैयक्तीकपणे जो पर्यंत तो स्वतः जवळील पैसे देण्यास समर्थ असेल. म्हणजे जेव्हां व्यवसायातील देणी फेडण्यासाठी व्यवसायाची संपत्ती अपुरी पडत असेल तेव्हां बाह्य देयतांची परतफेड करण्यासाठी भागीदारांच्या वैयक्तिक संपत्तीचाही उपयोग केला जाऊ शकतो.

६) **नोंदणी (Registrations) :-** भागीदारी संस्थेची नोंदणी ही अनिवार्य नाही. परंतु महाराष्ट्र राज्यामध्ये १ एप्रिल २००५ पासून अनिवार्य करण्यात आली आहे. भारतीय भागीदारी कायदा १९३२ नुसार भागीदारीची नोंदणी ही ऐच्छिक आहे. भागीदारी कराराची नोंदणी करणे हे कायदयाचे दृष्टीने सुरक्षित ठरते.

७) **संयुक्त मालकी आणि व्यवस्थापन (Joint Ownership & Management) :-** संस्थेच्या संपत्तीमध्ये प्रत्येक भागीदाराची मालकी संयुक्त असते. कोणताही भागीदार संस्थेच्या संपत्तीचा उपयोग वैयक्तिक उपयोगासाठी करू शकत नाही. सर्व भागीदारांना समान अधिकार असतात. म्हणून सर्व भागीदार संयुक्तपणे संस्थेच्या व्यवस्थापनाला जबाबदार असतात.

८) **प्रधान आणि अभिकर्ता (Principal and Agent) :–** भागीदारी व्यवसायात सर्व भागीदार प्रधान आणि अभिकर्ता म्हणून किंवा सर्वांचे वतीने त्यांचे पैकीच कुणी एक व्यवसायाचे संचालन करू शकतो. म्हणजेच प्रत्येक भागीदार हा संस्थेचा प्रधान त्याच बरोबर अभिकर्ता या नात्याने कार्य करीत असतो.


९) **विसर्जन (Dissolution) :–** विसर्जन म्हणजे भागीदारी व्यवसाय बंद करणे होय. कोणताही भागीदार व्यवसाय विसर्जना करीता सक्रीय भाग घेऊ शकतो. जर एखाद्या भागीदाराला भागीदारी व्यवसाय बंद करावा वाटला तर तो १४ दिवस अगोदर सूचना (Notice) देऊन भागीदारी संस्था विसर्जित करू शकतो. भागीदाराचा मृत्यू, निवृत्ती किंवा भागीदार नादार घोषीत झाल्यास भागीदारी संस्था विसर्जित होऊ शकते.

## भागीदारीचा करार (Partnership Deed)

**भागीदारीच्या लिखित कराराला भागीदारी विलेख असे म्हणतात.** यामध्ये भागीदारीच्या अटी व नियम दिलेले असतात. ज्यामुळे संस्थेचे अंतर्गत व्यवस्थापन सुरळीत सुरू राहते. भागीदारांचे आपसातील संबंध भागीदारी कराराचे साहाय्यानेच नियंत्रीत केले जातात.

भागीदारी करार लिखित स्वरूपातच असावा अशी सक्ती नाही. काही वेळा भागीदारांमध्ये वाद निर्माण झाल्यास लिखित भागीदारी कराराचा सर्व भागीदारांना उपयोग होतो. भागीदारी लिखित करारात अटी व नियम असतात, ज्यामुळे संस्थेचे अतंर्गत व्यवस्थापन सुरळीत चालते. एका अर्थाने भागीदारी संस्थेची ही नियमावली असते.

**भागीदारीचा करार**


भारतीय गैर न्यायिक
एक सौ रुपये
Rs. 100
ONE HUNDRED RUPEES
रु. 100
भारत INDIA
INDIA NON JUDICIAL
02AB 335525

Deed of Partnership

This deed of partnership is made on [Date. Month. Year] between:

1. [First Partner's Name], [Son/Daughter] of [Mr. Father's Name], residing at [Address Line 1, Address Line 2, City, State, Pin Code] hereinafter referred to as FIRST PARTNER.
2. [Second Partner's Name], [Son/Daughter] of [Mr. Father's Name], residing at [Address Line 1, Address Line 2, City, State, Pin Code] hereinafter referred to as SECOND PARTNER.
3. [Third Partner's Name], [Son/Daughter] of [Mr. Father's Name], residing at [Address Line 1, Address Line 2, City, State, Pin Code] hereinafter referred to as THIRD PARTNER.
4. [Fourth Partner's Name], [Son/Daughter] of [Mr. Father's Name], residing at [Address Line 1, Address Line 2, City, State, Pin Code] hereinafter referred to as FOURTH PARTNER.

## भागीदारी करारातील घटक (Contents of the Partnership Deed)

१) भागीदारी संस्थेचे नाव, पत्ता आणि मुख्य व्यवसाय.
२) भागीदारांची नावे पत्ते आणि भागीदारीतील कालावधी.
३) सर्व भागीदारांचे भांडवल योगदान.
४) भागीदारांचे नफा – तोटा विभाजनाचे प्रमाण.
५) भागीदारांचे अधिकार, कर्तव्ये आणि देयता
६) भागीदारांच्या प्रवेश, निवृत्ती, मृत्यू इ. संबंधी प्रक्रिया.
७) भांडवल, कर्ज, उचल यावर व्याजाचा दर.
८) भागीदाराला दिले जाणारे वेतन, कमिशन इत्यादी.
९) भागीदारीच्या विसर्जनाची प्रक्रिया आणि विसर्जनानंतर खात्याचे हिशेब चुकते करणे.
१०) भागीदारामधील वाद (तंटा) निवारण करण्याची पद्धती.
११) सर्व भागीदारांना मान्य असलेल्या इतर अटी किंवा शर्ती.

## भागीदारी कराराचे महत्त्व (Importance of Partnership Deed)

भागीदारातील करार हा फार महत्वाचा दस्तऐवज आहे. कारण हा लेखी करार आहे ज्यामध्ये भागीदारी संबंधी सर्व शर्ती व अटी असतात. त्याचबरोबर भागीदारी करारामध्ये भागीदारांचे अधिकार, कर्तव्य, दायित्व यांचा समवेश असतो. भविष्यात जर भागीदारांमध्ये काही वाद निर्माण झाल्यास ते सोडविण्यास मदत हाते.

म्हणून भागीदारी करार लेखी स्वरूपात असावा. भागीदारी कायदा १९३२ नुसार भागीदारी करारावर सर्व भागीदारांच्या सह्या असाव्यात.

## १.२ भारतीय भागीदारी कायदा १९३२ नुसार तरतुदी :

भागीदारीसंस्था उभारणीच्या वेळी तयार करण्यात येणाऱ्या दस्तऐवजाला भागीदारीचा करार असे म्हणतात. आणि त्यात सर्व शर्ती व अटी समाविष्ट असतात परंतु भागीदारी कराराचे अभावी किंवा एखादया पदासंबंधी भागीदारीचा करार मौन असेल तर अशा प्रसंगी भारतीय भागीदारी कायदा १९३२ मधील तरतुदी लागू होतात. आधिनियम १२ आणि १७ मधील काही महत्वाच्या तरतुदी पुढील प्रमाणे –

२) **नफ्याचे वितरण (Distribution of profit) :** भागीदारीच्या करारामध्ये नफा वाटपाच्या प्रमाणाचा उल्लेख नसल्यास सर्व भागीदार हे समान मानले जातात आणि ते नफा-तोटा समप्रमाणात विभाजीत करतील, परंतु जर भागीदारीच्या करारामध्ये नफा तोटा विभाजनाचे प्रमाण देण्यात आले असेल तर त्या प्रमाणातच भागीदारांना नफा तोटा विभाजीत करण्यात येईल.

२) **उचलीवर व्याज (Interest on drawing) :** भारतीय भागीदारी कायदा १९३२ मध्ये भागीदारांनी केलेल्या उचल रकमेवर व्याज आकारणीसंबंधी कोणतीही तरतूद नाही. जेव्हा उचल करण्यात आलेली एकूण रक्कम दिलेली असेल परंतु उचल केल्याच्या रकमेच्या तारखा दिलेल्या नसतील, तेव्हा व्याजाची आकारणी करतांना ६ महिने एवढा कालावधी विचारात घ्यावा.

३) **भागीदाराकडून घेतलेल्या कर्जावर व्याज (Interest on partner loan) :** भागीदारी कायद्याप्रमाणे संस्थेने भागीदारांकडून कर्ज किंवा अग्रिम घेतले असल्यास त्यावर ६% वार्षिक दराने व्याज दिले जाईल.


४) **भांडवलावर व्याज (Interest on capital) :** भागीदारी करारात जर भांडवलावरील व्याजाचा उल्लेख नसेल तर भांडवलावर व्याज आकारले जात नाही.

५) **भागीदारांना वेतन किंवा कमिशन (Salary or commission to Partners) :** भागीदारी कायदा १९३२ प्रमाणे एखाद्या भागीदाराने संस्थेकरीता अतिरीक्त काम केले असेल तरीदेखील कोणतेच प्रकारचे वेतन किंवा कमिशन देण्यात येऊ नये.परंतु जर भागीदारी कारारामध्ये या संबंधी विशेष तरतूद करण्यात आली असेल तर करारा प्रमाणे भागीदाराना वेतन किंवा कमिशन देता यईल.

६) **नवीन भागीदाराचा प्रवेश (Admission of a new partner) :** एखाद्या नवीन भागीदाराला सर्व भागीदारांच्या संमतीने भागीदारीत प्रवेश दिला जाऊ शकतो.

## १.३ भांडवल खात्याच्या पद्धती (Methods of Capital Accounts)

भागीदाराने रोख किंवा वस्तूच्या स्वरूपात व्यवसायात गुंतविलेल्या रकमेला भागीदाराचे भांडवल असे म्हणतात. भागीदार भांडवल खात्याच्या कोणत्याही पद्धतीचा वापर करू शकतात.



**भांडवल खात्याच्या दोन पद्धती खालील प्रमाणे :**

### स्थिर भांडवल पद्धत (Fixed Capital Method) :

या पद्धतीत आर्थिक वर्षाच्या शेवटी भागीदाराचे भांडवल स्थिर राहते. वर्षभरात भांडवलात वाढ किंवा घट होत नाही.जेव्हा या पद्धतीचा अवलंब करतात तेंव्हा भागीदारांचे चालू खाते उघडले जाते आणि भागीदाराच्या भांडवला संबंधीच्या सर्व समायोजना या खात्यात केल्या जातात. उदा.-उचल, उचलीवरील व्याज, अतिरिक्त भांडवल, भांडवलावरील व्याज, भागीदाराचे वेतन, कमिशन, दलाली, नफा-तोट्यातील हिस्सा हे सर्व भागीदाराच्या चालू खात्यात नोंदविले जातात.

**भागीदारचे संयुक्त भांडवल खाते**

**नावे** **जमा**

| दिनांक | विवरण | 'क्ष' (₹) | 'य' (₹) | दिनांक | विवरण | 'क्ष' (₹) | 'य' (₹) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ... | शिल्लक पु/ने | xxx | xxx | ... | शिल्लक पु/आ | xxx | xxx |
| | | | | | रोख/बँक खाते [अतिरीक्त भांडवल] | xxx | xxx |
| | | | | | संपत्ती खाते [वस्तू स्वरूपात भांडवल] | xxx | xxx |
| | एकूण | xxx | xxx | | एकूण | xxx | xxx |
| | | | | ... | शिल्लक पुढे आणली | xxx | xxx |

**रोजकिर्द नोंदी**

**१) जेव्हा भागीदारा द्वारे अतिरिक्त भांडवल गुंतविले जाते**

रोख / बँक खाते ............................................ नावे

भागीदाराच्या भांडवल खात्याला

[अतिरिक्त भांडवल व्यवसायात गुंतविल्याबद्दल]

**२) जेव्हा भागीदाराव्दारे भांडवलाची रक्कम ही संपत्तीचे स्वरूपात आणली जाते**

संपत्ती खाते ............................................... नावे

भागीदाराचे भांडवल खात्याला

[अतिरिक्त भांडवल हे वस्तू स्वरूपात आणल्याबद्दल]

**३) जेव्हा भागीदार भांडवलाच्या काही रकमेची उचल करतात :**

भागीदाराचे भांडवल खाते .................................... नावे

रोख / बँक खात्याला

[भागीदाराने रकमेची उचल केल्याबद्दल]

### भागीदारांचे चालू खाते (Partner's Current Accounts):

जेव्हा भागीदार स्थिर भांडवल पद्धतीचा अवलंब करतात तेव्हा त्यांचे 'चालू खाते' उघडण्यात येते. या खात्यात भांडवलासंबंधीच्या सर्व समायोजनांच्या नोंदी केल्या जातात. भागीदाराच्या चालू खात्यात नावे किंवा जमा शिल्लक असू शकते.

१) भागीदारांनी चालू आर्थिक वर्षात व्यवसायामधून स्वतःचे उपयोगाकरीता रकमेची केलेली उचल

२) भागीदाराने व्यवसायामधून स्वतःचे उपयोगाकरीता घेतलेल्या वस्तू म्हणजेच वस्तू स्वरूपात केलेली उचल.

३) भागीदारांचे भांडवलावर व्याज संस्थेने मान्य केल्यास.

४) भागीदारांनी 'उचल' म्हणून घेतलेल्या रकमेवर व्याज.

५) भागीदाराचे वेतन किंवा कमिशन.

६) शुद्ध नफा किंवा शुद्ध तोट्याचे वितरण.

**भागीदाराचे चालू खाते (प्रारूप) :**

**नावे** **जमा**

| विवरण | 'क्ष' (₹) | 'य' (₹) | विवरण | 'क्ष' (₹) | 'य' (₹) |
|---|---|---|---|---|---|
| शिल्लक पु/आ (नावे शिल्लक) | xxx | xxx | शिल्लक पु/आ (जमा शिल्लक) | xxx | xxx |
| उचल | xxx | xxx | भांडवलावर व्याज खाते | xxx | xxx |
| उचलीवरील व्याज | xxx | xxx | वेतन खाते | xxx | xxx |
| नफा तोटा खाते (तोटा) | xxx | xxx | कमिशन खाते | xxx | xxx |
| शिल्लक पु/ने | xxx | xxx | नफा तोटा खाते (नफा) | xxx | xxx |
| | | | शिल्लक पु/नेली | xxx | xxx |
| | xxx | xxx | | xxx | xxx |
| शिल्लक पु/आ | xxx | xxx | शिल्लक पु/आणली | xxx | xxx |

**रोजकीर्द नोंदी**

**१) भागीदाराचे भांडवलावर द्यावयाचे व्याज**

अ) भांडवलावर व्याज खाते ........................................ नावे xxx

भागीदाराचे चालू खात्याला/ भांडवल खात्याला xxx

[भांडवलावरील व्याज चालू / भांडवल खात्याला स्थानांतरित केल्याबद्दल]

ब) नफा – तोटा खाते........................................ नावे xxx

भांडवलावर व्याज खात्याला

[भांडवलावरील व्याज नफा–तोटा खात्याला हस्तांतर]

**२) भागीदारांना द्यावयाचे वेतन / कमिशन**

अ) वेतन / कमिशन खाते........................................ नावे xxx

भागीदाराचे चालू खात्याला/ भांडवल खात्याला xxx

[वेतन / कमिशन चालू भांडवल / खात्याला जमा केल्याबद्दल]

ब) नफा – तोटा खाते........................................ नावे xxx

वेतन / कमिशन खात्याला xxx

[भागीदारांचे वेतन / कमिशन / नफा – तोटा खात्याला हस्तांतर]

**३) भागीदाराने वैयक्तिक उपयोगाकरिता रोख / वस्तू घेतल्यास.**

अ) उचल खाते ........................................ नावे xxx

रोख / वस्तू खात्याला xxx

[वैयक्तिक उपयोगाकरिता रोख / वस्तूची उचल केल्याबद्दल]

ब) भागीदाराचे चालू खाते ........................................ नावे xxx

उचल खात्याला xxx

[उचल खात्याची शिल्लक चालू खात्याला स्थानांतरित केल्याबद्दल]

## ४) भागीदाराच्या उचलीवर व्याजाची आकारणी

| | | |
|---|---|---|
| अ) भागीदाराचे चालू भांडवल खाते........................................नावे | XXX | |
| उचलीवर व्याज खात्याला | | XXX |
| [भागीदाराच्या उचलीवर व्याज आकारल्याबद्दल] | | |
| ब) उचलीवर व्याज खाते ................................................... नावे | XXX | |
| नफा-तोटा खात्याला | | XXX |
| [उचलीवरील व्याज नफा-तोटा खात्याला स्थानांतरित केल्याबद्दल] | | |

## ५) शुद्ध नफ्याचे वितरण

| | | |
|---|---|---|
| नफा-तोटा खाते ........................................................नावे | XXX | |
| भागीदाराचे चालू खात्याला | | XXX |
| [शुद्ध नफा भागीदाराच्या चालू खात्याला स्थानांतरित केल्याबद्दल] | | |

## ६) शुद्ध तोट्याचे वितरण :

| | | |
|---|---|---|
| भागीदाराचे चालू खाते ....................................................नावे | XXX | |
| नफा-तोटा खात्याला | | XXX |
| [शुद्ध तोटा भागीदाराच्या चालू खात्याला स्थानांतरित केल्याबद्दल] | | |

**नफा – तोटा खाते**

**नावे** **जमा**

| विवरण | 'क्ष' (₹) | 'य' (₹) | विवरण | 'क्ष' (₹) | 'य' (₹) |
|---|---|---|---|---|---|
| भांडवलावरील व्याज खाते | | XXX | उचलीवरील व्याज खाते | | XXX |
| भागीदाराचे वेतन खाते/ | | XXX | | | |
| भागीदाराचे कमिशन खाते | | XXX | | | |
| | | XXX | | | XXX |

## अस्थिर भांडवल पद्धत:

या पद्धतीमध्ये भागीदाराच्या भांडवलाची शिल्लक ही दरवर्षी बदलते. या पद्धतीला अस्थिर भांडवल पद्धती असे म्हणतात. या पद्धतीमध्ये भागीदाराचे चालू खाते उघडण्याची आवश्यकता नसते. म्हणून भागीदाराशी संबंधित सर्व समायोजना भागीदाराच्या भांडवल खात्यातच नोंदविले जातात.

१) भागीदाराच्या भांडवलाची प्रारंभिक शिल्लक

२) भागीदारांनी आणलेले अतिरिक्त भांडवल.

३) भागीदारांना देय असलेले वेतन / कमिशन

४) भागीदारांच्या भांडवलावर व्याज

५) भागीदारांनी वर्षभरात कलेली उचल आणि उचल रकमेवर व्याज

६) भांडवलाच्या रकमेतून करण्यात आलेली उचल

७) संस्थेच्या शुद्ध नफा किंवा शुद्ध तोट्याचे वितरण

**अस्थिर भांडवल पद्धती अंतर्गत नमूना.**

**भागीदारांचे भांडवल खाते**

**नावे** **जमा**

| विवरण | 'क्ष' (₹) | 'य' (₹) | विवरण | 'क्ष' (₹) | 'य' (₹) |
|---|---|---|---|---|---|
| शिल्लक पु/आ | xxx | xxx | शिल्लक पु/आ (जमा शिल्लक) | xxx | xxx |
| (नावे शिल्लक असल्यास) | | | रोख / बँक खाते [अतिरिक्त भांडवल] | xxx | xxx |
| उचल खाते | xxx | xxx | भांडवलावर व्याज खाते | | |
| उचलीवर व्याज खाते | xxx | xxx | वेतन खाते | xxx | xxx |
| नफा तोटा खाते (तोटा) | xxx | xxx | कमिशन खाते | xxx | xxx |
| शिल्लक पु/ने | xxx | xxx | नफा तोटा खाते (नफा) | xxx | xxx |
| | xxx | xxx | | xxx | xxx |
| | | | शिल्लक पुढे आणली | xxx | xxx |

**उदाहरण १ :** आनंद आणि भरत हे २ : ३ या प्रमाणात नफा तोटा विभागून घेणारे भागीदार आहेत. ०१.०४.२०१९ रोजी त्यांच्या भांडवल खात्याच्या शिलका पुढील प्रमाणे होत्या. आनंद ₹.६०,००० आणि भरत ₹. ३०,००० त्यांची उचल ही अनुक्रमे ₹.१२,००० आणि ₹.१०,००० होती. भागीदारी करारानुसार भांडवलावर १०% व्याज दिले जाईल आणि उचलीवर १२% वार्षिक दराने व्याज आकारले जाईल. आनंदला दरमहा ₹.२,५०० प्रमाणे वेतन मिळेल आणि भरतला शुद्ध विक्रीवर ३% कमिशन प्राप्त करण्याचा अधिकार आहे. शुद्ध विक्री ₹.५,००,००० आहे. तसेच वितरण योग्य नफा ₹.६०,००० आहे.

३१ मार्च, २०२० रोजी संपणाऱ्या वर्षाकरिता भागीदाराचे भांडवल खाते पुढील प्रमाणे तयार करा.

१) स्थिर भांडवल पद्धती २) अस्थिर भांडवल पद्धती

**उत्तर : १) स्थिर भांडवल पद्धती**

**नावे** **भागीदारांचे भांडवल खाते** **जमा**

| विवरण | आनंद (₹) | भरत (₹) | विवरण | आनंद (₹) | भरत (₹) |
|---|---|---|---|---|---|
| शिल्लक पु/ने | ६०,००० | ३०,००० | शिल्लक पु/आ | ६०,००० | ३०,००० |
| | ६०,००० | ३०,००० | | ६०,००० | ३०,००० |

**नावे** **भागीदारांचे चालू खाते** **जमा**

| विवरण | आनंद (₹) | भरत (₹) | विवरण | आनंद (₹) | भरत (₹) |
|---|---|---|---|---|---|
| उचल खाते | १२,००० | १०,००० | भांडवलावर व्याज खाते | ६,००० | ३,००० |
| उचलीवर व्याज खाते | ७२० | ६०० | वेतन खाते | ३०,००० | |
| शिल्लक पु/ने | ४७,२८० | ४३,४०० | कमिशन खाते | | १५,००० |
| | | | नफा तोटा खाते | २४,००० | ३६,००० |
| | ६०,००० | ५४,००० | | ६०,००० | ५४,००० |

## २) अस्थिर भांडवल पद्धती

नावे **भागीदारांचे भांडवल खाते** जमा

| विवरण | आनंद (₹) | भरत (₹) | विवरण | आनंद (₹) | भरत (₹) |
|---|---|---|---|---|---|
| उचल खाते | १२,००० | १०,००० | शिल्लक पु/आ | ६०,००० | ३०,००० |
| उचलीवर व्याज खाते | ७२० | ६०० | भांडवलावर व्याज खाते | ६,००० | ३,००० |
| शिल्लक पु/ने | १,०७,२८० | ७३,४०० | वेतन खाते | ३०,००० | |
| | | | कमिशन खाते | | १५,००० |
| | | | नफा तोटा खाते | २४,००० | ३६,००० |
| | १,२०,००० | ८४,००० | | १,२०,००० | ८४,००० |

**स्पष्टीकरणात्मक टीपा :**

### १) भांडवलावर व्याज

आनंद $६०,००० \times \frac{१०}{१००} = ₹\ ६,०००$

भरत $३०,००० \times \frac{१०}{१००} = ₹\ ३,०००$

### २) उचलीवर व्याज

आनंद $१२,००० \times \frac{१२}{१००} \times \frac{६}{१२} = ₹\ ७२०$

भरत $१०,००० \times \frac{१२}{१००} \times \frac{६}{१२} = ₹\ ६००$

(उचल केल्याची तारीख दिली नसल्यामुळे ६ महिन्याचे व्याज विचारात घ्यावे.)

### ३) आनंदला वेतन

दरमहा ₹ २,५००

$२५०० \times १२ = ₹\ ३०,०००$.

### ४) भरतला विक्रीवर कमिशन

शुद्‌ध विक्री ₹ ५,००,०००

$५,००,००० \times \frac{३}{१००} = ₹\ १५,०००$.

### ५) नफ्याचे वितरण

शुद्‌ध नफा ₹ ६०,०००

आनंदचा हिस्सा

$६०,००० \times \frac{२}{५} = ₹\ २४,०००$

भरतचा हिस्सा

$६०,००० \times \frac{३}{५} = ₹\ ३६,०००$

**उदाहरण २ :** करण आणि किरण मेहता एंटरप्रायजेसचे भागीदार आहेत. त्यांनी १ एप्रिल २०१९ रोजी तयार कापडाचा व्यवसाय सुरू केला. त्यासाठी त्यांनी प्रत्येकी ₹५,००,००० भांडवल गुंतविले. त्यांनी व्यवसायातून खाजगी उपयोगाकरीता करण यांनी ₹२०,००० आणि किरण यांनी ₹१५,००० उचल केली. भागीदारी करारानुसार भांडवलावर १२% वार्षिक दराने व्याज दिले जाईल आणि उचलीवर ३% वार्षिक दराने व्याज आकारले जाईल. करणला दरमहा ₹१,८०० प्रमाणे वेतन मिळेल आणि किरण यांना शुद्ध विक्रीवर ५%. कमिशन प्राप्त करण्याचा अधिकार आहे. वर्षभरातील शुद्ध विक्री ₹२,५०,००० असून वर्षभरातील शुद्ध नफा ₹६०,००० आहे.

भागीदाराचे भांडवल खाते पुढील प्रमाणे तयार करा.

**(१) स्थिर भांडवल पद्धत (२) अस्थिर भांडवल पद्धत**

**उत्तर :** **मेहता एंटर प्रायजेसच्या पुस्तकात**

## १) स्थिर भांडवल पद्धत

**नावे** **भागीदारांचे भांडवल खाते** **जमा**

| विवरण | करण (₹) | किरण (₹) | विवरण | करण (₹) | किरण (₹) |
|---|---|---|---|---|---|
| शिल्लक पु/ने | ५,००,००० | ५,००,००० | रोख / बँक खाते | ५,००,००० | ५,००,००० |
| | ५,००,००० | ५,००,००० | | ५,००,००० | ५,००,००० |

**नावे** **भागीदारांचे चालू खाते** **जमा**

| विवरण | करण (₹) | किरण (₹) | विवरण | करण (₹) | किरण (₹) |
|---|---|---|---|---|---|
| उचल खाते | २०,००० | १५,००० | भांडवलावर व्याज खाते | ६०,००० | ६०,००० |
| उचलीवर व्याज खाते | ३०० | २२५ | वेतन खाते | २१,६०० | |
| शिल्लक पु/ने | ९१,३०० | ८७,२७५ | कमिशन खाते | | १२,५०० |
| | | | नफा तोटा खाते | ३०,००० | ३०,००० |
| | १,११,६०० | १,०२,५०० | | १,११,६०० | १,०२,५०० |

## २) अस्थिर भांडवल पद्धत

**नावे** **भागीदारांचे भांडवल खाते** **जमा**

| विवरण | करण (₹) | किरण (₹) | विवरण | करण (₹) | किरण (₹) |
|---|---|---|---|---|---|
| उचल खाते | २०,००० | १५,००० | रोख / बँक खाते | ५,००,००० | ५,००,००० |
| उचलीवर व्याज खाते | ३०० | २२५ | भांडवलावर व्याज खाते | ६०,००० | ६०,००० |
| शिल्लक पु/ने | ५,९१,३०० | ५,८७,२७५ | वेतन खाते | २१,६०० | |
| | | | कमिशन खाते | | १२,५०० |
| | | | नफा तोटा खाते | ३०,००० | ३०,००० |
| | ६,११,६०० | ६,०२,५०० | | ६,११,६०० | ६,०२,५०० |

**स्पष्टीकरणात्मक टीपा :**

**१) भांडवलावर व्याज :**

करणचे भांडवल : $५,००,००० \times \frac{१२}{१००} = ₹ ६०,०००$

किरणचे भांडवल : $५,००,००० \times \frac{१२}{१००} = ₹ ६०,०००$

२) **उचलीवरील व्याज**

करणची उचल : $२०,००० \times \frac{३}{१००} \times \frac{६}{१२} = ₹ ३००$

किरणची उचल : $१५,००० \times \frac{३}{१००} \times \frac{६}{१२} = ₹ २२५$

**उदाहरण ३ :** मेसर्स आनंद एंटरप्रायजेस मध्ये ३:२ या प्रमाणाला नफा-तोटा वाटून घेणारे श्री. अमेय आणि श्री. आशिष भागीदार आहेत. १ एप्रिल, २०१८ रोजी श्री. अमेय ₹१,००,००० आणि श्री. आशिष यांनी ₹५०,००० भांडवल खात्यावर शिल्लक होती. त्यांची उचल श्री. अमेय ₹२०,००० आणि श्री. आशिष यांनी ₹२५,००० होती. भागीदारी कराराप्रमाणे भांडवलावर १०% वार्षिक दराने व्याज दिले जाईल आणि उचल केलेल्या रकमेवर वार्षिक १२% दराने व्याज आकारले जाईल. श्री. अमेय यांना दरमहा ₹३,००० प्रमाणे वेतन मिळेल. आणि श्री. आशिष यांना विक्रीवर ५% प्रमाणे कमिशन मिळेल. विक्री ₹४,००,००० आहे. वितरण योग्य नफा ₹९०,०००.

**३१ मार्च, २०१९ रोजी संपणाऱ्या वर्षाकरिता भागीदाराचे भांडवल खाते पुढील प्रमाणे तयार करा.**

**(१) स्थिर भांडवल पद्धत, (२) अस्थिर भांडवल पद्धत**

**उत्तर :** **मेसर्स आनंद एंटरप्रायजेसच्या पुस्तकात**

१) **स्थिर भांडवल पद्धत**

**नावे** **भागीदारांचे भांडवल खाते** **जमा**

| विवरण | अमेय (₹) | आशिष (₹) | विवरण | अमेय (₹) | आशिष (₹) |
|---|---|---|---|---|---|
| शिल्लक पु/ने | १,००,००० | ५०,००० | शिल्लक पु/आ | १,००,००० | ५०,००० |
| | **१,००,०००** | **५०,०००** | | **१,००,०००** | **५०,०००** |

**नावे** **भागीदारांचे चालू खाते** **जमा**

| विवरण | अमेय (₹) | आशिष (₹) | विवरण | अमेय (₹) | आशिष (₹) |
|---|---|---|---|---|---|
| उचल खाते | २०,००० | २५,००० | भांडवलावर व्याज खाते | १०,००० | ५,००० |
| उचलीवर व्याज खाते | १,२०० | १,५०० | वेतन खाते | ३६,००० | |
| शिल्लक पु/ने | ७८,८०० | ३४,५०० | कमिशन खाते | | २०,००० |
| | | | नफा तोटा खाते | ५४,००० | ३६,००० |
| | १,००,००० | ६१,००० | | १,००,००० | ६१,००० |

२) **अस्थिर भांडवल पद्धत**

**नावे** **भागीदारांचे भांडवल खाते** **जमा**

| विवरण | अमेय (₹) | आशिष (₹) | विवरण | अमेय (₹) | आशिष (₹) |
|---|---|---|---|---|---|
| उचल खाते | २०,००० | २५,००० | शिल्लक पु/आ | १,००,००० | ५०,००० |
| उचलीवर व्याज खाते | १,२०० | १,५०० | भांडवलावर व्याज खाते | १०,००० | ५,००० |
| शिल्लक पु/ने | १,७८,८०० | ८४,५०० | वेतन खाते | ३६,००० | |
| | | | कमिशन खाते | | २०,००० |
| | | | नफा तोटा खाते | ५४,००० | ३६,००० |
| | २,००,००० | १,११,००० | | २,००,००० | १,११,००० |

**स्पष्टीकरणात्मक टीपा :**

**१) भांडवलावर व्याज :**

श्री. अमेय = $१,००,००० \times \frac{१०}{१००}$ = ₹ १०,०००

श्री. आशिष = $५०,००० \times \frac{१०}{१००}$ = ₹ ५,०००

**२) उचलीवर व्याज :**

उचल केल्याल्या रकमेची तारीख दिली नाही म्हणून ६ महिन्याचे व्याज विचारात घ्यावे.

श्री. अमेय = $२०,००० \times \frac{१२}{१००} \times \frac{६}{१२}$ = ₹ १२००

श्री. आशिष = $२५,००० \times \frac{१२}{१००} \times \frac{६}{१२}$ = ₹ १५००

**३) नफा वितरण**

श्री. अमेयचा = $९०,००० \times \frac{३}{५}$ = ₹ ५४,०००

श्री. आशिषचा = $९०,००० \times \frac{२}{५}$ = ₹ ३६,०००

**उदाहरण ४ :** सन आणि मून भागीदार असून त्यांचे भांडवल अनुक्रमे ₹ १०,००,००० आणि ₹ ५,००,००० आहे. ते नफा तोटा ३ : २ प्रमाणात विभागून घेतात. पुढील दोन्ही प्रमाणे भांडवल खाते दर्शवा. (१) स्थिर भांडवल पद्धत, (२) अस्थिर भांडवल पद्धत चालू वर्षात त्यांनी अनुक्रमे ₹ २,२५,००० व ₹ १,५०,००० अतिरिक्त भांडवल गुंतविले.

**भागीदारांचे चालू खाते**

| तपशील | सन (₹) | मून (₹) |
|---|---|---|
| भांडवलावरील व्याज | ५ % | ५ % |
| उचल | २२,५०० | १५,००० |
| उचलीवरील व्याज | १,३५० | ९०० |
| पगार | १५,००० | |
| कमिशन | ७,५०० | ५,२५० |
| तोटा | ४५,००० | ३०,००० |

**उत्तर : १) अस्थिर भांडवल पद्धत**

**नावे** **भागीदारांचे भांडवल खाते** **जमा**

| तपशील | सन (₹) | मून (₹) | तपशील | सन (₹) | मून (₹) |
|---|---|---|---|---|---|
| उचल खाते | २२,५०० | १५,००० | शिल्लक पु/आ | १०,००,००० | ५,००,००० |
| उचलीवर व्याज खाते | १३५० | ९०० | रोख / बँक खाते | २,२५,००० | १,५०,००० |
| नफा तोटा खाते (तोटा) | ४५,००० | ३०,००० | भांडवलावर व्याज खाते | ५५,६२५ | २८,७५० |
| शिल्लक पु/ने | १२,३४,२७५ | ६,३८,१५० | पगार खाते | १५,००० | |
| | | | कमिशन खाते | ७,५०० | ५,२५० |
| | १३,०३,१२५ | ६,८४,००० | | १३,०३,१२५ | ६,८४,००० |

## २) स्थिर भांडवल पद्धत

**भागीदारांचे भांडवल खाते**

**नावे** **जमा**

| तपशील | सन (₹) | मून (₹) | तपशील | सन (₹) | मून (₹) |
|---|---|---|---|---|---|
| शिल्लक पु/आ | १२,२५,००० | ६,५०,००० | शिल्लक पु/आ | १०,००,००० | ५,००,००० |
| | | | रोख / बँक खाते (अतिरिक्त भांडवल) | २,२५,००० | १,५०,००० |
| | १२,२५,००० | ६,५०,००० | | १२,२५,००० | ६,५०,००० |

**भागीदारांचे चालू खाते**

**नावे** **जमा**

| तपशील | सन (₹) | मून (₹) | तपशील | सन (₹) | मून (₹) |
|---|---|---|---|---|---|
| उचल | २२,५०० | १५,००० | भांडवलावर व्याज | ५५,६२५ | २८,७५० |
| उचलीवर व्याज | १३५० | ९०० | भागीदारांचे वेतन | १५,००० | |
| नफा तोटा खाते (तोटा) | ४५,००० | ३०,००० | कमिशन | ७,५०० | ५,२५० |
| शिल्लक पु/ने | ९,२७५ | | शिल्लक पु/ने | | ११,९०० |
| | ७८,१२५ | ४५,९०० | | ७८,१२५ | ४५,९०० |

**भांडवलावर व्याज**

**सन –** ₹ १०,००,००० वर ५% प्रमाणे वर्षभरासाठी

$$= \frac{१०,००,००० \times ५}{१००} = ₹\ ५०,०००$$

₹ २,२५,००० वर ५% प्रमाणे ६ महिन्याचे व्याज

$$= \frac{२,२५,००० \times ५ \times ६}{१०० \times १२} = ₹\ ५,६२५$$

एकूण व्याज ₹ ५०,००० + ५,६२५ = ₹ ५५,६२५

**मून –** ₹ ५,००,००० वर ५% प्रमाणे वर्षभरासाठी

$$\frac{५,००,००० \times ५}{१००} = ₹\ २५,०००$$

₹ १,५०,००० वर ५% प्रमाणे ६ महिन्याचे व्याज

$$= \frac{१,५०,००० \times ५ \times ६}{१०० \times १२} = ₹\ ३,७५०$$

**एकूण व्याज २५,००० + ३,७५० = ₹ २८,७५०**

**टीप :**

१. चालू शिल्लक नावे किंवा जमा बाजूवर दर्शविली जाते.

२. जर काही सूचित केले नसेल तर अस्थिर भांडवल पद्धतीचा वापर केला जातो.

३. भागीदाराच्या कर्जावरील व्याज बाह्य देयता म्हणून गृहीत धरावी म्हणून भागीदाराच्या चालू खात्यावर जमा बाजूवर दर्शवावे. परंतु जर चालू खाते नसेल व अस्थिर भांडवल पद्धती असेल तर भागीदाराच्या भांडवल खात्याच्या जमा बाजूवर दर्शवावे.

**क्षमता विधाने –**

या प्रकरणाचे अध्ययन केल्यानंतर विद्यार्थ्यांना पुढील गोष्टीचे आकलन हाईल:–

- अंतिम खात्याचा अर्थ, गरज आणि महत्त्व.
- अंतिम खात्यामधील समायोजनांचे प्रभाव.
- व्यापार खाते, नफा तोटा खाते आणि ताळेबंदाचा अर्थ.
- व्यवसायाचे आर्थिक परिणाम कशा प्रकारे शोधावेत.

## भागीदारीची अंतिम खाती
## (Partnership Final Accounts)

**अभ्यास घटक (Contents) –**

२.१ प्रस्तावना आणि अंतिम खाती तयार करण्याची गरज

२.२ पुढील समायोजनांसह व्यापार खाते, नफा तोटा खाते व ताळेबंद तयार करणे.

१) वर्ष अखेरचा शिल्लक माल (संवरण स्कंध)
२) अदत्त खर्च
३) पूर्वदत्त खर्च
४) पूर्वप्राप्त उत्पन्न
५) येणे उत्पन्न
६) बुडीत कर्ज
७) संशयित कर्जनिधीसाठी तरतूद
८) ऋणको आणि धनकोवर कसरनिधी
९) घसारा
१०) भांडवल, उचल आणि कर्ज यावरील व्याज.
११) गुंतवणूक आणि दिलेल्या कर्जावर व्याज.
१२) आगीमुळे/अपघातामुळे माल नष्ट होणे (विमा काढलेला व विमा न काढलेला)
१३) चोरीस गेलेला माल
१४) मोफत नमुना म्हणून वितरित केलेला माल
१५) भागीदारांनी केलेली मालाची उचल
१६) नोंद न करण्यात आलेली खरेदी आणि विक्री
१७) महसुली खर्चाचा भांडवली खर्चात समावेश व भांडवली खर्चाचा महसुली खर्चात समावेश होणे
१८) प्राप्य विपत्राचे अनादरण
१९) देय विपत्रांचे अनादरण
२०) आस्थागित खर्च

२१) भांडवली प्राप्तीचा समावेश महसुली प्राप्तीत होणे व महसुली प्राप्तीचा समावेश भांडवली प्राप्तीत होणे

२२) सक्रिय भागीदारांना ढोबळ नफ्याच्या, शुद्ध नफ्याच्या किंवा विक्रीच्या आधारावर देण्यात येणारे कमिशन.

## २.१ प्रस्तावना :

एकल व्यापारी संस्थेप्रमाणेच भागीदारी संस्थेलादेखील एका विशिष्ट तारखेला आपल्या व्यवसायाची वित्तीय स्थिती जाणून घेण्यासाठी अंतिम खाती तयार करावी लागतात. अंतिम खाती तयार करणे हा लेखांकनाचा शेवटचा टप्पा आहे.लेखांकनाचे विभिन्न टप्पे हे पुढील प्रमाणे असतात.

### लेखांकनाचे विभिन्न टप्पे :

रोजकिर्द/सहाय्यक पुस्तके तयार करणे.

खतावणी करणे.

तेरीज पत्रक समायोजनांसह तयार करणे.

अंतिम खाती तयार करणे.

↓

अ) व्यापार खाते ब) नफा तोटा खाते क) ताळेबंद

आयकर अधिनियम कायदा १९६१ नुसार प्रत्येक आर्थिक वर्ष १ एप्रिलला सुरू होऊन ३१ मार्चला संपते.

### अंतिम खाती तयार करण्याची आवश्यकता :

खालील विविध कारणांसाठी अंतिम खाती तयार करण्यात येतात.

१. व्यवसायातील ढोबळ नफा किंवा ढोबळ तोटा शोधून काढणे.

२. व्यवसायातील शुद्ध नफा किंवा शुद्ध तोटा शोधून काढणे.

३. आर्थिक वर्षाच्या शेवटी व्यवसायाची आर्थिक स्थिती जाणून घेणे.

४. ऋणको आणि धनकोची रक्कम शोधून काढणे.

५. भविष्यकालीन नियोजनासाठी विभिन्न वित्तीय विवरणे तयार करणे.

६. व्यवसायातील निधिचे स्रोत व तिचा उपयोग जाणून घेणे.

७. भागीदारीच्या पुर्नरचनेच्या वेळी लौकिक मूल्याची किंमत / मूल्य ठरविणे.

८. संस्थेच्या आयकराची, विक्रीकराची गणना करणे.

### अंतिम खाती तयार करणे :

अंतिम खाती ही तेरीज आणि समायोजनांचे आधारे केली जातात. खातेवहीतील खात्यांच्या नावे किंवा जमा शिल्लकांच्या यादीला तेरीज असे म्हणतात. अंतिम खाती ही वित्तीय वर्षाच्या शेवटी तयार केली जातात.

व्यवसायाला होणारा ढोबळ नफा किंवा ढोबळ तोटा याची माहिती व्यापार खात्यावरून होते आणि त्याच कालावधीतील शुद्ध नफा किंवा शुद्ध तोटा याची माहिती नफातोटा खात्यावरून होते. ताळेबंद हे एका विशिष्ट तारखेला व्यवसायाची संपत्ती आणि देयता दर्शविणारे विवरण आहे.

### व्यापार खाते (Trading Account) :

व्यापार खाते हे एक नामधारी खाते आहे. एका आर्थिक वर्षात व्यवसायाला ढोबळ नफा किंवा ढोबळ तोटा किती झाला हे शोधून काढण्याकरीता व्यापार खाते व्यापारी संस्था तयार करतात. व्यापार खात्याच्या नावे बाजूवर सर्व प्रत्यक्ष खर्च तर जमा बाजूवर

सर्व प्रत्यक्ष उत्पन्न नोंदविले जाते. जर व्यापार खात्याच्या जमा बाजूची बेरीज नावे बाजूच्या बेरजेपेक्षा ज्यास्त असेल तर ढोबळ नफा दर्शविते आणि जर नावे बाजूची बेरीज जमा बाजूच्या बेरजेपेक्षा ज्यास्त असेल तर ढोबळ तोटा दर्शविते. हा ढोबळ नफा किंवा ढोबळ तोटा नफा तोटा खात्याला स्थानांतरित केला जातो.

**J. R. Batliboi :**

"व्यापार खाते हे खरेदी आणि विक्री व्यवहारांचे परिणाम दर्शविते. हे खाते तयार करतांना सामान्य आस्थापन खर्चाचा विचार करण्यात येत नाही यामधे केवळ वस्तूशी संबंधित (Related to goods) व्यवहारांचाच समावेश होतो."

**व्यापार खाते**

**....... रोजी संपणाऱ्या वर्षाकरिता**

**नावे** **जमा**

| तपशील | रक्कम (₹) | रक्कम (₹) | तपशील | रक्कम (₹) | रक्कम (₹) |
|---|---|---|---|---|---|
| प्रारंभण स्कंध | | xxx | विक्री | xxx | |
| | | | (–) विक्री परत | xxx | xxx |
| खरेदी | xxx | | आगिमुळे जळलेला माल | | xxx |
| (–) खरेदी परत | xxx | xxx | | | |
| खरेदीवरील वाहतूक खर्च | | xxx | चोरीस गेलेला माल | | xxx |
| गाडी भाडे | | xxx | नमुना म्हणून मोफत वाटलेला माल | | xxx |
| गोदी भाडे (Dock Charges) | | xxx | अपघातामुळे नुकसान झालेला माल | | xxx |
| सीमा शुल्क (Custom Duty) | | xxx | भागीदाराने स्वतःच्या वैयक्तीक | | |
| मजुरी | | xxx | उपयोगाकरीता उचल केलेला माल | | xxx |
| उत्पादक मजुरी | | xxx | वर्षअखेरचा शिल्लक माल | | xxx |
| मजुरी आणि वेतन | | xxx | (संवरण स्कंध) | | |
| आयात शुल्क (Import Duty) | | xxx | ढोबळ तोटा | | xxx |
| कोळसा, गॅस, पाणी, | | xxx | (नफा तोटा खात्याला स्थानांतरित) | | |
| इंधन, तेल इ. | | | | | |
| अधिकार शुल्क | | xxx | | | |
| प्राथमिक संवेष्टन शुल्क | | xxx | | | |
| कारखाना प्रकाश व उष्णता | | xxx | | | |
| कारखाना भाडे | | xxx | | | |
| कारखाना विमा | | xxx | | | |
| कारखाना व्यवस्थापकाचा पगार/ | | | | | |
| वेतन | | xxx | | | |
| ढोबळ नफा | | xxx | | | |
| (नफा तोटा खात्याला स्थानांतरित) | | | | | |
| | | xxx | | | xxx |

जर उदाहरणात मजुरी आणि वेतन हे संयुक्त रित्या दिले असेल तर त्याची हाताळणी पुढील प्रमाणे करावी :

अ) जर सुरुवातीला मजुरी हा शब्द 'मजुरी व वेतन' दिला असेल तर व्यापार खात्याच्या नावे बाजूवर लिहावा.

ब) जर सुरुवातीला वेतन हा शब्द 'वेतन व मजुरी' दिला असेल तर नफा तोटा खात्याच्या नावे बाजूवर लिहावा.

**नफा तोटा खाते (Profit and Loss Account) :**

नफा तोटा खाते हे नामधारी खाते आहे. नफा तोटा खाते हे महत्त्वाचे खाते असून व्यवसायातील चालू आर्थिक वर्षातील शुद्ध नफा किंवा शुद्ध तोटा जाणून घेण्यासाठी तयार करण्यात येते. चालू वर्षाशी संबंधित सर्व अप्रत्यक्ष खर्च ज्यांचे शोधन करण्यात आले आहे किंवा करावयाचे आहे ते सर्व नफातोटा खात्याच्या नावे बाजूवर दर्शविले जातात. तसेच चालू वर्षाशी संबंधित अप्रत्यक्ष उत्पन्न जे मिळाले आहे किंवा मिळावयाचे आहे ते सर्व नफातोटा खात्याच्या जमा बाजूवर दर्शविले जातात. नफा तोटा खात्याची जमा शिल्लक शुद्ध नफा दर्शविते. हा शुद्ध नफा भागीदारांच्या भांडवल खात्याच्या जमा बाजूवर दर्शविला जातो किंवा भांडवलात आधिक(+) केला जातो. नफातोटा खात्याची नावे शिल्लक शुद्ध तोटा दर्शविते. हा शुद्ध तोटा भागीदारांच्या भांडवल खात्याच्या नावे बाजूवर दर्शविला जातो किंवा भांडवलातून वजा (–) केला जातो.

R.N. Carter,

**"नफा – तोटा खाते हे असे खाते आहे ज्यामधे व्यवसाय संस्थेला होणाऱ्या नफा किंवा तोट्याची माहिती प्राप्त करून घेण्यासाठी उत्पन्न आणि हानीच्या पदांचा विचार केला जातो."**

**नफा तोटा खात्याचे प्रारूप**

**नफा तोटा खाते ३१ मार्च ....... रोजी संपणाऱ्या वर्षाकरिता**

**नावे** **जमा**

| तपशील | रक्कम (₹) | रक्कम (₹) | तपशील | रक्कम (₹) | रक्कम (₹) |
|---|---|---|---|---|---|
| ढोबळ तोटा पु/आ (व्यापार खात्यावरून) | | xxx | ढोबळ नफा पु/आ (व्यापार खात्यावरून) | | xxx |
| वेतन / पगार | | xxx | प्राप्त कमिशन | | xxx |
| वेतन आणि मजुरी | | xxx | मिळालेली कसर | | xxx |
| भाडे आणि कर | | xxx | प्राप्त व्याज | | xxx |
| विद्युत खर्च | | xxx | प्राप्त लाभांश | | xxx |
| टेलीफोन खर्च | | xxx | प्राप्त भाडे | | xxx |
| छपाई आणि लेखन सामग्री | | xxx | इतर किरकोळ प्राप्ती | | xxx |
| प्रवास खर्च | | xxx | स्थिर संपत्ती विक्रीवर नफा | | xxx |
| स्थिर संपत्तीवर घसारा | | xxx | शुद्ध तोटा (भांडवल खात्याला स्थानांतरित) | | xxx |
| अंकेक्षण शुल्क | | xxx | | | |
| करमणूक खर्च | | xxx | | | |
| दुरुस्ती आणि नूतनीकरण | | xxx | | | |
| कर्जावरील व्याज | | xxx | | | |
| किरकोळ खर्च | | xxx | | | |
| वाहन भत्ता (Conveyance) | | xxx | | | |
| आगीमुळे/चोरीमुळे/अपघातामुळे झालेले नुकसान | | xxx | | | |
| वखार भाडे | | xxx | | | |
| भविष्य निधी योगदान | | xxx | | | |
| नमुना म्हणून मोफत वाटलेला माल | | xxx | | | |
| कमिशन | | xxx | | | |
| कसर | | xxx | | | |
| भत्ते (Allowance) | | xxx | | | |
| जाहिरात | | xxx | | | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| विक्रीवरील वाहतूक खर्च | | xxx | | | |
| विक्री खर्च | | xxx | | | |
| बुडीत कर्ज | | xxx | | | |
| निर्यात कर | | xxx | | | |
| कर | | xxx | | | |
| सामान्य खर्च | | xxx | | | |
| व्यापार खर्च | | xxx | | | |
| वैध खर्च (Legal Charges) | | xxx | | | |
| व्यावसायिक खर्च | | xxx | | | |
| बँक शुल्क | | xxx | | | |
| कायदेशीर खर्च | | xxx | | | |
| दुय्यम संवेष्टन खर्च | | xxx | | | |
| स्थिर संपत्ती विक्रीवर तोटा | | xxx | | | |
| शुद्ध नफा<br>(भांडवल खात्याला स्थानांतरित) | | xxx | | | |
| | | xxx | | | xxx |

## ताळेबंद (Balance Sheet) :

ताळेबंद हे एका विशिष्ट तारखेला व्यवसायाची वित्तीय स्थिती दर्शविणारे विवरण आहे. सर्व प्रकारची देयता ताळेबंदाच्या डाव्या बाजूला तर सर्व प्रकारची संपत्ती उजव्या बाजूला दिर्शविली जाते. ताळेबंद खाते नसून व्यवसायाची वित्तीय स्थिती दर्शविणारे विवरण आहे. हे व्यवसायाची संपत्ती व देयता दर्शविते.

### A. Palmer:

"ताळेबंद हे विवरण पत्रक आहे. जे विशिष्ट दिवशी व्यवसायाची आर्थिक स्थिती दर्शविते. त्याच बरोबर व्यवसायाची देयता आणि संपत्ती दर्शविते."

**स्थिती विवरण ............. रोजीचे**

| देयता | रक्कम (₹) | रक्कम (₹) | संपत्ती | रक्कम (₹) | रक्कम (₹) |
|---|---|---|---|---|---|
| भांडवल खाते | | | ख्याती | | xxx |
| अ | xxx | | जमीन व इमारत | xxx | |
| ब | xxx | xxx | (−) घसारा | xxx | xxx |
| क | xxx | | | | |
| भागीदाराचे चालू खाते | | xxx | यंत्र व संयंत्र | xxx | |
| (जमा शिल्लक) | | | (−) घसारा | xxx | xxx |
| राखीव निधी | | xxx | उपस्कर व अन्वायुक्ती | xxx | |
| | | | (−) घसारा | xxx | xxx |
| नफा तोटा खाते | | xxx | उपकरणे | xxx | |
| | | | (−) घसारा | xxx | xxx |
| तारण असलेले कर्ज | | xxx | मोटार गाडी | xxx | |
| | | xxx | (−) घसारा | xxx | xxx |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| बँक कर्ज | | xxx | पट्टधृत / स्वमालकीचा परिसर | xxx | |
| | | | (–) घसारा | xxx | xxx |
| भागीदारांकडून कर्ज | | xxx | एकस्व (Patents) | xxx | |
| | | | (–) घसारा | xxx | xxx |
| देय विपत्र | | xxx | सुटी अवजारे | xxx | |
| | | | (–) घसारा | xxx | xxx |
| अधिकोष अधिविकर्ष | | xxx | गुंतवणूक | | xxx |
| विविध धनको | xxx | | सुटी साहित्य | xxx | |
| अधिक / वजा समायोजना | xxx | xxx | (–) घसारा | xxx | xxx |
| | xxx | | पूर्व दत्त खर्च | | xxx |
| (–) धनकोवरील कसर | xxx | | | | |
| अदत्त खर्च | | xxx | अप्राप्त उत्पन्न | | xxx |
| पूर्व प्राप्त उत्पन्न | | xxx | ऋण आणि अग्रिम | | xxx |
| | | | संवरण स्कंध | | xxx |
| कर तरतूद | | xxx | विविध ऋणको | xxx | |
| | | | (–) बुडीत कर्ज | xxx | |
| | | | | xxx | |
| भविष्य निधी | xxx | | (–) नवीन बुडीत कर्ज | xxx | |
| अधिक: भविष्य निधी | | | | xxx | |
| गुंतवणूकवरील व्याज | xxx | xxx | (–) संदिग्ध ऋणार्थ संचिती | xxx | xxx |
| | | | विमा कंपनीकडून मिळालेली – नुकसान भरपाई | | xxx |
| | | | प्राप्य विपत्र | | xxx |
| | | | हस्तस्थ रोख | | xxx |
| | | | अधिकोषस्थ रोख | | xxx |
| | | | मुदत ठेव | | xxx |
| | | | भागीदाराचे चालू खाते | | xxx |
| | | xxx | (नावे शिल्लक) | | xxx |

**टीप :**

१) तेरीजपत्रकातील प्रत्येक पदाची वार्षिक खाती तयार करतांना एकच नोंद होते फक्त अदृश्य समायोजन वगळता.

२) प्रत्येक समायोजनाचे वार्षिक खाती तयार करतांना दोन परिणाम होतात.

३) या अगोदर आपण वर्ग ११ वी मध्ये "स्वामित्व संस्थेची अंतिम खाती" हे प्रकरण अभ्यासले आहे. त्यामुळे त्याची पुनरावृत्ती टाळण्यासाठी बराचसा सैद्धांतिक (Theory) भाग वगळला आहे. परंतु रोजकीर्द नोंदी व समायोजना दिलेल्या आहेत. काही सामान्य भाग अभ्यासण्यासाठी शिक्षक आणि विद्यार्थ्यांनी वर्ग ११ वी चे पुस्तक अभ्यासावे. भागीदारीची ओळख हे पहिले प्रकरण भागीदारांची वार्षिक खाती या प्रकरणाशी संबंधित आहे.

**समायोजना नोंदींचा सारांश (Summary ofAdjustments) :**

| अ.क्र. | समायोजना | प्रथम परिणाम | दुसरा परिणाम |
|---|---|---|---|
| १. | संवरण स्कंध | ताळेबंदाचे संपत्ती बाजूवर दर्शवा | व्यापार खाते जमा बाजूवर दर्शवा |
| २. | अदत्त खर्च (देणे बाकी खर्च) | व्यापार किंवा नफा-तोटा खात्याचे नावे बाजूवर त्या विशिष्ट खर्चाच्या पदात मिळवा | ताळेबंदाचे देयता बाजूवर दर्शवा |

| | | | |
|---|---|---|---|
| ३. | पूर्वदत्त खर्च (अगाऊ केलेला खर्च) | व्यापार किंवा नफा तोटा खाते नावे बाजूवर त्या विशिष्ट खर्चाचे पदातून वजा करा | ताळेबंदाचे संपत्ती बाजूवर दर्शवा |
| ४. | पूर्वप्राप्त उत्पन्न (अगाऊ मिळालेले उत्पन्न) | नफा-तोटा खात्याचे जमा बाजूवर त्या विशिष्ट उत्पन्नातून वजा करा. | ताळेबंदाचे देयता बाजूवर दर्शवा |
| ५. | अप्राप्त उत्पन्न (येणे उत्पन्न) | नफा-तोटा खात्याचे जमा बाजूवर संबंधित उत्पन्नाचे पदात मिळवा. | ताळेबंदाचे संपत्ती बाजूवर दर्शवा |
| ६. | बुडीत कर्ज (अतिरिक्त किंवा नवीन बुडीत कर्ज) | नफा-तोटा खात्याचे नावे बाजूवर दर्शवा (जुने बुडीत कर्ज रकमेमध्ये मिळवा) | ताळेबंदाचे संपत्ती बाजूवर ऋणकोमधून वजा करा |
| ७. | संशायित कर्ज निधीकरिता तरतूद | नफा-तोटा खाते नावे बाजूवर दर्शवा (जुने बुडीत कर्ज रकमेत मिळवा) | ताळेबंदाचे संपत्ती बाजूवर ऋणकोमधून वजा करा |
| ८. | ऋणकोंवर देय कसर निधी | नफा-तोटा खाते नावे बाजूवर दर्शवा (दत्त कसर मध्ये मिळवा) | ताळेबंदाचे संपत्ती बाजूवर ऋणकोमधून वजा करा |
| ९. | घसारा | नफा-तोटा खाते नावे बाजूवर दर्शवा | ताळेबंद संपत्ती बाजू विशिष्ट संपत्तीमधून वजा करा |
| १०. | (i) भांडवलावर व्याज | नफा-तोटा खाते नावे बाजूवर दर्शवा | भागीदाराचे भांडवल/चालू खात्यात जमा किंवा भांडवलामध्ये मिळवा |
| १०. | (ii) उचलीवर व्याज | नफा-तोटा खात्याचे जमा बाजूवर दर्शवा | भागीदाराचे भांडवल/चालू खात्यात नावे करा किंवा भांडवला मधून वजा करा |
| १०. | (iii) घेतलेल्या कर्जावर व्याज | नफा-तोटा खाते नावे बाजूवर दर्शवा | ताळेबंदाचे देयता बाजूवर घेतलेल्या कर्जाच्या रकमेत मिळवा |
| ११. | गुंतवणुकीवर आणि दिलेल्या कर्जावर व्याज | नफा-तोटा खाते जमा बाजूवर दर्शवा | ताळेबदाच्या संपत्ती बाजूवर दर्शवा |
| १२. | (i) विमा काढलेला माल आगीमुळे/ अपघातामुळे नष्ट झाल्यास | व्यापार खाते जमा बाजूवर संपूर्ण रक्कम दर्शवा | (१) ताळेबंद संपत्ती बाजूवर (विमा कपनीद्वारे येणे रक्कम) दर्शवा<br>(२) नफा-तोटा खाते नावे बाजूवर वास्तविक हानीची रक्कम दर्शवा |
| १२. | (ii) विमा न काढलेल्या मालाचे आगीमुळे / चोरीमुळे नुकसान झाल्यास | नफा-तोटा खाते - नावे बाजूवर दर्शवा | व्यापार खाते जमा बाजूवर दर्शवा किंवा खरेदीमधून वजा करा. |
| १३. | चोरीस गेलेला माल | नफा-तोटा खाते - नावे बाजूवर दर्शवा | व्यापार खाते जमा बाजूवर दर्शवा किंवा खरेदीमधून वजा करा. |
| १४. | नमुना म्हणून मालाचे मोफत वाटप | नफा-तोटा खाते - नावे बाजूवर (जाहिरात खर्चामधे मिळवा) | व्यापार खाते जमा बाजूवर दर्शवा किंवा खरेदीमधून वजा करा. |
| १५. | भागीदाराने स्वतःचे खाजगी उपयोगा करिता केलेली मालाची उचल | व्यापार खाते जमा बाजूवर दर्शवा किंवा खरेदीमधून वजा करा. | भागीदारांचे भांडवल/चालू खाते - नावे बाजूवर दर्शवा |
| १६. | (i) अनोंदित खरेदी (Unrecorded Purchases) | व्यापार खाते नावे बाजूवर खरेदीमध्ये मिळवा | ताळेबंदाचे देयता बाजूवर धनकोंमध्ये मिळवा |

| | | | |
|---|---|---|---|
| १६. | (ii) अनोंदित विक्री (Unrecorded Sales) | व्यापार खाते जमा बाजूवर विक्रीमध्ये मिळवा | ताळेबंदाचे संपत्ती बाजूवर ऋणकोमध्ये मिळवा |
| १७.१ | भांडवली खर्च महसुली खर्चात समाविष्ट असल्यास | व्यापार किंवा नफा-तोटा खात्याचे नावे बाजूवर त्या विशिष्ट महसुली खर्चातून वजा करा. | ताळेबंदाचे संपत्ती बाजूवर विशिष्ट संपत्तीमध्ये मिळवा |
| १७.२ | महसुली खर्च भांडवली खर्चात समाविष्ट असल्यास | त्या विशिष्ट खर्चामध्ये मिळवा | ताळेबंदाचे संपत्ती बाजूवर त्या विशिष्ट संपत्तीमधून वजा करा |
| १८. | अनादरित प्राप्य विपत्रे | ताळेबंदाचे संपत्ती बाजूवर ऋणकोमध्ये अनादरित विपत्रांची रक्कम मिळवा | प्राप्य विपत्रांचे रकमेतून अनादरित विपत्रांची राशी वजा करा |
| १९. | अनादरित देय विपत्रे | ताळेबंदाचे देयता बाजूवर धनकोंचे रकमेमधे अनादरित विपत्रांची रक्कम मिळवा | देय विपत्रांचे रकमेतून अनादरित विपत्रांची रक्कम वजा करा |
| २०. | आस्थागित खर्च (Differed expenses)जसे जाहिरातीचे दिले ५ वर्षाकरिता | चालू वर्षाशी संबंधित जाहिरातीचे नफा-तोटा खात्याला नावे करा | शिल्लक राहिलेली जाहिरात खर्चाची रक्कम ताळेबंदाचे संपत्ती बाजूवर दर्शवा |
| २१. | (i) भांडवली प्राप्तीचा समावेश महसुली प्राप्तीमध्ये झाल्यास उदा. यंत्र विक्रीचा समोवश ‘विक्री’मध्ये झाला. | व्यापार खाते जमा बाजूवर विक्रीमधून वजा करा | ताळेबंदाचे संपत्ती बाजूवर यंत्राचे रकमेतून यंत्र विक्रीची राशी वजा करा |
| २१. | (ii) महसुली प्राप्तीचा समावेश भांडवली प्राप्तीमधे झाल्यास जसे माल विक्रीचा समावेश फर्निचर विक्रीमधे झाला | व्यापार खाते जमा बाजूवर विक्रीमध्ये मिळवा | ताळेबंद संपत्ती बाजूवर फर्निचरचे रकमेतून वजा करा. |
| २२. | भागीदारांना ढोबळ नफा/ विक्रीवर (%) कमिशन | नफा-तोटा खाते नावे बाजूवर दर्शवा | भागीदारांचे भांडवल/चालू खाल्यावर दर्शवा किंवा भागीदारांचे भांडवलामध्ये मिळवा |

**तेरीज पत्रक/परीक्षा सूचीतील गुप्त/गर्भित/ध्वनित समायोजना**

| अ.क्र. | परीक्षा सूचीतील समायोजना | व्यापार आणि नफा तोटा खाते | ताळेबंद |
|---|---|---|---|
| १. | वेतन / भाडे दिले (१० महिन्यासाठी) | वेतन / भाडे या पदात २ महिन्याचे अदत्त रक्कम अधिक करा. | ताळेबंद पत्रकाच्या देयता बाजूवर २ महिन्याचे अदत्त वेतन/भाडे दर्शवा |
| २. | विमा प्रव्याजी ३० जून २०१९ रोजी संपणाऱ्या वर्षाकरिता दिला. (आर्थिक वर्ष ३१मार्च २०१९ रोजी संपते.) | विमा या पदातून ३ महिन्याचा पूर्वदत्त विमा वजा करा. | पूर्वदत्त विमा हे पद ताळेबंद पत्रकाच्या संपत्ती बाजूवर दर्शवा |
| ३. | जाहिरात खर्च (४ वर्षासाठी) | नफातोटा खात्याच्या नावे बाजूवर $\frac{१}{४}$ जाहिरात खर्च दर्शवा | ताळेबंद पत्रकाच्या संपत्ती बाजूवर $\frac{३}{४}$ जाहिरात खर्च दर्शवा |
| ४. | भाडे मिळाले (११महिन्याचे) | नफातोटा खात्याच्या जमा बाजूवर प्राप्त भाडे या पदात १ महिन्याचे भाडे अधिक करा. | ताळेबंद पत्रकाच्या संपत्ती बाजूवर अप्राप्त भाडे १ महिन्याचे दर्शवा |

| | | | |
|---|---|---|---|
| ५. | १०% दराचे कर्ज (१ जानेवारीला घेतले, लेखा खाते ३१ मार्च रोजी संपते) | नफातोटा खात्याच्या नावे बाजूवर ३ महिन्याचे देणे व्याज दर्शवा | ताळेबंद पत्रकाच्या देयता बाजूवरील १०% दराचे कर्ज या पदात ३ महिन्याचे अदत्त व्याज अधिक करा. |
| ६. | १६% दराची गुंतवणूक (१ जानेवारीला खरेदी, लेखा खाते ३१ मार्च रोजी संपते) | नफातोटा खात्याच्या जमा बाजूवर ३ महिन्याचे अप्राप्त व्याज दर्शवा | ताळेबंद पत्रकाच्या संपत्ती बाजूवरील गुंतवणूक या पदात ३ महिन्याचे व्याज अधिक करा. |
| ७. | १०% सरकारी रोखे | नफातोटा खात्याच्या जमा बाजूवर अप्राप्त व्याज दर्शवा | ताळेबंद पत्रकाच्या संपत्ती बाजूवरील सरकारी रोखे या पदात अप्राप्त व्याजाची राशी अधिक करा. |

**महत्त्वाचे मुद्दे (Important Points) :**

१) परीक्षा सूचीतील प्रत्येक पदाची एकच नोंद वार्षिक खाती तयार करताना होते. व्यापार किंवा नफातोटा खात्यात किंवा ताळेबंदात.

२) प्रत्येक समायोजनेच्या दोन परिणाम होतात.

३) परीक्षा सूचीतील नावे शिल्लक असलेली पदे व्यापार किंवा नफातोटा खात्याच्या नावे बाजूवर अथवा ताळेबंद पत्रकाच्या संपत्ती बाजूवर लिहावित.

४) परीक्षा सूचीतील जमा शिल्लक असलेली पदे व्यापार किंवा नफातोटा खात्याच्या जमा बाजूवर अथवा ताळेबंद पत्रकाच्या देयता बाजूवर लिहावित.

५) जेव्हा परीक्षा सूचीत वेतन, मजुरी ही स्वतंत्र पदे दिली असतील तर वेतन हे पद नफातोटा खात्याच्या नावे बाजूवर लिहावे व मजुरी हे पद व्यापार खात्याच्या नावे बाजूवर लिहावे. जर मजुरी व वेतन हे पद दिले असेल तर व्यापार खात्याच्या नावे बाजूवर लिहावे. जर वेतन व मजुरी पद दिले असेल तर नफा तोटा खात्याच्या नावे बाजूवर लिहावे.

६) जर परीक्षा सूचीत व्यापार खर्च हे एकच पद दिले असेल तर नफातोटा खात्याच्या नावे बाजूवर लिहावे. परंतु जर परीक्षा सूचीत व्यापार खर्च, सामान्य खर्च ही दोन पदे दिली असतील तर व्यापार खर्च व्यापार खात्याच्या नावे बाजूवर लिहावे. सामान्य खर्च नफातोटा खात्याच्या नावे बाजूवर लिहावे. व्यापार खर्च, सामान्य खर्च यापैकी कोणतेही एकच पद दिले असेल तर ते नफातोटा खात्याच्या नावे बाजूवर लिहावे.

७) ऋणकोवर बुडीत कर्ज, बुडीत कर्ज निधी, बुडीत व संशयित कर्ज निधी या समायोजना करतांना ऋणकोत अनोंदित उधार विक्रीची राशी अधिक (+) करावी नंतर बुडीत कर्ज आकारावे. नंतर बुडीत कर्ज निधीचे समायोजन करावे.

८) ऋणकोतून बुडीत कर्ज वजा (–) केल्यानंतर बुडीत व संशयित कर्ज निधीची तरतूद करावी.

९) धनकोशी संबंधित सर्व समायोजना झाल्यानंतर धनकोवर प्राप्त कसर निधीची समायोजना करावी.

१०) गुप्त / गर्भित / ध्वनित समायोजनांचा परिणाम उदाहरणातील सूचनेप्रमाणे करावा.

११) संवरण स्कंधाचे लागत मूल्य (परिव्यय मूल्य) आणि विपणी मूल्य (बाजार मूल्य) अशी दोन मूल्य दिली असतील तर जे कमी असेल ते विचारात घ्यावे.

१२) जर व्यवस्थापकाला किंवा भागीदाराला शुद्‌ध नफ्यावर कमिशन दयावयाचे असेल तर खालील प्रमाणे काढावे :

अ) शुद्‌ध नफ्याच्या अगोदर कमिशन द्यावयाचे असल्यास :

$$\text{कमिशन राशी} = \frac{\text{कमिशनचा दर} \times \text{शुद्‌ध नफा}}{१००}$$

ब) शुद्‌ध नफ्याच्या नंतर कमिशन द्यावयाचे असल्यास :

$$\text{कमिशन राशी} = \frac{\text{कमिशनचा दर} \times \text{शुद्‌ध नफा}}{१०० + \text{कमशिनचा दर}}$$

१३) जर उचलीची तारीख दिलेली नसल्यास उचलीवरील व्याज आकारतांना खालील सूत्राचा वापर करावा.

$$\text{उचलीवरील व्याज} = \text{उचल} \times \frac{\text{दर}}{१००} \times \frac{६}{१२}$$

१४) जर भागीदाराने आर्थिक वर्षामध्येच अतिरिक्त भांडवल आणले असेल तर त्यावरील तेवढ्या कालावधीकरिताचे व्याज विचारात घ्यावे. (हे वर्ग १२वीच्या अभ्यासक्रमात अपेक्षित नाही).

**फक्त परीक्षा सूचीत दिलेल्या पदांची हाताळणी :**

| | | |
|---|---|---|
| १) | कोणताही अदत्त खर्च | ताळेबंदाच्या देयता बाजूवर |
| २) | कोणताही पूर्वदत्त खर्च | ताळेबंदाच्या संपत्ती बाजूवर |
| ३) | कोणतेही अप्राप्त उत्पन्न | ताळेबंदाच्या संपत्ती बाजूवर |
| ४) | कोणताही पूर्वप्राप्त उत्पन्न | ताळेबंदाच्या देयता बाजूवर |
| ५) | घसारा | नफातोटा खात्याच्या नावे बाजूवर |
| ६) | संपत्ती विक्रीवरील तोटा | नफातोटा खात्याच्या नावे बाजूवर |
| ७) | भागीदारांनी केलेली वस्तूंची उचल | भांडवल/ चालू खात्याच्या नावे बाजूवर |
| ८) | सामान्य संचिती / राखीव निधी | ताळेबंदाच्या देयता बाजूवर |
| ९) | जनतेकडून ठेवी | ताळेबंदाच्या देयता बाजूवर |
| १०) | नमुना म्हणून मोफत वाटलेला माल | नफातोटा खात्याच्या नावे बाजूवर |
| ११) | निलंबित खाते:<br>अ) जर नावे बाजूवर असेल | <br>ताळेबंदाच्या संपत्ती बाजूवर |
| | ब) जर जमा बाजूवर असेल | ताळेबंदाच्या देयता बाजूवर |
| १२) | राशी संग्रहणासाठी विपत्र बँकेत पाठविणे | ताळेबंदाच्या संपत्ती बाजूवर |

**उदाहरण सोडविण्याच्या पायऱ्या:**

१) आवश्यक खाती उघडावित, स्पष्टीकरणात्मक टीपणांसह.

२) समायोजना असलेल्या पदावर विशिष्ट चिन्ह करून घ्यावे.

३) परीक्षा सूचीतील पदांची एकच नोंद करून घ्यावी.

४) प्रत्येक समायोजनेच्या दोन नोंदी करून घ्याव्यात.

५) नंतर खाती बंद करावीत. प्रथम व्यापार खाते बंद करावे.

६) व्यापार खात्यावरील ढोबळ नफा/ ढोबळ तोटा नफातोटा खात्याला स्थानांतरित करावा. नंतर नफातोटा खाते बंद करून शुद्ध नफा / शुद्ध तोटा काढावा.

७) भांडवलाचे खाते बंद करावे व भांडवल खात्यातील शिल्लक ताळेबंद पत्रकाच्या देयता बाजूवर दर्शवावी.

८) शेवटी ताळेबंदाची बेरीज करावी व ताळेबंद बंद करावा. ताळेबंद पत्रकाच्या दोन्ही बाजूंची बेरीज समान असते.

## उदाहरणे

१. **दया आणि क्षमा भागीदार असून ते १:१ या प्रमाणात नफातोटा विभागून घेतात. खालील परीक्षा सूची आणि समायोजनांच्या आधारे ३१ मार्च, २०१९ रोजी संपणाऱ्या वर्षाकरिता व्यापार व नफातोटा खाते आणि त्याच तारखेचा ताळेबंद तयार करा.**

**परीक्षा सूची ३१ मार्च २०१९**

| नावे शिल्लक | रक्कम ₹ | जमा शिल्लक | रक्कम ₹ |
|---|---|---|---|
| स्कंध (१/४/२०१८) | ६५,००० | राखीव निधी | १४,५०० |
| प्राप्य विपत्र | २८,००० | भांडवल: | |
| मजुरी व वेतन | ९,००० | दया | १,६०,००० |
| विविध ऋणको | १,३२,५०० | क्षमा | १,२०,००० |
| बुडीत कर्ज | १,००० | धनको | ९८,००० |
| खरेदी | १,४८,००० | संशयित कर्ज निधी | १,८०० |
| मोटार गाडी | ६८,००० | विक्री | २,८५,५०० |
| यंत्रसामग्री | १,१४,८०० | अदत्त मजुरी | ७०० |
| अंकेक्षण शुल्क | १,२०० | खरेदी परत | ४,००० |
| विक्री परत | २,००० | कसर | १८०० |
| कसर | २,३०० | | |
| इमारत | ७५,००० | | |
| बँकेतील रोख | १२,००० | | |
| १०% गुंतवणूक | २०,००० | | |
| जाहिरात (९ महिन्यासाठी) | ४,५०० | | |
| अधिकार शुल्क | ३,००० | | |
| | ६,८६.३०० | | ६,८६.३०० |

**समयोजना :**

(१) संवरण स्कंध ₹ ४०,०००.

(२) इमारत आणि यंत्रसामग्रीवर अनुक्रमे वार्षिक ५% आणि ३% घसारा आकारा.

(३) प्राप्य विपत्रात ₹ ३,००० च्या अनादरीत विपत्राचा समावेश आहे.

(४) दया यांनी स्वतःच्या खाजगी उपयोगाकरिता ₹ १,००० चा माल उचलला त्याची लेखा पुस्तकात नोंद नाही.

(५) बुडीत कर्ज ₹ १,८०० अपलेखित करून ऋणकोवर ५% प्रमाणे बुडीत व संशयित कर्ज निधीची तरतूद करा.

(६) ₹ ६,००० चा माल विकला परंतु त्याची लेखा पुस्तकात नोंद नाही. .

**दया आणि क्षमा यांच्या पुस्तकात**

**व्यापार व नफा तोटा खाते दि.३१ मार्च २०१९ रोजी संपणाऱ्या वर्षाकरिता**

**नावे** **जमा**

| तपशील | रक्कम ₹ | रक्कम ₹ | तपशील | रक्कम ₹ | रक्कम ₹ |
|---|---|---|---|---|---|
| प्रारंभण स्कंध | | ६५,००० | विक्री | २,८५,५०० | |
| | | | (+) नोंद न झालेली विक्री | ६,००० | |
| खरेदी | १,४८,००० | | | २,९१,५०० | |
| (-) खरेदी परत | ४,००० | १,४४,००० | (-) विक्री परत | २,००० | २,८९,५०० |
| अधिकार शुल्क | | ३,००० | दया यांनी स्वतःच्या वैयक्तिक – उपयोगाकरीता उचललेला माल | | १,००० |
| मजुरी व वेतन | | ९,००० | संवरण स्कंध | | ४०,००० |
| ढोबळ नफा (पु/ने) | | १,०९,५०० | | | |
| | | **३,३०,५००** | | | **३,३०,५००** |

### नफा तोटा खाते

नावे | जमा

| तपशील | रक्कम ₹ | रक्कम ₹ | तपशील | रक्कम ₹ | रक्कम ₹ |
|---|---|---|---|---|---|
| जाहिरात | ४,५०० | | ढोबळ नफा (पु/आ) | | १,०९,५०० |
| (+)अदत्त जाहिरात (३ महिन्यासाठी) | १,५०० | ६,००० | | | |
| अंकेक्षण शुल्क | | १,२०० | गुंतवणुकीवर अप्राप्त व्याज | | २,००० |
| घसारा : | | | कसर (प्राप्त) | | १,८०० |
| इमारत | ३,७५० | | | | |
| यंत्रसामग्री | ३,४४४ | ७,१९४ | | | |
| बुडीत कर्ज | १,००० | | | | |
| (+) नवीन बुडीत कर्ज | १,८०० | | | | |
| (+) बुडीत व संशयित कर्ज निधी | ६,९८५ | | | | |
| | ९,७८५ | | | | |
| (–) जुना बुडीत कर्ज | १,८०० | ७,९८५ | | | |
| कसर (दिलेली) | | २,३०० | | | |
| शुद्ध नफा | | ८८,६२१ | | | |
| (भांडवल खात्याला स्थानांतरित) | | | | | |
| दया | ४४,३११ | | | | |
| क्षमा | ४४,३१० | | | | |
| | | **१,१३,३००** | | | **१,१३,३००** |

**ताळेबंद ३१ मार्च २०१९ रोजीचा**

| देयता | रक्कम ₹ | रक्कम ₹ | संपत्ती | रक्कम ₹ | रक्कम ₹ |
|---|---|---|---|---|---|
| **भांडवल:** दया | १,६०,००० | | इमारत | ७५,००० | |
| (+) शुद्ध नफा | ४४,३११ | | (−) घसारा ५% | ३,७५० | ७१,२५० |
| | २,०४,३११ | | यंत्रसामग्री | १,१४,८०० | |
| (−) उचल | १,००० | २,०३,३११ | (−) घसारा ३% | ३,४४४ | १,११,३५६ |
| (वैयक्तिक उपयोगाकरीता उचललेला माल) | | | प्राप्य विपत्र | २८,००० | |
| **भांडवल:** क्षमा | १,२०,००० | | (−) अनादरीत विपत्र | ३,००० | २५,००० |
| (+) शुद्ध नफा | ४४,३१० | १,६४,३१० | मोटार गाडी | | ६८,००० |
| राखीव निधी | | १४,५०० | बँकेतील रोख | | १२,००० |
| अदत्त जाहिरात (३ महिने) | | १,५०० | संवरण स्कंध | | ४०,००० |
| | | | विविध ऋणको : | १,३२,५०० | |
| धनको | | ९८,००० | (+) अनादरीत विपत्र | ३,००० | |
| अदत्त मजुरी | | ७०० | (+) नोंद न झालेली विक्री | ६,००० | |
| | | | | १,४१,५०० | |
| | | | (−) नवीन बुडीत कर्ज | १,८०० | |
| | | | | १,३९,७०० | |
| | | | (−) बुडीत व संशयित कर्ज निधी | ६,९८५ | १,३२,७१५ |
| | | | १०% गुंतवणूक | २०,००० | |
| | | | (+) अप्राप्त व्याज | २,००० | २२,००० |
| | | ४,८२,३२१ | | | ४,८२,३२१ |

२. **खालील परीक्षा सूची आणि समायोजनांच्या आधारे शिल्पा आणि कॅटरिना या भागीदारांच्या पुस्तकात व्यापार खाते व नफातोटा खाते आणि त्याच तारखेचे ताळेबंद तयार करा.**

**परीक्षा सूची / तेरीज पत्रक ३१ मार्च २०१९ रोजीची**

| नावे शिल्लक | नावे रक्कम ₹ | जमा शिल्लक | जमा रक्कम ₹ |
|---|---|---|---|
| जमीन आणि इमारत | ३७,८०० | **भांडवल** | |
| उपस्कर | १७,२५० | शिल्पा | ४५,००० |
| विविध ऋणको | ४०,००० | कॅटरिना | ४५,००० |
| स्कंध(१/०४/२०१८) | ६५,००० | विक्री | १,२०,००० |
| बुडीत कर्ज | ४०० | देय विपत्र | १७,५०० |
| छपाई व लेखन सामग्री | ४,००० | अधिकोष अधिविकर्ष(Bank Overdraft) | १०,००० |
| मजुरी | ३,००० | खरेदी परत | १,४८० |
| वेतन | ५,००० | विविध धनको | २२,००० |
| खरेदीवरील वाहन व्यय | ४,००० | बँक कर्ज | १५,००० |
| विक्री परत | २,००० | संशयित कर्ज निधी | १,००० |
| **उचल :** | | प्राप्त व्याज | १,५०० |
| शिल्पा | २,००० | | |
| कॅटरिना | ३,००० | | |
| कसर | २,०३० | | |
| शाहरूखला अग्रिम (Advance to Shaharukh) | १०,००० | | |
| हस्तस्थ रोख | २०,००० | | |
| बँकेतील रोख | ८,००० | | |
| व्याज | १,००० | | |
| कमिशन | २,००० | | |
| अधिकार शुल्क | २,००० | | |
| खरेदी | ५०,००० | | |
| | २,७८,४८० | | २,७८,४८० |

**समायोजना**

(१) ३१ मार्च २०१९ रोजी शिल्लक असलेल्या मालाचे मूल्य ₹ ५८,०००.

(२) अदत्त खर्च : अधिकार शुल्क ₹ १,५०० आणि मजुरी ₹ ८००.

(३) कर्मचाऱ्यांना अग्रिम दिलेले वेतन ₹ २,०००.

(४) ऋणकोवर ₹ १,००० बुडीत कर्ज अपलेखीत करून ३% प्रमाणे बुडीत व संशयित कर्ज निधी निर्माण करा.

(५) जमीन व इमारतीवर वार्षिक ५% आणि उपस्करावर वार्षिक १०% दराने घसारा आकारा.

**शिल्पा आणि कॅटरिना यांच्या पुस्तकात**
**व्यापार व नफा तोटा खाते दि.३१ मार्च २०१९ रोजी संपणाऱ्या वर्षाचे**

**नावे** **जमा**

| तपशील | रक्कम ₹ | रक्कम ₹ | तपशील | रक्कम ₹ | रक्कम ₹ |
|---|---|---|---|---|---|
| प्रारंभण स्कंध | | ६५,००० | विक्री | १,२०,००० | |
| खरेदी | ५०,००० | | (–) विक्री परत | २,००० | १,१८,००० |
| (–) खरेदी परत | १,४८० | ४८,५२० | संवरण स्कंध | | ५८,००० |
| मजुरी | ३,००० | | | | |
| (+) अदत्त मजुरी | ८०० | ३,८०० | | | |
| अधिकार शुल्क | २,००० | | | | |
| (+) अदत्त | १,५०० | ३,५०० | | | |
| खरेदीवरील वाहन व्यय | | ४,००० | | | |
| ढोबळ नफा (पु/ने) | | ५१,१८० | | | |
| | | १,७६,००० | | | १,७६,००० |
| वेतन | ५,००० | | ढोबळ नफा (पु/आ) | | ५१,१८० |
| (–) पूर्वदत्त वेतन | २,००० | ३,००० | प्राप्त व्याज | | १,५०० |
| बुडीत कर्ज | ४०० | | | | |
| (+) नवीन बुडीत कर्ज | १,००० | | | | |
| (+) संशयित कर्ज निधी | १,१७० | | | | |
| | २,५७० | | | | |
| (–) जुना बुडीत कर्ज | १,००० | १,५७० | | | |
| **घसारा:** | | | | | |
| जमीन आणि इमारत | १,८९० | | | | |
| उपस्कर | १,७२५ | ३,६१५ | | | |
| छपाई व लेखन सामग्री | | ४,००० | | | |
| कसर | | २,०३० | | | |
| व्याज | | १,००० | | | |
| कमिशन | | २,००० | | | |
| शुद्ध नफा | | | | | |
| (भांडवल खात्याला वर्ग) | | | | | |
| शिल्पा | १७,७३२ | | | | |
| कॅटरिना | १७,७३३ | ३५,४६५ | | | |
| | | ५२,६८० | | | ५२,६८० |

**ताळेबंद ३१ मार्च २०१९ रोजीचा**

| देयता | रक्कम ₹ | रक्कम ₹ | संपत्ती | रक्कम ₹ | रक्कम ₹ |
|---|---|---|---|---|---|
| **भांडवल** | | | जमीन आणि इमारत | ३७,८०० | |
| शिल्पा | ४५,००० | | (–) घसारा | १,८९० | ३५,९१० |
| (+) शुद्ध नफा | १७,७३२ | | उपस्कर | १७,२५० | |
| | ६२,७३२ | | (–) घसारा | १,७२५ | १५,५२५ |
| (–) उचल | २,००० | ६०,७३२ | विविध ऋणको | ४०,००० | |
| **भांडवल** | | | (–) नवीन बुडीत कर्ज | १,००० | |
| कॅटरिना | ४५,००० | | | ३९,००० | |
| (+) शुद्ध नफा | १७,७३३ | | (–) संशयित कर्ज निधी | १,१७० | ३७,८३० |
| | ६२,७३३ | | हस्तस्थ रोख | | २०,००० |
| (–) उचल | ३,००० | ५९,७३३ | बँकेतील रोख | | ८,००० |
| देय विपत्र | | १७,५०० | संवरण स्कंध | | ५८,००० |
| अदत्त खर्च: | | | पूर्वदत्त वेतन | | २,००० |
| मजुरी | ८०० | | शाहरूखला अग्रिम | | १०,००० |
| अधिकार शुल्क | १,५०० | २,३०० | | | |
| अधिकोष अधिविकर्ष | | १०,००० | | | |
| विविध धनको | | २२,००० | | | |
| बँक कर्ज | | १५,००० | | | |
| | | १,८७,२६५ | | | १,८७,२६५ |

३. **ऋचा आणि जुली भांडवलाच्या प्रमाणात नफा – तोटा वाटून घेणाऱ्या भागीदार आहेत. खालील परीक्षा सूची आणि समायोजनांच्या आधारे वार्षिक खाती तयार करा.**

**परीक्षा सूची / तेरीज पत्रक ३१ मार्च २०१९ रोजीची**

| नावे शिल्लक | रक्कम ₹ | जमा शिल्लक | रक्कम ₹ |
|---|---|---|---|
| खरेदी | ४८,००० | भांडवल खाते | |
| व्यापार खर्च | ३,००० | ऋचा | ८०,००० |
| वेतन | ४,५०० | जुली | ४०,००० |
| मजुरी व वेतन | २,८०० | विविध धनको | २२,००० |
| जाहिरात(२ वर्षाकरिता) | ४,००० | विक्री | १,४८,००० |
| विक्री परत | ८,००० | संशयित कर्ज निधी | १,२०० |
| स्वमालकीची संपत्ती | २३,००० | देय्य विपत्र | १२,००० |
| कार्यालय भाडे | ५,००० | खरेदी परत | ६,००० |
| मोटार गाडी | ४०,००० | | |
| स्कंध (०१/०४/२०१८) | ८९,५०० | | |
| सामान्य खर्च | २,५०० | | |
| विविध ऋणको | ६२,००० | | |
| कोळसा, गॅस व इंधन | १,००० | | |
| खरेदीवरील वाहतूक खर्च | ८०० | | |
| विक्रीवरील वाहतूक खर्च | १,३०० | | |
| यंत्र व सयंत्र | १३,८०० | | |
| | ३,०९,२०० | | ३,०९,२०० |

**समायोजना:**

(१) वर्षअखेरच्या शिल्लक मालाचे लागत मूल्य ₹ ८८,००० असून त्याचे बाजार मूल्य ₹ ९०,००० आहे.

(२) ऋचा आणि जुली यांनी व्यवसायातून अनुक्रमे ₹ ३,००० आणि ₹ २,००० स्वतःच्या वैयक्तिक उपयोगाकरीता माल उचलला.

(३) मोटार गाडीवर वार्षिक ५% आणि यंत्र सामग्रीवर वार्षिक ७% दराने घसारा आकारा.

(४) ऋणकोवर ५% प्रमाणे बुडीत व संशयित कर्ज निधीची तरतूद करा.

(५) अदत्त मजुरी ₹ ८००.

(६) ₹ ६,००० चा माल उधार खरेदी केला परंतु लेखा पुस्तकात नोंद नाही. तसेच ₹ ६,००० चा माल विकला पण त्याची नोंद झाली नाही.

**ऋचा आणि जुली यांच्या पुस्तकात**

**व्यापार व नफा तोटा खाते दि.३१ मार्च २०१९ रोजी संपणाऱ्या वर्षाचे**

**नावे** **जमा**

| तपशील | रक्कम ₹ | रक्कम ₹ | तपशील | रक्कम ₹ | रक्कम ₹ |
|---|---|---|---|---|---|
| प्रारंभण स्कंध | | ८९,५०० | विक्री | १,४८,००० | १,४६,००० |
| खरेदी | ४८,००० | | (–) विक्री परत | ८,००० | |
| | | | (+) नोंद न झालेली विक्री | ६,००० | |
| (+) नोंद न झालेली खरेदी | ६,००० | | संवरण स्कंध | | ८८,००० |
| | ५४,००० | | भागीदारांनी केलेली उचल : | | ५,००० |
| (–) खरेदी परत | ६,००० | ४८,००० | ऋचा | ३,००० | |
| मजुरी व वेतन | २,८०० | | जुली | २,००० | |
| (+) अदत्त मजुरी | ८०० | ३,६०० | | | |
| व्यापार खर्च | | ३,००० | | | |
| कोळसा, गॅस, व इंधन | | १,००० | | | |
| खरेदीवरील वाहतूक खर्च | | ८०० | | | |
| ढोबळ नफा (पु/ने) | | ९३,१०० | | | |
| | | २,३९,००० | | | २,३९,००० |
| वेतन | | ४,५०० | ढोबळ नफा (पु/आ) | | ९३,१०० |
| **घसारा :** | | | | | |
| मोटार गाडी | २,००० | | | | |
| यंत्र व यंत्रसामग्री | ९६६ | २,९६६ | | | |
| नवीन बुडीत कर्ज | ३,४०० | | | | |
| (–) जुना बुडीत कर्ज | १,२०० | २,२०० | | | |
| जाहिरात | ४,००० | | | | |
| (–) पूर्वदत्त जाहिरात | २,००० | २,००० | | | |
| कार्यालय भाडे | | ५,००० | | | |
| सामान्य खर्च | | २,५०० | | | |
| विक्रीवरील वाहतूक खर्च | | १,३०० | | | |
| शुद्ध नफा(भांडवल खात्याला स्थानांतरित) | | | | | |
| ऋचा | ४८,४२३ | | | | |
| जुली | २४,२११ | ७२,६३४ | | | |
| | | ९३,१०० | | | ९३,१०० |

**ताळेबंद ३१ मार्च २०१९ रोजीचा**

| देयता | रक्कम ₹ | रक्कम ₹ | संपत्ती | रक्कम ₹ | रक्कम ₹ |
|---|---|---|---|---|---|
| भांडवल | | | मोटार गाडी | ४०,००० | |
| ऋचा | १,२५,४२३ | | (−) घसारा | २,००० | ३८,००० |
| जुली | ६२,२११ | | | | |
| अदत्त मजुरी | | १,८७,६३४ | यंत्र व यंत्रसामग्री | १३,८०० | |
| | | ८०० | (−) घसारा | ९६६ | १२,८३४ |
| विविध धनको | २२,००० | | | | |
| (+)नोंद न झालेली उधार खरेदी | ६,००० | २८,००० | ऋणको | ६२,००० | |
| | | | (+) नोंद न झालेली विक्री | ६,००० | |
| | | | | ६८,००० | |
| देयविपत्र | | १२,००० | (−) नवीन बुडीत कर्ज | ३,४०० | ६४,६०० |
| | | | संवरण स्कंध | | ८८,००० |
| | | | पूर्वदत्त जाहिरात | | २,००० |
| | | | स्वमालकीची संपत्ती | | २३,००० |
| | | **२,२८,४३४** | | | **२,२८,४३४** |

**नावे** **भागीदाराचे भांडवल खाते** **जमा**

| तपशील | ऋचा ₹ | जुली ₹ | तपशील | ऋचा ₹ | जुली ₹ |
|---|---|---|---|---|---|
| उचल | ३,००० | २,००० | शिल्लक पु/आ | ८०,००० | ४०,००० |
| शिल्लक पु/ने | १,२५,४२३ | ६२,२११ | नफा तोटा खाते | ४८,४२३ | २४,२११ |
| | **१,२८,४२३** | **६४,२११** | | **१,२८,४२३** | **६४,२११** |
| | | | शिल्लक पु/आ | १,२५,४२३ | ६२,२११ |

**टीप :**

(१) जाहिरात २ वर्षाकरिता ₹ ४,००० दिली आहे. म्हणून १ वर्षाची जाहिरात ₹ २,००० पूर्वदत्त आहे. म्हणून जाहिरात या पदातून ₹ २,००० वजा केले आहेत व ₹ २,००० आगाऊ केलेला खर्च असल्यामुळे ताळेबंद पत्रकाच्या संपत्ती बाजूला दर्शविले आहे.

**४. खालील परीक्षा सूची / तेरीज पत्रक श्री. पियुष व श्री. अरुण यांची आहे. त्यावरून व्यापार व नफातोटा खाते आणि त्याच तारखेचा ताळेबंद तयार करा. :**

**परीक्षा सूची / तेरीज पत्रक ३१ मार्च २०१९ रोजीची**

| तपशील | नावे शिल्लक ₹ | तपशील | जमा शिल्लक ₹ |
|---|---|---|---|
| स्कंध (१/४/२०१८) | ३०,८०० | भांडवल खाते | |
| खरेदी | ८०,००० | पियुष | ८०,००० |
| वेतन | ५,००० | अरुण | ८०,००० |
| मजुरी | ७,५०० | विविध धनको | २०,५०० |
| वाहतूक खर्च | ३,००० | मुदत ठेवीवर व्याज | १,००० |
| अधिकार शुल्क | २,५०० | अधिकोष अधिविकर्ष | १०,००० |
| गाडी भाडे | ७०० | विक्री | १,२०,००० |
| छपाई व लेखन सामग्री | १,०५० | | |
| विविध ऋणको | ४३,००० | | |
| उपस्कर | २०,२०० | | |
| पट्टधृत संपत्ती | २५,००० | | |
| गुंतवणूक | १५,००० | | |
| प्रवास खर्च | ३,४५० | | |
| जाहिरात (३वर्षासाठी) | ३०,००० | | |
| बुडीत कर्ज | ५०० | | |
| दिलेली कसर | १,८०० | | |
| हस्तस्थ रोख | ७,००० | | |
| बँकेतील रोख | २०,००० | | |
| मुदती ठेव | १५,००० | | |
| | **३,११,५००** | | **३,११,५००** |

**समायोजना:**

(१) ३१ मार्च २०१९ रोजी शिल्लक असलेल्या मालाचे लागत मूल्य ₹ ४०,००० असून बाजार मूल्य ₹ ३५,००० होते.

(२) मुदत ठेवीवरील व्याज ₹ १,२०० अप्राप्त आहे.

(३) विविध ऋणकोवर २.५% प्रमाणे बुडीत व संशयित कर्ज निधीची तरतूद करा.

(४) उपस्करावर वार्षिक ५% दराने घसारा आकारा.

(५) ₹ ८,०००चा माल आगिमुळे नष्ट झाला विमा कंपनीने ₹ ६,००० चा दावा मान्य केला.

**पियुष आणि अरुण यांच्या पुस्तकात**
**व्यापार व नफा तोटा खाते दि.३१ मार्च २०१९ रोजी संपणाऱ्या वर्षाचे**

**नावे** **जमा**

| तपशील | रक्कम ₹ | रक्कम ₹ | तपशील | रक्कम ₹ | रक्कम ₹ |
|---|---|---|---|---|---|
| प्रारंभण स्कंध | | ३०,८०० | विक्री | | १,२०,००० |
| खरेदी | | ८०,००० | आगीमुळे नुकसान | | ८,००० |
| मजुरी | | ७,५०० | संवरण स्कंध | | ३५,००० |
| वाहतूक खर्च | | ३,००० | | | |
| अधिकार शुल्क | | २,५०० | | | |
| गाडी भाडे | | ७०० | | | |
| ढोबळ नफा (पु/ने) | | ३८,५०० | | | |
| | | १,६३,००० | | | १,६३,००० |
| कसर | | १,८०० | ढोबळ नफा (पु/आ) | | ३८,५०० |
| वेतन | | ५,००० | | | |
| छपाई व लेखन सामग्री | | १,०५० | मुदत ठेवीवरील व्याज | १,००० | |
| बुडीत कर्ज | ५०० | | (+) अप्राप्त व्याज | १,२०० | २,२०० |
| (−) नवीन बुडीत कर्ज | १,०७५ | १,५७५ | | | |
| आगीमुळे नुकसान | | २,००० | | | |
| उपस्करावर घसारा | | १,०१० | | | |
| प्रवास खर्च | | ३,४५० | | | |
| जाहिरात | ३०,००० | | | | |
| (−) पूर्वदत्त जाहिरात | २०,००० | १०,००० | | | |
| शुद्ध नफा (भांडवल खात्याला स्थानांतरित) | | | | | |
| पियुष | ७,४०८ | | | | |
| अरुण | ७,४०७ | १४,८१५ | | | |
| | | ४०,७०० | | | ४०,७०० |

**ताळेबंद ३१ मार्च २०१९ रोजीचा**

| देयता | रक्कम ₹ | रक्कम ₹ | संपत्ती | रक्कम ₹ | रक्कम ₹ |
|---|---|---|---|---|---|
| भांडवल : | | | पट्टधृत संपत्ती | | २५,००० |
| पियुष | | | गुंतवणूक | | १५,००० |
| (+) शुद्ध नफा | ८०,००० | | मुदत ठेवी | १५,००० | |
| | ७,४०८ | ८७,४०८ | (+)अप्राप्त व्याज | १,२०० | १६,२०० |
| भांडवल : | | | उपस्कर | २०,२०० | |
| अरुण | | | (–) घसारा | १,०१० | १९,१९० |
| (+) शुद्ध नफा | ८०,००० | | | | |
| | ७,४०७ | ८७,४०७ | विविध ऋणको | ४३,००० | |
| | | | (–) नवीन बुडीत कर्ज | १,०७५ | ४१,९२५ |
| विविध धनको | | २०,५०० | | | |
| | | | विमा कंपनीकडून नुकसान भरपाई | | ६,००० |
| अधिकोष अधिविकर्ष | | १०,००० | पूर्वदत्त जाहिरात | | २०,००० |
| | | | हस्तस्थ रोख | | ७,००० |
| | | | बँकेतील रोख | | २०,००० |
| | | | संवरण स्कंध | | ३५,००० |
| | | **२,०५,३१५** | | | **२,०५,३१५** |

५. **मेसर्स सुदर्शन ट्रेडर्स या भागीदारी संस्थेत राम आणि कृष्णा १ : १ या प्रमाणात नफातोटा वाटून घेणारे भागीदार आहेत. खालील परीक्षा सूची वरून / तेरीज पत्रकावरून २०१८–१९ वर्षाचे वार्षिक खाती तयार करा.**

**परीक्षा सूची / तेरीज पत्रक ३१ मार्च २०१९ रोजीची**

| तपशील | | नावे शिल्लक ₹ | जमा शिल्लक ₹ |
|---|---|---|---|
| प्रारंभण स्कंध | | ३६,००० | ... |
| भांडवल : | राम | ... | १,६०,००० |
| | कृष्णा | ... | ८०,००० |
| चालू खाते : | राम | ... | ८,००० |
| | कृष्णा | ४,००० | ... |
| खरेदी | | १,००,००० | ... |
| विक्री | | ... | २,०८,००० |
| विविध ऋणको | | १,७३,५०० | ... |
| विविध धनको | | ... | ४१,८०० |
| प्राप्य विपत्र | | ४७,००० | ... |
| देय्य विपत्र | | ... | २१,००० |
| कमिशन | | २,८०० | ... |
| मजुरी | | १,७६० | ... |
| वेतन | | ३,००० | |
| उपस्कर | | २५,००० | ... |
| यंत्र व सयंत्र | | ६३,००० | ... |
| बुडीत व संशयित कर्ज निधी | | ... | १,००० |
| गुंतवणूक | | १०,५०० | ... |
| ऋण आणि अग्रिम | | ३५,२४० | ... |
| विमा | | २,५०० | ... |
| बुडीत कर्ज | | ५०० | ... |
| १२% सरकारी रोखे (१.१.२०१९ ला खरेदी केले) | | १५,००० | |
| | | **५,१९,८००** | **५,१९,८००** |

**समायोजना:**

(१) ३१ मार्च २०१९ रोजी शिल्लक असलेला मालसाठा ₹ ३८,०००.

(२) रामला वार्षिक ₹ ६,००० वेतन तर कृष्णाला निव्वळ विक्रीवर ३% कमिशन मिळण्याचा अधिकार आाहे.

(३) भांडवलावर वार्षिक ५% दराने व्याज आकारा.

(४) यंत्र व सयंत्र सामग्रीवर वार्षिक ५% दराने घसारा आकारा.

(५) एका ग्राहकाकडून येणे असलेले ₹ ३००० वसूल होण्याजोगे नाही.

(६) पूर्वदत्त विमा ₹ ५००.

**मेसर्स सुदर्शन यांच्या पुस्तकात**

**व्यापार व नफा तोटा खाते दि.३१ मार्च २०१९ रोजी संपणाऱ्या वर्षाचे**

**नावे** **जमा**

| तपशील | रक्कम ₹ | रक्कम ₹ | तपशील | रक्कम ₹ | रक्कम ₹ |
|---|---|---|---|---|---|
| प्रारंभण स्कंध | | ३६,००० | विक्री | | २,०८,००० |
| खरेदी | | १,००,००० | संवरण स्कंध | | ३८,००० |
| मजुरी | | १,७६० | | | |
| ढोबळ नफा(पु/ने) | | १,०८,२४० | | | |
| | | २,४६,००० | | | २,४६,००० |
| कमिशन | | २,८०० | ढोबळ नफा(पु/आ) | | १,०८,२४० |
| वेतन | | ३,००० | सरकारी रोख्यावर अप्राप्त व्याज | | ४५० |
| विमा | २,५०० | | | | |
| (–) पूर्वदत्त विमा | ५०० | २,००० | | | |
| रामला वेतन | | ६,००० | | | |
| कृष्णाला विक्रीवर कमिशन | | ६,२४० | | | |
| यंत्र व सयंत्र सामग्रीवर घसारा | | ३,१५० | | | |
| बुडीत कर्ज | ५०० | | | | |
| (+) बुडीत कर्ज (नवीन) | ३,००० | | | | |
| | ३,५०० | | | | |
| (–) बुडीत कर्ज (जुना) | १,००० | २,५०० | | | |
| भांडवलावर व्याज : | | | | | |
| राम | ८,००० | १२,००० | | | |
| कृष्णा | ४,००० | | | | |
| शुद्ध नफा(भांडवल खात्याला वर्ग) | | | | | |
| राम | ३५,५०० | | | | |
| कृष्णा | ३५,५०० | ७१,००० | | | |
| | | १,०८,६९० | | | १,०८,६९० |

**ताळेबंद**
**३१ मार्च २०१९ रोजीचा**

| देयता | रक्कम ₹ | रक्कम ₹ | संपत्ती | रक्कम ₹ | रक्कम ₹ |
|---|---|---|---|---|---|
| भांडवल खाते : | | | विविध ऋणको | १,७३,५०० | |
| राम | १,६०,००० | | (–) नवीन बुडीत कर्ज | ३,००० | १,७०,५०० |
| कृष्णा | ८०,००० | २,४०,००० | | | |
| चालू खाते : | | | प्राप्य विपत्र | | ४७,००० |
| राम | ५७,५०० | | यंत्र व सयंत्र सामग्री | ६३,००० | |
| कृष्णा | ४१,७४० | ९९,२४० | (–) घसारा | ३,१५० | ५९,८५० |
| | | | उपस्कर | | २५,००० |
| विविध धनको | | ४१,८०० | गुंतवणूक | | १०,५०० |
| देय्य विपत्र | | २१,००० | ऋण व अग्रिम | | ३५,२४० |
| | | | संवरण स्कंध | | ३८,००० |
| | | | पूर्वदत्त विमा | | ५०० |
| | | | १२% सरकारी रोखे | १५,००० | |
| | | | (+) अप्राप्त व्याज | ४५० | १५,४५० |
| | | ४,०२,०४० | | | ४,०२,०४० |

**भागीदारांचे चालू खाते**

**नावे** **जमा**

| तपशील | राम ₹ | कृष्णा ₹ | तपशील | राम ₹ | कृष्णा ₹ |
|---|---|---|---|---|---|
| शिल्लक पु/आ | – | ४,००० | शिल्लक पु/आ | ८,००० | – |
| शिल्लक पु/ने | ५७,५०० | ४१,७४० | नफा तोटा खाते (रामला वेतन) | ६,००० | – |
| | | | नफा तोटा खाते (कृष्णाला कमिशन) | – | ६,२४० |
| | | | नफा तोटा खाते (भांडवलावर व्याज) | ८,००० | ४,००० |
| | | | नफा तोटा खाते (शुद्ध नफा) | ३५,५०० | ३५,५०० |
| | **५७,५००** | **४५,७४०** | | **५७,५००** | **४५,७४०** |
| | | | शिल्लक पु/आ | ५७,५०० | ४१,७४० |

**स्पष्टीकरणात्मक टीप :**

(१) या उदाहरणात चालू खाते दिले आहे. म्हणून भांडवल खात्याची शिल्लक राम ₹१,६०,००० आणि कृष्णा ₹८०,००० = ₹ २,४०,००० प्रत्यक्ष ताळेबंद पत्रकात देयता बाजूला दर्शविली आहे. भांडवलावरील व्याज, भागीदाराला वेतन, कमिशन चालू खात्यात दर्शविले आहे.

(२) एका ग्राहकाकडून येणे असलेले ₹३,००० वसूल होण्याजोगे नाही म्हणून ते ताळेबंद पत्रकातील संपत्ती बाजूवरील विविध ऋणको या पदातून नवीन बुडीत कर्ज म्हणून वजा केले आहे.

(३) १२% सरकारी रोखे १/०१/२०१९ ला खरेदी केले आहे. १/०१/२०१९ ते ३१/०३/२०१९ पर्यंत ३ महिने होतात ३ महिन्याचो व्याज विचारात घेतले आहे.

$$\frac{१५,०००}{१} \times \frac{१२}{१००} \times \frac{३}{१२} = ₹\ ४५०$$

∴ ३ महिन्याचे व्याज ₹ ४५०

६. **खालील परीक्षा सूची श्रेयस आणि मृणाल यांची असून ३१ मार्च २०१९ रोजी संपणाऱ्या वर्षाकरिता व्यापार व नफा तोटा खाते आणि त्याच तारखेचा ताळेबंद तयार करा.:**

**परीक्षा सूची ३१ मार्च २०१९ रोजीची**

| तपशील | नावे शिल्लक ₹ | जमा शिल्लक ₹ |
|---|---|---|
| **भांडवल खाते :** | | |
| श्रेयस | – | ३५,००० |
| मृणाल | – | २०,००० |
| खरेदी | ३७,८०० | – |
| विक्री | – | ६६,७०० |
| प्राप्य विपत्र | ८,००० | – |
| देय्य विपत्र | – | ६,५०० |
| कमिशन | २,४०० | – |
| वेतन | ६,००० | – |
| विमा (९ महिन्याकरिता) | ९,००० | – |
| पूर्वदत्त भाडे | ३,००० | – |
| विविध धनको | – | ४८,९०० |
| विविध ऋणको | २५,००० | – |
| टपाल खर्च | १,७०० | – |
| परिसर | १७,३०० | – |
| उपस्कर | २०,००० | – |
| बुडीत कर्ज | ५०० | – |
| रोख शिल्लक | ४,५०० | – |
| बँक शिल्लक | १६,००० | – |
| खरेदीवरील वाहतूक खर्च | ८०० | – |
| विक्रीवरील वाहतूक खर्च | १,७०० | – |
| स्कंध (१/४/२०१८) | २२,५०० | – |
| परत (Returns) | १,२०० | १,८०० |
| मजुरी | ३,१०० | – |
| अदत्त मजुरी | – | १,६०० |
| | **१,८०,५००** | **१,८०,५००** |

**समायोजना :**

(१) संवरण स्कंध ₹ ३०,०००

(२) अदत्त खर्च – वेतन ₹ १,२००, कमिशन ₹ ४००.

(३) उपस्करावर वार्षिक १०% दराने घसारा आकारा.

(४) नवीन बुडीत कर्जासाठी ₹ १,२०० ची तरतूद करा.

(५) ₹ ५,००० चा माल आगिमुळे नष्ट झाला. विमा कंपनीने ₹ २,००० चा दावा मान्य केला.

(६) श्रेयस आणि मृणाल २:१ या प्रमाणात नफातोटा विभागून घेतात.

**श्रेयस आणि मृणाल यांच्या पुस्तकात**

**व्यापार व नफा तोटा खाते दि.३१ मार्च २०१९ रोजी संपणाऱ्या वर्षाचे**

**नावे** **जमा**

| तपशील | शिल्लक ₹ | शिल्लक ₹ | तपशील | शिल्लक ₹ | शिल्लक ₹ |
|---|---|---|---|---|---|
| प्रारंभण स्कंध | | २२,५०० | विक्री | ६६,७०० | |
| खरेदी | ३७,८०० | | (–) परत | १,२०० | ६५,५०० |
| (–) परत | १,८०० | ३६,००० | आगीमुळे जळलेला माल | | ५,००० |
| खरेदीवरील वाहतूक खर्च | | ८०० | संवरण स्कंध | | ३०,००० |
| मजुरी | | ३,१०० | | | |
| ढोबळ नफा(पु/ने) | | ३८,१०० | | | |
| | | **१,००,५००** | | | **१,००,५००** |
| विमा | ९,००० | | ढोबळ नफा(पु/आ) | | ३८,१०० |
| (+) अदत्त विमा (३ महिन्याचा) | ३,००० | १२,००० | | | |
| वेतन | ६,००० | | | | |
| (+) अदत्त वेतन | १,२०० | ७,२०० | | | |
| कमिशन | २,४०० | | | | |
| (+) अदत्त विमा | ४०० | २,८०० | | | |
| उपस्करावर घसारा | | २,००० | | | |
| टपाल खर्च | | १,७०० | | | |
| विक्रीवरील वाहतूक खर्च | | १,७०० | | | |
| बुडीत कर्ज | ५०० | | | | |
| (+) नवीन बुडीत कर्ज | १,२०० | १,७०० | | | |
| आगीमुळे जळालेला माल | | ३,००० | | | |
| शुद्ध नफा (भांडवल खात्याला स्थानांतरित) | | ६,००० | | | |
| श्रेयस | ४,००० | | | | |
| मृणाल | २,००० | | | | |
| | | **३८,१००** | | | **३८,१००** |

**ताळेबंद ३१ मार्च २०१९ रोजीचा**

| देयता | रक्कम ₹ | रक्कम ₹ | संपत्ती | रक्कम ₹ | रक्कम ₹ |
|---|---|---|---|---|---|
| भांडवल | | | उपस्कर | २०,००० | |
| श्रेयस | ३५,००० | | (–) घसारा | २,००० | १८,००० |
| (+) शुद्ध नफा | ४,००० | ३९,००० | | | |
| भांडवल | | | विविध ऋणको | २५,००० | |
| मृणाल | २०,००० | | (–) नवीन बुडीत कर्ज | १,२०० | २३,८०० |
| (+) शुद्ध नफा | २,००० | २२,००० | | | |
| | | | प्राप्य विपत्र | | ८,००० |
| विविध धनको | | ४८,९०० | परिसर | | १७,३०० |
| देय विपत्र | | ६,५०० | रोख शिल्लक | | ४,५०० |
| अदत्त खर्च | | | बँक शिल्लक | | १६,००० |
| वेतन | १,२०० | | संवरण स्कंध | | ३०,००० |
| कमिशन | ४०० | १,६०० | विमा कंपनीकडून नुकसान भरपाई | | २,००० |
| | | | पूर्वदत्त भाडे | | ३, ००० |
| अदत्त विमा | | ३,००० | | | |
| अदत्त मजुरी | | १,६०० | | | |
| | | १,२२,६०० | | | १,२२,६०० |

७. **सप्रे आणि अत्रे समान प्रमाणात नफा तोटा वाटून घेणारे भागीदार आहेत. खालील परीक्षा सूची व समायोजनांच्या आधारे ३१ मार्च २०१९ रोजी संपणाऱ्या वर्षाकरिता व्यापार व नफा तोटा खाते आणि त्याच तारखेचा ताळेबंद तयार करा.**

**परीक्षा सूची ३१ मार्च २०१९ रोजीची**

| नावे शिल्लक | रक्कम ₹ | जमा शिल्लक | रक्कम ₹ |
|---|---|---|---|
| विविध ऋणको | ४०,००० | विक्री | ८५,००० |
| खरेदी | ६५,००० | विविध धनको | २३,००० |
| विक्री परत | ८०० | किरकोळ उत्पन्न | २,००० |
| प्रारंभण स्कंध | १८,००० | भांडवल : | |
| जमीन आणि इमारत | १०,००० | सप्रे | ३५,००० |
| गाडी भाडे | १,२०० | अत्रे | ३५,००० |
| भाडे, दर व कर | १,००० | भविष्य निधी | १०,००० |
| उचल : | | खरेदी परत | १,५०० |
| सप्रे | ३,००० | पूर्वप्राप्त कमिशन | ८०० |
| अत्रे | २,००० | संशयित कर्ज निधी | ४०० |
| वेतन | ३,२०० | | |
| बुडीत कर्ज | १,००० | | |
| यंत्र सामग्री | २५,००० | | |
| (१ ऑक्टोंबर २०१८ला ₹१०,०००ची वाढ) | | | |
| जाहिरात | ४,००० | | |
| भविष्य निधी गुंतवणूक | १८,५०० | | |
| | १,९२,७०० | | १,९२,७०० |

**समायोजना :**

१) संवरण स्कंध ₹ २३,०००.

२) जमीन आणि इमारतीवर वार्षिक ५% दराने व यंत्रसामग्रीवर वार्षिक १०% दराने घसारा आकारा.

३) बुडीत कर्ज ₹ १,००० अपलेखीत करून ऋणकोवर ५% दराने बुडीत व संशयित कर्ज निधी निर्माण करा.

४) ₹ ३,००० चा माल विकला परंतु लेखा पुस्तकात नोंद नाही.

५) अदत्त गाडी भाडे ₹ ५००.

६) ३१ मार्च २०१९ रोजी ₹ ८,००० चा माल खरेदी केला व संवरण स्कंधात त्याचा समावेश देखील करण्यात आला परंतु लेखा पुस्तकात त्याची नोंद नाही.

**सप्रे आणि अत्रे यांच्या पुस्तकात**

**व्यापार व नफा तोटा खाते दि.३१ मार्च २०१९ रोजी संपणाऱ्या वर्षाचे**

**नावे** **जमा**

| तपशील | रक्कम ₹ | रक्कम ₹ | तपशील | रक्कम ₹ | रक्कम ₹ |
|---|---|---|---|---|---|
| प्रारंभण स्कंध | | १८,००० | विक्री | ८५,००० | |
| खरेदी | ६५,००० | | (+) नोंद न झालेली विक्री | ३,००० | |
| (+) नोंद न झालेली खरेदी | ८,००० | | | ८८,००० | |
| | ७३,००० | | (–) विक्री परत | ८०० | ८७,२०० |
| (–) खरेदी परत | १,५०० | ७१,५०० | संवरण स्कंध | | २३,००० |
| गाडी भाडे | १,२०० | | | | |
| (+) अदत्त गाडी भाडे | ५०० | १,७०० | | | |
| ढोबळ नफा (पु/ने) | | १९,००० | | | |
| | | **१,१०,२००** | | | **१,१०,२००** |
| वेतन | | ३,२०० | ढोबळ नफा (पु/आ) | | १९,००० |
| भाडे, दर व कर | | १,००० | किरकोळ उत्पन्न | | २,००० |
| घसारा | | | | | |
| जमीन व इमारत | ५०० | | | | |
| यंत्र सामग्री | २,००० | २,५०० | | | |
| बुडीत कर्ज | १,००० | | | | |
| (+) नवीन बुडीत कर्ज | १,००० | | | | |
| (+) संशयित कर्ज निधी | २,१०० | | | | |
| | ४,१०० | | | | |
| (–) जुना बुडीत कर्ज | ४०० | ३,७०० | | | |
| जाहिरात | | ४,००० | | | |
| शुद्ध नफा (भांडवल खात्याला स्थानांतरित) | | | | | |
| सप्रे | ३,३०० | | | | |
| अत्रे | ३,३०० | ६,६०० | | | |
| | | **२१,०००** | | | **२१,०००** |

**ताळेबंद ३१ मार्च २०१९ रोजीचा**

| देयता | रक्कम ₹ | रक्कम ₹ | संपत्ती | रक्कम ₹ | रक्कम ₹ |
|---|---|---|---|---|---|
| भांडवल : | | | जमीन व इमारत | १०,००० | |
| सप्रे | ३५,००० | | (–) घसारा | ५०० | ९,५०० |
| (+)– शुद्ध नफा | ३,३०० | | यंत्रसामग्री | २५,००० | |
| | ३८,३०० | | (–) घसारा | २,००० | २३,००० |
| (–)– उचल | ३,००० | ३५,३०० | विविध ऋणको | ४०,००० | |
| भांडवल : | | | (+) नोंद न झालेली विक्री | ३,००० | |
| अत्रे | ३५,००० | | | ४३,००० | |
| (+)– शुद्ध नफा | ३,३०० | | (–) नवीन बुडीत कर्ज | १,००० | |
| | ३८,३०० | | | ४२,००० | |
| (–) उचल | २,००० | ३६,३०० | (–) संशयित कर्ज निधी | २,१०० | ३९,९०० |
| भविष्य निधी | | १०,००० | संवरण स्कंध | | २३,००० |
| अदत्त गाडी भाडे | | ५०० | भविष्य निधी गुंतवणूक | | १८,५०० |
| विविध धनको | २३,००० | | | | |
| (+) नोंद न झालेली खरेदी | ८,००० | ३१,००० | | | |
| पूर्वप्राप्त कमिशन | | ८०० | | | |
| | | **१,१३,९००** | | | **१,१३,९००** |

**स्पष्टीकरणात्मक टिपा :**

१) यंत्र सामग्रीवर घसारा –

१ ऑक्टोंबर २०१८ रोजी ₹१०,००० ची वाढ

२५,०००

१५,०००      १०,०००

१५,००० ₹ वर वार्षिक १०% प्रमाणे १२ महिन्याचा घसारा

$१५,००० \times \frac{१०}{१००} = ₹ १,५००$

१०,००० ₹ च्या यंत्रसामग्रीवर वार्षिक १०% प्रमाणे ६ महिन्याचा घसारा

$१०,००० \times \frac{१०}{१००} \times \frac{६}{१२} = ₹ ५००$

∴ एकूण घसारा ₹१,५०० + ₹ ५०० = ₹ २०००

२) नोंद न झालेली विक्री ₹ ३,००० विक्री आणि विविध ऋणको या पदात समाविष्ट केली आहे. त्यानंतर नवीन बुडीत कर्ज, संशयित कर्ज निधीची तरतूद केली आहे.

| प्रथम प्रभाव | | व्दितीय प्रभाव | | | |
|---|---|---|---|---|---|
| विविध ऋणको | ४०,००० | (i) व्यापार खात्याच्या जमा बाजूवर | | (ii) नफा तोटा खाते नावे बाजूवर | |
| (+) नोंद न झालेली विक्री | ३,००० | विक्री | ८५,००० | बुडीत कर्ज | १,००० |
| | ४३,००० | (+) नोंद न झालेली विक्री | ३,००० | (+) बुडीत कर्ज (नवीन) | १,००० |
| (–) बुडीत कर्ज (नवीन) | १,००० | | ८८,००० | (+)संशयित कर्ज निधी | २,१०० |
| | ४२,००० | (–) विक्री परत | ८०० | | ४.१०० |
| (–) ५% संशयित कर्ज निधी | २,१०० | | | (–) बुडीत कर्ज (जुना) | ४०० |
| | ३९,९०० | | ८७,२०० | | ३,७०० |

३)  नोंद न झालेली खरेदी

व्यापार खात्याच्या नावे बाजूवर खरेदी या पदात अधिक केले आहे आणि ताळेबंद पत्रकातील विविध धनको या पदात अधिक केले आहे.

खरेदी (₹ ६५,००० + ₹ ८,०००) विविध धनको (₹ २३,००० + ₹ ८,०००)

**८. नेने आणि काणे ६:४ या प्रमाणात नफातोटा वाटून घेणारे भागीदार आहेत. खालील परीक्षा सूची आणि समायोजनांच्या आधारे ३१ मार्च २०१९ रोजी संपणाऱ्या वर्षाकरिता व्यापार व नफातोटाखाते आणि त्याच तारखेचा ताळेबंद तयार करा.**

**परीक्षा सूची ३१ मार्च २०१९ रोजीची**

| तपशील | रक्कम ₹ | रक्कम ₹ |
|---|---|---|
| भांडवल : | | |
| नेने | – | १५,००,००० |
| काणे | – | १०,००,००० |
| विविध ऋणको | ४,५०,००० | – |
| विविध धनको | – | ३,००,००० |
| भाडे (१० महिन्याचे) | १०,००० | – |
| स्कंध (१/४/२०१८) | ५,३५,५०० | – |
| परिसर | ८,५०,००० | – |
| वेतन | ५०,००० | – |
| कसर | ८०० | ९५० |
| मोटार गाडी | ३,७०,००० | – |
| विक्री | – | ८,४०,५०० |
| खरेदी | ६,४०,५०० | – |
| मजुरी | १०,००० | – |
| कार्यालय खर्च | २०,००० | – |
| अधिकोष अधिविकर्ष | – | १,५०,००० |
| परत (Returns) | ५,५०० | ३,५०० |
| भविष्य निधी गुंतवणूक | ८,००,००० | – |
| रोख शिल्लक | ४०,००० | – |
| भविष्य निधी योगदान | १,००,००० | – |
| बँकेतील शिल्लक | २,००,००० | – |
| भविष्य निधी | – | २,८०,००० |
| भविष्य निधी गुंतवणुकीवर व्याज | – | ४२,००० |
| उचल : | | |
| नेने | २०,००० | – |
| काणे | १५,००० | – |
| बुडीत कर्ज | ३,३५० | – |
| संशयित कर्ज निधी | – | ३,७०० |
| | **४१,२०,६५०** | **४१,२०,६५०** |

**समायोजना :**

१) संवरण स्कंध ₹ ३,६०,०००.
२) अदत्त मजुरी ₹ ३,००० आणि अदत्त वेतन ₹ २,०००.
३) मोटार गाडीवर वार्षिक ५% दराने घसारा आकारा.
४) बुडीत कर्ज ₹ ५,००० अपलेखीत करून विविध ऋणकोवर ५% प्रमाणे संशयित कर्ज निधीसाठी तरतूद करा.
५) काणे यांनी स्वतःच्या वैयक्तिक उपयोगासाठी ₹ ६,००० चा माल उचलला.

**नेने आणि काणे यांच्या पुस्तकात**

**व्यापार व नफा तोटा खाते दि.३१ मार्च २०१९ रोजी संपणाऱ्या वर्षाचे**

**नावे** **जमा**

| तपशील | रक्कम ₹ | रक्कम ₹ | तपशील | रक्कम ₹ | रक्कम ₹ |
|---|---|---|---|---|---|
| प्रारंभण स्कंध | | ५,३५,५०० | विक्री | ८,४०,५०० | |
| खरेदी | ६,४०,५०० | | (–) परत | ५,५०० | ८,३५,००० |
| (–) परत | ३,५०० | ६,३७,००० | | | |
| मजुरी | १०,००० | | काणे यांनी स्वतःच्या वैयक्तिक | | ६,००० |
| | | | उपयोगाकरीता उचललेला माल | | |
| (+) अदत्त मजुरी | ३,००० | १३,००० | | | |
| ढोबळ नफा (पु/ने) | | १५,५०० | संवरण स्कंध | | ३,६०,००० |
| | | १२,०१,००० | | | १२,०१,००० |
| वेतन | ५०,००० | | | | |
| (+) अदत्त वेतन | २,००० | ५२,००० | ढोबळ नफा (पु/आ) | | १५,५०० |
| | | | कसर | | ९५० |
| मोटार गाडीवर घसारा | | १८,५०० | शुद्ध तोटा | | |
| बुडीत कर्ज (जुना) | ३,३५० | | (भांडवल खात्याला | | |
| | | | स्थानांतरित) | | |
| (+) बुडीत कर्ज (नवीन) | ५,००० | | नेने | १,२८,२५० | |
| (+) सं.क.नि. | २२,२५० | | काणे | ८५,५०० | २,१३,७५० |
| | ३०,६०० | | | | |
| (–) सं. क. निधी (जुना) | ३,७०० | २६,९०० | | | |
| भाडे | १०,००० | | | | |
| (+) अदत्त भाडे (२महिन्याचे) | २,००० | १२,००० | | | |
| कसर | | ८०० | | | |
| कार्यालय खर्च | | २०,००० | | | |
| भविष्य निधी योगदान | | १,००,००० | | | |
| | | २,३०,२०० | | | २,३०,२०० |

**ताळेबंद**

**३१ मार्च २०१९ रोजीचा**

| देयता | रक्कम ₹ | रक्कम ₹ | संपत्ती | रक्कम ₹ | रक्कम ₹ |
|---|---|---|---|---|---|
| भांडवल : | | | मोटार गाडी | ३,७०,००० | |
| नेने | १५,००,००० | | (−) घसारा | १८,५०० | ३,५१,५०० |
| (−) शुद्ध तोटा | १,२८,२५० | | विविध ऋणको | ४,५०,००० | |
| | १३,७१,७५० | | (−) बुडीत कर्ज (नवीन) | ५,००० | |
| (−) उचल | २०,००० | १३,५१,७५० | | ४,४५,००० | |
| भांडवल | | | (−) संशयित कर्ज निधी | २२,२५० | ४,२२,७५० |
| काणे | १०,००,००० | | | | |
| (−) शुद्ध तोटा | ८५,५०० | | परिसर | | ८,५०,००० |
| | ९,१४,५०० | | भविष्य निधी गुंतवणूक | | ८,००,००० |
| (−) उचल | १५,००० | | | | |
| (−) वस्तूंची उचल | ६,००० | ८,९३,५०० | रोख शिल्लक | | ४०,००० |
| | | | बँक शिल्लक | | २,००,००० |
| विविध धनको | | ३,००,००० | संवरण स्कंध | | ३,६०,००० |
| अदत्त खर्च : | | | | | |
| मजुरी | ३,००० | | | | |
| वेतन | २,००० | | | | |
| भाडे | २,००० | ७,००० | | | |
| अधिकोष अधिविकर्ष | | १,५०,००० | | | |
| भविष्य निधी | २,८०,००० | | | | |
| (+) भविष्य निधी गुंतवणुकीवर व्याज | ४२,००० | ३,२२,००० | | | |
| | | **३०,२४,२५०** | | | **३०,२४,२५०** |

९. क्रांती आणि सुमंगला भांडवलाच्या प्रमाणात नफा तोटा विभागणाऱ्या भागीदार आहेत. खालील परीक्षा सूची आणि समायोजनांच्या आधारे ३१ मार्च २०१९ रोजी संपणाऱ्या वर्षाकरिता व्यापार व नफातोटा खाते आणि त्याच तारखेचा ताळेबंद तयार करा.

**परीक्षा सूची / तेरीज पत्रक ३१ मार्च २०१९ रोजीची**

| नावे शिल्लक | रक्कम ₹ | जमा शिल्लक | रक्कम ₹ |
|---|---|---|---|
| स्कंध (१/४/२०१८) | ३२,५०० | भांडवल | |
| खरेदी | ४०,००० | क्रांती | १,२०,००० |
| विविध ऋणको | १,००,००० | सुमंगला | ४०,००० |
| प्राप्य विपत्र | ८,५०० | | |
| मजुरी | ३,००० | विक्री | ६०,००० |
| गुंतवणूक | ३२,००० | विविध धनको | ३०,००० |
| टपाल खर्च | २,७०० | देय विपत्र | १५,००० |
| विमा | ७,५०० | कमिशन | ३२५ |
| यंत्र व संयत्र | १५,००० | खरेदी परत | १,००० |
| वेतन | ४,८५० | | |
| पूर्वदत्त भाडे | २,००० | | |
| बुडीत कर्ज | ५०० | | |
| उपस्कर | १२,५०० | | |
| रोख शिल्लक | ३,७७५ | | |
| विक्री परत | १,५०० | | |
| | **२,६६,३२५** | | **२,६६,३२५** |

**समायोजना :**

१) संवरण स्कंधाचे परिव्यय मूल्य (लागत मूल्य) ₹ २८,००० असून विपणी मूल्य (बाजार मूल्य) ₹ ३२,००० आहे.

२) विमा ३० जून २०१९ रोजी संपणाऱ्या वर्षाकरिता दिलेला आहे.

३) अदत्त मजुरी ₹ ८०० व अदत्त वेतन ₹ ७००.

४) यंत्र व सयंत्राचे मूल्य ₹ १३,००० झाले आहे.

५) उपस्करावर वार्षिक ५% दराने घसारा आकारा.

६) बुडीत कर्जासाठी ₹ ८०० ची तरतूद करा.

७) नमुना म्हणून ₹ ३,००० चा माल मोफत वाटण्यात आला.

**क्रांती आणि सुमंगला यांच्या पुस्तकात**
**व्यापार व नफा तोटा खाते दि.३१ मार्च २०१९ रोजी संपणाऱ्या वर्षाचे**

**नावे** **जमा**

| देयता | रक्कम ₹ | रक्कम ₹ | तपशील | रक्कम ₹ | रक्कम ₹ |
|---|---|---|---|---|---|
| प्रारंभण स्कंध | | ३२,५०० | विक्री | ६०,००० | |
| खरेदी | ४०,००० | | (–) विक्री परत | १,५०० | ५८,५०० |
| (–) खरेदी परत | १,००० | ३९,००० | | | |
| मजुरी | ३,००० | | संवरण स्कंध | | २८,००० |
| (+) अदत्त मजुरी | ८०० | ३,८०० | नमुना म्हणून मोफत वाटलेला माल | | ३,००० |
| ढोबळ नफा (पु/ने) | | १४,२०० | | | |
| | | ८९,५०० | | | ८९,५०० |
| टपाल खर्च | | २,७०० | ढोबळ नफा (पु/आ) | | १४,२०० |
| विमा | ७,५०० | | कमिशन | | ३२५ |
| (–) पूर्वदत्त विमा | १,८७५ | ५,६२५ | शुद्ध तोटा (भांडवल खात्याला स्थानांतरित) | | |
| वेतन | ४,८५० | | क्रांती | ४,७०६ | |
| (+) अदत्त वेतन | ७०० | ५,५५० | सुमंगला | १,५६९ | ६,२७५ |
| घसारा : | | | | | |
| यंत्र व सयंत्र | २,००० | | | | |
| उपस्कर | ६२५ | २,६२५ | | | |
| बुडीत कर्ज | ५०० | | | | |
| (+) नवीन बुडीत कर्ज | ८०० | १,३०० | | | |
| जाहिरात (नमुना म्हणून मोफत वाटलेला माल) | | ३,००० | | | |
| | | २०,८०० | | | २०,८०० |

**ताळेबंद ३१ मार्च २०१९ रोजीचा**

| देयता | रक्कम ₹ | रक्कम ₹ | संपत्ती | रक्कम ₹ | रक्कम ₹ |
|---|---|---|---|---|---|
| **भांडवल** | | | यंत्र व सयंत्र | १५,००० | |
| क्रांती | १,२०,००० | | (–) घसारा | २,००० | १३,००० |
| (–) शुद्ध तोटा | ४,७०६ | १,१५,२९४ | उपस्कर | १२,५०० | |
| | | | (–) घसारा | ६२५ | ११,८७५ |
| **भांडवल** | | | | | |
| सुमंगला | ४०,००० | | विविध ऋणको | १,००,००० | |
| (–) शुद्ध तोटा | १,५६९ | ३८,४३१ | (–) नवीन बुडीत कर्ज | ८०० | ९९,२०० |
| **अदत्त खर्च** | | | | | |
| मजुरी | ८०० | | प्राप्य विपत्र | | ८,५०० |
| वेतन | ७०० | १,५०० | गुंतवणूक | | ३२,००० |
| | | | रोख शिल्लक | | ३,७७५ |
| विविध धनको | | ३०,००० | संवरण स्कंध | | २८,००० |
| देय विपत्र | | १५,००० | पूर्वदत्त विमा | | १,८७५ |
| | | | पूर्वदत्त भाडे | | २,००० |
| | | २,००,२२५ | | | २,००,२२५ |

**१०. खालील परीक्षा सूची रिद्धी आणि सिद्धी या भागीदारांची आहे. ३१ मार्च २०१९ रोजी संपणाऱ्या वर्षाकरिता व्यापार व नफातोटा खाते आणि त्याच तारखेचा ताळेबंद खालील समायोजना विचारात घेऊन तयार करा.**

**परीक्षा सूची ३१ मार्च २०१९ रोजीची**

| तपशील | | नावे शिल्लक ₹ | जमा शिल्लक ₹ |
|---|---|---|---|
| स्कंध(१/४/२०१८) | | ४८,००० | – |
| **भांडवल :** | रिद्धी | – | ५०,००० |
| | सिद्धी | – | ३०,००० |
| खरेदी | | २२,५०० | – |
| मजुरी | | ८०० | – |
| खरेदीवरील वाहतूक खर्च | | १,००० | – |
| विविध धनको | | – | २७,६०० |
| देय्य विपत्र | | – | २०,००० |
| हस्तस्थ रोख | | २,८५० | – |
| विमा | | १,२०० | – |
| विविध ऋणको | | ३२,००० | – |
| अधिकोष अधिविकर्ष | | – | १८,००० |
| विक्रीवरील वाहतूक खर्च | | ९०० | – |
| जमीन व इमारत | | ४२,५०० | – |
| उपस्कर | | ३८,७०० | – |
| विक्री | | – | ४७,००० |
| खरेदी परत | | – | ५०० |
| विक्री परत | | ४०० | – |
| भाडे | | – | १,८०० |
| बुडीत कर्ज | | ३०० | – |
| संशयित कर्ज निधी | | – | ३५० |
| कसर | | ७०० | १,००० |
| प्रवास खर्च | | २५० | – |
| जाहिरात | | ४,१५० | – |
| | | **१,९६,२५०** | **१,९६,२५०** |

**समायोजना :**

१) संवरण स्कंध ₹ ४८,७००.

२) अदत्त खर्च – मजुरी ₹ ७०० आणि प्रवास खर्च ₹ २००.

३) जमीन व इमारतीवर वार्षिक १०% दराने तसेच उपस्करावर वार्षिक ५% दराने घसारा आकारा.

४) पूर्वदत्त विमा ₹ ३००.

५) ₹ ३,००० चा माल आगिमुळे नष्ट झाला विमा कंपनीने नुकसान भरपाईचा दावा अमान्य केला.

**रिद्धी आणि सिद्धी यांच्या पुस्तकात**
**व्यापार व नफा तोटा खाते**
**दि.३१ मार्च २०१९ रोजी संपणाऱ्या वर्षाचे**

**नावे** **जमा**

| तपशील | रक्कम ₹ | रक्कम ₹ | तपशील | रक्कम ₹ | रक्कम ₹ |
|---|---|---|---|---|---|
| प्रारंभण स्कंध | | ४८,००० | विक्री | ४७,००० | |
| खरेदी | २२,५०० | | (–) विक्री परत | ४०० | ४६,६०० |
| (–) खरेदी परत | ५०० | २२,००० | | | |
| | | | संवरण स्कंध | | ४८,७०० |
| मजुरी | ८०० | | आगीमुळे जळालेला माल | | ३,००० |
| (+) अदत्त मजुरी | ७०० | १,५०० | | | |
| खरेदीवरील वाहतूक खर्च | | १,००० | | | |
| ढोबळ नफा (पु/ने) | | २५,८०० | | | |
| | | ९८,३०० | | | ९८,३०० |
| विमा | १,२०० | | ढोबळ नफा (पु/आ) | | २५,८०० |
| (–) पूर्वदत्त वीमा | ३०० | ९०० | भाडे | | १,८०० |
| कसर | | ७०० | संशयित कर्ज निधी | ३५० | |
| घसारा | | | (–) बुडीत कर्ज | ३०० | ५० |
| जमीन व इमारत | ४,२५० | | | | |
| उपस्कर | १,९३५ | ६,१८५ | कसर | | १,००० |
| प्रवास खर्च | २५० | | | | |
| (+) अदत्त प्रवास खर्च | २०० | ४५० | | | |
| आगीमुळे नुकसान | | ३,००० | | | |
| विक्रीवरील वाहतूक खर्च | | ९०० | | | |
| जाहिरात | | ४,१५० | | | |
| शुद्ध नफा(भांडवल खात्याला स्थानांतरित) | | | | | |
| रिद्धी | ६,१८३ | | | | |
| सिद्धी | ६,१८२ | १२,३६५ | | | |
| | | २८,६५० | | | २८,६५० |

**ताळेबंद**

**३१ मार्च २०१९ रोजीचा**

| देयता | रक्कम ₹ | रक्कम ₹ | संपत्ती | रक्कम ₹ | रक्कम ₹ |
|---|---|---|---|---|---|
| भांडवल : | | | जमीन व इमारत | ४२,५०० | |
| रिद्‌धी | ५०,००० | | (–) घसारा | ४,२५० | ३८,२५० |
| (+) शुद्‌ध नफा | ६,१८३ | ५६,१८३ | उपस्कर | ३८,७०० | |
| भांडवल | | | (–) घसारा | १,९३५ | ३६,७६५ |
| सिद्‌धी | ३०,००० | | पूर्वदत्त विमा | | ३०० |
| (+) शुद्‌ध नफा | ६,१८२ | ३६,१८२ | हस्तस्थ रोख | | २,८५० |
| विविध धनको | | २७,६०० | विविध ऋणको | | ३२,००० |
| अदत्त खर्च : | | | संवरण स्कंध | | ४८,७०० |
| मजुरी | ७०० | | | | |
| प्रवास खर्च | २०० | ९०० | | | |
| देय्य विपत्र | | २०,००० | | | |
| अधिकोष अधिविकर्ष | | १८,००० | | | |
| | | **१,५८,८६५** | | | **१,५८,८६५** |

**स्वाध्याय : १**

**वस्तूनिष्ठ प्रश्न (Objective type questions)**

**१ अ) खालील दिलेल्या पर्यायामधून योग्य पर्याय निवडून संपूर्ण वाक्य पुन्हा लिहा. :**

१) जेव्हा भागीदारीच्या करारनाम्यात भागीदारांच्या नफातोटा विभाजना संबंधी उल्लेख नसतो तेव्हा भागीदार कोणत्या अनुपातात नफातोटा वाटून घेतात?

अ) समान ब) भांडवलाच्या प्रमाणात

क) प्रारंभिक योगदान ड) भागीदाराचा अनुभव आणि कार्यकाळ.

२) व्यवसायाचा शुद्‌ध नफा किंवा तोटा शोधण्याकरिता ................ खाते तयार केले जाते.

अ) व्यापार ब) भांडवल

क) चल ड) नफा – तोटा

३) ................ ही अदृश्य संपत्ती आहे.

अ) ख्याती ब) स्कंध (Stock)

क) रोख ड) उपस्कर (Furniture).

४) भागीदारी करारात उल्लेख नसेल तर भागीदाराच्या कर्जावर ................ दराने व्याज देय असेल.

अ) ५% ब) ६ %

क) १० % ड) ९%

५) भागीदारी संस्थेमध्ये भागीदाराची देयता ही ................ असते.

अ) मर्यादित ब) अमर्याद

क) मर्यादित आणिअमर्याद ड) वरील पैकी काहीही नाही

६) भारतीय भागीदारी कायदा ................ मधे अस्तित्वात आला.

अ) १९३२ ब) १८८१

क) १९५६ ड) १९८४

७) कंपनी कायद्यातील २०१३ मधील तरतुदीनुसार भगीदारी संस्थेत जास्तीत जास्त ................ भागीदार असू शकतात.

अ) १० ब) २५

क) २० ड) ५०

**ब) खालील विधानांनसाठी एक शब्द / शब्द समूह / संज्ञा लिहा.**

१) भागीदारी संस्थेमधील व्यक्ती कोण.

२) भागीदारांनी स्वतःच्या वैयक्तिक उपयोगाकरीता वेळोवेळी व्यवसायातून उचललेली रोख किंवा माल.

३) दोन किंवा दोनापेक्षा जास्त व्यक्तींची भारतीय भागीदारी संस्था कायद्याप्रमाणे संघटना.

४) भागीदारी संस्थेसंबंधी नियमित वापरला जाणारा कायदा.

५) भागीदारी संस्था नोंदणी आधिकाऱ्याकडे नोंदविण्याची प्रक्रिया.

६) भागीदारांमधील लिखीत असलेला करार.

७) अशी भांडवल पद्धती ज्यामधे भागीदारांचे भांडवल खाते स्थिर राहते.

८) भागीदार कोणत्या प्रमाणात नफा वाटून घेतात.

९) अशा भांडवल पद्धतीमध्ये प्रत्येक भागीदाराचे फक्त भांडवल खाते उघडले जाते.

१०) स्थिर भांडवल पद्धती असतांना सर्व समायोजनांची तरतूद कोणत्या भांडवल खात्यामधे करण्यात येते.

११) असा खर्च जो देय असण्यापूर्वीच केला जातो.

१२) प्रत्येक लेखांकन वर्षाचे शेवटी तयार करण्यात येणारी खाती.

१३) अशी संपत्ती जिचे सहजपणे रोखीत रूपांतर करता येते.

१४) ताळेबंद पत्रकात संपत्ती कोणत्या क्रमाने नोंदविली जाते.

१५) विक्रीवरील खर्च कोणत्या खात्यात लिहीला जातो.

१६) व्यापार खात्यावरील नावे शिल्लक.

१७) नफातोटा खात्याची जमा शिल्लक.

**क) खालील विधाने 'बरोबर' किंवा 'चूक ते लिहा :**

१) भागीदारीसंस्था ही अ-व्यापारी संस्था आहे.

२) नफातोटा खाते हे वास्तविक खाते आहे.

३) आगत वाहतूक खर्च हा खरेदीवरील वाहतूक खर्च आहे.

४) स्थिर भांडवल पद्धतीमध्ये भागीदारांशी संबधित सर्व समायोजन तरतुदी भागीदाराच्या चालू खात्यात केल्या जातात.

५) पूर्वदत्त खर्च हा देयता समजण्यात येते.

६) जर भागीदारी करारात उल्लेख नसेल तर भागीदार त्यांच्या भांडवलाच्या प्रमाणात नफातोटा वाटून घेतात.

७) ताळेबंद पत्रक हे खाते आहे.

८) यंत्राच्या स्थापने करीता दिलेली मजुरी हा महसुली (आगम) खर्च आहे.

९) आग्रिम मिळालेले उत्पन्न ही देयता आहे.

१०) बुडीत व संशयित कर्ज निधी (R.D.D.) धनकोवर आकारली जाते.

११) चल संपत्तीवर घसारा आकारला जात नाही.

१२) ख्याती ही अदृश्य संपत्ती आहे.

१३) अप्रत्यक्ष खर्च व्यापार खात्याच्या नावे बाजूवर दर्शविला जातो.

१४) बँकेचे कर्ज ही चल देयता आहे.

१५) नफातोटा खात्याची नावे शिल्लक शुद्ध नफा दर्शविते.

## ड) गटात न बसणारा शब्द ओळखा (Find odd one)

१) मजुरी, वेतन, अधिकार शुल्क (Royalty), आयात शुल्क (Import duty)

२) पोस्टेज, लेखनसामग्री, जाहिरात, खरेदी

३) भांडवल, प्राप्य विपत्र (Bills Receivable), राखीव निधी, बँक ओव्हरड्राफ्ट

४) इमारत, यंत्रसामग्री, उपस्कर (Furniture), देय विपत्र

५) प्राप्त कसर, प्राप्त लाभांश, प्राप्त व्याज, घसारा

## इ) विधाने पूर्ण करा.

१) जर नफातोटा वाटपाचे प्रमाण न दिल्यास भागीदार नफातोटा .................... प्रमाणात वाटून घेतात.

२) भारतात भागीदारी संस्थेची नोंदणी करणे .................... आहे.

३) भागीदारी व्यवसाय .................... असणेआवश्यक आहे.

४) भागीदारी संस्थेमधील भागीदाराची देयता .................... असते.

५) स्थिर भांडवल पद्धतीमध्ये उचल खात्याचा शिल्लक .................... खात्याल स्थानांतरित करतात.

६) भागीदाराच्या भांडवलावरील व्याज हे .................... खात्याच्या नावे बाजूवर दर्शवितात.

७) भागीदारांची भागीदारी संस्थेमधील देयता .................... असे.

८) .................... ही भागीदारी संस्थेची नियमावली आहे.

९) भागीदाराने स्वतःच्या वैयक्तिक उपयोगाकरीता व्यवसायातून काही घेतल्यास भागीदाराचे वैयक्तिक खाते .................... होते.

१०) भागीदाराला द्यावयाचे कमिशन भागीदारी संस्थेचा .................... आहे.

११) जेव्हा भागीदार स्थिर भांडवल पद्धतीचा वापर करतात तेव्हां ते .................... खाते उघडतात.

१२) जेव्हां भागीदाराच्या चालू खात्यावर.................... शिल्लक असते तेव्हा ती ताळेबंद पात्रकात देयता बाजूवर लिहीली जाते.

१३) व्यापारी हेतूसाठी केल्या जाणाऱ्या खर्चास .................... म्हणतात.

१४) नियमीत प्राप्त होणाऱ्या रोख प्राप्तीस .................... म्हणतात.

१५) खरेदी परत .................... मधून वजा केली जाते.

१६) देय तिथी पूर्वीच्या केलेल्या खर्चास .................... म्हणतात.

१७) व्यवसायामध्ये दीर्घकाळासाठी राहणाऱ्या संपत्तीस .................... असे म्हणतात.

१८) व्यापार खाते.................... खर्चाच्या आधारे तयार केले जाते.

१९) जेव्हां एखादया भागीदाराला कमिशन देय असते तेव्हां तो भागीदारी संस्थेचा .................... असतो.

२०) जेव्हा नमुना म्हणून मोफत माल वाटला जातो, तेव्हा तो भागीदारी संस्थेचा .................... खर्च समजण्यात येतो.

## ग) खालील विधानांशी तुम्ही सहमत आहात की असहमत ते लिहा.

१) जेव्हां भागीदारी करारात उल्लेख नसेल तेव्हा भागीदार भांडवलाच्या प्रमाणात नफातोटा विभागून घेतात.
२) चालू खाते नेहमी नावे शिल्लक दर्शविते.
३) भागीदारीचा करार हा लिखीत स्वरूपात असणे अनिवार्य आहे.
४) भागीदारी संस्था ही व्यापारी संस्था आहे.
५) भागीदाराच्या भांडवलावरील व्याज हा भागीदारी संस्थेचा खर्च आहे.
६) भागीदारी ही दोन किंवा दोन पेक्षा जास्त व्यक्तींची संघटना आहे.
७) भागीदाराला अशीर्षकांकीत वेतन किंवा कमिशन मिळाले पाहिजे.
८) स्थिर भांडवल पद्धतीमध्ये भागीदाराच्या भांडवल खात्याची शिल्लक स्थिर असते.
९) विद्यमान भारतीय भागीदारी कायदा १९४५ या वर्षाचा आहे.
१०) नफातोटा खाते व्यवसायाची खरी वित्तीय कामगीरी दर्शविते.
११) भागीदाराने स्वतःच्या वैयक्तिक उपयोगाकरीता व्यवसायातून रक्कम घेतल्यास चालू खात्याच्या नावे बाजूवर दर्शवितात.
१२) विकलेल्या परंतु न वितरीत केलेल्या मालाचे मूल्यांकन संवरण स्कंधात केले जाते.
१३) खरेदीवरील वाहतूक खर्च हा विक्री व वितरण खर्च आहे.
१४) ढोबळ नफा हा परिचालन नफा आहे. (operating)
१५) सर्व प्रकारचे प्रत्यक्ष खर्च नफातोटा खात्याच्या नावे बाजूवर दर्शविले जातात.
१६) मोफत वाटलेला माल व्यापार खात्याच्या नावे दर्शविला जातो.

## फ) एका वाक्यात उत्तरे लिहा

१) आस्थिर भांडवल म्हणजे काय?
२) भागीदारी करार का आवश्यक आहे?
३) भागीदारी करारात जर उल्लेख नसेल तर भागीदार कोणत्या प्रमाणात नफातोटा वाटून घेतात ?
४) स्थिर भांडवल पद्धती म्हणजे काय ?
५) भागीदारी संस्थेत किमान किती सभासद असतात ?
६) भागीदारी करार म्हणजे काय?
७) भागीदारी संस्थेचे उद्दिष्ट्य काय आहे ?
८) भागीदारी करारात जर उल्लेख नसेल तर भागीदाराच्या कर्जावर किती टक्के दराने व्याज दिले जाते?
९) भारतीय भागीदारी कायदा १९३२ नुसार भागीदारी-संस्थेत कमीत कमी किती सभासद असतात ?
१०) भागीदाराची देयता म्हणजे काय?
११) भागीदारी करारात जर उल्लेख नसेल तर, भागीदारी कोणत्या प्रमाणात नफा तोटा वाटून घेतात.
१२) पूर्व प्राप्त उत्पन्न म्हणजे काय?
१३) भागीदारांच्या वार्षिक खात्यावर ऋणकोवर कसर या समायोजनेचा काय परिणाम होतो?
१४) भागीदाराच्या चालू खात्यावरील नावे शिल्लक कुठे स्थानांतरित केली जाते?
१५) वर्ष अखेरच्या मालसाठ्याचे लागत मूल्य व बाजार मूल्य दिली असतील तर त्याचे मूल्यांकन कसे केले जाते ?
१६) भारतीय भागीदारी कायदयात भागीदाराच्या भांडवलावर व्याज देण्याची काय तरतूद आहे ?
१७) परीक्षा सूची का तयार केली जाते?
१८) यंत्राच्या स्थापने करीता दिलेली मजुरी व्यापार खात्यात का दर्शविली जात नाही ?

१९) अप्रत्यक्ष उत्पन्न म्हणजे काय ?

२०) भागीदाराचे भांडवल हे भागीदारी संस्थेची दीर्घ मुदतीची देयता असते असे का?

**ह) पुढील ची गणना करा. (Calculate the following) :-**

१) संवरण स्कंधाचे मूल्य १०% ने कमी लावण्यात यावे. संवरण स्कंधाचे मूल्य ₹ ३०,००० आहे. संवरण स्कंधाचे मूल्य शोधा.

२) फर्निचर वर वार्षिक १२.५% दराने घसाऱ्याची गणना करा –

अ) ₹ २२,००० वर १ वर्षाचे

ब) ₹ १०,००० वर ६ महिन्याचे

३) १ सप्टेंबर २०१९ रोजी संपणाऱ्या वर्षाकरिता विमा प्रव्याजीचे ₹१५०० देण्यात आले. संस्थेचे आर्थिक वर्ष ३१ मार्च २०१९ रोजी संपते असे गृहीत मानून पूर्वदत्त विम्याच्या राशीची गणना करा.

४) ढोबळ नफा किंवा तोटा शोधा –

खरेदी ₹ ३०,०००, विक्री ₹१५,०००, आगत वाहन व्यय ₹२,४००, प्रारंभण स्कंध ₹१०,०००, खरेदी परत ₹१,०००, संवरण स्कंध ₹३६,०००.

५) १ ऑक्टोंबर २०१९ ला बँक ऑफ महाराष्ट्रकडून १५% वार्षिक दराने ₹२,००,००० चे कर्ज घेतले. प्रत्येक आर्थिक वर्ष ३१ मार्चला संपते असे गृहीत धरून २०१९-२० या वर्षासाठी बँक कर्जावरील व्याजाची गणना करा.

**१. अमितभाई आणि नरेन्द्रभाई हे समान प्रमाणात नफातोटा वाटून घेणारे भागीदार आहेत. खालील परीक्षा सूची व समायोजनांच्या आधारे ३१ मार्च २०१९ रोजी संपणाऱ्या वर्षाकरिता व्यापार व नफातोटा खाते आणि त्याच तारखेचा ताळेबंद तयार करा.**

**परीक्षा सूची ३१ मार्च २०१९ रोजीची**

| नावे शिल्लक | रक्कम ₹ | जमा शिल्लक | रक्कम ₹ |
|---|---|---|---|
| यंत्र व सयंत्र | २,८०,००० | भांडवल : | |
| इमारत | ७५,००० | अमितभाई | ३,५०,००० |
| विविध ऋणको | २८,७०० | नरेन्द्र भाई | ३,००,००० |
| खरेदी | ८५,५०० | | |
| बुडीत कर्ज | ५०० | विक्री | १,८०,००० |
| विक्री परत | २,२०० | देयविपत्र | ८,५०० |
| १०% सरकारी रोखे (१ ऑक्टो.२०१८ ला खरेदी) | ४०,००० | कसर | १,२०० |
| आयात कर | १,८०० | धनको | ३८,५०० |
| वैध खर्च | २,००० | संशयित कर्ज निधी | २,७०० |
| गामक शक्ती | १२,००० | बँक कर्ज | १५,००० |
| वखार भाडे | १,८०० | खरेदी परत | २,००० |
| हस्तस्थ रोख | २०,००० | | |
| बँकेतील रोख | ७०,००० | | |
| जाहिरात (१ जाने.२०१९ पासून २ वर्षासाठी) | १०,००० | | |
| वेतन | ३,८०० | | |
| भाडे | १,५०० | | |
| उचल : | | | |
| अमितभाई | २,४०० | | |
| नरेन्द्र भाई | ३,२०० | | |
| उपस्कर | १,९५,८०० | | |
| प्राप्य विपत्र | २०,७०० | | |
| आत्मधृत संपत्ती (Free hold property) | ४१,००० | | |
| | ८,९७,९०० | | ८,९७,९०० |

**समायोजना :**

१) ३१ मार्च २०१९ रोजी शिल्लक असलेला माल साठ्याचे मूल्य ₹ ४३,०००.

२) ₹ ८,००० किमतीचा माल चोरीला गेला.

३) विविध ऋणकोवर २% बुडीत व संशयित कर्ज निधीची तरतूद करा.

४) श्री. पाटील आपले ग्राहक नादार झाल्यामुळे त्यांच्याकडील ₹ ५०० वसूल होण्याजोगे नाही.

५) अदत्त खर्च – भाडे ₹ ८०० आणि वेतन ₹ ३००

६) इमारतीवर ₹ २,५०० आणि उपस्कारावर ₹ १,८०० घसारा आकारा.

**उत्तर :** ढोबळ नफा – ₹ १,३१,५००, निव्वळ नफा – ₹ १,१२,०८६, ताळेबंद बेरीज – ₹ ८,१९,५८६

२. **खालील परीक्षा सूची मितेश आणि मंगेश या भागीदारांची आहे. त्यावरून ३१ मार्च २०१९ रोजी संपणाऱ्या वर्षाकरिता व्यापार व नफातोटा खाते आणि त्याच तारखेचा ताळेबंद तयार करा.**

**परीक्षा सूची ३१ मार्च २०१९ रोजीची**

| नावे शिल्लक | रक्कम ₹ | जमा शिल्लक | रक्कम ₹ |
|---|---|---|---|
| स्कंध (१/४/२०१८) | २५,००० | विविध धनको | ३८,००० |
| इमारत | ४८,५०० | विक्री | १,७५,००० |
| गाडीभाडे | १,७८० | भांडवल : | |
| कारखाना विमा | २,७०० | मितेश | १,५०,००० |
| टपाल खर्च | १,६०० | मंगेश | ५०,००० |
| प्राप्य विपत्र | १३,७०० | अदत्त वेतन | २,००० |
| विविध ऋणको | ५२,२०० | देय विपत्र | १८,००० |
| विक्री परत | १,६०० | खरेदी परत | १,८०० |
| खरेदी | ६८,९०० | चालू खाते : | |
| अंकेक्षण शुल्क | १,८०० | मितेश | ३,००० |
| सुटी अवजारे | ३२,००० | मंगेश | २,००० |
| उत्पादन खर्च | १,८२० | | |
| विद्युत खर्च | २,६०० | | |
| सामान्य खर्च | ३,४०० | | |
| निर्यात कर | १,००० | | |
| रोख शिल्लक | ७५,००० | | |
| बँक शिल्लक | २९,००० | | |
| प्रवास खर्च | ४,१०० | | |
| उपस्कर | ६४,००० | | |
| वेतन | २,००० | | |
| भाडे, दर आणि कर | ३,७०० | | |
| उचल : | | | |
| मितेश | १,२०० | | |
| मंगेश | २,२०० | | |
| | **४,३९,८००** | | **४,३९,८००** |

**समायोजना :**

१) मितेश आणि मंगेश ३:१ या प्रमाणात नफातोटा वाटून घेतात.

२) भागीदारांना ढोबळ नफ्यावर प्रत्येकी १% कमिशन देण्यात यावे.

३) वर्ष अखेरचा शिल्लक मालसाठा ₹ २३,७००.

४) अदत्त खर्च – अंकेक्षण ₹ ४००; गाडी भाडे ₹ ६००.

५) इमारतीचे मूल्यांकन ₹ ४६,५००.

६) उपस्करावर वार्षिक ५% दराने घसारा आकारा.

७) भागीदाराच्या भांडवलावर २.५% दराने व्याज आकारा.

८) मंगेश यांनी स्वतःच्या वैयक्तिक उपयोगाकरीता ₹ ९०० चा माल उचलला.

९) ₹ १,००० बुडीत कर्ज अपलेखीत करून ऋणकोवर ३% प्रमाणे बुडीत व संशयित कर्ज निधी निर्माण करा.

**उत्तर :** ढोबळ नफा – ₹ ९९,०००, निव्वळ नफा – ₹ ६३,६८४, ताळेबंद बेरीज – ₹ ३,३०,३६४

३. **खालील परीक्षा सूची व समायोजनांच्या आधारे ३१ मार्च २०१९ रोजी संपणाऱ्या वर्षाकरिता व्यापार व नफातोटा खाते आणि त्याच तारखेचा ताळेबंद तयार करा.**

**परीक्षा सूची ३१ मार्च २०१९ रोजीची**

| नावे शिल्लक | रक्कम ₹ | जमा शिल्लक | रक्कम ₹ |
|---|---|---|---|
| खरेदी | ३५,५०० | विक्री | ५८,२०० |
| विविध ऋणको | ४०,००० | विविध धनको | २५,७०० |
| विक्री परत | १,००० | खरेदी परत | ५०० |
| प्रारंभण स्कंध | १८,१०० | संशयित कर्ज निधी | ८०० |
| बुडीत खर्च | ५०० | कसर | ५० |
| जमीन व इमारत | २५,००० | कमिशन | २५० |
| उपस्कर | २०,००० | भांडवल : | |
| कसर | १,००० | रिना | ५०,००० |
| अधिकार शुल्क | ७०० | आरती | ३०,००० |
| भाडे | १,९०० | | |
| वेतन | ३,००० | | |
| मजुरी | ८०० | | |
| विमा | १,५०० | | |
| उचल : | | | |
| रिना | २,००० | | |
| आरती | १,००० | | |
| बँक शिल्लक | ११,५०० | | |
| रोख शिल्लक | २,००० | | |
| | **१,६५,५००** | | **१,६५,५००** |

**समायोजना :**

१) संवरण स्कंधाचे मूल्य ₹ २२,०००.

२) बुडीत कर्ज ₹ ९०० अपलेखीत करून ऋणकोवर ₹ १,००० बुडीत व संशयित कर्ज निधीची तरतूद करा.

३) ऋणकोवर ३% प्रमाणे देय कसर निधी व धनकोवर ५% प्रमाणे प्राप्त कसर निधी निर्माण करा.

४) अदत्त खर्च – मजुरी ₹ ७०० आणि वेतन ₹ ८००.

५) विमा १ एप्रिल २०१८ पासून १५ महिन्याकरीता दिला आहे.

६) जमीन आणि इमारतीवर वार्षिक ५% दराने घसारा आकारा.

७) रिना आणि आरती भांडवलाच्या प्रमाणात नफातोटा विभागून घेतात.

**उत्तर :** ढोबळ नफा – ₹ २३,९००, निव्वळ / शुद्ध नफा – ₹ १३,५९२, ताळेबंद बेरीज – ₹ १,१६,५०७

४. **खालील परीक्षा सूची मेसर्स मीरा आणि माधव या भागीदारी संस्थेची आहे. ३१ मार्च २०१९ रोजी संपणाऱ्या वर्षाकरिता व्यापार व नफातोटा खाते आणि त्याच तारखेचा ताळेबंद तयार करा.**

**परीक्षा सूची ३१ मार्च २०१९ रोजीची**

| नावे शिल्लक | रक्कम ₹ | जमा शिल्लक | रक्कम ₹ |
|---|---|---|---|
| स्कंध (१/४/२०१८) | २५,००० | बँक अधिविकर्ष | ५,००० |
| ऋणको | ८०,५०० | देय्य विपत्र | १२,५०० |
| प्राप्य विपत्र | १०,००० | धनको | ६८,००० |
| खरेदी | २,०८,५०० | विक्री | ३,२५,००० |
| परत | १,००० | अदत्त भाडे | २,००० |
| खरेदी वरील वाहन व्यय | ३,००० | देणे बाकी मजुरी | १,५०० |
| विक्री वरील वाहन व्यय | ४,५०० | भांडवल : | |
| मोटार गाडी | ५५,००० | मीरा | ७५,००० |
| सामान्य खर्च | १,८०० | माधव | ७५,००० |
| निर्यात कर | ९०० | खरेदी परत | १००० |
| जाहिरात | ४,८०० | | |
| (१/१०/२०१८ पासून ३ वर्षाकरिता) | | | |
| छपाई व लेखन सामग्री | १,२०० | | |
| उचल : | | | |
| मीरा | ३,५०० | | |
| माधव | २,००० | | |
| पट्टधृत परिसर | १,१०,००० | | |
| (Lease hold Premises) | | | |
| बँकेतील रोख | ४५,००० | | |
| उपस्कर | ८,३०० | | |
| | **५,६५,०००** | | **५,६५,०००** |

**समायोजना :**

१) संवरण स्कंधाचे मूल्य ₹ ३२,०००.

२) संशयित कर्ज निधी करीता ₹ २,००० ची तरतूद करा.

३) ऋणकोवर ३% दराने देयकसर निधी निर्माण करा.

४) ३१ मार्च २०१९ रोजी पट्टधृत परिसराचे मूल्यांकन ₹ १,००,००० होते.

५) अदत्त छपाई व लेखनसामग्री ₹ ५००.

**उत्तर :** ढोबळ नफा – ₹ १,२०,५००, निव्वळ नफा – ₹ ९६,४४५, ताळेबंद बेरीज – ₹ ३,३०,४४५

५. **सुचेता आणि गायत्री ३:२ या प्रमाणात नफातोटा विभागून घेणाऱ्या भागीदार आहेत. खालील परीक्षा सूची आणि अतिरीक्त माहितीच्या आधारे ३१ मार्च २०१९ रोजी संपणाऱ्या वर्षाकरिता व्यापार व नफातोटा खाते आणि त्याच तारखेचा ताळेबंद तयार करा.**

**परीक्षा सूची ३१ मार्च २०१९ रोजीची**

| तपशील | नावे शिल्लक ₹ | जमा शिल्लक ₹ |
|---|---|---|
| खरेदी आणि विक्री | ६५,००० | १,८५,५०० |
| निर्माणी व्यवस्थापकाचे वेतन | २,३०० | – |
| भांडवल : | | |
| सुचेता | – | ७५,००० |
| गायत्री | – | ४०,००० |
| प्रारंभण स्कंध | १८,७०० | – |
| ऋणको आणि धनको | ४७,५०० | ३५,००० |
| मजुरी आणि वेतन | ४,००० | – |
| प्राप्य विपत्र | २२,००० | – |
| देय विपत्र | – | २७,३०० |
| कसर | – | ४०० |
| गामक शक्ती(Motive Power) | १,३५० | – |
| सीमा शुल्क (Custom duty) | १,५०० | – |
| व्याज | – | १,३०० |
| अनुत्पादक मजुरी | ३,००० | – |
| अंकेक्षण शुल्क | २,५०० | – |
| भाडे | १,८०० | – |
| प्रवास खर्च | २,००० | – |
| ख्याती (Goodwill) | २५,००० | – |
| प्रतीलीपी हक्क (Copy rights) | २०,००० | – |
| इमारत | ८८,००० | – |
| सुचेताचे कर्ज खाते | – | ६,१५० |
| गुंतवणूक | ४०,००० | – |
| बँकेतील रोख | २६,००० | – |
| | **३,७०,६५०** | **३,७०,६५०** |

**समायोजना :**

१) ३१ मार्च २०१९ रोजी शिल्लक असलेला माल ₹ १९,७००.

२) ₹ ३,००० चा माल नमुना म्हणून मोफत वाटण्यात आला.

३) पॉवर मिटरसाठी ठेव म्हणून ठेवलेली रक्कम ₹ ५०० गामक शक्ती या पदात समाविष्ट आहे.

४) इमारतीवर वार्षिक ५% दराने घसारा आकारा.

५) ₹ २,००० बुडीत कर्ज अपलेखीत करून ऋणकोवर ३% प्रमाणे संशयित कर्ज निधी निर्माण करा.

६) प्राप्य विपत्रात ₹ ४,००० च्या अनादरीत विपत्राचा समावेश आहे.

**उत्तर :** ढोबळ नफा – ₹ १,१५,८५०, निव्वळ नफा – ₹ ८६,९९६, ताळेबंद बेरीज – ₹ २,८०,८१५

६. **अर्चना आणि प्रेरणा २:१ या प्रमाणात नफातोटा विभागणाऱ्या भागीदार आहेत. खालील परीक्षा सूची आणि समायोजनांच्या आधारे ३१ मार्च २०१९ रोजी व्यापार व नफातोटा खाते आणि त्याच दिवशीचे ताळेबंद तयार करा.**

**परीक्षा सूची ३१ मार्च २०१९ रोजीची**

| नावे शिल्लक | रक्कम ₹ | जमा शिल्लक | रक्कम ₹ |
|---|---|---|---|
| स्कंध - (१/४/२०१८) | ८,५६० | भांडवल : | |
| एकस्व (Patents) | २,००० | अर्चना | ४०,००० |
| विविध ऋणको | १८,५०० | प्रेरणा | २०,००० |
| लेखन सामग्रीचा स्कंध | ३,००० | इतर कर्ज | ३,००० |
| व्यापार चिन्ह (Trade Mark) | २,००० | राखीव निधी | १,००० |
| प्राप्य विपत्र | ६,३०० | विविध धनको | १७,५०० |
| विद्युत शुल्क | १,४५० | देय विपत्र | ५,००० |
| मजुरी | ९५० | खरेदी परत | १,००० |
| उष्णता आणि प्रकाश | १,००० | संशयित कर्ज निधी (R.D.D.) | ५०० |
| व्यापार व्यय | ८५० | विक्री | ३०,२०० |
| विक्री परत | ४०० | व्याज | ३१० |
| जमीन आणि इमारत | २२,००० | | |
| उपस्कर | १३,००० | | |
| बँकेतील रोख | ५,००० | | |
| गुंतवणूक | ७,५०० | | |
| उचल : | | | |
| अर्चना | १,२०० | | |
| प्रेरणा | ९०० | | |
| बुडीत कर्ज | २०० | | |
| खरेदी | २३,७०० | | |
| | **१.१८,५१०** | | **१.१८,५१०** |

**समायोजना :**

१) ३१मार्च २०१९ रोजी शिल्लक असलेल्या मालाचे लागत मूल्य (परीव्यय मूल्य) ₹ १२,००० असून बाजार मूल्य (विपणी मूल्य) ₹ १७,००० आहे.

२) आपले ग्राहक श्री. शेखर ₹ ८०० देण्यास असमर्थ आहेत.

३) ऐकस्व १/८ खाते बाद करा.

४) उपस्कराचा एक भाग ₹ ५,००० मूल्याचा १ ऑक्टोंबर २०१८ रोजी खरेदी करण्यात आला.

५) जमीन आणि इमारतीवर वार्षिक १०% प्रमाणे उपस्करावर वार्षिक ५% प्रमाणे घसारा आकारा.

६) अदत्त खर्च - मजुरी ₹ ३००, विद्युत शुल्क ₹ २००.

७) भांडवलावर वार्षिक ३% दराने व्याज आकारा.

**उत्तर :** ढोबळ नफा - ₹ ८,२९०, निव्वळ नफा - ₹ ८२५, ताळेबंद बेरीज - ₹ ८७,५२७

७. **श्री. सतीश आणि श्री. प्रमोद हे भागीदार आहेत. ३१ मार्च २०१९ रोजी संपणाऱ्या वर्षा करिता व्यापार खाते व नफातोटा खाते तयार करून ढोबळ नफा आणि शुद्‌ध नफा शोधून काढा.**

**परीक्षा सूची ३१ मार्च २०१९ रोजीची**

| नावे शिल्लक | रक्कम ₹ | जमा शिल्लक | रक्कम ₹ |
|---|---|---|---|
| स्कंध (१/४/२१८) | ८,७०० | विक्री | ६८,००० |
| खरेदी | १८,३०० | लाभांश | २,००० |
| मजुरी | १,००० | खरेदी परत | ५०० |
| विमा | ८०० | विविध धनको | १३,००० |
| अनुत्पादक मजुरी | १,४०० | १०% बँक कर्ज | ८,००० |
| गोदाम भाडे | ६०० | (१/७/२०१८ रोजीचे) | |
| विक्रीवरील वाहन व्यय | १,२०० | इतर प्राप्ती | १,००० |
| विक्री परत | ६०० | | |
| निर्यात कर | १,४०० | | |
| सीमा शुल्क(Customs duty) | ८०० | | |
| विविध ऋणको | ४०,००० | | |
| गुंतवणूक | १५,७०० | | |
| कारखाना भाडे | १,६०० | | |
| टपाल आणि तार | ४०० | | |
| | **९२,५००** | | **९२,५००** |

**समायोजना :**

१) संवरण स्कंधाचे मूल्यांकन ₹ १५,४००.

२) अदत्त मजुरी ₹ ५००.

३) बुडीत कर्जासाठी ₹ ८०० ची तरतूद करून ऋणकोवर ३% दराने बुडीत व संशयित कर्जनिधी निर्माण करा.

४) ₹ १,८०० चा माल नमुना म्हणून मोफत वाटण्यात आला.

५) ३१ मार्च २०१९ ला ₹ २,००० चा माल विकला आणि वितरीत करण्यात आला परंतु लेखापुस्तकात त्याची नोंद करण्यात आली नाही.

**उत्तर :** ढोबळ नफा – ₹ ५६,२००, शुद्‌ध नफा – ₹ ४८,९६४

८. **नाना आणि नानी समान प्रमाणात नफातोटा वाटून घेणारे भागीदार आहेत. खालील परीक्षा सूची आणि समायोजनांच्या आधारे ३१ मार्च २०१९ रोजी संपणाऱ्या वर्षाकरिता नफातोटा खाते आणि त्याच तारखेचा ताळेबंद तयार करा.**

**परीक्षा सूची ३१ मार्च २०१९ रोजीची**

| तपशील | नावे शिल्लक ₹ | जमा शिल्लक ₹ |
|---|---|---|
| विमा | १५,००० | – |
| जमीन आणि इमारत | ५०,००० | – |
| (१ जुलै २०१८ रोजी ₹२०,००० ची वाढ) | | |
| वेतन | ५,००० | – |
| भांडवल : | | |
| नाना | – | ५०,००० |
| नानी | – | ५०,००० |
| १०% दराने बँक कर्ज (१/१०/२०१८ रोजी घेतले) | – | ३०,००० |
| निर्यात कर | २,५०० | – |
| व्याज | १,००० | १,५०० |
| उपस्कर | ४०,००० | – |
| देय विपत्र | – | ८,००० |
| ऋणको | २६,००० | – |
| | **१,३९,५००** | **१,३९,५००** |

**अतिरिक्त माहिती :**

१) ढोबळ नफा ₹ ३४,५००.

२) विमा १ एप्रिल २०१८ पासून १५ महिन्याकरीता दिला आहे.

३) जमीन आणि इमारतीवर वार्षिक १०% दराने तसेच उपस्करावर वार्षिक ५% दराने घसारा आकारा.

४) बुडीत कर्ज ₹ १,००० अपलेखित करून ऋणकोवर ५% प्रमाणे बुडीत व संशयित कर्ज निधीची तरतूद करा.

५) संवरण स्कंधाचे मूल्य ₹ ३४,५००

**उत्तर :** शुद्ध नफा – ₹ ५,२५०, ताळेबंद बेरीज – ₹ १,४४,७५०

**९. सन आणि मुन समान प्रमाणात नफातोटा विभागणारे भागीदार आहेत. खालील माहितीच्या आधारे ताळेबंद व भागीदाराचे चालू खाते तयार करून समायोजनांचा होणारा परिणाम दर्शवा.**

**परीक्षा सूची ३१ मार्च २०१९ रोजीची**

| नावे शिल्लक | रक्कम ₹ | जमा शिल्लक | रक्कम ₹ |
|---|---|---|---|
| जमीन व इमारत | ४०,००० | भांडवल खाते : | |
| उपस्कर | १८,००० | सन | ३३,५०० |
| मजूरी | २,००० | मून | ३३,५०० |
| सयंत्र | ४०,००० | चालू खाते : सन | ६,००० |
| (१/७/२०१८ ला खरेदी) | | | |
| ख्याती (Goodwill) | २,००० | विविध धनको | २५,००० |
| चालू खाते : मून | ४,००० | बँक अधिविकर्ष | १०,००० |
| ८% कर्जरोखे | ८,००० | राखीव निधी | ५,००० |
| (१/१०/२०१८ला खरेदी) | | भविष्य निर्वाह निधी (Providend Fund) | ५,००० |
| भविष्य निर्वाह निधी गुंतवणूक | ३,५०० | | |
| पोष्ट तिकीटांचा साठा | ५०० | | |
| | **१,१८,०००** | | **१,१८,०००** |

**समायोजना:**

१) भागीदारांना नफातोटा विभाजना व्यतीरीक्त वार्षिक ₹ ६,००० वेतन देण्यात यावे.

२) जमीन व इमारत, उपस्कर आणि सयंत्रावर अनुक्रमे १०%, ५% आणि ३% वार्षिक दराने घसारा आकारण्यात यावा.

३) भांडवलावर वार्षिक ५% दराने व्याज आकारा.

४) संवरण स्कंध ₹ ६०,७४३.

५) कामगारांना दिलेल्या मजुरीत ₹ १,००० अग्रिम दिलेल्या मजुरीचा समावेश आहे.

६) ₹ ८०० व्याज देय झाले परंतु दिले नाही.

७) चालू वर्षाचा शुद्ध नफा ₹ ३८,११३ आहे.

**उत्तर :** ताळेबंद बेरीज – ₹ १,६८,२६३, चालू खाते : सन – ₹ ३२,७३१, मून – ₹ २२,७३२

१०. क्षिप्रा आणि मनिषा भांडवलाच्या प्रमाणात नफातोटा विभागून घेणाऱ्या भागीदार आहेत. खालील माहितीवरून ३१ मार्च २०१९ रोजी संपणाऱ्या वर्षाकरिता व्यापार व नफातोटा खाते आणि त्याच तारखेचा ताळेबंद तयार करा.

**परीक्षा सूची ३१ मार्च २०१९ रोजीची**

| नावे शिल्लक | रक्कम ₹ | जमा शिल्लक | रक्कम ₹ |
|---|---|---|---|
| विविध ऋणको | २८,००० | विक्री | १,२०,००० |
| खरेदी | ५५,००० | भाडे | १,८०० |
| उपस्कर | ३८,५०० | विविध धनको | ३८,५०० |
| यंत्र व सयंत्र | ६०,००० | खरेदी परत | १,००० |
| मजुरी | ८०० | कसर | ५०० |
| वेतन | ३,५०० | देय विपत्र | ९,००० |
| कसर | ८०० | भांडवल : | |
| प्राप्य विपत्र | १४,४०० | क्षिप्रा | ९०,००० |
| विक्रीवरील वाहन व्यय | १,००० | मनिषा | ३०,००० |
| टपाल आणि तार | ५०० | चालू खाते : | |
| विक्री परत | ५०० | क्षिप्रा | ५,००० |
| हस्तस्थ रोख | ४,००० | मनिषा | ३,००० |
| बँकेतील रोख | ४७,००० | | |
| विमा | २,००० | | |
| प्रारंभण स्कंध | १७,८०० | | |
| व्यापार खर्च | १,५०० | | |
| गोदाम भाडे | २,५०० | | |
| जाहिरात | १,००० | | |
| इमारत | २०,००० | | |
| | २,९८,८०० | | २,९८,८०० |

**समायोजना :**

१) ३१ मार्च २०१९ रोजी शिल्लक असलेल्या मालाचे मूल्य ₹ ३७,०००.

२) १ एप्रिल २०१८ रोजी विकण्यात आलेल्या ₹ २,००० च्या यंत्रसामग्रीचा समावेश विक्री या पदात करण्यात आला.

३) सर्व स्थिर संपत्तीवर वार्षिक ५% दराने घसारा आकारा.

४) भागीदारांना ढोबळ नफ्यावर १% प्रमाणे कमिशन देण्यात यावे आणि भागीदाराच्या भांडवलावर वार्षिक ५% प्रमाणे व्याज देण्यात यावे.

५) अदत्त खर्च - मजुरी ₹ २००, वेतन ₹ ५००.

६) विविध ऋणकोवर ३% दराने संशयित कर्जनिधी करिता तरतूद करा.

**उत्तर :** ढोबळ नफा - ₹ ८१,७००, शुद्ध नफा - ₹ ५६,४०१, ताळेबंद बेरीज - ₹ २,४०,२३५

# २. नफा न कमविणाऱ्या संस्थांची खाती
## (Accounts of Not for Profit Concerns)

**अभ्यास घटक**

२.१.१ प्रस्तावना
२.१.२ नफा न कमविणाऱ्या संस्थांचा अर्थ.
२.१.३ नफा न कमविणाऱ्या संस्थेची वैशिष्ट्ये.
२.१.४ नफा कमविणारी आणि नफा न कमविणारी संस्था यामधील फरक.
२.१.५ लेखा पुस्तके ठेवण्याची आणि अंतिम खाती तयार करण्याची गरज.
२.२.१ प्राप्ती-शोधन खात्याचा अर्थ.
२.२.२ प्राप्ती-शोधन खात्याची वैशिष्ट्ये.
२.२.३ प्राप्ती चे प्रकार (Types of Receipts)
i) भांडवली प्राप्ती
ii) महसुली प्राप्ती
२.२.४ शोधनाचे प्रकार (Types of Payments)
i) भांडवली खर्च
ii) महसुली खर्च
iii) आस्थगित महसुली खर्च (Deferred Revenue Expenditure).
२.२.५. प्राप्ती -शोधन खात्याचे प्रारूप / नमूना.
२.३.१ उत्पन्न -खर्च खात्याचा अर्थ
२.३.२ उत्पन्न -खर्च खात्याची वैशिष्ट्ये
२.३.३ उत्पन्न -खर्च खात्याचे प्रारूप/नमूना
२.३.४ प्राप्ती -शोधन खाते आणि उत्पन्न -खर्च खाते यामधील फरक
२.३.५ उत्पन्न -खर्च खाते तयार करणे
२.३.६ ताळेबंद तयार करणे
२.३.७ गर्भित (ध्वनित) समायोजना (Implied Adjustments)
२.३.८ भांडवल निधी
२.३.९ ताळेबंदाचे प्रारूप/नमूना
२.३.९ (अ) अतिरिक्त माहिती :
१. अदत्त आणि पूर्वदत्त खर्च.
२. उपार्जित अप्राप्त उत्पन्न आणि अगाऊ (Advance) मिळालेले उत्पन्न.
३. अगाऊ मिळालेली वर्गणी आणि अप्राप्त वर्गणी.
४. घसारा.
५. प्रवेश शुल्काचे भांडवलीकरण.
६. देणग्यांमधून विशेष निधी निर्माण करणे.

*७. लेखन सामग्रीचा साठा (स्कंध) Stock of Stationery,*

*८. संपत्ती आणि देयतांच्या प्रारंभिक शिलका.*

*(ब) महत्त्वपूर्ण पदे*

*१. प्रवेश शुल्क*

*२. वर्गणी*

*३. मृत्युपत्रीत दान(Legacy)*

*४. आजीवन सदस्यता शुल्क*

*५. जुन्या संपत्तीची विक्री, निरुपयोगी सामग्री, वर्तमान पत्रे (News Papers) इ. ची विक्री*

*६. विशिष्ट देणग्या*

*७. सामान्य देणग्या*

*८. विशिष्ट निधी*

*९. देणगी (दान) निधी (Endowment Funds)*

**क्षमता विधाने**

- ❑ *या प्रकरणाचा अभ्यास केल्यानंतर विद्यार्थी सक्षम होतील :*
- *नफा न कमविणाऱ्या संस्थेचा अर्थ व वैशिष्ट्ये समजतो.*
- *प्राप्ती शोधन खात्याचा अर्थ व वैशिष्ट्ये सांगतो .*
- *उत्पन्न खर्च खात्याचा अर्थ समजून नफा-तोटा खाते व उत्पन्न - खर्च यातील फरक जाणतो.*
- *नफा कमविणाऱ्या व नफा न कमविणाऱ्या संस्थेतील फरक जाणतो.*
- *उत्पन्न खर्च खाते व ताळेबंद तयार करण्यासाठी आवश्यक ती कौशल्ये आत्मसात करतो.*

### २.१.१ प्रस्तावना (Introduction) :

संस्थाचे दोन प्रकार आढळतात.

१) व्यावसायिक संस्था किंवा नफा कमविणाऱ्या संस्था आणि

२) अव्यावसायिक किंवा नफा न कमविणाऱ्या संस्था

व्यावसायिक संस्थेचा मुख्य उद्देश नफा कमविणे हा असतो. त्या व्यावसायिक कार्यात गुंतलेल्या असतात जसे वस्तू आणि सेवा यांची खरेदी-विक्री करणे. अशा संस्थांमधे एकल व्यवसाय संस्था, भागीदारी संस्था, सहकारी संस्था, सार्वजनिक मर्यादित प्रमंडळ (Public Limited Company) इत्यादींचा समावेश होतो. ह्या संस्था नफा मिळविण्याच्या उद्देशाने स्थापन करण्यात येतात. अशा संस्था आपल्या व्यवसायाच्या कारभाराचे विशिष्ट कालावधीतील परिणाम शोधून काढण्याकरिता अंतिम खाती, म्हणजेच व्यापार व नफा-तोटा खाते आणि ताळेबंद तयार करतात.

नफा न कमविणाऱ्या संस्थांचा मुख्य उद्देश आपल्या सभासदांना किंवा समाजाला सेवा प्रदान करणे हा असतो. अशा संस्था ह्या नफा मिळविण्याचे उद्देशाने स्थापन झालेल्या नसतात. या कोणत्याही व्यापारिक किंवा उत्पादन कार्यात (Trading or manufacturing activities) गुंतलेल्या नसतात.

क्रीडा मंडळे (Sports club), धर्मार्थ दवाखाने, शाळा, महाविद्यालये, विद्यापीठे, कामगार संघटना, वाणिज्य मंडळ, (Chember of Commerce), व्यावसायिक (पेशेवर) संस्था (Professional Institutions), विश्वस्त संस्था (Trusts), समाज कल्याण संस्था, धार्मिक संस्था, सार्वजनिक ग्रंथालये इ. नफा न कमविणाऱ्या संस्थांची उदाहरणे होत. यांचा मुख्य उद्देश आपल्या सभासदांना सेवा पुरविणे हा असतो. अशा सर्व संस्था विभिन्न पद्धतीने हिशेबाची लेखा पुस्तके ठेवतात.

नफा कमविणे हा उद्‌देश नसल्यामुळे नफा न कमविणाऱ्या संस्था या नफा-तोटा खाते तयार करीत नाहीत मात्र त्या ऐवजी उत्पन्न-खर्च खाते तयार करतात. त्याच बरोबर या संस्था तेरीज पत्रकदेखील तयार करीत नाहीत तर त्याऐवजी प्राप्ती-शोधन खाते तयार करतात. तसेच एका विशिष्ट तारखेला संस्थेचे शुद्ध मूल्य (Net Worth) जाणून घेण्यासाठी ताळेबंद तयार करतात. थोडक्यात नफा न कमविणाऱ्या संस्थेच्या अंतिम खात्यांमधे उत्पन्न -खर्च खाते आणि ताळेबंदाचा समावेश होतो.

### २.१.२ नफा न कमविणाऱ्या संस्थेचा अर्थ :

नफा न कमविणाऱ्या संस्था ह्या अशा संस्था होत की ज्यांचा प्रारंभ नफा मिळविण्यासाठी झालेला नसतो. त्या आपल्या सभासदांना कमीत कमी खर्चात गुणवत्तापूर्ण सेवा प्रदान करण्यावर लक्ष केन्द्रित करतात. यांचा मुख्य उद्‌देश समाजाला सेवा पुरविणे आणि कला, संस्कृती, खेळ, शिक्षण इत्यादिंना प्रोत्साहन देणे, त्यांचे संवर्धन करणे हा असतो.

नफा न कमविणाऱ्या संस्थाचे स्वरूप हे इतर व्यावसायिक संस्थांच्या स्वरूपापेक्षा वेगळे असते. या संस्था सभासदांनी किंवा इतरांनी दिलेली वर्गणी, प्रवेश शुल्क, व देणग्या आणि सरकार कडून प्राप्त अनुदान (Grants) अर्थसहाय्य (Subsidies),किंवा सूट (Concession) इत्यादींचे माध्यमातून उत्पन्न प्राप्त करीत असतात.

### २.१.३ नफा न कमविणाऱ्या संस्थांची वैशिष्ट्ये (Features of 'Not for Profit' concerns) :

१. अशा संस्थांचा प्राथमिक उद्‌देश आपल्या सभासदांना किंवा इतरांना सेवा प्रदान करणे हा असतो. नफा मिळविणे हा उद्‌देश नसतो.

२. अशा संस्थांची स्थापना ही कला, संस्कृती, शिक्षण, खेळ, धर्मादाय (Charity), आरोग्य, धार्मिक इत्यादींच्या संवर्धनासाठी करण्यात येते.

३. अशा संस्थांच्या सदस्यांना लाभांश देण्यात येत नाही, यावर प्रतिबंध आहे.

४. अशा संस्थांचे व्यवस्थापन व संचालन संस्थेच्या सभासदांनी निवडून दिलेल्या प्रतिनिधींद्‌वारे करण्यात येते.

५. ह्या संस्था उत्पन्न-खर्च खाते, प्राप्ती-शोधन खाते आणि ताळेबंद तयार करतात.

६. अशा संस्था भांडवल निधी निर्माण करतात. भांडवल निधी ही प्रवेश शुल्क, वाढावा, मृत्युपत्रीत देणगी आणि भांडवल निधीसाठी मिळालेल्या विशेष देणग्या यांचे माध्यमातून निर्माण करण्यात येते.

### २.१.४ नफा कमविणाऱ्या संस्था आणि नफा न कमविणाऱ्या संस्था यामधील फरक

| फरकाचे मुद्दे | नफा कमविणाऱ्या संस्था | नफा न कमविणाऱ्या संस्था |
|---|---|---|
| १. प्राथमिक उद्‌देश | या संस्थांचा प्राथमिक उद्‌देश नफा कमविणे हा आहे. | या संस्थांचा प्राथमिक उद्‌देश सेवा प्रदान करणे हा आहे. |
| २. तेरीज पत्रक तयार करणे | तेरीज पत्रक तयार केले जाते | तेरीज पत्रक तयार करण्यात येत नाही. त्या ऐवजी प्राप्ती-शोध खाते तयार करण्यात येते. |
| ३. लेखा विवरणे | i) व्यापार खाते<br>ii) नफा-तोटा खाते<br>iii) ताळेबंद | i) प्राप्ती-शोधन खाते<br>ii) उत्पन्न-खर्च खाते<br>iii) ताळेबंद |
| ४. शुद्‌ध परिणाम (Net Result) | शुद्‌ध नफा / शुद्‌ध तोटा (Net Profits / Net Loss) | वाढावा / तूट (Surplus / Deficit) |
| ५. स्वामित्व निधी(Owner's Fund)/ भांडवल निधी | स्वामित्व निधीची राशी ही व्यवसाय स्वामीच्या गुंतवणुकीमध्ये मिळविली जाते. अर्थात - भांडवल (+) राखीव निधी (+) अधिशेष(Surplus) | भांडवल निधी ही वाढाव्याची संचित रक्कम (Accumulated amount of Surplus), प्रवेश शुल्क, देणगी व उत्पन्न-खर्च खात्यामधील वाढवा संबंधी रकमांचे प्रतिनिधित्व करते. |

### २.१.५ लेखा पुस्तके ठेवण्याची व अंतिम खाती तयार करण्याची आवश्यकता :

नफा न कमविणाऱ्या संस्था ह्या व्यावसायिक कार्यात गुंतलेल्या नसतात. त्या सार्वजनिक पैशांनी आपला कारभार करतात. या संस्था जनतेकडून वर्गणी, देणग्या, अनुदाने, प्रवेश शुल्क इत्यादीचे माध्यमाने रकमा जमा करतात. म्हणून या संस्था त्यांनी जमा केलेल्या आणि खर्च केलेल्या रकमेकरीता समाजाला उत्तरदायी असतात. म्हणून योग्य प्रकारे लेखा-पुस्तके ठेवणे गरजेचे असते.

नफा न कमविणाऱ्या संस्थांना पुढील कारणांमुळे योग्य प्रकारे लेखा पुस्तके ठेवावी लागतात.

१. वित्तिय व्यवहारांवर योग्य ते नियंत्रण ठेवणे.

२. उत्पन्नाचे स्रोत व खर्चाची पदे जाणणे.

३. त्यांना लागू असलेल्या कायदेशीर तरतुदींची पूर्तता करणे

उदाहरणार्थ - नफा न कमविणाऱ्या संस्थांचे धर्मादाय संस्था म्हणून मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियमांतर्गत नोंदणी करण्यात येते, किंवा सहकारी संस्था म्हणून सहकारी संस्था कायद्या अंतर्गत नोंदणी करण्यात येते, व संबंधित कायद्याच्या तरतुदींनुसार अंदाजपत्रक तयार करणे. लेखापुस्तकांचे अंकेक्षण करून घेणे, तसेच इतर विभिन्न पुस्तके व विवरणे ठेवावी लागतात.

४. एका विशिष्ट कालावधीत संस्थेला झालेला वाढवा (Surplus) किंवा तूट (Deficit) जाणून घेणे.

५. एका विशिष्ट दिवशी संस्थेजवळ असलेल्या शुद्‌ध संपत्तीचे मूल्य(Net Worth) जाणून घेणे.

६. रोख रकमा व संपत्तीचा दुरूपयोग आणि भ्रष्टाचार टाळणे.

### २.२.१ प्राप्ती-शोधन खात्याचा अर्थ :

**अर्थ (Meaning) -** नफा न कमविणाऱ्या संस्थांच्या दैनंदिन आर्थिक व्यवहारांची नोंद सर्वप्रथम रोख पुस्तकात करण्यात येते व तद्‌नंतर त्यांची नोंद खातेवहीतील खात्यांमधे करण्यात येते. लेखांकन अवधीच्या शेवटी रोखपुस्तकाचे व खातेवहीतील खात्यांचे संतुलन करण्यात येते व खात्यातील शिलकांचे आधारे प्राप्ती-शोधन खाते तयार करण्यात येते.

प्राप्ती-शोधन खाते हे 'वास्तविक खाते' आहे. उधारीच्या व्यवहारांची नोंद प्राप्ती-शोधन खात्यात करण्यात येत नाही. प्राप्ती-शोधन खाते हा रोख व बँक व्यवहार यांचा एका विशिष्ट कालावधीचा सारांश (गोषवारा) (Summary) होय. यामधे नावे बाजूस सर्व प्राप्ती आणि जमा बाजूस सर्व शोधन (Payments) दर्शविले जाते.

या खात्याची सुरवात प्रारंभीच्या रोख आणि बँक शिलकेनी होते व लेखांकन अवधीचे शेवटीच्या रोख आणि बँक शिलकेनी ते बंद करण्यात येते.

**प्राप्ती (Receipts) :** एका विशिष्ट कालावधीतील सर्व प्राप्ती (Receipts) मग ती कोणत्या वर्षाशी संबंधित मिळकत आहे, ती महसूल की भांडवली या पैकी कोणत्या स्वरूपाची आहे, तसेच प्राप्त रोख ही मागील वर्षाशी किंवा चालू वर्षाची किंवा पुढील वर्षाशी संबंधित आहे असा कोणताही विचार न करता प्राप्त रक्कम प्राप्ती-शोधन खात्यात 'नावे' करण्यात येते.

**शोधन (Payments) :** एका विशिष्ट कालावधीत करण्यात आलेले सर्व शोधन मग ते कोणत्या कालावधीशी संबंधित आहे, ते भांडवली की महसुली या पैकी कोणत्या स्वरूपाचे आहे, असे शोधन हे मागील वर्षाशी किंवा चालू वर्षाशी किंवा पुढील वर्षाशी संबंधित आहे असा कोणताही विचार न करता प्राप्ती-शोधन खात्याला 'जमा' करण्यात येते.

**प्राप्ती–शोधन खाते**

**३१ मार्च ............रोजी संपणाऱ्या वर्षाकरिता**

**नावे** **जमा**

| प्राप्ती | रक्कम ₹ | शोधन | रक्कम ₹ |
|---|---|---|---|
| सर्व प्राप्ती (रोख) (महसुली किंवा भांडवली) | xxx | सर्व शोधन (रोख) (महसुली किंवा भांडवली) | xxx |
| मागील वर्षाची xx | | मागील वर्षाचे xx | |
| चालू वर्षाची xx | | चालू वर्षाचे xx | |
| पुढील वर्षाची xx | | पुढील वर्षाचे xx | |

### २.२.२ प्राप्ती – शोधन खात्याची वैशिष्ट्ये:

१. प्राप्ती–शोधन खाते हे एक वास्तविक खाते (Real Account)आहे.

२. प्राप्ती–शोधन खाते हे रोख पुस्तका सारखेच (Similar) असते.(हा रोख व बँक व्यवहारांचा सारांश होय)

३. या मधे सर्वप्रकारच्या प्राप्ती आणि शोधनांचा समावेश होतो. (महसुली असो की भांडवली असो)

४. या मधे एका विशिष्ट कालावधितील सर्व प्राप्ती आणि झालेल्या शोधनाची नोंद करण्यात येते. (मग ते मागील, चालू किंवा पुढील वर्षाचे असो)

५. कोणत्याही प्रकारची येणे असलेली राशी (Receivable amount) किंवा देय असलेली राशी (Payable amount) ची नोंद या खात्यामधे केली जात नाही.

६. या खात्याचे आधारे नफा न कमविणाऱ्या संस्थेची अंतिम खाती तयार करता येतात.

७. हे खाते वर्षाच्या प्रारंभीची आणि वर्षाचे शेवटी असलेली रोख आणि बँकेतील शिल्लक (किंवा बँक ओव्हरड्राफ्ट) दाखविते.

८. चालू वर्षाशी संबंधित बुडीत कर्ज, संशयित बुडीत कर्ज निधी, घसारा या सारखी पदे या खात्यात दर्शविण्यात येत नाहीत.

### २.२.३ प्राप्तीचे प्रकार (Types of Receipts) :

i) भांडवली प्राप्ती (Capital Receipts)

ii) महसुली प्राप्ती (Revenue Receipts)

i) **भांडवली प्राप्ती :–** सर्व अनावर्ती (Non recurring) स्वरूपाच्या म्हणजेच ज्या वारंवार प्राप्त होत नाहीत आणि ज्या संस्थेच्या नियमीत उत्पन्नाचा भाग ठरत नाही अशा सर्व प्राप्ती म्हणजे भांडवली प्राप्ती होय.

उदाहरणार्थ – इमारत, क्रीडा स्पर्धा, ग्रंथालय अशा विशिष्ट कार्याकरिता प्राप्त झालेल्या देणग्या, आजीवन सभासद शुल्क, स्थिर संपत्तीच्या विक्रीपासून मिळणारे उत्पन्न इत्यादी. भांडवली प्राप्तीची रक्कम ही एकतर भांडवल निधीमधे मिळविली जाते किंवा ताळेबंदाचे देयता बाजूवर वेगळी दर्शविली जाते.

ii) **महसुली प्राप्ती :–** अशी प्राप्ती जी आवर्ती (Recurring) स्वरूपाची म्हणजेच वारंवार प्राप्त होणारी असते आणि नियमित उत्पन्न देणारी असते ती महसुली प्राप्ती समजली जाते.
उदाहरणार्थ – वर्गणी, भाडे, लॉकर भाडे, प्राप्त व्याज इत्यादी.

प्राप्ती (Receipts)

- महसुली
  - उत्पन्न
- भांडवली

सर्वच प्राप्ती ही उत्पन्नाची पदे नसतात. भांडवली प्राप्तीचा विभिन्न प्रकारे विचार केला जातो.

### २.२.४ शोधनाचे प्रकार (Types of Payments) :

शोधन

- भांडवली खर्च (दीर्घ कालावधी) जमीन, फर्निचर, सयंत्र इत्यादींची खरेदी
- महसुली खर्च आणि स्थगित महसुली खर्च (अल्प कालावधी) पगार, कर (Taxes), विमा हप्ता, इत्यादी.

i) **भांडवली खर्च (Capital Expenditure) :-** हे खर्च अनावर्ती (Non-Recurring) स्वरूपाचे असतात. अशा खर्चाचे फायदे संस्थेला दीर्घकाळ पर्यंत मिळतात. हे खर्च ताळेबंदाच्या संपत्ती बाजूवर दर्शविले जातात आणि त्यांची शिल्लक ही पुढील लेखांकन कालावधीत नेली जाते.

ii) **महसुली खर्च (Revenue Expenditure) :-** जर एखाद्या खर्चाचे फायदे हे एका लेखांकन कालावधीतून पुढील लेखांकन कालावधीत नेले जाऊ शकत नसतील अशा खर्चांना महसुली खर्च मानले जाते. हे खर्च आवर्ती स्वरूपाचे असतात. सर्वसाधारणपणे अशा खर्चाचे फायदे त्वरित मिळतात.

iii) **स्थगित महसुली खर्च (Deferred Revenue Expenditure) :-** वस्तुतः स्थगित महसुली खर्च हा महसुली खर्चच होय. अशा खर्चाचे फायदे हे एका वर्षापेक्षा अधिक कालावधीपर्यंत मिळत असतात.

उदाहरणार्थ – ३ वर्षाकरिता जाहिरात खर्चाचे दिले ' ३०,००० या एकूण जाहिरात खर्चापैकी १/३ हिस्सा ( ' ३०,०००चा १/३ हिस्सा) म्हणजे '१०,००० चालू वर्षाचा खर्च समजला जाईल. ही रक्कम उत्पन्न-खर्च खात्याला नावे करण्यात येईल आणि २/३ हिश्याची म्हणजे ' २०,००० ही राशी ताळेबंदाच्या संपत्ती बाजूवर दर्शविण्यात येईल.

<u>एकूण प्राप्ती</u>

- महसुली ⟶ उत्पन्न खर्च खात्याची जमा बाजू
- भांडवली ⟶ ताळेबंदाची देयता बाजू

<u>एकूण शोधन</u>

- महसुली ⟶ उत्पन्न खर्च खात्याची नावे बाजू
- भांडवली ⟶ ताळेबंदाची संपत्ती बाजू

२.२.५ प्राप्ती – शोधन खात्याचे प्रारूप :

**.................. यांचे पुस्तकात**

**प्राप्ती – शोधन खाते**

**३१ मार्च ................ रोजी संपणाऱ्या वर्षाकरिता**

**नावे** **जमा**

| प्राप्ती | रक्कम ₹ | रक्कम ₹ | शोधन | रक्कम ₹ | रक्कम ₹ |
|---|---|---|---|---|---|
| शिल्लक (पुढे आणली) | | | शिल्लक (पुढे आणली) | | xxx |
| हस्तस्थ रोख | xxx | | (बँक ओव्हरड्राफ्ट असल्यास) | | |
| बँकेतील रोख | xxx | | पगार / वेतन | | |
| (बँकांची नावे)(Name of Banks) | | xxx | मागील वर्षाचा | xxx | |
| **वर्गणी** | | | चालू वर्षाचा | xxx | xxx |
| मागील वर्षाची | xxx | | भाडे, दर आणि कर | | |
| चालू वर्षाची | xxx | | मागील वर्षाचा | xxx | |
| पुढील वर्षाची | xxx | xxx | चालू वर्षाचा | xxx | |
| प्रवेश शुल्क (Entrances / Admission fees) | | xxx | पुढील वर्षाचा | xxx | xxx |
| आजीवन सभासद शुल्क | | xxx | छपाई व लेखन सामग्री | | xxx |
| मृत्युपत्राद्वारे प्राप्त राशी (Legecies) | | xxx | सामान्य खर्च | | xxx |
| सरकारी अनुदान | | xxx | बँक कर्जावरील व्याज | | xxx |
| सामान्य देणगी | | xxx | विद्युत शुल्क | | xxx |
| विशिष्ट निधी करिता देणगी | | xxx | अंकेक्षण शुल्क | | xxx |
| (जसे – इमारत निधी, पारितोषिक निधी, खेळ स्पर्धा निधी इ.) | | | क्रीडा महोत्सव खर्च | | xxx |
| प्राप्त लाभांश | | xxx | खेळ सामग्रीची खरेदी | | xxx |
| सभागृहाचे प्राप्त भाडे | | xxx | विमा | | xxx |
| विविध उत्पन्न | | xxx | टेलीफोन / मोबाइल खर्च | | xxx |
| जुन्या सामग्रीची विक्री | | xxx | बँक शुल्क / आकार | | xxx |
| जुन्या वर्तमानपत्रांची विक्री/ रद्दी विक्री | | xxx | पोस्टेज | | xxx |
| किरकोळ प्राप्ती | | xxx | वाहन व्यय(Conveyance) | | xxx |
| क्रीडा महोत्सवापासून प्राप्ती | | xxx | वार्षिक कार्यक्रम खर्च | | xxx |
| क्रिकेट शुल्क | | xxx | मुदत ठेव | | xxx |
| शिक्षण शुल्क | | xxx | स्थिर संपत्तीची खरेदी | | xxx |
| सत्र शुल्क(Term Fees) | | xxx | पुस्तके | | xxx |
| दंड वसुली | | xxx | फर्निचर | | xxx |
| लॉकर भाडे | | xxx | इमारत | | |
| परीक्षा शुल्क | | xxx | गुंतवणूक | | xxx |
| शिल्लक (पुढे नेली) | | xxx | वर्तमान पत्रे | | xxx |
| (बँक ओव्हरड्राफ्ट असल्यास) | | | कार्यालय खर्च | | xxx |
| | | | दुरुस्ती/खर्च | | xxx |
| | | | शिल्लक (पुढे नेली) | | xxx |
| | | | हस्तस्थ रोख | xxx | |
| | | | बँक रोख (बँकांची नावे) | xxx | |
| | | XXXX | | | XXXX |

### २.३.१ उत्पन्न – खर्च खात्याचा अर्थ :

**अर्थ (Meaning) :** एका विशिष्ट कालावधितील महसुली उत्पन्न आणि खर्चाचा सारांश म्हणजे उत्पन्न – खर्च खाते होय. या खात्याचे स्वरूप हे नफा – तोटा खात्यासारखेच असते. हे एक नामधारी खाते (Nominal Account) आहे. नफा न कमविणाऱ्या संस्था या उत्पन्न – खर्च खाते तयार करतात. या खात्यामधे चालू वर्षाशी संबंधित सर्व खर्च व हानीची पदे नावे करण्यात येतात आणि चालू वर्षाशी संबंधित उत्पन्न व लाभ संबंधीची सर्व पदे जमा करण्यात येतात.

**उत्पन्न/ आय (Incomes) :** उत्पन्न – खर्च खात्यामधे केवळ चालू वर्षाशी संबंधित महसुली उत्पन्न वा लाभ जमा करण्यात येतो.

उदाहरणार्थ – प्राप्त वर्गणी, गुंतवणुकीवर प्राप्त व्याज, विविध प्राप्ती, मिळालेल्या सामान्य देणग्या, प्राप्त शिक्षण शुल्क इत्यादी. मागील वर्षाच्या किंवा पुढील वर्षाशी संबंधित उत्पन्नाचा यात समावेश होत नाही. असे असले तरी चालू वर्षाशी संबंधित उत्पन्न मग ते वास्तविक मिळालेले असो किंवा नसो किंवा चालू वर्षाचे जे मागील वर्षात मिळालेले असेल अशा सर्व उत्पन्नांचा या मधे समावेश होतो. दुसऱ्या शब्दांमधे चालू वर्षाशी संबंधित अप्राप्त उत्पन्न आणि पूर्वप्राप्त उत्पन्नाचा या मधे विचार करण्यात येतो.

**खर्च / व्यय (Expenditure) :** उत्पन्न – खर्च खात्यामधे केवळ चालू वर्षाशी संबंधित महसुली खर्च वा हानी नावे करण्यात येते. नफा न कमविणाऱ्या विभिन्न संस्थांचे अनुरूप खर्चाची पदे ही वेगवेगळी असु शकतात. या मधे मागील वर्षासाठी किंवा पुढील वर्षासाठी करण्यात आलेल्या खर्चाचा विचार केला जात नाही. असे असेल तरी चालू वर्षाशी संबंधित असलेले सर्व खर्च मग ते वास्तविकतः करण्यात आलेले आहेत किंवा नाहीत किंवा त्यांचे शोधन मागील वर्षात झालेले असेल अशा सर्व खर्चांचा समावेश चालू वर्षामधे करण्यात येतो. अन्य शब्दांमधे अदत्त (देणे बाकी) खर्च आणि मागील वर्षातील पूर्वदत्त खर्चाचा विचार करण्यात येतो.

उत्पन्न – खर्च खात्यामधे वाढावा किंवा तूट दिसून येते. जर 'वाढावा' असेल तर 'भांडवल निधीत' मिळविण्यात येतो आणि जर 'तूट' असेल तर 'भांडवल निधीतून' वजा करण्यात येते. भांडवली प्राप्ती आणि भांडवली शोधन (Capital Receipts and Capital Payments) या पदांची उत्पन्न – खर्च खात्यात नोंद केली जात नाही.

### २.३.२ उत्पन्न – खर्च खात्याची वैशिष्ट्ये :

१) उत्पन्न – खर्च खाते हे नामधारी खाते आहे.

२) या खात्यामधे केवळ चालू आर्थिक वर्षाशी संबंधित महसुली खर्च व महसुली उत्पन्नाची नोंद करण्यात येते.

३) हे नफा – तोटा खात्यासारखेच आहे.

४) नफा न कमविणाऱ्या संस्था या नफा – तोटा खात्या ऐवजी उत्पन्न – खर्च खाते तयार करतात.

५) संस्थेला वाढवा (Surplus) किंवा तूट (Deficit) झाली आहे. याची माहिती करून घेण्याकरिता हे खाते तयार करण्यात येते.

६) उत्पन्न – खर्च खाते हे नेहमी ताळेबंदाबरोबर जोडले जाते.

७) या खात्याला प्रारंभिक शिल्लक नसते.

८) वाढावा किंवा तूट भांडवल निधीला स्थानांतरित करण्यात येते.

९) या मधे चालू वर्षाशी संबंधित सर्व रोख व अरोखीकृत पदांची (Cash as well as Non – Cash items) नोंद करण्यात येते. उदाहरणार्थ – देण्यात आलेला पगार (दत्त वेतन), देणे बाकी पगार (अदत्त वेतन), बुडीत कर्ज, स्थिर संपत्तीवरील घसारा इत्यादी.

## २.३.३ उत्पन्न – खर्च खाते / आय – व्यय खाते – प्रारूप :

.................... चे पुस्तकात

उत्पन्न – खर्च खाते

३१ मार्च ................ रोजी संपणाऱ्या वर्षाकरिता

नावे | जमा

| खर्च | रक्कम ₹ | रक्कम ₹ | उत्पन्न | रक्कम ₹ | रक्कम ₹ |
|---|---|---|---|---|---|
| पगाराचे दिले / दत्त वेतन | xxx | | प्राप्त वर्गणी | xxx | |
| (–) मागील वर्षाचा दिलेला | xxx | | (–) : | | |
| (–) पुढील वर्षाचा दिलेला | xxx | | i) मागील वर्षाची प्राप्ती xxx | | |
| | xxx | | ii) पुढील वर्षाची प्राप्ती xxx | xxx | |
| (+) अदत्त पगार (देणे बाकी) | xxx | | (+) : | | |
| | xxx | | i) चालू वर्षाची मागील वर्षामधे प्राप्त | | |
| | | | झालेली xxx | | |
| (+)मागील वर्षातील पूर्वदत्त | xxx | xxx | ii) चालू वर्षाची अप्राप्त xxx | xxx | xxx |
| मजुरी | | xxx | प्राप्त भाडे | | xxx |
| छपाई व लेखन सामग्री | | xxx | व्याज मिळाले | | xxx |
| भाडे | | xxx | प्राप्त लाभांश | | xxx |
| व्याज | | xxx | शासकीय अनुदान (सामान्य) | | xxx |
| वाहन खर्च (Conveyence) | | xxx | मैदान भाडे (Ground Rent) | | xxx |
| दर आणि कर(Rates & Taxes) | | xxx | विविध प्राप्ती | | xxx |
| विमा हप्ता / प्रव्याजी | | xxx | प्रवेश शुल्क (महसुली) | | xxx |
| (Insurances Premium) | | | (Entrance / Admission fees) | | |
| अंकेक्षण शुल्क | | xxx | आजीवन सभासद शुल्क | | xxx |
| कार्यालय खर्च | | xxx | देणगी (सामान्य) | | xxx |
| टेलीफोन / मोबाईल खर्च | | xxx | संपत्ती – विक्री वरील नफा | | xxx |
| औषधी | | xxx | तूट (खर्चाचे उत्पन्नावरील आधिक्य ) | | xxx |
| वापरलेली क्रीडा सामग्री | | | | | |
| (Sports Materials) | | | | | |
| लेखन सामग्री / औषधी | | | | | |
| प्रारंभिची शिल्लक | xxx | | | | |
| (+) खरेदी | xxx | | | | |
| | xxx | | | | |
| (–) शेवटची शिल्लक | xxx | xxx | | | |
| दुरुस्ती व देखभाल | | xxx | | | |
| विद्युत खर्च (शुल्क) | | xxx | | | |
| वर्तमान पत्रे आणि नियतकालिके | | xxx | | | |
| विविध खर्च | | xxx | | | |
| संपत्ती विक्रीवरील तोटा | | xxx | | | |
| स्थिर संपत्तीवर घसारा | | xxx | | | |
| वाढावा | | xxx | | | |
| (उत्पन्नाचे खर्चावरील आधिक्य) | | | | | |
| | | xxx | | | xxx |

### २.३.४ प्राप्ती शोधन खाते व उत्पन्न – खर्च खाते यातील फरक.

| मुद्दे | प्राप्ती शोधन खाते | उत्पन्न – खर्च खाते |
|---|---|---|
| १) खाते प्रकार | हे वास्तविक खाते आहे. | हे नामधारी खाते आहे. |
| २) स्वरूप | हे रोख पुस्तकासारखेच असते. | हे नफा–तोटा खात्यासारखेच असते. |
| ३) हेतू | हे खाते रोख–व्यवहारांचा सारांश प्रस्तुत करते. | हे खाते आपणास उत्पन्न व खर्च व्यवहारांतून शुद्ध परिणाम – वाढावा किंवा तूट स्वरूपात दर्शविते. |
| ४) प्रारंभिक शिल्लक | या खात्याची सुरूवात रोख व बँक शिलकेने होते. | या खात्याला प्रारंभिक शिल्लक नसते. |
| ५) अंतिम शिल्लक | विशिष्ट कालावधीच्या शेवटी या खात्याची अंतिम शिल्लक ही हस्तस्थ रोख व अधिकोषस्थ रोखेचे (बँक शिलकेचे) प्रतिनिधित्व करते. | या खात्याची अंतिम शिल्लक वाढवा किंवा तूट हा परिणाम दर्शविते. |
| ६) प्राप्ती शोधन | चालू वर्षात मिळालेल्या सर्व प्राप्ती आणि केलेले सर्व शोधनाची नोंद या खात्यात केली जाते. मग ते महसुली किंवा भांडवली असो. | या खात्यात केवळ चालू वर्षाशी संबंधित महसुली उत्पन्न व खर्चाची नोंद केली जाते. |
| ७) पदांचे स्वरूप | या खात्यात अरोखीकृत (Non – Cash) पदांचा समावेश होत नाही. | या खात्यात अरोखीकृत (Non – cash) पदांचा समावेश होतो. उदा. बुडीत कर्ज, घसारा, अदत्त खर्च इ. |
| ८) सर्व खाती | या खात्यात वैयक्तिक, वास्तविक आणि नामधारी अशा सर्वच खात्यांशी संबंधित पदांचा समावेश होतो. | या खात्यामध्ये केवळ नामधारी खात्याशी संबंधित पदांचा समावेश होतो. |
| ९) कालावधी | या खात्यात कोणत्याही कालावधीशी संबंधितप्राप्ती व शोधनाच्या रकमा असल्या तरी त्यांचा समावेश होतो मग त्या मागील, चालू किंवा पुढील वर्षाशी संबंधित असो. | या खात्यांमध्ये केवळ चालू वर्षाशी संबंधित रकमांचाच समावेश होतो. |
| १०) ताळेबंद | प्राप्ती शोधन खात्याला ताळेबंद जोडला जात नाही. | उत्पन्न–खर्च खात्याला नेहमीच ताळेबंद जोडला जातो. |

### २.३.५ उत्पन्न – खर्च तयार करणे :

उत्पन्न – खर्च खाते हे एक नामधारी खाते आहे. सर्व खर्च आणि हानी (नुकसानीची) ची पदे नावे केली जातात व सर्व उत्पन्न व लाभाची पदे जमा केली जातात. नफा–तोटा खात्यासारखेच हे खाते असते.

### २.३.६ ताळेबंद तयार करणे :

ताळेबंदामध्ये संस्थेची देयता व संपत्ती दाखविलेली असते. नफा–तोटा न कमविणाऱ्या संस्थेचा ताळेबंद हा नफा–तोटा कमविणाऱ्या संस्थांच्या ताळेबंदासारखा असतो. ताळेबंदाच्या डाव्या बाजूला देयता असते व उजव्या बाजूला संपत्ती असते.

ताळेबंद हे फक्त भांडवली जमा व भांडवली खर्च दाखविते. ताळेबंद एका विशिष्ट दिवशी व्यवसायाची / संस्थेची आर्थिक परिस्थिती दर्शविते.

संपत्ती हे देयते पेक्षा जास्त असेल तर त्याला भांडवल निधी असे म्हणतात. भांडवल निधीची आरंभीची शिल्लक दिली नसेल तर सुरूवातीचा ताळेबंद तयार केला जातो. संपत्ती–देयता यातील फरक भांडवल निधी असतो.

### २.३.७ ध्वनित (गर्भित) समायोजना :

प्राप्ती–शोधन खात्यामध्ये काही वेळा जास्तीची माहिती काही विशिष्ट गोष्टींच्या बाबतीत दिलेली असते. या अतिरिक्त माहितीच्या आधारे काही लेखांकीय समायोजना आवश्यक असतात. समायोजना आहे असे कोठेही लिहिलेले नसते किंवा उल्लेख नसतो. अशा समायोजनांना ध्वनित किंवा गुप्त समायोजना असे म्हणतात. यांचा परिणाम कमीत कमी दोन खात्यावर होतो.

काही ध्वनित (गर्भीत) समायोजना खाली दिल्या आहेत. (या समायोजना प्राप्ती – शोधन खात्यांमध्ये दिलेल्या असतात).

१) भाडे (११ महिने) ' ११,०००

२) १० % कर्ज बँक ऑफ इंडिया कडून. ₹ २०,००० (१ जानेवारी २०२०ला घेतले)

३) भाडेपट्यावरील जमीन ₹ १,००,००० (१ – ४ – २०१९ पासून १० वर्षासाठी)

४) फर्निचर विक्री (पुस्तक मूल्य ₹ ७५००) ₹ ८,०००

**प्राप्ती शोधन खाते**

**३१ मार्च २०२० रोजी संपणाऱ्या वर्षासाठी**

**नावे** **जमा**

| प्राप्ती | रक्कम ₹ | शोधन | रक्कम ₹ |
|---|---|---|---|
| | | १० % मुदत ठेव<br>(दि.१ – १– २०२० रोजी जमा कले) | १,००,००० |

वरील उदाहरणामध्ये ध्वनीत समायोजना दिलेली आहे. यात अप्राप्त व्याजाची रक्कम निश्‍चित करावयाची आहे.

i) मुदत ठेवीवरील एकूण व्याज किती आले याचा उल्लेख नाही.

ii) मुदत ठेवीवरील व्याजाच्या दर मुदत ठेव ठेवल्यापासून दिलेला आहे.
त्यामुळे एकूण ३ महिन्यांचे मुदत ठेवीवरील व्याज (दि. १ – १ – २०२० पासून ३१–३–२०२० पर्यंत) ₹ २,५०० येणे आहे. त्याचा विचार करावा लागेल.

अंतिम खात्यामध्ये समायोजना

i) अप्राप्त व्याज : उत्पन्न – खर्च खात्याच्या जमा बाजूस ₹ २,५०० लिहिणे.

ii) ताळेबंदाच्या संपत्ती बाजूला ₹ २,५०० अप्राप्त व्याज मुदत ठेवीमध्ये जमा करावे किंवा स्वतंत्र लिहिणे.

### २.३.८ भांडवल निधी :

भांडवल हे सर्व सभासदांचे असते. त्यालाच भांडवल निधी असे म्हणतात. भांडवल निधी हा ताळेबंदच्या देयता बाजूला लिहिला जातो. भांडवल निधी हा भांडवली उत्पन्न आणि वाढाव्याचे भांडवलीकरण यामधून निर्माण होते. जर उत्पन्न खर्च खात्यात वाढावा आढळून येत असेल तर ती रक्कम भांडवल निधीत मिळविली जाते आणि जर तूट आढळून येत असेल तर ती भांडवल निधीतून वजा करण्यात येते.

जर भांडवल निधीची प्रारंभिक शिल्लक माहिती नसेल तर ती संस्थेचा प्रारंभिक ताळेबंद तयार करून त्यामध्ये जी संतुलित रक्कम येईल ती भांडवल निधीची प्रारंभिक शिल्लक समजण्यात येते.

## ताळेबंदाचे स्वरूप (Specimen of Balance Sheet)

.................... चे पुस्तकात

ताळेबंद

३१ मार्च ................ रोजीचा

नावे　　　　　　　　　　　　　　　　　　　　　　　　　　　　　　　　　　　　जमा

| देयता | रक्कम ₹ | रक्कम ₹ | संपत्ती | रक्कम ₹ | रक्कम ₹ |
|---|---|---|---|---|---|
| भांडवल निधी | | | हस्तस्थ रोख (रोख शिल्लक) | | xxx |
| आरंभीची शिल्लक | xxx | | अधिकोषस्थ रोख (बँक शिल्लक) | | xxx |
| (+) देणगी | xxx | | मुदत ठेवी | | xxx |
| (+) प्रवेश शुल्क | xxx | | गुंतवणूक | | xxx |
| (+) वाढावा | xxx | | विविध ऋणको | | xxx |
| (−) तूट | xxx | xxx | जमीन आणि इमारत | | xxx |
| इमारत निधी | | xxx | फर्निचर आणि फिक्चर/उपस्कर व अन्वायुक्ती | | xxx |
| दान निधी | | xxx | सयंत्र व यंत्र | | xxx |
| क्रीडा स्पर्धा निधी | | xxx | उपकरणे | | xxx |
| विशेष निधी | | xxx | खेळाचे मैदान | | xxx |
| धर्मादाय निधी | | xxx | मोटार वाहन | | xxx |
| विविध धनको | | xxx | ग्रंथालय पुस्तके | | xxx |
| अधिकोष अधिकर्ष | | xxx | खेळ सामानाचा साठा | | xxx |
| अन्य कर्ज | | xxx | लेखन सामग्रीचा साठा | | xxx |
| अदत्त खर्च | | xxx | औषधांचा साठा | | xxx |
| पूर्वप्राप्त उत्पन्न (वर्गणी अगाऊ जमा) | | xxx | दिलेली कर्जे | | xxx |
| उत्पन्न खर्च खाते(जमा शिल्लक) | | xxx | उपर्जित अप्राप्त व्याज | | xxx |
| आजीवन सभासद शुल्क | | xxx | पूर्वदत्त खर्च | | xxx |
| | | | येणेबाकी उत्पन्न (जसे – वर्गणी) | | xxx |
| | | xxxx | | | xxxx |

कित्येकदा उत्पन्न–खर्च खात्यावरील वाढण्याची रक्कम ही भांडवल निधीमध्ये मिळविण्याचे ऐवजी ती ताळेबंदात देयता बाजूवर वेगळीच उत्पन्न खर्च खात्यावरील रक्कम दर्शविली जाते. ती खालील प्रमाणे –

| | रक्कम ₹ | रक्कम ₹ |
|---|---|---|
| **उत्पन्न खर्च खाते** | | |
| प्रारंभिक जमा शिल्लक | xxx | |
| (+) चालू वर्षाचा वाढावा | xxx | xxx |

## २.३.९ अतिरिक्त माहिती :

**अदत्त (देणे बाकी) खर्च (Outstanding Expenses) आणि पूर्वदत्त खर्च (संदर्भ ४ थे उदाहरण)**

१. **अदत्त / देणे बाकी खर्च (Outstanding Expenses) –** देणे बाकी खर्च म्हणजे असे खर्च की जे चालू वर्षाशी संबंधित आहेत परंतु वर्षअखेरला देणे बाकी आहेत.

**दोन प्रभाव**

i) उत्पन्न खर्च खात्याचे नावे बाजूवर (खर्च बाजू) संबंधित खर्चामध्ये अदत्त खर्चाची राशी मिळविण्यात यावी.

ii) ताळेबंदाचे देयता बाजूवर अदत्त खर्चाची रक्कम दर्शवावी.

२. **पूर्वदत्त खर्च (Prepaid Expenses) –** पूर्वदत्त खर्च म्हणजे असे खर्च होत की जे आगाऊ (Advance) करण्यात येतात आणि अशा शोधनाचे फायदे हे पुढील वर्षामध्ये मिळतात.

**दोन प्रभाव**

i) उत्पन्न खर्च खात्याचे खर्च बाजूवर संबंधित खर्चातून पूर्वदत्त खर्चाची राशी वजा करण्यात यावी.

ii) ताळेबंदाचे संपत्ती बाजूवर पूर्वदत्त खर्चाची राशी विभिन्न वर्षानुसार वेगळी दर्शविण्यात यावी.

३. **उपर्जित अप्राप्त उत्पन्न / येणे बाकी उत्पन्न (Accured Income/Outstanding Income/Income Receivable) : (उदाहरण क्रमांक २चा संदर्भ घ्यावा)**

जे उत्पन्न चालू वर्षात कमविले परंतु ते चालू वर्षात मिळाले नाही अशा उत्पन्नाला उपार्जित परंतु अप्राप्त उत्पन्न असे म्हणतात .

**दोन प्रभाव**

i) उत्पन्न खर्च खात्याचे उत्पन्न बाजूवर संबंधित उत्पन्नाच्या पदात मिळविण्यात येते. मात्र संबंधित पद त्या ठिकाणी नसेल तर उत्पन्न बाजूवर त्याची स्वतंत्र नोंद दर्शविण्यात यावी.

ii) उपार्जित अप्राप्त उत्पन्न हे ताळेबंदाचे संपत्ती बाजूवर स्वतंत्रपणे दर्शवावे.

४. **आगाऊ मिळालेले उत्पन्न / पूर्व प्राप्त उत्पन्न (Income received in advance / Pre – received Income) :**

जे उत्पन्न चालू वर्षात मिळाले परंतु ते वास्तविकता पुढील वर्षाशी संबंधित असते असे उत्पन्न चालू वर्षात प्राप्त झालेले असले तरी ते या वर्षात कमविलेले नसते म्हणून संस्थेची ही देयता ठरते.

**दोन प्रभाव**

i) उत्पन्न खर्च खात्याचे उत्पन्न बाजूवर संबंधित उत्पन्नाचे रक्कमेतून पूर्वप्राप्त उत्पन्नाची रक्कम वजा करण्यात येते.

ii) ताळेबंदाचे देयता बाजूवर पूर्वप्राप्त उत्पन्नाची रक्कम दर्शविण्यात यावी.

५. **चालू आणि मागील वर्षात आगाऊ मिळालेली वर्गणी / पूर्वप्राप्त वर्गणी आणि अप्राप्त वर्गणी (Subscription received in advance and subscription outstanding of the account and previous year) :**

**(संदर्भ क्रमांकासाठी उदाहरण २ पहावे)**

वर्गणी ही नफा न कमविणाऱ्या संस्थेचे महसूल उत्पन्न आहे. 'वर्गणी' हे नफा न कमविणाऱ्या संस्थेचे उत्पन्नाचे एक महत्वाचे स्रोत (Source) आहे. वर्गणी ही कालावधीनुसार दिली जाते. सर्व सभासदांना वर्गणी ही नियमितपणे द्यावी लागते. वर्गणी ही उत्पन्न खर्च खात्यात जमा केली जाते.

आजीवन सभासदत्वाकरिता एक रकमी रक्कम वर्गणी म्हणून दिली जाऊ शकते.

**वर्गणीचे खालील प्रकार आहेत.**

i) चालू वर्षाची वर्गणी चालू वर्षात मिळाली.

ii) चालू वर्षात मागील वर्षाची वर्गणी मिळाली.

iii) पुढील वर्षाची वर्गणी चालू वर्षात मिळाली.

iv) चालू वर्षाची वर्गणी येणे आहे.

(उदाहरण क्रमांक २ चा संदर्भ घ्यावा)

## ६. घसारा (Depreciation) :

घसाऱ्याचा अभ्यास आपण व्यक्तीगत व्यापारी व भागीदारी संस्थेच्या अंतिम लेख्यांमध्ये केला आहे. घसारा खाते हे नामधारी खाते आहे. घसारा खालील प्रमाणे आकारले जाते.

**१० % घसारा यंत्रावर (यंत्र हे १/०४/२०१९ रोजी ₹२०,००० चे घेतले)**

**घसाऱ्याचे गणन करा**

**यंत्राची किंमत ₹ २०,०००**

$$\text{घसारा} = \frac{२०,०००}{१} \times \frac{१०}{१००} = ₹\ २०००$$

**दोन प्रभाव**

१) उत्पन्न खर्च खात्याच्या नावे बाजूला.

२) ताळेबंदाच्या संपत्ती बाजूला यंत्रामधून घसारा वजा करावा. (उदाहरण क्रमांक ३चा संदर्भ घ्यावा)

## ७. प्रवेश शुल्काचे भांडवलीकरण (Capitalisation of Entrances fees) :

एखाद्या संस्थेचा सभासद होण्याकरिता व्यक्तीद्वारे संस्थेला जे शुल्क दिले जाते. त्याला प्रवेश शुल्क असे संबोधिले जाते. नफा न कमविणाऱ्या संस्थेचे हे आवर्ती (Recurring) स्वरूपाचे म्हणजे वारंवार मिळणारे उत्पन्न असते.

सामान्यतः प्रवेश शुल्क हे संस्थेचे भांडवली उत्पन्न समजले जाते. परंतु काही वेळा प्रवेश शुल्काचा काही भाग महसुली उत्पन्न समजले जाते.

जसे – प्रवेश शुल्क ₹ ५०,००० आहे.

₹ ५०,००० पैकी ५० % प्रवेश शुल्काचे भांडवलीकरण करा.

**५० % ₹ ५०,००० चे = ₹ २५,०००**

₹ २५,००० हे भांडवल निधीमध्ये मिळविले जातील व ₹ २५,००० हे महसुली उत्पन्न म्हणून उत्पन्न-खर्च खात्याच्या जमा बाजूला लिहिले जाईल.

**प्रवेश फी ₹ ५०,०००**

| ₹ २५,००० | ₹ २५,००० |
|---|---|
| **भांडवली उत्पन्न** | **महसूल उत्पन्न** |

## ८. देणग्यामधून विशेष निधी निर्माण करणे (Creation of special funds out of Donations) :

देणग्या म्हणजे अशा रक्कमा की ज्या संस्थेच्या सभासदांद्वारे किंवा बाहेरील व्यक्तीद्वारे बक्षीसांच्या / उपहाराच्या (Gifts) स्वरूपात संस्थेला देण्यात येतात. देणगी हा नफा न कमविणाऱ्या संस्थेचा एक महत्वाचा उत्पन्नाचा स्रोत (Source) आहे.

**देणग्यांचे प्रकार –**

१) **सामान्य देणग्या –** सामान्य देणग्या हे महसुली उत्पन्न समजले जाते व त्या उत्पन्न-खर्च खात्याच्या जमा बाजूला लिहिल्या जातात. या देणग्या देण्यामागे कोणत्याही विशिष्ट अटी नसतात.

२) **विशिष्ट देणग्या –** कित्येकदा दानदात्याद्वारे संस्थेला विशिष्ट उद्देशाचे पूर्ततेसाठी देणग्या देण्यात योतात. देणगी देताना दानदाता कोणत्या कार्यासाठी किंवा उपयोगासाठी किंवा उद्देशासाठी देणगी देण्यात येत आहे, या गोष्टीचा स्पष्ट उल्लेख करीत असतो.

जसे – इमारत निधीसाठी देणगी, पारितोषिक निधीकरीता देणगी, खेळ व क्रीडांगणासाठी देणगी इ.

विशिष्ट देणग्या ताळेबंदाच्या देयता बाजूला दाखविण्यात येतात.

९. **लेखन सामग्रीचा साठा / स्कंध (Stock of Stationery) :** सर्वच संस्थाकरिता लेखन सामग्री खर्च हा सामान्य खर्च आहे. लेखन सामग्रीच्या वापरामुळे ती संपुष्टात येते.

उपयोगात आलेल्या लेखन सामग्रीची निश्चिती खालीलप्रमाणेदेखील करता येते.

| | | |
|---|---|---|
| चालू वर्षात उपयोगात आलेली लेखन सामग्री = | लेखन सामग्रीचा प्रारंभिक साठा | ₹ ------- |
| | + चालू वर्षात लेखन सामग्रीची खरेदी | ₹ ------- |
| | + लेखन सामग्रीचे बाकी बिल देणे | ₹ ------- |
| | – वर्षअखेरीस शिल्लक साठा | ₹ ------- |
| | लेखन सामग्रीचा उपयोग | xxxx |

वरील सूत्र (चालू वर्षात उपयोगात आलेली लेखन सामग्री) हे उत्पन्न-खर्चाच्या नावे बाजूला येते व अखेरचा शिल्लक साठा ताळेबंदाच्या संपत्ती बाजूला लिहितात.

लेखन सामग्रीप्रमाणेच संस्थामध्ये काही विशिष्ट सामग्री अशी असते की जिचा वापर केल्यामुळे ती नाश पावते. उदा. खेळाचे साहित्य (Sports Material), दवाखान्यामध्ये औषध इ. (उदाहरण क्रमांक १ चा संदर्भ घ्यावा)

१०. **संपत्ती व देयतांच्या प्रारंभिक शिलका (Opening Balances) व प्रारंभिक ताळेबंद (Opening Balance Sheet) :** लेखांकन वर्षाच्या प्रारंभी संपत्ती व देयतांच्या प्रारंभिक शिलका दाखविल्या जातात. या प्रारंभिक शिलकांच्या सहाय्याने प्रारंभिक ताळेबंद तयार करण्यात येतो.

प्राप्ती शोधन खात्याच्या सुरुवातीला असलेली रोख शिल्लक व बँक शिल्लक हे प्रारंभिक ताळेबंदाच्या संपत्ती बाजूला लिहितात. बँक अधिविकर्ष असेल तर तो देयता बाजूस लिहावा. भांडवल निधी हा ताळेबंदाच्या देयता बाजूस दाखवावा.

(संदर्भ २:३:८)

### ब) महत्वाची पदे (Important Terms):

१) प्रवेश शुल्क – संदर्भ –अतिरीक्त माहितीतील मुद्दा क्रमांक ५ पहा.

२) वर्गणी – अतिरीक्त माहितीतील मुद्दा क्रमांक ३ पहावा.

३) मृत्युपत्रित दान(Legacy) – मृत्यूपत्रित दान म्हणजे एखद्या व्यक्तीने संस्थेला मृत्युपत्रानुसार दिलेली देणगी होय. हे दान सामान्य किंवा विशिष्ट हेतूसाठी असते.

i) सामान्य दान – महसुली उत्पन्न होय. हे उत्पन्न-खर्च खात्याच्या जमा बाजूस लिहितात.

ii) विशिष्ट दान – याला भांडवली उत्पन्न म्हणतात. हे ताळेबंदाच्या देयता बाजूला लिहिले जाते.

४. **आजीव सभासद शुल्क (Life Membership Fees) :**

नफा-तोटा न कमविणाऱ्या संस्थेमध्ये सभासद एकाच वेळी सर्व वर्गणी देतात अशा वर्गणीला आजीव सभासद शुल्क असे म्हणतात. हे शुल्क भांडवली असते त्यामुळे ते ताळेबंदाच्या देयता बाजूस दर्शवितात.

५. **जुन्या संपत्तीची विक्री (Sale of old Assets) :**

ज्यावेळी कायमस्वरूपी मालमत्ता बाजारात विकली जाते त्यावेळेस त्याची पुस्तकी किंमत (Book - Value) मालमत्तेच्या बाजूस त्या विशिष्ट संपत्तीमधून वजा केली जाते. संपत्ती विकताना जर नफा झाला तर तो उत्पन्न - खर्चाच्या जमा बाजूस लिहितात व तोटा झाला तर तो उत्पन्न - खर्चाच्या नावे बाजूस लिहितात. संपत्ती विक्रीची रोख ही रोख खात्यात किंवा बँक खात्यात जमा केली जाते.

भंगार किंवा जुन्या वर्तमानपत्रांच्या विक्रीपासून मिळणारी रक्कम हे महसुली उत्पन्न समजले जाते. आणि ते उत्पन्न-खर्च खात्याला जमा करण्यात येते. जुन्या वर्तमान पत्रांच्या विक्रीतून जे उत्पन्न मिळते त्याला किरकोळ उत्पन्न म्हणतात.

६) विशिष्ट देणगी (याकरिता अतिरिक्त माहितीतील मुद्दा पहावा)

७) सामान्य देणगी (याकरिता अतिरिक्त माहितीतील मुद्दा पहावा)

८) विशिष्ट निधी (याकरिता अतिरिक्त माहितीतील मुद्दा पहावा)

९) दान निधी (याकरिता अतिरिक्त माहितीतील मुद्दा पहावा)

विशिष्ट कार्याकरिता बक्षिसाकरिता किंवा देणगीकरिता विशिष्ट रक्कमेने हा निधी निर्माण केला जातो. दाननिधी हे विशिष्ट उत्पन्न असते.

## उदाहरणे

१. **लेखन सामग्रीची हाताळणी** (Treatment of Stationery)

**ताळेबंद ३१ मार्च २०१७ रोजीचा**

| देयता | रक्कम ₹ | रक्कम ₹ | संपत्ती | रक्कम ₹ | रक्कम ₹ |
|---|---|---|---|---|---|
| | | | लेखन सामग्रीचा साठा | | ८०० |

**प्राप्ती-शोधन खाते (३१ मार्च २०१८ रोजी संपणाऱ्या वर्षाकरिता)**

**नावे** **जमा**

| प्राप्ती | रक्कम ₹ | रक्कम ₹ | शोधन | रक्कम ₹ | रक्कम ₹ |
|---|---|---|---|---|---|
| | | | लेखन सामग्रीची खरेदी | | ७,००० |

**समायोजन :**

१) ₹ १,५०० लेखन सामग्रीचे देणे बाकी आहे.

२) ३१ मार्च २०१८ ला चालू वर्षाच्या लेखन सामग्रीचा साठा ₹ १,३०० चा होता.

**वरील माहितीचे आधारे चालू वर्षात उपयोगात (वापरात) आलेल्या लेखन सामग्रीच्या रकमेची गणना (निश्चिती) करा.**

| तपशील | रक्कम ₹ | रक्कम ₹ |
|---|---|---|
| लेखन सामग्रीचा साठा १-४-२०१७ चा | ८०० | |
| अधिक : चालू वर्षातील खरेदी | ७,००० | |
| देणे बाकी (outstanding bill) | १,५०० | |
| | ९,३०० | |
| वजा : वर्ष अखेरचा साठा (३१-३-२०१८) | १,३०० | |
| चालू वर्षात उपयोगात आलेली लेखन सामग्री | | ८,००० |

२.

**केवळ वर्गणी संबंधित समायोजना**

**प्राप्ती – शोधन खाते ३१ मार्च २०१८ रोजी संपणाऱ्या वर्षाकरिता**

**नावे** **जमा**

| प्राप्ती | रक्कम ₹ | रक्कम ₹ | शोधन | रक्कम ₹ | रक्कम ₹ |
|---|---|---|---|---|---|
| वर्गणी | | | | | |
| २०१६ – १७ | १,५०० | | | | |
| २०१७ – १८ | ८०,००० | | | | |
| २०१८ – १९ | ३,५०० | ८५,००० | | | |

**समायोजना :**

१) चालू वर्षाची वर्गणी येणे बाकी ₹ ७,०००

२) २०१६ – १७ या वर्षामधे वर्गणीचे येणे बाकी ₹ २,०००/– होते, तसेच चालू वर्षाची मागील वर्षी अग्रिम मिळालेली वर्गणी ₹ ८,००० होती.

**वरील माहितीचे आधारे अंतिम खात्यामधे होणारे प्रभाव दर्शवा.**

**उत्तर :**

**उत्पन्न – खर्च खाते ३१ मार्च २०१८ रोजी संपणाऱ्या वर्षाकरिता**

**नावे** **जमा**

| खर्च | रक्कम ₹ | रक्कम ₹ | उत्पन्न | रक्कम ₹ | रक्कम ₹ |
|---|---|---|---|---|---|
| | | | वर्गणी | ८०,००० | |
| | | | अधिक – चालू वर्षाची मागील वर्षी मिळालेली वर्गणी | ८,००० | |
| | | | अधिक– चालू वर्षाची येणे बाकी वर्गणी | ७,००० | ९५,००० |

**ताळेबंद ३१ मार्च २०१८ रोजीचा**

| देयता | रक्कम ₹ | रक्कम ₹ | संपत्ती | रक्कम ₹ | रक्कम ₹ |
|---|---|---|---|---|---|
| अगाऊ मिळालेली वर्गणी (२०१८–१९) | | ३,५०० | अप्राप्त वर्गणी | | |
| | | | २०१६ – १७ | ५०० | |
| | | | २०१७ – १८ | ७,००० | ७,५०० |

३. **घसाऱ्याची निश्चिती (गणना)** (Calculations of Depreciation)

१ एप्रिल २०१८ ला उपस्कर (Furniture) खात्यामधे ₹ १,००,०००. एवढी शिल्लक दर्शविण्यात आली आहे.

१ जुलै २०१८ ला ₹ ३०,००० किंमतीचे अतिरिक्त उपस्कर (Furniture) खरेदी करण्यात आले.

उपस्करावर वार्षिक १२ % दराने घसारा आकारण्यात यावा.

अंतिम खात्यांमधे ही बाब प्रस्तुत करा.

उत्पन्न – खर्च खाते ३१ मार्च २०१९ रोजी संपणाऱ्या वर्षाकरिता

नावे जमा

| खर्च | रक्कम ₹ | रक्कम ₹ | उत्पन्न | रक्कम ₹ | रक्कम ₹ |
|---|---|---|---|---|---|
| उपस्करावर घसारा (कार्य टिप बघा) | | १४,७०० | | | |

ताळेबंद ३१ मार्च २०१९ रोजीचा

| देयता | रक्कम ₹ | रक्कम ₹ | संपत्ती | रक्कम ₹ | रक्कम ₹ |
|---|---|---|---|---|---|
| | | | उपस्कर (१.०४.२०१८) | १,००,००० | |
| | | | (+) खरेदी(१.७.२०१८ ला) | ३०,००० | |
| | | | | १,३०,००० | |
| | | | (–) घसारा(वार्षिक१२ %दराने) | १४,७०० | १,१५,३०० |

**कार्य टीप (Working Note) :**

| | | ₹ |
|---|---|---|
| अ) | वार्षिक १२ % दराने घसारा ₹ १,००,००० वर एका वर्षाचा | १२,००० |
| ब) | वार्षिक १२ % दराने घसारा ₹ ३०,००० वर ९ महिन्याकरिता | २,७०० |
| | **एकूण घसारा** | १४,७०० |

४. **चालू वर्षाशी आणि मागील वर्षाशी संबंधित अदत्त आणि पूर्वदत्त खर्च**

ताळेबंद ३१ मार्च २०१८ रोजीचा

| देयता | रक्कम ₹ | रक्कम ₹ | संपत्ती | रक्कम ₹ | रक्कम ₹ |
|---|---|---|---|---|---|
| | | | पूर्वदत्त पगार (२०१८ – १९ करिता) | | २,००० |

प्राप्ती – शोधन खाते ३१ मार्च २०१९ रोजी संपणाऱ्या वर्षाकरिता

नावे जमा

| प्राप्ती | रक्कम ₹ | रक्कम ₹ | शोधन | रक्कम ₹ | रक्कम ₹ |
|---|---|---|---|---|---|
| | | | पगार | | |
| | | | २०१८ – १९ | ३०,००० | |
| | | | २०१९ – २० | १,००० | ३१,००० |

**समायोजन :** चालू वर्षाचा अदत्त पगार (Outstanding Salaries) ₹ ५,५००

वरील माहितीचे आधारे २०१८ – १९ या वर्षाकरिता अंतिम खात्यांमधे 'पगार' संबंधीची बाब प्रस्तुत करा.

उत्तर :

**उत्पन्न – खर्च खाते ३१ मार्च २०१९ रोजी संपणाऱ्या वर्षाकरिता**

**नावे** **जमा**

| खर्च | रक्कम ₹ | रक्कम ₹ | उत्पन्न | रक्कम ₹ | रक्कम ₹ |
|---|---|---|---|---|---|
| पगार | ३०,००० | | | | |
| अधिक : २०१७ – १८मधे चालू वर्षाचा दिलेला | २,००० | | | | |
| चालू वर्षाचा देणे बाकी (अदत्त) | ५,५०० | | | | |
| | | ३७,५०० | | | |

**ताळेबंद ३१ मार्च २०१९ रोजीचा**

| देयता | रक्कम ₹ | रक्कम ₹ | संपत्ती | रक्कम ₹ | रक्कम ₹ |
|---|---|---|---|---|---|
| अदत्त पगार | | ५,५०० | पूर्वदत्त पगार (२०१९ – २०शी संबंधीत) | | १,००० |

५. **सोपे उदाहरण – उत्पन्न आणि खर्च खाते तयार करा.**

खाली दिलेल्या प्राप्ती–शोधन खाते आणि समायोजनांचे आधारे वेण्णा कल्चरल असोसिएशन सातारा चे ३१ मार्च २०२० रोजी संपणाऱ्या वर्षाचे उत्पन्न–खर्च खाते तयार करा.

**प्राप्ती शोधन खाते ३१ मार्च २०२० रोजी संपणाऱ्या वर्षाकरिता**

**नावे** **जमा**

| प्राप्ती | रक्कम ₹ | रक्कम ₹ | शोधन | रक्कम ₹ | रक्कम ₹ |
|---|---|---|---|---|---|
| शिल्लक (पुढे आणली) | | | भाडे | | |
| रोख | १०,००० | | २०१८ – १९ | ७०० | |
| बँक | १९,२०० | २९,२०० | २०१९ – २० | ५४,३०० | ५५,००० |
| वर्गणी | | | मुदत ठेव | | ४७,००० |
| २०१८ – १९ | १५,००० | | सामान्य खर्च | | ८,००० |
| २०१९ – २० | १,००,००० | | विमा (Insurance) | | १२,००० |
| २०२० – २१ | ८,००० | १,२३,००० | छपाई व लेखन सामग्री | | ६,००० |
| देणगी (सामान्य) | | २५,००० | सहल खर्च | | १८,००० |
| प्रवेश शुल्क | | १५,००० | पगार | | २०,००० |
| मुदत ठेवीवर व्याज | | ४,८०० | प्रवास खर्च | | १३,००० |
| सहल प्राप्ती | | २०,००० | जाहिरात (२०१८ – १९ वर्षाशी संबंधीत) | | ७,००० |
| | | | शिल्लक (पुढे नेली) | | |
| | | | रोख | १५,००० | |
| | | | बँक | १६,००० | ३१,००० |
| | | २,१७,००० | | | २,१७,००० |

**समायोजना :**

१) चालू वर्षाचे देणे बाकी भाडे ₹ ७,०००.

२) प्रवेश शुल्काच्या ६० % रकमेचे भांडवलीकरण करा.

३) चालू वर्षाची अप्राप्त वर्गणी ₹ २०,०००.

४) पूर्वदत्त विमा ₹ १,०००.

**उत्तर :**

**वेण्णा कल्चरल असोसिएशन साताराचे पुस्तकात**

**उत्पन्न – खर्च खाते ३१ मार्च २०२० रोजी संपणाऱ्या वर्षाकरिता**

**नावे** **जमा**

| खर्च | रक्कम ₹ | रक्कम ₹ | उत्पन्न | रक्कम ₹ | रक्कम ₹ |
|---|---|---|---|---|---|
| भाडे | ५४,३०० | | वर्गणी | १,००,००० | |
| (+) अदत्त | ७,००० | ६१,३०० | (+) अप्राप्त | २०,००० | १,२०,००० |
| सामान्य खर्च | | ८,००० | देणगी | | २५,००० |
| विमा | १२,००० | | प्रवेश शुल्क | १५,००० | |
| (–) पूर्वदत्त विमा | १,००० | ११,००० | (–) ६०% भांडवल निधीला | ९,००० | ६,००० |
| छपाई व लेखन सामग्री | | ६,००० | स्थानांतरित | | |
| सहल खर्च | | १८,००० | मुदत ठेवीवर व्याज | | ४,८०० |
| पगार | | २०,००० | सहल प्राप्ती | | २०,००० |
| प्रवास खर्च | | १३,००० | | | |
| वाढावा (Surplus) | | ३८,५०० | | | |
| (उत्पन्नाचे खर्चावरील आधिक्य) | | | | | |
| | | **१,७५,८००** | | | **१,७५,८००** |

**संकेत (Hint) :** सहल खर्चाची रक्कम ही सहल प्राप्तीमधून वजा करून देखील दर्शविता येईल.

६. **प्राप्ती–शोधन खात्याचे आधारे वर्गणी संबंधीची माहिती पुढील प्रमाणे देण्यात आलेली आहे.**

२०१८–१९ या वर्षामधे वर्गणी मिळाली ₹ ५०,०००. ३१ मार्च २०१८ ला वर्गणीचे येणे बाकी होते ₹१०,०००, ३१ मार्च २०१९ ला येणे बाकी असलेली वर्गणी ₹ २०,०००, ३१ मार्च २०१८ ला अगाऊ मिळालेली वर्गणी ₹ १५,०००, ३१ मार्च २०१९ ला अगाऊ मिळालेली वर्गणी ₹ १०,०००.

वरील माहिती ३१ मार्च २०१९ रोजी संपणाऱ्या वर्षाच्या उत्पन्न – खर्च खात्यात आणि त्याच तारखेच्या ताळेबंदामधे प्रस्तुत करा.

### उत्पन्न –खर्च खाते
### ३१ मार्च २०१९ रोजी संपणाऱ्या वर्षाकरिता

नावे — जमा

| खर्च | रक्कम ₹ | उत्पन्न | रक्कम ₹ |
|---|---|---|---|
| | | चालू वर्षाची वर्गणी (कार्य टीप नुसार) | ६५,००० |

### ताळेबंद
### ३१ मार्च २०१९ रोजीचा

| देयता | रक्कम ₹ | संपत्ती | रक्कम ₹ |
|---|---|---|---|
| अगाऊ मिळालेली वर्गणी | १०,००० | अप्राप्त वर्गणी (येणे बाकी) | २०,००० |

**कार्य टीपा :–**

चालू वर्षामधे वर्गणीपासून प्राप्त उत्पन्नाची निश्चिती एक तर वर्गणी खाते किंवा विवरणपत्र तयार करून करता येईल.

i) **वर्गणी विवरणपत्र** (Statement of Subscription)

| तपशील | | रक्कम ₹ |
|---|---|---|
| वर्गणी :– प्राप्ती – शोधन खात्याप्रमाणे | | ५०,००० |
| (+) ३१–३–२०१९ ला येणे बाकी | | २०,००० |
| (+) ३१–३–२०१८ ला अगाऊ मिळालेली वर्गणी | | १५,००० |
| | | ८५,००० |
| (–) ३१–३–२०१८ ची येणे बाकी वर्गणी | १०,००० | |
| (–) ३१–३–२०१९ ला अगाऊ मिळालेली वर्गणी | १०,००० | |
| | | २०,००० |
| | | ६५,००० |

### वर्गणी खाते

नावे — जमा

| तपशील | रक्कम ₹ | तपशील | रक्कम ₹ |
|---|---|---|---|
| येणे बाकी वर्गणी (पुढे आणली) | १०,००० | अगाऊ मिळालेली वर्गणी (पुढे आणली) | १५,००० |
| उत्पन्न – खर्च खाते (संतुलित रक्कम) | ६५,००० | बँक खाते | ५०,००० |
| चालू वर्षात अगाऊ मिळालेली (पुढे नेली) | १०,००० | चालू वर्षाची येणे बाकी | २०,००० |
| | ८५,००० | | ८५,००० |

७. **खाली दिलेल्या प्राप्ती – शोधन खाते दिलेल्या अतिरिक्त माहितीचे आधारे ३१ मार्च २०१९ रोजी संपणाऱ्या वर्षाकरिता उत्पन्न – खर्च खाते आणि त्याच तारखेचा ताळेबंद तयार करा.**

**प्राप्ती – शोधन खाते ३१ मार्च २०१९ रोजी संपणाऱ्या वर्षाकरिता**

**नावे** **जमा**

| प्राप्ती | रक्कम ₹ | रक्कम ₹ | शोधन | रक्कम ₹ | रक्कम ₹ |
|---|---|---|---|---|---|
| शिल्लक (पुढे आणली) | | ३,००० | पगार | | ४,००० |
| वर्गणी | | ५,००० | छपाई व लेखन सामग्री | | १,००० |
| देणगी (महसुली) | | ५,००० | कमिशन | | ५०० |
| प्रवेश शुल्क | | ४,००० | भाडे | | २,००० |
| व्याज | | १,००० | विद्युत खर्च | | १,५०० |
| | | | उपस्कर(Furniture) | | ८,००० |
| | | | शिल्लक (पुढे नेली) | | १,००० |
| | | **१८,०००** | | | **१८,०००** |

**अतिरिक्त माहिती :**

१) अदत्त भाडे (Outstanding Rent) ₹ २००.

२) वर्गणी या पदामधे अगाऊ मिळालेल्या वर्गणीच्या ₹ १,००० या रकमेचा समावेश आहे आणि चालू वर्षाची अप्राप्त वर्गणी ₹५०० आहे.

३) उपस्करवर वार्षिक ८% दराने घसारा आकारा.

४) प्रवेश शुल्काच्या ५०% रकमेचे भांडवलीकरण करा.

५) भांडवल निधी ₹ ३,०००

**उत्तर :**

**उत्पन्न – खर्च खाते ३१ मार्च २०१९ रोजी संपणाऱ्या वर्षाकरिता**

**नावे** **जमा**

| खर्च | रक्कम ₹ | रक्कम ₹ | उत्पन्न | रक्कम ₹ | रक्कम ₹ |
|---|---|---|---|---|---|
| पगार | | ४,००० | वर्गणी | ५,००० | |
| छपाई व लेखन सामग्री | | १,००० | वजा : अगाऊ मिळालेली | १,००० | |
| कमिशन | | ५०० | | ४,००० | |
| भाडे | २,००० | | अधिक : अप्राप्त | ५०० | ४,५०० |
| अधिक : अदत्त | २०० | २,२०० | देणगी | | ५,००० |
| विद्युत खर्च | | १,५०० | प्रवेश शुल्क | ४,००० | |
| उपस्करावर घसारा | | ६४० | वजा : ५०% भांडवल निधीला स्थानांतरित | २,००० | २,००० |
| वाढावा (Surplus) (उत्पन्नाचे खर्चावरील आधिक्य) | | २,६६० | व्याज | | १,००० |
| | | **१२,५००** | | | **१२,५००** |

**ताळेबंद ३१ मार्च २०१९ रोजीचा**

| देयता | रक्कम ₹ | रक्कम ₹ | संपत्ती | रक्कम ₹ | रक्कम ₹ |
|---|---|---|---|---|---|
| भांडवल निधी | ३,००० | | उपस्कर | ८,००० | |
| (+)५०% प्रवेश शुल्क | २,००० | | (-) ८% घसारा | ६४० | ७,३६० |
| (+) वाढावा | २,६६० | ७,६६० | | | |
| | | | रोख शिल्लक | | १,००० |
| अदत्त भाडे | | २०० | अप्राप्त वर्गणी | | ५०० |
| पूर्वप्राप्त वर्गणी | | १,००० | | | |
| | | ८,८६० | | | ८,८६० |

८. **१ एप्रिल २०१९ रोजी डॉ. अभिनव भारत यांनी वैद्यकीय व्यवसाय सुरू केला. त्यांनी ३१ मार्च २०२० रोजी संपणाऱ्या वर्षाचे प्राप्ती–शोधन खाते आणि केलेल्या समायोजना दिलेल्या आहेत. त्या आधारे ३१ मार्च २०२० रोजी संपणाऱ्या वर्षाचे उत्पन्न–खर्च खाते आणि त्याच तारखेचा ताळेबंद तयार करा.**

**डॉ. अभिनव भारत यांचे**

**प्राप्ती – शोधन खाते ३१ मार्च २०२० रोजी संपणाऱ्या वर्षाकरिता**

**नावे** **जमा**

| प्राप्ती | रक्कम ₹ | शोधन | रक्कम ₹ |
|---|---|---|---|
| व्यवसायाचे प्रारंभी रोख आणली (Cash introduce) | २५,००० | उपस्कर (Furniture) | ८,००० |
| | | उपकरणे | १०,००० |
| तपासणी शुल्क | १०,००० | औषधी | ७,००० |
| दवाखान्यापासून प्राप्ती | ३०,००० | पगार | १२,००० |
| विविध प्राप्ती(Sundry Receipts) | ५,००० | भाडे | ६,००० |
| | | वाहन खर्च(Conveyance) | ४,००० |
| | | लेखन सामग्री | ५०० |
| | | विद्युत शुल्क | ५,००० |
| | | नियतकालिके (Journals) | ५०० |
| | | उचल | १५,००० |
| | | शिल्लक (पुढे नेली) | २,००० |
| | ७०,००० | | ७०,००० |

**अतिरिक्त माहिती:**

१) तपासणी शुल्क चे ₹ २,००० आणि दवाखाना प्राप्ती चे ₹ ५०० येणे बाकी आहेत.

२) अदत्त खर्च – भाडे ₹ ५०० आणि पगार ₹ १,००० .

३) ४० % वाहन खर्च हा घरगुती वापराशी संबंधित आहे.

४) औषधींचा साठा ₹ १,००० .

५) उपस्करावर वार्षिक ८% दराने आणि उपकरणांवर ₹ ५०० घसारा आकारण्यात यावा.

उत्तर :

**डॉ. अभिनव भारत यांचे पुस्तकात**

**उत्पन्न – खर्च खाते ३१ मार्च २०२० रोजी संपणाऱ्या वर्षाकरिता**

**नावे** **जमा**

| खर्च | रक्कम ₹ | रक्कम ₹ | उत्पन्न | रक्कम ₹ | रक्कम ₹ |
|---|---|---|---|---|---|
| औषधी | ७,००० | | तपासणी फी | १०,००० | |
| वजा : औषध साठा | १,००० | ६,००० | अधिक : अप्राप्त | २,००० | १२,००० |
| पगार | १२,००० | | | | |
| अधिक : अदत्त पगार | १,००० | १३,००० | दवाखाना प्राप्ती | ३०,००० | |
| भाडे | ६,००० | | अधिक : अप्राप्त | ५०० | ३०,५०० |
| अधिक : अदत्त भाडे | ५०० | ६,५०० | | | |
| वाहन खर्च | ४,००० | | विविध प्राप्ती | | ५,००० |
| वजा : ४०%घरगुती वापराशी संबंधित | १,६०० | २,४०० | | | |
| लेखन सामग्री | | ५०० | | | |
| विद्युत शुल्क | | ५,००० | | | |
| नियतकालिके | | ५०० | | | |
| घसारा : | | | | | |
| उपस्करावर | ६४० | | | | |
| उपकरणांवर | ५०० | १,१४० | | | |
| वाढावा (Surplus) | | १२,४६० | | | |
| (उत्पन्नाचे खर्चावरिल आधिक्य) | | | | | |
| | | ४७,५०० | | | ४७,५०० |

**ताळेबंद**

**३१ मार्च २०२० रोजीचा**

| देयता | रक्कम ₹ | रक्कम ₹ | संपत्ती | रक्कम ₹ | रक्कम ₹ |
|---|---|---|---|---|---|
| भांडवल निधी (व्यवसाय | २५,००० | | उपस्कर | ८,००० | |
| प्रारंभी रोख आणली) | | | (–) ८% घसारा | ६४० | ७,३६० |
| (+) वाढावा | १२,४६० | | उपकरणे | १०,००० | |
| | ३७,४६० | | (–) घसारा | ५०० | ९,५०० |
| (–) उचल १५,००० | | | औषधींचा साठा | | १,००० |
| घरगुती वाहन खर्च १,६०० | १६,६०० | २०,८६० | अप्राप्त तपासणी फी | | २,००० |
| अदत्त भाडे | | ५०० | दवाखाना प्राप्तीचे येणे | | ५०० |
| अदत्त पगार | | १,००० | रोख शिल्लक | | २,००० |
| | | २२,३६० | | | २२,३६० |

९. **पर्णनिल क्रीडा मंडळ, पुणे यांचे प्राप्ती–शोधन आणि अतिरिक्त माहिती पुढील प्रमाणे देण्यात आलेली आहे. त्यावरून ३१ मार्च २०१९ रोजी संपणाऱ्या वर्षाकरिता उत्पन्न – खर्च खाते आणि त्याच तारखेचा ताळेबंद तयार करा.**

**प्राप्ती – शोधन खाते ३१ मार्च २०१९ रोजी संपणाऱ्या वर्षाकरिता**

**नावे** **जमा**

| प्राप्ती | रक्कम ₹ | रक्कम ₹ | शोधन | रक्कम ₹ | रक्कम ₹ |
|---|---|---|---|---|---|
| रोख शिल्लक (पुढे आणली) | | ५,००० | बँक ओव्हरड्राफ्ट (परत फेड) | | ३२,००० |
| वर्गणी | | | पगार | | १०,००० |
| २०१६ – १७ | २,००० | | विद्युत शुल्क (आकार) | | ४,००० |
| २०१७ – १८ | ३,००० | | महानगरपालिका कर | | २,७०० |
| २०१८–१९ | ७०,००० | ७५,००० | खेळ सामग्री खरेदी | | ५०,००० |
| देणगी | | १५,००० | सामान्य खर्च | | ५०० |
| प्रवेश शुल्क | | १,७०० | बिलियर्ड खेळा संबंधीचा खर्च | | ३,००० |
| आजीवन सभासद शुल्क (महसुली) | | १७,००० | खेळ मैदानाची दुरुस्ती | | ५०० |
| खेळ स्पर्धांपासून प्राप्ती (Tournament Receipt) | | ६०,००० | खेळ स्पर्धांवर खर्च (Tournaments Exp.) | | ५०,००० |
| | | | शिल्लक (पुढे नेली) | | |
| | | | हस्तस्थ रोख | | ७,००० |
| | | | बँक शिल्लक | | १४,००० |
| | | **१,७३,७००** | | | **१,७३,७००** |

**अतिरिक्त माहिती :**

१) देणगीची ५० % रक्कम ही इमारत निधीशी संबंधित आहे.

२) प्रवेश शुल्काच्या ७० % रकमेचे भांडवलीकरण करा.

३) २०१६ – १७ या वर्षाची ₹ ५०० आणि २०१७ – १८ या वर्षाची ₹ १,००० वर्गणी अद्याप येणे बाकी आहे.

४) १–४–२०१८ रोजी संस्थेच्या पुस्तकामधे पुढील प्रमाणे शिलका दिसून आल्या – इमारत निधी ₹ ४७,०००, बँक ओव्हरड्राफ्ट ₹ ३२,०००, जमीन ₹ १,५०,०००. खेळ सामग्री ₹ ३०,०००, अप्राप्त वर्गणी २०१६ – १७ या वर्षाची ₹२,५०० आणि २०१७ – १८ या वर्षाची ₹ ४,०००.

५) चालू वर्षाची अप्राप्त वर्गणी ₹ ८,०००

६) खेळ सामग्रीचा साठा ₹ ८,००० एवढा होता आणि या खेळ सामग्री साठ्यावर वार्षिक १२.५ % ने घसारा आकारा.

उत्तर :

**पर्णनिल क्रीडा मंडळ, पुणे यांचे पुस्तकात**
**उत्पन्न– खर्च खाते ३१ मार्च २०१९ रोजी संपणाऱ्या वर्षाकरिता**

नावे जमा

| खर्च | रक्कम ₹ | रक्कम ₹ | उत्पन्न | रक्कम ₹ | रक्कम ₹ |
|---|---|---|---|---|---|
| पगार | | १०,००० | खेळ स्पर्धांपासून प्राप्ती | ६०,००० | |
| विद्युत शुल्क | | ४,००० | (–) खेळ स्पर्धांवर खर्च | ५०,००० | १०,००० |
| नगरपरिषद कर | | २,७०० | वर्गणी | ७०,००० | |
| वापरण्यात आलेली खेळसामग्री | | | (+) अप्राप्त | ८,००० | ७८,००० |
| प्रारंभीची शिल्लक : | ३०,००० | | देणगी | १५,००० | |
| (+) खरेदी | ५०,००० | | (–) ५० % राशी इमारत | ७,५०० | ७,५०० |
| | ८०,००० | | निधीला स्थानांतरित | | |
| (–) वर्ष अखेरचा साठा | ८,००० | ७२,००० | प्रवेश शुल्क | १,७०० | |
| सामान्य खर्च | | ५०० | (–) ७० % भांडवल | १,१९० | ५१० |
| बिलियर्ड खेळ संबंधी खर्च | | ३,००० | निधीला स्थानांतरित | | |
| खेळ मैदान दुरुस्ती | | ५०० | आजीवन सभासद शुल्क | | १७,००० |
| खेळ सामग्री साठ्यावर घसारा | | १,००० | | | |
| वाढावा (उत्पन्नाचे खर्चावरील आधिक्य) | | १९,३१० | | | |
| | | **१,१३,०१०** | | | **१,१३,०१०** |

**ताळेबंद ३१ मार्च २०१९ रोजीचा**

| देयता | रक्कम ₹ | रक्कम ₹ | संपत्ती | रक्कम ₹ | रक्कम ₹ |
|---|---|---|---|---|---|
| इमारत निधी | ४७,००० | | रोख शिल्लक | | ७,००० |
| (+) ५० % देणगी | ७,५०० | ५४,५०० | बँक शिल्लक | | १४,००० |
| भांडवल निधी | १,१२,५०० | | अप्राप्त वर्गणी : | | |
| (+) ७० % प्रवेश शुल्क | १,१९० | | २०१६ – १७ | ५०० | |
| (+) वाढावा | १९,३१० | १,३३,००० | २०१७ – १८ | १,००० | |
| | | | २०१८ –१९ | ८,००० | ९,५०० |
| | | | जमीन | | १,५०,००० |
| | | | खेळ सामग्रीचा साठा | ८,००० | |
| | | | (–) घसारा १२.५ % | १,००० | ७,००० |
| | | **१,८७,५००** | | | **१,८७,५००** |

**कार्य टीपा (Working Notes) :**

१) **भांडवल निधीची निश्चिती –**

**ताळेबंद ३१ मार्च २०१८ रोजीचा**

| देयता | रक्कम ₹ | रक्कम ₹ | संपत्ती | रक्कम ₹ | रक्कम ₹ |
|---|---|---|---|---|---|
| इमारत निधी | | ४७,००० | जमीन | | १,५०,००० |
| बँक ओव्हरड्राफ्ट | | ३२,००० | खेळ सामग्री | | ३०,००० |
| भांडवल निधी(संतुलित रक्कम) | | १,१२,५०० | अप्राप्त वर्गणी | | |
| | | | २०१६ – १७ | २,५०० | |
| | | | २०१७ – १८ | ४,००० | ६,५०० |
| | | | रोख शिल्लक | | ५,००० |
| | | **१,९१,५००** | | | **१,९१,५००** |

२. **खेळ सामग्री वर घसाऱ्याची आकारणी**

₹ ८,००० वर $१२ \frac{१}{२}$ % दराने घसारा

$= ८,००० \times \frac{१२.५}{१००} = ₹\ १,०००$

१०. **३१ मार्च २०१८ रोजी सरस्वती हायस्कूल, खेड ची स्थिती पुढीलप्रमाणे दिसून आली.**

**ताळेबंद ३१ मार्च २०१८ रोजीचा**

| देयता | रक्कम ₹ | रक्कम ₹ | संपत्ती | रक्कम ₹ | रक्कम ₹ |
|---|---|---|---|---|---|
| भांडवल निधी | | ६,८०,००० | रोख शिल्लक | | ५,००० |
| प्रवेश शुल्क | | २०,००० | बँक शिल्लक | | ८,००० |
| | | | प्रयोगशाळा | | १५,००० |
| | | | इमारत | | ६,००,००० |
| | | | फर्निचर | | ४०,००० |
| | | | पुस्तके | | २२,००० |
| | | | शिक्षण शुल्क येणे बाकी | | १०,००० |
| | | **७,००,०००** | | | **७,००,०००** |

**प्राप्ती – शोधन खाते ३१ मार्च २०१९ रोजी संपणाऱ्या वर्षाकरिता**

**नावे** **जमा**

| प्राप्ती | रक्कम ₹ | रक्कम ₹ | शोधन | रक्कम ₹ | रक्कम ₹ |
|---|---|---|---|---|---|
| शिल्लक (पुढे आणली) | | | शिक्षकांचा पगार | | १,८०,००० |
| रोख | ५,००० | | कार्यालयीन कर्मचाऱ्यांचा | | |
| बँक | ८,००० | १३,००० | पगार | | ३०,००० |
| शिक्षण शुल्क | | | पुस्तके (१-१-२०१९ ला | | १५,००० |
| २०१७ – १८ | ८,००० | | खरेदी) | | |
| २०१८ – १९ | १,००,००० | १,०८,००० | छपाई व लेखन सामग्री | | ५,००० |
| दंड वसुली(Fine Collected) | | २,००० | वार्षिक संमेलन खर्च | | १०,००० |
| प्रवेश शुल्क | | १०,००० | कार्यालय भाडे | | १६,००० |
| सत्र शुल्क (Term fees) | | ७,००० | दुरुस्ती | | १५,००० |
| ग्रंथालयासाठी देणगी | | १,००० | क्रीडा खर्च (Sports Exp.) | | ५,००० |
| बँक ठेवीवर व्याज | | ५,००० | फर्निचर (१-७-२०१८ ला | | ५०,००० |
| सरकारी अनुदान (महसुली) | | २,००,००० | खरेदी) | | |
| | | | शिल्लक (पुढे नेली) | | |
| | | | रोख | ८,००० | |
| | | | बँक | १२,००० | २०,००० |
| | | **३,४६,०००** | | | **३,४६,०००** |

**अतिरिक्त माहिती :–**

१) चालू वर्षाच्या शिक्षण शुल्काचे येणे बाकी आहे ₹ ५,०००

२) शिक्षकांचा देणे बाकी पगार ₹ १५,०००

३) भाडे अगाऊ (advance) दिलेले आहे ₹ ३,०००

४) पुस्तकांवर वार्षिक १५% आणि फर्निचर वर वार्षिक १०% ने घसाऱ्याची आकारणी करा.

**आपणास ३१ मार्च २०१९ रोजी संपणाऱ्या वर्षाकरिता उत्पन्न – खर्च खाते आणि त्याच तारखेचा ताळेबंद तयार करावयाचा आहे.**

उत्तर :

**सरस्वती हायस्कूल, खेड यांचे पुस्तकात**

**उत्पन्न – खर्च खाते ३१ मार्च २०१९ रोजी संपणाऱ्या वर्षाकरिता**

**नावे** **जमा**

| खर्च | रक्कम ₹ | रक्कम ₹ | उत्पन्न | रक्कम ₹ | रक्कम ₹ |
|---|---|---|---|---|---|
| शिक्षकांचा पगार | १,८०,००० | | शिक्षण शुल्क | १,००,००० | |
| (+) देणे बाकी | १५,००० | १,९५,००० | (+) येणे बाकी | ५,००० | १,०५,००० |
| कार्यालयीन कर्मचाऱ्यांचा पगार | | ३०,००० | दंड वसुली | | २,००० |
| छपाई व लेखन सामग्री | | ५,००० | प्रवेश शुल्क | | १०,००० |
| वार्षिक संमेलन खर्च | | १०,००० | सत्र शुल्क | | ७,००० |
| कार्यालय भाडे | १६,००० | | बँक ठेवीवर व्याज | | ५,००० |
| (–) अगाऊ दिलेले | ३,००० | १३,००० | सरकारी अनुदान | | २,००,००० |
| दुरुस्ती | | १५,००० | | | |
| क्रीडा खर्च | | ५,००० | | | |
| घसारा | | | | | |
| पुस्तकांवर | ७,७५० | | | | |
| उपस्करवर | ३,८६३ | ११,६१३ | | | |
| वाढावा (उत्पन्नाचे खर्चावरील आधिक्य) | | ४४,३८७ | | | |
| | | **३,२९,०००** | | | **३,२९,०००** |

**ताळेबंद ३१ मार्च २०१९ रोजीचा**

| देयता | रक्कम ₹ | रक्कम ₹ | संपत्ती | रक्कम ₹ | रक्कम ₹ |
|---|---|---|---|---|---|
| भांडवल निधी | ६,८०,००० | | रोख शिल्लक | | ८,००० |
| (+) वाढावा | ४४,३८७ | ७,२४,३८७ | बँक शिल्लक | | १२,००० |
| प्रवेश शुल्क | | २०,००० | शिक्षण शुल्क येणे बाकी : | | |
| ग्रंथालय देणगी | | १,००० | २०१७ – १८ | २,००० | |
| शिक्षकांचा देणे बाकी पगार | | १५,००० | २०१८ – १९ | ५,००० | ७,००० |
| | | | अगाऊ दिलेले भाडे | | ३,००० |
| | | | प्रयोगशाळा | | १५,००० |
| | | | इमारत | | ६,००,००० |
| | | | फर्निचर : | ४०,००० | |
| | | | (+) खरेदी | ५०,००० | |
| | | | | ९०,००० | |
| | | | (–) घसारा १० % | ७,७५० | ८२,२५० |
| | | | पुस्तके : | २२,००० | |
| | | | (+) खरेदी | १५,००० | |
| | | | | ३७,००० | |
| | | | (–) घसारा १५% | ३,८६३ | ३३,१३७ |
| | | ७,६०,३८७ | | | ७,६०,३८७ |

**कार्य टीपा (Working Notes) :**

**१) फर्निचरवर घसाऱ्याची आकारणी –** ₹

अ) ₹ ४०,००० वर वार्षिक १० % दराने वर्षभराचे ४,०००

ब) ₹ ५०,००० वर वार्षिक १० % दराने ९ महिन्यासाठी

$५०,००० \times \frac{१०}{१००} \times \frac{९}{१२} =$ ३७५०

**एकूण फर्निचर घसारा** **७,७५०**

**२) पुस्तकांवर घसाऱ्याची आकारणी –** ₹

अ) ₹ २२,००० वर वार्षिक १५ % दराने वर्षभराचे ३,३००

ब) ₹ १५,००० वर वार्षिक १५ % दराने ३ महिन्यासाठी

$१५,००० \times \frac{१५}{१००} \times \frac{३}{१२} =$ ५६३

**पुस्तकांवर घसारा एकूण** **३,८६३**

**११. दयानंद ग्रंथालय, अंबेजोगाई यांचा ३१ मार्च २०१९ रोजीचा ताळेबंद व ३१ मार्च २०२० रोजी संपणाऱ्या वर्षासाठीचे प्राप्ती – शोधन खाते व समायोजना खालील प्रमाणे आहे.**

**त्यावरून ३१ मार्च २०२० रोजी संपणाऱ्या वर्षाकरिता उत्पन्न – खर्च खाते आणि त्याच तारखेचा ताळेबंद तयार करा.**

**ताळेबंद ३१ मार्च २०१९ रोजीचा**

| देयता | रक्कम ₹ | संपत्ती | रक्कम ₹ |
|---|---|---|---|
| भांडवल निधी | ७,५०,००० | फर्निचर | ५०,००० |
| पूर्वप्राप्त वर्गणी | ३,००० | पुस्तके | ६,५०,५०० |
| अदत्त खर्च | २,००० | पोस्ट तिकीटांचा साठा | ५०० |
| | | प्रतिभूतीमध्ये गुंतवणूक | ७,००० |
| | | रोख शिल्लक | ७,००० |
| | | बँक शिल्लक | ४०,००० |
| | **७,५५,०००** | | **७,५५,०००** |

**प्राप्ती – शोधन खाते ३१ मार्च २०२० रोजी संपणाऱ्या वर्षाकरिता**

**नावे** **जमा**

| प्राप्ती | रक्कम (₹) | शोधन | रक्कम (₹) |
|---|---|---|---|
| शिल्लक (पुढे आणली) | | पगार | २४,००० |
| रोख | ७,००० | पोस्ट तिकीटांची खरेदी | १,५०० |
| बँक | ४०,००० | पुस्तकांची खरेदी (१-१०-२०१९ ला) | १,००,००० |
| सभासद वर्गणी | १,८०,००० | अदत्त खर्चाचे शोधन | २,००० |
| प्रवेश शुल्क | ३०,००० | गुंतवणूक | ५०,००० |
| जुन्या वर्तमानपत्रांची विक्री | २,००० | फर्निचर (१-७-२०१९ला खरेदी केले) | ३०,००० |
| व्याख्यान कक्षाचे भाडे (Hire of Lecture Hall) | १०,००० | छपाई व लेखन सामग्री | ६,००० |
| | | भाडे | १८,००० |
| प्रतिभूतींवरील व्याज | ५,००० | शिल्लक (पुढे नेली) | |
| आजीवन सभासद शुल्क | १०,००० | रोख | ९,५०० |
| | | बँक | ४३,००० |
| | २,८४,००० | | २,८४,००० |

**समायोजना :**

१) पुस्तकांवर वार्षिक १० % दराने घसारा आकारा.

२) फर्निचरवर वार्षिक ८.५ % दराने घसारा आकारा.

३) प्रवेश शुल्काच्या ५० % रकमेचे आणि आजीवन सभासद शुल्काच्या संपूर्ण रकमेचे भांडवलीकरण करा.

४) ग्रंथालयाचे प्रत्येकी ₹ १०० वर्गणी देणारे असे २,००० सभासद आहेत.

५) उपयोगात न आलेल्या पोस्ट तिकीटांची किंमत ₹ २०० आहे.

उत्तर :

### दयानंद ग्रंथालय, अंबेजोगाई यांचे पुस्तकात
### उत्पन्न व खर्च खाते ३१ मार्च २०२० रोजी संपणाऱ्या वर्षाकरिता

**नावे** **जमा**

| खर्च | रक्कम ₹ | रक्कम ₹ | उत्पन्न | रक्कम ₹ | रक्कम ₹ |
|---|---|---|---|---|---|
| पगार | | २४,००० | सभासद वर्गणी | १,८०,००० | |
| पोस्टेज : | | | (+) पूर्वप्राप्त वर्गणी | ३००० | |
| प्रारंभिक शिल्लक | ५०० | | (+) अप्राप्त | १७,००० | २,००,००० |
| (+) खरेदी | १,५०० | | प्रवेश शुल्क | ३०,००० | |
| | २,००० | | (-) ५० %भांडवल निधीला | | |
| (-) शेवटची शिल्लक | २०० | १,८०० | स्थानांतरित | १५,००० | १५,००० |
| छपाई व लेखन सामग्री | | ६,००० | जुन्या वर्तमानपत्रांची विक्री | | २,००० |
| भाडे | | १८,००० | व्याख्यान कक्षाचे भाडे | | १०,००० |
| घसारा : | | | प्रतिभूतिंवरिल व्याज | | ५,००० |
| पुस्तकांवर | ७०,०५० | | | | |
| फर्निचरवर | ६,१६२ | ७६,२१२ | | | |
| वाढावा (उत्पन्नाचे खर्चावरील आधिक्य) | | १,०५,९८८ | | | |
| | | २,३२,००० | | | २,३२,००० |

### ताळेबंद ३१ मार्च २०२० रोजीचा

| देयता | रक्कम ₹ | रक्कम ₹ | संपत्ती | रक्कम ₹ | रक्कम ₹ |
|---|---|---|---|---|---|
| भांडवल निधी | ७,५०,००० | | रोख शिल्लक | | ९,५०० |
| (+) ५० % प्रवेश शुल्क | १५,००० | | बँक शिल्लक | | ४३,००० |
| (+)आजीवन सभासद शुल्क | १०,००० | | फर्निचर | ५०,००० | |
| (+) वाढावा | १,०५,९८८ | ८,८०,९८८ | (+) खरेदी | ३०,००० | |
| | | | | ८०,००० | |
| | | | (-) ८.५% घसारा | ६,१६२ | ७३,८३८ |
| | | | पुस्तके : | ६,५०,५०० | |
| | | | (+) खरेदी | १,००,००० | |
| | | | | ७,५०,५०० | |
| | | | (-) घसारा | ७०,०५० | ६,८०,४५० |
| | | | पोस्ट तिकीटांचा साठा | | २०० |
| | | | प्रतिभूतींमधील गुंतवणूक | | ७,००० |
| | | | गुंतवणूक | | ५०,००० |
| | | | अप्राप्त वर्गणी | | १७,००० |
| | | ८,८०,९८८ | | | ८,८०,९८८ |

**कार्य टीपा (Working Notes) :**

१) **पुस्तकांवरील घसाऱ्याची गणना** ₹

अ) ₹ ६,५०,५०० वर १०% वार्षिक दराने एका वर्षाचे

$$\frac{६,५०,५००}{१} \times \frac{१०}{१००} = ६५,०५० \qquad ६५,०५०$$

ब) ₹ १,००,००० वर १० % वार्षिक दराने ६ महिन्याचे

$$\frac{१००००}{१} \times \frac{१}{१००} \times \frac{६}{१२} = \qquad ५,०००$$

**एकूण घसारा** ७०,०५०

२) **फर्निचर वरील घसाऱ्याची गणना** ₹

अ) **₹ ५०,००० वर वार्षिक ८.५ % ने एका वर्षाचा**

$$५०,००० \times \frac{८.५}{१००} = \qquad ४,२५०$$

ब) **₹ ३०,००० वर वार्षिक ८.५ % ने ९ महिन्याचा**

$$३०,००० \times \frac{८.५}{१००} \times \frac{९}{१२} = \qquad १,९१२$$

**एकूण घसारा** ६,१६२

१२. **चेंबर ऑफ कॉमर्स, बीड यांचे ३१ मार्च २०१८ रोजी संपणाऱ्या वर्षाचे प्राप्ती – शोधन खाते आणि काही अतिरिक्त माहिती पुढील प्रमाणे आहे. आपणास ३१ मार्च २०१८ रोजी संपणाऱ्या वर्षाकरिता उत्पन्न – खर्च खाते आणि त्याच तारखेचा ताळेबंद तयार करावयाचा आहे.**

**प्राप्ती – शोधन खाते ३१ मार्च २०१८ रोजी संपणाऱ्या वर्षाकरिता**

**नावे** **जमा**

| प्राप्ती | रक्कम ₹ | शोधन | रक्कम ₹ |
|---|---|---|---|
| बँक शिल्लक (पुढे आणली) | २२,२५० | विमा | १०,००० |
| वर्गणी | ७२,००० | छपाई व लेखन सामग्री | ४,००० |
| (२०१६ – १७ च्या ₹ ८,००० चा समावेश आहे.) | | पुस्तके | ३०,००० |
| यंत्राची विक्री (पुस्तक मूल्य ₹ २५,०००) | २०,००० | संगणक | ६०,००० |
| देणगी | ५५,००० | प्रवास खर्च | ४,००० |
| प्रवेश शुल्क | ६,००० | उपस्कर (Furniture) | ६२,००० |
| | | बँक शिल्लक (पुढे नेली) | ५,२५० |
| | १,७५,२५० | | १,७५,२५० |

**अतिरिक्त माहिती :**

१) १ .०४.२०१७ ला संपत्ती आणी देयता पुढील प्रमाणे :
अप्राप्त वर्गणी ₹१०,०००, यंत्र ₹ ५०,०००, इमारत निधि ₹ २,१०,०००, गुंतवणूक ₹ ३,००,०००.

२) यंत्रावर घसाऱ्याची आकारणी करा ₹ २,५००.

३) देणगी ही इमारत निधी करिता मिळालेली आहे.

४) चालू वर्षाचे शेवटी एकूण येणे बाकी वर्गणी ₹ ६,०००.
[सूचना – चालू वर्षाची वर्गणी ₹ ४,००० आहे.(₹ ६,००० – ₹ २,०००)]

**उत्तर :**

**चेम्बर ऑफ कॉमर्स, बीड यांचे पुस्तकात**

**उत्पन्न – खर्च खाते ३१ मार्च २०१८ रोजी संपणाऱ्या वर्षाकरिता**

**नावे** **जमा**

| खर्च | रक्कम ₹ | रक्कम ₹ | उत्पन्न | रक्कम ₹ | रक्कम ₹ |
|---|---|---|---|---|---|
| विमा | | १०,००० | वर्गणी : | ७२,००० | |
| छपाई व लेखन सामग्री | | ४,००० | (–) २०१६ – १७ ची | ८,००० | |
| प्रवास खर्च | | ४,००० | | ६४,००० | |
| यंत्र विक्रीवर नुकसान | | ५,००० | (+) चालू वर्षाची अप्राप्त | ४,००० | ६८,००० |
| यंत्रावर घसारा | | २,५०० | प्रवेश शुल्क | | ६,००० |
| वाढावा (उत्पन्नाचे खर्चावरिल आधिक्य) | | ४८,५०० | | | |
| | | ७४,००० | | | ७४,००० |

**ताळेबंद**

**३१ मार्च २०१८ रोजीचे**

| देयता | रक्कम ₹ | रक्कम ₹ | संपत्ती | रक्कम ₹ | रक्कम ₹ |
|---|---|---|---|---|---|
| इमारत निधी | २,१०,००० | | बँकेतील रोख | | ५,२५० |
| (+) इमारत निधी देणगी | ५५,००० | २,६५,००० | पुस्तके | | ३०,००० |
| भांडवल निधी | १,७२,२५० | | उपस्कर | | ६२,००० |
| (+) वाढावा | ४८,५०० | २,२०,७५० | अप्राप्त वर्गणी : | | |
| | | | २०१६ – १७ | २,००० | |
| | | | २०१७ – १८ | ४,००० | ६,००० |
| | | | संगणक | | ६०,००० |
| | | | यंत्र : | ५०,००० | |
| | | | (–) विक्री | २५,००० | |
| | | | | २५,००० | |
| | | | (–) घसारा | २,५०० | २२,५०० |
| | | | गुंतवणूक | | ३,००,००० |
| | | ४,८५,७५० | | | ४,८५,७५० |

**कार्य टीप :**

**१) १-४-२०१७ च्या भांडवल निधीची गणना**

**ताळेबंद १ एप्रिल २०१७ रोजीचा**

| देयता | रक्कम ₹ | संपत्ती | रक्कम ₹ |
|---|---|---|---|
| इमारत निधी | २,१०,००० | बँकेत रोख | २२,२५० |
| भांडवल निधी | १,७२,२५० | अप्राप्त वर्गणी | १०,००० |
| (संतुलित रक्कम) | | यंत्र | ५०,००० |
| | | गुंतवणूक | ३,००,००० |
| | ३,८२,२५० | | ३,८२,२५० |

**टीप २) चालू वर्षाची अप्राप्त वर्गणी :**

| | | |
|---|---|---|
| २०१६-१७ ची अप्राप्त वर्गणी | ₹ | १०,००० |
| वजा चालू वर्षामधे २०१६-१७ ची प्राप्त वर्गणी | ₹ | ८,००० |
| म्हणजेच २०१६-१७ ची वर्गणी अद्याप येणे बाकी | ₹ | २,००० |

३१ मार्च २०१८ ला एकूण येणे बाकी (अप्राप्त) वर्गणी ₹ ६,००० यामध्ये २०१६-१७ च्या अप्राप्त वर्गणी चे ₹ २,००० चा समावेश आहे. म्हणजेच चालू वर्षाची अप्राप्त वर्गणी ही ₹ ४,००० एवढी आहे.

**१३. जय हनुमान व्यायाम शाळा, औरंगाबाद यांचा ३१ मार्च २०२० रोजी संपणाऱ्या वर्षाच्या प्राप्ती – शोधन खात्याचा गोषवारा पुढील प्रमाणे आहे.**

**प्राप्ती – शोधन खाते ३१ मार्च २०२० रोजी संपणाऱ्या वर्षाकरिता**

**नावे** **जमा**

| प्राप्ती | | रक्कम ₹ | शोधन | रक्कम ₹ |
|---|---|---|---|---|
| शिल्लक (पुढे आणली) | | ३२,८०० | पगार | ५०,००० |
| वर्गणी | | | विद्युत | १०,५०० |
| २०१८ – १९ | ४,००० | | सामान्य खर्च | २०,००० |
| २०१९ – २० | २,३०,००० | २,३४,००० | देखरेख शुल्क(Maintenances charges) | ४०,००० |
| देणगी | | ६०,००० | करमणुक खर्च | ३५,००० |
| करमणुकीपासून प्राप्ती | | ४०,००० | छपाई व लेखन सामग्री | ७,००० |
| मुदत ठेवीवर व्याज | | ३,००० | २०१८ – १९ चा खर्च | २५,००० |
| प्रवेश शुल्क | | ५०,००० | गुंतवणूक | १,५०,००० |
| गुंतवणुकीपासून उत्पन्न | | १,००० | ८ % मुदत ठेव (वाई-अर्बन बँकमधे) | ५०,००० |
| | | | रोख शिल्लक (पुढे नेली) | ३३,३०० |
| | | ४,२०,८०० | | ४,२०,८०० |

**अतिरिक्त माहिती :**

१) जय हनुमान व्यायाम शाळेचे प्रत्येकी ₹ ५० वार्षिक वर्गणी देणारे ₹ ५,००० सदस्य आहेत.

२) देणे बाकी पगार ₹ १२,०००.

३) १ एप्रिल २०१९ ला संपत्ती मूल्य पुढील प्रमाणे होते.

अ) जमीन व इमारत ₹ ७०,०००

ब) फर्निचर ₹ ४५,०००

वरील संपत्तींवर वार्षिक १० % दराने घसारा आकारा.

४) गुंतवणुकीवरील उपर्जित अप्राप्त उत्पन्न ₹ २,०००

५) प्रवेश शुल्काचे ५० % आणि देणगीच्या ६० % रकमेचे भांडवलीकरण करावयाचे आहे.

**३१ मार्च २०२० ला संपणाऱ्या वर्षाकरिता उत्पन्न – खर्च खाते आणि त्याच तारखेचा ताळेबंद तयार करा.**

**उत्तर :**

**जय हनुमान व्यायाम शाळा, औरंगाबाद यांच्या पुस्तकात**

**उत्पन्न – खर्च खाते ३१ मार्च २०२० रोजी संपणाऱ्या वर्षाकरिता**

**नावे** **जमा**

| खर्च | रक्कम ₹ | रक्कम ₹ | उत्पन्न | रक्कम ₹ | रक्कम ₹ |
|---|---|---|---|---|---|
| पगार | ५०,००० | | वर्गणी | २,३०,००० | |
| (+) देणे बाकी | १२,००० | ६२,००० | (+) येणे बाकी | २०,००० | २,५०,००० |
| विद्युत | | १०,५०० | देणगी | ६०,००० | |
| सामान्य खर्च | | २०,००० | (–) ६०% भांडवल निधीला | ३६,००० | २४,००० |
| देखरेख शुल्क | | ४०,००० | स्थानांतरित | | |
| करमणूक खर्च | | ३५,००० | करमणुकीपासून प्राप्त | | ४०,००० |
| छपाई व लेखन सामग्री | | ७,००० | गुंतवणुकीपासून उत्पन्न | १,००० | |
| घसारा : | | | (+) अप्राप्त | २,००० | ३,००० |
| जमीन व इमारत | ७,००० | | प्रवेश शुल्क | ५०,००० | |
| फर्निचर | ४,५०० | ११,५०० | (–) ५० %भांडवल निधीला | २५,००० | २५,००० |
| वाढावा (उत्पन्नाचे खर्चावरील | | १,६०,००० | स्थानांतरित | | |
| आधिक्य) | | | मुदत ठेवीवर व्याज | ३,००० | |
| | | | (+) येणे बाकी व्याज | १,००० | ४,००० |
| | | ३,४६,००० | | | ३,४६,००० |

**ताळेबंद ३१ मार्च २०२० रोजीचा**

| देयता | रक्कम ₹ | रक्कम ₹ | संपत्ती | रक्कम ₹ | रक्कम ₹ |
|---|---|---|---|---|---|
| देणे बाकी पगार | | १२,००० | रोख शिल्लक | | ३३,३०० |
| भांडवल निधी | | | गुंतवणूक | १,५०,००० | |
| प्रारंभिक शिल्लक : | १,२६,८०० | | (+) उपर्जित अप्राप्त व्याज | २,००० | १,५२,००० |
| (+) ५० % प्रवेश शुल्क | २५,००० | | ८ % मुदत ठेव | ५०,००० | |
| (+) ६० % देणगी | ३६,००० | | (+) अप्राप्त व्याज | १,००० | ५१,००० |
| (+) वाढावा | १,६०,००० | ३,४७,८०० | येणे बाकी वर्गणी | | २०,००० |
| | | | जमीन व इमारत | ७०,००० | |
| | | | (–) घसारा १०% | ७,००० | ६३,००० |
| | | | फर्निचर | ४५,००० | |
| | | | (–) घसारा १०% | ४,५०० | ४०,५०० |
| | | ३,५९,८०० | | | ३,५९,८०० |

**कार्य टीप : भांडवल निधीची निश्चिती**

**ताळेबंद १ एप्रिल २०१९ रोजीचा**

| देयता | रक्कम ₹ | संपत्ती | रक्कम ₹ |
|---|---|---|---|
| खर्चाचे देणे बाकी (२०१८-१९) चा | २५,००० | रोख शिल्लक | ३२,८०० |
| भांडवल निधी (संतुलित रक्कम) | १,२६,८०० | येणे बाकी वर्गणी | ४,००० |
| | | जमीन व इमारत | ७०,००० |
| | | फर्निचर | ४५,००० |
| | १,५१,८०० | | १,५१,८०० |

१४. **येसुबाई महिला मंडळाचा १.०४.२०१८ रोजीचा ताळेबंद आणि ३१ मार्च २०१९ रोजी संपणाऱ्या वर्षाचे प्राप्ती-शोधन खाते खालील प्रमाणे देण्यात आलेला आहे.**

**येसुबाई महिला मंडळाचे पुस्तकात**

**ताळेबंद १ एप्रिल २०१८ रोजीचा**

| देयता | | रक्कम ₹ | संपत्ती | रक्कम ₹ |
|---|---|---|---|---|
| भांडवल निधी | | ३०,००० | रोख शिल्लक | ३,००० |
| अदत्त खर्च | | | बँक शिल्लक | ८,००० |
| पगार | ८,००० | | उपस्कर (Furniture) | २०,००० |
| भाडे | ७,००० | | अप्राप्त वर्गणी | ८,५०० |
| स्टेशनरी | १,००० | १६,००० | ६ % गुंतवणूक | ६,५०० |
| | | ४६,००० | | ४६,००० |

**प्राप्ती – शोधन खाते ३१ मार्च २०१९ रोजी संपणाऱ्या वर्षाकरिता**

**नावे** **जमा**

| प्राप्ती | | रक्कम ₹ | शोधन | रक्कम ₹ |
|---|---|---|---|---|
| शिल्लक (पुढे आणली) | | | भाडे | २५,००० |
| रोख | | ३,००० | स्टेशनरी | ३,००० |
| बँक | | ८,००० | पगार | २२,००० |
| प्रवेश शुल्क | | २८,००० | फर्निचर दुरुस्ती | १,८०० |
| वर्गणी | | | सचिवाचे मानधन | १६,००० |
| २०१७ – १८ | २,००० | | किरकोळ खर्च | २,००० |
| २०१८ – १९ | ४५,००० | | शिल्लक (पुढे नेली) : | |
| २०१९ – २० | ३,००० | ५०,००० | रोख | ८,२०० |
| विविध प्राप्ती | | ५,००० | बँक | १६,००० |
| | | ९४,००० | | ९४,००० |

**अतिरिक्त माहिती :**

१) मागील दोन महिन्याचे भाडे अजून देय (Still due) आहे ₹ ५,०००.

२) ३१ मार्च २०१९ रोजी स्टेशनरी खर्चाचे देणे बाकी ₹ ४५०.

३) वर्गणी चे ₹ ३,००० येणे बाकी आहेत.

४) प्रवेश शुल्काचे भांडवलीकरण करा.

५) उपस्करावर वार्षिक १० % दराने घसारा आकारा.

**आपणास ३१ मार्च २०१९ रोजी संपणाऱ्या वर्षाकरिता उत्पन्न–खर्च खाते आणि त्याच तारखेचा ताळेबंद तयार करावयाचे आहे.**

**येसुबाई महिला मंडळाचे पुस्तकात**

**उत्पन्न –खर्च खाते ३१ मार्च २०१९ रोजी संपणाऱ्या वर्षाकरिता**

**नावे** **जमा**

| खर्च | रक्कम ₹ | रक्कम ₹ | उत्पन्न | रक्कम ₹ | रक्कम ₹ |
|---|---|---|---|---|---|
| भाडे | २५,००० | | प्रवेश शुल्क | २८,००० | |
| (–)२०१७ – १८ चे | ७,००० | | (–) भांडवल निधीला | २८,००० | ——— |
| | १८,००० | | स्थानांतरित | | |
| (+) देणे बाकी | ५,००० | २३,००० | वर्गणी | ४५,००० | |
| स्टेशनरी : | ३,००० | | (+) येणे बाकी | ३,००० | ४८,००० |
| (–) २०१७ – १८ चे | १,००० | | विविध प्राप्ती | | ५,००० |
| | २,००० | | गुंतवणुकीवरील व्याज येणे | | ३९० |
| (+) देणे बाकी | ४५० | २,४५० | बाकी | | |
| पगार | २२,००० | | तूट (Deficit) (खर्चाचे | | ७,८६० |
| (–) २०१७ – १८ चा पगार | ८,००० | १४,००० | उत्पन्नावरील आधिक्य) | | |
| सचिवाचे मानधन | | १६,००० | | | |
| किरकोळ खर्च | | २,००० | | | |
| उपस्करवर घसारा | | २,००० | | | |
| फर्निचर दुरुस्ती | | १,८०० | | | |
| | | **६१,२५०** | | | **६१,२५०** |

ताळेबंद ३१ मार्च २०१९ रोजीचा

| देयता | रक्कम ₹ | रक्कम ₹ | संपत्ती | रक्कम ₹ | रक्कम ₹ |
|---|---|---|---|---|---|
| भांडवल निधी : | | | रोख शिल्लक | | ८,२०० |
| प्रारंभिक शिल्लक | ३०,००० | | बँक शिल्लक | | १६,००० |
| (+) प्रवेश शुल्क | २८,००० | | उपस्कर | २०,००० | |
| | ५८,००० | | (–) १० % घसारा | २,००० | १८,००० |
| (–) तूट | ७,८६० | ५०,१४० | ६ % गुंतवणूक | ६,५०० | |
| देणे बाकी खर्च : | | | (+)व्याज येणे बाकी | ३९० | ६,८९० |
| भाडे | ५,००० | | वर्गणी येणे बाकी : | | |
| स्टेशनरी | ४५० | ५,४५० | २०१७ – १८ (८५००–२०००) | ६,५०० | |
| अगाऊ प्राप्त वर्गणी | | ३,००० | २०१८ – १९ | ३,००० | ९,५०० |
| | | **५८,५९०** | | | **५८,५९०** |

**१५. कृष्णा ज्युनियर कॉलेज, महाबळेश्वर यांचे ३१ मार्च २०२० रोजी संपणाऱ्या वर्षाचे प्राप्ती–शोधन खाते आणि अतिरिक्त माहिती पुढील प्रमाणे आहे.**

**प्राप्ती – शोधन खाते ३१ मार्च २०२० रोजी संपणाऱ्या वर्षाकरिता**

**नावे** **जमा**

| प्राप्ती | रक्कम ₹ | रक्कम ₹ | शोधन | रक्कम ₹ | रक्कम ₹ |
|---|---|---|---|---|---|
| शिल्लक (पुढे आणली) | | | बँक ओव्हर ड्राफ्ट | | २८,५०० |
| रोख | | २३,५०० | शिक्षकांचा पगार | | २,००,००० |
| शिक्षण शुल्क : | | | कार्यालयीन कर्मचाऱ्यांचा पगार | | ४०,००० |
| २०१८ – १९ | ७,००० | | पुस्तकांची खरेदी | | ६०,००० |
| २०१९ – २० | ७०,००० | ७७,००० | (१ – ७ – २०१९ला) | | |
| दंड वसुली | | ४,००० | छपाई व लेखन सामग्री | | ७,००० |
| बँक ठेवीवर व्याज | | २५,५०० | कार्यालय भाडे | | ६,००० |
| प्रवेश शुल्क | | १२,००० | दुरुस्ती | | ३,००० |
| पारितोषिक निधी करिता | | ९०,००० | क्रीडा खर्च | | १,५०० |
| देणगी | | | वार्षिक संमेलन खर्च | | १२,००० |
| सरकारी अनुदान | | १,७३,००० | फर्निचर खरेदी (१–१–२०२०ला) | | ४०,००० |
| | | | शिल्लक (पुढे नेली) | | |
| | | | रोख | २०० | |
| | | | बँक | ६,८०० | ७,००० |
| | | **४,०५,०००** | | | **४,०५,०००** |

**अतिरिक्त माहिती :**

१) चालू वर्षाच्या (२०१९ – २०) शिक्षण शुल्काचे येणे बाकी ₹ १०,०००.

२) प्रवेश शुल्काच्या ५० % रकमेचे भांडवलीकरण करावयाचे आहे.

३) शिक्षकांचे अदत्त पगार ₹ १२,०००.

४) घसाऱ्याची आकारणी करा –
पुस्तकांवर वार्षिक १० % आणि फर्निचर वर वार्षिक १५ % दराने.

५) सरकारी अनुदानाच्या ५० % रकमेचे भांडवलीकरण करावयाचे आहे.

६) १ एप्रिल २०१९ ला संपत्ती व देयता पुढील प्रमाणे होत्या.
इमारत ₹ १८,००,०००, फर्निचर ₹ ७,००,०००, पुस्तके ₹ ५,००,०००, ९ % बँक ठेव (Bank deposit) ₹ ३,००,०००, येणे बाकी शिक्षण शुल्क ₹ ७,०००, बँक ओव्हरड्राफ्ट ₹ २८,५००

**आपणास ३१ मार्च २०२० रोजी संपणाऱ्या वर्षाकरिता उत्पन्न – खर्च खाते आणि त्याच तारखेचा ताळेबंद तयार करावयाचे आहे.**

**उत्तर :**

**कृष्णा ज्युनियर कॉलेज, महाबळेश्वर यांचे पुस्तकात**
**उत्पन्न –खर्च खाते ३१ मार्च २०२० रोजी संपणाऱ्या वर्षाकरिता**

**नावे** **जमा**

| खर्च | रक्कम ₹ | रक्कम ₹ | उत्पन्न | रक्कम ₹ | रक्कम ₹ |
|---|---|---|---|---|---|
| शिक्षकांचा पगार | २,००,००० | | शिक्षण शुल्क | ७०,००० | |
| (+) अदत्त पगार | १२,००० | २,१२,००० | (+) येणे बाकी | १०,००० | ८०,००० |
| कार्यालयीन कर्मचाऱ्यांचा पगार | | ४०,००० | दंड वसुली | | ४,००० |
| छपाई व लेखन सामग्री | | ७,००० | प्रवेश शुल्क | १२,००० | |
| कार्यालय भाडे | | ६,००० | (–) ५०% भांडवल निधीला | ६,००० | ६,००० |
| दुरुस्ती | | ३,००० | स्थानांतरित | | |
| क्रीडा खर्च | | १,५०० | बँक ठेवीवर व्याज | २५,५०० | |
| वार्षिक संमलेन खर्च | | १२,००० | (+) येणे बाकी व्याज | १,५०० | २७,००० |
| घसारा : | | | सरकारी अनुदान | १,७३,००० | |
| १०% पुस्तकांवर | ५४,५०० | | (–) ५०% भांडवल निधीला | ८६,५०० | ८६,५०० |
| १५% फर्निचरवर | १,०६,५०० | १,६१,००० | स्थानांतरित | | |
| | | | तूट (Deficit) | | २,३९,००० |
| | | | (खर्चाच्या उत्पन्नावरील | | |
| | | | आधिक्य) | | |
| | | ४,४२,५०० | | | ४,४२,५०० |

**ताळेबंद ३१ मार्च २०२० रोजीचा**

| देयता | रक्कम ₹ | रक्कम ₹ | संपत्ती | रक्कम ₹ | रक्कम ₹ |
|---|---|---|---|---|---|
| भांडवल निधी : | ३३,०२,००० | | येणे बाकी शिक्षण शुल्क | | १०,००० |
| (+) ५०% प्रवेश शुल्क | ६,००० | | इमारत | | १८,००,००० |
| (+) ५०% सरकारी अनुदान | ८६,५०० | | फर्निचर : | ७,००,००० | |
| | ३३,९४,५०० | | (+) खरेदी | ४०,००० | |
| (−) तूट | २,३९,००० | | | ७,४०,००० | |
| | | ३१,५५,५०० | (−) १५ % घसारा | १,०६,५०० | ६,३३,५०० |
| पारितोषिक निधी देणगी | | ९०,००० | पुस्तके : | ५,००,००० | |
| शिक्षकांच्या पगार देणे बाकी | | १२,००० | (+) खरेदी | ६०,००० | |
| | | | | ५,६०,००० | |
| | | | (−) १० % घसारा | ५४,५०० | ५,०५,५०० |
| | | | ९ % बँक ठेव | ३,००,००० | |
| | | | (+) येणे बाकी व्याज | १,५०० | ३,०१,५०० |
| | | | रोख शिल्लक | | २०० |
| | | | बँक शिल्लक | | ६,८०० |
| | | **३२,५७,५००** | | | **३२,५७,५००** |

**कार्य टीपा :–**

**१) भांडवल निधीची गणना**

**ताळेबंद १ एप्रिल २०१९ रोजीचा**

| देयता | रक्कम ₹ | संपत्ती | रक्कम ₹ |
|---|---|---|---|
| बँक ओव्हरड्राफ्ट | २८,५०० | रोख शिल्लक | २३,५०० |
| भांडवल निधी (संतुलित राशी) | ३३,०२,००० | शिक्षण शुल्काचे येणे बाकी | ७,००० |
| | | इमारत | १८,००,००० |
| | | फर्निचर | ७,००,००० |
| | | पुस्तके | ५,००,००० |
| | | ९ % बँक ठेव | ३,००,००० |
| | **३३,३०,५००** | | **३३,३०,५००** |

**२) पुस्तकांवर घसारा आकारणी**

| | | ₹ |
|---|---|---|
| अ) | वार्षिक १० % दराने ₹ ५,००,००० वर एका वर्षाचे | ५०,००० |
| ब) | वार्षिक १० % दराने ₹ ६०,००० वर ९ महिन्याचे | ४,५०० |
| | एकूण घसारा | ५४,५०० |

३) **फर्निचरवर घसारा निश्चिती** ₹

| | | |
|---|---|---|
| अ) | वार्षिक १५ % दराने ₹ ७,००,००० वर वर्षभराचे | १,०५,००० |
| ब) | वार्षिक १५ % दराने ₹ ४०,००० वर ३ महिन्याचे | १,५०० |
| | एकूण घसारा | १,०६,५०० |

४) **बँक ठेवीवर ९ % वार्षिक दराने व्याजाची आकारणी** ₹

९ % दराने ₹ ३,००,००० ₹ २७,०००

यापैकी ₹ २५,५०० चालू वर्षात मिळाले.

∴ व्याजाचे येणे बाकी =(२७,००० – २५,५००) = ₹ १,५००

**१६. यंग पेन्शनर्स असोसिएशन, लेह चे ३१ मार्च २०२० रोजी संपणाऱ्या वर्षाचे प्राप्ती – शोधन खाते पुढील प्रमाणे आहे.**

**प्राप्ती – शोधन खाते**

**३१ मार्च २०२० रोजी संपणाऱ्या वर्षाकरिता**

**नावे** **जमा**

| प्राप्ती | रक्कम ₹ | रक्कम ₹ | शोधन | रक्कम ₹ | रक्कम ₹ |
|---|---|---|---|---|---|
| शिल्लक (पुढे आणली) | | ७,००० | लेखन सामग्री | | ८,००० |
| वर्गणी : | | | पोस्टेज | | १,००० |
| २०१८ – १९ | ५,००० | | सहल खर्च | | ८,००० |
| २०१९ – २० | ८३,००० | | पगार | | ८,००० |
| २०२० – २१ | २,००० | ९०,००० | वार्षिक सर्वसाधारण सभा खर्च | | ४,५०० |
| प्रवेश शुल्क (भांडवली प्राप्ती) | | १३,००० | प्रवास खर्च | | ७,५०० |
| देणगी | | ६०,००० | भाडे | | १२,००० |
| मृत्युपत्रीत दान (Legacies) | | ४०,००० | धर्मादाय (Charity) | | ७,८०० |
| ठेवीवर व्याज | | ७,००० | विविध खर्च | | ३,२०० |
| सहल शुल्क | | १०,००० | मुदत ठेव | | १,१०,००० |
| | | | उपस्कर (Furniture) | | ५०,००० |
| | | | शिल्लक (पुढे नेली) | | ७,००० |
| | | २,२७,००० | | | २,२७,००० |

**समायोजना :**

१) चालू वर्षाची अप्राप्त वर्गणी ₹ ७,०००.

२) उपस्कराची खरेदी १ ऑक्टोबर २०१९ रोजी करण्यात आली. त्यावर वार्षिक १०% दराने घसारा आकारा.

३) सहल शुल्क येणे बाकी ₹ ७,५००.

४) लेखन सामग्रीचा साठा १-४-२०१९ ला ₹ ३५० आणि ३१ मार्च २०२० ला ₹ १,७०० एवढा होता.

५) मृत्युपत्रीत दानापैकी ५०% रकमेचे आणि देणगीच्या संपूर्ण रकमेचे भांडवलीकरण करा.

**वरील माहितीचे आधारे आपणास ३१ मार्च २०२० रोजी संपणाऱ्या वर्षाचे उत्पन्न – खर्च खाते तयार करावयाचे आहे.**

उत्तर :

**यंग पेन्शनरर्स असोसिएशन, लेह चे पुस्तकात**

**उत्पन्न – खर्च खाते ३१ मार्च २०२० रोजी संपणाऱ्या वर्षाकरिता**

**नावे** **जमा**

| खर्च | रक्कम ₹ | रक्कम ₹ | उत्पन्न | रक्कम ₹ | रक्कम ₹ |
|---|---|---|---|---|---|
| वापरलेली लेखन सामग्री | | | वर्गणी | ८३,००० | |
| वर्ष प्रारंभीची शिल्लक | ३५० | | (+) अप्राप्त | ७,००० | ९०,००० |
| (+) खरेदी | ८,००० | | मृत्युपत्रीत देणगी | ४०,००० | |
| | ८,३५० | | (–) ५०% भांडवल निधीला | २०,००० | २०,००० |
| (–) वर्ष अखेर शिल्लक | १,७०० | ६,६५० | स्थानांतरित | | |
| पोस्टेज | | १,००० | ठेवीवरील व्याज | | ७,००० |
| सहल खर्च (Picnic Exp.) | | ८,००० | सहल प्राप्ती (Picnic | १०,००० | |
| पगार | | ८,००० | Receipts) | | |
| वार्षिक सर्वसाधारण सभा खर्च | | ४,५०० | (+) अप्राप्त | ७,५०० | १७,५०० |
| प्रवास खर्च | | ७,५०० | | | |
| भाडे | | १२,००० | | | |
| धर्मादाय (Charity) | | ७,८०० | | | |
| विविध खर्च | | ३,२०० | | | |
| उपस्करावर घसारा | | २,५०० | | | |
| उत्पन्नाचे खर्चावरील | | ७३,३५० | | | |
| आधिक्य (वाढावा) | | | | | |
| | | **१,३४,५००** | | | **१,३४,५००** |

कार्य टीप :

१) उपस्करावरील घसाऱ्याची निश्चिती –
वार्षिक १० % दराने ₹ ५०,००० वर ६ महिन्याचे = ₹ २,५००.

**सूचना :**

सहल उत्पन्न आणि खर्च हा खालील प्रमाणे देखील दर्शविला जाऊ शकतो. अर्थात उत्पन्न – खर्च खात्याचे जमा बाजूवर सहल प्राप्ती + अप्राप्त राशी यामधून सहल खर्चाची राशी वजा करून उरलेली निव्वळ रक्कम ही सहलीपासूनचे उत्पन्न म्हणून दर्शविता येईल.

| | ₹ | |
|---|---|---|
| सहल प्राप्ती | १०,००० | |
| (+) अप्राप्त | ७,५०० | |
| | १७,५०० | |
| (–) सहल खर्च | ८,००० | ९,५०० |

१७. **समर्थ हॉस्पिटल, सावंतवाडी यांचे ताळेबंद आणि प्राप्ती – शोधन खाते पुढील प्रमाणे आहे.**

**तयार करा – ३१ मार्च २०१८ रोजी संपणाऱ्या वर्षाचे उत्पन्न – खर्च खाते आणि त्याच तारखेचा ताळेबंद.**

**ताळेबंद**

**१ एप्रिल २०१७ रोजीचा**

| देयता | रक्कम ₹ | रक्कम ₹ | संपत्ती | रक्कम ₹ | रक्कम ₹ |
|---|---|---|---|---|---|
| भांडवल निधी | | ८,९८,५०० | रोख शिल्लक | | ५,००० |
| अदत्त पगार | | १५,००० | बँक शिल्लक | | २५,००० |
| औषधींच्या बिलाचे देणे बाकी | | ९,००० | जमीन व इमारत | | ७,००,००० |
| विविध खर्चाचे देणे बाकी | | १,५०० | फर्निचर | | ५०,००० |
| | | | उपस्कर (Equipments) | | १,४०,००० |
| | | | अप्राप्त वर्गणी | | ४,००० |
| | | ९,२४,००० | | | ९,२४,००० |

**प्राप्ती – शोधन खाते**

**३१ मार्च २०१८ रोजी संपणाऱ्या वर्षाकरिता**

**नावे** **जमा**

| प्राप्ती | रक्कम ₹ | शोधन | रक्कम ₹ |
|---|---|---|---|
| शिल्लक (पुढे आणली) : | | औषधी(यामधे मागील वर्षाशी संबंधित देय | ५०,००० |
| रोख | ५,००० | बिल ₹ ९,००० चा समावेश आहे) | |
| बँक | २५,००० | उपकरणांची खरेदी | १,३०,००० |
| वर्गणी (मागील वर्षाची वर्गणी ₹ ४,००० | ९०,००० | कर (Taxes) | ७,२०० |
| चा यामधे समावेश आहे.) | | विविध खर्च (२०१६ – १७चे) | १,५०० |
| फर्निचर विक्री (पुस्तक मूल्य ₹२०,०००) | १५,००० | पगार (मागील वर्षातील देय सामाविष्ट) | ५२,००० |
| देणगी (भांडवली) | ५०,००० | शिल्लक (पुढे नेली) | |
| आजीवन सभासद शुल्क | ३०,००० | रोख | ८,३०० |
| भेट शुल्क (Visit fees) | ५५,००० | बँक | २१,००० |
| | २,७०,००० | | २,७०,००० |

**अतिरिक्त माहिती :**

१) पूर्वदत्त कर ₹ १,०००

२) अदत्त पगार ₹ ८,०००

३) घसारा – जमीन व इमारतीवर वार्षिक १० % व उपकरणांवर ₹ १२,०००

४) अप्राप्त वर्गणी ₹ २०,०००

५) आजीवन सभासद शुल्काच्या ५० % रकमेचे भांडवलीकरण करा.

उत्तर :

**समर्थ हॉस्पीटल, सावंतवाडी यांचे पुस्तकात**
**उत्पन्न – खर्च खाते ३१ मार्च २०१८ रोजी संपणाऱ्या वर्षाकरिता**

नावे जमा

| खर्च | रक्कम ₹ | रक्कम ₹ | उत्पन्न | रक्कम ₹ | रक्कम ₹ |
|---|---|---|---|---|---|
| औषधी | ५०,००० | | वर्गणी | ९०,००० | |
| (–) मागील वर्षाचे देय | ९,००० | ४१,००० | (–) मागील वर्षाची अप्राप्त | ४,००० | |
| पगार | ५२,००० | | | ८६,००० | |
| (–) मागील वर्षाचा देय | १५,००० | | (+)चालू वर्षाची अप्राप्त | २०,००० | १,०६,००० |
| | ३७,००० | | आजीवन सभासद शुल्क | ३०,००० | |
| (+) चालू वर्षाचा देणे बाकी | ८,००० | ४५,००० | (–) ५०% भांडवल निधीला | १५,००० | १५,००० |
| कर | ७,२०० | | स्थानांतरित | | |
| (–) पूर्व दत्त कर | १,००० | ६,२०० | भेट शुल्क | | ५५,००० |
| फर्निचर विक्रीवरील तोटा | | ५,००० | तूट (खर्चाचे उत्पन्नावरील | | ३,२०० |
| (२०,००० – १५,०००) | | | आधिक्य) | | |
| घसारा : | | | | | |
| जमीन व इमारत | ७०,००० | | | | |
| उपकरणांवर | १२,००० | ८२,००० | | | |
| | | १,७९,२०० | | | १,७९,२०० |

**ताळेबंद ३१ मार्च २०१८ रोजीचा**

| देयता | रक्कम ₹ | रक्कम ₹ | संपत्ती | रक्कम ₹ | रक्कम ₹ |
|---|---|---|---|---|---|
| अदत्त पगार | | ८,००० | रोख शिल्लक | | ८,३०० |
| भांडवल निधी : | | | बँक शिल्लक | | २१,००० |
| प्रारंभिक शिल्लक | ८,९८,५०० | | अप्राप्त वर्गणी | | २०,००० |
| (+)५०% आजीवन सभासद शुल्क | १५,००० | | जमीन व इमारत | ७,००,००० | |
| (+) देणगी | ५०,००० | | (−) १०% घसारा | ७०,००० | ६,३०,००० |
| | ९,६३,५०० | | फर्निचर : | | |
| (−) तूट | ३,२०० | ९,६०,३०० | प्रारंभिक शिल्लक | ५०,००० | |
| | | | (−) विक्री | २०,००० | ३०,००० |
| | | | उपकरणे : | | |
| | | | प्रारंभिक शिल्लक | १,४०,००० | |
| | | | (+) खरेदी | १,३०,००० | |
| | | | | २,७०,००० | |
| | | | (−) घसारा | १२,००० | २,५८,००० |
| | | | पूर्वदत्त कर | | १,००० |
| | | ९,६८,३०० | | | ९,६८,३०० |

१८. भाऊराव पाटील पॉलीटेक्नीक कॉलेज, नागपूर ३१ मार्च २०१९ रोजी संपणाऱ्या वर्षाचे प्राप्ती–शोधन खाते आणि अतिरिक्त माहिती पुढील प्रमाणे देण्यात आलेली आहे.

**३१ मार्च २०१९ रोजी संपणाऱ्या वर्षाचे उत्पन्न –खर्च खाते आणि त्याच तारखेचा ताळेबंद तयार करा.**

**प्राप्ती – शोधन खाते**

**३१ मार्च २०१९ रोजी संपणाऱ्या वर्षाकरिता**

**नावे** **जमा**

| प्राप्ती | रक्कम ₹ | शोधन | रक्कम ₹ |
|---|---|---|---|
| शिल्लक (पुढे आणली) : | | पगार : | |
| रोख | १२,००० | शिक्षकांचा | १५,००,००० |
| बँक | २,००,००० | कार्यालय कर्मचाऱ्यांचा | ८,५५,००० |
| व्याज | ६०,००० | छपाई व लेखन सामग्री | २७,००० |
| देणगी | ७,००,००० | पुस्तके | ८८,००० |
| शिक्षण शुल्क | १५,००,००० | फर्निचर (१-१-२०१९ ला खरेदी) | ७८,००० |
| प्रवेश शुल्क | ६५,००० | 'नाटक' खर्च (Drama Expenses) | ९०,००० |
| सत्र शुल्क | ४,००,००० | पोस्टेज | ७,००० |
| नाटक (Drama) पासून प्राप्ती | १,००,००० | टेलीफोन / मोबाईल शुल्क | ६,००० |
| हॉलच्या वापरापासूनचे भाडे | ६,००० | विद्युत (Electricity) | ६१,००० |
| मृत्युपत्राद्‌वारे प्राप्त देणगी (भांडवली) | ६०,००० | नियतकालिके आणि वर्तमानपत्रे खर्च | ६,००० |
| | | शिल्लक (पुढे नेली) | |
| | | रोख | ६२,००० |
| | | बँक | ३,२३,००० |
| | **३१,०३,०००** | | **३१,०३,०००** |

**अतिरिक्त माहिती:**

१)

| तपशील | १/४/२०१८ ₹ | ३१/३/२०१९ ₹ |
|---|---|---|
| पुस्तके | ९,००,००० | ८,८८,००० |
| फर्निचर | ३,२६,००० | ३,००,००० |
| इमारत निधी | ८,२७,००० | ? |
| भांडवल निधी | ६,११,००० | ? |

२) देणगीच्या ६० % रक्कम ही इमारत निधी करिता आहे आणि उरलेली रक्कम हे महसुली उत्पन्न होय.

३) कार्यालयीन कर्मचाऱ्यांचा पगार देणे बाकी (Outstanding Salaries) ₹ ७०,०००.

उत्तर :

**भाऊराव पाटील पॉलीटेक्नीक कॉलेज, नागपूर यांचे पुस्तकात**

**उत्पन्न – खर्च खाते ३१ मार्च २०१९ रोजी संपणाऱ्या वर्षाकरिता**

नावे | जमा

| खर्च | रक्कम ₹ | रक्कम ₹ | उत्पन्न | रक्कम ₹ | रक्कम ₹ |
|---|---|---|---|---|---|
| शिक्षकांचा पगार | | १५,००,००० | व्याज | | ६०,००० |
| कार्यालयीन कर्मचाऱ्यांचा | | | देणगी | ७,००,००० | |
| पगार | ८,५५,००० | | (–) ६० % इमारत निधी | ४,२०,००० | २,८०,००० |
| (+) अदत्त | ७०,००० | ९,२५,००० | करिता | | |
| छपाई व लेखन सामग्री | | २७,००० | शिक्षण शुल्क | | १५,००,००० |
| पोस्टेज | | ७,००० | प्रवेश शुल्क | | ६५,००० |
| टेलिफोन / मोबाईल शुल्क | | ६,००० | सत्र शुल्क | | ४,००,००० |
| विद्युत | | ६१,००० | 'नाटक' पासून प्राप्ती | १,००,००० | |
| नियतकालिके आणि वर्तमान पत्रे | | ६,००० | (–) 'नाटक' खर्च | ९०,००० | १०,००० |
| घसारा | | | हॉलचे भाडे | | ६,००० |
| पुस्तके | १,००,००० | | तूट (खर्चाचे उत्पन्नावरील | | ४,१५,००० |
| फर्निचर | १,०४,००० | २,०४,००० | आधिक्य) | | |
| | | **२७,३६,०००** | | | **२७,३६,०००** |

**ताळेबंद ३१ मार्च २०१९ रोजीचा**

| देयता | रक्कम ₹ | रक्कम ₹ | संपत्ती | रक्कम ₹ | रक्कम ₹ |
|---|---|---|---|---|---|
| भांडवल निधी | ६,११,००० | | पुस्तके | ९,००,००० | |
| (+) मृत्युपत्राद्वारे देणगी | ६०,००० | | (+) खरेदी | ८८,००० | |
| | ६,७१,००० | | | ९,८८,००० | |
| (–) तूट | ४,१५,००० | २,५६,००० | (–) घसारा | १,००,००० | ८,८८,००० |
| ईमारत निधी | ८,२७,००० | | फर्निचर : | ३,२६,००० | |
| (+) देणगी | ४,२०,००० | १२,४७,००० | (+) खरेदी | ७८,००० | |
| कार्यालयीन कर्मचाऱ्यांचा पगार | | ७०,००० | | ४,०४,००० | |
| देणे बाकी | | | (–) घसारा | १,०४,००० | ३,००,००० |
| | | | रोख शिल्लक | | ६२,००० |
| | | | बँक शिल्लक | | ३,२३,००० |
| | | **१५,७३,०००** | | | **१५,७३,०००** |

१९. सुषमा स्वराज मेमोरियल हॉस्पिटल, जळगांव यांनी दिलेल्या पुढील विवरणाच्या आधारे ३१ मार्च २०२० रोजी संपणाऱ्या वर्षाकरिता उत्पन्न – खर्च खाते आणि त्याच तारखेचा ताळेबंद तयार करा.

**प्राप्ती – शोधन खाते**

**३१ मार्च २०२० रोजी संपणाऱ्या वर्षाकरिता**

**नावे** **जमा**

| प्राप्ती | रक्कम ₹ | शोधन | रक्कम ₹ |
|---|---|---|---|
| शिल्लक (पुढे आणली) | १२,००० | फर्निचर | २७,००० |
| वर्गणी | १,००,३०० | औषधी | ७,००० |
| प्रवेश शुल्क (महसुली) | १,७०० | कर्मचाऱ्यांचा पगार | १५,००० |
| आजीवन सभासद शुल्क (महसुली) | १८,००० | चिकित्सकांना मानधन (Honorarium to Doctors) | ८०,००० |
| जुन्या वर्तमानपत्रांची विक्री | ५०० | सामान्य खर्च | ८,००० |
| इमारत निधीकरिता देणगी | १,५०,००० | शस्त्रक्रिया उपकरणे (Surgical Instruments) | ६०,००० |
| | | मुदत ठेव (३१-३-२०२०) | ८०,००० |
| | | शिल्लक (पुढे नेली) | ५,५०० |
| | **२,८२,५००** | | **२,८२,५००** |

**अतिरिक्त माहिती :**

| तपशील | १/४/२०१९ ₹ | ३१/३/२०२० ₹ |
|---|---|---|
| अप्राप्त वर्गणी | ९,००० | १०,००० |
| पूर्वप्राप्त वर्गणी | ८,००० | ६,००० |
| इमारत | १३,००,००० | १३,००,००० |
| गुंतवणूक | २,००,००० | २,००,००० |
| भांडवल निधी | १०,१३,००० | ? |
| इमारत निधी | ५,००,००० | ? |

**उत्तर :**

**सुषमा स्वराज मेमोरीयल हॉस्पिटल, जळगाव यांचे पुस्तकात**

**उत्पन्न – खर्च खाते ३१ मार्च २०२० रोजी संपणाऱ्या वर्षाकरिता**

**नावे** **जमा**

| खर्च | रक्कम ₹ | रक्कम ₹ | उत्पन्न | रक्कम ₹ | रक्कम ₹ |
|---|---|---|---|---|---|
| औषध | | ७,००० | वर्गणी (कार्य टीप प्रमाणे) | | १,०३,३०० |
| चिकित्सकांचे मानधन | | ८०,००० | प्रवेश शुल्क | | १,७०० |
| कर्मचाऱ्यांचा पगार | | १५,००० | आजीवन सभासद शुल्क | | १८,००० |
| सामान्य खर्च | | ८,००० | जुन्या वर्तमानपत्रांची विक्री | | ५०० |
| वाढावा (उत्पन्नावरील खर्चाचे अधिक्य) | | १३,५०० | | | |
| | | **१,२३,५००** | | | **१,२३,५००** |

**ताळेबंद ३१ मार्च २०२० रोजीचे**

| देयता | रक्कम ₹ | रक्कम ₹ | संपत्ती | रक्कम ₹ | रक्कम ₹ |
|---|---|---|---|---|---|
| भांडवल निधी | १०,१३,००० | | गुंतवणूक | | २,००,००० |
| (+) वाढावा | १३,५०० | १०,२६,५०० | इमारत | | १३,००,००० |
| इमारत निधी | ५,००,००० | | फर्निचर | | २७,००० |
| (+) देणगी मिळाली | १,५०,००० | ६,५०,००० | शस्त्रक्रिया उपकरणे | | ६०,००० |
| पूर्वप्राप्त वर्गणी | | ६,००० | मुदत ठेव | | ८०,००० |
| | | | अप्राप्त वर्गणी | | १०,००० |
| | | | रोख शिल्लक | | ५,५०० |
| | | १६,८२,५०० | | | १६,८२,५०० |

**कार्य टीप : चालू वर्षाच्या वर्गणीपासूनच्या उत्पन्नाचे आगणन**

| तपशील | ३१/३/२०१८ ₹ |
|---|---|
| प्राप्ती – शोधन खात्याप्रमाणे एकूण प्राप्त राशी | १,००,३०० |
| (+) चालू वर्षाची अप्राप्त | १०,००० |
| | १,१०,३०० |
| (–) मागील वर्षातील अप्राप्त चालू वर्षात मिळाली | ९,००० |
| | १,०१,३०० |
| (+) मागील वर्षामधील पूर्वप्राप्त | ८,००० |
| | १,०९,३०० |
| (–) चालू वर्षामध्ये अगाऊ मिळालेली उत्पन्न–खर्च खात्यामध्ये वर्गणी उत्पन्न | ६,००० |
| | १,०३,३०० |

## स्वाध्याय : २

**प्रश्न १ : वस्तुनिष्ठ स्वरूपाचे प्रश्न :**

**अ) खाली दिलेल्या पर्यायांमधून योग्य पर्यायाची निवड करा.**

१. नफा न कमविणाऱ्या संस्था ह्या जनतेला मोठ्या प्रमाणात ............. सेवा प्रदान करतात.
अ) वाणिज्यिक ब) सामाजिक क) व्यक्तीगत ड) समूह /गट(Group)

२. शिष्यवृत्ती निधी करिता देणगी ही ............. आहे.
अ) भांडवली प्राप्ती ब) महसुली प्राप्ती
क) भांडवली खर्च ड) महसुली खर्च

३. उत्पन्न खर्च खाते हे ...........आहे.
अ) भांडवल खाते ब) वास्तविक खाते क) वैयक्तिक खाते ड) नामधारी खाते

४. वर्षाच्या शेवटी येणे बाकी (अप्राप्त) वर्गणी ही ...........चे प्रतिनिधित्व करते.
अ) देयता ब) खर्च क) संपत्ती ड) भांडवल निधी

५. चालू लेखा वर्षात (Accounting year) अगाऊ मिळालेली वर्गणी हे एक ...........आहे.
अ) उत्पन्न ब) खर्च क) संपत्ती ड) देयता

६. उत्पन्नाचे खर्चावरिल आधिक्यास ........... असे म्हणतात.
अ) तूट(Deficit) ब) नफा(Profit) क) वाढावा(Surplus) ड) तोटा (Loss)

७. नफा न कमविणारी संस्था ही नफा तोटा खाते ऐवजी .............. खाते तयार करते.
अ) व्यापार खाते ब) उत्पन्न - खर्च खाते
क) रोख खाते ड) प्राप्ती-शोधन खाते

८. प्राप्ती - शोधन खात्याची शेवटची शिल्लक ही सामान्यतः .......चे प्रतिनिधित्व करते.
अ) अखेरचा माल साठा ब) रोख बँक शिल्लक क) वाढवा ड) तूट

९. नफा न कमविणाऱ्या संस्थांना ............ संस्था असे देखील म्हटले जाते.
अ) सेवा ब) व्यापारिक क)नफा कमविणारी ड) वाणिज्यिक

१०. इमारत खरेदीवरील खर्च हा ..........खर्च आहे.
अ) भांडवली ब) महसुली क) सामान्य ड) आवर्ती

**ब) पुढील विधानाकरिता एक शब्द / संज्ञा किंवा शब्द समूह द्या .**

१. अशी संस्था जी सेवा पुरविण्याकरिता स्थापन झालेली असते.
२. नफा न कमविणाऱ्या संस्थेद्वारे नफा-तोटा खाते ऐवजी तयार करण्यात येणारे खाते.
३. विशिष्ट उद्देशासाठी प्राप्त झालेली देणगी.
४. अशी प्राप्ती जी आवर्ती स्वरूपाची नसते.
५. नफा न कमविणाऱ्या संस्थेचे असे खाते ज्या मधे केवळ महसुली पदांचीच (Revenue items) नोंद करण्यात येते.
६. नफा न कमविणाऱ्या संस्थेचे असे खाते ज्या मधे केवळ रोख व्यवहारांचीच नोंद करण्यात येते.
७. असे उत्पन्न जे चालू वर्षात मिळविले (Earned) परंतु ते चालू वर्षात प्राप्त झाले नाही.
८. उत्पन्न - खर्च खात्याची जमा शिल्लक.
९. नफा न कमविणाऱ्या संस्थेच्या एकूण संपत्तीचे एकूण देयतांवर असलेले आधिक्य.
१०. अशा सर्व प्राप्ती ज्या अनावर्ती स्वरूपाच्या असतात आणि त्या संस्थेला नियमित उत्पन्न प्रदान करीत नाहीत.

**क) पुढील विधाने बरोबर की चूक ते सकारण सांगा :.**

१. नफा न मिळविणे हा नफा न कमविणाऱ्या संस्थांचा हेतू होय.
२. धर्मादाय संस्था (Charitable Institutions) ह्या प्रत्येक आर्थिक वर्षाच्या शेवटी नफा-तोटा खाते तयार करतात.
३. प्राप्ती-शोधन खाते आणि उत्पन्न-खर्च खाते यामधे कोणताही फरक नाही.
४. उत्पन्न-खर्च खाते हे 'वाढावा' (Surplus) किंवा तूटीचे (Deficit) चे प्रतिनिधित्व करते.
५. प्राप्ती-शोधन खात्याला कोणतीही सुरुवातीची (प्रारंभिक) शिल्लक (Opening Balance) नसते.
६. नफा न कमविणारी संस्था ताळेबंद तयार करीत नाहीत.
७. क्रीडा उपकरणांची खरेदी हा भांडवली खर्च आहे.
८. उत्पन्न-खर्च खाते हे 'वास्तविक खाते'(Real Account) आहे.
९. प्राप्ती-शोधन खात्यामधे केवळ चालू वर्षाशी संबंधित असलेल्या व्यवहारांचाच अंतर्भाव करण्यात येतो.
१०. संपत्तीचे देयतेवरील आधिक्याला भांडवल निधी असे म्हणतात.

### ड) रिकाम्या जागा भरा

१. नफा न कमविणाऱ्या संस्था ह्या ............ कार्यात गुंतलेल्या नसतात.
२. नफा न कमविणाऱ्या संस्थांना ............. संस्था असे देखील म्हणतात.
३. प्राप्ती-शोधन खाते हे ............. खात्याचे श्रेणीमधे येते.
४. प्राप्ती-शोधन खात्यामधे ............. व्यवहारांच्या सारांशाची नोंद केली जाते.
५. उत्पन्न-खर्च खाते हे व्यापारिक संस्थेच्या .......... खात्यासरखे असते.
६. प्राप्ती-शोधन खात्याचे जमा बाजूवर रोख ......... दर्शविले जाते.
७. उत्पन्न-खर्च खाते हे ........... खाते आहे.
८. मुंबई विद्यापीठ हे नफा-तोटा खाते ऐवजी ........... खाते तयार करते.
९. एखाद्या क्लब (Club) च्या जुन्या फर्निचरच्या विक्रीपासून मिळणारी रक्कम ही ............होय.
१०. उत्पन्न-खर्च खात्यामधे नोंदण्यात येणारे व्यवहार हे फक्त ............वर्षाशी संबंधित असतात.

### इ) केवळ एका वाक्यात उत्तरे द्या.

१. नफा न कमविणारी संस्था यापासून आपणास काय अर्थ बोध होतो?
२. कोणत्या प्रकारच्या संस्था ह्या उत्पन्न - खर्च खाते तयार करतात?
३. प्राप्ती-शोधन म्हणजे काय?
४. उत्पन्न आणि खर्च खाते का तयार केले जाते?
५. भांडवल निधी म्हणजे काय?
६. वर्गणी म्हणजे काय?
७. मृत्यु पत्राद्वारे प्राप्त देणगी (Legacy) म्हणजे काय?
८. वाढावा (Surplus) म्हणजे काय?
९. अनावर्ती (Non-Recurring) खर्चापासून आपणास काय अर्थबोध होतो?
१०. वाढावा (Surplus) किंवा तूट (Deficit) कोणत्या खात्याला स्थानांतरित करण्यात येते?

### फ) तक्ता पूर्ण करा (Complete the Table)

१)

| अ.क्र. | उत्पन्न ₹ | खर्च ₹ | वाढावा/तोटा (Surplus/Deficit) ₹ |
|---|---|---|---|
| १ | १०,००० | ? | ५,००० (तूट) |
| २ | ८,००० | ? | ४,००० (वाढावा) |
| ३ | ? | १५,००० | ८,००० (वाढावा) |
| ४ | ७,५०० | ९,००० | ? |
| ५ | १५,००० | ११,३०० | ? |

२) चालू वर्षामध्ये देण्यात आलेला पगार

| अ.क्र. | एकूण ₹ | पूर्वदत्त / अदत्त (Prepaid / Outstanding) | खर्च ₹ | संबंधित वर्षाचा खर्च (Expenditure for the year) |
|---|---|---|---|---|
| १ | १,१०० | पूर्वदत्त | १०० | ? |
| २ | २,७०० | पूर्वदत्त | ? | २,००० |
| ३ | ८,२५० | पूर्वदत्त | ? | ६,६५० |
| ४ | १,२०० | अदत्त | २०० | ? |
| ५ | ? | अदत्त | ६०० | ५,१०० |
| ६ | १,८०० | अदत्त | ? | २,२०० |

३) चालू वर्षातील प्राप्त भाडे

| अ.क्र. | एकूण प्राप्ती ₹ | आगाऊ मिळालेले भाडे/उपर्जित अप्राप्त (Rent received in Advance/Accrued) | ₹ | संबंधित वर्षाचे उत्पन्न (Income for the year) ₹ |
|---|---|---|---|---|
| १ | १,३०० | अगाऊ मिळालेले (पूर्वप्राप्त) | २०० | ? |
| २ | ? | अगाऊ मिळालेले (पूर्वप्राप्त) | ४०० | १,४०० |
| ३ | २,६५० | अगाऊ मिळालेले (पूर्वप्राप्त) | ? | २,००० |
| ४ | ? | उपर्जित अप्राप्त | २९० | ३,१९० |
| ५ | १,७०० | उपर्जित अप्राप्त | ? | २,१५० |
| ६ | २,६०० | उपर्जित अप्राप्त | ५०० | ? |

**ग) खालील बाबींची गणना करा.**

१. १० % घसारा आकारा फर्निचरवर ₹ ५०,००० (तीन महिन्यासाठी)

२. १२ % व्याज ₹ ८०,००० बँक कर्ज १ वर्षासाठी.

३. लेखन सामग्रीचा प्रारंभिक साठा ₹ ५,०००, लेखन सामग्रीची खरेदी ₹ ७,०००
लेखन सामग्रीचे बिल देणे बाकी ₹ १२,०००, लेखन सामग्रीचा अखेरचा साठा (Closing Stock) ₹ १,०००
यावरून उपयोगात आलेली लेखन सामग्री (Consumed Stationery) किती?

४. पगार ₹ १०,०००, पगार देणे बाकी ₹ ५,०००, उत्पन्न – खर्च खात्यामधे नावे टाकण्यात येणाऱ्या पगाराची गणना करा.

५. ग्रंथालय पुस्तके = ₹ ................? वजा १० % घसारा ₹ ५,००० = ₹ ४५,०००

**ह) गटात न बसणारा शब्द ओळखा (Find odd one).**

१. व्यापार खाते, नफा तोटा खाते, प्राप्ती – शोधन खाते, ताळेबंद.

२. यंत्रसामग्री, फर्निचर, संगणक, पगार

३. वर्गणी, लेखन सामग्री, व्याज मिळाले, लॉकर भाडे मिळाले.

४. रिलायन्स उद्योग, वेण्णा विद्या मंदिर, लक्ष्मी हॉस्पिटल, मनोज स्पोर्टस क्लब.

५. वाढावा, तूट, शुद्ध नफा, भांडवल निधी.

## प्रात्यक्षिक उदाहरणे

### १. चालू वर्षामध्ये वापरलेल्या लेखन सामग्रीची निश्चिती करा.

**ताळेबंद ०१.०४.२०१८ रोजीचा**

| देयता | रक्कम ₹ | रक्कम ₹ | संपत्ती | रक्कम ₹ | रक्कम ₹ |
|---|---|---|---|---|---|
| | | | लेखन सामग्री | | ४०० |
| | | | | | |

**प्राप्ती–शोधन खाते ३१.०३.२०१९ रोजी संपणाऱ्या वर्षाकरिता**

**नावे** **जमा**

| प्राप्ती | रक्कम ₹ | रक्कम ₹ | शोधन | रक्कम ₹ | रक्कम ₹ |
|---|---|---|---|---|---|
| | | | लेखन सामग्रीची खरेदी | | ६,३०० |

**समायोजना :**

१) लेखन सामग्री बिलाचे देणे बाकी ₹ १,०००.

२) ३१.०३.२०१९ ला लेखन सामग्री साठ्याची किंमत ₹ १,८००.

**वरील माहितीच्या आधारे चालू वर्षात वापरलेल्या लेखन–सामग्रीच्या रकमेची गणना (calculate) करा आणि संस्थेच्या अंतिम खात्यांमध्ये प्रस्तुतीकरण करा.**

**उत्तर :** चालू वर्षामध्ये वापरात आलेली लेखन सामग्री ₹ ५,९००

### २ : केवळ वर्गणीचे प्रस्तुतीकरण करा.

**ताळेबंद**

**०१.०४.२०१८ रोजीचा**

| देयता | रक्कम ₹ | रक्कम ₹ | संपत्ती | रक्कम ₹ | रक्कम ₹ |
|---|---|---|---|---|---|
| अगाऊ मिळालेली (पूर्वप्राप्त) | | | अप्राप्त वर्गणी : | | |
| वर्गणी २०१८ – १९ची | | २०,००० | २०१६ – १७ | २६,००० | |
| | | | २०१७ – १८ | ३५,००० | ६१,००० |

**प्राप्ती–शोधन खाते**

**३१.०३.२०१९ रोजी संपणाऱ्या वर्षाकरिता**

**नावे** **जमा**

| प्राप्ती | रक्कम ₹ | रक्कम ₹ | शोधन | रक्कम ₹ | रक्कम ₹ |
|---|---|---|---|---|---|
| वर्गणी | | | | | |
| २०१६ – १७ | २३,००० | | | | |
| २०१७ – १८ | ३०,००० | | | | |
| २०१८ – १९ | ४,१०,००० | | | | |
| २०१९ – २० | २१,००० | ४,८४,००० | | | |

**समायोजना :**

२०१८ – १९ ची येणे बाकी वर्गणी ₹ ३२,०००.

**वरील माहितीचे आधारे ३१.०३.२०१९ रोजी संपणाऱ्या वर्षाकरिता उत्पन्न–खर्च खात्यामधे आणि त्याच तारखेच्या ताळेबंदात वर्गणी या पदाचे प्रस्तुतीकरण करा.**

**उत्तरे :** i) २०१८–१९ या वर्षाची एकूण वर्गणी ₹ ४,६२,०००

ii) ३१.०३.२०१९ ला एकूण अप्राप्त वर्गणी ' ४०,००० (₹ ३,००० + ₹ ५,००० + ₹ ३२,०००)

iii) ३१.०३.२०१९ ला पूर्वप्राप्त वर्गणी (२०१९ – २०ची) ₹ २१,०००

३.

**प्राप्ती – शोधन खाते ३१.०३.२०१८ रोजी संपणाऱ्या वर्षाकरिता**

**नावे** **जमा**

| प्राप्ती | रक्कम ₹ | रक्कम ₹ | शोधन | रक्कम ₹ | रक्कम ₹ |
|---|---|---|---|---|---|
| वर्गणी : | | | | | |
| २०१६ – १७ | २,००० | | | | |
| २०१७ – १८ | ६०,००० | | | | |
| २०१८ – १९ | ४,५०० | ६६,५०० | | | |

**समायोजना :**

२०१७ – १८ या वर्षाची अप्राप्त वर्गणी ₹ ६,०००.

मागील वर्षामधे २०१७ – १८ ची अगाऊ मिळालेली वर्गणी ₹ २,०००.

२०१६ – २०१७ ची येणे बाकी वर्गणी ₹ २,५००

**वरील माहितीचे आधारे ३१.०३.२०१८ रोजी संपणाऱ्या वर्षाकरिताच्या उत्पन्न–खर्च खात्यामधे आणि त्याच तारखेच्या ताळेबंदात वर्गणी या पदाचे प्रस्तुतीकरण करा.**

**उत्तर :** २०१७–१८ ची एकूण वर्गणी ₹ ६८,०००

४. **(केवळ उत्पन्न–खर्च खाते तयार करणे)**

**सातारा स्पोर्टस क्लब, सातारा यांचे प्राप्ती–शोधन खाते पुढील प्रमाणे दिलेले आहे. त्यावरून ३१ मार्च २०१९ रोजी संपणाऱ्या वर्षाचे उत्पन्न–खर्च खाते तयार करा.**

**प्राप्ती–शोधन खाते ३१.०३.२०१९ रोजी संपणाऱ्या वर्षाकरिता**

**नावे** **जमा**

| प्राप्ती | रक्कम ₹ | रक्कम ₹ | शोधन | रक्कम ₹ | रक्कम ₹ |
|---|---|---|---|---|---|
| शिल्लक (पुढे आणली) | | | वेतन (Salaries) | | ५,००० |
| रोख | ४,५०० | | भाडे (यामधे २०१७ – १८ चे | | ५,००० |
| बँक | १२,००० | १६,५०० | ₹ २,०००समाविष्ट आहेत) | | |
| वर्गणी : | | | विद्युत शुल्क | | १,४५० |
| २०१७ – १८ | ४,००० | | मुदत ठेव | | ६०,००० |
| २०१८ – १९ | ४४,५०० | | छपाई व लेखन सामग्री | | ७५० |
| २०१९ – २० | ३,५०० | ५२,००० | सामान्य खर्च (यामध्ये ₹ ५०० पुढील | | ५,५०० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| प्रवेश शुल्क | | ८,००० | वर्षाशी संबंधित आहे) | | |
| इमारत निधीकरीता देणगी | | ७०,००० | क्रीडा सामग्रीची खरेदी | | ४०,००० |
| व्याज | | ६०० | शिल्लक (पुढे नेली) | | |
| फर्निचर विक्री | | ४,५०० | रोख | ८,९०० | |
| (पुस्तकी मूल्य ₹ ८०००) | | | बँक | २५,००० | ३३,९०० |
| | | **१,५१,६००** | | | **१,५१,६००** |

**समायोजना :**

१) चालू वर्षाची अप्राप्त वर्गणी ₹ ४,५००

२) चालू वर्षाचे देणे बाकी भाडे ₹ १,०००

३) प्रवेश शुल्काची रक्कम महसुली उत्पन्न म्हणून समजण्यात यावे.

४) क्रीडा सामग्रीचा साठा

०१.०४.२०१८ ला ₹ ६,००० आणि

३१.०३.२०१९ ला ₹ १४,०००

**उत्तर :** वाढवा (Surplus) ₹ ५,९००

**५. "भारतीय कला केंद्र", सोलापूर यांनी ३१ मार्च २०१८ रोजी संपणाऱ्या वर्षाची माहिती पुढील प्रमाणे दिली आहे. त्यावरून ३१ मार्च २०१८ रोजी संपणाऱ्या वर्षाकरिताचे उत्पन्न खर्च खाते तयार करा.**

**प्राप्ती – शोधन खाते ३१.०३.२०१८ रोजी संपणाऱ्या वर्षाकरिता**

**नावे** **जमा**

| प्राप्ती | रक्कम ₹ | शोधन | रक्कम ₹ |
|---|---|---|---|
| शिल्लक (पुढे आणली) | | लेखन सामग्री | ६०० |
| रोख | २०० | फर्निचर खरेदी | ७,००० |
| बँक | १२,५०० | सरकारी प्रतिभूतींमधे गुंतवणूक | १४,००० |
| लॉकरचे भाडे | ४०० | 'नाटक' संबंधी खर्च | ३,००० |
| प्रवेश शुल्क | २,९०० | पोस्टेज | ४५० |
| जुन्या वर्तमानपत्रांची विक्री | २५० | नियतकालिके आणि वर्तमानपत्रे | ६०० |
| 'नाटक' पासून प्राप्ती | ९,००० | पगार | ४,४०० |
| मृत्युपत्राद्वारे देणगी | १२,००० | शिल्लक (पुढे नेली) | |
| सरकारी प्रतिभूतीपासून व्याज | ४०० | रोख | ७०० |
| किरकोळ खर्च | ४०० | बँक | ७,३०० |
| | **३८,०५०** | | **३८,०५०** |

**अतिरिक्त माहिती :**

१) मृत्युपत्रित देणगीचे भांडवलीकरण करा.

२) देणे बाकी पगार ₹ २००

३) प्रवेश शुल्काच्या ५० % रकमेचे भांडवलीकरण करा.

**उत्तर :** वाढवा (Surplus) ₹ २,६५०

६.	(धर्मादाय हॉस्पिटलचे खाते)

"राधा–कृष्ण चॅरीटेबल हॉस्पीटल", नागपूरची माहिती पुढील प्रमाणे दिलेली आहे. त्याआधारे ३१ मार्च २०२० रोजी संपणाऱ्या वर्षाकरिता उत्पन्न खर्च खाते आणि त्याच तारखेचा ताळेबंद तयार करा.

**प्राप्ती – शोधन खाते ३१.०३.२०२० रोजी संपणाऱ्या वर्षाकरिता**

**नावे** 	**जमा**

| प्राप्ती | रक्कम ₹ | शोधन | रक्कम ₹ |
|---|---|---|---|
| शिल्लक (पुढे आणली) : रोख | ८,२३० | औषध खरेदी | ४१,००० |
| वर्गणी | ५२,००० | सामान्य खर्च | १,०५० |
| देणगी (सामान्य) | १७,५०० | वेतन (Salaries) | २३,५०० |
| गुंतवणुकीवर व्याज | १०,००० | लेखन सामग्री | २,००० |
| चॅरीटी शोपासून उत्पन्न | ८,५३० | चॅरीटी शो खर्च | ५५० |
| | | शस्त्रक्रिया आणि दवाखाना खर्च | ४,२०० |
| | | उपकरणे | १०,००० |
| | | शिल्लक (पुढे नेली) | |
| | | रोख ९६० | |
| | | बँक १३,००० | १३,९६० |
| | **९६,२६०** | | **९६,२६०** |

**अतिरिक्त माहिती :**

| तपशील | ०१.०४.२०१९ ₹ | ३१.०३.२०२० ₹ |
|---|---|---|
| अप्राप्त वर्गणी | ३१० | ३५० |
| पूर्वप्राप्त वर्गणी | ६०० | १५० |
| औषध साठा | ८,००० | ११,००० |
| उपकरणांचे अनुमानित मूल्य | १५,००० | ? |
| इमारत | ४०,००० | ? |
| भांडवल निधी | १,७०,९४० | ? |
| १० % गुंतवणूक | १,००,००० | ? |

**घसारा आकारा –** उपकरणांवर ₹ १,९०० इमारतीवर ₹ १,५००

**उत्तर :** वाढवा ₹ १५,८२०, ताळेबंद ₹ १,८६,९१०

७. **पवन – पुत्र हनुमान व्यायाम शाळा, परभणी प्राप्ती–शोधन खात्याचे व्यवहार आणि समायोजना पुढील प्रमाणे आहेत. त्याआधारे ३१ मार्च २०१९ रोजी संपणाऱ्या वर्षाकरिता उत्पन्न–खर्च खाते आणि त्याच तारखेचा ताळेबंद तयार करा.**

**प्राप्ती – शोधन खाते ३१ मार्च २०१९ रोजी संपणाऱ्या वर्षाकरिता**

**नावे** **जमा**

| प्राप्ती | | रक्कम ₹ | शोधन | | रक्कम ₹ |
|---|---|---|---|---|---|
| शिल्लक (पुढे आणली) : रोख | | ५,००० | पगार | | ६,००० |
| वर्गणी | | | मनोरंजन खर्च | | २,४८० |
| २०१८ – १९ | १८,००० | | विविध खर्च | | १,३०० |
| २०१९ – २० | ४१० | १८,४१० | विद्युत शुल्क | | १,२०० |
| देणगी | | ६,००० | भाडे | | ७०० |
| मनोरंजनापासून प्राप्ती | | ५,४०० | गुंतवणूक | | १५,००० |
| व्याज | | ४०० | छपाई व लेखन सामग्री | | ८०० |
| प्रवेश शुल्क | | ६,२०० | पोस्टेज | | ३,२०० |
| | | | मुदत ठेव | | ३,९०० |
| | | | शिल्लक (पुढे नेली) | | |
| | | | रोख | ८३० | |
| | | | बँक | ६,००० | ६, ८३० |
| | | **४१,४१०** | | | **४१,४१०** |

**समायोजना :**

१) संस्थेचे प्रत्येकी ₹ ५० वार्षिक वर्गणी देणारे ५,००० सभासद आहेत.

२) पगाराचे देणे बाकी ₹ १,२००

३) ०१.०४.२०१८ ला संपत्ती पुढील प्रमाणे आहेत : इमारत ₹ ५०,०००, फर्निचर ₹ १५,०००

४) इमारत आणि फर्निचर वर क्रमशः वार्षिक ५ % आणि १० % दराने घसारा आकारा.

५) ५० % प्रवेश फी चे भांडवलीकरण करा.

६) गुंतवणुकीवर वार्षिक ५ % दराने ६ महिन्याचे व्याज येणे आहे.

७) ०१.०४.२०१८ चा भांडवल निधी ₹ ७०,०००.

**उत्तर :** वाढवा ₹ १९,३९५, ताळेबंद ₹ ९४, १०५

८. (नव्याने प्रारंभ केलेले कला मंडळ)

**नव्याने प्रारंभ झालेल्या "जीवन ज्योती कला मंडळ" या संस्थेने खालीलप्रमाणे माहिती सादर केली.**

**प्राप्ती – शोधन खाते ३१ मार्च २०१८ रोजी संपणाऱ्या वर्षाकरिता**

**नावे** **जमा**

| प्राप्ती | रक्कम ₹ | रक्कम ₹ | शोधन | रक्कम ₹ | रक्कम ₹ |
|---|---|---|---|---|---|
| प्रवेश फी | | २२,००० | फर्निचर | | १२,००० |
| वर्गणी | | ४०,००० | स्टेशनरी | | ४,००० |
| देणगी | | १८,००० | कार्यालय भाडे | | २,६०० |
| | | | वर्तमानपत्रे व नियतकालिके | | ३०० |
| | | | टेलिफोन खर्च | | ५६० |
| | | | गुंतवणूक | | २३,००० |
| | | | शिल्लक (पुढे नेली) | | |
| | | | रोख | ७,५४० | |
| | | | बँक | ३०,००० | ३७,५४० |
| | | ८०,००० | | | ८०,००० |

**समायोजना :**

१) या वर्षाची अप्राप्त वर्गणी ₹ ५,०००.

२) फर्निचरवर वार्षिक १० % दराने घसारा आकारा.

३) प्रवेश शुल्काच्या संपूर्ण रकमेचे आणि देणगीच्या ५० % रकमेचे भांडवलीकरण करा.

**आपणास ३१ मार्च २०१८ रोजी संपणाऱ्या वर्षाकरिता उत्पन्न–खर्च खाते आणि त्याच तारखेचा ताळेबंद तयार करा.**

**उत्तर :** वाढवा ₹ ४५,३४०, ताळेबंदाची बेरीज ₹ ७६,३४०

९ **"विठाई महिला मंडळ," पंढरपूरचे ३१ मार्च २०१८ रोजी संपणाऱ्या वर्षाचे प्राप्ती–शोधन खाते खाली दिले आहे. ३१.०३.२०१८. रोजी संपणाऱ्या वर्षाचे उत्पन्न–खर्च खाते आणि त्याच तारखेचा ताळेबंद तयार करा.**

**प्राप्ती – शोधन खाते**

**३१ मार्च २०१८ रोजी संपणाऱ्या वर्षाकरिता**

**नावे** **जमा**

| प्राप्ती | रक्कम ₹ | रक्कम ₹ | शोधन | रक्कम ₹ | रक्कम ₹ |
|---|---|---|---|---|---|
| शिल्लक (पुढे आणली) | | | स्टेशनरी | | ६,००० |
| रोख | ३,००० | | फर्निचर दुरुस्ती | | ९५० |
| बँक | २०,००० | २३,००० | भाडे | | ८,३०० |
| प्रवेश शुल्क | | ३,५०० | पगार | | १५,००० |
| वर्गणी | | १९,००० | किरकोळ खर्च | | ४५० |
| किरकोळ प्राप्ती | | ८५० | शिल्लक (पुढे नेली) : | | |
| | | | रोख | १,६५० | |
| | | | बँक | १४,००० | १५,६५० |
| | | ४६,३५० | | | ४६,३५० |

**समायोजना :**

१) ०१.०४.२०१७ ला भांडवल निधी ₹ ९०,००० होती.

२) अप्राप्त वर्गणी ₹ ४,०००

३) प्रवेश शुल्काचे भांडवलीकरण करावयाचे आहे.

४) दिलेल्या भाड्याच्या रकमेमधे एप्रिल २०१८ च्या भाड्याचा समावेश आहे ₹ ८००.

५) ०१.०४.२०१७ ला संपत्ती व देयता पुढील प्रमाणे आहेत.
फर्निचर ₹ ९,०००, इमारत ₹ ७०,०००, विविध धनको ₹ १२,०००

**उत्तर :** तूट ₹ ६,०५०, ताळेबंदाची बेरीज ₹ ९९,४५०

१०. **"K.B.P. इंजिनिअरिंग कॉलेज" नासिकचे ३१.०३.२०१९ रोजी संपणाऱ्या वर्षाचे प्राप्ती-शोधन खाते आणि अतिरिक्त माहिती पुढील प्रमाणे आहे.**

**३१.०३.२०१९. रोजी संपणाऱ्या वर्षाचे उत्पन्न-खर्च खाते आणि त्याच तारखेचा ताळेबंद तयार करा.**

**प्राप्ती - शोधन खाते ३१ मार्च २०१९ रोजी संपणाऱ्या वर्षाकरिता**

**नावे** **जमा**

| प्राप्ती | रक्कम ₹ | शोधन | रक्कम ₹ |
|---|---|---|---|
| शिल्लक (पुढे आणली) : | | शिक्षक कर्मचारी पगार | ११,७०,००० |
| रोख | १८,००० | विद्युत शुल्क | ५५,००० |
| बँक | १,००,४०० | पुस्तके | ६१,००० |
| व्याज | ५५,००० | फर्निचर | ५१,००० |
| वर्गणी | २८,३०० | लेखन सामग्री | २१,८५० |
| आजीवन सभासद शुल्क | २५,००० | मुदत ठेव (३१.०३.२०१९) | ८,५०,००० |
| देणगी | ७,००,००० | शिल्लक (पुढे नेली) : | |
| शिक्षण शुल्क | १२,३०,००० | रोख | १६,६५० |
| सत्र शुल्क | २,००,८०० | बँक | २,००,००० |
| विविध प्राप्ती | ८,००० | | |
| प्रवेश शुल्क (महसुली) | ६०,००० | | |
| | **२४,२५,५००** | | **२४,२५,५००** |

**अतिरिक्त माहिती :**

| तपशील | ०१.०४.२०१८ | ३१.०३.२०१९ |
|---|---|---|
| पुस्तके | ६,००,००० | ६,००,००० |
| फर्निचर | ३,१९,००० | ३,००,००० |
| इमारत निधी | १०,००,००० | ? |
| मुदत ठेव | ९,१०,००० | ? |
| भांडवल निधी | ९,४७,४०० | ? |

१) देणगीची ५०% रक्कम ही इमारत निधीकरीता असून शिल्लक राशी ही महसुली उत्पन्न म्हणून समजण्यात येते.

२) वर्गणी येणे बाकी ₹ ५,३००

३) आजीवन सदस्यता शुल्काचे भांडवलीकरण करा.

**उत्तर :** वाढवा ₹ ५,५९,५५०, ताळेबंदाची बेरीज ₹ २८,८१,९५०

**११. (शाळेचे खाते)**

**"न्यू इंग्लीश स्कूल", बार्शी, चे प्राप्ती–शोधन खाते व ताळेबंद पुढील प्रमाणे देण्यात आलेले आहे.**

**त्यावरून ३१ मार्च २०२० रोजी संपणाऱ्या वर्षाचे उत्पन्न–खर्च खाते आणि त्याच तारखेचा ताळेबंद तयार करा.**

**ताळेबंद ०१.०४.२०१९ रोजीचा**

| देयता | रक्कम ₹ | संपत्ती | रक्कम ₹ |
|---|---|---|---|
| भांडवल निधी | ६,४३,००० | रोख शिल्लक | ६,००० |
| | | बँक शिल्लक | १०,००० |
| | | इमारत | ४,५०,००० |
| | | उपस्कर (Furniture) | ७२,००० |
| | | ग्रंथालय – पुस्तके | ४५,००० |
| | | संगणक प्रयोगशाळा | ६०,००० |
| | **६,४३,०००** | | **६,४३,०००** |

**प्राप्ती – शोधन खाते ३१ मार्च २०२० रोजी संपणाऱ्या वर्षाकरिता**

**नावे** **जमा**

| प्राप्ती | रक्कम ₹ | रक्कम ₹ | शोधन | रक्कम ₹ | रक्कम ₹ |
|---|---|---|---|---|---|
| शिल्लक (पुढे आणली) : | | | वेतन | | ९०,००० |
| रोख | ६,००० | | ग्रंथालय पुस्तके | | १४,००० |
| बँक | १०,००० | १६,००० | कार्यालय भाडे | | १०,००० |
| शिक्षण शुल्क | | ९०,००० | छपाई व लेखन सामग्री | | २२,००० |
| सत्र शुल्क | | ३,००० | विविध खर्च | | १२,००० |
| प्रवेश शुल्क | | १२,००० | विमा | | १०,२०० |
| देणगी(भांडवली) | | ६१,००० | क्रीडा खर्च | | ८,००० |
| प्राप्त व्याज | | २,००० | वार्षिक संमेलन खर्च | | ९,००० |
| शासकीय अनुदान (महसुली) | | १,२०,००० | फर्निचर | | ५०,००० |
| विविध प्राप्ती | | ११,००० | दुरुस्ती | | १५,००० |
| | | | शिल्लक (पुढे नेली): | | |
| | | | रोख | ४,८०० | |
| | | | बँक | ७०,००० | ७४,८०० |
| | | **३,१५,०००** | | | **३,१५,०००** |

**अतिरिक्त माहिती :**

१) अदत्त वेतन ₹ ९,०००

२)  अप्राप्त शिक्षण शुल्क ₹ १५,०००

३)  घसारा आकारा ग्रंथालय पुस्तकांवर ₹ ९,००० आणि फर्निचरवर ₹ १०,०००

**उत्तर :** वाढवा ₹ ४८,८००, ताळेबंदाची बेरीज ₹ ७,६१,८००

१२. **(ग्रंथालयाचे खाते)**

**मुंबईचे धनंजय ग्रंथालय याचे ३१ मार्च २०२० रोजी संपणाऱ्या वर्षाचे प्राप्ती–शोधन खाते माहिती पुढील प्रमाणे आहे.**

**प्राप्ती – शोधन खाते ३१ मार्च २०२० रोजी संपणाऱ्या वर्षाकरिता**

**नावे** **जमा**

| प्राप्ती | रक्कम ₹ | शोधन | रक्कम ₹ |
|---|---|---|---|
| शिल्लक (पुढे आणली) | ५,००० | पगार | ९,००० |
| प्रवेश शुल्क | ४,५०० | भाडे | ७,५०० |
| वर्गणी | २०,००० | गुंतवणूक | ६,००० |
| व्याख्यान हॉलचे भाडे | ४,२०० | स्टेशनरी | १,३५० |
| किरकोळ खर्च | २५० | विद्युत शुल्क | ८५० |
| गुंतवणुकीवरील व्याज | ९०० | पुस्तके | ५,००० |
| | | अदत्त खर्च (२०१८ – १९) | ५०० |
| | | शिल्लक (पुढे नेली) | ४,६५० |
| | **३४,८५०** | | **३४,८५०** |

**आपणास ३१.०३.२०२० रोजी संपणाऱ्या वर्षाकरिता उत्पन्न–खर्च खाते आणि त्याच तारखेचा ताळेबंद तयार करावयाचा आहे.** त्याकरिता पुढील अतिरिक्त माहितीदेखील आपणास उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

१)  ग्रंथालयामधे ३१.०३.२०१९, ला पुढील संपत्ती होत्या; पुस्तके ₹ ५०,०००, फर्निचर ₹ ६५००, आणि यंत्र सामग्री ₹३०,०००

२)  अगाऊ मिळालेली वर्गणी ₹ ५००

३)  अदत्त पगार ₹ १,३०० आणि अदत्त भाडे ₹ ९५०

४)  प्रवेश शुल्काच्या ५० % रकमेचे भांडवलीकरण करा.

५)  फर्निचर वर वार्षिक १० % दराने घसारा आकारा.

६)  पुस्तकांची खरेदी १ एप्रिल २०१९ रोजी करण्यात आली. पुस्तकांवर वार्षिक १० % दराने घसारा आकारा.

७)  १ एप्रिल २०१९ ला गुंतवणुकीची खरेदी करण्यात आली. त्यावर वार्षिक २० % दराने व्याज प्राप्त होते.

**उत्तर :** वाढवा ₹ ३००, ताळेबंदाची बेरीज ₹ ९६,३००, भांडवल निधी ₹ ९१,०००

१३. (अप्राप्त खर्च आणि पूर्वदत्त खर्च)

**खालील प्रमाणे पुरविण्यात आलेल्या माहितीच्या आधारे "मोरया स्पोर्टस क्लब, ठाणे" चे ३१.०३.२०२० रोजी संपणाऱ्या वर्षाचे उत्पन्न-खर्च खाते आणि त्याच तारखेचा ताळेबंद तयार करा.**

**ताळेबंद ०१.०४.२०१९ रोजीचा**

| देयता | रक्कम ₹ | संपत्ती | रक्कम ₹ |
|---|---|---|---|
| भांडवल निधी | ६४,५०० | यंत्र सामग्री | ६९,००० |
| बँक ओव्हरड्राफ्ट | ३८,००० | अप्राप्त वर्गणी | ८,००० |
| अदत्त वेतन | ४,००० | पूर्व दत्त विमा हप्ता | २,००० |
| | | फर्निचर | १५,००० |
| | | रोख शिल्लक | १२,००० |
| | | लॉकर भाड्याचे देणे बाकी | ५०० |
| | **१,०६,५००** | | **१,०६,५००** |

**प्राप्ती – शोधन खाते ३१ मार्च २०२० रोजी संपणाऱ्या वर्षाकरिता**

**नावे** **जमा**

| प्राप्ती | रक्कम ₹ | शोधन | रक्कम ₹ |
|---|---|---|---|
| शिल्लक (पुढे आणली) | १२,००० | शिल्लक (पुढे आणली)बँक ओव्हरड्राफ्ट | ३८,००० |
| वर्गणी | १,०५,००० | वेतन | १७,५०० |
| प्रवेश शुल्क (भांडवली) | ९,३०० | विमा हप्ता | ११,००० |
| लॉकरचे भाडे | १,५०० | व्याज | १,४०० |
| देणगी (भांडवली) | ८०० | अल्पोपहार खर्च (Refreshment Expenses) | ४,२०० |
| | | फर्निचर | ३०,००० |
| | | शिल्लक (पुढे नेली) : | |
| | | रोख | ६,५०० |
| | | बँक | २०,००० |
| | **१,२८,६००** | | **१,२८,६००** |

**समायोजना :**

१) प्राप्त वर्गणी मधे २०१८ – १९ वर्षाशी संबंधित ₹ ३,००० चा समावेश आहे आणि २०१९ – २० ची अप्राप्त वर्गणी ही ₹ १४,००० आहे.

२) ३१.०३,२०२० ला पूर्वदत्त विम्याची रक्कम ₹ २,५०० होती.

३) फर्निचरवर घसारा आकारा ₹ ३,०००.

४) २०१९ – २० चे लॉकर भाडे देणे बाकी आहे ₹ ४००.

**उत्तर :** वाढवा ₹ ८४,८००, ताळेबंदाची बेरीज ₹ १,५९,४००

१४. **(चॅरीटेबल हॉस्पिटल)**

**"विवेकानंद चॅरिटेबल हॉस्पिटल" लातूरनी पुढील प्रमाणे माहिती पुरविली आहे.**

**आपणास ३१ मार्च २०१९ रोजी संपणाऱ्या वर्षाकरिता उत्पन्न–खर्च खाते आणि त्याच तारखेचा ताळेबंद तयार करा.**

**ताळेबंद ०१.०४.२०१८ रोजीचा**

| देयता | रक्कम ₹ | संपत्ती | रक्कम ₹ |
|---|---|---|---|
| भांडवल निधी | ११,००,००० | इमारत | १०,५०,००० |
| बँक कर्ज | ६,५०,००० | रुग्णवाहिका (Ambulance) | ४,००,००० |
| औषधांचे बिलाचे देणे बाकी | ५०,००० | औषध साठा | ४२,००० |
| | | रुग्णालय उपकरणे | ३,०४,००० |
| | | रोख शिल्लक | ४,००० |
| | **१८,००,०००** | | **१८,००,०००** |

**प्राप्ती – शोधन खाते ३१ मार्च २०१९ रोजी संपणाऱ्या वर्षाकरिता**

**नावे** **जमा**

| प्राप्ती | रक्कम ₹ | शोधन | रक्कम ₹ |
|---|---|---|---|
| शिल्लक (पुढे आणली) | ४,००० | औषध खरेदी | २,००,००० |
| वर्गणी | २,२२,००० | (यामधे२०१७ – १८ चे ₹४०,००० सम्मिलीत) | |
| आजीवन सभासद शुल्क | ३०,००० | कर्मचाऱ्यांचा पगार | ८५,००० |
| रुग्णालय प्राप्ती (महसूल) | ५,१०,४०० | डॉक्टरांना मानधन | ४,००,००० |
| | | दुरुस्ती व देखभाल | १८,००० |
| | | फर्निचर | ४५,००० |
| | | सामान्य खर्च | १६,००० |
| | | शिल्लक (पुढे नेली) | २,४०० |
| | **७,६६,४००** | | **७,६६,४००** |

**समायोजना :**

१) ३१.०३.२०१९ ला औषध साठ्याचे मूल्य ₹ २२,००० होते.

२) घसारा आकारा : इमारतीवर वार्षिक ५ % दराने आणि रुग्णवाहिकेवर ₹ ३०,०००.

३) आजीवन सभासद शुल्काचे भांडवलिकरण करा.

**उत्तर :** तोटा ₹ ४९,१००, ताळेबंदाची बेरीज ₹ १७,४०,९००

**विद्यार्थी कृती :**

१) कोणत्याही एका महिला बचत गटाला भेट द्या व तेथे हिशोब कशा प्रकारे ठेवले जातात याचा अभ्यास करून त्या संबंधीचा अहवाल तयार करा.

२) कोणत्याही शाळा किंवा ज्युनियर कॉलेजला भेट देऊन त्यांच्या उत्पन्न–खात्याचा आणि ताळेबंदाचा अभ्यास करा.

३) सहकारी गृह निर्माण संस्थेला भेट द्या आणि तेथील लेखांकन कार्यपद्धती समजून घ्या.

# ३. भागीदारीची पुनर्रचना (Reconstitution of Partnership)
# भागीदाराचा प्रवेश (Admission of Partner)

**अभ्यास घटक**

***३.१ भागीदारीची पुनर्रचना अर्थ***

३.१.१ पुनर्रचनेचे विविध प्रकार

***३.२ भागीदाराचा प्रवेश***

३.२.१ गरज

३.२.२ नवीन भागीदाराने आणलेले भांडवल

३.२.३ नफा वाटपाचे नवीन प्रमाण

३.२.४ त्यागाचे प्रमाण

३.२.५ ख्यातीचा अर्थ

३.२.५.१ ख्याती मूल्यांकनाच्या पद्‌धती

१) सरासरी नफा पद्‌धती

२) अतिरिक्त नफा पद्‌धती

३.२.५. ख्यातीची हाताळणी

३.२.६ संपत्ती व देयतांचे पुनर्मूल्यांकन

३.२.७ संचित नफातोट्याचे समायोजन

३.२.८ भांडवलाचे समायोजन

**क्षमता विधाने (Competency Statement)**

❑ *या प्रकरणाचा अभ्यास केल्यानंतर विद्यार्थी :*

- *भागीदारीच्या पुनर्रचनेचा अर्थ व प्रकार समजतो.*
- *भागीदाराच्या प्रवेशचा अर्थ व गरज समजतो.*
- *भागीदाराच्या प्रवेशासंबंधी समायोजनांचा अभ्यास करतो.*
- *नफा-तोटा वाटपाचे व त्यागाचे नवीन प्रमाण काढतो.*
- *ख्यातीचे मूल्य काढण्याच्या विविध पद्‌धती व हाताळणी जाणतो.*
- *संचित नफा/ तोट्याची लेखांकीय हाताळणी जाणतो.*
- *संपत्ती व देयतांच्या पुनर्मूल्यांकनाच्या समायोजन नोंदीची आवश्यकता समजून घेतो.*
- *नवीन नफा विभाजनाच्या प्रमाणात भांडवलाचे समायोजन करतो.*

## ३.१ भागीदारीची पुनर्रचना अर्थ (Meaning of Reconstitution of Partnership) :

भागीदारांचा संबधातील बदल म्हणजे भागीदारीची पुनर्रचना होय. भागीदारांमध्ये झालेल्या नवीन करारामुळे भागीदारांच्या आपसातील संबंधात बदल होतो तसेच, भागीदारीच्या नफा-तोटा वाटपाच्या प्रमाणात बदल होतो. खालील प्रकारे हा बदल भागीदारी संस्थेत होत असतो. :

### पुनर्रचनेचे विविध प्रकार (Different forms of Reconstitution) :

१) **विद्यमान भागीदारांच्या नफा-तोटा वाटपाच्या प्रमाणात बदल (Change in Profit – sharing of existing Partner)**

विद्यमान भागीदार नफा-तोटा वाटपाच्या प्रमाणात बदल करण्याचा निर्णय घेवू शकतात. एक भागीदार दुसऱ्या भागीदाराचा नफ्यातील हिस्सा खरेदी करू शकतो. यामुळे भागीदारीचा जुना करारनामा रद्द होतो आणि नवीन करार अंमलात येऊन नफा-तोटा वाटपाचे नवीन प्रमाण लागू होते.

२) **भागीदाराचा प्रवेश (Admission of a Partner)**

जेव्हा नवीन भागीदार भागीदारीत प्रवेश घेतो, तेव्हां तो भांडवल आणि ख्यातीतील हिस्सा आणतो. जुने भागीदार आपल्या हिश्यातून नवीन भागीदाराला हिस्सा देतात, पर्यायाने त्याग करतात. त्यामुळे भागीदारीचा करार बदलतो.

३) **भागीदाराची निवृत्ती (Retirement of a Partner)**

जेव्हा भागीदार निवृत्त होतो तेव्हां त्याला नफ्यातील हिस्सा, भांडवल, निधीतील हिस्सा आणि ख्यातीतील हिस्सा द्यावा लागतो. यामुळे जुन्या भागीदाराच्या लाभाच्या प्रमाणात वाढ होते आणि नफा-तोटा वाटपाचे प्रमाण बदलते.

४) **भागीदाराचा मृत्यू (Death of a Partner)**

जेव्हा एखाद्या भागीदाराचा मृत्यू होतो. तेव्हां त्याच्या कायदेशीर वारसास त्याचा व्यवसायातील हिस्सा द्यावा लागतो. त्यामुळे नियमीत (उरलेले) भागीदारांचे नफा-तोटा वाटपाचे प्रमाण बदलते आणि जुना भागीदारीचा करार रद्द होतो.

### ३.२ भागीदाराचा प्रवेश (Admission of a Partner) :

भारतीय भागीदारी कायदा १९३२ च्या कलम ३१ (१) नुसार वर्तमान (ह्यात) सर्व भागीदारांच्या संमतीने नवीन भागीदारास भागीदारीत प्रवेश दिला जातो. नवीन भागीदार भागीदारीत भांडवल आणि ख्यातीतील हिस्सा आणतो. यामुळे त्याला भविष्यात होणाऱ्या नफ्यात हिस्सा प्राप्त करण्याचा अधिकार मिळतो.

या प्रकरणात अस्तित्वात असलेल्या भागीदारी संस्थेत नवीन भागीदाराला प्रवेश देण्यासंबंधीचा लेखांकनाची हाताळणी कशी करावी यासंबंधीची माहिती दिलेली आहे.

#### ३.२.१ गरज (Need) :

सहसा भांडवलाची वाढ आणि नवीन भागीदाराचे व्यवसायिक कौशल्य ह्या गोष्टी लक्षात घेऊन भागीदारीचा विकास व प्रगती करण्याच्या उद्देशाने नवीन भागीदाराला प्रवेश दिला जातो.

#### ३.२.२ नवीन भागीदाराने आणलेले भांडवल (Capital brought by new partner) :

भागीदारी संस्थेच्या भांडवलात वाढ व्हावी या उद्देशाने नवीन भागीदाराला भागीदारीत प्रवेश दिला जातो. नवीन भागीदार रोख किंवा इतर साधन सामग्रीच्या स्वरूपात भांडवल आणत असतो. नवीन भागीदार, भागीदारीच्या करारातील तरतुदीनुसार भांडवल आणत असतो. :

नवीन भागीदाराने आणलेल्या भांडवलाची नोंद जमा खर्चाच्या पुस्तकात खालील प्रमाणे होते.

| व्यवहार | किर्दनोंद |
|---|---|
| नवीन भागीदाराने भांडवल रोख आणल्यास | रोकड / बँक खाते ....................................नावे.<br>नवीन भागीदाराचे भांडवल खात्याला |
| नवीन भागीदाराने भांडवल म्हणून एखादी संपत्ती आणल्यास – | विशिष्ट संपत्तीचे खाते ................................नावे.<br>नवीन भागीदाराचे भांडवल खात्याला |

### नवीन प्रमाण (New ratio)

जेव्हा नवीन भागीदाराला भागीदारीत प्रवेश दिला जातो, तेव्हां विद्यमान भागीदारांच्या नफा-तोटा वाटपाच्या प्रमाणात बदल होतो आणि नवीन भागीदाराला विचारात घेऊन नवीन नफा-तोटा प्रमाण काढावे लागते. तेव्हा खालील सुत्राचा वापर करतात.

१ - नवीन भागीदाराचा हिस्सा - शिल्लक नफा

नवीन प्रमाण = जुने प्रमाण × शिल्लक प्रमाण (नफा)

किंवा

जेव्हा जुन्या भागीदारांचे त्यागाचे प्रमाण दिले असेल तेव्हा नवीन प्रमाण खालील प्रमाणे काढावे.

नवीन प्रमाण = जुने प्रमाण - त्यागाचे प्रमाण

### त्यागाचे प्रमाण (Sacrifice Ratio) :

जेव्हा नवीन व्यक्तीला भागीदारीत प्रवेश दिला जातो, तेव्हा जुने भागीदार, नवीन भागीदाराला आपल्या नफ्यातील हिश्याचा त्याग करतात. या प्रमाणाला त्यागाचे प्रमाण सुद्धा म्हणतात. हप्ता पद्धतीत ख्याती खाते उघडण्यासाठी या प्रमाणाचा उपयोग करतात.

त्यागाचे प्रमाण = जुने प्रमाण - नवीन प्रमाण

**भागीदाराच्या प्रवेशामुळे नफा वाटपाच्या प्रमाणात होणारे बदल** (Change in the Profit sharing ratio due to admission of a partner)

### उदाहरण १ नवीन प्रमाणाचे आगणन (Calculation of New ratio)

मोहन आणि गणपत २:३.या प्रमाणात नफा-तोटा वाटून घेतात. त्यांनी भविष्यातील १/४ हिश्यासाठी चंद्रकांतला प्रवेश दिला. त्यांचे नवीन लाभ वाटपाचे प्रमाण खालील प्रमाणे राहील.

शिल्लक नफा = १ – नवीन भागीदाराचा नफ्यातील हिस्सा

$= १ - \frac{१}{४} = \frac{३}{४}$ उर्ववरीत नफा

नवीन प्रमाण = जुने प्रमाण × शिल्लक नफा

मोहनचे प्रमाण $= \frac{२}{५} \times \frac{३}{४} = \frac{६}{२०}$

गणपतचे प्रमाण $= \frac{३}{५} \times \frac{३}{४} = \frac{९}{२०}$

चंद्रकांतचे प्रमाण $= \frac{१}{४} \times \frac{५}{५} = \frac{५}{२०}$

नवीन नफा वाट्याचे प्रमाण ६:९:५

### उदाहरण २ त्यागाच्या प्रमाणाचे आगणन (Calculation of Sacrifice Ratio)

**अ** आणि **ब** ६:४. या प्रमाणात नफा-तोटा वाटून घेतात क ला भागीदारीत प्रवेश देण्यात आला. अ, ब, क यांचे नवीन नफा-तोटा वाटपाचे प्रमाण १० : ६: ४ असे आहे.

त्यागाचे प्रमाण = जुने प्रमाण – नवीन प्रमाण

'अ' चे त्यागाचे प्रमाण $= \frac{६}{१०} - \frac{१०}{२०} = \frac{१२० - १००}{२००}$

$$= \frac{२०}{२००} = \frac{२}{२०}$$

'ब' च्या त्यागाचे प्रमाण $= \frac{४}{१०} - \frac{६}{२०} = \frac{८० - ६०}{२००}$

$$= \frac{२०}{२००} = \frac{२}{२०}$$

'अ' आणि 'ब' च्या त्यागाचे प्रमाण $\frac{२}{२०} : \frac{२}{२०}$ किंवा २:२ , १:१ म्हणजे समप्रमाण.

**उदाहरण ३ त्यागाचे प्रमाण आणि नवीन प्रमाणाचे आगणन (Calculation of Sacrifice Ratio and New Ratio)**

प्रवीण आणि नवीन ७:३ या प्रमाणात नफा-तोटा वाटून घेतात. त्यांनी रिनाला $\frac{१}{५}$ हिश्यासाठी भागीदारीत प्रवेश दिला, जो प्रवीण आणि नवीनकडून समप्रमाणात घेणार आहे. तेव्हा त्यागाचे प्रमाण आणि नवीन नफा वाट्याचे प्रमाण काढून दाखवा.

प्रवीण व नवीन यांचे त्यागाचे प्रमाण $= १:१ \; \frac{१}{२} : \frac{१}{२}$ (समान)

प्रवीणचा त्याग $= \frac{१}{५} \times \frac{१}{२} = \frac{१}{१०}$

नवीनचा त्याग $= \frac{१}{५} \times \frac{१}{२} = \frac{१}{१०}$

प्रवीणचे नवीन नफा वाटपाचे प्रमाण $= \frac{७}{१०} - \frac{१}{१०} = \frac{७० - १०}{१००}$

$$= \frac{६०}{१००} = \frac{६}{१०}$$

नवीनचे नवीन नफा वाटपाचे प्रमाण $= \frac{३}{१०} - \frac{१}{१०} = \frac{३० - १०}{१००}$

$$= \frac{२०}{१००} = \frac{२}{१०}$$

रिनाचा हिस्सा $= \frac{१}{५} \times \frac{२}{२} = \frac{२}{१०}$

प्रवीण, नवीन, रिना चे प्रमाण = ६ : २: २ = ३:१:१

**उदाहरण ४ त्यागाचे प्रमाण आणि नवीन प्रमाण काढणे. (Calculation of Sacrifice Ratio and New Ratio)**

**क्ष** व **य** हे ७:३ या प्रमाणात नफा-तोटा वाटून घेतात. 'क्ष' ने त्याच्या हिश्यातून $\frac{१}{७}$ हिस्सा व 'य' ने $\frac{१}{३}$ हिश्या 'झ' ला देण्याचे ठरविले. तेव्हां नफा वाटपाचे नवीन प्रमाण आणि त्यागाचे प्रमाण काढून दाखवा.

क्ष व य चे जुने प्रमाण $= \frac{७}{१०} : \frac{३}{१०}$

'क्ष' चा त्याग $= \frac{१}{७} \times \frac{७}{१०} = \frac{१}{१०}$

'य' चा त्याग $= \frac{१}{३} \times \frac{३}{१०} = \frac{१}{१०}$

'क्ष' व 'य'चे त्यागाचे प्रमाण = $\frac{१}{१०}$, $\frac{१}{१०}$ = १:१ समान

'झ' चा हिस्सा = क्ष चा हिस्सा + य चा हिस्सा

= $\frac{१}{१०} + \frac{१}{१०}$

= $\frac{२}{२०}$

'क्ष' चा हिस्सा = जुने प्रमाण – नवीन प्रमाण

= $\frac{७}{१०} - \frac{१}{१०}$

= $\frac{६}{१०}$

'य' चा हिस्सा = जुने प्रमाण – नवीन प्रमाण

= $\frac{३}{१०} - \frac{१}{१०}$

= $\frac{२}{१०}$

'क्ष' 'य' व 'झ' चे नवीन प्रमाण - ६ :२: २ = ३:१:१

### ३.२.५ ख्यातीचा अर्थ (Meaning of Goodwill) :

ख्याती म्हणजे व्यवसायाचे नांव, प्रसिद्धी, किर्ती आणि चांगले व्यावसायिक संबंध की ज्यामुळे व्यवसायात अधिकाधिक नफा मिळविण्यास मदत होते. गत काही वर्षात भागीदारांनी केलेल्या मेहनतीमुळे हे शक्य झालेले असते. सामान्यत: भविष्यातील नफा हा भुतकाळातील नफ्यावर आधारीत असतो. त्यावरून ख्यातीचे मूल्य निश्चित होते.

**३.२.५.१ ख्यातीच्या मूल्यांकनाच्या विविध पद्धती आहेत. या ठिकाणी आपण दोन मुख्य पद्धतींचा समावेश केला आहे.:**

#### १) सरासरी नफा पद्धती (Average Profit Method)

या पद्धतीनुसार ख्यातीचे मूल्य हे भागीदारी संस्थेच्या मागील काही वर्षाच्या सरासरी नफ्याच्या आधारावर केले जाते. पुढील काही वर्षात भागीदारी संस्थेला सरासरी नफा होईल हे गृहीत धरले जाते आणि म्हणूनच ख्यातीचे मूल्य निश्चित करतांना मागील काही वर्षातील नफ्याच्या खरेदीच्या आधारावर करण्यात येते.

या पद्धतीत ख्यातीचे मूल्यांकन करतांना खालील तीन पायऱ्यांचा अवलंब केला जातो.

#### i) एकूण नफ्याचे आगणन (Calculation of total profit)

ज्यावेळी एकूण नफ्याचे आगणन (बेरीज) करण्यात येते, त्यावेळी त्यातून एकूण तोटा वजा करण्यात येतो.

उदा. मागील ४ वर्षातील नफा– तोटा खालील प्रमाणे होता.

| वर्ष | राशी |
|---|---|
| २०१६ | ₹ १,२०,००० (नफा) |
| २०१७ | ₹ ८०,००० (नफा) |

२०१८ ₹ २०,००० (तोटा)

२०१९ ₹ ६०,००० (नफा)

एकूण नफा खालील प्रमाणे राहील :

एकूण नफा = १,२०, ००० + ८०,००० – २०,००० + ६०,०००

= ₹ २, ४०,०००

## ii) सरासरी नफ्याची गणना (Calculation of Average Profit)

$$\text{सरासरी नफा} = \frac{\text{एकूण नफा}}{\text{एकूण वर्षे}}$$

$$\text{सरासरी नफा} = \frac{२,४०,०००}{४ \text{ वर्षे}}$$

सरासरी नफा = ₹ ६०,०००

## iii) ख्यातीचे आगणन (Calculation of Goodwill) :

ख्यातीचे मूल्य हे मागील काही वर्षाच्या सरासरी नफ्याच्या खरेदीच्या आधारे निश्‍चित केले जाते.

याकरिता ख्यातीचे मूल्य निश्‍चित करण्यासाठी खालील सूत्रांचा उपयोग करावा.

ख्याती = सरासरी नफा × खरेदीच्या वर्षांची संख्या

वरील उदाहरणात ख्यातीचे मूल्य दोन वर्षाच्या खरेदीच्या सरासरी नफ्याच्या एवढे लावावे.

ख्याती = ₹ ६०, ००० × २

= ₹ १,२०, ०००

## २) अतिरिक्त नफा पद्धत (Super Profit Method)

अतिरिक्त नफा म्हणजे साधारण नफ्यापेक्षा मिळणारा जास्तीचा नफा होय. जर संस्था सामान्य किंवा साधारण नफ्यापेक्षा जास्तीचा नफा मिळविते याला कारण संस्थेचा नावलौकिक होय, म्हणून ख्यातीचे मूल्यांकन करतांना अतिरिक्त नफा विचारात घेण्यात येतो. व्यवसायात गुंतवलेल्या भांडवलावर साधारण परतावा अपेक्षित असतो, तोच साधारण नफा समजला जातो. जेव्हा संस्था साधारण नफ्यापेक्षा जास्तीचा नफा मिळविते तोच अतिरिक्त नफा असतो. अतिरिक्त नफ्याचे आधारे ख्यातीचे मूल्यांकन खालीलप्रमाणे करण्यात येते.

### उदाहरण १

अतिरिक्त नफा पद्धतीचा वापर करून खालील माहितीच्या आधारे ख्यातीचे मूल्य शोधून काढा.

| वर्ष | राशी (₹) |
|---|---|
| २०१४ | ₹ ८०,००० (नफा) |
| २०१५ | ₹ ९५,००० (नफा) |
| २०१६ | ₹ १,१०,००० (नफा) |
| २०१७ | ₹ ४०,००० (तोटा) |
| २०१८ | ₹ ८५,००० (नफा) |

i) भांडवलाची गुंतवणूक ₹ ३, ५०, ०००आहे.

ii) गुंतवणूकीवरील परतावा १२%

iii) ख्यातीचे मूल्य २ वर्षांच्या अतिरीक्त नफ्याच्या खरेदी एवढे लावावे.

**i) सरासरी नफ्याचे आगणन (Calculation of Average Profit )**

$$\text{सरासरी नफा} = \frac{\text{एकूण नफा}}{\text{एकूण वर्षे}}$$

$$= \frac{८०,००० + ९५,००० + १,१०,००० - ४०,००० + ८५,०००}{५ \text{ वर्षे}}$$

$$= ₹ \frac{३,३०,०००}{५}$$

$$= ₹ ६६,०००$$

**ii) साधारण नफ्याचे आगणन (Calculation of Normal Profit)**

$$\text{सामान्य नफा} = \frac{\text{गुंतवलेले भांडवल} \times \text{परताव्याचा दर (NRR)}}{१००}$$

$$= ₹ \frac{३,५०,००० \times १२}{१००}$$

$$= ₹ ४२,०००$$

**ii) अतिरिक्त नफ्याचे आगणन (Calculation of Super Profit)**

अतिरिक्त नफा = सरासरी नफा – सामान्य नफा

= ६६,०००– ४२,०००

= ₹ २४,०००

**iii) ख्यातीचे मूल्यांकन (Calculation of Goodwill)**

ख्याती = अतिरिक्त नफा × खरेदीच्या वर्षांची संख्या

= २४,००० × २

= ₹ ४८,०००

### ३.२.५.२ ख्यातीची हाताळणी (Treatment of Goodwill)

भागीदारीच्या पुनर्रचनेच्या प्रसंगी इतर संपत्तीप्रमाणे न हाताळता तिची स्वतंत्ररित्या हाताळणी करण्यात येते. नवीन भागीदाराला प्रवेश देताना जमाखर्चाच्या पुस्तकात नोंदी करण्याच्या दोन पद्धती आहेत.

**(अ) अधिमूल्य पद्धत (Premium Method)**

या पद्धतीनुसार नवीन भागीदार त्याच्या वाट्याची ख्याती रोख किंवा वस्तू स्वरूपात आणतो. ही रक्कम व्यवसायात ठेवली जाते किंवा जुने भागीदार ते काढून घेतात.

| अ.क्र | व्यवहार | किर्दनोंद |
|---|---|---|
| १ | जेव्हा नवीन भागीदार ख्यातीची रक्कम आणतो आणि ती रक्कम व्यवसायातच ठेवली जाते. | (अ) रोकड / बँक खाते .................................... नावे.<br>ख्याती खात्याला<br>(नवीन भागीदाराने ख्याती रोख आणल्याबद्दल)<br>(ब) ख्याती खाते .......................................... नावे.<br>जुन्या भागीदारांचे भांडवल / किंवा चालू खात्याला<br>(त्यागाच्या प्रमाणात)<br>(जुन्या भागीदारांना ख्यातीची रक्कम वाटून दिल्याबद्दल) |
| २ | जेव्हा नवीन भागीदार ख्यातीची रक्कम रोख आणतो आणि जुने भागीदार ती काढून घेतात. | (अ) रोकड / बँक खाते .................................... नावे.<br>ख्याती खात्याला<br>(नवीन भागीदाराने ख्याती रोख आणल्याबद्दल)<br>(ब) ख्याती खाते .......................................... नावे.<br>जुन्या भागीदारांचे भांडवल / चालू खात्याला<br>(ख्याती राशी जुन्या भागीदारांना त्यागाच्या प्रमाणात वाटून दिल्याबद्दल)<br>(क) जुन्या भागीदारांचे भांडवल / चालू खाते ................ नावे.<br>रोकड / बँक खात्याला<br>(जुन्या भागीदारांनी ख्यातीची रक्कम काढून घेतल्याबद्दल) |
| ३ | जेव्हा नवीन भागीदार ख्यातीची रक्कम रोख आणतो आणि ती परस्पररित्या जुन्या भागीदारांना वाटून देतो. | अशा वेळी संस्थेच्या जमाखर्चाच्या पुस्तकात नोंद होणार नाही. |

## (ब) मूल्यांकन पद्धती (Valuation Method) :

या पद्धतीमध्ये नवीन भागीदार ख्याती रक्कम रोख स्वरूपात आणू शकत नाही. तेव्हां नवीन भागीदाराच्या प्रवेशावेळी जुने भागीदार ख्यातीचे मूल्यांकन करून तेवढ्या रकमेने ख्याती खाते उघडतात.

| अ.क्र. | व्यवहार | किर्दनोंदी |
|---|---|---|
| १ | नवीन भागीदार ख्यातीची राशी रोख न आणू शकल्यामुळे भागीदारीच्या पुस्तकात ख्याती खाते उघडणे. | (अ) ख्याती खाते ..........................................नावे.<br>जुन्या भागीदारांचे भांडवल / चालू खात्याला<br>(भागीदारीच्या पुस्तकात ख्याती खाते उघडल्याबद्दल)<br>• सूचना : नवीन ताळेबंदात ख्याती संपत्ती बाजूला दाखविली जाईल. |
| २ | ख्याती खाते उघडणे आणि बंद केल्यास. | (अ) ख्याती खाते ..........................................नावे.<br>जुन्या भागीदारांचे भांडवल / चालू खात्याला<br>**(त्यागाच्या प्रमाणात)**<br>(ख्याती खाते उघडल्याबद्दल)<br>(ब) सर्व भागीदारांचे भांडवल / चालू खाते....................नावे.<br>**(नवीन प्रमाणात)**<br>ख्याती खात्याला<br>(ख्यातीचे अपलेखन केल्याबद्दल) |

| | | |
|---|---|---|
| ३ | जेव्हा ख्याती खाते अगोदरच संस्थेच्या पुस्तकात उघडलेले असते व ताळेबंदात त्याची नोंद असते. | अशा परिस्थितित जर ख्यातीचे पुनर्मूल्यांकन करण्यात आले. तेव्हां पुनर्मूल्यांकनात पुस्तकी मूल्य आणि नवीन मूल्य यातील फरक जुन्या भागीदारांच्या भांडवल किंवा चालू खात्याला किंवा पुनर्मूल्यांकन खात्याला स्थानांतरित करण्यात येईल. |
| • | जेव्हा ख्याती जुन्या ताळेबंदात अगोदरच असेल व नवीन भागीदार ख्याती रोख आणतो | • अशा वेळी ताळेबंदात दिलेल्या ख्यातीचे जुन्या भागीदारामध्ये जुन्या प्रमाणात अपलेखीत करणे योग्य असते. |

## ३.२.६ संपत्ती आणि देयतांचे पुनर्मूल्यांकन (Revaluation of Assets and Liabilities)

### अर्थ Meaning

भागीदारीच्या पुनर्रचेनेच्या वेळी संपत्ती व देयतेचे पुनर्मूल्यांकन करण्यात येते. संपत्ती व देयतेच्या मूल्यातील हा बदल 'पुनर्मूल्यांकन खाते' किंवा नफा-तोटा समायोजन खात्याला लिहिला जातो. संपत्ती व देयतेतील वाढ किंवा घट हा पुनर्मूल्यांकनावरील नफा किंवा तोटा समजला जातो व हा नफा-तोटा जुन्या भागीदारांच्या भांडवल / चालू खात्याला स्थानांतरित करण्यात येतो हे खाते नामधारी स्वरूपाचे खाते आहे.

| अ.क्र. | व्यवहार | किर्दनोंदी |
|---|---|---|
| १. | संपत्तीचे मूल्य वाढविल्यास आणि देयतेचे मूल्य कमी केल्यास. | संपत्ती खाते ............................................ नावे.<br>देयतेचे खाते ............................................ नावे.<br>पुनर्मूल्यांकन खाते / नफा-तोटा समायोजन खात्याला<br>(संपत्तीचे मूल्य वाढविले व देयतेचे मूल्य कमी केल्याबद्दल ) |
| २. | संपत्तीचे मूल्य कमी केल्यास व देयतेचे मूल्य वाढविल्यास | पुनर्मूल्यांकन खाते / नफा-तोटा समायोजन खाते ..............नावे.<br>संपत्ती खात्याला<br>देयतेच्या खात्याला<br>(संपत्तीचे मूल्य कमी केल्यास आणि देयतेचे मूल्य वाढविल्याबद्दल) |
| ३. | नोंद न झालेली संपत्ती जमाखर्चाच्या पुस्तकात नोंदविल्यास | संपत्तीचे खाते ......................................... नावे.<br>पुनर्मूल्यांकन खात्याला<br>(नोंद न झालेली संपत्ती जमाखर्चाच्या पुस्तकात नोंदविल्याबद्दल) |
| ४. | नवीन देयता उद्भवल्यास / निर्माण झाल्यास | पुनर्मूल्यांकन खाते ........................................ नावे.<br>नवीन देयतेच्या खात्याला<br>(नवीन देयता उद्भवल्याबद्दल) |
| ५. | पुनर्मूल्यांकनावरील नफा भागीदारांच्या भांडवल / चालू खात्याला स्थानांतरित केल्याबद्दल | पुनर्मूल्यांकन खाते . ....................................... नावे.<br>जुन्या भागीदारांचे भांडवल / चालू खात्याला<br>(पुर्नमूल्यांकनावरील नफा जुन्या भागीदारांच्या भांडवल / चालू खात्याला नेल्याबद्दल) |
| ६. | पुनर्मूल्यांकनावरील तोटा भागीदारांच्या भांडवल / चालू खात्याला नेल्याबद्दल) | जुन्या भागीदारांचे भांडवल / चालू खाते...................... नावे.<br>पुनर्मूल्यांकन खात्याला<br>(पुनर्मूल्यांकनावरील नफा भागीदारांच्या भांडवल / चालू खात्याला नेल्याबद्दल) |

नावे पुनर्मूल्यांकन किंवा नफा–तोटा समायोजन खात्याचा नमुना जमा

| विवरण | रक्कम (₹) | विवरण | रक्कम (₹) |
|---|---|---|---|
| संपत्ती खाते (संपत्तीची घट) | xxx | संपत्ती खाते (संपत्तीत वाढ) | xxx |
| देयचेचे खाते (देयतेतील वाढ) | xxx | देयतेचे खाते (देयतेतील घट) | xxx |
| जुन्या भागीदारांचे भांडवल / चालू खाते | xxx | जुन्या भागीदारांचे भांडवल / चालू खाते | |
| (पुनर्मूल्यांकनावरील नफा स्थानांतरित केला) | xxx | (पुनर्मूल्यांकनावरील तोटा स्थानांतरित) | xxx |

### ३.२.७ संचित नफा–तोट्याचे समायोजन (Adjustment of accumulated Profits and Losses)

संचित नफा म्हणजे नवीन भागीदाराला प्रवेश देण्यापूर्वी जुन्या भागीदारांनी कमविलेला नफा असतो. हा अतिरिक्त नफा, राखीव निधी, सामान्य निधी, कर्मचारी भरपाई निधी किंवा संयुक्त विमापत्र निधी इ. स्वरूपात असतो.

जेव्हां असे निधी ताळेबंदाच्या देयतेच्या बाजूला दिलेले असतात. तेव्हा ते जुन्या भागीदारांच्या भांडवल / चालू खात्याला स्थानांतरित केले जातात.

संबंधित निधीचे खाते ............................................ नावे

जुन्या भागीदारांचे भांडवल / चालू खात्याला

(संचित नफा/राखीव निधी भागीदारांना स्थानांतरित केल्याबद्दल)

संचित तोटा म्हणजे नवीन भागीदाराला प्रवेश देण्यापूर्वी जुन्या भागीदारांना झालेला तोटा असतो. हा वितरीत झालेला नसतो. सदर तोटा ताळेबंदामध्ये संपत्ती बाजूला दिसतो. (उदा. नफा – तोटा खात्याची नावे शिल्लक प्राथमिक खर्च इ.).

जुन्या भागीदारांचे भांडवल / चालू खाते ........................... नावे

संबंधित संचित तोटा खात्याला

(संचित तोटा भागीदारांना स्थानांतरित केल्याबद्दल)

### ३.२.८ भांडवलाचे समायोजन (Adjustment of Capitals)

बऱ्याच वेळेला नवीन भागीदाराला प्रवेश दिल्यानंतर नवीन नफा–तोटा वाटपाच्या प्रमाणात भांडवलाचे समायोजन करण्यात येते. भागीदारांच्या भांडवलाचे समायोजन खालीलपैकी कोणत्याही एका मार्गाने केले जाते.

(१) नवीन भागीदाराने आणलेल्या भांडवलाच्या प्रमाणात जुन्या भागीदारांचे भांडवल समायोजित करणे. अशा परिस्थित नवीन भागीदाराच्या भांडवलाच्या आधारे भागीदारीचे एकूण भांडवल शोधून काढावे लागेल. त्याकरिता नवीन भागीदाराचा नफा हिस्सा हा आधार असेल.

एकूण भांडवल खालील पद्धतीने शोधावे लागेल.

एकूण भांडवल = नवीन भागीदाराचे भांडवल × त्याचे नफा तोटा विभाजनाचे व्यस्त प्रमाण

Total Capital = New partner's capital × Reciprocal of his PSR (Profit sharing ratio)

समजा : 'C' ला $\frac{१}{५}$ हिश्यासाठी भागीदारीत प्रवेश दिला आणि त्याने भांडवल म्हणून ₹ ५०,००० आणले. 'A' आणि 'B' २:३ या प्रमाणात नफा–तोटा विभागून घेणारे भागीदार आहेत.

तेव्हा 'A'आणि 'B' चे नवीन भांडवल काय ते खालीलप्रमाणे शोधून काढले जाईल. :

नवीन नफा प्रमाणाचे गणन :

'A' चे नवीन नफ्याचे प्रमाण $= \frac{२}{५} \times (१ - \frac{१}{५}) = \frac{२}{५} \times \frac{४}{५} = \frac{८}{२५}$

'B' चे नवीन नफ्याचे प्रमाण = $\frac{३}{५} \times (१ - \frac{१}{५}) = \frac{३}{५} \times \frac{४}{५} = \frac{१२}{२५}$

'C' चे नवीन नफ्याचे प्रमाण = $\frac{१}{५} \times \frac{३}{५} = \frac{५}{२५}$

म्हणून नवीन प्रमाण = ८:१२:५

जर 'C' $\frac{१}{५}$ हिश्यासाठी ₹ ५०,००० भांडवल असेल तर

भागीदारीचे एकूण भांडवल = ₹ ५०,००० × ५ = ₹ २,५०,०००

∴ 'A' चा भांडवलातील हिस्सा = २,५०,००० × $\frac{८}{२५}$
= ₹ ८०,०००

∴ 'B' चा भांडवलातील हिस्सा = २,५०,००० × $\frac{१२}{२५}$
= ₹ १,२०,०००

(२) जुन्या भागीदारांच्या एकूण भांडवलांच्या आधारावर नवीन भागीदाराचे भांडवल ठरविणे शक्य असते. अशा परिस्थितीत नवीन भागीदाराला जुन्या भागीदारांच्या एकूण भांडवलांच्या प्रमाणात भांडवल आणावे लागते. हे खालीलप्रमाणे आगणित केले जाते. समजा. ख्याती, राखीव निधी, संपत्ती व देयतेच्या पुनर्मूल्यांकनावरील नफा-तोटा इ. विचारात घेतल्यानंतर 'P' आणि 'Q' चे भांडवल अनुक्रमे ₹ ६०,००० आणि ₹ ४८,००० आहे. त्यांचे नफा-तोटा वाटपाचे प्रमाण अनुक्रमे ३:२ आहे.

'R' ला $\frac{१}{४}$ हिश्याकरिता भागीदारीत प्रवेश दिला. या परिस्थितीत 'R ला त्याच्या नफ्याच्या प्रमाणानुसार किती भांडवल आणावे लागेल ते खालीलप्रमाणे काढता येईल.

'R' ला नफ्यात $\frac{१}{४}$ हिस्सा मिळतो म्हणजे भागीदारीच्या शिल्लक नफ्याचे प्रमाण $\frac{१}{१} - \frac{१}{४} = \frac{३}{४}$

जुन्या भागीदारांचे एकत्रित भांडवल (₹ ६०,००० + ४८,०००) = ₹ १,०८,००० $\frac{३}{४}$ चे प्रतिनिधित्व करते.

अशाप्रकारे भागीदारीचे एकूण भांडवल

₹ १,०८,००० × $\frac{४}{३}$ = ₹ १,४४,०००

म्हणून 'R' ला ₹ १,४४,००० एकूण भांडवलांतील $\frac{१}{४}$ हिस्सा ₹ १,४४,००० × $\frac{१}{४}$
= ₹ ३६,००० भांडवल म्हणून आणावे लागेल.

नवीन भागीदारीच्या भांडवलाची समायोजना झाल्यानंतर भांडवल खात्याला त्याची नोंद करण्यात येईल. प्रमाणापेक्षा जास्त असलेली फरकाची रक्कम भागीदार रोख काढून घेतात किंवा त्यांच्या कर्ज खात्याला भांडवल / चालू खात्याच्या माध्यमातून स्थानांतरित करण्यात येते. याउलट प्रमाणापेक्षा कमी पडणारी रक्कम रोख स्वरूपात आणावी लागते. तेव्हा जमाखर्चाच्या पुस्तकात खालील किर्दनोंदी होतात.

१) प्रमाणापेक्षा जास्त भांडवल असल्यास
संबंधित भागीदाराचे भांडवल खाते ............................... नावे.
रोकड / बँक / चालू खात्याला

२) प्रमाणापेक्षा कमी भांडवल असल्यास.

रोकड / बँक / चालू खाते ........................................ नावे.

संबंधित भागीदाराचे भांडवल खात्याला

## उदाहरणे

**१. सुजाता आणि पौर्णिमा समप्रमाणात नफा–तोटा वाटून घेणारे भागीदार आहेत. त्यांचा ताळेबंद खालीलप्रमाणे होता.**

**३१ मार्च २०१८ रोजीचा ताळेबंद**

| देयता | | रक्कम ₹ | संपत्ती | रक्कम ₹ |
|---|---|---|---|---|
| भांडवल : | | | जमीन व इमारत | ६०,००० |
| सुजाता | १,००,००० | | यंत्रसामग्री | ७०,००० |
| पौर्णिमा | १,४०,००० | २,४०,००० | उपस्कर | २४,००० |
| | | | ऋणको | २६,००० |
| धनको | | ३४,००० | स्कंध | ४०,००० |
| देयविपत्र | | २६,००० | रोकड | ८०,००० |
| | | ३,००,००० | | ३,००,००० |

**१ एप्रिल २०१८ रोजी अपर्णाला $\frac{१}{५}$ हिश्यासाठी भागीदारीत प्रवेश देण्यात आला. तेव्हां प्रवेशाच्या अटी खालीलप्रमाणे होत्या. :**

अ) ख्यातीचे मूल्य ₹ २,००,००० करण्यात आले. अपर्णाने त्याचा हिस्सा रोख आणावयाचा आहे.

ब) अपर्णाने भांडवल म्हणून ₹ १,००,००० आणावे.

क) ऋणकोकरिता १०% तरतूद करावी.

ड) जमीन आणि इमारतीचे मूल्य ₹ ८०,००० करावे.

इ) स्कंध आणि यंत्रसामग्रीचे मूल्य २०% ने कमी करावे.

**वरील योजना कार्यान्वित करण्यासाठी भागीदारीच्या पुस्तकात किर्दनोंदी देऊन नवीन संस्थेचा ताळेबंद तयार करा.**

**भागीदारीच्या पुस्तकात किर्दनोंदी**

| दिनांक | विवरण | खा.पा. | नावे राशी | जमा राशी |
|---|---|---|---|---|
| २०१८<br>एप्रिल १ | रोकड खाते ............ नावे.<br>अपर्णाचे भांडवल खात्याला ............<br>ख्याती खात्याला ............<br>(अपर्णाने ख्याती व भांडवल रोख आणल्याबद्दल ) | | १,४०,००० | <br>१,००,०००<br>४०,००० |
| एप्रिल १ | ख्याती खाते ............ नावे.<br>सुजाताचे भांडवल खात्याला<br>पौर्णिमाच्या भांडवल खात्याला<br>(भागीदारांना ख्यातीची रक्कम वाटून दिल्याबद्दल) | | ४०,००० | <br>२०,०००<br>२०,००० |
| एप्रिल १ | पुनर्मूल्यांकन खाते ............ नावे.<br>प्राप्त विपत्र तरतूद खात्याला<br>स्कंध खात्याला<br>यंत्रसामग्री खात्याला<br>(प्राप्त विपत्र, स्कंध व यंत्रसामग्री चे मूल्य कमी केल्याबद्दल) | | २४,६०० | <br>२,६००<br>८,०००<br>१४,००० |
| एप्रिल १ | जमीन व इमारत खाते ............ नावे.<br>पुनर्मूल्यांकन खात्याला<br>(जमीन व इमारतीचे मूल्य वाढविल्याबद्दल) | | २०,००० | <br>२०,००० |
| एप्रिल १ | सुजाताचे भांडवल खाते ............ नावे.<br>अपर्णाचे भांडवल खाते ............ नावे.<br>पुनर्मूल्यांकन खात्याला<br>(पुनर्मूल्यांकनावरील तोटा भागीदारांच्या भांडवल खात्याला नेल्याबद्दल) | | २,३००<br>२,३०० | <br><br>४,६०० |

**१ एप्रिल २०१८ रोजीचा ताळेबंद**

| देयता | रक्कम ₹ | रक्कम ₹ | संपत्ती | रक्कम ₹ | रक्कम ₹ |
|---|---|---|---|---|---|
| धनको | | ३४,००० | रोकड | | २,२०,००० |
| देयविपत्र | | २६,००० | ऋणको | २६,००० | |
| **भांडवल :** | | | (-) तरतूद | २,६०० | २३,४०० |
| सुजाता | १,१७,७०० | | स्कंध | ४०,००० | |
| पौर्णिमा | १,५७,७०० | | (-) घट | ८,००० | ३२,००० |
| अपर्णा | १,००,००० | ३,७५,४०० | उपस्कर | | २४,००० |
| | | | जमीन व इमारत | ६०००० | |
| | | | (+) वाढ | २०००० | ८०,००० |
| | | | यंत्र सामग्री | ७०००० | |
| | | | (-) घट | १४००० | ५६,००० |
| | | ४,३५,४०० | | | ४,३५,४०० |

**कार्य टीप –** १) हस्तथ रोख शिल्लक ₹ ८०,००० + भांडवल ₹ १,००,००० + ख्याती ₹ ४०,००० = ₹ २,२०,०००

**नावे** **पुनर्मूल्यांकन खाते** **जमा**

| विवरण | रक्कम ₹ | विवरण | रक्कम ₹ |
|---|---|---|---|
| सं. क. नि. खाते | २,६०० | इमारत खाते | २०,००० |
| मालसाठा खाते | ८,००० | सुजाताचे भांडवल खाते (तोटा) | २,३०० |
| यंत्रसामग्री खाते | १४,००० | पौर्णिमाचे भांडवल खाते (तोटा) | २,३०० |
| | २४,६०० | | २४,६००० |

२. **पद्‌मा आणि कुमुद या ३:२ प्रमाणात नफा–तोटा वाटून घेणारे भागीदार आहेत. ३१ मार्च २०१९ रोजी त्यांचा ताळेबंद खालीलप्रमाणे होता.**

**३१ मार्च २०१९ रोजीचा ताळेबंद**

| देयता | रक्कम ₹ | रक्कम ₹ | संपत्ती | रक्कम ₹ | रक्कम ₹ |
|---|---|---|---|---|---|
| धनको | | ३७,५०० | बँक शिल्लक | | २२,५०० |
| देयविपत्रे | | ३०,००० | प्राप्त विपत्र | | ११,४०० |
| बँकेचे कर्ज | | ४८,००० | ऋणको | ६२,४०० | |
| सामान्य निधी | | ७,५०० | (–) संशयित कर्ज निधी | २,४०० | ६०,००० |
| भांडवल : | | | स्कंध | | ३६,००० |
| पद्‌मा | ४५,००० | | उपस्कर | | १४,१०० |
| कुमुद | ३६,००० | ८१,००० | यंत्र सामग्री | | १५,००० |
| | | | इमारत | | ४५,००० |
| | | २,०४,००० | | | २,०४,००० |

**१.०४.२०१९ रोजी त्यांनी आशाला खालील अटींवर भागीदारीत प्रवेश दिला. : –**

१) $\frac{१}{२}$ हिश्यासाठी आशाने ₹ ३०,००० भांडवल आणि ₹ १५,००० ख्याती नगदी आणावी.

२) जुन्या भागीदारांनी ख्यातीची अर्धी रक्कम उचलली.

३) स्कंधाचे १०% आणि यंत्राचे ५% मूल्य कमी करण्यात यावे.

४) संशयित कर्ज निधी ₹ ३,००० पर्यंत ठेवावा.

५) फर्निचरचे मूल्य ₹ १६,०५० पर्यंत करावे व इमारतीचे मूल्य २०% वाढवावे.

**भागीदारीच्या पुस्तकात किर्द नोंदी करा.**

### भागीदारीच्या पुस्तकात किर्दनोंदी

| दिनांक | विवरण | खा.पा. | नावे रक्कम (₹) | जमा रक्कम (₹) |
|---|---|---|---|---|
| २०१९ एप्रिल १ | सामान्य निधी खाते .. ........................................नावे. | | ७,५०० | |
| | पद्‌माच्या भांडवल खात्याला .......................... | | | ४,५०० |
| | कुमुदच्या भांडवल खात्याला .. ........................ | | | ३,००० |
| | ( सामान्य निधी जुन्या भागीदारांना वाटून दिल्याबद्‌दल ) | | | |
| एप्रिल १ | नफा-तोटा समायोजना खाते ................................नावे. | | ४,९५० | |
| | स्कंध खात्याला | | | ३,६०० |
| | यंत्र खात्याला | | | ७५० |
| | संशयित कर्ज निधी खात्याला | | | ६०० |
| | (संपत्ती आणि संशयित कर्जनिधीत वाढ झाल्याबद्‌दल) | | | |
| एप्रिल १ | उपस्कर खाते ..............................................नावे. | | १,९५० | |
| | इमारत खाते ................................................ नावे. | | ९,००० | |
| | नफा -तोटा समायोजन खात्याला | | | १०,९५० |
| | (संपत्तीचे मूल्य वाढविल्याबद्‌दल) | | | |
| एप्रिल १ | बँक खाते ..................................................नावे. | | ३०,००० | |
| | आशाचे भांडवल खात्याला | | | ३०,००० |
| | (आशाने भांडवल आणल्याबद्‌दल) | | | |
| एप्रिल १ | बँक खाते ...................................................नावे. | | १५,००० | |
| | ख्याती खात्याला | | | १५,००० |
| | (आशाने ख्याती रोख आणल्याबद्‌दल) | | | |
| एप्रिल १ | ख्याती खाते ................................................नावे. | | १५,००० | |
| | पद्‌माचे भांडवल खात्याला | | | ९,००० |
| | कुमुदच्या भांडवल खात्याला | | | ६,००० |
| | (त्यागाच्या प्रमाणात ख्याती वाटून दिल्याबद्‌दल) | | | |
| एप्रिल १ | पद्‌माचे भांडवल खाते .......................................नावे. | | ४,५०० | |
| | कुमुदचे भांडवल खाते .........................................नावे. | | ३,००० | |
| | बँक खात्याला | | | ७,५०० |
| | (जुन्या भागीदारांनी ख्यातीची अर्धी रक्कम काढून घेतल्याबद्‌दल | | | |
| एप्रिल १ | नफा-तोटा समायोजना खाते.................................नावे. | | ६,००० | |
| | पद्‌माचे भांडवल खात्याला | | | ३,६०० |
| | कुमुदच्या भांडवल खात्याला | | | २,४०० |
| | (पुनर्मूल्यांकनावरील नफा भागीदारांत वाटून दिल्याबद्‌दल) | | | |

कार्यटिप :

**संस्थेच्या पुस्तकात**

**नफा–तोटा समायोजन खाते**

**नावे** **जमा**

| विवरण | | रक्कम (₹) | विवरण | रक्कम (₹) |
|---|---|---|---|---|
| स्कंध खाते | | ३,६०० | उपस्कर खाते | १,९५० |
| यंत्र खाते | | ७५० | इमारत खाते | ९,००० |
| संशयित कर्ज निधी खाते. | | ६०० | | |
| नफा (भांडवल खात्याला स्थानांतरित) | | | | |
| पद्मा | ३,६०० | | | |
| कुमुद | २,४०० | ६,००० | | |
| | | १०,९५० | | १०,९५० |

**नावे.** **ख्याती खाते** **जमा**

| विवरण | रक्कम (₹) | विवरण | रक्कम (₹) |
|---|---|---|---|
| पद्माचे भांडवल खाते | ९,००० | **बँक खाते** | १५,००० |
| कुमुद चे भांडवल खाते | ६,००० | | |
| | १५,००० | | १५,००० |

**३. आनंद आणि रोहित ४:१ या प्रमाणात नफा –तोटा वाटून घेतात. ३१ मार्च २०१८ रोजी त्यांचा ताळेबंद खालीलप्रमाणे होता.**

**३१ मार्च २०१८ रोजीचा ताळेबंद**

| देयता | | रक्कम (₹) | संपत्ती | रक्कम (₹) |
|---|---|---|---|---|
| भांडवल : | आनंद | १,३५,००० | ख्याती | ९०,००० |
| | रोहित | ७५,००० | उपकरणे | ४५,००० |
| राखीव निधी | | ९०,००० | मालसाठा | ५४,००० |
| धनको | | ५४,००० | ऋणको | १,२०,००० |
| देयविपत्र | | ६,००० | रोकड | ५१,००० |
| | | ३,६०,००० | | ३,६०,००० |

**त्यांनी नचिकेतला खालील अटींवर भागीदारीत प्रवेश देण्याचे ठरवले. :**

१ नचिकेतच्या प्रवेशानंतर ख्यातीचे पूर्णपणे अपलेखन करावे.

२ उपकरणांचे $\frac{१}{४}$ अपलेखन करावे.

३ मालसाठ्याचे १०% अवमूल्यन झाल्यामुळे त्याचे योग्यरित्या समायोजन करावे.

४ ₹ १,८००चे ऋणको वसूल होणारे नाही.

५ $\frac{२}{५}$ हिश्याकरिता नचिकेतने ₹ १,२०,००० भांडवल आणावे.

६ आनंदने भागीदारीतून ₹ ६०,००० ची उचल केली.

पुनर्मूल्यांकन खाते तयार करून ख्यातीशी संबंधित किर्दनोंदी करा.

**उत्तर :**

**नावे** **पुनर्मूल्यांकन खाते** **जमा**

| विवरण | रक्कम (₹) | विवरण | | रक्कम (₹) |
|---|---|---|---|---|
| उपकरण खाते | ११,२५० | मालसाठा | | ६,००० |
| बुडीत खाते | १,८०० | पूनर्मूल्यांकन नफा : | | |
| | | आनंद | ५,६४० | |
| | | रोहित | १,४१० | ७,०५० |
| | १३,०५० | | | १३,०५० |

**रोजकीर्द**

| दिनांक | विवरण | खा.पा. | नावे (₹) | जमा (₹) |
|---|---|---|---|---|
| २०१८ | आनंदचे भांडवल खाते ....................................नावे. | | ७२,००० | |
| मार्च ३१ | रोहितचे भांडवल खाते ...................................नावे. | | १८,००० | |
| | ख्याती खात्याला | | | ९०,००० |
| | (भागीदाराच्या प्रवेशानंतर ख्यातीचे अपलेखन करण्यात आले.) | | | |

४. **खालील ताळेबंद हा मकरंद आणि महेश यांचा आहे. ते ३:२ प्रमाणात नफा-तोटा वाटून घेतात.**

**३१ मार्च २०१९ चा ताळेबंद**

| देयता | रक्कम (₹) | रक्कम (₹) | संपत्ती | रक्कम (₹) | रक्कम (₹) |
|---|---|---|---|---|---|
| **भांडवल खाती** | | | इमारत | | ७२,००० |
| मकरंद | ९५,००० | | यंत्र सामग्री | | ६०,००० |
| महेश | १,००,००० | १,९५,००० | ऋणको | ४२,००० | |
| विविध धनको | | ४,००० | संशयित कर्ज निधी | २,००० | ४०,००० |
| देयविपत्र | | ३,००० | बँक | | २०,००० |
| | | | फर्निचर | | १०,००० |
| | | २,०२,००० | | | २,०२,००० |

**१ एप्रिल २०१९ रोजी त्यांनी मंगेशला खालील अटींवर भागीदारीत प्रवेश दिला. :**

१ $\frac{१}{२}$ हिश्यासाठी त्याने भांडवलाचे ₹ १,००,००० आणि ख्यातीचे ₹ ४०,००० द्यावे.

२ यंत्रसामग्रीचे पुनर्मूल्यांकन ₹ ४८,००० करावे.

३. मकरंदने इमारत ₹ १,००,००० ला घेतली.

४. संशयित कर्ज बुडीत निधी ₹ ४,००० पर्यंत वाढवा

५. जुन्या भागीदारांनी ख्यातीची अर्धी रक्कम व्यवसायातच ठेवण्याचा निर्णय घेतला.

६. जुन्या भागीदारांचे त्यागाचे प्रमाण समान होते.

**भांडवल खाती तयार करा.**

उत्तर :

नावे. भांडवल खाते जमा.

| विवरण | मकरंद (₹) | महेश (₹) | मंगेश (₹) | विवरण | मकरंद (₹) | महेश (₹) | मंगेश( ₹) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| इमारत खाते | १,००,००० | | | शि/ खा./आणली | ९५,००० | १,००,००० | |
| बँक खाते | १०,००० | १०,००० | | बँक खाते | | | १,००,००० |
| शि./खा./ नेली | १३,४०० | १,१५,६०० | १,००,००० | ख्याती खाते | २०,००० | २०,००० | |
| | | | | पुनर्मूल्यांकन खाते | ८,४०० | ५,६०० | |
| | | | | नफा | | | |
| | १,२३,४०० | १,२५,६०० | १,००,००० | | १,२३,४०० | १,२५,६०० | १,००,००० |

कार्यटिप :

नावे पुनर्मूल्यांकन खाते जमा.

| विवरण | | राशी (₹) | विवरण | राशी (₹) |
|---|---|---|---|---|
| यंत्रसामग्री खाते | | १२,००० | इमारत खाते (मकरंदने घेतला) | २८,००० |
| संशयित कर्ज निधी खाते | | २,००० | | |
| नफा (भांडवल खात्याला स्थानांतरित) | | | | |
| मकरंद | ८,४०० | | | |
| महेश | ५,६०० | १४,००० | | |
| | | २८,००० | | २८,००० |

५ **खालील ताळेबंद हा माधुरी व मनिषाचा आहे. त्या ३:२ या प्रमाणात नफा-तोटा वाटून घेतात.**

**३१ मार्च २०१९ रोजीचा ताळेबंद**

| देयता | रक्कम (₹) | संपत्ती | | रक्कम (₹) |
|---|---|---|---|---|
| **भांडवल खाते** | | इमारत | | ७२,००० |
| माधुरी | ८०,००० | यंत्रसामग्री | | ६०,००० |
| मनिषा | १,००,००० | स्कंध | | ४८,००० |
| विविध धनको | ६०,००० | ऋणको | ४२,००० | |
| देयविपत्र | १०,००० | (-) संशयित कर्ज निधी | २,००० | ४०,००० |
| | | बँक | | २०,००० |
| | | फर्निचर | | १०,००० |
| | २,५०,००० | | | २,५०,००० |

**याच तारखेला मोहिनीला खालील अटींवर भागीदारीत प्रवेश देण्यात आला :**

१ तिने ₹ १,००,००० भांडवल व ख्यातीतील हिस्सा ₹ ४०,००० आणावे.

२ नफा-तोटा वाटपाचे नवीन प्रमाण ५:३:२ आहे.

३. संपत्ती देयतांचे खालील प्रमाणे पुनर्मूल्यांकन करावे. :
इमारत ₹ १,००,०००, यंत्रसामग्री ₹ ४८,०००

४. सं.क.निधी. ₹ ४,०००. पर्यंत वाढवा.

५ जुन्या भागीदारांनी ख्यातीची अर्धी रक्कम व्यवसायातच ठेवण्याचा निर्णय घेतात.

६ विविध धनकोचे ₹ ६६,००० पुनर्मूल्यांकन करण्यात आले.

**पुनर्मूल्यांकन खाते, भागीदारांची भांडवल खाती, नवीन ताळेबंद तयार करा.**

**उत्तर:**

**नावे** **पुनर्मूल्यांकन खाते** **जमा**

| विवरण | | रक्कम (₹) | विवरण | रक्कम (₹) |
|---|---|---|---|---|
| यंत्रसामग्री | | १२,००० | इमारत | २८,००० |
| सं.क. निधी | | २,००० | | |
| विविध धनको | | ६,००० | | |
| नफा (भांडवल खात्याला नेला) | | | | |
| माधुरी | ४,८०० | | | |
| मनिषा | ३,२०० | ८,००० | | |
| | | २८,००० | | २८,००० |

**नावे** **भागीदाराचे भांडवल खाते** **जमा**

| विवरण | माधुरी (₹) | मनिषा (₹) | मोहिनी (₹) | विवरण | माधुरी (₹) | मनिषा (₹) | मोहिनी (₹) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| बँक खाते | १०,००० | १०,००० | | शि/खा. आ. | ८०,००० | १,००,००० | |
| | | | | बँक खाते | | | १,००,००० |
| शि/ खा/नेली | ९४,८०० | १,१३,२०० | १,००,००० | ख्याती खाते | २०,००० | २०,००० | |
| | | | | पुनर्मूल्यांकन खाते (नफा) | ४,८०० | ३,२०० | |
| | १,०४,८०० | १,२३,२०० | १,००,००० | | १,०४,८०० | १,२३,२०० | १,००,००० |

**१ एप्रिल २०१९ रोजीचा ताळेबंद**

| देयता | रक्कम (₹) | रक्कम (₹) | संपत्ती | रक्कम (₹) | रक्कम (₹) |
|---|---|---|---|---|---|
| **भांडवल खाते :** | | | इमारत | ७२,००० | |
| माधुरी | ९४,८०० | | (+) वाढ | २८,००० | १,००,००० |
| मनिषा | १,१३,२०० | | यंत्रसामग्री | ६०,००० | |
| मोहिनी | १,००,००० | ३,०८,००० | (–) घट | १२,००० | ४८,००० |
| विविध धनको | ६०,००० | | स्कंध | | ४८,००० |
| (+) वाढ | ६,००० | ६६,००० | ऋणको | ४२,००० | |
| देयविपत्र | | १०,००० | (–) संशयित कर्ज निधी | ४,००० | ३८,००० |
| | | | बँक | | १,४०,००० |
| | | | फर्निचर | | १०,००० |
| | | ३,८४,००० | | | ३,८४,००० |

६. **समीर आणि निशा $\frac{३}{४}$ व $\frac{१}{४}$ या प्रमाणात नफा-तोटा वाटून घेणारे भागीदार आहेत. त्यांचा ३१ मार्च २०१८ रोजीचा ताळेबंद खालीलप्रमाणे.**

**३१ मार्च २०१८ चा ताळेबंद**

| देयता | | रक्कम (₹) | संपत्ती | | रक्कम (₹) |
|---|---|---|---|---|---|
| **भांडवल :** | | | मालसाठा | | ९०,००० |
| समीर | १,५०,००० | | फर्निचर / उपस्कर | | ६०,००० |
| निशा | १,६२,००० | ३,१२,००० | ऋणको | १,५०,००० | |
| | | | संशयित कर्ज निधी | १५,००० | १,३५,००० |
| सामान्य निधी | | ४८,००० | प्राप्य विपत्रे | | ९०,००० |
| धनको | | ९०,००० | हस्तस्थ रोख | | ७५,००० |
| | | ४,५०,००० | | | ४,५०,००० |

त्यांनी $\frac{१}{५}$ हिश्याकरिता १ एप्रिल २०१८ रोजी पूनमला खालील अटींवर भागीदारीत प्रवेश दिला. :

१. पुनमने भांडवल ₹ १,२०,००० आणले.
२. ख्यातीचे मूल्य मागील ५ वर्षाच्या सरासरी नफ्याच्या ४ पट लावावे. पूनमने तिच्या हिश्याची ख्याती नगदी आणावी.
३. संपत्तीचे पुनर्मूल्यांकन खालीलप्रमाणे करावे. :
   उपस्कर ₹ ४५,०००, प्राप्तविपत्रे ₹ १,२०,०००, मालसाठा ₹ ६०,००० ऋणकोवर २०% सं.क.नि. ठेवा.
४. वस्तू खरेदी केल्याबद्दल देय विपत्राची स्वीकृतीची नोंद पुस्तकात करावयाची राहून गेली ₹ १५,०००
५. मागील पाच वर्षातील नफा :
   I ₹ ६०,०००
   II ₹ ४५,०००
   III ₹ ७५,०००
   IV ₹ ३०,०००
   V ₹ ४५,०००

**तयार करा : पुनर्मूल्यांकन खाते, भागीदारांची भांडवल खाती, पुनमच्या प्रवेशानंतरचा ताळेबंद.**

उत्तर :

**नावे.** **पुनर्मूल्यांकन खाते** **जमा**

| विवरण | रक्कम (₹) | विवरण | | रक्कम (₹) |
|---|---|---|---|---|
| उपस्कर खाते | १५,००० | प्राप्त विपत्र | | ३०,००० |
| मालसाठा खाते | ३०,००० | तोटा (भागीदारांच्या भांडवल खात्याला नेला) | | |
| सं.क. निधी | १५,००० | समीर | ३३,७५० | |
| देयविपत्र | १५,००० | निशा | ११,२५० | ४५,००० |
| | ७५,००० | | | ७५,००० |

नावे **भागीदारांचे भांडवल खाते** जमा

| विवरण | समीर (₹) | निशा (₹) | पूनम (₹) | विवरण | समीर (₹) | निशा (₹) | पूनम (₹) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| पुनर्मूल्यांकन खाते (तोटा) | ३३,७५० | ११,२५० | | शि/ खा. आणली | १,५०,००० | १,६२,००० | |
| | | | | ख्याती खाते | ३०,६०० | १०,२०० | |
| शि/खा./नेली | १,८२,८५० | १,७२,९५० | १,२०,००० | सामान्य निधी. | ३६,००० | १२,००० | |
| | | | | रोकड खाते | | | १,२०,००० |
| | २,१६,६०० | १,८४,२०० | १,२०,००० | | २,१६,६०० | १,८४,२०० | १,२०,००० |

**१ एप्रिल २०१८ रोजीचा ताळेबंद**

| देयता | रक्कम (₹) | रक्कम (₹) | संपत्ती | रक्कम (₹) | रक्कम (₹) |
|---|---|---|---|---|---|
| धनको | | ९०,००० | रोकड | | २,३५,८०० |
| देयता | | १५,००० | ऋणको | १,५०,००० | |
| | | | (–) सं.क.नि. | ३०,००० | १,२०,००० |
| **भांडवल :** | | | प्राप्त विपत्रे | ९०,००० | |
| समीर | | १,८२,८५० | (+) वाढ | ३०,००० | १,२०,००० |
| निशा | | १,७२,९५० | मालसाठा | ९०,००० | |
| पूनम | | १,२०,००० | (–) घट | ३०,००० | ६०,००० |
| | | | उपस्कर | | ४५,००० |
| | | ५,८०,८०० | | | ५,८०,८०० |

**कार्य टिप :**

**ख्यातीचे मूल्यांकन**

i) **सरासरी नफा** $= \dfrac{\text{एकूण नफा}}{\text{एकूण वर्षे}}$

∴ **सरासरी नफा** $= \dfrac{६०,००० + ४५,००० + ७५,००० + ३०,००० + ४५,०००}{५ \text{ वर्षे}}$

∴ $\dfrac{२,५५,०००}{५}$ = **₹ ५१,००० सरासरी नफा.**

**ख्याती** = ५१,००० × ४ = ₹ २,०४,०००

ii) **पूनमचा हिस्सा** $= २,०४,००० \times \dfrac{१}{५} =$ ₹ ४०,८००.

**ख्यातीची हाताळणी (Treatment of Goodwill)**

| दिनांक | विवरण | खा.पा. | नावे रक्कम (₹) | जमा रक्कम (₹) |
|---|---|---|---|---|
| २०१६<br>१ एप्रील | रोकड खाते .............................................नावे.<br>पूनमच्या भांडवल खात्याला<br>ख्याती खात्याला<br>(पूनमने भांडवल व ख्याती नगदी आणल्याबद्दल) | | १,६०,८०० | <br>१,२०,०००<br>४०,८०० |
| १ एप्रील | ख्याती खाते .............................................नावे.<br>समीरच्या भांडवल खात्याला<br>निशाच्या भांडवल खात्याला<br>(जुन्या भागीदारांना ख्यातीची रक्कम वाटून दिल्याबद्दल) | | ४०,८०० | <br>३०.६००<br>१०,२०० |

७. ३:१ या प्रमाणात नफा-तोटा वाटून घेणारे भावेश व चंद्रा यांचा ३१ मार्च २०१८ रोजीचा ताळेबंद खालीलप्रमाणे. :

**३१ मार्च, २०१८ रोजीचा ताळेबंद**

| देयता | रक्कम (₹) | रक्कम (₹) | संपत्ती | रक्कम (₹) | रक्कम (₹) |
|---|---|---|---|---|---|
| धनको | | २०,००० | बँक | | २०,००० |
| कर्मचारी नुकसान भरपाई निधी | | ३०,००० | ऋणको | १३,००० | |
| सामान्य निधी | | २४,००० | (−) संशयित कर्ज निधी | १,००० | १२,००० |
| भावेशचे भांडवल | | ३२,००० | प्राप्त विपत्रे | | १०,००० |
| चंद्राचे भांडवल | | २८,००० | मालसाठा | | २०,००० |
| | | | जमीन व इमारत | | ३०,००० |
| | | | ख्याती | | ४२,००० |
| | | १,३४,००० | | | १,३४,००० |

**१.४.२०१८ रोजी आलियाला $\frac{१}{५}$ हिश्यासाठी भागीदारीत खालील अटींवर प्रवेश दिला. :**

१ आलियाने ख्यातीतील हिस्सा ₹. २०,००० नगदी आणावा.आणि आवश्यक भांडवलातील हिस्सापण नगदी आणावा.

२ जुनी ग्राहक अंजूचे खाते बुडीत कर्ज म्हणून बाद केले होते. तिने ₹. ४०० देऊन खात्याचा पूर्ण हिशेब चुकता केला.

३. जमीन व इमारतीचे बाजारमूल्य ₹. ४०,००० समजावे.

४. कर्मचारी नुकसान भरपाई निधी ₹. ४०,००० करण्यात आले.

५. चालू वर्षातील ₹. २०० अप्राप्त व्याज आहे.

६. सर्व समायोजन नोंदी झाल्यानंतर जुन्या भागीदारांच्या भांडवल खात्याच्या आधारे नवीन नफा-तोटा वाट्याच्या प्रमाणात भांडवलाचे समायोजन करावे.

७. नवीन ताळेबंदात ख्याती दाखवू नये.

**तयार करा. पुनर्मूल्यांकन खाते, भागीदारांची भांडवल खाती आणि संस्थेचा नवीन ताळेबंद**

उत्तर :

नावे **पुनर्मूल्यांकन खाते** जमा

| विवरण | | रक्कम (₹) | विवरण | रक्कम (₹) |
|---|---|---|---|---|
| कर्मचारी नुकसान भरपायी निधी | | १०,००० | अप्राप्त उत्पन्न | २०० |
| पुनर्मूल्यांकन नफा (भांडवल खात्याला स्थानांतरित केला) | | | जमीन व इमारत | १०,००० |
| भावेश | ४५० | | बुडीत कर्ज वसुली | ४०० |
| चंद्रा | १५० | ६०० | | |
| | | १०,६०० | | १०,६०० |

नावे **भागीदारांची भांडवल खाती** जमा

| विवरण | भावेश (₹) | चंद्रा (₹) | आलिया (₹) | विवरण | भावेश (₹) | चंद्रा (₹) | आलिया (₹) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ख्याती खाते | ३१,५०० | १०,५०० | | शि./ खा./ आणली | ३२,००० | २८,००० | |
| रोकड खाते (भांडवल परत) | | १३,००० | | राखीव निधी | १८,००० | ६,००० | |
| शि / खा. नेली | ४६,९५० | १५,६५० | १५,६५० | पुनर्मूल्यांकन नफा | ४५० | १५० | |
| | | | | ख्याती | १५,००० | ५,००० | |
| | | | | रोकड खाते (भांडवल) | १३,००० | | १५,६५० |
| | ७८,४५० | ३९,१५० | १५,६५० | | ७८,४५० | ३९,१५० | १५,६५० |

**१ एप्रिल २०१८ रोजीचा ताळेबंद**

| देयता | रक्कम (₹) | रक्कम (₹) | संपत्ती | रक्कम (₹) | रक्कम (₹) |
|---|---|---|---|---|---|
| धनको | | २०,००० | रोकड | | ३६,०५० |
| कर्मचारी नुकसान भरपाई निधी | ३०,००० | ४०,००० | बँक | | २०,००० |
| (+) वाढ | १०,००० | | ऋणको | १३,००० | |
| **भांडवल** | | | (–) संशयित कर्ज निधी | १,००० | १२,००० |
| भावेश | ४६,९५० | | प्राप्त विपत्र | | १०,००० |
| चंद्रा | १५,६५० | | मालसाठा | | २०,००० |
| आलिया | १५,६५० | ७८,२५० | जमीन व इमारत | ३०,००० | |
| | | | (+) वाढ | १०,००० | ४०,००० |
| | | | अप्राप्त उत्पन्न | | २०० |
| | | १,३८,२५० | | | १,३८,२५० |

कार्यटिप :

**समायोजित भांडवल**

समायोजनेनंतर भावेशचे भांडवल ............. ₹ ३३,९५०

समायोजनेनंतर चंद्राचे भांडवल ............ ₹ २८,६५०

$\frac{४}{५}$ हिश्यासाठी भावेश व चंद्राचे एकूण भांडवल ............ ₹ ६२,६००

संस्थेचे एकूण भांडवल = रु. ६२,६०० × $\frac{५}{४}$ = ₹ ७८,२५०

भावेश, चंद्रा आणि आलियाचे नवीन प्रमाण : ३:१:१

भावेशचे भांडवल ₹ ७८,२५० × $\frac{३}{५}$ = ₹ ४६,९५०

₹ ४६,९५०

चंद्रांचे भांडवल ₹ ७८,२५० × $\frac{१}{५}$ = ₹ १५,६५०

₹ १५,६५०

आलियाचे भांडवल ₹ ७८,२५० × $\frac{१}{५}$ = ₹ १५,६५०

₹ ७८,२५०

**ख्यातीच्या नोंदी**

| दिनांक | विवरण | खा.पा. | नावे रक्कम (₹) | जमा रक्कम (₹) |
|---|---|---|---|---|
| २०१८ १ एप्रील | रोकड खाते ................................................नावे. | | २०,००० | |
| | ख्याती खात्याला | | | २०,००० |
| | (आलियाने ख्याती नगदी आणल्याबद्दल ) | | | |
| १ एप्रील | ख्याती खाते ................................................नावे. | | २०,००० | |
| | भावेशचे भांडवल खात्याला | | | १५,००० |
| | चंद्राचे भांडवल खात्याला | | | ५,००० |
| | (ख्यातीची रक्कम जुन्या भागीदारांना वाटून दिल्याबद्दल) | | | |
| १ एप्रील | भावेशचे भांडवल खाते ....................................नावे. | | ३१,५०० | |
| | चंद्राचे भांडवल खाते ......................................नावे. | | १०,५०० | |
| | ख्याती खात्याला | | | ४२,००० |
| | (ख्यातीचे अपलेखन केल्याबद्दल ) | | | |

८. **आदिल आणि समीर २:१ या प्रमाणात नफा-तोटा वाटून घेणारे भागीदार आहेत. ३१ मार्च २०१८ रोजी त्यांचा ताळेबंद खालीलप्रमाणे होता.**

**३१ मार्च २०१८ रोजीचा ताळेबंद**

| देयता | रक्कम (₹) | रक्कम (₹) | संपत्ती | रक्कम (₹) | रक्कम (₹) |
|---|---|---|---|---|---|
| **भांडवल :** | | | जमीन व इमारत | | ७५,००० |
| आदिल | ९०,००० | | गुंतवणूक | | १,०८,००० |
| समीर | ४८,६०० | १,३८,६०० | ऋणको | | ३९,००० |
| गुंतवणूक चढउतार निधी | | १५,००० | ख्याती | | १२,००० |
| सामान्य निधी | | १२,००० | नफा-तोटा खाते | | १२,००० |
| विविध धनको | | ६३,००० | आस्थगित महसुली खर्च | | १२,००० |
| देयविपत्र | | ६०,००० | रोकड | | ३०,६०० |
| | | २,८८,६०० | | | २,८८,६०० |

**१.४.२०१८ रोजी त्यांनी राजूला खालील अटीवर प्रवेश दिला. :**

१ राजूने भांडवल ₹ ३०,००० आणावे त्याला नफ्यात $\frac{१}{४}$ हिस्सा द्यावा.

२ राजुने ख्यातीचे ₹ १५,००० आणले. आदिलने व समीरने ख्यातीची ५०% राशी काढून घेतली.

३. संशयित कर्ज निधी १०%. निर्माण करा.

४. जमीन व इमारतीचे मूल्य ₹ ३०,००० ने वाढवा.

५. गुंतवणूकीचे मूल्य ₹ २२,५०० ने कमी करण्यात आले होते.

६. धनकोचे मूल्य ₹ ६२,२५०. लावावे. आदिल व समीरचे भांडवल राजूच्या भांडवला आधारे समायोजित करावे. कमी पडलेली रोख आणावी किंवा जास्तीची काढून घ्यावी.

**तयार करा : पुनर्मूल्यांकन खाते, भागीदारांची भांडवल खाती आणि संस्थेचा १.४. २०१८ रोजीचा ताळेबंद.**

**उत्तर :**

**नावे** **पुनर्मूल्यांकन खाते** **जमा**

| विवरण | | रक्कम (₹) | विवरण | रक्कम (₹) |
|---|---|---|---|---|
| बुडीत व सं.क.निधी | | ३,९०० | जमीन आणि इमारत | ३०,००० |
| गुंतवणूक खाते (२२५००– १५०००) | | ७,५०० | धनकोचे खाते | ७५० |
| नफा (भांडवल खात्याला स्थानांतरित) | | | | |
| आदिल | १२,९०० | | | |
| समीर | ६,४५० | १९,३५० | | |
| | | ३०,७५० | | ३०,७५० |

**नावे** **भागीदारांचे भांडवल खाते** **जमा**

| विवरण | आदिल (₹) | समीर (₹) | राजू (₹) | विवरण | आदिल (₹) | समीर (₹) | राजू (₹) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ख्याती खाते | ८,००० | ४,००० | | शि./खा./ आणली | ९०,००० | ४८,६०० | |
| आस्थगित महसुली | ८,००० | ४,००० | | पुनर्मूल्यांकन खाते | १२,९०० | ६,४५० | |
| रोकड खाते | ५,००० | २,५०० | | रोकड खाते | | | ३०,००० |
| नफा-तोटा खाते | ८,००० | ४,००० | | ख्याती खाते | १०,००० | ५,००० | |
| रोकड खाते (अतिरिक्त भांडवल) | ३१,९०० | १९,५५० | | सामान्य निधी खाते | ८,००० | ४,००० | |
| शि/खा./ नेली | ६०,००० | ३०,००० | ३०,००० | | | | |
| | १,२०,९०० | ६४,०५० | ३०,००० | | १,२०,९०० | ६४,०५० | ३०,००० |

**१ एप्रिल २०१८ रोजीचा ताळेबंद**

| देयता | रक्कम (₹) | रक्कम (₹) | संपत्ती | रक्कम (₹) | रक्कम (₹) |
|---|---|---|---|---|---|
| देय विपत्र | | ६०,००० | रोकड | | १६,६५० |
| विविध धनको | | ६२,२५० | ऋणको | ३९,००० | |
| भांडवल खाते : | | | (–) सं.क.नि. | ३,९०० | ३५,१०० |
| आदिल | ६०,००० | | गुंतवणूक | | ८५,५०० |
| समीर | ३०,००० | | जमीन व इमारत | | १,०५,००० |
| राजू | ३०,००० | १,२०,००० | | | |
| | | २,४२,२५० | | | २,४२,२५० |

**सूचना :**

भागीदाराच्या प्रवेशावेळी जेव्हां भागीदाराच्या पुस्तकात पूर्वीपासूनच ख्याती निर्माण केलेली असते, तेव्हां त्या ख्यातीचे जुन्या नफा–तोटा वाटपाच्या प्रमाणात अपलेखन करण्यात आलेले असते.

**कार्य टिपा :**

१) आदिलचा हिस्सा $= \frac{१}{४}$

शिल्लक प्रमाण $= १ - \frac{१}{४} = \frac{३}{४}$

आदिलचे नवीन प्रमाण $= \frac{२}{३} \times \frac{३}{४} = \frac{६}{१२} = \frac{२}{४}$

समीरचे नवीन प्रमाण $= \frac{१}{३} \times \frac{३}{४} = \frac{३}{१२} = \frac{१}{४}$

नवीन प्रमाण = २: १:१

या प्रमाणात भांडवलाचे समायोजन केले.

२) गुंतवणुकीच्या मूल्यातील बदलाचा उपयोग हा गुंतवणुकीच्या चढउतारासाठी करण्यात येतो.

९. **खालील ताळेबंद हा 'त्रिवेणी ट्रेडर्स' यांचा आहे. नर्मदा आणि गोदावरी ह्या ३:२ प्रमाणात नफा–तोटा वाटून घेतात.**

**३१ मार्च २०१९ रोजीचा ताळेबंद**

| देयता | रक्कम (₹) | रक्कम (₹) | संपत्ती | रक्कम (₹) | रक्कम (₹) |
|---|---|---|---|---|---|
| धनको | | ४९,६०० | बँकेतील रोख | | ४,००० |
| भांडवल : | | | इमारत | | २०,००० |
| नर्मदा | २८,००० | | यंत्र | | २८,००० |
| गोदावरी | २८,००० | ५६,००० | उपस्कर | | १,२०० |
| | | | स्कंध | | १६,४०० |
| | | | ऋणको | | ३६,००० |
| | | १,०५,६०० | | | १,०५,६०० |

१.४.२०१९ रोजी त्यांनी खालील शर्तीवर कावेरीला भागीदारीत घेतले. :

१ कावेरी ने ख्यातीकरिता ₹ ४,००० आणावे ही रक्कम व्यवसायातच ठेवावी.

२ भविष्यातील $\frac{१}{४}$ हिश्याकरिता ₹ १५,००० भांडवल आणावे.

३. संपत्तीचे खालीलप्रमाणे पुनर्मूल्यांकन करण्यात आले. :

इमारत ₹ २४०००, यंत्र आणि उपस्कराचे १०%, अवमूल्यन आणि ऋणकोवर ५% सं.क. निधी निर्माण करावा. स्कंधाचे मूल्य ₹२०,००० करावे.

४. भांडवलाचे नफा–तोटा वाटपाच्या प्रमाणात समायोजन केल्यावर दिसणारी नर्मदा आणि गोदावरीच्या भांडवल खात्यावर जास्तीची शिल्लक कर्ज खात्याला न्यावी.

**तयार करा : नफा–तोटा समायोजन खाते, भागीदारांचे भांडवल खाते आणि नवीन ताळेबंद.**

**उत्तर :**

**नावे.** **नफा–तोटा समायोजन खाते** **जमा**

| विवरण | | रक्कम (₹) | विवरण | रक्कम (₹) |
|---|---|---|---|---|
| यंत्र खाते | | २,८०० | इमारत | ४,००० |
| उपस्कर खाते | | १२० | स्कंध | ३,६०० |
| संशयित कर्ज निधी | | १,८०० | | |
| नफा (भांडवल खात्याला स्थानंतरित) | | | | |
| नर्मदा | १,७२८ | | | |
| गोदावरी | १,१५२ | २,८८० | | |
| | | ७,६०० | | ७,६०० |

**नावे** **भागीदारांचे भांडवल खाते** **जमा.**

| विवरण | नर्मदा (₹) | गोदावरी (₹) | कावेरी (₹) | विवरण | नर्मदा (₹) | गोदावरी (₹) | कावेरी (₹) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| कर्ज खाते | १०,५२८ | १६,३५२ | | शि/खा/ नेली | २८,००० | २८,००० | |
| शि/ खा/ नेली | २१,६०० | १४,४०० | १२,००० | बँक खाते | | | १२,००० |
| | | | | ख्याती | २,४०० | १,६०० | |
| | | | | नफा | १,७२८ | १,१५२ | |
| | ३२,१२८ | ३०,७५२ | १२,००० | | ३२,१२८ | ३०,७५२ | १२,००० |

**१.४. २०१९ रोजीचा ताळेबंद**

| देयता | रक्कम (₹) | रक्कम (₹) | मालमत्ता | | रक्कम (₹) |
|---|---|---|---|---|---|
| **भांडवल :** | | | इमारत | २०,००० | |
| नर्मदा | २१,६०० | | (+) वाढ | ४,००० | २४,००० |
| गोदावरी | १४,४०० | | यंत्र | २८,००० | |
| कावेरी | १२,००० | ४८,००० | (–) घट | २,८०० | २५,२०० |
| | | | उपस्कर | १,२०० | |
| **कर्ज खाते :** | | | (–) घट | – १२० | १,०८० |
| नर्मदा | १०,५२८ | | स्कंध | १६,४०० | |
| गोदावरी | १६,३५२ | २६,८८० | (+) वाढ | ३,६०० | २०,००० |
| धनको | | ४९,६०० | ऋणको | ३६,००० | |
| | | | (–) सं.क.नि. | १,८०० | ३४,२०० |
| | | | बँकेतील रोख | | २०,००० |
| | | १,२४,४८० | | | १,२४,४८० |

१०. **कबीर आणि रेश्मा ४:१ प्रमाणात नफा–तोटा वाटून घेणारे भागीदार आहेत. त्यांचा ३१ मार्च २०१९ चा ताळेबंद :**

**३१ मार्च २०१९ रोजीचा ताळेबंद**

| देयता | रक्कम (₹) | रक्कम (₹) | संपत्ती | रक्कम (₹) | रक्कम (₹) |
|---|---|---|---|---|---|
| **भांडवल :** | | | | | |
| कबीर | १,०५,००० | | ख्याती | | ६६,००० |
| रेश्मा | ७५,००० | १,८०,००० | विविध ऋणको | ३०,००० | |
| | | | (–) संशयित कर्ज निधी | ३,००० | २७,००० |
| सामान्य निधी | | ३०,००० | जमीन व इमारत | | १,००,००० |
| नफा–तोटा खाते | | ६,००० | बँक | | ८३,००० |
| खरेदीबद्दल धनको | | ४८,००० | | | |
| खर्चाबद्दल धनको | | १२,००० | | | |
| | | २,७६,००० | | | २,७६,००० |

**१ एप्रिल २०१९ रोजी त्यांनी सुवर्णाला खालील अटींवर भागीदारीत प्रवेश दिला. :**

१ भविष्यातील नफ्याच्या २०% हिश्यासाठी तिने भांडवल ₹ ४५,००० आणावे.

२ ख्यातीचे मूल्य ₹ ७५,००० करावे

३. संशयित कर्ज निधीची गरज नाही.

४. ₹ ४,५००चे भाडे अप्राप्त आहे.

५. चालू खात्याच्या माध्यमातून भागीदारांचे भांडवल खाते, नवीन नफा–तोटा वाटपाच्या प्रमाणात समायोजित करा.

**तयार करा: १) नफा–तोटा समायोजन खाते २) भागीदारांचे भांडवल खाते ३) नवीन ताळेबंद.**

उत्तर :

नावे. **नफा–तोटा समायोजन खाते** जमा

| विवरण | | रक्कम (₹) | विवरण | रक्कम (₹) |
|---|---|---|---|---|
| नफा (भांडवल खात्याला स्थानांतरित) | | | सं.क.निधी | ३,००० |
| कबीर | ६,००० | | अप्राप्त भाडे | ४,५०० |
| रेश्मा | १,५०० | ७,५०० | | |
| | | ७,५०० | | ७,५०० |

नावे **भागीदारांचे भांडवल खाते** जमा

| विवरण | कबीर (₹) | रेश्मा (₹) | सुवर्णा (₹) | विवरण | कबीर (₹) | रेश्मा (₹) | सुवर्णा (₹) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| शि/ खा. नेली | १,४४,००० | ३६,००० | ४५,००० | शि/ खा/ नेली | १,०५,००० | ७५,००० | |
| चालू खाते | ३,००० | ४९,५०० | | सामान्य निधी | २४,००० | ६,००० | |
| | | | | नफा–तोटा खाते | ४,८०० | १,२०० | |
| | | | | बँक खाते | | | ४५,००० |
| | | | | ख्याती खाते | ७,२०० | १,८०० | |
| | | | | नफा | ६,००० | १,५०० | |
| | १,४७,००० | ८५,५०० | ४५,००० | | १,४७,००० | ८५,५०० | ४५,००० |

**१.४. २०१९ रोजीचा ताळेबंद**

| देयता | रक्कम (₹) | रक्कम (₹) | मालमत्ता | रक्कम (₹) | रक्कम (₹) |
|---|---|---|---|---|---|
| **भांडवल खाते :** | | | ख्याती | | ७५,००० |
| कबीर | १,४४,००० | | ऋणको | | ३०,००० |
| रेश्मा | ३६,००० | | जमीन व इमारत | | १,००,००० |
| सुवर्णा | ४५,००० | २,२५,००० | बँक | | १,२८,००० |
| | | | अप्राप्त भाडे | | ४,५०० |
| **चालू खाते :** | | | | | |
| कबीर | ३,००० | | | | |
| रेश्मा | ४९,५०० | ५२,५०० | | | |
| खरेदीबद्दल धनको | | ४८,००० | | | |
| खर्चाबद्दल धनको | | १२,००० | | | |
| | | ३,३७,५०० | | | ३,३७,५०० |

**११. तारा, चंद्रा आणि सूर्य हे एका भागीदारीत २:३:१ या प्रमाणात नफा–तोटा वाटून घेतात. त्यांनी ३१ मार्च २०१७ रोजी आकाशला प्रवेश दिला. त्यांच्या त्याच दिवशीचा ताळेबंद पुढीलप्रमाणे.**

**३१ मार्च २०१८ रोजीचा ताळेबंद**

| देयता | रक्कम (₹) | मालमत्ता | रक्कम (₹) |
|---|---|---|---|
| चंद्राचे भांडवल | १,०५,००० | उपस्कर | ३०,००० |
| सूर्याचे भांडवल | ६६,००० | मोटार कार | ६०,००० |
| | | रोकड | ५४,००० |
| | | ताराचे भांडवल | २७,००० |
| | १,७१,००० | | १,७१,००० |

नफा–तोटा वाटपातील आकाशचा हिस्सा $\frac{१}{४}$ असेल आणि इतर भागीदारांमधील नफा–तोटा वाटपाचे प्रमाण पूर्वीप्रमाणेच असेल. आकाशच्या प्रवेशाकरिता खालील समायोजना करावयाच्या आहेत. :

१ चंद्रा ने मोटार कार ₹ ७५,००० ला ठेऊन घेतली.

२ फर्निचर (उपस्कर) चे मूल्य ₹ ५४,००० लावण्यात आले.

३. पुस्तकात ₹ १,५०,००० ने ख्याती खाते उघडा.

४. अनोंदीत ऋणको ₹ ३३,०००.

५. अदत्त खर्चाबद्दल देणे ₹ ९,०००.

६. आकाश ने भांडवलाबद्दल ₹ ६०,००० आणावे.

**आवश्यक किर्दनोंदी देऊन आकाशच्या प्रवेशानंतरचा ताळेबंद तयार करा.**

उत्तर :

**भागीदारीच्या पुस्तकात रोजकीर्द नोंदी**

| दिनांक | विवरण | खा.पा | नावे राशी (₹) | जमा राशी (₹) |
|---|---|---|---|---|
| १ | ख्याती खाते ................................................ नावे | | १,५०,००० | |
| | ताराचे चे भांडवल खात्याला | | | ५०,००० |
| | चंद्राचे भांडवल खात्याला | | | ७५,००० |
| | सूर्य चे भांडवल खात्याला | | | २५,००० |
| | (भागीदारीच्या पुस्तकात ख्याती खाते उघडल्याबद्दल) | | | |
| २ | चंद्राचे भांडवल खाते ........................................ नावे | | ७५,००० | |
| | मोटारकार खात्याला | | | ७५,००० |
| | (चंद्राने मोटारकार ₹ ७५,०००० ला घेतली) | | | |
| ३ | नफा–तोटा समा.खाते ....................................... नावे | | ९,००० | |
| | अदत्त खर्च खात्याला | | | ९,००० |
| | (अदत्तखर्चाची नोंद केल्याबद्दल) | | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ४ | मोटारकार खाते ............................................. नावे | | १५,००० | |
| | ऋणकोचे खाते .. ............................................ नावे | | ३३,००० | |
| | उपस्कर खाते .. ............................................ नावे | | २४,००० | |
| | नफा-तोटा समायोजन खात्याला | | | ७२,००० |
| | (अनोंदित ऋणकोची नोंद घेतल्याबद्दल आणि मोटार व उपस्कराच्या मूल्यात वाढ झाल्याबद्दल) | | | |
| ५ | रोकड खाते ............................................. नावे | | ६०,००० | |
| | आकाशच्या भांडवल खात्याला | | | ६०,००० |
| | (आकाशने भांडवल आणल्याबद्दल ) | | | |
| ६ | नफा-तोटा समायोजन खाते.................................. नावे | | ६३,००० | |
| | ताराचे भांडवल खात्याला | | | २१,००० |
| | चंद्र च्या भांडवल खात्याला | | | ३१,५०० |
| | सूर्यच्या भांडवल खात्याला | | | १०,५०० |
| | (पुनर्मूल्यांकनावरील नफा जुन्या भागीदारांना वाटून दिल्याबद्दल ) | | | |

**३१ मार्च २०१८ रोजीचे ताळेबंद**

| देयता | रक्कम (₹) | रक्कम (₹) | संपत्ती | रक्कम (₹) | रक्कम (₹) |
|---|---|---|---|---|---|
| भांडवल खाती : | | | ख्याती | | १,५०,००० |
| तारा | ४४,००० | | उपस्कर | | ५४,००० |
| चंद्र | १,३६,५०० | | ऋणको | | ३३,००० |
| सूर्य | १,०१,५०० | | रोकड | | १,१४,००० |
| आकाश | ६०,००० | ३,४२,००० | | | |
| अदत्त खर्च | | ९,००० | | | |
| | | ३,५१,००० | | | ३,५१,००० |

**१२. प्रवीण आणि दीपक ३:१ या प्रमाणात नफा-तोटा वाटून घेणारे भागीदार आहेत. ३१ मार्च २०१९ रोजी त्यांचा ताळेबंद खालीलप्रमाणे होता.**

**३१ मार्च २०१९ रोजीचा ताळेबंद**

| देयता | रक्कम (₹) | रक्कम (₹) | संपत्ती | रक्कम (₹) | रक्कम (₹) |
|---|---|---|---|---|---|
| धनको | | ६०,००० | ऋणको | १,००,००० | |
| देयविपत्र | | २,००० | (-) सं.क.नि. | १०,००० | ९०,००० |
| राखीवनिधी | | ३२,००० | | | |
| अदत्त वेतन | | ६,००० | स्कंध | | ६०,००० |
| भांडवल : | | | प्राप्त विपत्र | | २०,००० |
| प्रवीण | १,२०,००० | | एकस्वधिकार | | २,००० |
| दीपक | ४०,००० | १,६०,००० | यंत्र | | ८०,००० |
| | | | रोकड | | ८,००० |
| | | २,६०,००० | | | २,६०,००० |

याच तारखेला त्यांनी संदिपला भागीदारीत प्रवेश दिला. नवीन नफा-तोटा वाटपाचे प्रमाण ३:२:३ ठरले असून त्याने भांडवल ₹ ९६,००० आणावे. इतर अटी पुढीलप्रमाणे.

१. संदिपने खाजगीरित्या भागीदारांना ख्यातीकरिता ₹ ३२,००० दिले.

२. संशयित कर्ज निधी वरील तरतूद ₹ ४,००० ने कमी करा.

३. जुने संगणक ₹ ४८,०० चे जमा-खर्चाच्या पुस्तकात त्याची नोंद नाही. त्याची नोंद करावी.

४. एकस्वधिकाराचे अपलेखन करावे.

**तयार करा : पुनर्मूल्यांकन खाते, भागीदारांचे भांडवल खाते आणि नवीन ताळेबंद**

उत्तर :

**नावे** **पुनर्मूल्यांकन खाते** **जमा**

| तपशील | | रक्कम (₹) | तपशील | रक्कम (₹) |
|---|---|---|---|---|
| एकस्वधिकार खाते | | २,००० | संशयित कर्ज निधी | ४,००० |
| भांडवल खाते (नफा) | | | जुने संगणक | ४,८०० |
| प्रवीण | ५,१०० | | | |
| दीपक | १,७०० | ६,८०० | | |
| | | ८,८०० | | ८,८०० |

**नावे** **भांडवल खाते** **जमा**

| विवरण | प्रवीण(₹) | दीपक (₹) | संदिप (₹) | विवरण | प्रवीण (₹) | दीपक (₹) | संदिप (₹) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| शि /खा/ नेली | १,४९,१०० | ४९,७०० | ९६,००० | शि/खा/ आणली | १,२०,००० | ४०,००० | |
| | | | | राखीव निधी | २४,००० | ८,००० | |
| | | | | नफा | ५,१०० | १,७०० | |
| | | | | बँक खाते | | | ९६,००० |
| | १,४९,१०० | ४९,७०० | ९६,००० | | १,४९,१०० | ४९,७०० | ९६,००० |

**३१ मार्च २०१९ रोजीचा ताळेबंद**

| देयता | रक्कम (₹) | रक्कम (₹) | संपत्ती | रक्कम (₹) | रक्कम (₹) |
|---|---|---|---|---|---|
| धनको | | ६०,००० | ऋणको | १,००,००० | |
| देयविपत्र | | २,००० | (-) संशयित कर्ज निधी | ६,००० | ९४,००० |
| अदत्त वेतन | | ६,००० | स्कंध | | ६०,००० |
| **भांडवल :** | | | प्राप्त विपत्र | | २०,००० |
| प्रवीण | १,४९,१०० | | यंत्र | | ८०,००० |
| दीपक | ४९,७०० | | संगणक | | ४,८०० |
| संदिप | ९६,००० | २,९४,८०० | रोकड | | १,०४,००० |
| | | ३,६२,८०० | | | ३,६२,८०० |

१३. राधा आणि विकास ३:२ या प्रमाणात नफा-तोटा वाटून घेणारे भागीदार आहेत. ३१ मार्च २०१९ रोजी त्यांचा ताळेबंद खालीलप्रमाणे होता.

**३१ मार्च २०१९ रोजीचा ताळेबंद**

| देयता | | रक्कम (₹) | संपत्ती | रक्कम (₹) |
|---|---|---|---|---|
| भांडवल : | | | परिसर | २,८०,००० |
| राधा | २,००,००० | | उपस्कर | २२,८०० |
| विकास | १,२०,००० | ३,२०,००० | स्कंध | ५४,००० |
| चालू खाते : | | | ऋणको | १८,२०० |
| राधा | २,४०० | | बँक शिल्लक | २,२०० |
| विकास | २,८०० | ५,२०० | | |
| बाळूचे कर्ज | | ४०,००० | | |
| धनको | | १२,००० | | |
| | | ३,७७,२०० | | ३,७७,२०० |

१, एप्रिल २०१९ रोजी त्यांनी ओमला खालील अटीवर भागीदारीत प्रवेश दिला.

१ परिसरमूल्य ₹ ३,४०,००० करावे. उपस्कराचे मूल्य ₹ २०,८०० लावावे. संशयित कर्ज निधी ₹ २,००० निर्माण करावी. स्कंधाचे मूल्य ₹ ५८,००० लावावे.

२. ओम ने भांडवल म्हणून ₹ ८०,००० आणावे आणि ख्यातीकरिता ₹ २०,००० आणावे व ही रक्कम व्यवसायातच ठेवावी. त्याला नफ्यातील $\frac{१}{४}$ हिस्सा द्यावा.

३ बाळूकडील कर्जाची परतफेड NEFT ने करावी.

**तयार करा : नफा-तोटा समायोजन खाते, भागीदारांचे चालू खाते, नवीन ताळेबंद.**

उत्तर :

**नावे** **पुनर्मूल्यांकन खाते** **जमा**

| विवरण | | रक्कम (₹) | विवरण | रक्कम (₹) |
|---|---|---|---|---|
| उपस्कर | | २,००० | परिसर | ६०,००० |
| संशयित कर्ज निधी | | २,००० | स्कंध | ४,००० |
| नफा (चालू खात्याला स्थानंतरित) | | | | |
| राधा | ३६,००० | | | |
| विकास | २४,००० | ६०,००० | | |
| | | ६४,००० | | ६४,००० |

**नावे** **भागीदारांची चालू खाती** **जमा**

| विवरण | राधा (₹) | विकास (₹) | विवरण | राधा (₹) | विकास (₹) |
|---|---|---|---|---|---|
| शि./ खा./नेली | ५०,४०० | ३४,८०० | शि/ खा/ आनली | २,४०० | २,८०० |
| | | | ख्याती खाते | १२,००० | ८,००० |
| | | | पुनर्मूल्यांकन खाते (नफा) | ३६,००० | २४,००० |
| | ५०,४०० | ३४,८०० | | ५०,४०० | ३४,८०० |

**नवीन ताळेबंद**

| देयता | रक्कम (₹) | रक्कम (₹) | संपत्ती | रक्कम (₹) | रक्कम (₹) |
|---|---|---|---|---|---|
| भांडवल : | | | व्यवसाय परिसर | २,८०,००० | |
| राधा | २,००,००० | | (+) वाढ | ६०,००० | ३,४०,००० |
| विकास | १,२०,००० | | उपस्कर | २२,८०० | |
| ओम | ८०,००० | ४,००,००० | (–) घट | २,००० | २०,८०० |
| चालू खाती : | | | स्कंध | ५४,००० | |
| राधा | | ५०,४०० | (+) वाढ | ४,००० | ५८,००० |
| विकास | | ३४,८०० | ऋणको | १८,२०० | |
| धनको | | १२,००० | (–) संशयित कर्ज निधी | २,००० | १६,२०० |
| | | | बँक शिल्लक | | ६२,२०० |
| | | ४,९७,२०० | | | ४,९७,२०० |

**१४. साहिल आणि वनिता ३:१ या प्रमाणात नफा–तोटा वाटून घेणारे भागीदार आहेत. ३१ मार्च २०१९ रोजी त्यांचा ताळेबंद खालीलप्रमाणे होता.**

**३१ मार्च २०१९ रोजीचा ताळेबंद**

| देयता | रक्कम (₹) | रक्कम (₹) | संपत्ती | रक्कम (₹) | रक्कम (₹) |
|---|---|---|---|---|---|
| भांडवल : | | | इमारत | | ९०,००० |
| साहिल | ९०,००० | | स्कंध | | ६०,००० |
| | ७५,००० | १,६५,००० | ऋणको | | ४६,५०० |
| वनिता | | | रोकड | | ६,००० |
| धनको | | ३१,५०० | | | |
| सामान्य निधी | | ६,००० | | | |
| | | २,०२,५०० | | | २,०२,५०० |

खालील अटीवर दिनेशला भागीदारीत प्रवेश दिला. :

१ संस्थेच्या नफ्यात त्याला $\frac{१}{४}$ हिस्सा द्यावा.

२. भांडवल म्हणून त्याने ₹ ६०,००० आणि ख्याती करिता ₹ ३०,००० नगदी आणावे.

३ ₹ १२,००० ने इमारतीचे अधिमूल्यन करण्यात आले व स्कंधाचे २०% अवमूल्यन करण्यात आले असून त्यांचे पुस्तकीमूल्यावर समायोजन करावे.

४. संशयित कर्ज निधिकरिता ₹ १,२०० ची तरतूद करावी.

**पुनर्मूल्यांकन खाते, भागीदारांची भांडवल खाती आणि दिनेशच्या प्रवेशानंतरचा ताळेबंद तयार करा.**

**उत्तर :**

**भागीदारी संस्थांच्या पुस्तकात**

**नावे** **पुनर्मूल्यांकन खाते** **जमा**

| विवरण | | रक्कम (₹) | विवरण | रक्कम (₹) |
|---|---|---|---|---|
| इमारत | | १२,००० | स्कंध खाते | १५,००० |
| संशयित कर्ज निधी | | १,२०० | | |
| नफा (भांडवल खात्याला स्थानांतरित) | | | | |
| साहिल | १,३५० | | | |
| वनिता | ४५० | १,८०० | | |
| | | १५,००० | | १५,००० |

नावे **भांडवल खाती** जमा

| विवरण | साहिल (₹) | वनिता (₹) | दिनेश (₹) | विवरण | साहिल (₹) | वनिता (₹) | दिनेश (₹) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| शि/ खा/नेली | १,१८,३५० | ८४,४५० | ६०,००० | शि./खा./आणली | ९०,००० | ७५,००० | |
| | | | | सामान्य निधी | ४,५०० | १,५०० | |
| | | | | बँक / रोकड | | | ६०,००० |
| | | | | ख्याती खाते | २२,५०० | ७,५०० | |
| | | | | पुनर्मूल्यांकन खाते (नफा) | १,३५० | ४५० | |
| | १,१८,३५० | ८४,४५० | ६०,००० | | १,१८,३५० | ८४,४५० | ६०,००० |

**मे. साहिल, वनिता व दिनेश १.४. २०१९ रोजीचा ताळेबंद**

| देयता | रक्कम (₹) | रक्कम (₹) | संपत्ती | रक्कम (₹) | रक्कम (₹) |
|---|---|---|---|---|---|
| भांडवल : | | | इमारत | ९०,००० | |
| साहिल | १,१८,३५० | | (–) घट | १२,००० | ७८,००० |
| वनिता | ८४,४५० | | | | |
| विकास | ६०,००० | २,६२,८०० | स्कंध | ६०,००० | |
| | | | (+) वाढ | १५,००० | ७५,००० |
| विविध धनको | | ३१,५०० | ऋणको | ४६,५०० | |
| | | | (–) संशयित कर्ज निधी | १,२०० | ४५,३०० |
| | | | बँकेतील रोख | | ९६,००० |
| | | २,९४,३०० | | | २,९४,३०० |

## स्वाध्याय ३

**प्र.१ वस्तुनिष्ठ प्रश्न**

**अ. खाली दिलेल्या पर्यायापैकी योग्य पर्याय निवडा आणि संपूर्ण विधान पुन्हा लिहा.**

१. अंजू आणि इशा ३:२ या प्रमाणात नफा-तोटा वाटून घेतात. त्यांनी $\frac{१}{५}$ हिश्यासाठी आरोहला भागीदारीत प्रवेश देण्याचे ठरविले. तेव्हा नफा-तोटा वाटपाचे नवीन प्रमाण ...................... राहिल.
(अ) १२:८:५ (ब) ४:३:१ (क) १२:८:१ (ड) १२:३:१

२. समायोजित भांडवलापेक्षा दिसणारे प्रत्यक्ष जास्तीचे भांडवल ......................
(अ) समान भांडवल (ब) अतिरिक्त भांडवल (क) कमी भांडवल (ड) लाभ

३. जेव्हा व्यवसायात अनोंदीत संपत्ती आणली जाते. तेव्हा ......................खाते जमा होते.
(अ) पुनर्मूल्यांकन (ब)ताळेबंद (क) व्यापार खाते (ड) भागीदारांचे भांडवल खाते.

४. जेव्हा भागीदारांकडून ख्यातीची उचल केली जाते, तेव्हा ......................खाते जमा करतात.
(अ)पुनर्मूल्यांकन (ब) रोकड / बँक (क) चालू (ड) नफा-तोटा समायोजन खाते.

५. जर भागीदाराने एखादी संपत्ती ठेऊन घेतली असेल तर ......................खाते नावे होते.
(अ) पुनर्मूल्यांकन (ब) भांडवल (क) संपत्ती (ड) ताळेबंद

**ब. खालील विधानासाठी एक शब्द, शब्दसमूह किंवा संज्ञा सूचवा.**

१ सामान्य नफ्यापेक्षा मिळालेल्या जास्तीच्या नफ्याच्या आधारावर ख्यातीचे मूल्यांकन करण्यात येणारी पध्दत.

२ नवीन भागीदाराच्या प्रवेशाच्या वेळी संपत्ती व देयता मूल्यांकन करण्यासाठी उघडण्यात आलेले खाते.

३ पैशामधे मोजता येणारी व्यवसायाची प्रतिष्ठा.

४ जुन्या भागीदारांना सामान्य निधीचे वाटप करावयाचे प्रमाण.

५ जेव्हा नवीन भागीदार ख्यातीची रक्कम रोख आणतो. तेव्हा ख्यातीची हाताळणी कोणत्या पद्धतीने केली जाते.

६ जुन्या भागीदारांच्या त्यागाच्या प्रमाणाचे प्रमाण.

७ विनियोजित भांडवल $\times \dfrac{\text{परताव्याचा दर (NRR)}}{१००}$ = …………

८ भागीदाराने संपत्ती ठेऊन घेतल्यास नावे होणारे खाते.

९ ताळेबंदाच्या देयता बाजूला नफा-तोटा खात्याची असलेली शिल्लक.

१० जुने प्रमाण – नवीन प्रमाण =

**क. चूक कि बरोबर सकारण सांगा.**

१ नवीन भागीदार भांडवल रोख किंवा इतर स्वरूपात आणू शकतो.

२ जेव्हा भागीदारांना ख्याती खाजगी स्वरूपात दिली जाते. तेव्हा पुस्तकात त्यांची नोंद केली जात नाही.

३. नवीन भागीदाराच्या प्रवेशाच्या वेळी नवीन लाभाचे प्रमाण काढले जाते.

४. पुनर्मूल्यांकनावरील नफा सर्व भागीदारांना नवीन भागीदारासह वितरीत केला जातो.

५. भागीदारांचे आपसातील संबंध बदलणे म्हणजे भागीदारीची पुनरर्चना होय.

६. नवीन भागीदार त्याच्या हिश्याची ख्याती रोख स्वरूपातच आणतो.

७. ख्यातीचे अपलेखन करतेवेळी ख्याती खाते नावे करतात.

८. नवीन प्रमाण वजा जुने प्रमाण बरोबर त्यागाचे प्रमाण.

९. सहसा व्यवसायाच्या विस्तारासाठी नवीन भागीदाराला संस्थेत प्रवेश दिला जातो.

१०. जेव्हा जुन्या भागीदारांकडून ख्यातीची उचल केली जाते, तेव्हा रोकड / बँक खाते जमा करतात.

**ड. गटात न बसणारा शब्द ओळखा.**

१. सामान्य निधी, धनको, यंत्रसामग्री, भांडवल.

२. उपस्करातील घट, स्वामित्त्व अपलेखन, प्राप्त विपत्रातील वाढ, सं. कर्ज निधीचे अपलेखन

३ अतिरिक्त नफा पद्धत, मूल्यांकनाची पद्धत, सरासरी नफा पद्धत, अस्थिर भांडवल पध्दत.

**इ. खालील उदाहरणे सोडवा.**

१. एका संस्थेत अ आणि ब २:१ या प्रमाणात नफा-तोटा वाटून घेणारे भागीदार आहेत. त्यांनी 'क' भागीदारीत प्रवेश दिला. तेव्हा 'अ' ने आपल्या हिश्यातून $\frac{१}{४}$ व 'ब' ने $\frac{१}{५}$ हिस्सा देण्याचे ठरविले. तेव्हा नवीन नफा-तोटा वाटपाचे प्रमाण काढा.

२. अनिका आणि राधिका ५:१ या प्रमाणात नफा-तोटा वाटून घेणारे भागीदार आहेत. त्यांनी सानिका ला $\frac{१}{५}$ हिश्यासाठी भागीदारीत प्रवेश दिला. अनिका आणि राधिकाचे त्यागाचे प्रमाण काढा.

३. प्रमोद आणि विनोद ३:२ या प्रमाणात नफा-तोटा वाटून घेणारे भागीदार आहेत. रमेशला भागीदारीत प्रवेश दिल्यानंतर त्यांचे नवीन प्रमाण ४:३:२ असे राहणार आहे, तेव्हा त्यागाचे प्रमाण शोधून काढा.

## ई. खालील प्रश्नांची फक्त एका वाक्यात उत्तरे लिहा.

१ पुनर्मूल्यांकन खाते म्हणजे काय ?
२ भागीदारीची पुनर्रचनेचा अर्थ सांगा ?
३ नवीन भागीदाराला प्रवेश का दिला जातो ?
४ त्यागाचे प्रमाण (sacrifice ratio) म्हणजे काय ?
५ नवीन भागीदाराच्या प्रवेशाच्या वेळी ख्याती खाते उघडणे याचा अर्थ काय ?
६ ख्यातीच्या मूल्यांकनाची अतिरिक्त नफा पद्धत म्हणजे काय ?
७ ख्यातीचे वाटप करताना त्यागाचे प्रमाण केव्हा आगणित (काढणे) केले जाते. ?
८ नवीन भागीदाराला प्रवेश देतेवेळी संचित नफ्याची हाताळणी कशी केली जाते. ?
९ जेव्हा नवीन भागीदार ख्यातीची रक्कम रोख आणू शकत नाही, तेव्हा जुन्या भागीदारांच्या भांडवल खात्याच्या जमा बाजूला ख्याती कोणत्या प्रमाणात लिहिली जाते.
१०. नफा-तोटा समायोजन खात्याची जमा बाजूपेक्षा मोठी असलेली नावे बाजू काय दर्शविते ?

## ग. कोष्टक पूर्ण करा.

१. [ ] = $\dfrac{\text{एकूण नफा}}{\text{एकूण वर्ष}}$

२. सामान्य नफा = [ ] × $\dfrac{\text{परताव्याचा दर (NRR)}}{१००}$

३. ताळेबंदात दाखविलेला स्कंध → स्कंधाचे मूल्य २०% कमी दाखविले → स्कंध मूल्य

[ ₹ १,६०,००० ] [ ] [ ]

### प्रात्यक्षिक उदाहरणे

**१. विक्रम आणि प्रज्ञा २:३ या प्रमाणात नफा-तोटा वाटून घेतात. ३१ मार्च २०१८ रोजी त्यांचा ताळेबंद खालीलप्रमाणे होता.**

**३१ मार्च २०१८ रोजीचा ताळेबंद**

| देयता | रक्कम (₹) | संपत्ती | रक्कम (₹) |
|---|---|---|---|
| धनको | १,०५,००० | रोकड | ७,५०० |
| भांडवल : | | जमीन व इमारत | ३७,५०० |
| विक्रम | ७५,००० | यंत्रसामग्री | ४५,००० |
| प्रज्ञा | ७५,००० | उपस्कर | ३,००० |
| | | स्कंध | ७५,००० |
| | | ऋणको | ८७,००० |
| | २,५५,००० | | २,५५,००० |

१ एप्रिल २०१८ रोजी त्यांनी अवनीला भागीदारीत प्रवेश देण्याचे ठरविले. :

१ भविष्यातील नफ्यात तिला १/४ हिस्सा द्यावा.
२. तिने भांडवल म्हणून ₹ ३७,५०० आणि ख्यातीतील हिस्सा ₹ ३०,००० रोख आणावेत.
३. जमीन व इमारतीचे मूल्य ₹ ४५,००० करावे आणि उपस्कराचे मूल्य १० % कमी करावे.

४. विविध ऋणकोवर ५% दराने संशयित कर्ज निधी ची तरतूद करावी.

५. स्कंधाचे ₹ ८२,५०० मूल्य लावावे.

सर्व भागीदारांचे भांडवल खाते नवीन नफा-तोटा विभाजनाच्या प्रमाणात समायोजित करावे आणि प्रमाणापेक्षा जास्त असणारी रक्कम कर्ज खात्याला स्थानांतरित करावी.

**तयार करा : अ) नफा-तोटा समायोजन खाते ब) भागीदारांची भांडवल खाती क) नवीन ताळेबंद**

**उत्तर :** नफा - ₹ १०,३५०, विक्रमचे भांडवल खाते - ₹ ४५,०००, अवनीचे भांडवल खाते - ₹ ३७,५००, ताळेबंद - ₹ ३,३२,८५० प्रज्ञाचे भांडवल खाते ₹ ६७,५००

**२. अमलेंदू आणि समीर ३:२ या प्रमाणात नफा -तोटा वाटून घेणारे भागीदार आहेत. ३१ मार्च २०१७ रोजी त्यांचा ताळेबंद खालीलप्रमाणे होता.**

**३१ मार्च २०१७ रोजीचा ताळेबंद**

| देयता | रक्कम (₹) | संपत्ती | रक्कम (₹) |
|---|---|---|---|
| विविध धनको | १०,००० | बँकेतील रोख | १२,००० |
| अमलेंदू चे भांडवल | ६०,००० | विविध ऋणको | २४,००० |
| समीरचे भांडवल | ४०,००० | जमीन/ इमारत | ५०,००० |
| सामान्य निधी | २०,००० | स्कंध | १६,००० |
| | | यंत्रसामग्री | २०,००० |
| | | उपस्कर व अन्वायुक्ती | ८,००० |
| | १,३०,००० | | १,३०,००० |

१ एप्रिल २०१७ रोजी त्यांनी परेशला भागीदारीत प्रवेश दिला. तेव्हा प्रवेशाच्या अटी खालीलप्रमाणे होत्या. :

१. त्याने ख्यातीतील हिस्सा म्हणून ₹ १६,००० आणावे. जुन्या भागीदारांनी ख्यातीची ५०% राशी काढून घ्यावी.

२. भविष्यातील नफ्यातील १/४ हिश्यासाठी त्याने भांडवल म्हणून ₹ २०,००० आणावे.

३. परेशच्या प्रवेशासाठी संपत्तीचे खालीलप्रमाणे पुनर्मूल्यांकन करण्यात यावे.

अ) जमीन व इमारतीचे मूल्य ₹ ६०,००० करावे.

ब) यंत्रसामग्रीचे मूल्य ₹ १६,००० करावे.

क) स्कंधाचे मूल्य ₹२०,००० आणि उपस्कर व अन्वायुक्ती ₹ ४,०००

ड) संशयित कर्ज निधीकरीता ऋणकोवर ५% तरतूद करावी.

**नवीन संस्थेच्या पुस्तकात आवश्यक किर्दनोंदी करा.**

**३. वसू आणि विराज अनुक्रमे ३:२ प्रमाणात नफा-तोटा वाटून घेणारे भागीदार आहेत. त्यांचा ३१ मार्च २०१९ रोजीचा ताळेबंद खालीलप्रमाणे.**

**३१ मार्च २०१९ रोजीचा ताळेबंद**

| देयता | रक्कम (₹) | रक्कम (₹) | संपत्ती | रक्कम (₹) | रक्कम (₹) |
|---|---|---|---|---|---|
| विविध धनको | | ४५,००० | हस्तस्थ रोख | | ७५० |
| सामान्य निधी | | ३०,००० | विविध ऋणको | | ६६,७५० |
| | | | स्कंध | | २५,५०० |
| भांडवल | | | गुंतवणूक | | ३६,००० |
| वसू | १,०८,००० | | यंत्रसामग्री | | ९०,००० |
| विराज | ७२,००० | १,८०,००० | इमारत | | ३६,००० |
| | | २,५५,००० | | | २,५५,००० |

१ एप्रिल २०१९ रोजी त्यांनी हरीला खालील अटीवर भागीदारीत प्रवेश दिला. :

१. त्याने भांडवल म्हणून ₹ ६०,००० आणावे. भविष्यातील नफ्यात त्याला $\frac{१}{४}$ हिस्सा मिळेल.

२. ख्यातीचे मूल्य मागील ३ वर्षाच्या सरासरी नफ्याच्या दुप्पट लावावे. मागील तीन वर्षाचा नफा अनुक्रमे

   २०१६ – १७ ₹ ४८,०००,

   २०१७ – १८ ₹ ८१,०००

   २०१८ – १९ ₹ ७३,५००

   हरी ख्यातीची रक्कम रोख आणण्यास असमर्थ आहे, म्हणून भागीदारीच्या पुस्तकात तेवढ्या रकमेने ख्याती खाते उघडा.

३. ऋणकोवर ₹ १,५०० संशयित कर्ज निधी निर्माण करा.

४. संवरण स्कंधाचे मूल्य ₹ २२, ५०० लावा.

५. यंत्रसामग्री आणि इमारतीचे मूल्य ५%. कमी करा.

**तयार करा. नफा–तोटा समायोजन खाते, भागीदारांची भांडवल खाती, आणि नवीन संस्थेचा ताळेबंद**

**उत्तर :** पुनर्मूल्यांकन तोटा – ₹ १०,८००, भांडवलाच्या शिलका : वसू – ₹ १,६०,०२०, विराज – ₹ १,०६,६८०, हरी – ₹ ६०,०००, ताळेबंद बेरीज – ₹ ३,७१,७००

४. **दिप आणि करण हे एका भागीदारीत ३:१ या प्रमाणात नफा–तोटा वाटून घेणारे भागीदार आहेत. ३१ मार्च २०१८ रोजी त्यांचा ताळेबंद खालीलप्रमाणे आहे.**

**३१ मार्च २०१८ रोजीचा ताळेबंद**

| देयता | | रक्कम (₹) | संपत्ती | रक्कम (₹) |
|---|---|---|---|---|
| विविध धनको | | ४०,००० | रोकड | ४०,००० |
| देयविपत्र | | १०,००० | विविध ऋणको | ३२,००० |
| अधिकोष अधिविकर्ष | | ११,००० | जमीन व इमारत | १६,००० |
| भांडवल : | | | मालसाठा | २०,००० |
| दीपचे भांडवल | ६०,००० | | यंत्रसामग्री | ३०,००० |
| करणचे भांडवल | २०,००० | ८०,००० | फर्निचर | ११,००० |
| सामान्य निधी | | ८,००० | | |
| | | १,४९,००० | | १,४९,००० |

१ एप्रिल २०१८ रोजी शुभमला खालील अटीवर भागीदारीत प्रवेश दिला. :

१. १/५ हिश्यासाठी त्याने भांडवल ₹ २०,००० आणि ख्यातीतील हिस्सा ₹ १०,००० आणावा.

२. ऋणकोवर ५% दराने सं.क. निधीची तरतूद करावी.

३. फर्निचरवर २०% घसारा आकारावा.

४. मालसाठ्याचे ५% आणि इमारतीचे २०% मूल्य वाढवावे.

५. सर्व भागीदारांचे भांडवल खाते त्यांच्या नवीन नफा–तोटा विभाजनाच्या प्रमाणात रोखीच्या माध्यमातून समायोजित करावी.

**तयार करा : नफा–तोटा समायोजन खाते, भागीदारांची भांडवल खाती, नवीन भागीदारीचा ताळेबंद.**

**उत्तर :** पुनर्मूल्यांकन नफा – ४००, दीप–रोख हस्तांतर – १३,८००, करण – ४,६००, ताळेबंद बेरीज – १,६१,०००

५. **किशोर आणि लाल $\frac{३}{४}$ व $\frac{१}{४}$ या प्रमाणात नफा-तोटा वाटून घेणारे भागीदार आहेत.**

**३१ मार्च २०१८ रोजीचा ताळेबंद**

| देयता | | रक्कम (₹) | संपत्ती | रक्कम (₹) |
|---|---|---|---|---|
| धनको | | १,२०,००० | जमीन व इमारत | ७५,००० |
| सामान्य निधी | | १२,००० | फर्निचर | ६,००० |
| | | | स्कंध | ६०,००० |
| भांडवल खाते : | | | ऋणको | ६०,००० |
| किशोर | ९०,००० | | प्राप्त विपत्रे | ३९,००० |
| लाल | ४८,००० | १,३८,००० | बँक शिल्लक | ३०,००० |
| | | २,७०,००० | | २,७०,००० |

१ एप्रिल २०१८ रोजी त्यांनी रामला भागीदारीत प्रवेश दिला. :

१. त्याला भविष्यातील नफ्यात $\frac{१}{५}$ हिस्सा द्यावा. याकरिता त्याने भांडवल ₹ ६०,००० RTGS प्रणालीद्वारे आणावे.

२. ₹. ६०,००० ने ख्याती खाते उघडावे.

३. जमीन व इमारतीचे मूल्य २०% ने वाढवावे.

४. फर्निचर व स्कंधाचे मूल्य १०% ने कमी करा.

५. सर्व भागीदारांनी त्यांचे भांडवल खाते नवीन नफा -तोटा विभाजनाच्या प्रमाणात बँक खात्याच्या मार्फत समायोजित करावे.

**भागीदारीच्या पुस्तकात किर्दनोंदी देऊन नवीन संस्थेचा ताळेबंद तयार करा.**

**उत्तरे : पुनर्मूल्यांकन नफा – ८,४००, दीप-रोख हस्तांतर – १३,८००, करण – ४,६००, ताळेबंद बेरीज – ४,२०,०००**

६. **वृषाली आणि लीना या समान भागीदार आहेत. ३१ मार्च २०१८ रोजी त्यांचा ताळेबंद खालील प्रमाणे होता.**

**३१ मार्च २०१८ रोजीचा ताळेबंद**

| देयता | रक्कम (₹) | रक्कम (₹) | संपत्ती | रक्कम (₹) | रक्कम (₹) |
|---|---|---|---|---|---|
| विविध धनको | | ९०,००० | बँक शिल्लक | | ६२,००० |
| सामान्य निधी | | १८,००० | ऋणको | ३१,००० | |
| भांडवल: | | | (-) संशयित कर्ज निधी | १,००० | ३०,००० |
| वृषाली | ४५,००० | | इमारत | | ५५,००० |
| लीना | ३०,००० | ७५,००० | यंत्र | | २४,००० |
| | | | प्राप्त विपत्रे | | १२,००० |
| | | १,८३,००० | | | १,८३,००० |

त्यांनी १ एप्रिल २०१८ रोजी अपर्णाला भागीदारीत प्रवेश देण्याचे ठरविले. :

१. यंत्र आणि इमारतीचे मूल्य १०% कमी करा. संशयित कर्ज निधी ₹ ५,००० रु. ने वाढवा.

२. वृषालीने १०%कसरीवर प्राप्त विपत्र ठेऊन घेतले.

३. भविष्यातील $\frac{१}{४}$ हिश्यासाठी अपर्णाने ₹ ६०,००० भांडवल आणावे.

४. चालू खाते उघडून सर्व भागीदारांचे भांडवल खाते नवीन नफा-तोटा विभाजनाच्या प्रमाणात समायोजित करावे.

**नफा-तोटा समायोजन खाते, भागीदारांची भांडवल खाती आणि नवीन संस्थेचा ताळेबंद तयार करा.**

**उत्तर :** पुनर्मूल्यांकन तोटा - ₹ १४,१००, वृषालीचे चालू खाते - ₹ ५३,८५०, लीनाचे चालू खाते - ₹ ५८,०५०, ताळेबंद - ३,३०,०००

**७. मेधा आणि राधा ३:१ या प्रमाणात नफा-तोटा वाटून घेणाऱ्या भागीदार आहेत. :**

**३१ मार्च २०१८ रोजीचा ताळेबंद**

| देयता | रक्कम (₹) | संपत्ती | रक्कम (₹) |
|---|---|---|---|
| विविध धनको | ८०,००० | रोकड | ७८,००० |
| देयविपत्र | २०,००० | विविध ऋणको | ६४,००० |
| बँक ओव्हर ड्राफ्ट | २०,००० | मालसाठा | ४०,००० |
| | | यंत्रसामग्री | ६०,००० |
| भांडवल : | | फर्नीचर | २२,००० |
| मेधा | १,२०,००० | जमीन व इमारत | ३२,००० |
| राधा | ४०,००० | | |
| सामान्य निधी | १६,००० | | |
| | २,९६,००० | | २,९६,००० |

१ एप्रिल २०१८ रोजी कृतीकाला भागीदारीत प्रवेश दिला :

१. तिने भांडवल ₹ ४०,००० आणि ख्याती ₹ २,५०० आणावे. तिला नफ्यात $\frac{१}{५}$ हिस्सा मिळेल.

२. ऋणकोवर ५% सं.क. निधी ची तरतूद करावी.

३. फर्निचरचे मूल्य २०% ने कमी करावे.

४. मालसाठ्याचे ५% आणि यंत्रसामग्रीचे २% मूल्य वाढवा.

५. चालू खाते उघडून सर्व भागीदारांचे भांडवल खाते नवीन नफा-तोटा विभाजनाच्या प्रमाणात समायोजित करावे.

६. नवीन नफा-तोटा वाटपाचे प्रमाण अनुक्रम $\frac{३}{५}$, $\frac{१}{५}$, $\frac{१}{५}$ असे राहिल.

**नफा-तोटा समायोजन खाते, कर्ज खात्यांच्या माध्यमाने भागीदारांचे भांडवल खाते आणि नवीन संस्थेचा ताळेबंद तयार करा.**

**उत्तर :** पुनर्मूल्यांकन तोटा - ₹ ४,४००, मेधाचे चालू खाते - ₹ १०,५७५, राधा - ₹ ३,५२५, ताळेबंद बेरीज - ₹ ३,३४,१००

**८. ३:२ या प्रमाणात नफा–तोटा वाटून घेणारे भागीदार साहिल आणि निखिल यांचा ताळेबंद.**

**३१ मार्च २०१७ रोजीचा ताळेबंद**

| देयता | | रक्कम (₹) | संपत्ती | रक्कम (₹) |
|---|---|---|---|---|
| धनको | | ६०,००० | फर्निचर | ६०,००० |
| भांडवल : | | | इमारत | ७२,००० |
| साहिल | ८०,००० | | ऋणको | ४०,००० |
| निखिल | १,००,००० | १,८०,००० | मालसाठा | ४८,००० |
| | | | हस्तस्थ रोख | २०,००० |
| | | २,४०,००० | | २,४०,००० |

१ एप्रिल २०१७ रोजी वरदला खालील अटीवर भागीदारीत प्रवेश दिला. :

१. वरदने भांडवलासाठी ₹ १,००,००० दिले.

२. ख्याती म्हणून ₹ ४०,००० दिले.

३. नवीन नफा–तोटा वाटपाचे प्रमाण ३:२:३ ठरले.

४. जुन्या भागीदारांनी संपत्तीचे मूल्य खालील प्रमाणे ठरविले. :
इमारत ₹ १,००,०००, फर्निचर ₹ ४८,०००, ऋणको ₹ ३८,०००

५. मार्च २०१७ मध्ये ₹ ३,००० च्या वस्तू खरेदी करण्यात आल्या. त्याची नोंद २ एप्रिल २०१७ रोजी करण्यात आली. ही देयता विचारात घ्यावी.

**तयार करा :**

**अ) नफा–तोटा समायोजन खाते**

**ब) भागीदारांची भांडवल खाती**

**क) भागीदारी संस्थेचा नवीन ताळेबंद**

**उत्तर :** नफा–तोटा खाते नफा – ₹ ११,०००, साहिलचे भांडवल – ₹ १,१०,६००, निखिलचे भांडवल खाते – ₹ १,२०,४०० वरदचे भांडवल – ₹ १,००,०००, ताळेबंद – ₹ ३,९४,०००)

**९. अमीत आणि बबन २:३ या प्रमाणात नफा–तोटा वाटून घेणारे भागीदार आहे.**

**३१ मार्च २०१८ रोजीचा ताळेबंद**

| देयता | रक्कम (₹) | संपत्ती | रक्कम (₹) |
|---|---|---|---|
| धनको | १,४०,००० | रोकड | १,१०,००० |
| | | जमीन व इमारत | ५०,००० |
| भांडवल : | | यंत्र | ६०,००० |
| अमीत | १,००,००० | फर्निचर | ४,००० |
| बबन | १,००,००० | मालसाठा | १,००,००० |
| | | ऋणको | १६,००० |
| | ३,४०,००० | | ३,४०,००० |

१ एप्रिल २०१८ रोजी त्यांनी कमल यांना भागीदारीत प्रवेश दिला.:

१. तिला भविष्यातील नफ्यात $\frac{१}{४}$ हिस्सा मिळेल.

२. तिने भांडवल रु. ५०,००० आणि ख्याती ₹ ४०,००० नगदी आणावी.

३. जमीन व इमारतीचे मूल्य ₹ ६०,००० आणि फर्निचर चे मूल्य १०% कमी करावे.
४. विविध ऋणकोवर ५% दराने संशयित कर्ज निधीची तरतूद करावी.
५. मालसाठ्याचे मूल्य ₹ १,१०,००० करावे.
६. सर्व भागीदारांचे भांडवल खाते, नवीन नफा-तोटा वाटपाच्या प्रमाणात समायोजित करावे. जास्तीची रक्कम कर्ज खात्याला स्थानांतरित करावी.

**तयार करा : नफा-तोटा समायोजन खाते, भागीदारांचे भांडवल खाते, आणि नवीन ताळेबंद.**

**उत्तर :** पुनर्मूल्यांकन नफा - ₹ १८,८००, अमीतचे कर्ज खाते - ₹ ६३,५२०, बबनचे कर्ज खाते - ₹ ४५,२८०, ताळेबंद - ₹ ४,४८,८००

**१०. ओम आणि जय यांचा ३१ मार्च २०१८ रोजीचा ताळेबंद खालीलप्रमाणे होता. ते नफा-तोटा ३:२ प्रमाणात वाटून घेतात.**

**३१ मार्च २०१८ रोजीचा ताळेबंद**

| देयता | रक्कम (₹) | संपत्ती | रक्कम (₹) |
|---|---|---|---|
| धनको | ३०,००० | बँक शिल्लक | ३,००० |
| भांडवल : | | इमारत | १५,००० |
| ओम | २१,००० | यंत्र | २१,००० |
| जय | २१,००० | फर्निचर | ९०० |
| चालू खाते : | | स्कंध | १२,३०० |
| ओम | ३,७५० | ऋणको | २७,००० |
| जय | ३,४५० | | |
| | ७९,२०० | | ७९,२०० |

१ एप्रिल २०१८ रोजी जगदिशला खालील अटीवर प्रवेश दिला.

१. जगदिशने ख्यातीचा हिस्सा ₹ ३,००० द्यावा. भागीदारांकडून रोख स्वरूपात ५०% ख्याती उचलण्यात आली.
२. त्याने भांडवल ₹ ९,००० आणावे. भविष्यातील नफ्यात त्याला $\frac{१}{४}$ हिस्सा मिळेल.
३. इमारतीचे मूल्य ₹ १८,००० करावे, यंत्र व फर्निचर चे मूल्य १०% ने कमी करावे.
४. ऋणको ५% दराने संशयित कर्ज निधीची तरतूद करावी.
५. स्कंधाचे मूल्य ₹ १५,००० ठरले.

**तयार करा : नफा-तोटा समायोजन खाते, भागीदारांची चालू खाती आणि नवीन ताळेबंद .**

**उत्तर :** पुनर्मूल्यांकन नफा - ₹ २,१६०, ओमचे चालू खाते - ₹ ५,९४६, जयचे चालू खाते - ₹ ४,९१४, ताळेबंद - ₹ ९१,८६०

# ४. भागीदारीची पुनर्रचना (Reconstitution of Pertnership)
## भागीदाराची निवृत्ती (Retirement of Partner)

**अभ्यास घटक**

*४.१ प्रस्तावना*
*४.२ नवीन प्रमाण*
*४.३ लाभाचे प्रमाण*
*४.४ खाती नोंदविण्याच्या पद्धती*
*४.५ राखीव निधी, संचित नफा किंवा तोटा*
*४.६ संपत्तीचे पुनर्मूल्यांकन आणि देयतेची पुर्ननिश्चिती*
*४.७ भांडवलाचे समायोजन*
*४.८ निवृत्त भागीदाराला द्यावयाची राशी*

**क्षमता विधाने Competency Statement**

❑ *या प्रकरणाचा अभ्यास केल्यानंतर विद्यार्थी :*

- *भागीदारी व्यवसायातून निवृत्त होणाऱ्या भागीदाराचा संबंधीचा अर्थ समजतो.*
- *निवृत्त भागीदारीशी संबंधित असणाऱ्या विविध अनुपतांची गणना करता येईल.*
- *ख्यातीची हाताळणी करण्या संबंधीचे ज्ञान प्राप्त होईल. राखीव निधी, संचित नफा किंवा तोट्यासंबंधीचे होणारे परिणाम समजतो.*
- *संपत्तीचे पुनर्मूल्यांकन आणि देयतेची पुर्ननिश्चितीचे परिणाम संबंधीची माहिती होईल.*
- *निवृत्तीनंतर भागीदारीत असलेल्या भागीदारांच्या भांडवलाचे समायोजन करण्यासंबंधीची माहिती होईल.*
- *निवृत्त भागीदाराला द्यावयाच्या अंतिम राशी शोधनाच्या विविध पर्यायांची माहिती होईल.*

### ४.१ प्रस्तावना (Introduction) :

अस्तित्वात किंवा प्रचलित भागीदारी व्यवसायातून एखाद्या भागीदाराची व्यवसाय सोडून जाण्याची इच्छा असल्यास आणि उर्वरित भागीदारांनी व्यवसाय सुरू ठेवण्याचे ठरविल्यास त्याला 'भागीदाराची निवृत्ती' असे म्हणतात. एक प्रकारे ही भागीदारीची पुनर्रचना असते. नवीन भागीदारी व्यवसाय उर्वरित भागीदार सुरू ठेवतात आणि निवृत्त भागीदाराला त्याचे निवृत्तीचे वेळी त्याला द्यावयाची राशी शोधून काढणे आवश्यक असते. यासाठी निवृत्त भागीदाराच्या भांडवल व चालू खात्याची शिल्लक, नफातोट्यातील त्याचा वाटा, संपत्ती व देयतेचे पुनर्मूल्यांकन, संचित नफ्यातील वाटा, ख्याती इत्यादी, गोष्टींचा विचार करण्यात येतो. भागीदार व्यवसायातून निवृत्त होण्याची अनेक कारणे आहेत ती म्हणजे वृद्धापकाळामुळे, भागीदारामध्ये गैरसमज निर्माण झाला असेल, व्यवसायात तोटा होत असेल, भागीदाराची दुसरा नवीन व्यवसाय सुरू करण्याची इच्छा असेल इत्यादी.

भागीदार निवृत्त होऊ शकतो.

१. ऐच्छिक भागीदारी असल्यास उर्वरित भागीदारांना सूचना देऊन
२. भागीदारी करारनाम्याच्या अटीप्रमाणे
३. सर्व भागीदारांचे संमतीने.

## ४.२ नवीन प्रमाण (New ratio)

एखाद्या भागीदाराच्या निवृत्तीनंतर संस्थेतील उर्वरित भागीदार आपसात नफा-तोटा वाटून घेण्याचे जे प्रमाण ठरवितात त्यास नफा विभाजनाचे नवीन प्रमाण असे म्हणतात.

**उदाहरण :**

१. अ, ब आणि क भागीदारीत ४:२:१ या प्रमाणात नफा वाटून घेणारे भागीदार आहेत. जर भागीदारीतून 'ब' निवृत्त होत असेल तर नवीन नफ्याचे प्रमाण काय राहील?

उत्तर : अ आणि क भागीदारांचे नवीन नफा वाटपाचे प्रमाण ४:१ राहील हे नवीन प्रमाण ब चे नफ्याचे प्रमाण रद्द करून आगणित केलेले आहे.

२. क्ष, य आणि ज्ञ समान प्रमाणात नफातोटा वाटून घेतात. ज्ञ च्या निवृत्ती नंतर त्याचा हिस्सा क्ष आणि य यांनी ३:१ या प्रमाणात वाटून घ्यायचे ठरविल्यास नवीन नफातोटा विभाजनाचे प्रमाण काय राहील?

उत्तर : नफातोटा विभाजनाचे नवीन प्रमाण

जुने प्रमाण क्ष, य, ज्ञ = १:१:१

ज्ञ चा हिस्सा क्ष आणि य यांनी ३:१ प्रमाणात वाटून घेण्याचे ठरविल्यास

क्ष चे प्रमाण $= \frac{१}{३} \times \frac{३}{४} = \frac{३}{१२}$

य चे प्रमाण $= \frac{१}{३} \times \frac{१}{४} = \frac{१}{१२}$

क्ष चा हिस्सा $= \frac{१}{३} + \frac{३}{१२} = \frac{७}{१२}$

य चा हिस्सा $= \frac{१}{३} + \frac{१}{१२} = \frac{५}{१२}$

क्ष चे आणि य चे नवीन नफातोटा विभाजनाचे प्रमाण = ७:५

## ४.३ लाभाचे प्रमाण (Gain Ratio )

एका भागीदाराच्या निवृत्तीनंतर उर्वरित भागीदारांची नफ्यात जास्तीचा हिस्सा मिळावा अशी अपेक्षा असते. निवृत्त भागीदाराच्या नफ्याचा हिस्सा उर्वरित भागीदारांमध्ये वाटून देतात. याचा उपयोग साधारणतः निवृत्त भागीदाराच्या हिश्याच्या ख्यातीची निर्मिती किंवा उभारणी केली असल्यास तिचे अपलेखन करण्यासाठी करतात.

लाभाचे प्रमाण = नवीन प्रमाण - जुने प्रमाण

**उदाहरण १**

अ, ब आणि क नफातोटा ४:३: २ प्रमाणात विभागून घेणारे भागीदार आहेत. ब च्या निवृत्तीनंतर अ आणि क ने नफातोटा समान प्रमाणात विभागून घेण्याचे ठरविले. लाभाचे प्रमाण काय राहील?

उत्तर लाभाचे प्रमाण = नवीन प्रमाण - जुने प्रमाण

'अ' चे प्रमाण $= \frac{१}{२} - \frac{४}{९} = \frac{१}{१८}$

क चे प्रमाण $= \frac{१}{२} - \frac{२}{९} = \frac{५}{१८}$

अ आणि क चे लाभाचे प्रमाण : १:५

**उदाहरण २**

क्ष, य आणि ज्ञ नफातोटा ४:३:२ प्रमाणात विभागून घेणारे भागीदार आहेत. ज्ञ च्या निवृत्तीनंतर क्ष आणि य ने नफातोटा ३:२ प्रमाणात विभागून घेण्याचे ठरविले. लाभाच्या प्रमाणाचे आगणन करा.

क्ष चे प्रमाण $= \frac{३}{५} - \frac{४}{९} = \frac{७}{४५}$

'य' चे प्रमाण $= \frac{२}{५} - \frac{३}{९} = \frac{३}{४५}$

लाभाचे प्रमाण = ७ : ३

**उदाहरण ३**

P,Q, आणि R नफातोटा २ :२:१. प्रमाणात वाटून घेतात. Q निवृत्त झाल्यास नवीन प्रमाण काय राहील?

जुने प्रमाण = २:२:१

नवीन प्रमाण = २:१

P चे प्रमाण $= \frac{२}{३} - \frac{२}{५} = \frac{४}{१५}$

R चे प्रमाण $= \frac{१}{३} - \frac{१}{५} = \frac{२}{१५}$

लाभाचे प्रमाण = ४:२ = २:१

## ४.४ ख्याती नोंदविण्याच्या पद्धती

| अ. क्र. | व्यवहार | रोजकीर्द नोंद |
|---|---|---|
| १. | पूर्ण मूल्याने ख्याती निर्माण करून व्यवसायातच ठेवणे | ख्याती खाते ........................................ नावे<br>सर्व भागीदारांच्या भांडवल खात्याला<br>(पुनर्मूल्यांकन ख्याती जुन्या प्रमाणात सर्व भागीदारांना वाटून दिल्याबद्दल)<br>**टिप :** या परिस्थितित संस्थेच्या नवीन ताळेबंदात पूर्ण मूल्याने संपत्ती बाजूला ख्यातीची राशी दिसेल. |
| २. | ख्याती खाते निर्माण करून अपलेखीत केली जात असेल तर | अ) ख्याती निर्माण करणे<br>ख्याती खाते ........................................ नावे<br>सर्व भागीदारांच्या भांडवल खात्याला<br>(जुन्या प्रमाणात सर्व भागीदारांना वाटून दिल्याबद्दल)<br><br>ब) ख्याती अपलेखित केल्यास<br>व्यवसाय चालू ठेवणाऱ्या भागीदारांचे भांडवल खाते ......... नावे<br>(नवीन लाभाच्या प्रमाणात)<br>ख्याती खात्याला<br>(ख्याती निर्माण करून व्यवसायात असणाऱ्या भागीदारांच्या खात्याला नावे टाकून अपलेखित केल्याबद्दल)<br>**टिप :** या परिस्थितीत संस्थेच्या नवीन ताळेबंदात ख्याती दिसणार नाही. |

| | | |
|---|---|---|
| ३. | केवळ निवृत्त भागीदाराच्या हिश्याइतकीच ख्याती निर्माण करून व्यवसायात ठेवली जात असेल तर | ख्याती खाते नावे ......................................... नावे<br>निवृत्त भागीदाराच्या भांडवल खात्याला<br>(निवृत्त भागीदाराच्या हिश्शाइतकी ख्याती त्यांच्या भांडवल खात्याला जमा केल्याबद्दल)<br>**टिप :** या परिस्थितीत संस्थेच्या नवीन ताळेबंदात विस्तारित ख्याती दिसेल. |
| ४. | केवळ निवृत्त भागीदाराच्या हिश्याइतकी ख्याती खाते निर्माण करून अपेलेखित केली जात असेल तर | अ) ख्याती खाते ............................................. नावे<br>निवृत्त भागीदाराच्या भांडवल खात्याला<br>ब) व्यवसाय चालू ठेवणाऱ्या भागीदारांचे भांडवल खाते.......... नावे<br>ख्याती खात्याला<br>(ख्याती खाते अपलेखित केल्याबद्दल)<br>**टिप :** या परिस्थितीत संस्थेच्या ताळेबंदात ख्याती दिसणार नाही. |
| ५. | जर ख्याती आधीपासूनच ताळेबंदात दिली असेल तर | ख्यातीच्या पुनर्मूल्यांकनाचा परिणाम नफा-तोटा समायोजन खात्यात दर्शविला जाईल किंवा भागीदारांच्या भांडवल खात्यात दर्शविला जाईल. |

## ४.५ राखीव निधी, संचयीत नफा किंवा तोट्याची समायोजना –

ताळेबंदात देयता बाजूला असलेली संचिती, राखीव निधी, संचित नफा इ. संबंधीचा रकमा सर्व भागीदारांच्या भांडवल खात्याला त्यांच्या नफा विभाजनाच्या प्रमाणात जमा केल्या जातात.

**या संपूर्ण बाबी भागीदारांत झालेल्या करारावर अवलूंबन असतात. यासाठी खाली नोंद केली जाते :**

सामान्य संचिती खाते .........................................नावे

राखीव निधी खाते .............................................नावे

नफा तोटा खाते ...............................................नावे

सर्व भागीदारांच्या भांडवल / चालू खात्याला

(संचित नफा हा निवृत्त भागीदारासह सर्व भागीदारांच्या भांडवल खात्याला जमा केल्याबद्दल)

**निवृत्तीच्या वेळी ताळेबंदाच्या संपत्ती बाजूला संचित तोटा दिसत असेल तर तो सर्व भागीदारांच्या भांडवल खात्याला त्यांच्या जुन्या प्रमाणात नावे केला जातो.**

**त्यावेळी खालील नोंद केली जाईल :**

सर्व भागीदारांचे भांडवल / चालू खाते ...........................नावे

नफा तोटा खात्याला

(संचित तोटा सर्व भागीदारांच्या भांडवल / चालू खात्याला नावे टाकल्याबद्दल)

## ४.६ संपत्तीचे पुनर्मूल्यांकन आणि देयतेची पुनर्निश्चिती.

जेव्हा भागीदार व्यवसायातून निवृत्त होतो तेव्हा संपत्तीच्या वाढीव मूल्यात किंवा देयतेच्या कमी झालेल्या मूल्यात त्याला हिस्सा प्राप्त करण्याचा अधिकार मिळतो. तो कुठल्याही संपत्तीच्या कमी झालेल्या मूल्यात किंवा देयतेच्या वाढीव मूल्यात हिस्सा प्राप्त करण्यास पात्र असतो. याचा परिणाम दर्शविण्यासाठी पुनर्मूल्यांकन खाते / नफातोटा समायोजन खाते तयार करण्यात येते.

या खात्याच्या नावे बाजूला संपत्तीच्या मूल्यात झालेली घट आणि देयतेचे वाढलेले मूल्य दर्शवितात तर जमा बाजूला संपत्तीच्या मूल्यात झालेली वाढ आणि देयतेच्या मूल्यात झालेली घट दर्शवितात.

**टिप (Note) : मागच्या प्रकरणामध्यें (भागीदाराचा प्रवेश) नफा तोटा समायोजन खात्याच्या / पुनर्मूल्यांकन खात्याचा नमुना (प्रारूप) दिलेला आहे. तो पाहावा.**

### ४.७ भांडवलाचे समायोजन :

भागीदाराच्या निवृत्तीनंतर भागीदारीत शिल्लक असणारे भागीदार हे त्यांचे भांडवल त्यांच्या नफातोटा विभाजनाच्या प्रमाणात पुनर्रचना करण्याचे ठरवू शकतात. याकरिता :

१) संस्थेचे एकूण भांडवल नवीन नफातोटा विभाजनाच्या प्रमाणात विभागण्यात येईल.

२) नवीन भांडवलाची सद्यस्थितीत असणाऱ्या भांडवलाशी तुलना करणे.

३) व्यक्तीगत भांडवल खात्यात अधिक्य किंवा तूट शोधणे.

४) असे अधिकचे भांडवल व्यवसायातून काढून घेतले जाते किंवा चालू खात्याला किंवा कर्ज खात्याला स्थानांतरित केले जाते. आणि तूट असल्यास व्यवसायात आणले जाते किंवा भागीदाराच्या चालू खात्याला किंवा कर्ज स्थानांतरित केले जाते.

| अनु. क्र. | व्यवहार | रोजकीर्द नोंदी |
|---|---|---|
| १. | अतिरिक्त राशी व्यवसाय चालू ठेवणाऱ्या भागीदारांना दिल्यास | व्यवसाय चालू ठेवणाऱ्या भागीदारांचे भांडवल खाते ............... नावे<br>रोख / बँक खात्याला<br>(अतिरिक्त राशी भागीदारांना दिल्याबद्दल) |
| २. | अतिरिक्त राशी भागीदारांच्या चालू खात्याला स्थानांतरित केल्यास | भागीदारांचे भांडवल खाते....................................... नावे<br>भागीदारांच्या चालू खात्याला<br>(अतिरिक्त राशी चालू खात्याला स्थानांतरित केल्याबद्दल) |
| ३. | कमी पडलेली राशी व्यवसाय चालू ठेवणाऱ्या भागीदारांनी आणल्यास | रोख / बँक खाते ............................................. नावे<br>भागीदारांच्या भांडवल खात्याला<br>(भागीदारांनी कमी पडलेली राशी आणल्याबद्दल) |
| ४ | जर अतिरिक्त राशी (तूट) भागीदारांच्या कर्ज खात्याला किंवा चालू खात्याला स्थानांतरित केल्यास | भागीदारांचे चालू खाते / कर्ज खाते .............................. नावे<br>भागीदारांच्या भांडवल खात्याला<br>(तूट भागीदारांच्या चालू / कर्ज खात्याला स्थानांतरित केल्याबद्दल) |

### निवृत्त भागीदाराची निवृत्तीच्या तारखेपर्यंतच्या लाभातील हिश्श्याची निश्चिती.

जर भागीदार खाते बंद होण्याची तारीख सोडून अन्य कोणत्याही तारखेला निवृत्त होत असेल तर त्याला लाभात निवृत्तीच्या तारखेपर्यंत हिस्सा घेण्याचा अधिकार आहे.

त्याला मिळणारा हिस्सा मागील वर्षाच्या नफ्याच्या किंवा नफ्याच्या आधारे काढतात तसेच संस्थेच्या त्या वर्षाच्या संबंधित कालावधितील नफ्याची गणना करून (अर्थात जेव्हां दिलेल्या ताळेबंदाची तारीख आणि भागीदार निवृत्तीची तारीख ही भिन्न असल्यास) त्या आधारे निवृत्त भागीदाराच्या हिश्याच्या नफ्याची निश्चिती करता येईल.

नफा किंवा तोटा स्थानांतरित करण्यासाठी संस्थेच्या पुस्तकात खालीलप्रमाणे नोंदवितात

निवृत्त भागीदाराच्या भांडवल / चालू खात्याला नफा स्थानांतरित केल्यास –

नफा / तोटा निलंबित खाते ............................................ नावे

निवृत्त भागीदाराच्या भांडवल/ चालू खात्याला

तोटा स्थानांतरित केल्यास

निवृत्त भागीदाराचे भांडवल / चालू खाते ................................ नावे

नफातोटा निलंबित खात्याला

## ४.८ निवृत्त भागीदाराला द्यावयाची राशी – (अंतिम शोधन)

| अनु. क्र. | व्यवहार | रोजकीर्द नोंदी |
|---|---|---|
| १. | एकरकमी रकमेने निवृत्त भागीदाराला द्यावयाची राशी एकाच वेळी दिली जाते तेव्हां | निवृत्त भागीदाराचे भांडवल खाते ................................नावे<br>रोख / बँक खात्याला<br>(निवृत्त भागीदाराला अंतिम शोधन केल्याबद्दल) |
| २. | हप्त्याने – निवृत्त भागीदाराला द्यावयाची राशी हप्त्या हप्त्याने शोधन केल्यास शिल्लक राशी भागीदाराच्या कर्ज खात्याला स्थानांतरित केली जाते. | |
| (अ) | द्यावयाची राशी कर्ज खात्याला स्थानांतरित केल्यास | निवृत्त भागीदाराचे भांडवल खाते ................................नावे<br>निवृत्त भागीदाराच्या कर्ज खात्याला<br>(द्यावयाची राशी कर्ज खात्याला स्थानांतरित केल्याबद्दल) |
| (ब) | कर्ज खात्यावर व्याजाची राशी देय झाल्यास | व्याज खाते ..............................................नावे.<br>निवृत्त भागीदाराच्या कर्ज खात्याला<br>(हप्त्यावरील व्याज देय झाल्याबद्दल) |
| २. (क) | व्याजाची राशी रोख दिल्याबद्दल | निवृत्त भागीदाराचे कर्ज खाते ....................................नावे<br>रोख / बँक खात्याला<br>(व्याजाची राशी रोख दिल्याबद्दल) |
| ३. | जर निवृत्त भागीदाराला द्यावयाची पूर्ण राशी कर्ज खात्याला स्थानांतरित केल्यास | निवृत्त भागीदाराचे भांडवल खाते ................................नावे<br>निवृत्त भागीदाराच्या कर्ज खात्याला<br>(देय पूर्ण राशी कर्ज खात्याला स्थानांतरित केल्याबद्दल) |
| ४. | निवृत्त भागीदाराला द्यावयाच्या पूर्ण राशीपैकी काही राशी रोख आणि काही राशी कर्ज खात्याला स्थानांतरित केल्यास | निवृत्त भागीदाराचे भांडवल खाते ................................नावे<br>रोख/ बँक खात्याला<br>निवृत्त भागीदाराच्या कर्ज खात्याला<br>(पूर्ण देय राशीपैकी काही राशी रोख देऊन काही राशी कर्ज खात्याला स्थानांतरित केल्याबद्दल) |

### उदाहरणे

**१. राजा, राणी आणि प्रधान हे भागीदार असून ते ५:३:२ या प्रमाणात नफातोटा वाटून घेतात. त्यांचा ३१ मार्च २०१९ रोजी ताळेबंद खालील प्रमाणे होता.**

**ताळेबंद ३१ मार्च २०१९ रोजीचा**

| देयता | रक्कम (₹) | संपत्ती | रक्कम (₹) |
|---|---|---|---|
| धनको | ११,२०० | रोख | ७,६०० |
| अधिकोष अधिविकर्ष | ९,७०० | ऋणको | १८,००० |
| राखीव निधी | १५,००० | मालसाठा | १७,५०० |
| भांडवल : | | संयंत्र | ३०,००० |
| राजा | ४२,००० | जमीन | ७०,००० |
| राणी | ३७,००० | उपस्कर | ५,००० |
| प्रधान | ३३,२०० | | |
| | १,४८,१०० | | १,४८,१०० |

१ एप्रिल २०१९ रोजी प्रधान खालील अटींवर निवृत्त झाला.

१. संस्थेच्या ख्यातीचे मूल्य ₹ २०,००० लावावे.

२. मालसाठ्याचे मूल्य १० % आणि उपस्कराचे ५% ने कमी करावे तसेच संयंत्राचे मूल्य ₹ २६,७०० लावावे.

३ ऋणकोवर ५% प्रमाणे बुडीत व संशयित कर्ज निधी निर्माण करा.

४. धनकोंमधून ₹ २०० अपलेखित करा.

५. प्रधानाला द्यावयाच्या राशीपैकी ₹ ५००० रोख आणि उर्वरित राशी त्याच्या कर्ज खात्याला स्थानांतरित करा.

**तयार करा : अ) नफातोटा समयोजन खाते ब) भागीदाराचे भांडवल खाते क) संस्थेचा नवीन ताळेबंद**

उत्तर :

**भागीदारी संस्थेच्या पुस्तकात**

**नावे** **नफातोटा समायोजन खाते** **जमा**

| तपशील | रक्कम (₹) | तपशील | | रक्कम (₹) |
|---|---|---|---|---|
| मालसाठा खाते | १,७५० | धनको खाते | | २०० |
| उपस्कर खाते | २५० | शुद्ध तोटा (भांडवल खात्याला स्थानांतरित) | | |
| बुडीत व संशयित कर्ज निधी | ९०० | राजा | ३,००० | |
| संयंत्र खाते | ३,३०० | राणी | १,८०० | |
| | | प्रधान | १,२०० | ६,००० |
| | ६,२०० | | | ६,२०० |

**नावे** **भागीदाराचे भांडवल खाते** **जमा**

| तपशील | राजा (₹) | राणी (₹) | प्रधान (₹) | तपशील | राजा (₹) | राणी (₹) | प्रधान (₹) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| नफातोटा समायोजन खाते (तोटा) | ३,००० | १,८०० | १,२०० | शिल्लक पुआ | ४२,००० | ३७,००० | ३३,२०० |
| रोख खाते | | | ५,००० | राखीव निधी | ७,५०० | ४,५०० | ३,००० |
| प्रधानाचे कर्ज खाते | | | ३४,००० | ख्याती खाते | १०,००० | ६,००० | ४,००० |
| शिल्लक पु/ने | ५६,५०० | ४५,७०० | | | | | |
| | ५९,५०० | ४७,५०० | ४०,२०० | | ५९,५०० | ४७,५०० | ४०,२०० |

**ताळेबंद १ एप्रिल २०१९ रोजीचा**

| देयता | रक्कम ₹ | रक्कम ₹ | संपत्ती | रक्कम ₹ | रक्कम ₹ |
|---|---|---|---|---|---|
| धनको | ११,२०० | | रोख | | २,६०० |
| (–) अपलेखन | २०० | ११,००० | ऋणको | १८,००० | |
| अधिकोष अधिविकर्ष | | ९,७०० | (–) बुडीत कर्ज निधी | ९०० | १७,१०० |
| भागीदारांचे भांडवल खाते | | | मालसाठा | १७,५०० | |
| राजा | | ५६,५०० | (–) घट | १,७५० | १५,७५० |
| राणी | | ४५,७०० | संयंत्र | ३०,००० | |
| प्रधानाचे कर्ज खाते | | ३४,००० | (–) घसारा | ३,३०० | २६,७०० |
| | | | जमीन | | ७०,००० |
| | | | उपस्कर | ५००० | |
| | | | (–) घसारा | २५० | ४,७५० |
| | | | ख्याती | | २०,००० |
| | | १,५६,९०० | | | १,५६,९०० |

२. **नाना, नानी आणि सोनी यांचा ताळेबंद खालीलप्रमाणे आहे. ते भांडवलाच्या प्रमाणात नफातोटा विभागतात.**

**ताळेबंद ३१ मार्च २०१९ रोजीचा**

| देयता | | रक्कम (₹) | संपत्ती | | रक्कम (₹) |
|---|---|---|---|---|---|
| भांडवल | नाना | ५०,००० | यंत्रसामग्री | | २०,००० |
| | नानी | २०,००० | इमारत | | ५५,००० |
| | सोनी | ३०,००० | स्कंध | | १२,००० |
| धनको | | १०,००० | ऋणको | १२,००० | |
| देय विपत्र | | ५,००० | (–) संशयित कर्ज निधी | १,००० | ११,००० |
| | | | रोख | | १७,००० |
| | | १,१५,००० | | | १,१५,००० |

**सोनी व्यवसायातून १ एप्रिल २०१९ रोजी खालील अटींवर निवृत्त होते.**

१. स्कंधाचे पुस्तकमूल्याच्या ९२% मूल्यांकन ठेवावे.

२. ऋणकोवर १०% दराने संशयित कर्जनिधीची तरतूद करा.

३. जमीन आणि इमारतीचे मूल्य २०% ने वाढवावे.

४ संस्थेच्या ख्यातीचे मूल्य ₹ १२,०००. निश्चित करावे. सोनीच्या हिश्श्याची ख्याती उरलेले व्यवसाय चालविणारे भागीदार त्यांच्या लाभाच्या प्रमाणात समायोजित करून घेतात.

५. नवीन संस्थेचे भांडवल ₹ १,६०,००० निश्चित करण्यात आले. नाना आणि नानी यांच्या नवीन ३:१ लाभाच्या प्रमाणात रोख रकमेचा फरक समायोजित करा.

**तयार करा – नफातोटा समायोजन खाते, भागीदारांचे भांडवल खाते आणि सोनीच्या निवृत्तीनंतरचा संस्थेचा ताळेबंद तयार करा.**

उत्तर

### नफातोटा समायोजन खाते

| तपशील | रक्कम (₹) | तपशील | रक्कम (₹) |
|---|---|---|---|
| स्कंध | ९६० | जमीन आणि इमारत | ११,००० |
| संशयित कर्ज निधी | २०० | | |
| शुद्ध नफा (स्थानांतरित): | | | |
| नानांचे भांडवल खाते | ४,९२० | | |
| नानीचे भांडवल खाते | १,९६८ | | |
| सोनीचे भांडवल खाते | २,९५२ | | |
| | ११,००० | | ११,००० |

नावे **भागीदारांचे भांडवल खाते** जमा

| तपशील | नाना (₹) | नानी (₹) | सोनी (₹) | तपशील | नाना (₹) | नानी (₹) | सोनी (₹) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ख्याती खाते (५:१ प्रमाण) | ३,००० | ६०० | | शिल्लक पु /आ | ५०,००० | २०,००० | ३०,००० |
| | | | | ख्याती खाते | | | ३,६०० |
| रोख खाते | | | ३६,५५२ | नफातोटा समायोजन खाते | ४,९२० | १,९६८ | २,९५२ |
| शिल्लक पु / ने | १,२०,००० | ४०,००० | | रोख खाते | ६८,०८० | १८,६३२ | |
| | १,२३,००० | ४०,६०० | ३६,५५२ | | १,२३,००० | ४०,६०० | ३६,५५२ |

### ताळेबंद १ एप्रिल २०१९ रोजीचा

| देयता | रक्कम ₹ | रक्कम ₹ | संपत्ती | रक्कम ₹ | रक्कम ₹ |
|---|---|---|---|---|---|
| धनको | | १०,००० | यंत्रसामग्री | | २०,००० |
| देय विपत्र | | ५,००० | इमारत | ५५,००० | |
| भांडवल : | | | (+) अधिमूल्यन (वाढ) | ११,००० | ६६,००० |
| नाना | | १,२०,००० | स्कंध | १२,००० | |
| नानी | | ४०,००० | (–) घट | ९६० | ११,०४० |
| | | | ऋणको | १२,००० | |
| | | | (–) संशयित कर्ज निधी | १,२०० | १०,८०० |
| | | | रोख | | ६७,१६० |
| | | १,७५,००० | | | १,७५,००० |

टिप १) ख्याती – १२,००० × सोनीचे प्रमाण $\frac{३}{१०}$ = ₹ ३,६००

२) ख्यातीचे अपलेखन ............ नाना = ३,६०० × $\frac{५}{६}$ = ₹ ३,०००

नानी = ३,६०० × $\frac{१}{६}$ = ₹ ६००

३) लाभाचे प्रमाण = नवीन प्रमाण – जुने प्रमाण

नाना = $\frac{३}{४} - \frac{५}{१०} = \frac{३०-२०}{४०} = \frac{१०}{४०}$

नानी = $\frac{१}{४} - \frac{२}{१०} = \frac{१०-८}{४०} = \frac{२}{४०}$

लाभाचे प्रमाण = १०:२ = ५:१

३. **श्याम ट्रेडर्स पुणे यांचा ताळेबंद खालीलप्रमाणे आहे. भागीदार नफातोटा ५:२:३ प्रमाणात विभागतात.**

**ताळेबंद ३१/३/२०१९ रोजीचा**

| देयता | रक्कम ₹ | संपत्ती | | रक्कम ₹ |
|---|---|---|---|---|
| भांडवल खाते : | | यंत्र व संयत्र | | ३२,००० |
| रंभा | ३६,००० | इमारत | | ४०,००० |
| मेनका | ३२,००० | स्कंध | | २०,४०० |
| उर्वशी | १७,६०० | ऋणको | १६,८०० | |
| धनको | २०,००० | (–) संशयित कर्ज निधी | ८०० | १६,००० |
| देयविपत्र | १,२०० | बँक | | १२,४०० |
| राखीव निधी | १४,००० | | | |
| | १,२०,८०० | | | १,२०,८०० |

**१ एप्रिल २०१९ ला मेनका व्यवसायातून खालील अटींवर निवृत्त झाली.**

१. संपत्तीचे पुनर्मूल्यांकन खालील प्रमाणे केले होते.

अ) स्कंध ₹ २८,०००  ब) इमारतीचे मूल्य १०% वाढवावे.

क) ऋणकोवर ₹ १,००० संशयित कर्जनिधीची तरतूद करावी.

ड) यंत्र आणि संयत्रावर १०% दराने घसारा आकारा.

२. निवृत्त होणाऱ्या भागीदाराच्या हिश्श्याच्या ख्यातीचे मूल्य ₹ ८,००० लावावे आणि उरलेल्या भागीदारांनी असे ठरविले की ख्यातीचे अपलेखन त्यांच्या नवीन लाभ विभाजनाच्या प्रमाणात करावे, लाभ विभाजनाचे नवीन प्रमाण ५:३ आहे.

३. मेनकास निवृत्तीच्या वेळी द्यावयाची राशी तिच्या कर्ज खात्याला स्थानांतरित करावी.

**तयार करा – अ) नफातोटा समायोजन खाते ब) भागीदाराचे भांडवल खाते क) नवीन संस्थेचा ताळेबंद**

**उत्तर :**

**श्याम ट्रेडर्स पुणे यांचे पुस्तकात**

**नावे** **नफातोटा समायोजन खाते** **जमा**

| तपशील | | रक्कम ₹ | तपशील | रक्कम ₹ |
|---|---|---|---|---|
| संशयित कर्ज निधी खाते | | २०० | स्कंध खाते | ७,६०० |
| यंत्र व संयत्र खाते | | ३,२०० | इमारत खाते | ४,००० |
| नफा [भांडवल खात्याला वर्ग] | | | | |
| रंभा | ४,१०० | | | |
| मेनका | १,६४० | | | |
| उर्वशी | २,४६० | ८,२०० | | |
| | | ११,६०० | | ११,६०० |

उत्तर :

नावे **भागीदाराचे भांडवल खाते** जमा

| तपशील | रंभा (₹) | मेनका (₹) | उर्वशी (₹) | तपशील | रंभा (₹) | मेनका (₹) | उर्वशी (₹) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ख्याती खाते | ५,००० | | ३,००० | शिल्लक पु/आ | ३६,००० | ३२,००० | १७,६०० |
| कर्जखाते | | ४४,४४० | | ख्याती खाते | | ८,००० | |
| शिल्लक पु / नि | ४२,१०० | | २१,२६० | राखीव निधी | ७,००० | २,८०० | ४,२०० |
| | | | | नफातोटा समायोजन खाते | ४,१०० | १,६४० | २,४६० |
| | ४७,१०० | ४४,४४० | २४,२६० | | ४७,१०० | ४४,४४० | २४,२६० |

**ताळेबंद १ एप्रिल २०१९ रोजीचा**

| देयता | रक्कम ₹ | रक्कम ₹ | संपत्ती | रक्कम ₹ | रक्कम ₹ |
|---|---|---|---|---|---|
| धनको | | २०,००० | स्कंध | २०,४०० | |
| देय विपत्र | | १,२०० | (+) वाढ | ७,६०० | २८,००० |
| भांडवल खाते | | | इमारत | ४०,००० | |
| रंभा | ४२,१०० | | (+) वाढ | ४,००० | ४४,००० |
| मेनका | २१,२६० | ६३,३६० | ऋणको | १६,८०० | |
| मेनकाचे कर्ज खाते | | ४४,४४० | (−) सं. क. नि. | १,००० | १५,८०० |
| | | | संयत्र व यंत्रसामग्री | ३२,००० | |
| | | | (−) घसारा | ३,२०० | २८,८०० |
| | | | बँक | | १२,४०० |
| | | १,२९,००० | | | १,२९,००० |

४. **काळे, गोरे आणि पांढरे ३:३:२ प्रमाणात नफातोटा वाटून घेणारे भागीदार आहेत. त्यांचा ३१ मार्च २०१८ रोजीचा ताळेबंद खालील प्रमाणे**

**ताळेबंद ३१ मार्च २०१८ रोजीचा**

| देयता | रक्कम ₹ | संपत्ती | रक्कम ₹ |
|---|---|---|---|
| भांडवल | | इमारत | १०,००० |
| काळे | ११,००० | संयत्र व यंत्रसामग्री | १०,७०० |
| गोरे | १५,००० | पशुधन | १०,००० |
| पांढरे | ८,००० | ऋणको | ५,००० |
| धनको | ८,९०० | स्कंध | ६,६०० |
| देय विपत्र | २,००० | रोख | ६,६०० |
| राखीव निधी | ४,००० | | |
| | ४८,९०० | | ४८,९०० |

१ एप्रिल २०१८ ला पांढरे संस्थेतून खालील अटीवर निवृत्त झाले.

१. संपत्तीचे पुनर्मूल्यांकन पुढील प्रमाणे :

अ) स्कंध ₹ ६,३००, संयत्र व यंत्रसामग्री ₹ १०,००० पशुधन ₹ १०,२००

२. संस्थेच्या ख्यातीचे मूल्य ₹ ४,००० मानून त्यातील फक्त पांढरे यांच्या हिश्श्याने संस्थेच्या पुस्तकात ख्याती खाते उघडावे आणि ताबडतोब अपलेखित करावे.

३. ऋणकोवर १०% संशयित कर्जनिधीची तरतूद करावी.

४. धनको मधून ₹ १०० अपलेखित करावयाचे आहे.

५. निवृत्तीनंतर पांढरेला द्यावयाची राशी त्याच्या कर्ज खात्याला स्थानांतरित करावयाची आहे.

**तयार करा :**

**१) नफातोटा समयोजन खाते** **२) भागीदारीचे भांडवल खाते** **३) नवीन संस्थेचा ताळेबंद**

**उत्तर :**

**संस्थेच्या पुस्तकात**

**नावे** **नफातोटा समायोजन खाते** **जमा**

| तपशील | रक्कम (₹) | तपशील | | रक्कम (₹) |
|---|---|---|---|---|
| संयत्र व यंत्रसामग्री खाते | ७०० | पशुधन खाते | | २०० |
| स्कंध खाते | ३०० | धनको | | १०० |
| संशयित कर्ज निधी खाते | ५०० | भांडवल खाते (तोटा) : | | |
| | | काळे | ४५० | |
| | | गोरे | ४५० | |
| | | पांढरे | ३०० | १,२०० |
| | १,५०० | | | १,५०० |

**उत्तर :**

**नावे** **भागीदाराचे भांडवल खाते** **जमा**

| तपशील | काळे (₹) | गोरे (₹) | पांढरे (₹) | तपशील | काळे (₹) | गोरे (₹) | पांढरे (₹) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ख्याती | ५०० | ५०० | | शिल्लक पु / आ | ११,००० | १५,००० | ८,००० |
| नफातोटा | | | | राखीव निधी | १,५०० | १,५०० | १,००० |
| समायोजन खाते | ४५० | ४५० | ३०० | ख्याती | | | १,००० |
| कर्ज खाते | | | ९,७०० | | | | |
| शिल्लक पु / नि | ११,५५० | १५,५५० | | | | | |
| | १२,५०० | १६,५०० | १०,००० | | १२,५०० | १६,५०० | १०,००० |

**ताळेबंद १ एप्रिल २०१८ रोजीचा**

| देयता | रक्कम ₹ | रक्कम ₹ | संपत्ती | रक्कम ₹ | रक्कम ₹ |
|---|---|---|---|---|---|
| भांडवल : | | | इमारत | | १०,००० |
| काळे | ११,५५० | २७,१०० | संयत्र व यंत्रसामग्री | १०,७०० | |
| गोरे | १५,५५० | | (–) घसारा | ७०० | १०,००० |
| पांढरेचे कर्ज खाते | | ९,७०० | पशुधन (Live stock) | १०,००० | |
| धनको | ८,९०० | | (+) वाढ | २०० | १०,२०० |
| (–) अपलेखन | १०० | ८,८०० | ऋणको | ५,००० | |
| देयविपत्र | | २,००० | (–) संशयित कर्ज निधी | ५०० | ४,५०० |
| | | | स्कंध | ६,६०० | |
| | | | (–) घट | ३०० | ६,३०० |
| | | | रोख | | ६,६०० |
| | | ४७,६०० | | | ४७,६०० |

५. **खालील ताळेबंद वैशाली, माधुरी आणि मानसी यांचा असून त्या समान प्रमाणात नफातोटा विभागून घेणाऱ्या भागीदार आहेत.**

**ताळेबंद ३१ मार्च २०१९ रोजीचा**

| देयता | रक्कम ₹ | संपत्ती | | रक्कम ₹ |
|---|---|---|---|---|
| धनको | १०,५०० | रोख | | १९,५०० |
| अधिकोष अधिविकर्ष | ५,००० | ऋणको | १६,००० | |
| राखीव निधी | १२,००० | (–) संशयित कर्ज निधी | २,००० | १४,००० |
| भांडवल : | | उपस्कर | | १५,००० |
| वैशाली | २८,७०० | सयंत्र | | ४०,००० |
| माधुरी | ३१,८०० | मोटार गाडी | | २५,००० |
| मानसी | ३०,००० | नफातोटा खाते | | ४,५०० |
| | १,१८,००० | | | १,१८,००० |

१ एप्रिल २०१९ रोजी वैशाली व्यवसायातून खालील अटींवर निवृत्त झाली.

१. उपस्कराचे पुनर्मूल्यांकन ₹ १४,०००, संयत्र ₹ ३८,००० आणि मोटारगाडी ₹ २३,००० करण्यात आले.

२. ऋणकोवर ५% दराने संशयित कर्जनिधीची तरतूद करावी.

३. संस्थेच्या ख्यातीचे मूल्य ₹ १५,००० मानून त्यातील फक्त वैशालीच्या हिश्श्याने संस्थेच्या पुस्तकात ख्याती खाते उघडावे.

४. वैशालीला द्यावयाच्या राशीपैकी ₹ १०,००० रोख देऊन शिल्लक राशी तिच्या कर्ज खात्याला स्थानांतरित करावी.

**तयार करा :**

**१) नफातोटा समायोजन खाते**

**२) भागीदाराचे भांडवल खाते**

**३) नवीन संस्थेचा ताळेबंद**

उत्तर :

### संस्थेच्या पुस्तकात

नावे **नफातोटा समायोजन खाते** जमा

| तपशील | रक्कम (₹) | तपशील | | रक्कम (₹) |
|---|---|---|---|---|
| उपस्कर खाते | १,००० | संशयित कर्ज निधी | | १,२०० |
| संयत्र खाते | २,००० | भांडवल खाते : | | ३,००० |
| मोटार गाडी खाते | १,२०० | वैशाली | १,००० | |
| | | माधुरी | १,००० | |
| | | मानसी | १,००० | |
| | ४,२०० | | | ४,२०० |

उत्तर :

नावे **भागीदाराचे भांडवल खाते** जमा

| तपशील | वैशाली (₹) | माधुरी (₹) | मानसी (₹) | तपशील | वैशाली (₹) | माधुरी (₹) | मानसी (₹) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| नफातोटा समायोजन खाते | १,००० | १,००० | १,००० | शिल्लक पु/आ | २८,७०० | ३१,८०० | ३०,००० |
| नफातोटा खाते | १,५०० | १,५०० | १,५०० | राखीव निधी | ४,००० | ४,००० | ४,००० |
| रोख खाते | १०,००० | | | ख्याती खाते | ५,००० | | |
| कर्ज खाते | २५,२०० | | | | | | |
| शिल्लक पु/ने | | ३३,३०० | ३१,५०० | | | | |
| | ३७,७०० | ३५,८०० | ३४,००० | | ३७,७०० | ३५,८०० | ३४,००० |

### ताळेबंद १ एप्रिल २०१९ रोजीचा

| देयता | रक्कम (₹) | रक्कम (₹) | संपत्ती | रक्कम (₹) | रक्कम (₹) |
|---|---|---|---|---|---|
| धनको | | १०,५०० | रोख | | ९,५०० |
| अधिकोष अधिविकर्ष | | ५,००० | ऋणको | १६,००० | |
| वैशालीचे कर्ज खाते | | २५,२०० | (–) सं.क.नि. | ८०० | १५,२०० |
| भांडवल खाते : | | | उपस्कर | १५,००० | |
| माधुरी | | ३३,३०० | (–) घसारा | १,००० | १४,००० |
| मानसी | | ३१,५०० | सयंत्र | ४०,००० | |
| | | | (–) घसारा | २,००० | ३८,००० |
| | | | मोटार गाडी | २५,००० | |
| | | | (–) घसारा | १,२०० | २३,८०० |
| | | | ख्याती | | ५,००० |
| | | १,०५,५०० | | | १,०५,५०० |

६. **समान प्रमाणात नफातोटा विभागून घेणारे अनिल, सुनील आणि सुरेश यांचा ताळेबंद खालील प्रमाणे आहे.**

**ताळेबंद ३१ मार्च २०१९ रोजीचा**

| देयता | रक्कम (₹) | संपत्ती | | रक्कम (₹) |
|---|---|---|---|---|
| धनको | २०,३०० | बँक | | ८,४०० |
| देय विपत्र | १०,६०० | ऋणको | १८,००० | |
| राखीव निधी | १३,५०० | (–) सं.क.नि. | ९,०० | १७,१०० |
| भांडवल खाते : | | संगणक | | १७,५०० |
| अनिल | ४३,६०० | जमीन व इमारत | | ७०,००० |
| सुनील | ३५,००० | संयत्र | | १०,००० |
| सुरेश | ३२,००० | उपस्कर | | २०,००० |
| | | ख्याती | | १२,००० |
| | १,५५,००० | | | १,५५,००० |

१ एप्रिल २०१९ रोजी सुरेश खालील अटींवर व्यवसायातून निवृत्त झाला.

१. जमीन व इमारतीचे मूल्य १०% ने वाढवावे आणि संगणकाचे मूल्य ₹ १,९०० ने कमी करावे.

२. संपूर्ण ऋणको शोध्य असून यापुढे संशयित कर्जनिधीची गरज नाही.

३. सयंत्राचे पुनर्मूल्यांकन ₹ ९,४०० करावे.

४. संस्थेच्या ख्यातीचे मूल्य ₹ १६,५०० निश्चित करावे.

५. उपस्कर ₹२१,८०० ला विकले आणि सुरेशला द्यावयाच्या राशीपैकी ₹ १५,००० RTGS ने देऊन शिल्लक राशी त्याच्या कर्ज खात्याला स्थानांतरित करावी.

**तयार करा :**

**१) नफातोटा समायोजन करावे.** **२) भागीदारीचे भांडवल खाते** **३) अनिल आणि सुनील यांचा ताळेबंद.**

**उदाहरण :**

**संस्थेच्या पुस्तकात**

**नावे** **नफातोटा समायोजन खाते** **जमा**

| तपशील | | रक्कम (₹) | तपशील | रक्कम (₹) |
|---|---|---|---|---|
| संगणक खाते | | १,९०० | जमीन व इमारत खाते | ७,००० |
| संयत्र खाते | | ६०० | संशयित कर्जनिधी खाते | ९०० |
| भांडवल खाते (नफा) : | | | उपस्कर खाते | १,८०० |
| अनिल | २,४०० | | | |
| सुनील | २,४०० | | | |
| सुरेश | २,४०० | ७,२०० | | |
| | | ९,७०० | | ९,७०० |

नावे **भागीदाराचे भांडवल खाते** जमा

| तपशील | अनिल (₹) | सुनील (₹) | सुरेश (₹) | तपशील | अनिल (₹) | सुनील (₹) | सुरेश (₹) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| बँक खाते | | | १५,००० | शिल्लक पु / आ | ४३,६०० | ३५,००० | ३२,००० |
| सुरेशचे कर्ज खाते | | | २५,४०० | राखीव निधी | ४,५०० | ४,५०० | ४,५०० |
| शिल्लक पु / ने | ५२,००० | ४३,४०० | | ख्याती खाते | १,५०० | १,५०० | १,५०० |
| | | | | नफातोटा समायोजन खाते (नफा) | २,४०० | २,४०० | २,४०० |
| | ५२,००० | ४३,४०० | ४०,४०० | | ५२,००० | ४३,४०० | ४०,४०० |

**अनिल आणि सुनील यांचा ताळेबंद १ एप्रिल २०१९ रोजीचा**

| देयता | रक्कम (₹) | रक्कम (₹) | संपत्ती | रक्कम (₹) | रक्कम (₹) |
|---|---|---|---|---|---|
| धनको | | २०,३०० | बँक शिल्लक | | १५,२०० |
| देय विपत्रे | | १०,६०० | ऋणको | | १८,००० |
| सुरेशचे कर्ज खाते | | २५,४०० | संगणक | १७,५०० | |
| भांडवल : | | | (–) घसारा | १,९०० | १५,६०० |
| अनिल | | ५२,००० | जमीन व इमारत | ७०,००० | |
| सुनील | | ४३,४०० | (+) वाढ | ७,००० | ७७,००० |
| | | | संयंत्र | १०,००० | |
| | | | (–) घसारा | ६०० | ९,४०० |
| | | | ख्याती | | १६,५०० |
| | | १,५१,७०० | | | १,५१,७०० |

७. **खालील ताळेबंद जया, माया आणि ममता यांचा असून त्या अनुक्रमे $\frac{३}{८} : \frac{३}{८} : \frac{२}{८}$ या प्रमाणात नफातोटा विभागून घेणाऱ्या भागीदार आहेत.**

**ताळेबंद ३१ मार्च २०१९ रोजीचा**

| देयता | रक्कम (₹) | संपत्ती | रक्कम (₹) |
|---|---|---|---|
| धनको | ३४,४०० | बँक शिल्लक | २१,६०० |
| देय विपत्रे | ९,२०० | संयंत्र व यंत्रसामग्री | ३४,८०० |
| भांडवल खाते : | | ऋणको | ५०,००० |
| जया | ४८,००० | पशुधन (Live Stock) | २५,२०० |
| माया | ५२,००० | उपकरणे | १६,००० |
| ममता | ३६,००० | गुंतवणूक | ४८,००० |
| राखीव निधी | १६,००० | | |
| | १,९५,६०० | | १,९५,६०० |

**१ एप्रिल २०१९ रोजी संस्थेतून ममता खालील अटीवर निवृत्त झाली.**

१. संपत्तीचे पुनर्मूल्यांकन खालील प्रमाणे :

पशुधन ₹ २४,०००; संयत्र व यंत्रसामग्री ₹ ३२,०००, उपकरणे ₹ १६,८००

२. ₹ ४०० चे धनको यापुढे देयता राहणार नाही म्हणून ते समायोजित करावे.

३. आपले ग्राहक मिस्टर राम यांच्याकडून येणे ₹ २,००० वसूल होण्याजोगे नाही.

४. ममताला द्यावयाची राशी तिला तिच्या कर्ज खात्याला स्थानांतरित करा.

**नवीन संस्थेच्या पुस्तकात रोजकीर्द द्या.**

**नवीन संस्थेच्या पुस्तकात रोजकीर्द नोंदी**

| दिनांक | तपशील | खा. पा. | नावे रक्कम (₹) | जमा रक्कम (₹) |
|---|---|---|---|---|
| १ एप्रिल २०१९ | राखीव निधी खाते ........................................नावे | | १६,००० | |
| | जयाच्या भांडवल खात्याला | | | ६,००० |
| | मायाच्या भांडवल खात्याला | | | ६,००० |
| | ममताच्या भांडवल खात्याला | | | ४,००० |
| | (राखीव निधी भांडवल खात्याला स्थानांतरित केल्याबद्दल) | | | |
| १ एप्रिल २०१९ | पुनर्मूल्यांकन खाते ......................................नावे | | ६,००० | |
| | पशुधन खात्याला | | | १,२०० |
| | संयत्र व यंत्रसामग्री खात्याला | | | २,८०० |
| | संशयित कर्जनिधी खात्याला | | | २,००० |
| | (संपत्तीचे अवमूल्यन केल्याबद्दल आणि ऋणकोवर संशयित कर्जनिधी निर्माण केल्याबद्दल) | | | |
| १ एप्रिल २०१९ | उपकरण खाते ...........................................नावे | | ८०० | |
| | धनको खाते | | ४०० | |
| | पुनर्मूल्यांकन खात्याला | | | १,२०० |
| | (संपत्तीचे अधिमूल्यन केल्याबद्दल व धनकोचे अपलेखन केल्याबद्दल) | | | |
| १ एप्रिल २०१९ | जयाचे भांडवल खाते .....................................नावे | | १,८०० | |
| | मायाचे भांडवल खाते.....................................नावे | | १,८०० | |
| | ममताचे भांडवल खाते ....................................नावे | | १,२०० | |
| | नफातोटा पुनर्मूल्यांकन खात्याला | | | ४,८०० |
| | (पुनर्मूल्यांकनाचा तोटा स्थानांतरित केल्याबद्दल) | | | |
| १ एप्रिल २०१९ | ममताचे भांडवल खाते ....................................नावे | | ३८,८०० | |
| | ममताच्या कर्ज खात्याला | | | ३८,८०० |
| | (निवृत्तीच्या वेळी ममताला द्यावयाची राशी तिच्याकर्ज खात्याला स्थानांतरित केल्याबद्दल) | | | |
| | **एकूण** | | ६६,८०० | ६६,८०० |

**स्पष्टीकरणात्मक टीपणे : – संपत्ती व देयतेच्या पुनर्मूल्यांकनावर नफातोटा**

नावे **नफातोटा समायोजन खाते** जमा

| तपशील | रक्कम (₹) | तपशील | | रक्कम (₹) |
|---|---|---|---|---|
| पशुधन खाते | १,२०० | उपकरण खाते | | ८०० |
| संयत्र व यंत्रसामग्री खाते | २,८०० | धनको खाते | | ४०० |
| संशयित कर्ज खाते | २,००० | भांडवल खाते (तोटा) : | | ४,८०० |
| | | जया | १,८०० | |
| | | माया | १,८०० | |
| | | ममता | १,२०० | |
| | ६,००० | | | ६,००० |

नावे **भागीदाराचे भांडवल खाते** जमा

| तपशील | जया (₹) | माया (₹) | ममता (₹) | तपशील | जया (₹) | माया (₹) | ममता (₹) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| नफातोटा समायोजन खाते (तोटा) | १,८०० | १,८०० | १,२०० | शिल्लक पु / आ | ४८,००० | ५२,००० | ३६,००० |
| कर्ज खाते | | | ३८,८०० | राखीव निधी | ६,००० | ६,००० | ४,००० |
| शिल्लक पु / ने | ५२,२०० | ५६,२०० | | | | | |
| | ५४,००० | ५८,००० | ४०,००० | | ५४,००० | ५८,००० | ४०,००० |
| | | | | शिल्लक पु / आ | ५२,२०० | ५६,२०० | ---- |

## स्वाध्याय : ४

### वस्तुनिष्ठ प्रश्न (Objective Questions)

**अ) खालील दिलेल्या पर्यायामधून योग्य उत्तर निवडा**

१. भागीदाराच्या निवृत्तीचे वेळी पुनर्मूल्यांकनावर झालेला नफा किंवा तोटा .......... विभागून घेतला जातो.
अ) उरलेले भागीदार ब) सर्व भागीदारांमध्ये क) फक्त निवृत्त भागीदार ड) वरीलपैकी काहीही नाही.

२. संपत्तीच्या मूल्यात घट होते तेव्हा नफातोटा समायोजन खाते .......... केले जाते.
अ) नावे ब) जमा क) अधिक ड) यापैकी काहीही नाही

३. निवृत्त भागीदाराला द्यावयाची राशी रोख दिली नसल्यास त्याच्या भांडवल खात्याची शिल्लक .......... खात्याला स्थानांतरित करतात.
अ) पुनर्मूल्यांकन ब) ताळेबंद क) व्यापार ड) भागीदाराचे भांडवल

४. लाभाचे प्रमाण =.......... प्रमाण वजा जुने प्रमाण
अ) नवीन ब) समान क) भांडवल ड) त्यागाचे

५. नवीन प्रमाण = जुने प्रमाण अधिक (+) .......... प्रमाण
अ) लाभाचे ब) भांडवलाचे क) त्यागाचे ड) चालू

६. आपटे, भाटे आणि चितळे $\frac{१}{३}$, $\frac{३}{१०}$ आणि $\frac{१}{५}$ प्रमाणात नफा विभागून घेणारे भागीदार आहेत. तर आपटे निवृत्त होत असेल तर नवीन प्रमाण ........... राहील.

अ) ५:२ ब) ३:२ क) ५:३ ड) २:५

## ब) पुढील विधानांसाठी एक शब्द / संज्ञा किंवा शब्द समूह द्या.

१. नफातोटा समायोजन खात्याची जमाबाकी
२. भागीदाराच्या निवृत्तीनंतर उरलेल्या भागीदारांना मिळणाऱ्या फायद्याचे प्रमाण
३. पुनर्मूल्यांकन खात्याची नावे बाकी
४. नवीन प्रमाणातून जुने प्रमाण वजा केल्यानंतर येणारे प्रमाण
५. संस्थेच्या अनेक वर्षाच्या प्रतिष्ठेमुळे प्राप्त झालेले मूल्य
६. पुनर्मूल्यांकन खात्याचा नफा किंवा तोटा भागीदाराच्या ज्या खात्याला स्थानांतरित केला जातो ते खाते

## क) खालील विधाने बरोबर की चूक ते सकारण लिहा.

१. फायद्याचे प्रमाण म्हणजे जुने प्रमाण वजा नवे प्रमाण
२. निवृत्तीच्या तारखेपर्यंतचा निवृत्त भागीदाराचा लाभ नफातोटा निलंबन (Suspense) खात्याला नावे करतात.
३. भागीदाराच्या निवृत्तीच्या वेळी त्यागाचे प्रमाण गृहीत धरतात.
४. निवृत्त भागीदाराला व्यवसायातून बाहेर जाणारा भागीदार असेही म्हणतात.
५. भागीदाराच्या निवृत्तीमुळे, उर्वरीत भागीदार ख्यातीची राशी त्यांच्या नफा विभाजनाच्या प्रमाणात वाटून घेतात.
६. निवृत्त भागीदाराला राखीव निधी आणि संचित नफा वाटून दिला जात नाही.

## ड) रिकाम्या जागी योग्य शब्द लिहून वाक्य पुन्हा लिहा.

१. नवीन प्रमाण (–) वजा ...........= लाभाचे प्रमाण
२. निवृत्त भागीदाराच्या हिश्श्याची ख्याती उर्वरीत भागीदाराच्या भांडवल खात्याला ...........टाकतात.
३. पुनर्मूल्यांकन खात्याला ........... खाते असेही म्हणतात.
४. निवृत्त भागीदाराच्या चालू खात्याची शिल्लक ........... खात्याला स्थानांतरित करतात.
५. भागीदाराच्या निवृत्ति नंतर उर्वरीत भागीदारांना मिळणाऱ्या हिश्श्याचे प्रमाण म्हणजे ........... प्रमाण होय.

## इ) एका वाक्यात उत्तरे द्या

१. निवृत्त भागीदार कोणाला म्हणतात ?
२. लाभाचे प्रमाण (benefit ratio) म्हणजे काय ?
३. नवीन प्रमाण म्हणजे काय ?
४. भागीदाराच्या निवृत्त भागीदाराची देयराशी कशी निश्चित करतात ?
५. लाभाच्या प्रमाणाचे आगणन कधी करतात ?
६. ख्यातीची रक्कम निवृत्त भागीदाराच्या भांडवल खात्याला जमा का दाखविली जाते ?

## प्रात्यक्षिक उदाहरणे

**१. मामा, काका आणि बाबा अनुक्रमे ४:३:३ प्रमाणात नफातोटा विभागून घेणारे भागीदार आहेत. त्यांचा ताळेबंद खालील प्रमाणे आहे.**

**ताळेबंद ३१/३/२०१८ रोजीचा**

| देयता | रक्कम (₹) | संपत्ती | | रक्कम (₹) |
|---|---|---|---|---|
| धनको | ७,००० | रोख | | ४,५०० |
| कर्ज | ५,००० | ऋणको | ५,००० | |
| राखीव निधी | ६,२५० | (−) सं. क. नि. | ५०० | ४,५०० |
| भांडवल खाते : | | पशुधन (Live Stock) | | १२,५०० |
| मामा | २०,००० | मोटार गाडी | | ४,००० |
| काका | १५,००० | उपस्कर | | १७,५०० |
| बाबा | १२,२५० | यंत्र | | २२,५०० |
| | ६५,५०० | | | ६५,५०० |

**काकाने १ एप्रिल २०१८ रोजी खालील अटींवर निवृत्त होण्याचे ठरविले.**

१. काकाच्या हिश्श्याच्या ख्यातीचे मूल्य ₹ २,७०० लावावे.

२. उपस्करावर वार्षिक १०% आणि मोटार गाडीवर वार्षिक १२.५% दराने घसारा आकारा.

३. पशुधनाचे मूल्य १०% ने व यंत्राचे मूल्य २०% वाढवावे.

४. नुकसान भरपाईच्या दाव्यासाठी ₹ २,००० ची तरतूद करा.

५. संशयित कर्जनिधीची यापुढे गरज नाही.

६. काकास निवृत्तीच्या वेळी द्यावयाची राशी त्याच्या कर्ज खात्याला स्थानांतरित करावी.

**तयार करा : अ) नफातोटा समायोजन खाते  ब) भागीदाराचे भांडवल खाते  क) नवीन संस्थेचा ताळेबंद**

**उत्तर :** १) पुनर्मूल्यांकनावरील नफा – ₹ २,०००  २) काकाचे कर्ज खाते – ₹ २०,१७५  ३) ताळेबंदाची बेरीज – ₹ ७२,२००

**२. राम, श्याम आणि घनश्याम ३:२:१ प्रमाणात नफातोटा विभागून घेणारे भागीदार आहेत. ३१/३/२०१९ रोजी त्यांचा ताळेबंद खालील प्रमाणे आहे.**

**ताळेबंद ३१/३/२०१९ रोजीचा**

| देयता | रक्कम (₹) | संपत्ती | रक्कम (₹) |
|---|---|---|---|
| भांडवल : | | बँक | ५४,००० |
| राम | १,२०,००० | ऋणको | ९०,००० |
| श्याम | ९०,००० | इमारत | ६०,००० |
| घनश्याम | ६०,००० | गुंतवणूक | १,५०,००० |
| धनको | २२,००० | | |
| देय विपत्र | १२,००० | | |
| कर्ज | ५०,००० | | |
| | ३,५४,००० | | ३,५४,००० |

**घनश्याम १ एप्रिल, २०१९ व्यवसायातून खालील अटीवर निवृत्त झाला.**

१. इमारत आणि गुंतवणुकीचे मूल्य अनुक्रमे ५% व १०% ने वाढवा.

२. ऋणकोवर ५% प्रमाणे संशयित कर्जनिधीची तरतूद करा.

३. अदत्त वेतनाकरिता ₹ ३,००० ची तरतूद करा.

४. संस्थेच्या ख्यातीचे मूल्य ₹ ९०,००० मानून घनश्यामच्या हिश्श्याने संस्थेच्या पुस्तकात ख्याती खाते उघडावे आणि ताबडतोब अपलेखित करावे.

५. निवृत्तीनंतर घनश्यामला द्यावयाची राशी त्याच्या कर्ज खात्याला स्थानांतरित करावयाची आहे.

**तयार करा :**

**अ) नफातोटा समायोजन खाते  ब) भागीदाराचे भांडवल खाते  क) नवीन संस्थेचा ताळेबंद**

**उत्तर :** १) पुनर्मूल्यांकनावरील नफा – ₹ १०,५०० २) ताळेबंद बेरीज – ₹ ३,६७,५०० ३) घनश्यामचे कर्ज खाते – ₹ ७६,७५०

**३. अनु, रेणू आणि दिनू यांचा ताळेबंद खालील प्रमाणे. ते नफातोटा अनुक्रमे $\frac{२}{५} : \frac{२}{५} : \frac{१}{५}$ प्रमाणात वाटून घेतात.**

**ताळेबंद ३१/३/२०१९ रोजीचा**

| देयता | रक्कम (₹) | संपत्ती | | रक्कम (₹) |
|---|---|---|---|---|
| धनको | ८,००० | बँक | | ५,००० |
| देय विपत्र | २,००० | ऋणको | २०,००० | |
| राखीव निधी | ५,००० | (–) सं. क. नि. | १,००० | १९,००० |
| भांडवल : | | उपस्कर | | १५,००० |
| अनु | ४०,००० | संयत्र | | ४,००० |
| रेणु | ३०,००० | आत्मधृत संपत्ती (Free hold property) | | २७,००० |
| दिनु | १५,००० | ख्याती | | ३०,००० |
| | १,००,००० | | | १,००,००० |

**दिनूने १ एप्रिल २०१९ रोजी खालील अटीवर निवृत्त होण्याचे ठरविले.**

१. संपत्तीचे पुनर्मूल्यांकन पुढील प्रमाणे –
आत्मधृत संपत्ती ₹ ३०,०००, संयत्र ₹ ५,०००, उपस्कर ₹ १२,०००, सर्व ऋणको शोध्य आहेत.

२. ख्यातीचे मूल्य संस्थेच्या भागील ५ वर्षाच्या सरासरी नफ्याच्या तिप्पट लावावे. मागील ५ वर्षाचा नफातोटा खालील प्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| २०१४–१५ | ₹ १,००० नफा | २०१५–१६ | ₹ १०,५०० नफा |
| २०१६–१७ | ₹ १६,००० नफा | २०१७–१८ | ₹ १४,५०० नफा |
| २०१८–१९ | ₹ १०,००० नफा | | |

३. दिनूला निवृत्तीच्या वेळी ₹ ३,००० धनादेशाद्वारे द्यावे

४. दिनूच्या भांडवल खात्याची शिल्लक राशी त्याच्या कर्ज खात्याला स्थानांतरित करावी.

**तयार करा :**

**१) नफातोटा समायोजन खाते  २) भागीदाराचे भांडवल खाते  ३) नवीन संस्थेचा ताळेबंद**

**उत्तर :** १) नफातोटा समायोजन खाते नफा – ₹ ८,६०० २) ताळेबंदाची बेरीज – ₹ १,०५,६०० ३) बँक शिल्लक – ₹ २,०००
४) दिनूचे कर्ज खाते – ₹ १४,७२०

४. **रोहन, रोहित आणि सचिन हे भागीदार आहेत. ते नफातोटा अनुक्रमे ३:१:१ प्रमाणात विभागून घेतात. त्यांचा ३१ मार्च २०१८ रोजीचा ताळेबंद खालील प्रमाणे :**

**ताळेबंद ३१ मार्च २०१८ रोजीचा**

| देयता | रक्कम (₹) | संपत्ती | रक्कम (₹) |
|---|---|---|---|
| धनको | ४०,००० | बँक | १२,५०० |
| राखीव निधी | ५०,००० | ऋणको | ६०,००० |
| देय विपत्र | २५,००० | पशुधन | ५०,००० |
| भांडवल खाते : | | इमारत | ७५,००० |
| रोहन | १,२५,००० | यंत्र व संयत्र | ३५,००० |
| रोहीत | १,००,००० | मोटार ट्रक | १,००,००० |
| सचिन | ५०,००० | ख्याती | ५७,५०० |
| | ३,९०,००० | | ३,९०,००० |

**१ एप्रिल २०१८ रोजी सचिन भागीदारीतून खालील अटीवर निवृत्त झाला.**

१. ख्यातीचे पुनर्मूल्यांकन ₹ ५०,००० करण्यात आले.

२. संपत्ती आणि देयतेचे पुनर्मूल्यांकन खालीलप्रमाणे होते.

ऋणको ₹ ५०,०००, पशुधन, ₹ ४५,०००, इमारत ₹ १,२५,०००, यंत्र व संयत्र ₹ ३०,०००, मोटार ट्रक ₹ ९५,०००आणि धनको ₹ ३०,०००

३. रोहन आणि रोहितने अनुक्रमे ₹ ५०,००० आणि ₹ २५,००० अतिरिक्त भांडवल नेट बँकींगचे माध्यमाने आणले.

४. सचिनला द्यावयाची राशी त्याच्या कर्ज खात्याला स्थानांतरित करा.

**नवीन संस्थेच्या पुस्तकात रोजकिर्द नोंदी द्या.**

५. **शाह, लोढा आणि ढोले हे अनुक्रमे ४ : ३ : ३ प्रमाणात नफातोटा विभागून घेणारे भागीदार आहेत. ३१ मार्च २०१९ रोजीचा त्यांचा ताळेबंद खालील प्रमाणे आहे.**

**ताळेबंद ३१ मार्च २०१९ रोजीचा**

| देयता | रक्कम (₹) | संपत्ती | | रक्कम (₹) |
|---|---|---|---|---|
| विविध धनको | २०,००० | रोख | | ९,००० |
| देय विपत्र | ४,००० | विविध ऋणको | १०,००० | |
| भांडवल : | | (–) सं. क. नि. | १,००० | ९,००० |
| शाह | ४५,००० | उपस्कर | | २५,००० |
| लोढा | ३५,००० | संगणक | | ४३,००० |
| ढोले | २७,००० | वाहन (Vehicles) | | ४५,००० |
| | १,३१,००० | | | १,३१,००० |

**१ एप्रिल २०१९ रोजी श्री. लोढा व्यवसायातून खालील अटींवर निवृत्त झाला.**

१. ख्यातीचे मूल्य संस्थेच्या मागील ५ वर्षाचा नफातोट्याच्या सरासरी एवढे लावावे. मागील ५ वर्षाचा नफातोटा खालीलप्रमाणे आहे.

२. संगणकावर वार्षिक १०% दराने घसारा आकारा.

३. उपस्कराचे पुनर्मूल्यांकित मूल्य ₹ २७,५०० लावावे.

४. वाहनाचे मूल्य २०% ने वाढवा.

५. यापुढे संशयित कर्जनिधीची गरज नाही.

६. शाह आणि ढोले भविष्यात नफातोटा २:१ प्रमाणात वाटून घेतील.

७. ख्यातीचे लाभ विभाजनाच्या नवीन प्रमाणात अपलेखन करा.

८. लोढाला द्यावयाची राशी त्याच्या कर्ज खात्याला स्थानांतरित करा.

**तयार करा : १) नफातोटा समयोजन खाते २) भागीदाराचे भांडवल खाते ३) नवीन संस्थेचा ताळेबंद**

**उत्तर :** नफातोटा समायोजन खाते नफा ₹ ८,२००, ताळेबंदाची बेरीज ₹ १,३९,२००

# ५. भागीदारीची पुनर्रचना (Reconstitution of Partnership) (भागीदाराचा मृत्यू) (Death of Partner)

**अभ्यास घटक**

*५.१ अर्थ.*
*५.२ नफा विभाजनाचे नवीन प्रमाण.*
*५.३ लाभाचे प्रमाण.*
*५.४ संपत्ती व देयतेचे पुनर्मूल्यांकन.*
*५.५ मृत भागीदाराच्या वारसाला द्यावयाची रक्कम.*
*५.६ देय रकमेचे समायोजन.*
*५.७ लेखांकिय नोंदी.*

**क्षमता विधाने Competency Statement**

❑ *या प्रकरणाचा अभ्यास केल्यानंतर विद्यार्थी सक्षम होतील :*

- *विविध अनुपातांची गणना कशा प्रकारे करावी हे जाणतील.*
- *मृत भागीदाराच्या मृत्यू तिथीपर्यंतच्या लाभातील हिश्याची गणना करू शकतील.*
- *मृत भागीदाराच्या ख्यातीतील हिश्याचे आगणन करू शकतील.*
- *मृत भागीदाराच्या वारसदाराला देय असलेल्या रकमेची निश्चिती करू शकतील.*
- *वारसदाराचे खाते कशाप्रकारे समायोजित करावे याची माहिती होईल.*

## ५.१ अर्थ :

भागीदारीतील एखादा भागीदार मयत झाल्यानंतर मयत भागीदाराचे भागीदारीतील अस्तित्व संपुष्टात येते. म्हणून भागीदाराच्या मृत्यूला भागीदाराची सक्तीची निवृत्ती म्हणतात. भागीदारी संस्था इतर भागीदाराच्या मदतीने भागीदारीचे कामकाज चालू ठेवते. परंतु जर भागीदारीच्या करारनाम्यात तशी तरतूद केलेली असेल तरच ते शक्य होते. मृत भागीदाराच्या खात्याच्या रकमेची परतफेड ही त्याच्या कायदेशीर वारसला/प्रतिनिधीला करण्यात येते. या देय रकमेवर मृत भागीदाराच्या वारसाला अधिकार प्राप्त होतात आणि मृत भागीदाराच्या मृत्यूच्या दिनांकापासून तर त्याला दिल्या जाणाऱ्या रकमेवर वार्षिक ६% दराने व्याजासहित रक्कम द्यावी लागते.

## ५.२ नफा विभाजनाचे नवीन प्रमाण : (New Profit Sharing Ratio)

भागीदाराच्या मृत्यूनंतर राहिलेल्या भागीदारांचे नफा विभाजनाचे प्रमाण बदलते. म्हणजेच राहिलेल्या भागीदारांचे नफा विभाजनाच्या प्रमाणात वाढ होते. कारण मृत भागीदाराच्या नफ्यातील हिस्सा राहिलेल्या भागीदारांना विभागून दिला जातो.

## ५.३ लाभाचे प्रमाण : (Gain Ratio or Benefit Ratio)

भागीदारीतील एखाद्या भागीदाराच्या मृत्यूमुळे राहिलेल्या भागीदारांना मृत भागीदाराच्या लाभातील हिश्याचा लाभ होतो. मृत भागीदाराच्या लाभातील हिस्सा राहिलेल्या भागीदारांच्या हिश्यात अधिक केला जातो या हिश्यालाच लाभ किंवा ''लाभाचे प्रमाण'' असे म्हणतात. या लाभाच्या प्रमाणाचा उपयोग खास करून ख्यातीचे अपलेखन किंवा ख्याती खाते उघडतांना मृत भागीदाराचा हिस्सा ठरविण्यासाठी केला जातो. या लाभाच्या प्रमाणाचे आगणन खालील सूत्राप्रमाणे केले जाते.

लाभाचे प्रमाण = नवीन प्रमाण – जुने प्रमाण.

## ५.४ संपत्ती व देयतांचे पुनर्मूल्यांकन : (Revaluation of Assets and Liabilities)

भागीदाराच्या मृत्यूनंतर भागीदारीला संपत्ती व देयतांचे पुनर्मूल्यांकन करावे लागते. मृत भागीदाराचा आणि भागीदारीतील हिस्सा त्याच्या वारसदाराला दिला जातो. पुनर्मूल्यांकनाचे संपत्ती व देयतांवर होणारे परिणाम पूनर्मूल्यांकन खात्यात दर्शविले जातात ही प्रक्रिया भागीदाराच्या निवृत्तीमध्येदेखील केली जाते. पुनर्मूल्यांकन खात्यावर येणारा नफा किंवा तोटा मृत भागीदाराच्या भांडवल खात्यात त्याच्या हिश्याने दाखविला जातो.

## ५.५ मृत भागीदाराच्या वारसाला / प्रशासकाला द्यावयाची रक्कम :

(Amount due to deceased Partner's Executor / Nominee / Administrator)

भांडवल : भागीदारी संस्थेच्या शेवटच्या ताळेबंदाच्या शिल्लकीवरून मृत भागीदाराच्या भांडवलाची गणना केली जाते. पुनर्मूल्यांकन खात्यावरील नफा किंवा तोटा, ख्यातीतील हिस्सा, भागीदारांचे वेतन, भांडवलावरील व्याज, उचलीवरील व्याज आणि भागीदाराच्या मृत्यू दिनांकापर्यंतचा नफा यांचे सुद्धा आगणन केले जाते.

## ५.६ देय रकमेचे समायोजन : (Settlement of Amount Due )

मृत भागीदाराला द्यावयाची अंतिम रक्कम त्याच्या कायदेशीर वारसाला किंवा प्रतिनिधीच्या कर्ज खात्याला स्थानांतरित केली जाते. आणि सर्व कायदेशीर कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर कायदेशीर वारसाला किंवा प्रतिनिधीला दिली जाते.

## ५.७ लेखांकीय नोंदी : (Accounting Treatment)

भागीदाराच्या निवृत्तीच्या वेळी आणि मृत्यूच्या वेळी लेखांकीय समायोजनाच्या नोंदी सारख्याच असतात.

### उदाहरणे

**१. रेखा, मेनका आणि मुक्ता हे एका भागीदारीचे भागीदार असून या अनुक्रमे २:१:१ या नफातोटा विभाजनाच्या प्रमाणात नफातोटा विभागून घेणारे भागीदार आहेत. त्यांच्या भागीदाराचा ३१ मार्च २०१९ रोजीचा ताळेबंद खालील प्रमाणे आहे.**

**ताळेबंद ३१ मार्च २०१९ रोजीचा**

| देयता | रक्कम (₹) | संपत्ती | रक्कम (₹) |
|---|---|---|---|
| भांडवल खाते : | | यंत्र व संयत्र | ६०,००० |
| रेखा | ६०,००० | ऋणको | ५०,००० |
| मेनका | ७०,००० | फर्निचर | ३०,००० |
| मुक्ता | ३४,००० | बँक शिल्लक | ६०,००० |
| धनको | १८,००० | | |
| देय विपत्र | २,००० | | |
| सामान्य निधी | १६,००० | | |
| | २,००,००० | | २,००,००० |

**दि. १ जुलै २०१९ रोजी मुक्ता मृत झाली.**

१. यंत्र व सयंत्राचे पुनर्मूल्यांकन ₹ ७०,००० ला करण्यात आले तसेच ऋणकोवर ₹ २,००० ची बुडीत कर्ज निधी निर्माण करण्यात आला.

२. मुक्ताच्या मृत्यूच्या तारखेपर्यंत तिने ₹ १०,००० उचल केली आहे.

३. उचलीवर ₹ १,००० व्याज आकारा.

४. मुक्ताच्या ख्यातीचे मूल्यांकन करतांना मागील चार वर्षाच्या सरासरी नफ्याच्या तीनपट घेणे. मागील चार वर्षाचा नफा, प्रथमवर्ष ₹ १,५०,०००, द्विवतियवर्ष ₹ १,३०,०००, तृतियवर्ष ₹ ७०,०००, चतुर्थवर्ष ₹ ५०,०००.

५. मृत भागीदाराच्या नफ्याचे आगणन करतांना त्याच्या मृत्यूच्या तारखेपर्यंतचा नफा मागील दोन वर्षाच्या (३ रे व ४ थे) सरासरी नफ्याच्या आधारे करण्यात यावा.

**तयार करा :**

**१) पुनर्मूल्यांकन खाते.** **२) भागीदारांचे भांडवल खाते.**

**३) नवीन भागीदारी संस्थेचा ताळेबंद.** **४) ख्याती आणि नफ्याचे कृती कार्य दर्शवा.**

**भागीदारी संस्थेच्या पुस्तकात**

**नावे** **नफा तोटा समायोजन खाते** **जमा**

| तपशील | | रक्कम (₹) | तपशील | रक्कम (₹) |
|---|---|---|---|---|
| बुडीत कर्जनिधी खाते | | २,००० | यंत्र व सयंत्र | १०,००० |
| भागीदारांचे भांडवल खाते : | | | | |
| रेखा | ४,००० | | | |
| मेनका | २,००० | | | |
| मुक्ता | २,००० | ८,००० | | |
| | | १०,००० | | १०,००० |

**नावे** **भागीदारांचे भांडवल खाते** **जमा**

| तपशील | रेखा (₹) | मेनका (₹) | मुक्ता (₹) | तपशील | रेखा (₹) | मेनका (₹) | मुक्ता (₹) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| उचल खाते | | | १०,००० | शिल्लक खाली आणली | ६०,००० | ७०,००० | ३४,००० |
| उचलीवरील व्याज | | | १,००० | सामान्य निधी | ८,००० | ४,००० | ४,००० |
| मुक्ताच्या वारसदाराचे कर्ज खाते | | | १,०७,७५० | नफा तोटा समायोजन खाते | ४,००० | २,००० | २,००० |
| | | | | ख्याती | | | ७५,००० |
| शिल्लक पुढे नेली | ७२,००० | ७६,००० | | नफातोटा निलंबित खाते | | | ३,७५० |
| | ७२,००० | ७६,००० | १,१८,७५० | | ७२,००० | ७६,००० | १,१८,७५० |

**ताळेबंद १ जुलै २०१९ रोजीचा**

| देयता | रक्कम (₹) | रक्कम (₹) | संपत्ती | रक्कम (₹) | रक्कम (₹) |
|---|---|---|---|---|---|
| धनको | | १८,००० | यंत्र व सयंत्र | ६०,००० | |
| देय विपत्र | | २,००० | (+) अधिमूल्यन | १०,००० | ७०,००० |
| भांडवल खाते : | | | ऋणको | ५०,००० | |
| रेखा | | ७२,००० | (–) बुडीत कर्ज निधी | २,००० | ४८,००० |
| मेनका | | ७६,००० | फर्निचर | | ३०,००० |
| वारसदाराचे कर्ज खाते | | १,०७,७५० | बँक | | ५०,००० |
| | | | नफातोटा निलंबित खाते (३,७५०– १,००० व्याज) | | २,७५० |
| | | | ख्याती | | ७५,००० |
| | | २,७५,७५० | | | २,७५,७५० |

**कृती कार्य :**

**१. नफ्यातील हिश्याचे आगणन :**

चालू वर्षाचा नफा = मागील दोन वर्षाचा सरासरी नफा

$$= \frac{७०,००० + ५०,०००}{२}$$

$$= \frac{१,२०,०००}{२}$$

= ₹ ६०,०००

१ एप्रिल २०१९ ते १ जुलै २०१९ रोजीचा विभागून दिलेला नफा

$$= ६०,००० \times \frac{३}{१२}$$

= ₹ १५,०००

मुक्ताला विभागून दिलेला नफा $= १५,००० \times \frac{१}{४}$ = ₹ ३,७५०

**२. ख्यातीचे मूल्यांकन :**

मागील चार वर्षाचा एकूण नफा = १,५०,००० + १,३०,००० + ७०,००० + ५०,००० = ४,००,०००

सरासरी नफा $= \frac{४,००,०००}{४}$ = ₹ १,००,०००

ख्याती = सरासरी नफा × सरासरी नफ्याच्या पटीत

ख्याती = १,००,००० × ३ (तिप्पट)

= ₹ ३,००,०००

मुक्ताच्या ख्यातीतील हिस्सा $= ३,००,००० \times \frac{१}{४}$ = ₹ ७५,०००

२. **राकेश, महेश आणि मुकेश हे एका भागीदारी संस्थेचे भागीदार आहेत. ते अनुक्रमे ३:२:१ या प्रमाणात नफातोटा विभागून घेतात. त्यांच्या भागीदारीचा ३१ मार्च २०१९ चा ताळेबंद खालीलप्रमाणे आहे.**

**ताळेबंद ३१ मार्च २०१९ रोजीचा**

| देयता | रक्कम (₹) | संपत्ती | | रक्कम (₹) |
|---|---|---|---|---|
| भांडवल खाते | | यंत्र व सयंत्र | | ४०,००० |
| राकेश | ३०,००० | मोटार ट्रक | | २०,००० |
| महेश | २०,००० | ऋणको | १६,००० | |
| मुकेश | १०,००० | वजा : बुडीत कर्ज निधी | २,००० | १४,००० |
| धनको | ८,००० | गुंतवणूक | | १८,००० |
| बँक कर्ज | २०,००० | बँक | | १४,००० |
| देय विपत्र | १८,००० | | | |
| | १,०६,००० | | | १,०६,००० |

**दि. ३० जून २०१९ रोजी मुकेश मयत झाला त्यामुळे खालील समायोजना करण्यात आल्या.**

१. संपत्तीचे पुनर्मूल्यांकन खालील प्रमाणे करण्यात आले.
   यंत्र व सयंत्र ₹ ४४,०००, मोटार ट्रक ₹ १८,०००, गुंतवणूक ₹ १७,०००.

२. सर्व ऋणको वसुलीयोग्य आहेत.

३. ख्यातीचे मूल्य संस्थेच्या मागील पाच वर्षाच्या सरासरी नफ्याच्या दोनपट लावावे. संस्थेच्या पुस्तकात ख्याती खाते दिसणार नाही.

४ मुकेशच्या मृत्यूपर्यंतचा नफ्यातील हिश्याचे आगणन करतांना सरासरी नफ्याच्या दोनपट लावण्यात यावा.

५. नफा पहिले वर्ष ₹ ६,०००, दुसरे वर्ष ₹ ११,०००, तिसरे वर्ष ₹ ७,०००, चौथे वर्ष ₹ १२,०००, पाचवे वर्ष ₹ २४,०००.

६. **तयार करा :**

**१) पुनर्मूल्यांकन खाते.  २) भागीदारांचे भांडवल खाते.  ३) १ जुलै २०१९ रोजीचा ताळेबंद.**

**भागीदारी संस्थेच्या पुस्तकात**

**नावे** **नफा तोटा समायोजन खाते** **जमा**

| तपशील | | रक्कम (₹) | तपशील | रक्कम (₹) |
|---|---|---|---|---|
| मोटार ट्रक | | २,००० | यंत्र व सयंत्र | ४,००० |
| गुंतवणूक | | १,००० | बुडीत कर्जनिधी खाते | २,००० |
| भागीदारांचे भांडवल खाते | | | | |
| राकेश | १,५०० | | | |
| महेश | १,००० | | | |
| मुकेश | ५०० | | | |
| | | ३,००० | | |
| | | ६,००० | | ६,००० |

**नावे** **भागीदारांचे भांडवल खाते** **जमा**

| तपशील | राकेश (₹) | महेश (₹) | मुकेश (₹) | तपशील | राकेश (₹) | महेश (₹) | मुकेश (₹) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| मुकेशचे भांडवल खाते | २,४०० | १,६०० | | शिल्लक खाती आणली | ३०,००० | २०,००० | १०,००० |
| मुकेशच्या वारसदाराचे खाते | | | १५,२५० | नफा तोटा समायोजन खाते | १,५०० | १,००० | ५०० |
| | | | | राकेशचे भांडवल खाते | | | २,४०० |
| | | | | महेशचे भांडवल खाते | | | १,६०० |
| शिल्लक पुढे नेली | २९,१०० | १९,४०० | | नफातोटा निलंबित खाते | | | ७५० |
| | ३१,५०० | २१,००० | १५,२५० | | ३१,५०० | २१,००० | १५,२५० |

**ताळेबंद १ जुलै २०१९ रोजीचा**

| देयता | रक्कम (₹) | रक्कम (₹) | संपत्ती | रक्कम (₹) | रक्कम (₹) |
|---|---|---|---|---|---|
| भांडवल खाते : | | | यंत्र व सयंत्र | ४०,००० | |
| राकेश | | २९,१०० | (+) अधिमूल्यन | ४,००० | ४४,००० |
| महेश | | १९,४०० | मोटार ट्रक | २०,००० | |
| मुकेशच्या वारसदाराचे कर्ज खाते | | १५,२५० | (–) अवमूल्यन | २,००० | १८,००० |
| धनको | | ८,००० | ऋणको | | १६,००० |
| बँक कर्ज | | २०,००० | गुंतवणूक | १८,००० | |
| देय विपत्र | | १८,००० | (–) अवमूल्यन | १,००० | १७,००० |
| | | | बँक | | १४,००० |
| | | | नफातोटा निलंबित खाते | | ७५० |
| | | १,०९,७५० | | | १,०९,७५० |

**कार्य टिपा :**

**१. ख्यातीच्या मूल्यांकनाचे आगणन**

एकूण नफा = ६,००० + १२,००० + ७,००० + ११,००० + २४,०००

= ६०,०००

सरासरी नफा = $\frac{\text{६०,०००}}{\text{५}}$ = ₹ १२,०००

ख्याती = १२,००० × २= २४,०००

मुकेशच्या ख्यातीतील हिस्सा = २४,००० × $\frac{\text{१}}{\text{६}}$ = ₹ ४,०००

ख्यातीचे ३:२ या प्रमाणात विभाजन करून राकेश आणि महेश यांच्या भांडवल खात्यात नावे करण्यात आले.

राकेश = ४,००० × $\frac{\text{३}}{\text{५}}$

= ₹ २,४००

महेश = ४,००० × $\frac{\text{२}}{\text{५}}$

= ₹ १,६००

**२. दि. ०१/०४/२०१९ ते ०१/०७/२०१९ पर्यंतचे मुकेशच्या नफ्यातील हिश्याचे आगणन.**

चालू वर्षाचा एकूण नफा = सरासरी नफा मागील दोन वर्षाचा

= $\frac{\text{१२,००० + २४,०००}}{\text{२}}$

= $\frac{\text{३६,०००}}{\text{२}}$

= ₹ १८,०००

विभाजित केलेला नफा = १८,००० × $\frac{\text{३}}{\text{१२}}$

= ₹ ४,५००

मुकेशचा नफ्यातील हिस्सा = ४,५०० × $\frac{\text{१}}{\text{६}}$

= ₹ ७५०

**३. अनिता, सुनीता आणि कविता एका भागीदारी संस्थेचे भागीदार असून ते अनुक्रमे २:२:१ या प्रमाणात नफातोटा विभागून घेणारे भागीदार आहेत. त्यांच्या भागीदारीचा ३१ मार्च २०१९ रोजीचा ताळेबंद खालीलप्रमाणे होता.**

**ताळेबंद ३१ मार्च २०१९ रोजीचा**

| देयता | रक्कम (₹) | संपत्ती | | रक्कम (₹) |
|---|---|---|---|---|
| भांडवल खाते : | | जमीन व इमारत | | ५५,८०० |
| अनिता | ४०,००० | गुंतवणूक | | ३०,००० |
| सुनीता | ४०,००० | फर्निचर | | १६,००० |
| कविता | २०,००० | ऋणको | २०,८०० | |
| धनको | ३०,००० | (–) बुडीत कर्ज निधी | ८०० | २०,००० |
| देय विपत्र | २,००० | बँक | | ८,२०० |
| कर्ज | ८,००० | ख्याती | | १०,००० |
| | १,४०,००० | | | १,४०,००० |

**दि. १ जुलै २०१९ रोजी कविता मृत झाली, भागीदारीच्या करारानुसार खालील बदल करण्यात आले.**

१. सर्व ऋणको वसुली योग्य आहेत.
२. नुकसान भरपाईबद्दल ₹ ९०० आकस्मिक देयता म्हणून प्रदान करावयाची आहे.
३. संस्थेची गुंतवणूक बाजारात १०% नफ्यावर विकण्यात आली.
४. कर्जाचे पूर्णपणे शोधन करण्यात आले.
५. जमीन व इमारतीवर ₹ ८०० आणि फर्निचरवर ₹ १,१०० घसारा आकारावयाचा आहे.
६. ख्यातीचे मूल्य ₹ १५,००० आणि संस्थेच्या पुस्तकात ख्याती खाते वरील रकमेने उघडण्यात आले.
७. कविताच्या संस्थेच्या नफ्यात तिच्या मृत्यू दिनांकापर्यंत हक्क आहे. आर्थिक वर्ष २०१९ चा अनुमानित नफा ₹ १०,०००.
8. कविताला देय असलेली रक्कम तिच्या वारसदाराला NEFT द्वारे दिली.

**तयार करा :**

**१) पूनर्मूल्यांकन खाते. २) भागीदारांचे भांडवल खाते. ३) नवीन भागीदारी संस्थेचा ताळेबंद.**

**उत्तर :**

**भागीदारी संस्थेच्या पुस्तकात**

**नावे** **पुनर्मूल्यांकन खाते** **जमा**

| तपशील | | रक्कम (₹) | तपशील | रक्कम (₹) |
|---|---|---|---|---|
| आकस्मिक देयता | | ९०० | बुडीत कर्ज निधी | ८०० |
| जमीन व इमारत | | ८०० | गुंतवणूक | ३,००० |
| फर्निचर | | १,१०० | | |
| भागीदाराचे भांडवल खाते (नफा) : | | | | |
| अनिता | ४०० | | | |
| सुनीता | ४०० | | | |
| कविता | २०० | १,००० | | |
| | | ३,८०० | | ३,८०० |

नावे **भागीदारांचे भांडवल खाते** जमा

| तपशील | अनिता (₹) | सुनीता (₹) | कविता (₹) | तपशील | अनिता (₹) | सुनीता (₹) | कविता (₹) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| कविताचा वारसदार खाते | | | २१,७०० | शिल्लक खाली नेली | ४०,००० | ४०,००० | २०,००० |
| शिल्लक खाली नेली | ४२,४०० | ४२,४०० | | पुनर्मूल्यांकन खाते | ४०० | ४०० | २०० |
| | | | | ख्याती खाते | २,००० | २,००० | १,००० |
| | | | | नफातोटा निलंबित खाते | | | ५०० |
| | ४२,४०० | ४२,४०० | २१,७०० | | ४२,४०० | ४२,४०० | २१,७०० |

**ताळेबंद १ जुलै २०१९ रोजीचा**

| देयता | रक्कम (₹) | रक्कम (₹) | संपत्ती | रक्कम (₹) | रक्कम (₹) |
|---|---|---|---|---|---|
| भांडवल खाते : | | | जमीन व इमारत | ५५,८०० | |
| अनिता | | ४२,४०० | (–) घसारा | ८०० | ५५,००० |
| सुनीता | | ४२,४०० | ऋणको | | २०,८०० |
| धनको | | ३०,००० | फर्निचर | | १४,९०० |
| देय विपत्र | | २,००० | बँक | | ११,५०० |
| आकस्मिक देयता | | ९०० | ख्याती | | १५,००० |
| | | | नफातोटा निलंबित खाते | | ५०० |
| | | १,१७,७०० | | | १,१७,७०० |

**कार्य टिपा :**

१. ०१ जुलै २०१९ रोजी कविताचा मृत्यू झाल्यामुळे तिच्या नफ्यातील हिश्याचे आगणन मृत्यू दिनांकापर्यंत करावे. २०१९ चा अनुमानित नफा ₹ १०,०००.

नफ्यातील कविताचा हिस्सा ३ महिन्याचा $= ₹\ १०,००० \times \frac{३}{१२} \times \frac{१}{५}$

$= ₹\ ५००$

२. कविताच्या वारसदाराच्या खात्याचे पूर्णपणे शोधन करण्यात आले म्हणून हे खाते ताळेबंदात देयता बाजूला स्थानांतरित करण्यात आलेले नाही.

**४. रोहित, सचिन आणि विराट एका भागीदारी संस्थेचे भागीदार आहेत. ते अनुक्रमे ७ :५: ४ या प्रमाणात नफातोटा वाटून घेतात. त्यांच्या भागीदारीचा ३१ मार्च २०१७ रोजीचा ताळेबंद खालीलप्रमाणे होता.**

**ताळेबंद ३१ मार्च २०१७**

| देयता | रक्कम (₹) | संपत्ती | रक्कम (₹) |
|---|---|---|---|
| भांडवल खाते : | | स्कंध | १७,००० |
| रोहीत | २३,००० | फर्निचर | १८,००० |
| सचिन | १५,००० | जमीन व इमारत | १६,००० |
| विराट | १२,००० | बँक | ३७,००० |
| देय विपत्र | २,००० | | |
| धनको | ८,००० | | |
| बँक कर्ज | १२,००० | | |
| सामान्य संचिती | १६,००० | | |
| | ८८,००० | | ८८,००० |

**दि. ३० जून २०१७ रोजी विराट मृत झाला आणि भागीदारीच्या करारानुसार खालील समायोजना करण्यात आल्या.**

१. स्कंध, फर्निचर आणि जमीन व इमारतीचे पुनर्मूल्यांकन ₹ १६,७००, ₹ १६,२००, ₹ ३०,१०० ला करण्यात आले.

२ संस्थेची ख्याती मागील चार वर्षाच्या सरासरी नफ्याच्या तीन पट ठरविण्यात यावी आणि ख्यातीतील विराटचा हिस्सा ठरविण्यात यावा मागील चार वर्षाचा नफा : ₹ ३०,०००, ₹ २५,०००, ₹ २५,०००, ₹ ४०,०००

३. विराटचा नफ्यातील हिस्सा मागील वर्षाच्या नफ्यातून त्याच्या मृत्यू दिनांकापर्यंत देण्यात यावा.

४. विराटला ₹ ५०० प्रमाणे दरमहा वेतन दिले जात होते.

५. भांडवलावर वार्षिक १०% दराने व्याज देण्याची तरतूद आहे.

६. विराटच्या मृत्यूपर्यंतची त्याची उचल ₹ ९०० दरमहा होती.

**तयार करा :**

**१) विराटचे भांडवल ते त्याच्या वारसदाराला दिल्या जाणाऱ्या रकमेने दाखवा. २) ख्याती आणि नफ्याचे कृती कार्य स्पष्ट करा.**

**उत्तर**

**भागीदारी संस्थेच्या पुस्तकात**

**नावे** **विराटचे भांडवल खाते** **जमा**

| तपशील | रक्कम (₹) | तपशील | रक्कम (₹) |
|---|---|---|---|
| उचल खाते | २,७०० | शिल्लक खाली आणली | १२,००० |
| वारसदाराचे कर्ज खाते | ४५,२०० | सामान्य संचिती खाते | ४,००० |
| | | पुनर्मूल्यांकन खाते | ३,००० |
| | | ख्याती खाते | २२,५०० |
| | | नफातोटा निलंबित खाते | २,५०० |
| | | वेतन खाते | ३,६०० |
| | | भांडवलावरील व्याज | ३०० |
| | ४७,९०० | | ४७,९०० |

**कार्य टिपा :**

**१. ख्यातीतील हिश्याचे आगणन :**

(अ) सरासरी नफा $= \dfrac{\text{एकूण नफा}}{\text{एकूण वर्ष}} = \dfrac{१,२०,०००}{४}$ = ₹ ३०,०००

(ब) संस्थेची ख्याती = सरासरी नफा × सरासरी नफ्याच्या पटीत

= ३०,००० × ३ (तिप्पट)

= ₹ ९०,०००

(क) विराटचा ख्यातीतील हिस्सा = संस्थेची ख्याती × विराटचा हिस्सा

$= ९०,००० \times \dfrac{४}{१६}$

= ₹ २२,५००

**२. विराटला देय असलेल्या नफ्याचे आगणन :**

नफ्यातील हिस्सा = मागील वर्षाचा नफा × नफ्यातील हिस्सा × कालावधी

$= ४०,००० \times \dfrac{१}{४} \times \dfrac{३}{१२}$

= ₹ २,५००

५. **सोनु, मनेका आणि करिना एका भागीदारी संस्थेचे भागीदार असून ते अनुक्रमे २ : २ : १ या प्रमाणात नफातोटा वाटून घेतात. त्यांच्या भागीदारीचा ३१ मार्च २०१८ रोजीचा ताळेबंद खालीलप्रमाणे होता.**

**ताळेबंद ३१ मार्च २०१८**

| देयता | रक्कम (₹) | संपत्ती | | रक्कम (₹) |
|---|---|---|---|---|
| भांडवल खाते : | | यंत्र व सयंत्र | | ५०,००० |
| सोनु | ४०,००० | मालसाठा (स्कंध) | | ५०,००० |
| मनेका | ४०,००० | ऋणको | २२,००० | |
| करिना | २०,००० | (–) बुडीत कर्ज निधी | २,५०० | १९,५०० |
| सामान्य संचिती | १०,००० | गुंतवणूक | | १०,००० |
| धनको | १०,००० | रोकड | | ५०० |
| देय विपत्र | ६,००० | | | |
| बँक कर्ज | ४,००० | | | |
| | १,३०,००० | | | १,३०,००० |

**समायोजन :**

**१ ऑक्टोबर २०१८ रोजी करिना मृत झाली म्हणून भागीदारीच्या करारानुसार पुढीलप्रमाणे समायोजना करण्यात आल्या.**

१. यंत्र व सयंत्राचे पुनर्मूल्यांकन ₹ ६०,००० ला करण्यात आले आणि सर्व ऋणको वसुली योग्य आहे.

२. मालसाठ्याचे (स्कंध) मूल्य '₹ ३, ००० ने कमी करावे.

३. करिनाच्या मृत्यूपर्यंतची तिची उचल ₹ ४०० दरमहा होती.

४. भांडवलावर १०% दराने व्याज देय आहे.

५ मृत भागीदाराच्या ख्यातीतील हिस्सा मागील तीन वर्षाच्या सरासरी नफ्याच्या दोन वर्षाच्या खरेदी एवढा ठरविण्यात यावा.

**मागील तीन वर्षाचा नफा**

**२०१५–१६ = ₹ १५,०००** **२०१६–१७ = ₹ १७,०००**

**२०१७–१८ = ₹ १३,०००**

६. मृत भागीदाराचा नफ्यातील हिस्सा त्याच्या मृत्यू तारखेपर्यंत काढण्यात यावा आणि नफा मागील दोन वर्षाच्या सरासरी नफ्याच्या आधारावर ठरविण्यात यावा.

**तयार करा :**

**१) पुनर्मूल्यांकन खाते. २) करिनाचे भांडवल खाते आणि त्याच्या वारसदाराला दिली जाणारी रक्कम तिच्या कर्ज खात्याला दाखविण्यात यावी. ३) मृत भागीदाराच्या ख्याती आणि नफ्यातील हिश्याचे आगणनाची कृती कार्य दर्शवा.**

**नावे** **पुनर्मूल्यांकन खाते** **जमा**

| तपशील | | रक्कम (₹) | तपशील | रक्कम (₹) |
|---|---|---|---|---|
| माल साठा (स्कंध) | | ३,००० | यंत्र व सयंत्र खाते | १०,००० |
| भांडवल खाते (नफा) | | ९,५०० | बुडीत कर्ज निधी खाते | २,५०० |
| सोनु | ३,८०० | | | |
| मनेका | ३,८०० | | | |
| करिना | १,९०० | | | |
| | | १२,५०० | | १२,५०० |

| नावे | करिनाचे भांडवल खाते | | जमा |
|---|---|---|---|
| **तपशील** | **रक्कम (₹)** | **तपशील** | **रक्कम (₹)** |
| उचल खाते | २,४०० | शिल्लक खाली आणली | २०,००० |
| करिनाच्या वारसदाराचे कर्ज खाते | ३०,००० | सामान्य संचिती | २,००० |
| | | पुनर्मूल्यांकन खाते | १,९०० |
| | | भांडवलावरील व्याज | १,००० |
| | | ख्याती खाते | ६,००० |
| | | नफातोटा निलंबित खाते | १,५०० |
| | ३२,४०० | | ३२,४०० |

**क) ख्यातीचे आगणन**

१) सरासरी नफा = $\frac{\text{एकूण नफा}}{\text{एकूण वर्ष}} = \frac{४५,०००}{३}$ = ₹ १५,०००

संस्थेची ख्याती = सरासरी नफा × सरासरी नफ्याच्या पटीत
= ₹ १५,००० × २ वर्ष
= ₹ ३०,०००

करिनाच्या ख्यातीतील हिस्सा = संस्थेची ख्याती × करिनाचा हिस्सा
= ₹ ३०,००० × $\frac{१}{५}$ = ₹ ६,०००

**२ करिनाच्या नफ्यातील हिश्याचे आगणन.**

अ. सरासरी नफा = $\frac{\text{एकूण नफा}}{\text{एकूण वर्ष}}$

= $\frac{१७,००० + १३,०००}{२}$

= $\frac{३०,०००}{२}$

= ₹ १५,०००

ब. करिनाचा नफ्यातील हिस्सा = सरासरी नफा × नफ्यातील हिस्सा

= ₹ १५,००० × $\frac{१}{५}$ × $\frac{६}{१२}$

= ₹ १,५००

६. **अजय, संजय आणि विजय हे भांडवलाच्या प्रमाणात नफातोटा वाटून घेणारे भागीदार आहेत. त्यांच्या भागीदारीचा ३१ मार्च २०१९ रोजीचा ताळेबंद खालीलप्रमाणे होता.**

**ताळेबंद ३१ मार्च २०१९ रोजीचा**

| देयता | रक्कम (₹) | संपत्ती | | रक्कम (₹) |
|---|---|---|---|---|
| भांडवल खाते : | | जमीन व इमारत | | ८०,००० |
| अजय | ६०,००० | मोटार ट्रक | | ४०,००० |
| संजय | ४०,००० | ऋणको | ३२००० | |
| विजय | २०,००० | (–) बुडीत कर्ज निधी | ४,००० | २८,००० |
| धनको | ५०,००० | फर्निचर | | ३६,००० |
| अदत्त वेतन | ६,००० | बँक | | २८,००० |
| संचित / राखीव निधी | ३६,००० | | | |
| | २,१२,००० | | | २,१२,००० |

**१ ऑगस्ट २०१९ रोजी विजय मयत झाला आणि खालील समायोजना करण्यात आल्या.**

१. संपत्तीचे पुनर्मूल्यांकन खालीलप्रमाणे करण्यात आले

जमीन व इमारत ₹ ८८,०००, मोटार ट्रक ₹ ३६,००० आणि फर्निचर ₹ ३४,०००

२. सर्व ऋणको वसुली योग्य आहेत.

३. ख्यातीचे मूल्य मागील चार वर्षाच्या सरासरी नफ्याच्या दोनपट लावण्यात यावे.

४. विजयच्या नफ्यातील हिश्याचे आगणन करताना मागील तीन वर्षाच्या सरासरी नफ्याच्या आधारे करण्यात यावे. मागील चार वर्षाचा नफा – पहिले वर्ष ₹ १२,०००, दुसरे वर्ष ₹ २४,०००, तिसरे वर्ष ₹ १४,०००, चौथे वर्ष ₹ २२,००० होता.

**तयार करा :**

**१) विजयच्या भांडवल खात्यात त्याच्या वारसदाराला दिली जाणारी रक्कम दाखवावी.**

**२) विजयच्या ख्यातीतील हिस्सा आणि त्याच्या मृत्यू दिनांकापर्यंतच्या नफ्याचे कृती कार्य दाखवा.**

**उत्तर :**

**नावे** **विजयचे भांडवल खाते** **जमा**

| तपशील | रक्कम (₹) | तपशील | रक्कम (₹) |
|---|---|---|---|
| वारसाचे कर्ज खाते | ३४,१११ | शिल्लक खाली आणली | २०,००० |
| | | राखीव निधी खाते | ६,००० |
| | | पुनर्मूल्यांकन खाते | १,००० |
| | | ख्याती खाते | ६,००० |
| | | नफातोटा निलंबित खाते | १,१११ |
| | ३४,१११ | | ३४,१११ |

**कार्य टिपा :**

**विजयच्या ख्यातीतील हिश्याचे आगणन :**

१) १. सरासरी नफा $= \frac{\text{एकूण नफा}}{\text{एकूण वर्ष}} = \frac{७२,०००}{४}$ = ₹ १८,०००

२. संस्थेची ख्याती = सरासरी नफा × सरासरी नफ्याच्या खरेदी पटीत

= १८,००० × २

= ₹ ३६,०००

३. विजयच्या ख्यातीतील हिस्सा = संस्थेची ख्याती × विजयचा हिस्सा

$= ३६,००० \times \frac{१}{६}$ = ₹ ६,०००

**३. विजयच्या नफ्यातील हिश्याचे आगणन.**

१. एकूण नफा = $\frac{\text{एकूण नफा}}{\text{एकूण वर्ष}} = \frac{६०,०००}{३}$ = ₹ २०,०००

२. विजयचा नफ्यातील हिस्सा = सरासरी नफा × विजयचा हिस्सा × मुदत

$= २०,००० \times \frac{४}{१२} \times \frac{१}{६}$

= ₹ १,१११

**७. प्रेम, वर्मा आणि शर्मा हे एका भागीदारी संस्थेचे भागीदार असून ते अनुक्रमे २:१:१ या प्रमाणात नफातोटा विभागून घेतात. त्यांच्या भागीदारीचा ३१ मार्च २०२० रोजीचा ताळेबंद खालीलप्रमाणे राहील.**

**ताळेबंद ३१ मार्च २०१९ रोजीचा**

| देयता | रक्कम (₹) | संपत्ती | रक्कम (₹) |
|---|---|---|---|
| धनको | २०,००० | परिसर | २,४०,००० |
| बँक कर्ज | ९०,००० | ऋणको | २,००,००० |
| देय विपत्र | १०,००० | फर्निचर | ६०,००० |
| सामान्य संचिती | ६४,००० | मालसाठा (स्कंध) | १,००,००० |
| भांडवल खाते | | रोकड | २,००,००० |
| प्रेम | २,४०,००० | | |
| वर्मा | २,००,००० | | |
| शर्मा | १,७६,००० | | |
| | ८,००,००० | | ८,००,००० |

**३० जून २०१९ रोजी प्रेम मयत झाला आणि खालील समायोजना करण्यात आल्या.**

१. प्रेमचा त्याच्या मृत्यू दिनांकापर्यंतचा नफा संस्थेच्या मागील दोन वर्षांच्या सरासरी नफ्याच्या आधारावर ठरविण्यात यावा.

२. प्रेमच्या ख्यातीतील हिस्सा ठरवितांना ख्यातीचे मूल्यांकन करतांना मागील चार वर्षांच्या सरासरी नफ्याच्या तीनपट लावण्यात यावे. मागील चार वर्षांचा नफा –

२०१५-१६ = ₹ १,६०,०००    २०१६-१७ = ₹ १,२०,०००

२०१७-१८ = ₹ ८०,०००    २०१८-१९ = ₹ ४०,०००

३. परिसराचे मूल्य ₹ २,८०,००० लावावे आणि ऋणकोवर ₹ ८,००० ची संशयित व बुडीत कर्ज निधी निर्माण करावा.

४. प्रेमची त्याच्या मृत्यू दिनांकापर्यंतची उचल दरमहा ₹ १५,००० होती.

५. भांडवलावर वार्षिक १०% द्यावयाचे आणि उचलीवर ₹ ४,००० व्याज आकारण्यात यावे.

६. प्रेमला दिली जाणारी रक्कम त्याच्या वारसदाराच्या कर्ज खात्याला स्थानांतरित करावी.

**तयार करा :**

**१) प्रेमचे भांडवल खाते.**

**२) प्रेमच्या ख्यातीतील हिस्सा, त्याचा नफ्यातील हिस्सा आणि भांडवलावरील व्याजाचे कृती कार्य दर्शवा**

**उत्तर :**

**नावे** **प्रेमचे भांडवल खाते** **जमा**

| तपशील | रक्कम (₹) | तपशील | रक्कम (₹) |
|---|---|---|---|
| उचल खाते | ४५,००० | शिल्लक खाली आणली | २,४०,००० |
| उचलीवरील व्याज खाते | ४,००० | सामान्य संचिती | ३२,००० |
| वारसदाराचे कर्ज खाते | ४,०२,५०० | पुनर्मूल्यांकन खाते | १६,००० |
| | | भांडवलावरील व्याज खाते | ६,००० |
| | | ख्याती खाते | १,५०,००० |
| | | नफातोटा निलंबित खाते | ७,५०० |
| | ४,५१,५०० | | ४,५१,५०० |

**कृती कार्य :**

**१) संस्थेच्या ख्यातीमधील प्रेमच्या हिश्याचे आगणन :**

अ. सरासरी नफा $= \frac{\text{एकूण नफा}}{\text{एकूण वर्ष}} = \frac{४,००,०००}{४} =$ ₹ १,००,०००

ब. संस्थेची ख्याती = सरासरी नफा × सरासरी नफ्याच्या पटीत

= १,००,००० × ३

= ₹ ३,००,०००

क. प्रेमचा संस्थेतील ख्यातीमधील हिस्सा

= संस्थेची ख्याती × प्रेमचा हिस्सा

= ₹ ३,००,००० × $\frac{२}{४}$ = ₹ १,५०,०००

**२. प्रेमच्या नफ्यातील हिश्याचे आगणन**

मागील दोन वर्षाचा सरासरी नफा

अ. सरासरी नफा $= \frac{\text{एकूण नफा}}{\text{एकूण वर्ष}} = \frac{₹ १,२०,०००}{२} =$ ₹ ६०,०००

ब. सरासरी नफा = ₹ ६०,०००, ३ महिन्याचा नफा = ६०,००० × $\frac{३}{१२}$ = ₹ १५,०००

प्रेमचा नफ्यातील हिस्सा = १५,००० × $\frac{२}{४}$ = ₹ ७,५००

**३. प्रेमच्या भांडवलावरील व्याजाचे आगणन**

३० जून २०२० रोजी प्रेम मयत झाला.

प्रेमच्या भांडवलाची शिल्लक ₹ २,४०,०००

१०% व्याज ₹ २,४०,०००

₹ २,४०,००० × $\frac{१०\%}{१००}$ × $\frac{३}{१२}$ = ₹ ६,०००

## स्वाध्याय : ५

**प्रश्न : वस्तुनिष्ठ प्रश्न**

### अ. खालील दिलेल्या पर्यायामधून योग्य पर्याय निवडून वाक्य पुन्हा लिहा.

१. लाभाचे प्रमाण हे असे प्रमाण आहे की, ज्यात ..............................

अ) नवीन भागीदाराच्या प्रवेशाने जुन्या भागीदारांचा फायदा होतो.

ब) प्रवेशावेळी नवीन भागीदाराने आणलेली ख्याती जुन्या भागीदारांच्या भांडवल खात्यात जमा केली जाते

क) भागीदाराची निवृत्ती / भागीदाराच्या मृत्यूचा फायदा उरलेल्या भागीदारांना होतो.

ड) सर्व भागीदारांना लाभ होतो.

२. विद्यमान भागीदारांना ज्या प्रमाणाचा फायदा होतो, तो ..............................

अ) लाभाचे प्रमाण  ब) त्यागाचे प्रमाण  क) नफा प्रमाण  ड) भांडवल प्रमाण

३. नफातोटा निलंबित खाते हे ताळेबंदात .............................. बाजूला दाखवितात.

अ) नावे  ब) जमा  क) संपत्ती  ड) देयता

४. भागीदाराचा मृत्यू ही सक्तीची .............................. आहे.

अ) विसर्जन  ब) प्रवेश  क) निवृत्ती  ड) समाप्ती.

५. मृत भागीदाराच्या भांडवल खात्यावरील शिल्लक ही त्याच्या.............................. खात्याला स्थानांतरित केली जाते.

अ) नातेवाईक  ब) वारसदार कर्ज

क) भागीदारांचे भांडवल  ड) भागीदाराचे कर्ज

### ब. पुढील विधानासाठी एक शब्द / संज्ञा / शब्दसमूह द्या.

१. पुनर्मूल्यांकन खात्याच्या जमा बाजूचे नावे बाजूवरील अधिक्य.

२. मृत भागीदाराचे प्रतिनिधित्व करणारी व्यक्ती.

३. गतकाळातील अवितरीत / संचित नफा जो संस्थेत राखीव म्हणून ठेवला जातो.

४. भागीदारांनी खाजगी उपयोगासाठी व्यवसायातून काढलेली रक्कम आणि वस्तू.

५. भागीदाराच्या मृत्यूनंतर उरलेल्या भागीदारांना मिळणाऱ्या फायद्याचे प्रमाण.

### क. खालील विधाने चूक की बरोबर ते सकारण लिहा.

१) मृत भागीदाराचा संस्थेतील ख्यातीवर हक्क / अधिकार नसतो.

२) मृत भागीदाराचा संस्थेतील सामान्य निधी / संचितीवर त्याचा हक्क / अधिकार असतो.

३) ख्यातीचे अपलेखन केलेली रक्कम मृत भागीदाराच्या भांडवल खात्याला नावे केली जाते.

४) भागीदाराच्या मृत्यूनंतर मृत भागीदाराला दिली जाणारी रक्कम त्याच्या वारसदाराला / प्रशासकाला दिली जाते.

५) मृत भागीदाराच्या मृत्यू दिनांकापर्यंतचा नफा नोंदविण्यासाठी पुनर्मूल्यांकन खात्याचा वापर केला जातो.

### ड. रिकाम्या जागी योग्य शब्द भरून वाक्य पुन्हा लिहा.

१. मृत भागीदाराच्या वारसदाराचे खाते ताळेबंदात .............................. बाजूला दाखविले जाते.

२. भागीदाराच्या मृत्यूनंतर उरलेल्या भागीदारांना भविष्यातील नफ्यात मिळणारा अधिक नफा .............................. प्रमाणात मिळतो.

३. मृत्यूच्या दिनांकापर्यंत मृत भागीदाराला दिला जाणारा नफ्यातील हिस्सा ताळेबंदात .............................. बाजूला दाखविला जातो.

४. लाभाचे प्रमाण = नवीन प्रमाण ..............................

५. जेव्हा ख्याती खाते पूर्ण रक्कमेने उघडले जाते व त्याचे अपलेखन केले जाते तेव्हा .............................. खाते जमा केले जाते.

## इ. एका वाक्यात उत्तरे लिहा.

१. लाभाचे प्रमाण म्हणजे काय?

२. भागीदाराच्या मृत्यूच्या वेळी तुम्ही सामान्य संचिती कशी वाटप करणार?

३. भागीदाराच्या मृत्यूच्या वेळी सामान्य संचिती कोणाला वाटप करणार?

४. भागीदाराच्या मृत्यूच्या वेळी भागीदाराची निवृत्ती सक्तीची कशी ठरते?

५. भागीदाराच्या मृत्यू पर्यंत नफा कोणत्या खात्याला वर्ग केला जातो?

## प्रात्यक्षिक उदाहरणे

**१. राजेश, राकेश आणि महेश हे तिन भागीदार समान प्रमाणात नफातोटा विभागून घेतात. त्यांच्या भागीदारीचा ३१ मार्च २०१९ रोजीचा ताळेबंद खालीलप्रमाणे होता.**

**ताळेबंद ३१ मार्च २०१९ रोजीचा**

| देयता | रक्कम (₹) | संपत्ती | रक्कम (₹) |
|---|---|---|---|
| भांडवल खाते : | | जमीन व इमारत | ४,००,००० |
| राजेश | ५,००,००० | फर्निचर | ३,००,००० |
| राकेश | २,००,००० | ऋणको | ३,००,००० |
| महेश | २,००,००० | मालसाठा (स्कंध) | १,००,००० |
| विविध धनको | ९०,००० | रोख | १,००,००० |
| देय विपत्र | ६०,००० | | |
| बँक कर्ज | १,५०,००० | | |
| | १२,००,००० | | १२,००,००० |

**दि. ३० जून २०१९ रोजी राजेश मयत झाला त्याच्या मृत्यूनंतर करारानुसार खालील समायोजना करण्यात आल्या.**

१) फर्निचरचे समायोजन करून त्याचे विपणी मूल्य ₹ ३,४०,००० लावण्यात आले.

२) जमीन व इमारतीवर वार्षिक १०% दराने घसारा आकारण्यात यावा.

३) ऋणकोवर ५% संशयित व बुडीत कर्ज निधीची तरतूद करावी.

४) संस्थेच्या ख्याती मूल्य ₹ ९०,००० लावण्यात आले.

५) राजेशच्या नफ्यातील हिश्याचे आगणन त्याच्या मृत्यू दिनांकापर्यंत करतांना मागील दोन वर्षाचा सरासरी नफा ₹ १,८०,०००.

**तयार करा :**

**१) पुनर्मूल्यांकन खाते. २) भागीदारांचे भांडवल खाते. ३) राहिलेल्या भागीदारांचा ताळेबंद.**

**उत्तर :** नफा तोटा समायोजन खात्यावरील नफा ₹ १५,०००, ताळेबंदाची बेरीज ₹ १२,००,०००

२. **राहुल, रोहीत आणि रमेश हे भागीदार असून ते अनुक्रमे ३ : २ : १ या प्रमाणात नफातोटा विभागून घेणारे भागीदार आहेत. त्यांच्या भागीदारीचा दि. ३१ मार्च २०१७ रोजीचा ताळेबंद खालीलप्रमाणे होता.**

**ताळेबंद ३१ मार्च २०१७ रोजीचा**

| देयता | रक्कम (₹) | संपत्ती | | रक्कम (₹) |
|---|---|---|---|---|
| भांडवल खाते : | | ऋणको | १,००,००० | |
| राहुल | २,२०,००० | वजा – बुडीत कर्ज निधी | १०,००० | ९०,००० |
| रोहीत | २,१०,००० | यंत्र व सयंत्र | | ८५,००० |
| रमेश | २,४०,००० | गुंतवणूक | | ३,५०,००० |
| धनको | ८०,००० | मोटार ट्रक | | १,००,००० |
| देय विपत्र | ७,००० | इमारत | | ८०,००० |
| सामान्य निधी | ९६,००० | बँक | | १,४८,००० |
| | ८,५३,००० | | | ८,५३,००० |

**दि. १ ऑक्टोबर २०१७ रोजी रमेश मयत झाला. भागीदारीच्या कराराप्रमाणे खालील समायोजन करण्यात आले.**

१ ऋणकोवर ५% दराने संशयित व बुडीत कर्जनिधीची तरतूद करावी.

२. यंत्र व सयंत्र गुंतवणूक यांचे मूल्यांकन अनुक्रमे ₹ ८०,००० आणि ₹ ४,१०,००० ने करण्यात आले.

३. धनकोपैकी ₹ ६,००० देय नाही त्यामुळे त्याचे योग्य प्रकारे समायोजन करा.

४. २०१७–१८ या वर्षाचा अनुमानित नफा ₹ १,२०,००० आहे. या नफ्यातूनच रमेशचा त्याच्या मृत्यूपर्यंतचा नफा देण्यात यावा.

५. ख्यातीचे मूल्यांकन मागील पाच वर्षाच्या सरासरी नफ्याच्या दोनपट लावण्यात यावे. संस्थेचा मागील पाच वर्षाचा नफा पुढीलप्रमाणे आहे :

| | | | |
|---|---|---|---|
| २०१२–१३ | ₹ १,८०,००० | २०१३–१४ | ₹ २,००,००० |
| २०१४–१५ | ₹ २,५०,००० | २०१५–१६ | ₹ १,५०,००० |
| २०१६–२०१७ | ₹ १,२०,००० | | |

रमेशचा नफ्यातील हिस्सा त्याला देण्यात यावा.

६. रमेश ₹ ५,००० दरमहा वेतन द्यावयाचे आहे.

७. भागीदारांच्या भांडवलावर ५% वार्षिक दराने व्याज देय आहे आणि उचलीवर ₹ २,००० व्याज आकारावयाचे आहे.

८. रमेशने दि. ३० सप्टेंबर २०१७ पर्यंत दरमहा ₹ ५,००० प्रमाणे उचल केलेली आहे.

**तयार करा :**

**१) रमेशच्या वारसदाराला दिली जाणारी रक्कम त्याच्या भांडवल खात्यावर दिसण्यासाठी रमेशचे भांडवल खाते तयार करा.**

**२) नफा आणि ख्यातीच्या आगणनाचे कृती कार्य दाखवा.**

**उत्तर :** पुनर्मूल्यांकन खात्यावरील नफा ₹ ६६,०००.
रमेशच्या वारसदाराला दिली जाणारी रक्कम ₹ ३,४१,०००.

३. **राम, माधव आणि केशव हे भागीदार असून अनुक्रमे ५ : ३ : २ या प्रमाणात नफातोटा वाटून घेणारे भागीदार आहेत. त्यांच्या भागीदारीचा ३१ मार्च २०१८ रोजीचा ताळेबंद खालीलप्रमाणे होता.**

**ताळेबंद ३१ मार्च २०१८ रोजीचा**

| देयता | रक्कम (₹) | संपत्ती | रक्कम (₹) |
|---|---|---|---|
| सामान्य निधी | २५,००० | ख्याती | ५०,००० |
| धनको | १,००,००० | सुटे अवजारे | ५०,००० |
| अदत्त भाडे | २५,००० | ऋणको | १,५०,००० |
| भांडवल खाते | | मालसाठा (स्कंध) | १,००,००० |
| राम | १,००,००० | रोख | २५,००० |
| माधव | ७५,००० | | |
| केशव | ५०,००० | | |
| | ३,७५,००० | | ३,७५,००० |

**दि. ३१ जुलै २०१८ रोजी केशव मयत झाला म्हणून भागीदारी करारानुसार खालील समायोजना करण्यात आल्या.**

१. धनको मध्ये १०,००० ची वाढ करण्यात आली.

२. ख्यातीचे आगणन संस्थेच्या मागील पाच वर्षाच्या सरासरी नफ्याच्या दुप्पट खरेदीनुसार करण्यात यावे.

३. २०१३-१४ ₹ ९०,००० २०१४-१५ ₹ १,००,०००
२०१५-१६ ₹ ६०,००० २०१६-१७ ₹ ५०,०००
२०१७-१८ ₹ ५०,००० (तोटा). यातील केशवचा हिस्सा त्याला देण्यात यावा.

४. सुटी अवजारे आणि जिवंत मालसाठ्याचे पुनर्मूल्यांकन अनुक्रमे ₹ ८०,००० आणि ₹ १,२०,००० करण्यात आले.

५. संशयित व बुडीत कर्ज निधी ₹ १०,००० ठेवण्यात आला.

६. केशवला दरमहा ₹ २,००० कमिशन द्यावयाचे आहे.

६. संस्थेच्या २०१८ -१९ चा अनुमानित नफा ₹ ४५,००० आहे. म्हणून केशवला दिला जाणारा त्याच्या मृत्यूपर्यंतचा नफा वरील नफ्याच्या आधारावर ठरविण्यात यावा.

**तयार करा :**

**१) पुनर्मूल्यांकन खाते.**

**२) केशवच्या भांडवल खात्यात त्याच्या वारसदाराला दिली जाणारी रक्कम दाखविण्यात यावी.**

**उत्तर :** पुनर्मूल्यांकनावरील नफा ₹ ३०,०००, केशवच्या वारसदाराला कर्ज खात्यावर दिली जाणारी रक्कम ₹ ९२,०००

**४. विरेंद्र, देवेंद्र आणि नरेंद्र हे ३ :२ : १. या प्रमाणात नफातोटा वाटून घेणारे भागीदार आहेत. त्यांच्या भागीदारीचा ३१ मार्च २०१९ रोजीचा ताळेबंद खालीलप्रमाणे होता.**

**ताळेबंद ३१ मार्च २०१९ रोजीचा**

| देयता | रक्कम (₹) | संपत्ती | रक्कम (₹) |
|---|---|---|---|
| बँक कर्ज | २५,००० | फर्निचर | ५०,००० |
| धनको | २०,००० | जमीन व इमारत | ५०,००० |
| देय विपत्र | ५,००० | मोटार कार | २०,००० |
| संचित निधी | ३०,००० | विविध ऋणको | ५०,००० |
| भांडवल खाते : | | प्राप्य विपत्र | २०,००० |
| विरेंद्र | ९०,००० | गुंतवणूक | ५०,००० |
| देवेंद्र | ६०,००० | बँक शिल्लक | २०,००० |
| नरेंद्र | ३०,००० | | |
| | २,६०,००० | | २,६०,००० |

**दि. ३१ ऑगस्ट २०१९ रोजी विरेंद्र मयत झाला आणि भागीदारी करारानुसार विरेंद्रच्या मृत्यूनंतर त्याच्या हिश्याची रक्कम त्याच्या वारसदाराला देण्यात यावी.**

१. मागील ताळेबंदातील त्यांच्या भांडवलाची रक्कम त्याच्या भांडवल खात्यात दाखविण्यात यावी.

२. संचितीमधील विरेंद्रचा हिस्सा मागील ताळेबंदातील संचितीमधून देण्यात यावा.

३. विरेंद्रच्या संस्थेच्या नफ्यातील त्याच्या मृत्यूपर्यंतचा नफा मागील चार वर्षाच्या नफ्याच्या आधारे ठरविण्यात यावा.

४. विरेंद्रच्या ख्याती हिस्सा ठरवितांना ख्यातीचे आगणन करतेवेळी मागील चार वर्षांच्या सरासरी नफ्याच्या दोनपट खरेदी ख्यातीची रक्कम / मूल्य ठरवावे, ३१ मार्च रोजी संपणाऱ्या वर्षांचा नफा पुढील प्रमाणे –

| | | | |
|---|---|---|---|
| २०१६ | ₹ ४९,००० | २०१७ | ₹ ६०,००० |
| २०१८ | ₹ ७०,००० | २०१९ | ₹ ३०,००० |

५. विरेंद्रने त्याच्या मृत्यू दिनांकापर्यंत दरमहा ₹ ३,००० प्रमाणे उचल केलेली आहे.

६. संपत्ती व देयतांच्या मूल्यात कोणत्याही प्रकारची वाढ किंवा घट करण्यात आलेली नाही.

**तयार करा :**

**विरेंद्रच्या वारसदाराचे खाते.**

**उत्तर :** वारसदाराचे कर्जखाते ₹ १,५०,४१७

५. **सोहन, रोहन आणि मोहन यांच्या भागीदारीचा ताळेबंद दिलेला आहे. वरील भागीदार हे त्यांचा नफातोटा ३ : २ : १ या प्रमाणात वाटून घेतात. त्यांच्या भागीदारीची आर्थिक स्थिती पुढीलप्रमाणे आहे.**

**ताळेबंद ३१ मार्च २०१९ रोजीचा**

| देयता | रक्कम (₹) | संपत्ती | रक्कम (₹) |
|---|---|---|---|
| अधिकोष अधिविकर्ष | १८,००० | बँक | ४८,००० |
| धनको | ८५,००० | ऋणको | ३०,००० |
| देय विपत्र | ४०,००० | भूमी व इमारत | ४०,००० |
| बँक कर्ज | १,५०,००० | सयंत्र | ८०,००० |
| सामान्य संचिती | २७,००० | गुंतवणूक | ४०,००० |
| भांडवल खाते : | | संगणक | ४०,००० |
| सोहन | २०,००० | मालसाठा (स्कंध) | ९०,००० |
| रोहन | २०,००० | एकस्वाधीकार | १२,००० |
| मोहन | २०,००० | | |
| | ३,८०,००० | | ३,८०,००० |

**०१ ऑक्टोबर २०१९ रोजी रोहन मयत झाला आणि त्यामुळे खालील समायोजन करण्यात आल्या.**

१. संस्थेच्या ख्यातीचे मूल्य ₹ ३०,००० ठरविण्यात आले.

२. भूमी व इमारत सयंत्राचे मूल्य २०% कमी करण्यात आले.

३. गुंतवणुकीचे मूल्य सध्या ₹ ६०,००० ठेवण्यात आले.

४. मालसाठ्याचे मूल्य ₹ ५,००० ने कमी करण्यात आले तसेच ऋणकोवर बुडीत कर्ज निधीसाठी १०% तरतूद करावयाची आहे.

५. एकस्वाधीकाराचे मूल्य शून्य समजण्यात आले.

६. रोहनच्या मृत्यू दिनांकापर्यंत त्याच्या हिश्याचा संपूर्ण नफा आणि त्याची उचल नफा म्हणून मृत्यू दिनांकपर्यंत व्यवसायात राहील रोहनची मृत्यू दिनांकापर्यंत ₹ २५,००० उचल होती.

**तयार करा :**

**सर्व भागीदारांचे भांडवल खाते**

**उत्तर :** पुनर्मूल्यांकनावरील नफा ₹ ३०,०००, रोहनच्या वारसदाराचे कर्ज खाते ₹ ४९,०००, सोहनच्या भांडवल खात्याची शिल्लक ₹ ६३,५०० मोहनचे भांडवल खाते ₹ ३४,५००

**विद्यार्थी कृती :**

- सनदी लेखापालाकडून (C.A.) एखाद्या मृत भागीदाराच्या दाव्याची माहिती गोळा करा.
- भागीदारांच्या संयुक्त विमापत्र काढण्याची प्रक्रीया व मृत भागीदाराच्या दाव्याची रक्कम काढण्याबाबतची माहिती एखाद्या आयुर्विमा मंडळाच्या कार्यालयाकडून गोळा करा.

# ६ . भागीदारीचे विसर्जन (प्रविलयन किंवा समाप्ती)
# (Dissolution of Partnership)

**अभ्यास घटक**

*६.१ प्रस्तावना, भागीदारी, संस्था विसर्जनाचा अर्थ व व्याख्या*

*६.२ भागीदारी संस्था / विसर्जनाची कारणे*

*६.३ भागीदारीचे विसर्जन आणि भागीदारी संस्थेचे विसर्जन यातील फरक*

*६.४ लेखांकन प्रक्रिया / खाती बंद करतांना लेखांकन हाताळणी.*

*६.६ लेखांकन पद्धत*

*(अ) साधे विसर्जन*

*(ब) दिवाळ खोरीच्या परिस्थितीतील विसर्जन*

**क्षमता विधाने Competency Statement**

❑ *या प्रकरणाचा अभ्यास केल्यानंतर विद्यार्थी सक्षम होतील :*

- भागीदारी संस्थेच्या विसर्जनाचा अर्थ आणि कारणे.
- भागीदारी संस्थेच्या विसर्जनाचे परिणाम.
- खाती बंद करतांना लेखांकन हाताळणी / मांडणी
- साधे विसर्जन आणि भागीदाराच्या दिवाळखोर परिस्थितीतील विसर्जनाबाबत लेखांकन प्रक्रिया.

## ६.१ प्रस्तावना Introduction :

भागीदारांमधील आपापसातील व्यावसायिक संबंध संपुष्टात येतात तेव्हा ती भागीदारी संस्था विसर्जित झाली असे म्हणता येईल. भागीदारीचे विसर्जन व भागीदारी संस्थेचे विसर्जन यात काही प्रमाणात फरक आहे. जेव्हा एक किंवा अनेक व्यक्ती भागीदारी संस्थेशी आपले संबंध तोडतात परंतु उरलेले भागीदारांनी आपला व्यवसाय सुरूच ठेवला त्याला भागीदारीचे विसर्जन असे म्हणतात. भागीदारी संस्थेचे विसर्जन म्हणजे सर्व भागीदारांचे व्यावसायिक संबंध संपुष्टात येऊन व्यवसाय बंद होतो. म्हणून भागीदारीचे विसर्जन किंवा समाप्ती म्हणजे भागीदारी व्यवसाय संस्थेची समाप्ती / विसर्जन नसते. परंतु भागीदारी व्यवसाय संस्थेचे विसर्जन म्हणजे भागीदारीचे विसर्जन होय.

## विसर्जन अर्थ आणि व्याख्या Meaning and Definition :

अर्थ – कायद्यात विसर्जनाचे अनेक अर्थ आहेत. विसर्जन हा शब्द लॅटीन भाषेतील "DISSOLUTIO" शब्दापासून आलेला आहे. याचा अर्थ 'काही तरी विसर्जन करणे' विसर्जन ही निरवानिरवची शेवटची अवस्था आहे.

## व्याख्या Definition :

१. भारतीय भागीदारी कायदा १९३२, मधील कलम ३९, नुसार, "भागीदारी संस्थाचे विसर्जन म्हणजे संस्थेच्या सर्व भागीदारांमधील भागीदारांचे विसर्जन होय."

२. ‘व्यावसायिक संघटना किंवा कायदेशीर करार यांची समाप्तीची कार्य किंवा प्रक्रिया’

३. ‘भागीदारी विसर्जनामुळे भागीदारांचे एकमेकातील संबंध संपुष्टात येतात.’

## ६.२ भागीदारी विसर्जनाची कारणे :

**भागीदारी संस्थेचे विसर्जन खालील परिस्थितीमुळे होते.**

१. भागीदारांच्या इच्छेनुसार

२. जेव्हा भागीदारी संस्थेचा कार्यकाळ समाप्त होत असेल.

३. विशिष्ट व्यवसायासाठी किंवा उद्देशासाठी संस्था निर्मिती झाली असेल तर त्याची पूर्ती झाल्यामुळे विसर्जन.

४. जेव्हा सर्व भागीदार किंवा एक भागीदार सोडून सर्व भागीदार दिवाळखोर म्हणून घोषित झाले असतील तर भागीदारी संस्था विसर्जित केली जाते.

५. जेव्हा भागीदारी संस्थेचा व्यवसाय अवैध स्वरूपाचा असेल किंवा नियमानुसार चालत नसेल तर भागीदारी संस्थेचे विसर्जन केले जाते.

६. स्वच्छेने स्थापन केलेली भागीदारी संस्था विसर्जनासंबंधी १४ दिवसाची लिखित स्वरूपातील सूचनेने भागीदारी विसर्जन होते.

## ६.३ भागीदारीचे विसर्जन आणि भागीदारी संस्थेचे विसर्जन यातील फरक.

| मुद्दे | भागीदारीचे विसर्जन | भागीदारी संस्थेचे विसर्जन |
|---|---|---|
| **अर्थ** | यामध्ये भागीदारी संस्थेचे विसर्जन समाविष्ट असू शकते किंवा नसू शकते. | यामध्ये भागीदारांचे विसर्जन समाविष्ट असते. |
| **स्वरूप** | यामध्ये भागीदारी विसर्जनाचे स्वरूप ऐच्छिक असते. | यामध्ये भागीदारी संस्थेच्या विसर्जनाचे स्वरूप ऐच्छिक किंवा सक्तीचे असते. |
| **व्यवसायातील योगदान** | यामध्ये व्यवसायातील भागीदारांची पूर्नरचना होते. | यामध्ये व्यवसाय पूर्णत: बंद होतो. |
| **आवश्यकता** | भागीदारी संस्थेची पूर्नरचना करण्याकरिता संपत्ती व देयतेचे पुनर्मूल्यांकन करण्यात येते. | व्यवसाय संस्था बंद करण्यासाठी संपत्तीचे रोखीकरण व देयतेचे शोधन करण्यात येते. |
| **अंतिम लेखे बंद करणे** | यामध्ये अंतिम लेखापुस्तके बंद करण्याची आवश्यकता नसते. | यामध्ये अंतिम लेखा पुस्तके बंद करण्याची आवश्यकता असते. |
| **न्यायालयीन आदेश** | न्यायालयीन आदेश भागीदाराचे विसर्जन करू शकत नाही. | न्यायालयीन आदेशाप्रमाणे भागीदारी संस्थेचे विसर्जन होते. |

## ६.४ भागीदारी संस्थेच्या विसर्जन वेळीची लेखांकीय हाताळणी / खाते बंद करणे. (Accounting Treatment / Settlement of accounts on dissolution of firm) :

भागीदारी कायदा १९३२ कलम ४८ नुसार संपत्ती विक्रीद्वारे प्राप्त रकमेतून अग्रक्रमानुसार खालीलप्रमाणे देणी दिली जातात.

अ) सर्व प्रथम विसर्जन खर्च दिला जातो.

ब) त्यानंतर बाह्य देयतेचे शोधन केले जाते उदा. विविध धनको, देयविपत्रे, अधिकोष अधिविकर्षश, आणि इतरांकडून घेतलेले कर्ज आणि अदत्त खर्च इ.

क) सर्व बाह्य देयतेचे शोधन केल्यानंतर जास्तीची रक्कम शिल्लक राहिल्यास भागीदारांच्या कर्जाचे शोधन केले जाते. जर सर्व भागीदारांचे कर्ज निधी अभावी पूर्णपणे परत झाले नाही तर त्यांना देयतेच्या प्रमाणात वाटून दिले जाते.

ड) सर्व देयतांचे शोधन झाल्यानंतर अतिरिक्त रक्कम शिल्लक राहिल्यास सर्व भागीदारांना त्यांच्या नफा-तोटा विभाजनाच्या प्रमाणात दिली जाते.

## ६.५ लेखांकीय पद्धत (Accounting Procedure) :

भागीदारी संस्थेचे विसर्जन खालील दोन पद्धतीनुसार होत असते.

(अ) साधे विसर्जन (Simple dissolution.)

(ब) दिवाळखोरीचे परिस्थितीत विसर्जन (Dissolution Under Insolvency Situation)

### (अ) साधे विसर्जन (Simple Dissolution) :

जेव्हा सर्व भागीदार सक्षम असतात आणि एखाद्या कारणामुळे भागीदारीची समाप्ती किंवा कोणत्याही कारणामुळे भागीदारी संस्थेचे विसर्जन करण्याचे त्यांनी ठरविले तर त्यास भागीदारी संस्थेचे साधे विसर्जन असे म्हणतात. भागीदारी संस्थेचा साधे विसर्जनच्या वेळी संस्थेच्या पुस्तकात खालील खाती उघडली जातात.

१) रोखीकरण खाते (Realisation Account)

२) भागीदारांचे भांडवल खाते (Partners Capital Account)

३) भागीदारांचे चालू खाते (जर स्थिर भांडवल पद्धती असेल) (Partners Current Account.)

४) भागीदारांचे कर्ज खाते (आवश्यकता असल्यास) Partners Loan Account (If necessary).

५) रोख किंवा बँक खाते (Cash or Bank Account)

१ **रोखीकरण खाते (Realisation Account) :** रोखीकरण खाते तयार करत असतांना सर्व संपत्ती व बाह्य देयता रोखीकरण खात्यात स्थानांतरित केली जाते. सर्व संपत्तीचे रोखीकरण केले जाते. रोखीकरण झालेली संपत्तीची राशी जमा बाजूवर व देयतेचे शोधन नावे बाजूवर दर्शविले जाते. नफा-तोटा शोधून काढण्यासाठी रोखीकरण खाते संतुलित केले जाते. रोखीकरण खात्यावरील नफा किंवा तोटा भागीदारांच्या भांडवल / चालू खात्याला स्थानांतरित केला जातो. जर रोखीकरण खात्याची जमा बाजूची बेरीज नावे बाजूच्या बेरजेपेक्षा जास्त असेल तर नफा झाला. याउलट जर रोखीकरण खात्याची नावे बाजूची बेरीज जमा बाजूच्या बेरजेपेक्षा जास्त असेल तर तोटा झाला.

२ **भागीदाराचे भांडवल खाते (Partners Capital Account) :** सर्व भागीदारांचे भांडवल खाते उघडण्यात येते आणि त्यात ताळेबंदातील भागीदारांचे भांडवलाची रक्कम नोंद केली जाते. नावे बाजूवरील रक्कम भांडवल खात्याच्या नावे बाजूस व जमा बाजूवरील रक्कम जमा बाजूस 'शिल्लक पु / आ' म्हणून नोंदविली जाते. राखीव निधी, संचित नफा किंवा तोटा रोखीकरण खात्यावरील नफा किंवा तोटा आणि समायोजनाच्या नोंदी केल्या जातात. नंतर भागीदाराला द्यावयाची किंवा त्यांचेकडून येणे राशी दर्शविली जाते. शेवटी रोख देऊन किंवा प्राप्त करून खाते बंद केले जाते.

३ **भागीदाराचे चालू खाते (Partners Current Account) :** जेव्हा स्थिर भांडवल पद्धती असते तेव्हा भागीदाराचे चालू खाते उघडण्यात येते. चालू खाते नावे शिल्लक किंवा जमा शिल्लक दर्शविते. शेवटी भागीदाराच्या चालू खाते नावे शिल्लक किंवा जमा शिल्लक दर्शविते. शेवटी भागीदाराच्या चालू खात्याची शिल्लक भागीदाराच्या भांडवल खात्याला स्थानांतरित केली जाते.

४ **भागीदाराचे कर्ज खाते (Partners Loan Account) :** भागीदाराच्या कर्ज खात्याची जमा शिल्लक रोखीकरण खात्याला स्थानांतरित केली जात नाही. स्वतंत्र कर्ज खाते उघडून तिथे स्थानांतरित केली जाते. सर्व बाह्य देयतांचे शोधन झाल्यानंतर भागीदाराच्या कर्ज खात्याचे शोधन केले जाते. परंतु जर भागीदाराच्या भांडवल / चालू खात्याला स्थानांतरित केली जाते.

५ **रोख/ बँक खाते (Cash / Bank Account) :** भागीदारी संस्थेच्या पुस्तकात रोख/ बँक खाते उघडले जाते. ताळेबंदात दर्शविलेली सर्व रोख रक्कम किंवा बँक शिल्लक रक्कम यात नावे बाजूला दर्शविली जाते. रोखीकरणापासून मिळालेली सर्व रोख या खात्याच्या नावे बाजूला तर जमा बाजूला रोखीकरण / विसर्जन खर्च, देयतेची परतफेड, भागीदाराच्या कर्जाची परतफेड, लिहिण्यात येते. शेवटी बँक खात्याची नावे शिल्लक बरोबर भागीदारांच्या भांडवल खात्याची जमा शिल्लक असते.

**खाते बंद करण्यासाठी लेखांकीय नोंदी** (Accounting Entries to close the books of Accounts)

भागीदारीच्या विसर्जनानंतर सर्व खाती कायमची बंद करण्यात येतात, आणि ताळेबंद तयार करण्यात येतो. भागीदारी संस्थेच्या विसर्जनाच्या तारखेचा नवीन ताळेबंद तयार केला जातो. भागीदारीच्या साध्या विसर्जनाच्या तीन पायऱ्या आहेत. त्या पुढील प्रमाणे

### अ) स्थानांतरण अवस्था (Transfer Stage) :

या अवस्थेमध्ये सर्व संपत्ती (रोख, बँक शिल्लक, काल्पनिक संपत्ती, स्थापना खर्च, नफातोटा खात्याची नावे शिल्लक, जाहिरात निलंबन इ. सोडून) व सर्व देयता (भागीदारांचे भांडवल, कर्ज, संचिती, अवितरीत नफा सोडून) जे ताळेबंदात दिलेले असतात. ते रोखीकरण खात्यास पुस्तमूल्यावर स्थानांतरित केले जातात. रोखीकरण खात्याच्या नावे बाजूला संपत्ती स्थानांतरित होते. रोखीकरण खात्याच्या जमा बाजूला देयता स्थानांतरित केली जाते. (भागीदारांचे भांडवल, भागीदारांचे कर्ज, अवितरीत नफा इ. सोडून)

### नमुना कीर्दनोंदी (Specimen Journal Entries) :

**१. रोखीकरण खात्याला संपत्ती स्थानांतरित करण्यासाठी**

रोखीकरण खाते . ...............नावे.

विविध संपत्ती खात्याला

(विविध संपत्ती रोखीकरण खात्यात पुस्तमूल्यावर स्थानांतरित केल्याबद्दल)

**२. बाह्य पक्षाची देयता रोखीकरण खात्याला स्थानांतरित करण्यासाठी :**

विविध देयता खाते . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . नावे.

रोखीकरण खात्याला

(बाह्य देयता रोखीकरण खात्याला स्थानांतरित केल्याबद्दल)

**३. संपत्ती संबंधी तरतुदीचे स्थानांतर : जर संपत्ती संबंधी :**

काही तरतुदी किंवा संचिती असल्यास जसे संशयित कर्ज निधी इत्यादी. ह्या सर्व संचिती रोखीकरण खात्यात स्थानांतरित केले जातात. त्याची नोंद खालील प्रमाणे होते. .

संशयित कर्ज निधी खाते . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . नावे.

कसर तरतूद खाते . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . नावे.

घसारा तरतूद खाते . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . नावे.

अकस्मात संचिती खाते . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . नावे.

संयुक्त जीवनविमा संचिती खाते . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . नावे.

गुंतवणूक अस्थिर निधी खाते . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . नावे.

रोखीकरण खात्याला

(विविध तरतूदी रोखीकरण खात्याला स्थानांतरित केल्याबद्दल)

**४. संचित नफा आणि निधीचे स्थानांतर :**

संचित नफा म्हणजे भागीदारी संस्थांनी प्राप्त केलेला नफा परंतु तो भागीदारांना वाटलेला नसतो. उदा. नफा-तोटा खात्याची जमा शिल्लक, सामान्य निधी, राखीव निधी इत्यादी. संचित नफा / निधीची रक्कम भागीदाराच्या भांडवल खात्यात किंवा भागीदारांच्या चालू खात्याला त्यांच्या नफा-तोटा विभाजनाच्या प्रमाणात भागीदारांच्या शोधनापूर्वी स्थानांतरित केली जात असते. त्याची नोंद अशी. :

सामान्य निधी खाते . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . नावे.

राखीव निधी खाते . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . नावे.

नफा-तोटा खाते . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . नावे.

सर्व भागीदारांचे भांडवल / चालू खात्याला

(सामान्य निधी, राखीव निधी, अवितरीत नफा सर्व भागीदारांच्या भांडवल खात्यास / चालू खात्याला त्यांच्या नफा-तोटा विभाजनाच्या प्रमाणात स्थानांतरित केल्याबद्दल)

## ५. संचित तोट्याचे स्थानांतर :

संचित तोटा म्हणजे भागीदारी संस्थेला पूर्वी झालेला तोटा परंतु तो भागीदारामध्ये वाटलेला नसतो. उदा. नफा–तोटा खात्याची नावे शिल्लक. म्हणून हा संचित तोटा भागीदाराच्या भांडवल खात्याला / चालू खात्याला स्थानांतरित केला जातो. त्याची नोंद खालीलप्रमाणे – :

सर्व भागीदारांचे भांडवल खाते /चालू खाते ................................नावे (जर स्थिर भांडवल पद्धती असेल)

नफा–तोटा खात्याला (नावे शिल्लक)

जाहिरात निलंबन खात्याला (Suspense A/c)

(संचित / अवितरीत तोटा सर्व भागीदारांच्या भांडवल / चालू खात्याला त्यांच्या नफातोटा विभाजनाच्या प्रमाणात स्थानांतरित केल्याबद्दल)

## ब) रोखीकरण / विल्हेवाट अवस्था (REALISATION / DISPOSAL STAGE ) :

या अवस्थेमध्ये (stage) सर्व संपत्ती ज्या ताळेबदांतील किंवा ताळेबंदात समाविष्ट नाहीत अशाची विक्री करण्यात येते किंवा कोणताही भागीदार ठेऊन घेत असतो आणि देयता व रोखीकरण खर्च दिला जातो किंवा भागीदार देणी देण्याचे कबूल करतो. या अवस्थेत भागीदारांचे कर्ज देखील दिले जाते.

**नमुना किर्द नोंदी (SPECIMEN JOURNAL ENTRIES) :**

### १. संपत्तीची रोखीने विक्री झाल्यास –

रोख / बँक खाते ........................................................नावे.

रोखीकरण खात्याला

(संपत्ती विकल्याबद्दल)

### २. एखाद्या भागीदाराने एखादी संपत्ती ठेऊन घेतल्यास –

भागीदाराचे भांडवल / चालू खाते . ........................................नावे

रोखीकरण खात्याला

(भागीदाराने संपत्ती ठेऊन घेतल्याबद्दल)

**टीप :** अंशत किंवा पूर्णपणे शोधन होण्याकरिता जर एखाद्या धनकोने संपत्ती ठेऊन घेतल्यास संपत्तीची तेवढी रक्कम धनकोंना द्यावयाच्या रकमेतून कमी करण्यात येते आणि उर्वरीत रकमेचे शोधन करण्यात येते. धनकोने संपत्ती ठेऊन घेतल्यास त्याची नोंद करण्यात येत नाही. परंतु धनकोंना दिलेल्या शुद्ध शोधनाची नोंद करण्यात येते.

### ३. देयतांचे शोधन (For Payment of Liabilities) –

**अ) देयतांचे शोधन केल्यास (बाह्य देयता)**

रोखीकरण खाते...................................................नावे. (प्रत्यक्ष दिलेल्या रकमेने)

रोख / बँक खात्याला

(देयतेचे शोधन केल्याबद्दल)

**ब) देयतेचे शोधन करण्याचे एखाद्या भागीदाराने मान्य केले तर**

रोखीकरण खाते...................................................नावे. (प्रत्यक्ष दिलेल्या रकमेने)

भागीदाराचे भांडवल / चालू खात्याला

(भागीदाराने देयतेचे शोधून करण्याचे मान्य केल्याबद्दल)

**टीप :** जर देयतेला करावयाच्या शोधनाचा उल्लेख नसेल तर पुस्तमूल्यावर शोधन करावे.

### ४. रोखीकरण खर्च दिला असेल तर (For Payment of Realisation Expenses) –

**अ) रोखीकरण खर्च भागीदारी संस्थेने दिला असेल तर (Realisation Expenses is borne by firm) :**

रोखीकरण खाते..................................................नावे. (Actual expenses.)
रोख/ बँक खात्याला
(रोखीकरण खर्च संस्थेने दिल्याबद्दल )

**ब) रोखीकरण खर्च भागीदाराने दिला असेल तर (Realisation Expenses is borne by any Partner) :**

रोखीकरण खाते ..................................................नावे. (Actual expenses.)
संबंधित भागीदाराच्या भांडवल / चालू खात्याला
(रोखीकरण खर्च भागीदाराने दिल्याबद्दल)

### ५. संपत्ती विकल्याचे कमिशन एखाद्या भागीदाराला दिल्याबद्दल (If commission is given to any Partner for realising assets) :

रोखीकरण खाते ........................................................नावे.(Agreed value)
भागीदाराच्या भांडवल खात्याला / चालू खात्याला
(संपत्ती विक्री बद्दलचे कमिशन भागीदाराला दिल्याबद्दल)

### ६. आकस्मिक देणी दिल्याबद्दल (Any Contingent Liability is paid (i.e. liability not included in Balance Sheet) :

आकस्मिक देयता........................................................नावे. (Actual payment)
रोख / बँक खात्याला
(आकस्मिक देणीचे शोधन केल्याबद्दल)

### ७. भागीदारांचे कर्जाचे शोधन केल्याबद्दल (For Payment of Partner's Loan) –

भागीदारी कायदा १९३२ मधील कलम ४८ नुसार बाह्य देयतांचे शोधन केल्यानंतर भागीदारांचे कर्जाचे शोधन करण्यात येते. भागीदाराचे कर्ज रोखीकरण खात्याला स्थानांतरित केले जात नाही. भागीदारांच्या कर्जाचे शोधन केल्यास खालील रोजकीर्द नोंद केली जाते. :

भागीदाराचे कर्ज खाते..................................................नावे. (Actual payment)
रोख/ बँक खात्याला
(भागीदारांचे कर्जाचे शोधन केल्याबद्दल )

**टिप :** भागीदाराचे कर्ज किंवा अग्रीम भागीदाराने शोधन करण्याचे मान्य केल्यास ती रक्कम संबंधित भागीदाराच्या भांडवल खात्यात नावे शिल्लक दर्शवावी.

## क) वितरण अवस्था (DISTRIBUTION STAGE) :

या अवस्थेमध्ये रोखीकरण खाते बंद केले जाते आणि रोखीकरण खात्याचा नफा किंवा तोटा भागीदाराच्या भांडवल खात्याला / चालू खात्याला त्यांच्या नफा-तोटा विभाजनाच्या प्रमाणात स्थानांतरित केला जातो. त्यानंतर भागीदाराचे भांडवल खाते उघडून त्यात सर्व नोंदी केल्यानंतर भागीदाराचे घेणे/देणे शिल्लक काढून ते खाते बंद केले जाते.

### १. रोखीकरण खाते बंद केल्याबद्दल (For Closing Realisation Account) :

रोखीकरण खाते हे नामधारी खाते आहे. रोखीकरण केलेल्या संपत्ती व बाह्य देयताचे शोधन झाल्यानंतर रोखीकरणावरील नफा किंवा तोटा शोधून झाल्यानंतर रोखीकरणावरील नफा किंवा तोटा शोधून काढण्यासाठी हे खाते बंद केले जाते.

**अ) रोखीकरण खात्यावरील नफा स्थानांतरित केल्याबद्दल (For Transfer of Profit on Realisation Account) :**

रोखीकरण खात्याच्या जमा बाजूची बेरीज नावे बाजूच्या बेरजेपेक्षा जास्त असल्यास रोखीकरणावरील नफा दर्शविते हा नफा भागीदाराच्या भांडवल खात्याला / चालू खात्याला स्थानांतरित केला जातो त्याची नोंद पुढीलप्रमाणे :

रोखीकरण खाते ........................................................नावे. (In profit sharing ratio)

सर्व भागीदाराच्या भांडवल / चालू खात्याला

(रोखीकरणावरील नफा सर्व भागीदारांच्या भांडवल / चालू खात्याला स्थानांतरित केल्याबद्दल )

**ब) रोखीकरण खात्यावरील तोटा स्थानांतरित केल्याबद्दल : (For Transfer of Loss on Realisation Account):**

रोखीकरण खात्याच्या नावे बाजूची, बेरीज जमा बाजूच्या बेरजेपेक्षा जास्त असल्यास तोटा दर्शविते. त्याची नोंद पुढीलप्रमाणे :

सर्व भागीदाराचे भांडवल / चालू खाते ....................................नावे (In profit sharing ratio)

रोखीकरण खात्याला

(रोखीकरणावरील तोटा सर्व भागीदारांच्या भांडवल / चालू खात्याला स्थानांतरित केल्याबद्दल)

### २. चालू खाते बंद करण्यासाठी (For Closing Current Account) :

**भागीदाराच्या चालू खात्याची शिल्लक भांडवल खात्याला स्थानांतरित केल्याबद्दल :**

**अ) चालू खात्याची जमा शिल्लक असल्यास :**

भागीदारांचे चालू खाते ............................................नावे.

भागीदारांचे भांडवल खात्याला

(चालू खात्याची जमा शिल्लक भागीदारांच्या भांडवल खात्याला स्थानांतरित केल्याबद्दल)

**ब) चालू खात्याची नावे शिल्लक असल्यास**

भागीदारांचे भांडवल खाते ........................................नावे.

भागीदारांचे चालू खात्याला

(चालू खात्याची नावे शिल्लक भागीदारांच्या भांडवल खात्याला स्थानांतरित केल्याबद्दल)

### ३. भांडवल खाते बंद करण्यासाठी (For Closing Capital Account ):

**अ) भागीदाराने भांडवल एवढी रक्कम आणावी – एखाद्या भागीदाराच्या भांडवल खात्याची नावे शिल्लक असल्यास त्याबद्दल नोंद पुढील प्रमाणे – :**

रोख/ बँक खाते . ......................................................नावे.

संबंधित भागीदाराच्या भांडवल खात्याला

(भागीदाराने भांडवल न्यूनताबद्दल रक्कम आणून खाते बंद केल्याबद्दल )

**ब) भांडवल खात्यावरील देणे रक्कम रोख दिली तर :**

भागीदाराचे भांडवल खाते ........................................नावे.

रोख/ बँक खात्याला

(अंतिम रक्कम भागीदारास देऊन खाती बंद केल्याबद्दल)

**न नोंदविलेली संपत्ती / मालमत्ता आणि देयता / देणी (Treatment of Unrecorded (Undisclosed) Assets and Liabilities) –**

विसर्जनावेळी न नोंदविलेली संपत्ती आणि देयता आढळून येतात. ज्याची लेखा पुस्तकात नोंद केलेली नसते. अशा संपत्ती आणि देयता रोखीकरण खात्याला स्थानांतरित केलेल्या नसतात त्याची खालील प्रमाणे नोंद केली जाते.

**१. न नोंदविलेली संपत्तीची विक्री केली तर –**

रोख / बँक खाते . ......................................................नावे. (Value realised) वसुलीमूल्य
रोखीकरण खात्याला
(नोंद न झालेल्या संपत्तीची विक्री केल्याबद्दल )

**२. जर भागीदाराने न नोंदविलेली संपत्ती घेतली तर –**

भागीदाराचे भांडवल / चालू खाते . ........................................नावे. (Agreed value)
रोखीकरण खात्याला
(नोंद न झालेली संपत्ती भागीदाराने ठेऊन घेतल्याबद्दल)

**३. जर न नोंदविलेल्या देयतेचे शोधन भागीदाराने केले तर –**

रोखीकरण खाते . ........................................................नावे. (Actual payment)
भागीदाराच्या भांडवल / चालू खात्याला
(भागीदाराच्या भांडवल / चालू खात्याला)

**४. जर नोंदविलेली देयता भागीदारी संस्थेने दिली तर –**

रोखीकरण खाते..........................................................नावे (Actual payment made)
रोख/ बँक खात्याला
(न नोंदविलेल्या देयतेचे शोधन केल्याबद्दल)

**विसर्जनावेळेची ख्यातीची हाताळणी (Treatment of Goodwill on Dissolution) –**

विसर्जनाच्यावेळी ख्यातीला विशेष प्राधान्य देण्याची गरज नाही. इतर संपत्तीची जशी हाताळणी केली जाते. तशीच ख्यातीबद्दल करावी. विसर्जनाच्या दिनांकाला जर ख्याती ताळेबंदात दिली असेल रोखीकरण खात्याच्या नावे बाजूला इतर संपत्ती प्रमाणे ख्याती स्थानांतरित करावी. जर दिली नसेल तर स्थानांतरण करताना, विक्री करण्याचा प्रश्नच निर्माण होत नाही. जर ख्याती विकून काही रक्कम प्राप्त झाल्यास रोख/ बँक खात्याच्या नावे बाजूवर व रोखीकरण खात्याच्या जमा बाजूवर नोंद होईल.

**अ. जर ख्याती ताळेबंदात दिली असेल तर (If Goodwill Account Appears in the Balance Sheet) :**

**१. ख्याती रोखीकरण खात्याला स्थानांतरित केल्यास**

रोखीकरण खाते ................................................नावे
ख्याती खात्याला
(ख्याती रोखीकरण खात्याला स्थानांतरित केल्याबद्दल)

**२. रोखीकरण खात्याला स्थानांतरित ख्याती, विक्री केल्यास**

रोख / बँक खाते . ................................................नावे.
रोखीकरण खात्याला
(ख्याती विकून रक्कम मिळाल्याबद्दल)

**ब. जर ख्याती ताळेबंदात दिली नसेल तर (If Goodwill Account does not appears in the Balance Sheet):**

जेव्हा ताळेबंदात ख्याती दिलेली नसते तेव्हा रोखीकरण खात्यात स्थानांतरणाचा प्रश्नच निर्माण होत नाही. परंतु जर विक्रीकरून रक्कम प्राप्त झाली तर पुढीलप्रमाणे नोंद होते. :

**१. ख्यातीची विक्री करून रक्कम प्राप्त झाली तर –**

रोख / बँक खाते..................................................नावे.

रोखीकरण खात्याला

(ख्याती विकून रक्कम मिळाल्याबद्दल)

**२. जर भागीदाराने ख्याती खरेदी केली तर –**

भागीदाराचे भांडवल / चालू खाते ...................................नावे.

रोखीकरण खात्याला

(भागीदाराने ख्याती खरेदी केल्याबद्दल)

**रोखीकरण खाते प्रारूप / नमुना**

**नावे** **रोखीकरण खाते** **जमा**

| तपशील | रक्कम ₹ | रक्कम ₹ | तपशील | रक्कम ₹ | रक्कम ₹ |
|---|---|---|---|---|---|
| **विविध संपत्ती खाते** (रोख, बँक, काल्पनिक संपत्ती, संचित तोटा, भागीदारांच्या भांडवल किंवा चालू खात्याचीही नावे शिल्लक, भागीदारांना दिलेले कर्ज, सोडून सर्व संपत्तीचे स्थानांतरण ) | पुस्त मूल्यावर | XXX | **विविध देयता खाते** भागीदारांचे भांडवल, राखीव निधी संचित नफा, भागीदारांकडून घेतलेले कर्ज सोडून अन्य | पुस्तक मूल्यावर | XXX |
| **कोणत्याही देयताशी संबंधित तरतूद खाते** (धनकोंवरील कसर निधी) | पुस्त मूल्यावर | | **कोणत्याही संपत्तीशी संबंधित तरतूद खाते** (संशयित कर्ज निधी) | पुस्त मूल्यावर | |
| **रोख / बँक खाते** (रोखीकरण खर्च ) | मान्य किंमत | XXX | **रोख / बँक खाते** (संपत्तीची विक्री किंमत) | विक्री किंमत | XXX |
| **रोख / बँक खाते** (बाह्य देयतांचे व अनोंदित देयतांचे शोधन) | मान्य किंमत | XXX | **रोख / बँक खाते** (अनोंदित संपत्तीपासून प्राप्त रक्कम) | वास्तविक मूल्य | |
| **भागीदारांचे भांडवल / चालू खाते** (देयतांचे स्वीकृतीबद्दल) | | XXX | **भागीदाराचे भांडवल खाते** (संपत्ती ठेऊन घेतली) | मान्य किंमत | XXX |
| **भागीदाराचे भांडवल / चालू खाते** (नफा स्थानांतरित) | | | **भागीदाराचे भांडवल खाते** (तोटा असल्यास स्थानांतरित) | | XXX |
| | | XXX | | | XXX |

**उदाहरण – १**

रिद्धी आणि सिद्धी २:१ प्रमाणात नफा-तोटा वाटून घेणाऱ्या भागीदार आहेत. त्यांचा ३१ मार्च २०१९ रोजीचा ताळेबंद खालीलप्रमाणे आहे.

**३१ मार्च २०१९ रोजीचा ताळेबंद**

| देयता | रक्कम ₹ | संपत्ती | | रक्कम ₹ |
|---|---|---|---|---|
| भांडवल खाते | | इमारत | | ६०,००० |
| रिद्धी | ८०,००० | उपस्कर | | २४,००० |
| सिद्धी | ६०,००० | सयंत्र | | २०,००० |
| राखीव निधी | १६,००० | ऋणको | १७६०० | |
| सिद्धीचे कर्ज खाते | ४,००० | (-) संशयित कर्ज निधी | १,६०० | १६,००० |
| धनको | ३०,००० | स्कंध | | ४०,००० |
| | | गुंतवणूक | | ८,००० |
| | | अप्राप्त व्याज | | २,००० |
| | | बँक | | २०,००० |
| | १,९०,००० | | | १,९०,००० |

३१ मार्च २०१९ रोजी भागीदारी व्यवसाय संस्था विसर्जित झाली.

१. संपत्तीपासून रक्कम वसूल झाली :
   सयंत्र ₹ २२,०००, इमारत ₹ २८,०००, स्कंध ₹ ३८,००० आणि ऋणको ₹ १५,०००.
२. रिद्धीने गुंतवणूक ₹ १०,००० ला आणि उपस्कर पुस्तकमूल्यावर ठेऊन घेतले.
३. सिद्धीने आपल्या कर्जाच्या तडजोडी अंती ₹ ३,००० घेण्याचे मान्य केले.
४. विसर्जन खर्च ₹ ४,००० होता.
५. अप्राप्त व्याज प्राप्त झाले नाही.

**तयार करा : रोखीकरण खाते, भागीदाराचे भांडवल खाते, सिद्धीचे कर्ज खाते व बँक खाते.**

उत्तर

रिद्धी आणि सिद्धी यांच्या पुस्तकात

नावे **रोखीकरण खाते** जमा

| तपशील | रक्कम ₹ | रक्कम ₹ | तपशील | रक्कम ₹ | रक्कम ₹ |
|---|---|---|---|---|---|
| विविध संपत्ती : | | | विविध देयता : | | |
| इमारत | ६०,००० | | धनको | | ३०,००० |
| फर्निचर | २४,००० | | बुडीतकर्ज निधी | | १,६०० |
| सयंत्र | २०,००० | | बँक खाते : | | |
| ऋणको | १७,६०० | | इमारत | २८,००० | |
| स्कंध | ४०,००० | | ऋणको | १५,००० | |
| गुंतवणूक | ८,००० | | स्कंध | ३८,००० | |
| अप्राप्त व्याज | २,००० | १,७१,६०० | सयंत्र | २२,००० | १,०३,००० |
| बँक खाते | | | रिद्दीचे भांडवल खाते | | |
| धनको | ३०,००० | | गुंतवणूक | १०,००० | |
| विसर्जन खर्च | ४,००० | ३४,००० | फर्निचर | २४,००० | ३४,००० |
| | | | सिद्धीचे कर्ज खाते | | १,००० |
| | | | भागीदारांचे भांडवल खाते (तोटा) | | |
| | | | रिद्धी | २४,००० | |
| | | | सिद्धी | १२,००० | ३६,००० |
| | | २,०५,६०० | | | २,०५,६०० |

नावे **भागीदारांचे भांडवल खाते** जमा

| तपशील | रिद्धी ₹ | सिद्धी ₹ | तपशील | रिद्धी ₹ | सिद्धी ₹ |
|---|---|---|---|---|---|
| रोखीकरण खाते | ३४,००० | | शिल्लक खाली आणली | ८०,००० | ६०,००० |
| रोखीकरण खाते (रोखीकरणावरील तोटा) | २४,००० | १२,००० | राखीव / संचित निधी | १०,६६७ | ५,३३३ |
| बँक खाते | ३२,६६७ | ५३,३३३ | | | |
| | ९०,६६७ | ६५,३३३ | | ९०,६६७ | ६५,३३३ |

नावे **बँक खाते** जमा

| तपशील | रक्कम ₹ | तपशील | रक्कम ₹ |
|---|---|---|---|
| शिल्लक खाली आणली | २०,००० | रोखीकरण खाते | ३४,००० |
| रोखीकरण खाते | १,०३,००० | सिद्धीचे कर्ज खाते | ३,००० |
| | | रिद्धी भांडवल खाते | ३२,६६७ |
| | | सिद्धी भांडवल खाते | ५३,३३३ |
| | १,२३,००० | | १,२३,००० |

नावे **सिद्धीचे कर्ज खाते** जमा

| तपशील | रक्कम ₹ | तपशील | रक्कम ₹ |
|---|---|---|---|
| बँक खाते | ३,००० | शिल्लक खाली आणली | ४,००० |
| रोखीकरण खाते | १,००० | | |
| | ४,००० | | ४,००० |

**उदाहरण – २**

महेश, सुरेश आणि योगेश एका भागीदारी संस्थेचे भागीदार आहेत. त्यांनी एकत्रितपणे भागीदारी संस्था विसर्जित करण्याचे ठरविले. त्यांनी काही संपत्ती व देयता स्वत: ठेऊन भागीदारीचा व्यवसाय स्वतंत्रपणे चालू ठेवण्याचे ठरविले. त्यांच्या भागीदारीचा ताळेबंद खालीलप्रमाणे होता.

**३१ मार्च २०१७ रोजीचा ताळेबंद**

| देयता | रक्कम ₹ | रक्कम ₹ | संपत्ती | रक्कम ₹ | रक्कम ₹ |
|---|---|---|---|---|---|
| भांडवल खाते : | | | फर्निचर | | २,००० |
| महेश | | ५५,००० | विविध संपत्ती | | ३४,००० |
| सुरेश | | २०,००० | ऋणको | ४८,४०० | |
| योगेश | | १४,००० | – बुडीत कर्ज निधी | २,४०० | ४६,००० |
| धनको | | १२,००० | स्कंध | | १५,६०० |
| कर्ज | | ३,००० | रोख/ रोकड | | ६,४०० |
| | | १,०४,००० | | | १,०४,००० |

संपत्तीचे रोखीकरण खालीलप्रमाणे झाले.

१. 'महेश ने फर्निचर ₹ १,६०० ला तसेच ₹ ४०,००० चे ऋणको ₹ ३४,४०० ठेऊन घेतले आणि धनकोंचे पूर्णपणे (₹ १२,०००) शोधन करण्याची जबाबदारी स्वीकारली.

२. 'सुरेश ने स्कंध ₹ १४,००० आणि ₹ १६,००० ची विविध संपत्ती ₹ १४,४०० ठेऊन घेतली.

३. योगेश ने शिल्लक राहिलेली विविध संपत्ती ₹ १६,००० ठेऊन संस्थेचे कर्ज फेडण्याची तसेच उपार्जित व्याज ₹ ६० शोधन करण्याचे मान्य केले. जे व्याज संस्थेच्या खाते पुस्तकात न नोंदविलेले होते.

४. विसर्जन खर्च ₹ ५४०.

५. राहिलेल्या ऋणकोचे रोखीकरण ₹ ४,२०० ला करण्यात आले.

६. आवश्यक समायोजना करून सर्व भागीदारांचे खाते समायोजित करण्यात आले.

**तयार करा :**

**रोखीकरण खाते, रोकड खाते व भागीदाराचे भांडवल खाते तयार करा.**

उत्तर

**महेश, सुरेश आणि योगेश यांच्या पुस्तकात**

**नावे** **रोखीकरण खाते** **जमा**

| तपशील | रक्कम ₹ | रक्कम₹ | तपशील | रक्कम ₹ | रक्कम ₹ |
|---|---|---|---|---|---|
| विविध संपत्ती खाते : | | | विविध देयतांचे खाते: | | |
| विविध संपत्ती | ३४,००० | | धनको | १२,००० | |
| फर्निचर | २,००० | | कर्ज | ३,००० | १५,००० |
| ऋणको | ४८,४०० | | बुडीत कर्ज निधी | | २,४०० |
| स्कंध | १५,६०० | १,००,००० | महेशचे भांडवल खाते : | | |
| महेशचे भांडवल खाते : | | | फर्निचर | १६०० | |
| धनको | | १२,००० | ऋणको | ३४,४०० | ३६,००० |
| सुरेशचे भांडवल खाते | | | सुरेशचे भांडवल खाते : | | |
| कर्ज | ३,००० | | स्कंध | १४,००० | |
| कर्जावरील व्याज | ६० | ३,०६० | विविध संपत्ती | १४,४०० | २८,४०० |
| रोख खाते : विसर्जन खर्च | | ५४० | योगेशचे भांडवल खाते | | |
| | | | विविध संपत्ती | | १६,००० |
| | | | रोख खाते : | | |
| | | | ऋणको | | ४,२०० |
| | | | भागीदारांचे भांडवल खाते (तोटा) | | |
| | | | महेश | ४५३३ | |
| | | | सुरेश | ४५३३ | |
| | | | योगेश | ४५३४ | १३,६०० |
| | | १,१५,६०० | | | १,१५,६०० |

**नावे** **भागीदारांचे भांडवल खाते** **जमा**

| तपशील | महेश (₹) | सुरेश (₹) | योगेश (₹) | तपशील | महेश (₹) | सुरेश (₹) | योगेश (₹) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| रोखीकरण खाते | ३६,००० | २८,४०० | १६,००० | शिल्लक खाली आणली | ५५,००० | २०,००० | १४,००० |
| रोखीकरण खाते (तोटा) | ४,५३३ | ४,५३३ | ४,५३४ | रोखीकरण खाते | १२,००० | | ३,०६० |
| रोख खाते | २६,४६७ | | | रोख खाते | | १२,९३३ | ३,४७४ |
| | ६७,००० | ३२,९३३ | २०,५३४ | | ६७,००० | ३२,९३३ | २०,५३४ |

**कार्यटिप :**

**नावे** **रोख खाते / रोकड खाते** **जमा**

| तपशील | रक्कम ₹ | तपशील | रक्कम ₹ |
|---|---|---|---|
| शिल्लक खाली आणली | ६,४०० | रोखीकरण खाते | ५४० |
| रोखीकरण खाते | ४,२०० | महेशचे भांडवल खाते | २६,४६७ |
| सुरेशचे भांडवल खाते | १२,९३३ | | |
| योगेशचे भांडवल खाते | ३,४७४ | | |
| | २७,००७ | | २७,००७ |

**उदाहरण – ३**

राजीव आणि संजीव समान प्रमाणात नफा-तोटा विभागून घेणारे भागीदार आहेत. त्यांचा ३१ मार्च २०१९ रोजीचा ताळेबंद खालीलप्रमाणे होता.

**३१ मार्च २०१९ रोजीचा ताळेबंद**

| देयता | रक्कम ₹ | संपत्ती | रक्कम ₹ |
|---|---|---|---|
| राखीव निधी | ८,००० | इमारत | २०,००० |
| धनको | १२,८०० | उपस्कर | ६,००० |
| देयविपत्र | ७,२०० | ऋणको | १८,००० |
| भांडवल खाते | | स्कंध | २०,००० |
| राजीव | २०,००० | प्राप्त विपत्र | २,००० |
| संजीव | २४,००० | रोख | ६,००० |
| | ७२,००० | | ७२,००० |

**संपत्तीचे रोखीकरण खालीलप्रमाणे :**

स्कंध ₹ १८,४००, ऋणको ₹ १६,६००, प्राप्तविपत्र ₹ १,९८० संजीवने इमारत ₹ १८,००० आणि राजीवने उपस्कर ₹ ५,४०० ला घेण्याचे मान्य केले. रोखीकरण खर्च ₹ ६०० झाला.

**भागीदारी संस्थेच्या पुस्तकात आवश्यक रोजकीर्द नोंदी देऊन रोखीकरण खाते व भागीदारांचे भांडवल खाते तयार करा.**

**उत्तर**

**राजीव आणि संजीव यांच्या पुस्तकात**

**किर्दनोंदी**

| दिनांक | तपशील | खा.पा. | नावे रक्कम (₹) | जमा रक्कम (₹) |
|---|---|---|---|---|
| १. | रोखीकरण खाते ........ नावे | | ६६,००० | |
| | इमारत खात्याला | | | २०,००० |
| | उपस्कर खात्याला | | | ६,००० |
| | ऋणको खात्याला | | | १८,००० |
| | स्कंध खात्याला | | | २०,००० |
| | प्राप्त विपत्र खात्याला | | | २,००० |
| | (रोखीकरण खात्याला संपत्ती स्थानांतरित केल्याबद्दल) | | | |
| २. | धनको खाते ........ नावे | | १२,८०० | |
| | देयविपत्र खाते ........ नावे | | ७,२०० | |
| | रोखीकरण खात्याला | | | २०,००० |
| | (तृतीयपक्ष देयता रोखीकरण खात्याला स्थानांतरित केल्याबद्दल) | | | |
| ३. | राखीव निधी खाते ........ नावे | | ८,००० | |
| | राजीवच्या भांडवल खात्याला | | | ४,००० |
| | संजीवच्या भांडवल खात्याला | | | ४,००० |
| | (राखीव निधी भागीदाराच्या भांडवल खात्याला स्थानांतरित केल्याबद्दल) | | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ४. | रोख खाते ........................................ नावे<br>रोखीकरण खात्याला<br>(स्कंध, ऋणको, प्राप्त विपत्र विक्री केल्याबद्दल) | | ३६,९८० | ३६,९८० |
| ५. | संजीवचे भांडवल खाते ........................................ नावे<br>रोखीकरण खात्याला<br>(संजीवने इमारत ठेऊन घेतल्याबद्दल ) | | १८,००० | १८,००० |
| ६. | राजीवचे भांडवल खाते ........................................ नावे<br>रोखीकरण खात्याला<br>(राजीवने उपस्कर ठेऊन घेतल्याबद्दल ) | | ५,४०० | ५,४०० |
| ७. | रोखीकरण खाते ........................................ नावे.<br>रोख खात्याला<br>(तृतीय पक्ष देयताचे शोधन केल्याबद्दल) | | २०,००० | २०,००० |
| ८. | रोखीकरण खाते ........................................ नावे<br>रोख खात्याला<br>(विसर्जन खर्च दिल्याबद्दल) | | ६०० | ६०० |
| ९. | राजीवचे भांडवल खाते ........................................ नावे<br>संजीवचे भांडवल खाते ........................................ नावे<br>रोखीकरण खात्याला<br>(रोखीकरण खात्याचा तोटा भागीदाराच्या भांडवल खात्याला स्थानांतरित केल्याबद्दल) | | ३,११०<br>३,११० | ६,२२० |
| १०. | राजीवचे भांडवल खाते ........................................ नावे<br>संजीवचे भांडवल खाते ........................................ नावे<br>रोख खात्याला<br>(भागीदारांना अंतिम शोधन करून खाती बंद केल्याबद्दल ) | | १५,४९०<br>६,८९० | २२,३८० |

**राजीव व संजीवच्या पुस्तकात**

**नावे.** **रोखीकरण खाते** **जमा**

| तपशील | रक्कम (₹) | रक्कम (₹) | तपशील | रक्कम (₹) | रक्कम (₹) |
|---|---|---|---|---|---|
| विविध संपत्ती | | | विविध देयता : | | |
| इमारत | २०,००० | | धनको | १२,८०० | |
| फर्निचर | ६,००० | | देयविपत्र | ७,२०० | २०,००० |
| ऋणको | १८,००० | | रोख खाते: | | |
| मालसाठा | २०,००० | | मालसाठा | १८,४०० | |
| प्राप्तविपत्र | २,००० | ६६,००० | ऋणको | १६,६०० | |
| रोख खाते :<br>(विविध देयतांचे शोधन) | | २०,००० | प्राप्तविपत्र | १,९८० | ३६,९८० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| रोख खाते : | | ६०० | संजीवचे भांडवल खाते<br>(इमारत ठेऊन घेतली) | | १८,००० |
| (विसर्जन खर्च दिला) | | | राजीवचे भांडवल खाते<br>(फर्निचर ठेऊन घेतले) | | ५,४०० |
| | | | भागीदारांचे भांडवल खाते<br>(रोखीकरणावरील तोटा) | | |
| | | | राजीव | ३,११० | |
| | | | संजीव | ३,११० | ६,२२० |
| | | ८६,६०० | | | ८६,६०० |

नावे **भागीदारांचे भांडवल खाते** जमा

| तपशील | राजीव (₹) | संजीव (₹) | तपशील | राजीव( ₹) | संजीव (₹) |
|---|---|---|---|---|---|
| रोखीकरण खाते | ५,४०० | १८,००० | शिल्लक खाली आणली | २०,००० | २४,००० |
| रोखीकरण खाते<br>(रोखीकरणावरील तोटा) | ३,११० | ३,११० | सामान्य निधी | ४,००० | ४,००० |
| रोकड/ रोख खाते | १५,४९० | ६,८९० | | | |
| | २४,००० | २८,००० | | २४,००० | २८,००० |

**कार्यटिप :**

नावे **रोकड खाते** जमा

| तपशील | रक्कम ₹ | तपशील | रक्कम ₹ |
|---|---|---|---|
| शिल्लक खाली आणली | ६,००० | रोखीकरण खाते | २०,००० |
| रोखकरण खाते | ३६,९८० | रोखीकरण खाते | ६०० |
| | | राजीवचे भांडवल खाते | १५,४९० |
| | | संजीवचे भांडवल खाते | ६,८९० |
| | ४२,९८० | | ४२,९८० |

**उदाहरण – ४**

स्वरा आणि स्वराज यांचा भागीदारीचा ३१ मार्च २०१८ रोजीचा ताळेबंद खालीलप्रमाणे

**३१ मार्च २०१८ रोजीचा ताळेबंद**

| देयता | रक्कम ₹ | रक्कम ₹ | संपत्ती | रक्कम ₹ | रक्कम ₹ |
|---|---|---|---|---|---|
| भांडवल खाते : | | | फर्निचर | | ६,००० |
| स्वरा | | ६,००० | एकस्वाधीकार | | १,२०० |
| स्वराज | | ५,००० | ख्याती | | २,००० |
| सामान्य निधी / संचिती | | २,००० | ऋणको | ३,८०० | |
| स्वराचे कर्ज खाते | | २,००० | वजा : बुडीत कर्ज निधी | २०० | ३,६०० |
| धनको | | ३,००० | स्कंध | | ५,००० |
| देयविपत्र | | १,००० | बँक | | १,२०० |
| | | १९,००० | | | १९,००० |

१   १ एप्रिल २०१८ भागीदारी संस्थेचे विसर्जन झाले.

१.   स्वरा ने ₹ २,००० ला एकस्वाधीकार ठेऊन घेतले.

२.   संपत्तीचे रोखीकरण पुढीलप्रमाणे झाले. :
फर्निचर ₹ ७,०००, ख्याती ₹ ३,०००, स्कंध ₹ ४,००० आणि ऋणको ₹ ३,०००.

३.   धनकोचे शोधन १०% कसरीवर करण्यात आले तर इतर देयतेचे शोधन पूर्णपणे करण्यात आले.

४.   रोखीकरण खर्च स्वराजने स्वत: केला ₹ १,५००

**तयार करा : रोखीकरण खाते, भागीदारांचे भांडवल खाते, आणि बँक खाते.**

उत्तर :

**स्वरा व स्वराज यांच्या पुस्तकात**

**नावे   रोखीकरण खाते   जमा**

| तपशील | रक्कम ₹ | रक्कम ₹ | तपशील | रक्कम ₹ | रक्कम ₹ |
|---|---|---|---|---|---|
| विविध संपत्ती खाते | | | विविध देयतांचे खाते: | | |
| फर्निचर | ६,००० | | धनको | ३,००० | |
| एकस्वाधीकार | १,२०० | | देयविपत्र | १,००० | ४,००० |
| ख्याती | २,००० | | बुडीत कर्ज निधी | | २०० |
| ऋणको | ३,८०० | | स्वराचे भांडवल खाते | | २,००० |
| स्कंध | ५,००० | १८,००० | (एकस्वाधीकार ठेऊन घेतले) | | |
| | | | रोख / रोकड खाते | | |
| स्वराजचे भांडवल खाते | | १,५०० | फर्निचर | ७,००० | |
| (रोखीकरण खर्च) | | | ख्याती | ३,००० | |
| बँक खाते : | | | स्कंध | ४,००० | |
| धनको | २,७०० | | ऋणको | ३,००० | १७,००० |
| देयविपत्र | १,००० | ३,७०० | | | |
| | | **२३,२००** | | | **२३,२००** |

**नावे   भागीदारांचे भांडवल खाते   जमा**

| तपशील | स्वरा | स्वराज | तपशील | स्वरा | स्वराज |
|---|---|---|---|---|---|
| रोखीकरण खाते | २,००० | | शिल्लक खाली आणली | ६,००० | ५,००० |
| (एकस्वाधीकार घेतले) | | | सामान्य निधी | १,००० | १,००० |
| बँक खाते | ५,००० | ७,५०० | रोखीकरण खाते | | १,५०० |
| | ७,००० | ७,५०० | | ७,००० | ७,५०० |

**नावे   बँक खाते   जमा**

| तपशील | रक्कम ₹ | तपशील | रक्कम ₹ |
|---|---|---|---|
| शिल्लक खाली आणली | १,२०० | रोखीकरण खाते | ३,७०० |
| रोखीकरण खाते | १७,००० | स्वराजचे कर्ज खाते | २,००० |
| | | स्वराचे भांडवल खाते | ५,००० |
| | | स्वराज भांडवल खाते | ७,५०० |
| | **१८,२००** | | **१८,२००** |

**कार्यटिप :**

**नावे.** **स्वराचे कर्ज खाते** **जमा.**

| तपशील | रक्कम ₹ | तपशील | रक्कम ₹ |
|---|---|---|---|
| बँक खाते | २,००० | शिल्लक खाली आणली | २,००० |
| | २,००० | | २,००० |

**उदाहरण – ५**

सन, मून आणि स्टार हे भागीदार अनुक्रमे ५:३:२ या प्रमाणात नफा-तोटा विभागून घेतात. ३१ मार्च २०१९ रोजी त्यांनी भागीदारी विसर्जित करण्याचे ठरविले. त्याच तिथीला त्यांचा ताळेबंद खालीलप्रमाणे होता.

**३१ मार्च २०१९ रोजीचा ताळेबंद**

| देयता | रक्कम ₹ | संपत्ती | रक्कम ₹ |
|---|---|---|---|
| भांडवल | | उपस्कर | २०,००० |
| सन | ३५,००० | ख्याती | १३,००० |
| स्टार | ८५,००० | संयुक्त जीवन विमापत्र | ३०,००० |
| राखीव निधी | १५,००० | समर्पण मूल्य (Surrendered Value) | |
| संयुक्त जीवन विमापत्र निधी | ३०,००० | विविध ऋणको | ६०,००० |
| विविध धनको | २६,००० | स्कंध | २२,००० |
| अदत्त भाडे | ४,००० | बँकेतील रोख | ४०,००० |
| | | मूनचे भांडवल खाते | १०,००० |
| | **१,९५,०००** | | **१,९५,०००** |

**संपत्तीपासून खालील रक्कम प्राप्त झाली.**

**अ.** उपस्कर आणि स्कंध सन यांनी अनुक्रमे ₹ ३५,००० आणि ₹ २८,००० ला ठेऊन घेतले.

**ब.** संयुक्त जीवन विमापत्र समर्पित केले आणि विविध ऋणकोकडून २०% कसरीवर रक्कम प्राप्त झाली.

**क.** विविध धनकोंना पूर्ण शोधनार्थ ₹ २४,००० देण्याचे मून यांनी मान्य केले.

**ड.** विसर्जनाचा खर्च ₹ २,००० झाला.

**भागीदारी संस्थेच्या पुस्तकात आवश्यक खाती तयार करा.**

उत्तर

**सन, मून आणि स्टार यांच्या पुस्तकात**

नावे. **रोखीकरण खाते** जमा.

| तपशील | रक्कम ₹ | रक्कम ₹ | तपशील | रक्कम ₹ | रक्कम ₹ |
|---|---|---|---|---|---|
| विविध संपत्ती खाते : | | | विविध देयता खाते : | | |
| उपस्कर | २०,००० | | धनको | २६,००० | |
| ख्याती | १३,००० | | संयुक्त जीवन-विमापत्र निधी | ३०,००० | |
| संयुक्त जीवनविमापत्र | ३०,००० | | अदत्त भाडे | ४,००० | ६०,००० |
| विविध ऋणको | ६०,००० | | सनचे भांडवल खाते | | |
| स्कंध | २२,००० | १,४५,००० | उपस्कर | ३५,००० | |
| मूनचे भांडवल खाते | | २४,००० | स्कंध (ठेऊन घेतले) | २८,००० | ६३,००० |
| (धनकोचे शोधन) | | | बँक खाते | | |
| बँक खाते | | | संयुक्त जीवन विमापत्र | ३०,००० | |
| अदत्त भाडे | ४,००० | | विविध ऋणको | ४८,००० | ७८,००० |
| विसर्जन खर्च | २,००० | ६,००० | | | |
| भागीदाराचे भांडवल खाते | | | | | |
| (नफा) | | | | | |
| सन | १३,००० | | | | |
| मून | ७,८०० | | | | |
| स्टार | ५,२०० | २६,००० | | | |
| | | २,०१,००० | | | २,०१,००० |

नावे **भागीदाराचे भांडवल खाते** जमा

| तपशील | सन ₹ | मून ₹ | स्टार ₹ | तपशील | सन ₹ | मून ₹ | स्टार ₹ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| शिल्लक पु/ आ | | १०,००० | | शिल्लक पु/आ | ३५,००० | | ८५,००० |
| रोखीकरण खाते | ६३,००० | | | राखीव निधी | ७,५०० | ४,५०० | ३,००० |
| बँक खाते | | २६,३०० | ९३,२०० | रोखीकरण खाते | | २४,००० | |
| (अंतिम शोधन) | | | | रोखीकरण खाते (नफा) | १३,००० | ७,८०० | ५,२०० |
| | | | | बँक खाते | ७,५०० | | |
| | | | | (अंतिम शोधनार्थ रक्कम आणली) | | | |
| | ६३,००० | ३६,३०० | ९३,२०० | | ६३,००० | ३६,३०० | ९३,२०० |

नावे **बँक खाते** जमा

| तपशील | रक्कम ₹ | तपशील | रक्कम ₹ |
|---|---|---|---|
| शिल्लक पु/ आ | ४०,००० | रोखीकरण खाते | ६,००० |
| रोखीकरण खाते | ७८,००० | मूनचे भांडवल खाते | २६,३०० |
| सनचे भांडवल खाते | ७,५०० | स्टारचे भांडवल खाते | ९३,२०० |
| | १,२५,५०० | | १,२५,५०० |

**उदाहरण – ६**

नेरले आणि पाटील हे ३:१ या प्रमाणात नफा–तोटा वाटून घेणारे भागीदार आहेत. त्यांनी ३१ मार्च २०२० रोजी भागीदारी विसर्जित करण्याचे ठरविले त्यांच्या भागीदारीचा वरील तारखेचा ताळेबंद खालीलप्रमाणे होता.

**३१ मार्च २०२० रोजीचा ताळेबंद**

| देयता | रक्कम ₹ | संपत्ती | रक्कम ₹ |
|---|---|---|---|
| भांडवल खाते : | | इमारत | ६०,००० |
| नेरले | १,१४,००० | यंत्र | ५०,००० |
| पाटील | ५०,००० | मालसाठा (स्कंध) | ३०,००० |
| नफा तोटा खाते | ८,००० | विविध ऋणको | ४४,००० |
| विविध धनको | ३२,००० | बँकेतील रोख शिल्लक | २०,००० |
| | २,०४,००० | | २,०४,००० |

वरील तारखेला भागीदारी संस्थेचे विसर्जन झाले आणि संपत्तीचे रोखीकरण खालीलप्रमाणे झाले. –

१. नेरले यांनी ५०% यंत्र १०% कसरीवर आणि $\frac{१}{४}$ मालसाठा २०% कसरीवर ठेऊन घेतला.

२. पाटील ने ₹ ७०,००० ला इमारत ठेऊन घेतली तसेच ₹ २०,००० चे ऋणको ₹ १६,००० ला ठेऊन घेतले, तसेच त्याने ५ % कसरीवर धनकोचे शोधन करण्याचे कबूल केले.

३. शिल्लक सयंत्र ₹ ४,००० च्या नुकसानीवर विकण्यात आले.

४. शिल्लक मालसाठा १०% नफ्यावर विकण्यात आला आणि उर्वरीत ऋणकोचे ९५% रोखीकरण झाले.

**तयार करा : रोखीकरण खाते, भागीदारांचे भांडवल खाते आणि बँक खाते.**

**उत्तर – ६**

**नेरले आणि पाटील यांच्या पुस्तकात**

**नावे** **रोखीकरण खाते** **जमा.**

| तपशील | रक्कम ₹ | रक्कम ₹ | तपशील | रक्कम ₹ | रक्कम ₹ |
|---|---|---|---|---|---|
| **विविध संपत्ती खाते :** | | | **विविध देयतेचे खाते :** | | |
| इमारत | ६०,००० | | धनको | | ३२,००० |
| यंत्र | ५०,००० | | नेरले भांडवल खाते : | | |
| मालसाठा | ३०,००० | | यंत्र | २२,५०० | |
| विविध ऋणको | ४४,००० | १,८४,००० | मालसाठा | ६,००० | २८,५०० |
| पाटीलचे भांडवल खाते (धनको) | | ३०,४०० | पाटीलचे भांडवल खाते : | | |
| भागीदारांचे भांडवल खाते | | | इमारत | ७०,००० | |
| (रोखीकरणावरील नफा स्थानांतरित) | | | ऋणको | १६,००० | ८६,००० |
| नेरले | ४८८ | | बँक खाते : | | |
| पाटील | १६२ | ६५० | यंत्र | २१,००० | |
| | | | मालसाठा | २४,७५० | |
| | | | ऋणको | २२,८०० | ६८,५५० |
| | | २,१५,०५० | | | २,१५,०५० |

**नावे** **भागीदारांचे भांडवल खाते** **जमा**

| तपशील | नेरले ₹ | पाटील ₹ | तपशील | नेरले ₹ | पाटील ₹ |
|---|---|---|---|---|---|
| रोखीकरण खाते | २८,५०० | ८६,००० | शिल्लक खाली आणली | १,१४,००० | ५०,००० |
| बँक खाते | ९१,९८८ | | नफा-तोटा खाते | ६,००० | २,००० |
| | | | रोखीकरण खाते | | ३०,४०० |
| | | | रोखीकरण खाते (रोखीकरणावरील नफा) | ४८८ | १६२ |
| | | | बँक खाते | | ३,४३८ |
| | १,२०,४८८ | ८६,००० | | १,२०,४८८ | ८६,००० |

**नावे** **बँक खाते** **जमा**

| तपशील | रक्कम ₹ | तपशील | रक्कम ₹ |
|---|---|---|---|
| शिल्लक खाली आणली | २०,००० | नेरलेचे भांडवल खाते | ९१,९८८ |
| रोखीकरण खाते | ६८,५५० | | |
| पाटीलचे भांडवल खाते | ३,४३८ | | |
| | ९१,९८८ | | ९१,९८८ |

**कार्य टिप :**

१. **यंत्र – ₹ ५०,०००**

↓

| | |
|---|---|
| ५०% २५,००० (नेरले) | ५०% २५,००० (रोखीकरण) |
| (वजा) १०% २,५०० (Discount) | (वजा) ४,००० (तोटा) |
| ₹ २२,५०० | ₹ २१,००० |

२. **मालसाठा – ₹ ३०,०००**

↓

| | |
|---|---|
| (१/४) ७,५०० (नेरले) | (३/४) २२,५०० (रोखीकरण) |
| (वजा) २०% १,५०० (कसर) | (अधिक) १०% २,२५० (नफा) |
| ₹ ६,००० | ₹ २४,७५० |

३. **धनकोचे ५% कसरीवर शोधन**

= ३२,००० × ५/१००

= ₹ १,६०० कसर

= ₹ ३२,००० – १,६००

= ₹ ३०,४००

| | ₹ |
|---|---|
| ४. **एकूण ऋणको** | ४४,००० |
| वजा – पाटीलने घेतलेले | २०,००० |
| शिल्लक ऋणको | २४,००० |
| ९५% ऋणको | २२,८०० |
| रोखीकरण झाले | |

## ६.२ दिवाळखोरी / नादारीमुळे भागीदारीचे विसर्जन (Dissolution Under Insolvency Situation) :

कायदेशीर परिभाषेनुसार नादारी / दिवाळखोरी म्हणजे भागीदारांची किंवा संस्थेची देयता ही संपत्तीपेक्षा अधिक होते. तथापि विसर्जनाच्या परिस्थितीत संस्थेचे अस्तित्व राहत नाही. कारण उपलब्ध असलेल्या अपूर्ण रकमेमुळे संस्थेवर बंधने येतात. तसेच कर्जदाराची देय असलेली रक्कम देता येत नाही. अशा परिस्थितीला विसर्जन असे म्हणतात.

विसर्जन प्रसंगी जर भागीदारांचे भांडवल खाते वरील समायोजन करूनदेखील नावे शिल्लक दाखवित असेल तर भागीदारांची खाजगी संपत्ती विकून प्रथम देयता द्यावयाची असते. एवढे करूनही भागीदाराच्या भांडवल खात्याची नावे शिल्लक असल्यास म्हणजेच भांडवल न्यूनता / तूट भरून काढण्यासाठी तो पुन्हा रोख रक्कम आणण्यास असमर्थ ठरत असेल तर तो दिवाळखोर नादार ठरतो. या भागीदाराकडून येणे असलेल्या रकमेची जबाबदारी अन्य सक्षम भागीदार वहन करतात.

## ६.३ काही महत्त्वाच्या संकल्पना (Some Important Concepts) :

**अ. सक्षम भागीदार (Solvent Partner) : "असा भागीदार होय की ज्याची संपत्ती ही देयतेपेक्षा अधिक आहे."**

सक्षम भागीदार म्हणजे अशी व्यक्ती की जी आपल्या संपत्तीतून आपल्या देयतांची परतफेड करू शकेल.

सक्षम भागीदार म्हणजे जो आपली आर्थिक बंधने पूर्ण करण्यास समर्थ आहे.

**ब. दिवाळखोर / नादार भागीदार (Insolvent Partner) :**

"नादारी म्हणजे एखाद्या भागीदाराची देयता ही संपत्तीपेक्षा अधिक होते, आणि त्याचेकडील सर्व संपत्ती विकल्यानंतर सुद्धा देयतांचे शोधन होवू शकत नसेल त्या परिस्थितीला दिवाळखोरी / नादारी असे म्हटले जाते."

"नादार भागीदार म्हणजे ज्याची देयता ही त्याच्या संपत्तीपेक्षा जास्त असते.''

''जेव्हा एखादा व्यक्ती आपल्या संपत्तीतून देयतांचे समाधान करू शकत नसेल तेव्हां त्या व्यक्तीला नादार/ दिवाळखोर व्यक्ती असे म्हटले जाते.''

**क. भांडवलाची न्यूनता / तूट (Capital Deficiency) : "भागीदाराच्या भांडवल खात्यावर सर्व समायोजन केल्यानंतर देखील त्याचे भांडवल खाते नावे शिल्लक दाखवते या शिलकेला भांडवल न्यूनता / तूट म्हटले जाते.''**

एक किंवा त्यापेक्षा भागीदारांच्या भांडवल खात्याला नावे शिल्लक असेल. त्यासंबंधीची रक्कम ते अंशत: किंवा पूर्णपणे रोख स्वरूपात आणू शकत नसेल तर अशा भागीदारांना दिवाळखोर / नादार भागीदार असे म्हटले जाते. भागीदार कायदा १९३२ प्रमाणे भागीदारीत भागीदारांची देयता अमर्याद असते. जेव्हां भागीदार नादार होतात, तेव्हां खाजगी संपत्ती हस्तगत करून विक्री केली जाते तरीही जर नादार भागीदार आपल्या देयतांचे शोधन करण्यास असमर्थ असल्यास सक्षम भागीदार त्यांच्या नफा-तोटा विभाजनाच्या प्रमाणात भरपाई करतात.

जर भागीदारीतील एखादा भागीदार आपल्या भांडवलाची न्यूनता तूटीची रक्कम रोख स्वरूपात आणण्यास असमर्थ असेल तर दिवाळखोर / नादार भागीदाराच्या भांडवल खात्यावरील न्यूनता / तूट भागीदारीतील इतर सक्षम भागीदार ही तूट त्यांच्या नफा-तोटा विभाजनाच्या प्रमाणात भरून काढतील.

**६.४ दिवाळखोर / नादार भागीदाराच्या भांडवल खात्यावरील तूट किंवा न्यूनत :** दिवाळखोर / नादार भागीदाराच्या भांडवल खात्यावरील न्यूनता तूट खालील दोन प्रकारे भरून काढता येईल.

१. भागीदारीच्या सामान्य तोट्यामधून / न्यूनता / तूट निर्माण / झाली असल्यास ही तूट इतर भागीदार त्यांच्या नफा-तोटा विभाजनाच्या प्रमाणात भरून काढू शकेल.

२. विशेष तोट्यामुळे जर भांडवलाची न्यूनता / तूट निर्माण झाली असल्यास अशी तूट इतर सक्षम भागीदार त्यांच्या नफा तोटा विभाजनाच्या प्रमाणात ही तूट / न्यूनता भरून काढतात. (गार्नर विरुद्ध मरे नियमानुसार)

**टीप : गार्नर विरुद्ध मरे या केसचे नियम १२ वी वाणिज्यच्या अभ्यासक्रमात समाविष्ट नाहीत, म्हणून अशा प्रकारचे एकही उदाहरण अभ्यासक्रमात दिलेले नाही.**

## ६.४ स्थिर आणि अस्थिर भांडवल पद्धत (Fixed and Fluctuating Capital Method)

**स्थिर भांडवल पद्धत : (Fixed capital Method) :**

स्थिर भांडवल पद्धतीमध्ये प्रत्येक भागीदाराचे स्वतंत्र चालू खाते तयार केले जाते. सर्व प्रकारच्या समायोजना चालू खात्यात केल्या जातात. त्यानंतर चालू खात्यावर आलेली शिल्लक भागीदारांच्या भांडवल खात्याला स्थानांतरित केली जाते.

**लेखांकीय पद्धत (Accounting Procedure) :**

१. दिवाळखोर / नादार भागीदाराच्या चालू खात्याची शिल्लक त्याच्या भांडवल खात्याला स्थानांतरित केल्यास होणारी किर्द नोंद

दिवाळखोर / नादार भागीदाराचे चालू खाते ................................नावे

दिवाळखोर / नादार भागीदाराच्या भांडवल खात्याला

(नादार भागीदाराची न्यूनता त्याच्या भांडवल खात्याला / स्थानांतरित केल्याबद्दल)

२. दिवाळखोर / नादार भागीदाराच्या चालू खात्यावरील न्यूनतम तूट सक्षम भागीदारांच्या भांडवल खात्याला त्यांच्या नफा-तोटा विभाजनाच्या प्रमाणात स्थानांतरित केल्याबद्दल)

सक्षम भागीदारांचे भांडवल खाते ..........................................नावे

नादार भागीदाराच्या भांडवल खात्याला

(नादार भागीदाराची न्यूनता / तूट स्थानांतरित केल्याबद्दल)

३. सक्षम भागीदारांच्या चालू खात्याची शिल्लक त्यांच्या भांडवल खात्याला स्थानांतरित केल्याबद्दल

सक्षम भागीदारांचे चालू खाते ..............................................नावे.

सक्षम भागीदारांच्या भांडवल खात्याला

(चालू खात्याची शिल्लक स्थानांतरित केल्याबद्दल)

४. सक्षम भागीदारांच्या भांडवल खात्यांची अंतिम देवाण-घेवाण पूर्ण केल्याबद्दल

सक्षम भागीदारांचे भांडवल खाते ..........................................नावे

रोख/ बँक खात्याला

(रोख रक्कम देऊन खाते बंद केल्याबद्दल)

## ६.५ अस्थिर भांडवल पद्धत (Fluctuating Capital Method)

अस्थिर भांडवल पद्धतीमध्ये चालू खाते उघडले जात नाही. सर्व समायोजना भांडवल खात्यात करून दिवाळखोर/ नादार भागीदारीच्या भांडवल खात्यावरील न्यूनता / तूट सक्षम भागीदारांच्या भांडवल खात्याला त्यांच्या नफा-तोटा विभाजनाच्या प्रमाणात स्थानांतरित केली जाते.

सक्षम भागीदारांचे भांडवल खाते ..........................................नावे.

दिवाळखोर / नादार भागीदाराच्या भांडवल खात्याला

(दिवाळखोर भागीदाराच्या भांडवलाची न्यूनता / तूट स्थानांतरित केल्याबद्दल)

१. **विद्या, शर्मिला आणि मेघा हे ५ :३: २ या प्रमाणात नफा-तोटा वाटून घेणारे भागीदार आहेत. त्यांच्या भागीदारीचा ३१ मार्च २०१९ रोजीचा ताळेबंद खालीलप्रमाणे होता.**

**३१ मार्च २०१९ रोजीचा ताळेबंद**

| देयता | रक्कम (₹) | संपत्ती | रक्कम (₹) |
|---|---|---|---|
| भांडवल खाते : | | विविध संपत्ती | १,२८,००० |
| विद्या | ५०,००० | बँक खाते | १६,००० |
| शर्मिला | ४०,००० | चालू खाते – मेघा | २६,००० |
| मेघा | ३०,००० | | |
| चालू खाते : | | | |
| विद्या | ६,००० | | |
| शर्मिला | ६,००० | | |
| विविध धनको | २८,००० | | |
| देयविपत्र | १०,००० | | |
| | **१,७०,०००** | | **१,७०,०००** |

**त्यांनी वरील तारखेला भागीदारी संस्थेचे विसर्जन करण्याचे ठरविले.**

१. विविध संपत्तीचे रोखीकरण पुस्तकी मूल्याच्या ८०% रकमेने झाले.
२. नोंद न केलेल्या अदत्त खर्चाचे शोधन ₹ ८,००० ला करण्यात आले.
३. रोखीकरण खर्च ₹ ६,००० देय आहे.
४. विविध धनको आणि देयविपत्राचे शोधन ₹ ३४,००० ला करण्यात आले.
५. मेघा नादार झाली आणि तिच्या खाजगी संपत्तीतून ₹ २,००० वसूल झाले.

**तयार करा : रोखीकरण खाते, भागीदारांचे चालू खाते, भागीदारांचे भांडवल खाते आणि बँक खाते.**

**उत्तर**

**विद्या, शर्मिला आणि मेधा यांच्या पुस्तकात**

**नावे.** **रोखीकरण खाते** **जमा.**

| तपशील | रक्कम ₹ | रक्कम ₹ | तपशील | रक्कम ₹ | रक्कम ₹ |
|---|---|---|---|---|---|
| विविध संपत्ती खाते : | | १,२८,००० | विविध देयता खाते : | | |
| बँक खाते : | | | धनको | २८,००० | |
| धनको व देयविपत्र | ३४,००० | | देयविपत्र | १०,००० | ३८,००० |
| अदत्त खर्च | ८,००० | ४२,००० | बँक खाते : | | १,०२,४०० |
| बँक खाते : | | | विविध संपत्ती | | |
| (रोखीकरण खर्च) | | ६,००० | भागीदारांचे भांडवल खाते | | |
| | | | (रोखीकरणावरील तोटा) | | |
| | | | विद्या | १७,८०० | |
| | | | शर्मिला | १०,६८० | |
| | | | मेघा | ७,१२० | ३५,६०० |
| | | **१,७६,०००** | | | **१,७६,०००** |

नावे **भागीदारांचे चालू खाते** जमा

| तपशील | विद्या (₹) | शर्मिला (₹) | मेघा (₹) | तपशील | विद्या (₹) | शर्मिला (₹) | मेघा (₹) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| शिल्लक खाली आणली | | | २६,००० | शिल्लक खाली आणली | ६,००० | ६,००० | |
| रोखीकरण खाते (तोटा) | १७,८०० | १०,६८० | ७,१२० | भागीदारांचे भांडवल खाते | ११,८०० | ४,६८० | ३३,१२० |
| | **१७,८००** | **१०,६८०** | **३३,१२०** | | **१७,८००** | **१०,६८०** | **३३,१२०** |

नावे **भागीदारांचे भांडवल खाते** जमा

| तपशील | विद्या (₹) | शर्मिला (₹) | मेघा (₹) | तपशील | विद्या (₹) | शर्मिला (₹) | मेघा (₹) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| भागीदारांचे चालू खाते | ११,८०० | ४,६८० | ३३,१२० | शिल्लक खाली आणली | ५०,००० | ४०,००० | ३०,००० |
| मेघाचे भांडवल खाते | ७०० | ४२० | | बँक खाते | | | २,००० |
| बँक खाते | ३७,५०० | ३४,९०० | | विद्याचे भांडवल खाते | | | ७०० |
| | | | | शर्मिलाचे भांडवल खाते | | | ४२० |
| | **५०,०००** | **४०,०००** | **३३,१२०** | | **५०,०००** | **४०,०००** | **३३,१२०** |

नावे. **बँक खाते** जमा

| तपशील | रक्कम (₹) | तपशील | रक्कम (₹) |
|---|---|---|---|
| शिल्लक खाली आणली | १६,००० | रोखीकरण खाते | ४२,००० |
| रोखीकरण खाते | १,०२,४०० | रोखीकरण खाते | ६,००० |
| मेघाचे भांडवल खाते | २,००० | विद्याचे भांडवल खाते | ३७,५०० |
| | | शर्मिलाचे भांडवल खाते | ३४,९०० |
| | **१,२०,४००** | | **१,२०,४००** |

**कार्यटिप : Working Note :**

मेघाच्या भांडवलाची तूट – ₹ १,१२०

विद्या ₹ १,१२० × $\frac{५}{८}$ = ₹ ७००

शर्मिला ₹ १,१२० × $\frac{३}{८}$ = ₹ ४२०

२. **कदम, शिंदे आणि चव्हाण यांच्या भागीदारीचा ३१ मार्च २०१९ रोजीचा ताळेबंद खालीलप्रमाणे आहे. त्यांच्या नफा–तोटा विभाजनाचे प्रमाण अनुक्रमे $\frac{१}{२}$ : $\frac{१}{६}$ : $\frac{१}{३}$ असे आहे.**

**३१ मार्च २०१९ रोजीचा ताळेबंद**

| देयता | रक्कम ₹ | संपत्ती | रक्कम ₹ |
|---|---|---|---|
| भांडवल खाते : | | इमारत | २८,५०० |
| कदम | ३६,००० | यंत्र | २०,२५० |
| शिंदे | ३२,२५० | फर्निचर | ४,५०० |
| सामान्य निधी | १८,००० | मालसाठा (स्कंध) | ३०,७५० |
| कदमचे कर्ज | ११,२५० | ऋणको | १५,००० |
| विविध धनको | १८,७५० | प्राप्त विपत्र | ९,००० |
| देयविपत्र | ११,२५० | बँक | ४,५०० |
| | | नफा-तोटा खाते | २,२५० |
| | | चव्हाणचे भांडवल खाते | १२,७५० |
| | **१,२७,५००** | | **१,२७,५००** |

वरील तारखेला भागीदारी संस्था विसर्जित झाली आणि संपत्तीचे रोखीकरण खालीलप्रमाणे झाले.

१. इमारत ₹ २७,०००, यंत्र ₹ १८,०००, ऋणको ₹ ७,५००, ख्याती ₹ १,३५०

२. कदम ने फर्निचर आणि मालसाठा ₹ ३०,००० ला ठेऊन घेतला तसेच त्याने ₹ ७५० या कसरीवर धनकोचे शोधन करण्याचे मान्य केले.

३. शिंदे ने ₹ ७,८०० ला प्राप्तविपत्र ठेऊन घेतले आणि देयविपत्राचे पूर्णपणे शोधन केले.

४. विसर्जन खर्च ₹ २,४०० झाला.

५. चव्हाण नादार झाल्यामुळे त्याच्या खाजगी संपत्तीतून काहीही रक्कम वसूल झाली नाही.

**वरील माहितीच्या आधारे रोखीकरण खाते, भागीदारांचे भांडवल खाते आणि बँक खाते तयार करा.**

उत्तर :

**कदम, शिंदे आणि चव्हाण यांच्या पुस्तकातून**

**नावे** **रोखीकरण खाते** **जमा.**

| तपशील | | रक्कम (₹) | तपशील | | रक्कम (₹) |
|---|---|---|---|---|---|
| विविध संपत्ती | | | विविध देयता : | | |
| इमारत | २८,५०० | | धनको | १८,७५० | |
| यंत्र | २०,२५० | | देयविपत्र | ११,२५० | ३०,००० |
| उपस्कर | ४,५०० | | बँक खाते | | |
| मालसाठा | ३०,७५० | | इमारत | २७,००० | |
| ऋणको | १५,००० | | यंत्र | १८,००० | |
| प्राप्तविपत्र | ९,००० | १,०८,००० | ऋणको | ७,५०० | |
| कदमचे भांडवल खाते (धनको) | | १८,००० | ख्याती | १,३५० | ५३,८५० |
| शिंदेचे भांडवल खाते (देयविपत्र) | | ११,२५० | कदमचे भांडवल खाते (फर्निचर व मालसाठा) | | ३०,००० |
| बँक खाते : (रोखीकरण खर्च) | | २,४०० | शिंदेचे भांडवल खाते (प्राप्तविपत्र) | | ७,८०० |
| | | | भागीदाराचे भांडवल खाते (तोटा) : | | |
| | | | कदम | ९,००० | |
| | | | शिंदे | ३,००० | |
| | | | चव्हाण | ६,००० | १८,००० |
| | | **१,३९,६५०** | | | **१,३९,६५०** |

नावे. **भागीदारांचे भांडवल खाते** जमा.

| तपशील | कदम (₹) | शिंदे (₹) | चव्हाण (₹) | तपशील | कदम (₹) | शिंदे (₹) | चव्हाण (₹) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| शिल्लक खाली आणली | | | १२,७५० | शिल्लक खाली आणली | ३६,००० | ३२,२५० | |
| नफा-तोटा खाते | १,१२५ | ३७५ | ७५० | सामान्य निधी | ९,००० | ३,००० | ६,००० |
| रोखीकरण खाते (तोटा) | ९,००० | ३,००० | ६,००० | रोखीकरण खाते | १८,००० | ११,२५० | |
| रोखीकरण खाते | ३०,००० | ७,८०० | | कदमचे भांडवल खाते | | | १०,१२५ |
| चव्हाणचे भांडवल खाते | १०,१२५ | ३,३७५ | | शिंदेचे भांडवल खाते | | | ३,३७५ |
| बँक खाते | १२,७५० | ३१,९५० | | | | | |
| | **६३,०००** | **४६,५००** | **१९,५००** | | **६३,०००** | **४६,५००** | **१९,५००** |

नावे. **बँक खाते** जमा.

| तपशील | रक्कम (₹) | तपशील | रक्कम (₹) |
|---|---|---|---|
| शिल्लक खाली आणली | ४,५०० | रोखीकरण खाते | २,४०० |
| रोखीकरण खाते | ५३,८५० | कदमचे भांडवल खाते | १२,७५० |
| | | शिंदेचे भांडवल खाते | ३१,९५० |
| | | कदमचे कर्ज खाते | ११,२५० |
| | ५८,३५० | | ५८,३५० |

नावे **कदमचे कर्ज खाते** जमा.

| तपशील | रक्कम (₹) | तपशील | रक्कम (₹) |
|---|---|---|---|
| बँक खाते | ११,२५० | शिल्लक खाली आणली | ११,२५० |
| | ११,२५० | | ११,२५० |

**३. शुभांगी, मनिषा आणि शितल हे भागीदार समप्रमाणात नफा-तोटा विभागून घेतात त्यांच्या भागीदारीचा ३१ मार्च २०१८ रोजीचा ताळेबंद खालीलप्रमाणे होता. :**

**३१ मार्च २०१८ रोजीचा ताळेबंद**

| देयता | रक्कम ₹ | संपत्ती | | रक्कम ₹ |
|---|---|---|---|---|
| भांडवल खाते : | | यंत्र | | ६२,५०० |
| शुभांगी | ६२,५०० | मालसाठा (स्कंध) | | ३७,५०० |
| मनिषा | ३७,५०० | ऋणको | २७,५०० | |
| राखीव निधी | २२,५०० | (वजा) बुडीत कर्ज निधी | २,५०० | २५,००० |
| धनको | ३७,५०० | प्राप्त विपत्र | | २२,५०० |
| देयविपत्र | १२,५०० | बँकेतील रोख | | १२,५०० |
| | | शितलचे भांडवल | | १२,५०० |
| | **१,७२,५००** | | | **१,७२,५००** |

**वरील तारखेला त्यांनी भागीदारी विसर्जित केली. संपत्तीचे रोखीकरण पुढीलप्रमाणे झाले. :**

१. मालसाठा ₹ ३१, २५०, यंत्र ₹ ३७,५००, ऋणको ₹ २१,२५० आणि प्राप्तविपत्र ₹ १८,०००.
२. धनकोंचे शोधन २% कसरीवर तर देयविपत्राचे पूर्णपणे शोधन करण्यात आले
३. रोखीकरण खर्च ₹ ६,२५० झाला.
४. शितल नादार म्हणून घोषीत झाली आणि तिच्या खाजगी संपत्तीतून रुपयात ५० पैसे इतकी रक्कम वसूल झाली.

**तयार करा : रोखीकरण खाते, भागीदाराचे भांडवल खाते आणि बँक खाते**

**उत्तर** **शुभांगी, मनिषा आणि शितल यांच्या पुस्तकात**

**नावे.** **रोखीकरण खाते** **जमा.**

| तपशील | रक्कम (₹) | रक्कम (₹) | तपशील | रक्कम (₹) | रक्कम (₹) |
|---|---|---|---|---|---|
| विविध संपत्ती : | | | विविध देयता : | | |
| यंत्र | ६२,५०० | | धनको | ३७,५०० | |
| मालसाठा | ३७,५०० | | देयविपत्र | १२,५०० | ५०,००० |
| ऋणको | २७,५०० | | संशयित कर्ज निधी | | २,५०० |
| प्राप्तविपत्र | २२,५०० | १,५०,००० | बँक खाते : | | |
| बँक खाते : | | | मालसाठा | ३१,२५० | |
| धनको | ३६,७५० | | यंत्र | ३७,५०० | |
| देयविपत्र | १२,५०० | ४९,२५० | ऋणको | २१,२५० | |
| | | | प्राप्तविपत्र | १८,००० | १,०८,००० |
| बँक खाते : रोखीकरण खर्च | | ६,२५० | भागीदारांचे भांडवल खाते (रोखीकरणावरील तोटा) | | |
| | | | शुभांगी | १५,००० | |
| | | | मनिषा | १५,००० | |
| | | | शितल | १५,००० | ४५,००० |
| | | २,०५,५०० | | | २,०५,५०० |

**नावे** **भागीदारांचे भांडवल खाते** **जमा**

| तपशील | शुभांगी (₹) | मनिषा (₹) | शितल (₹) | तपशील | शुभांगी (₹) | मनिषा (₹) | शितल (₹) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| शिल्लक खाली आणली | | | १२,५०० | शिल्लक खाली आणली | ६२,५०० | ३७,५०० | |
| शितलचे भांडवल खाते | ५,००० | ५,००० | | सामान्य निधी | ७,५०० | ७,५०० | ७,५०० |
| रोखीकरण खाते (तोटा) | १५,००० | १५,००० | १५,००० | बँक खाते | | | १०,००० |
| बँक खाते | ५०,००० | २५,००० | | शुभांगीचे भांडवल खाते | | | ५,००० |
| | | | | मनिषाचे भांडवल खाते | | | ५,००० |
| | ७०,००० | ४५,००० | २७,५०० | | ७०,००० | ४५,००० | २७,५०० |

नावे. बँक खाते जमा.

| तपशील | रक्कम ₹ | तपशील | रक्कम ₹ |
|---|---|---|---|
| शिल्लक खाली आणली | १२,५०० | रोखीकरण खाते | ४९,२५० |
| रोखीकरण खाते | १,०८,००० | रोखीकरण खाते | ६,२५० |
| शितलचे भांडवल खाते | १०,००० | शुभांगीचे भांडवल खाते | ५०,००० |
| | | मनिषाचे भांडवल खाते | २५,००० |
| | १,३०,५०० | | १,३०,५०० |

**(जेव्हां दोन भागीदार दिवाळखोर / नादार होतात)**

**१** नरेंद्र, देवेंद्र आणि महेंद्र ३:३:२ या प्रमाणात नफा-तोटा वाटून घेणारे भागीदार आहेत. भागीदाराचा व्यवसाय त्यांनी ३१ मार्च २०२० रोजी विसर्जित केला. त्यावेळेस त्यांच्या भागीदारीचा ताळेबंद खालीलप्रमाणे होता. :

**३१ मार्च २०२० रोजीचा ताळेबंद**

| देयता | रक्कम ₹ | संपत्ती | रक्कम ₹ |
|---|---|---|---|
| भांडवल खाते : | | यंत्र आणि संयंत्र | १,००,००० |
| नरेंद्र | २०,००० | मोटार कार | २०.००० |
| देवेंद्र | ८०,००० | विविध ऋणको | ९०,००० |
| महेंद्र | ४०,००० | मालसाठा (स्कंध) | १,२०,००० |
| विविध धनको | २,००,००० | बँकेतील रोख | १०,००० |
| | ३,४०,००० | | ३,४०,००० |

**त्यांनी वरील तारखेला भागीदारी विसर्जित करण्याचे ठरविले.**

१. यंत्र आणि मालसाठा (स्कंध) अनुक्रमे ₹ ५०,००० आणि ₹ ३६,०००, विकण्यात आला.

२. ऋणकोचे रोखीकरण ₹ ४०,०००

३. देवेंद्रने ₹ २६,००० ला मोटारकार स्वत: ठेऊन घेतली.

४. रोखीकरण खर्च ₹ २,००० झाला.

५. एखाद्या भागीदाराच्या भांडवल खात्याला तूट असेल तर ती तूट इतर भागीदार त्यांच्या नफा-तोटा विभाजनाच्या प्रमाणात भरपाई करतील.

६. नरेंद्र नादार झाला. महेंद्रने फक्त ₹ १०,००० रोख आणले.

**भागीदारी संस्थेच्या पुस्तकात आवश्यक खाती तयार करा.**

उत्तर

## नरेंद्र, देवेंद्र आणि महेंद्र यांच्या पुस्तकात

नावे. **रोखीकरण खाते** जमा.

| तपशील | रक्कम (₹) | रक्कम (₹) | तपशील | रक्कम (₹) | रक्कम (₹) |
|---|---|---|---|---|---|
| विविध संपत्ती | | | विविध देयता : | | |
| यंत्र व सयंत्र | १,००,००० | | धनको | | २,००,००० |
| मोटार कार | २०,००० | | बँक खाते : | | |
| विविध ऋणको | ९०,००० | | यंत्र | ५०,००० | |
| मालसाठा (स्कंध) | १,२०,००० | ३,३०,००० | मालसाठा (स्कंध) | ३६,००० | |
| बँक खाते : (धनकोचे शोधन) | | २,००,००० | ऋणको | ४०,००० | १,२६,००० |
| बँक खाते : (रोखीकरण खर्च) | | २,००० | देवेंद्र भांडवल खाते (मोटारकार ठेऊन घेतली) | | २६,००० |
| | | | भागीदारांचे भांडवल खाते (रोखीकरणावरील तोटा स्थानांतरित) | | |
| | | | नरेंद्र | ६७,५०० | |
| | | | देवेंद्र | ६७,५०० | |
| | | | महेंद्र | ४५,००० | १,८०,००० |
| | | ५,३२,००० | | | ५,३२,००० |

नावे. **भागीदारांचे भांडवल खाते** जमा.

| तपशील | नरेंद्र (₹) | देवेंद्र (₹) | महेंद्र (₹) | तपशील | नरेंद्र (₹) | देवेंद्र (₹) | महेंद्र (₹) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| रोखीकरण खाते (रोखी करणावरील तोटा) | ६७,५०० | ६७,५०० | ४५,००० | शिल्लक खाली आणली | २०,००० | ८०,००० | ४०,००० |
| | | | | बँक खाते | | | १०,००० |
| रोखीकरण खाते | | २६,००० | | देवेंद्रचे भांडवल खाते | २८,५०० | | |
| नरेंद्रचे भांडवल खाते | | २८,५०० | १९,००० | महेंद्रचे भांडवल खाते | १९,००० | | |
| महेंद्रचे भांडवल खाते | | १४,००० | | देवेंद्रचे भांडवल खाते | | | १४,००० |
| | | | | बँक खाते | | ५६,००० | |
| | ६७,५०० | १,३६,००० | ६४,००० | | ६७,५०० | १,३६,००० | ६४,००० |

नावे. **बँक खाते** जमा.

| तपशील | रक्कम ₹ | तपशील | रक्कम ₹ |
|---|---|---|---|
| शिल्लक खाली आणली | १०,००० | रोखीकरण खाते | २,००,००० |
| रोखीकरण खाते | १,२६,००० | रोखीकरण खाते | २,००० |
| महेंद्रचे भांडवल खाते | १०,००० | | |
| देवेंद्रचे भांडवल खाते | ५६,००० | | |
| | २,०२,००० | | २,०२,००० |

**कार्यटिप :**

१. **नरेंद्रची तूट – नरेंद्रची भांडवलातील तूट** ₹ ४७,५०० असून देवेंद्र आणि महेंद्र ही तूट त्यांच्या नफा–तोटा वाटणीच्या प्रमाणात जसे ३:२ या प्रमाणात तूट भरून काढतील.

देवेंद्र ₹ ४७,५०० × ३/५ = ₹ २८,५००

महेंद्र ₹ ४७,५०० × २/५ = ₹ १९,०००

२. **महेंद्रची भांडवलातील तूट –** नरेंद्रच्या भांडवलातील तूट महेंद्रने भरून काढल्यामुळे महेंद्र स्वत: नादार झाला आणि म्हणून महेंद्रच्या भांडवलातील तूट ₹ १४,०००. देवेंद्रने भरून काढली.

**जेव्हा सर्व भागीदार नादार दिवाळखोर झाल्यास (when all Partners are insolvent )**

जेव्हा सर्व भागीदार नादार/ दिवाळखोर होतात त्यावेळी संस्थेच्या धनकोंचे पूर्णपणे परतफेड करता येत नाही. संस्थेजवळ उपलब्ध असलेली रोख रक्कम जसे हस्तस्थ रोख + भागीदारांच्या खाजगी संपत्तीतून प्राप्त रक्कम यातून सर्वप्रथम विसर्जन खर्च दिला जातो व उरलेली रक्कम धनकोंना त्या–त्या प्रमाणात दिली जाते.

संस्थेची सर्व पुस्तके बंद करतांना धनको हे रोखीकरण खात्यात स्थानांतरित केले जात नाही तसेच धनकोंची केलेली परतफेड सुद्धा रोखीकरण खात्यात नावे केली जात नाही. रोखीकरणावरील तोटा सर्व भागीदारांच्या भांडवल खात्याला त्यांच्या नफा–तोटा विभाजनाच्या प्रमाणात स्थानांतरित केला जातो. त्यानंतर उपलब्ध असलेल्या रकमेतून धनकोंची परतफेड केली जाते. काही देणे बाकी असल्यास ते न्यूनता / तूट खात्यास स्थानांतरित केले जाते. त्यानंतर भागीदारांचे भांडवल खाते बंद करून न्यूनता / तूट खातेमध्ये स्थानांतरित केले जाते. अशारितीने संस्थेची लेखापुस्तके बंद होतात.

१. **देयतेचे खाते बंद करणे.**

देयता खाते ........................................................ नावे

रोख/ बँक खात्याला ...................................... (दिलेली रक्कम)

न्यूनता / तूट खात्याला .................................... (न दिलेली रक्कम)

(देयतांचे शोधन आणि बाकी राहिलेली रक्कम न्यूनता / तूट खात्यास स्थानांतरित केल्याबद्दल)

२. भागीदारांचे भांडवल खाते बंद केल्याबद्दल

न्यूनता / तूट खाते ........................................... नावे.

भागीदारांचे भांडवल खात्याला ...............................

(भागीदारांचे भांडवल खाते न्यूनता खात्याला नेल्याबद्दल)

१. **दिवाळखोर / नादार भागीदारांकडून रक्कम वसूली :** जर काही रक्कम संस्थेने दिवाळखोर / नादार भागीदारांकडून वसूल केली तर खालीलप्रमाणे नोंद केली जाते.

रोख / बँक खाते ................................................. नावे

दिवाळखोर भागीदारांच्या भांडवल खात्याला

(नादार भागीदाराकडून रक्कम वसूल केल्याबद्दल )

२. **दिवाळखोर / नादार भागीदारांची भांडवल न्यूनता / तूटीची वाटणी :** दिवाळखोर / नादार भागीदारांची भांडवल न्यूनता / तूटीची वाटणी करण्यापूर्वी लक्षात घ्यावयाचे मुद्दे .

अ रोखीकरण खात्याला फक्त संपत्ती स्थानांतरित करावी.

ब. रोखीकरण खात्याला बाह्यदेयता किंवा बाह्यदेणी स्थानांतरित करू नका. त्यांचे स्वतंत्र खाते उघडावे.

क. न्यूनता / तूट खाते उघडून सर्व भागीदारांच्या भांडवल खात्यावरील नावे बाकी (न्यूनता / तूट) स्थानांतरित करावी.

ड. बाह्य देयतांच्या कारणामुळे न्यूनता / तूट उद्भवते म्हणून ते खाते देयता खात्याला स्थानांतरित केले जात असते.

इ. संस्थेजवळ उपलब्ध असलेली रोख रक्कम जसे आरंभीची शिल्लक संपत्तीच्या विक्रीची रक्कम, भागीदारांच्या खाजगी संपत्तीतून प्राप्त रक्कम सर्व तृतीय पक्षांना त्यांच्या देयतांच्या प्रमाणात वाटली जाते. त्याचप्रमाणे देयतांची पूर्णपणे परतफेड होत नाही परंतु त्या शक्य त्या मर्यादेपर्यंत परतफेड केल्या जातात.

१. खालील ताळेबंद रूपाली, दीपाली आणि मिताली यांच्या भागीदारीची असून हे भागीदार २:२:१ या प्रमाणात नफा-तोटा वाटून घेतात. ३१ मार्च २०१८ रोजी त्यांच्या भागीदारीचे विसर्जन झाले.

**ताळेबंद ३१ मार्च २०१८ रोजीचा**

| देयता | रक्कम ₹ | संपत्ती | रक्कम ₹ |
|---|---|---|---|
| भांडवल खाते : | | स्थिर संपत्ती | २,१८,००० |
| रूपाली | ६०,००० | ख्याती | ६०.००० |
| दीपाली | ४०,००० | मालसाठा (स्कंध) | १,२०,००० |
| विविध धनको | २,४०,००० | रोख | २,००० |
| बँक कर्ज - (स्कंध तारण ठेऊन) | १,००,००० | भांडवल खाते : मिताली | ४०,००० |
| | ४,४०,००० | | ४,४०,००० |

**विसर्जनवेळी संपत्तीचे रोखीकरण खालीलप्रमाणे झाले.**

स्थिर संपत्ती ₹ १,८०,००० ला विकण्यात आली आणि मालसाठ्याचे रोखीकरण ₹ १,०४,००० झाले. रोखीकरण खर्च ₹ ६,००० देण्यात आला.

**भागीदारीचे सर्व भागीदार नादार झाले असे गृहीत धरून रोखीकरण खाते, भागीदारांचे भांडवल खाते, बँक खाते, विविध धनको खाते, बँक कर्ज खाते आणि तूट खाते तयार करा.**

**उत्तर १**

**रूपाली, दीपाली आणि मिताली यांच्या पुस्तकात**

**नावे** **रोखीकरण खाते** **जमा.**

| तपशील | रक्कम (₹) | रक्कम (₹) | तपशील | रक्कम (₹) | रक्कम (₹) |
|---|---|---|---|---|---|
| विविध संपत्ती खाते : | | | बँक खाते : | | १,८०,००० |
| स्थिर संपत्ती | २,१८,००० | | (स्थिर संपत्ती विक्री) | | |
| ख्याती | ६०,००० | | बँक खाते : | | १,०४,००० |
| मालसाठा (स्कंध) | १,२०,००० | ३,९८,००० | मालसाठ्याचे (स्कंध) | | |
| बँक खाते : | | | रोखीकरण | | |
| (रोखीकरण खर्च) | | ६,००० | भागीदारांचे भांडवल खाते : | | |
| | | | (रोखीकरणावरील तोटा स्थानांतरित) | | |
| | | | रूपाली | ४८,००० | |
| | | | दीपाली | ४८,००० | |
| | | | मिताली | २४,००० | १,२०,००० |
| | | ४,०४,००० | | | ४,०४,००० |

| नावे. | | | भागीदारांचे भांडवल खाते | | | | जमा. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **तपशील** | **रूपाली (₹)** | **दीपाली (₹)** | **मिताली (₹)** | **तपशील** | **रूपाली (₹)** | **दीपाली (₹)** | **मिताली (₹)** |
| शिल्लक खाली आणली | | | ४०,००० | शिल्लक खाली आणली | ६०,००० | ४०,००० | |
| रोखीकरण खाते | ४८,००० | ४८,००० | २४,००० | तूट / न्यूनता खाते | | ८,००० | ६४,००० |
| (रोखीकरणावरील तोटा) | | | | | | | |
| तूट / न्यूनता खाते) | १२,००० | | | | | | |
| | ६०,००० | ४८,००० | ६४,००० | | ६०,००० | ४८,००० | ६४,००० |

नावे **बँक खाते** जमा.

| तपशील | रक्कम ₹ | तपशील | रक्कम ₹ |
|---|---|---|---|
| शिल्लक खाली आणली | २,००० | रोखीकरण खाते | ६,००० |
| रोखीकरण खाते | १,८०,००० | बँक कर्ज खाते | १,००,००० |
| रोखीकरण खाते | १,०४,००० | धनकोचे खाते | १,८०,००० |
| | २,८६,००० | | २,८६,००० |

नावे **धनकोंचे खाते** जमा.

| तपशील | रक्कम ₹ | तपशील | रक्कम ₹ |
|---|---|---|---|
| बँक खाते | १,८०,००० | शिल्लक खाली आणली | २,४०,००० |
| तूट खाते (न्यूनता खाते) | ६०,००० | | |
| | २,४०,००० | | २,४०,००० |

नावे **बँक कर्ज खाते** जमा.

| तपशील | रक्कम ₹ | तपशील | रक्कम ₹ |
|---|---|---|---|
| बँक खाते (कर्जाचे शोधन) | १,००,००० | शिल्लक खाली आणली | १,००,००० |
| | १,००,००० | | १,००,००० |

नावे **न्यूनता किंवा तूट खाते** जमा.

| तपशील | रक्कम ₹ | तपशील | रक्कम ₹ |
|---|---|---|---|
| दीपालीचे भांडवल खाते | ८,००० | रूपालीचे भांडवल खाते | १२,००० |
| मितालीचे भांडवल खाते | ६४,००० | धनकोचे खाते | ६०,००० |
| | ७२,००० | | ७२,००० |

**टिप :** बँकेचे कर्ज हे मालसाठा तारणावर घेतलेले सुरक्षित कर्ज होते. म्हणून विसर्जन झाल्यानंतर बँक कर्जाचे शोधन मालसाठ्याच्या रोखीकरणातून करण्यात आले.

२. मे. राणे, काणे आणि माने यांच्या भागीदारीचा ३१ मार्च २०१९ रोजीचा ताळेबंद खालीलप्रमाणे आहे.

**ताळेबंद ३१ मार्च २०१९ रोजीचा**

| देयता | रक्कम ₹ | संपत्ती | रक्कम ₹ |
|---|---|---|---|
| भांडवल खाते : | | फर्निचर | ६,००० |
| राणे | १०,००० | ऋणको | ४०,००० |
| काणे | ६,००० | मालसाठा (स्कंध) | ४८,००० |
| विविध धनको | ८०,००० | रोख | २,००० |
| राणेचे कर्ज | २०,००० | भांडवल खाते – माने | २०,००० |
| | **१,१६,०००** | | **१,१६,०००** |

धनकोचे शोधन करण्यास भागीदारी असमर्थ असल्याने भागीदारी संस्था विसर्जित करण्यात आली. काणे आणि माने यांनी काहीही शोधन केलेले नाही. राणेच्या खाजगी संपत्तीतून फक्त ₹ ३,००० वसूल झाले. मालसाठा ₹ ३०,०००. , ऋणको ₹ ३२,००० आणि फर्निचर फक्त ₹ २,००० ला विकण्यात आले. तसेच ₹ ६,००० रोखीकरण खर्च करण्यात आला.

**भागीदारी संस्थेची हिशोब पुस्तके बंद करण्यासाठी रोखीकरण खाते, भागीदारांचे भांडवल खाते, रोख खाते, धनकोंचे खाते, न्यूनता खाते तयार करा.**

**उत्तर**

**राणे, काणे आणि माने यांच्या पुस्तकात**

**नावे.** **रोखीकरण खाते** **जमा.**

| तपशील | रक्कम (₹) | रक्कम (₹)) | तपशील | रक्कम (₹) | रक्कम (₹)) |
|---|---|---|---|---|---|
| विविध संपत्ती खाते : | | | बँक खाते : | | |
| फर्निचर | ६,००० | | मालसाठा (स्कंध) | ३०,००० | |
| ऋणको | ४०,००० | | ऋणको | ३२,००० | |
| मालसाठा | ४८,००० | ९४,००० | फर्निचर | २,००० | ६४,००० |
| बँक खाते : (रोखीकरण खर्च) | | ६,००० | भागीदारांचे भांडवल खाते : | | |
| | | | (रोखीकरणावरील तोटा स्थानांतर) | | |
| | | | राणे | १२,००० | |
| | | | काणे | १२,००० | |
| | | | माने | १२,००० | ३६,००० |
| | | **१,००,०००** | | | **१,००,०००** |

**नावे** **भागीदारांचे भांडवल खाते** **जमा.**

| तपशील | राणे (₹) | काणे (₹) | माने (₹) | तपशील | राणे (₹)) | काणे (₹) | माने (₹) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| शिल्लक खाली आणली | | | २०,००० | शिल्लक खाली आणली | १०,००० | ६,००० | |
| रोखीकरण खाते | १२,००० | १२,००० | १२,००० | राणेचे कर्ज खाते | २०,००० | | |
| (रोखीकरणावरील तोटा) | | | | रोकड / रोख खाते | ३,००० | | |
| तूट खाते | २१,००० | | | तूट खाते | | ६,००० | ३२,००० |
| | **३३,०००** | **१२,०००** | **३२,०००** | | **३३,०००** | **१२,०००** | **३२,०००** |

नावे. **रोकड खाते** जमा.

| तपशील | रक्कम ₹ | तपशील | रक्कम ₹ |
|---|---|---|---|
| शिल्लक खाली आणली | २,००० | रोखीकरण खाते | ६,००० |
| राणेंचे भांडवल खाते | ३,००० | धनकोंचे खाते | ६३,००० |
| रोखीकरण खाते | ६४,००० | | |
| | ६९,००० | | ६९,००० |

नावे. **धनकोंचे खाते** जमा.

| तपशील | रक्कम ₹ | तपशील | रक्कम ₹ |
|---|---|---|---|
| रोकड / रोख खाते | ६३,००० | शिल्लक खाली आणली | ८०,००० |
| न्यूनता / तूट खाते | १७,००० | | |
| | ८०,००० | | ८०,००० |

नावे. **न्यूनता / तूट खाते** जमा.

| तपशील | रक्कम ₹ | तपशील | रक्कम ₹ |
|---|---|---|---|
| काणेचे भांडवल खाते | ६,००० | राणेचे भांडवल खाते | २१,००० |
| मानेचे भांडवल खाते | ३२,००० | धनकोचे खाते | १७,००० |
| | ३८,००० | | ३८,००० |

३. दिनेश, मंगेश आणि रमेश २:२:१ या प्रमाणात नफा-तोटा वाटून घेणारे भागीदार आहेत. त्यांनी ३१ मार्च २०१८ रोजी भागीदारी संस्था विसर्जित करण्याचे ठरविले.

**ताळेबंद ३१ मार्च २०१८ रोजीचा**

| देयता | राशी ₹ | संपत्ती | राशी ₹ |
|---|---|---|---|
| भांडवल खाते : | | इमारत | ७८,००० |
| दिनेश | २६,००० | संगणक | ४५,००० |
| मंगेश | २२,००० | ऋणको | २०,००० |
| रमेश | १८,००० | ख्याती | ३५,००० |
| धनको | ८०,००० | बँक शिल्लक | ८,००० |
| देयविपत्र | ४०,००० | | |
| | १,८६,००० | | १,८६,००० |

**वरील तारखेला भागीदारीचे विसर्जन झाले आणि भागीदारीच्या संपत्तीच्या रोखीकरणाचा परिणाम खालीलप्रमाणे.**

१. इमारत ₹ ४०,०००, संगणक ₹ ३०,०००, ऋणको ₹ १०,००० याप्रमाणे रोखीकरण झाले.

२. रोखीकरणाचा खर्च ₹ २,००० आला.

३. सर्व भागीदार नादार म्हणून घोषित झाले दिनेश कडून ₹ २,००० व मंगेशकडून ₹ २,००० वसूल झाले.

**वरील खाती बंद करण्यासाठी आवश्यक खाती तयार करा.**

उत्तर ३

## दिनेश, मंगेश आणि रमेश यांच्या पुस्तकात

नावे **रोखीकरण खाते** जमा

| तपशील | रक्कम (₹) | रक्कम (₹) | तपशील | रक्कम (₹) | रक्कम (₹) |
|---|---|---|---|---|---|
| विविध संपत्ती : | | | बँक खाते : | | |
| इमारत | ७८,००० | | इमारत | ४०,००० | |
| संगणक | ४५,००० | | संगणक | ३०,००० | |
| ऋणको | २०,००० | | ऋणको | १०,००० | ८०,००० |
| ख्याती | ३५,००० | १,७८,००० | भागीदारांचे भांडवल खाते : | | |
| बँक खाते | | | (रोखीकरणावरील तोटा स्थानांतरित) | | |
| (रोखीकरण खाते) | | २,००० | दिनेश | ४०,००० | |
| | | | मंगेश | ४०,००० | |
| | | | रमेश | २०,००० | १,००,००० |
| | | १,८०,००० | | | १,८०,००० |

नावे **भागीदारांचे भांडवल खाते** जमा

| तपशील | दिनेश (₹) | मंगेश (₹) | रमेश (₹) | तपशील | दिनेश (₹) | मंगेश (₹) | रमेश (₹) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| रोखीकरण खाते | ४०,००० | ४०,००० | २०,००० | शिल्लक खाली आणली | २६,००० | २२,००० | १८,००० |
| (तोटा ) | | | | बँक खाते | २,००० | २,००० | |
| | | | | तूट / न्यूनता खाते | १२००० | १६,००० | २,००० |
| | ४०,००० | ४०,००० | २०,००० | | ४०,००० | ४०,००० | २०,००० |

नावे **बँक खाते** जमा

| तपशील | रक्कम ₹ | तपशील | रक्कम ₹ |
|---|---|---|---|
| शिल्लक खाली आणली | ८,००० | रोखीकरण खाते | २,००० |
| रोखीकरण खाते (वसूली) | ८०,००० | धनकोचे खाते | ६०,००० |
| दिनेशचे भांडवल खाते | २,००० | देयविपत्र खाते | ३०,००० |
| मंगेशचे भांडवल खाते | २, ००० | | |
| | ९२,००० | | ९२,००० |

नावे **धनकोचे खाते** जमा

| तपशील | रक्कम ₹ | तपशील | रक्कम ₹ |
|---|---|---|---|
| बँक खाते | ६०,००० | शिल्लक खाली आणली | ८०,००० |
| न्यूनता / तूट खाते | २०,००० | | |
| | ८०,००० | | ८०,००० |

नावे. **देयविपत्र खाते** जमा.

| तपशील | रक्कम ₹ | तपशील | रक्कम ₹ |
|---|---|---|---|
| बँक खाते | ३०,००० | शिल्लक खाली आणली | ४०,००० |
| न्यूनता / तूट खाते | १०,००० | | |
| | ४०,००० | | ४०,००० |

नावे. **तूट/ न्यूनता खाते** जमा.

| तपशील | रक्कम ₹ | तपशील | रक्कम ₹ |
|---|---|---|---|
| भागीदारांचे भांडवल खाते : | | धनकोंचे खाते | २०,००० |
| दिनेश | १२,००० | देयविपत्र खाते | १०,००० |
| मंगेश | १६,००० | | |
| रमेश | २,००० | | |
| | ३०,००० | | ३०,००० |

## स्वाध्याय : ६

### प्र.१ वस्तुनिष्ठ प्रश्न (Objective Questions)

**अ) खालील दिलेल्या पर्यायामधून योग्य पर्यायाची निवड करा व विधाने पूर्ण लिहा.**

१) संस्था विसर्जनाच्यावेळी संपत्ती आणि देयता ............ खात्यात स्थानांतरित होतात.
(अ) बँक (ब) भागीदारांचे भांडवल
(क) रोखीकरण (ड) भागीदारांचे चालू

२) विसर्जन खर्च हा ............ खात्याला जमा केला जातो.
(अ) रोखीकरण (ब) रोख/ बँक
(क) भागीदारांचे भांडवल (ड) भागीदारांचे कर्ज

३) दिवाळखोर / नादार भागीदाराची तूट / न्यूनता सक्षम भागीदार ............ वाटून घेतात.
(अ) भांडवलाच्या प्रमाणात (ब) नफा तोटा प्रमाणात
(क) विक्री प्रमाणात (ड) तरलता प्रमाणात

४) जर एखाद्या भागीदाराने भागीदारी संस्थेची एखादी संपत्ती ठेऊन घेतली तर त्याचे भांडवल खाते ............ केले जाते.
(अ) जमा (ब) नावे
(क) अधिक (ड) विभाजित

५) नोंद न केलेली देयता विसर्जनाच्यावेळी शोधन केली तर ............ नावे केले जाते.
(अ) रोख / बँक खाते (ब) रोखीकरण खाते
(क) भागीदारांचे भांडवल (ड) कर्ज खाते

६) भागीदारी संस्था पूर्णपणे विसर्जित होते जेव्हां भागीदार ............ होतात.
(अ) सक्षम (ब) दिवाळखोर / नादार
(क) धनको (ड) ऋणको

७) संपत्ती आणि देयता ह्या रोखीकरण / खात्यात त्यांच्या ............. मूल्यावर स्थानांतरित होतात.

(अ) बाजार (ब) खरेदी

(क) विक्री (ड) पुस्तकी

८) जर दोनपेक्षा कमी भागीदार हे भागीदारी संस्थेत उरले असतील तर ती संस्था ............. होते

(अ) विसर्जित (ब) स्थापित

(क) रोखीकृत (ड) पुनर्रचना

९) संपत्तीची विक्री झाल्यास रोखीकरण खाते ............. केले जाते.

(अ) नावे (ब) जमा

(क) रोखीकृत (ड) बंद

१०) भागीदारी संस्थेच्या ............. वेळी भागीदारीचे सर्व कार्य बंद होतात.

(अ) विसर्जन (ब) प्रवेश

(क) निवृत्ती (ड) मृत्यू

**ब) खालील विधानासाठी एक शब्द/ संज्ञा/ शब्दसमूह लिहा.**

१) रोखीकरण खात्याची नावे शिल्लक.

२) भागीदारीचा व्यवसाय संपुष्टात येणे.

३) संपत्तीची विक्री व देयतांचे शोधनवरील नफा-तोटा शोधून काढण्यासाठी तयार केले जाणारे खाते.

४) दिवाळखोर भागीदारांचे भांडवल खात्याची नावे शिल्लक.

५) रोखीकरण खात्याची जमा शिल्लक.

६) भागीदारी संस्थेच्या विसर्जनप्रसंगी संपत्तीचे रोख रकमेत रूपांतर होणे.

७) भविष्यात एखाद्या प्रसंगी अचानक उद्‌भवणारी देयता.

८) हिशोबाच्या लेखापुस्तकात नोंद नसलेली संपत्ती.

९) संपत्तीचे रोखीकरण आणि देयतांचे शोधन दर्शविणारे खाते.

१०) भागीदारी विसर्जनाच्या वेळी होणारा खर्च

**क) खालील विधाने चूक की बरोबर ते सकारण लिहा.**

१) भागीदार निवृत्त झाल्यावर भागीदारी संस्था आपोआप विसर्जित होते.

२) विसर्जनाच्यावेळी रोख/ बँक खाते आपोआप बंद होते.

३) विसर्जनाच्यावेळी अधिकोष अधिविकर्ष ( Bank Overdraft)रोखीकरण खात्याला स्थानांतरित होते.

४) सक्षम भागीदारांच्या भांडवल खात्याची नावे शिल्लक असल्यास दिवाळखोर भागीदारांची भांडवल न्यूनता/ तूट ते वाटून घेत नाही.

५) भागीदारी संस्था विसर्जनप्रसंगी भागीदारीची सर्व संपत्ती रोखीकरण खात्याला स्थानांतरित करतात.

६) दिवाळखोर / नादार भागीदाराच्या भांडवल खात्याच्या नावे शिलकेला भांडवलाची न्यूनता / तूट असे म्हणतात.

७) भागीदारी संस्था विसर्जनप्रसंगी भागीदारांचे कर्ज रोखीकरण खात्याला स्थानांतरित करतात.

८) जेव्हा भागीदारांमधील संबंध संपुष्टात येतात तेव्हा विसर्जन होते.

९) दिवाळखोरीचा तोटा भागीदारी संस्था विसर्जनाच्यावेळी सक्षम भागीदार त्यांच्या नफा-तोट्याच्या प्रमाणात वाटून घेतात.

१०) रोखीकरणावरील तोटा दिवाळखोर / नादार भागीदारांच्या भांडवल खात्याला स्थानांतरित केला जात नाही.

**ड) सोडवा –**

१) विनोद, विजय आणि विशाल एका भागीदारी संस्थेचे भागीदार अजून ते ३ : २ : १ या प्रमाणात नफा–तोटा वाटून घेतात. विशाल नादार झाल्यामुळे त्याच्या भांडवल खात्यात ₹ ६,००० तूट दिसून येते, ही तूट सक्षम भागीदारात विभाजित करावी.

२) धनको ₹ ३०,०००, देयविपत्र ₹ २०,००० आणि बँक कर्ज ₹ १०,००० उपलब्ध बँक शिल्लक ₹ ४०,००० जर सर्व भागीदार नादार झाल्यास धनकोना किती रक्कम मिळेल.

३) नादार भागीदारांच्या भांडवल खात्याची नावे बाजूची एकूण बेरीज ₹ १०,००० आणि जमाबाजूची एकूण बेरीज ₹ ६,००० आहे, भांडवलाची तूट शोधून काढा.

४) नादार भागीदाराच्या भांडवल खात्याची नावे बाजू ₹ १५,००० आहे. आणि नादार भागीदार ₹ ६,००० रोख आणतात. नादार भागीदाराची वाटपाची भांडवलाची तूट शोधून काढा.

५) रोखीकरणावरिल नफा ₹ ६,००० आहे. सर्व भागीदारांचे नफा–तोटा वाटपाचे प्रमाण ३ : २ : १ असे आहे. भागीदाराच्या भांडवल खात्याला जमा बाजूला स्थानांतरित होणारा रोखीकरणावरील नफा शोधून काढा.

**इ) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) भागीदारीचे विसर्जन म्हणजे काय?

२) रोखीकरण खाते केव्हां उघडले जाते ?

३) रोखीकरण खात्याला कोणत्या प्रकारचे खाते स्थानांतरित केले जाते?

४) दिवाळखोर / नादार व्यक्ती कोणाला म्हटले जाते?

५) भांडवलाची तूट म्हणजे काय?

६) रोखीकरण खात्यावरील शिल्लक कोणत्या प्रमाणात भागीदारांच्या भांडवल / चालू खात्याला स्थानांतरित केली जाते?

७) नादार भागीदाराच्या भांडवल खात्यावरील तूट कोणाला सहन करावी लागते?

८) भागीदाराचे कर्ज परतफेड केल्यास कोणते खाते नावे केले जाते?

९) विसर्जन खर्चाचे शोधन झाल्यानंतर कोणते खाते नावे केले जाते?

**फ) खालील कोष्टके पूर्ण करा.**

| | | | |
|---|---|---|---|
| १) | रोखीकरण खात्याच्या नावे बाजूची बेरीज. ₹ २०,००० | रोखीकरण खात्याची जमा बाजूची बेरीज ? | रोखीकरणावरील तोटा ₹ ४,००० |
| २) | धनको ₹ १६,००० | देयविपत्र ₹ १२,००० | बाह्यदेयता ? |
| ३) | रोखीकरण खात्याची जमा बाजूची बेरीज ₹ २१,००० | रोखीकरण खात्याची नावे बाजूची बेरीज ₹ १६,००० | रोखीकरणावरील नफा ? |
| ४) | भांडवल खात्याची नावे बाजूची बेरीज ₹ ५१,००० | भांडवल खात्याच्या जमा बाजूची बेरीज ? | भागीदाराने आणलेली रोख रक्कम ₹ १७,००० |
| ५) | भांडवलाची तूट ₹ ? | नादार भागीदाराने आणलेली रक्कम ₹ ७,००० | नादारीमुळे तोटा ₹ २१,००० |

## प्रात्यक्षिक उदाहरणे

**१. गणेश आणि कार्तिक समान प्रमाणात नफातोटा वाटून घेणारे भागीदार आहेत. ३१ मार्च २०१८ रोजी त्यांनी भागीदारी संस्था विसर्जित करण्याचे ठरविले. तेव्हा त्यांचा ताळेबंद खालील प्रमाणे होता.:**

**ताळेबंद ३१ मार्च २०१८ रोजीचा**

| देयता | रक्कम ₹ | संपत्ती | रक्कम ₹ |
|---|---|---|---|
| धनको | १८,४०० | इमारत | ८८,००० |
| देयविपत्रे | ५,६०० | उपस्कर | १२,००० |
| राखीव निधी | २०,००० | ऋणको | ३२,००० |
| भांडवल खाते: | | स्कंध | २४,००० |
| गणेश | ४०,००० | प्राप्य विपत्रे | ४,००० |
| कार्तिक | ८०,००० | रोख | ४,००० |
| | १,६४,००० | | १,६४,००० |

**संपत्तीचे रोखीकरण खालीलप्रमाणे झाले :**

इमारत ₹ ८२,०००, ऋणको ₹ २२,०००, स्कंध ₹ २०,०००. प्राप्त विपत्रे ₹ ३,२०० आणि गणेशने उपस्कर ₹ १०,०००. ला ठेऊन घेण्याचे मान्य केले. रोखीकरणाचा खर्च ₹ २,००० आला.

**भागीदारी संस्थेच्या पुस्तकात रोखीकरण खाते, भागीदाराचे भांडवल खाते आणि रोख खाते तयार करा.**

**उत्तर :** रोखीकरण खात्यावरील तोटा – ₹ २४,८००, रोकड खाते – ₹ १,३१,२००, गणेशला रोख दिले – ₹ २७,६०० आणि कार्तिकला रोख दिले – ₹ ७७,६००

**२. लिला, मंदा आणि कुंदा हे 'जानकी स्टोअर्स' या संस्थेचे भागीदार आहेत. ते अनुक्रमे ३:२:१ या प्रमाणात नफा–तोटा वाटून घेतात. त्यांनी ३१ मार्च २०१८ रोजी भागीदारी संस्था विसर्जित करण्याचे ठरविले. त्यांच्या भागीदारीचा त्याच दिवशी ताळेबंद खालीलप्रमाणे होता.**

**ताळेबंद ३१ मार्च २०१८ रोजीचा**

| देयता | रक्कम ₹ | संपत्ती | रक्कम ₹ |
|---|---|---|---|
| धनको | २८,८०० | इमारत | १,०२,००० |
| देयविपत्र | २१,६०० | सयंत्र | ७३,००० |
| भांडवल खाते : | | मोटारकार | १,६७,६०० |
| लिला | २,२७,१६० | ख्याती | ४५,६०० |
| मंदा | १,४४,००० | गुंतवणूक | ६२,४०० |
| कुंदा | १,०८,००० | ऋणको | ३०,६०० |
| | | स्कंध | ४५,००० |
| | | बँक | ३,३६० |
| | **५,२९,५६०** | | **५,२९,५६०** |

लिलाने ₹ १,२३,६०० ला इमारत ठेऊन घेतली. मंदाने पुस्तकी मूल्यांना ख्याती, स्कंध आणि ऋणको ठेऊन घेतले. तसेच धनको आणि देयविपत्राचे शोधन करण्याचे मान्य केले. मोटारकार आणि संयंत्राचे अनुक्रमे ₹ १,५१,०८० व ₹ ३१,६८० या मूल्याला रोखीकरण झाले. कुंदाने ₹ ५५,४४० ला गुंतवणूक ठेऊन घेतले. रोखीकरण खर्च ₹ ६,८०० आला.

**जानकी स्टोअर्सच्या पुस्तकात रोजकीर्द नोंदी द्या.**

उत्तर : रोखीकरण तोटा – ₹ ५०,०००, लिला – ₹ ७८,५६०, मंदा – ₹ ५६,५३३ आणि कुंदा – ₹ ४४,२२७.

३. **शैलेश आणि शशांक ३:२ प्रमाणात नफा–तोटा विभागून घेणारे भागीदार आहेत. त्यांचा ३१ मार्च २०१९ रोजीचा ताळेबंद खालीलप्रमाणे आहे. :**

**ताळेबंद ३१ मार्च २०१९.**

| देयता | रक्कम ₹ | संपत्ती | रक्कम ₹ |
|---|---|---|---|
| भांडवल खाती : | | इमारत | ७,००० |
| शैलेश | १०,००० | यंत्र | ९,००० |
| शशांक | ६,००० | ऋणको | १४,००० |
| चालू खाती : | | स्कंध | ५,००० |
| शैलेश | ३,००० | बँक | ६,००० |
| शशांक | २,००० | | |
| धनको | १७,४०० | | |
| देयविपत्र | २,६०० | | |
| | **४१,०००** | | **४१,०००** |

**वरील दिनांकाला व्यवसाय संस्था बंद झाली आणि संपत्तीचा विक्रय खालीलप्रमाणे होता :**

१. यंत्र ₹ ८,०००, इमारत ₹ ६,०००, स्कंध ₹ ४,००० आणि ऋणको ₹ १२,०००.

२. देयविपत्राचे शोधन करण्याचे शैलेशने मान्य केले.

३. धनकोंना पूर्ण शोधन केले

४. विसर्जनाचा खर्च ₹ १,४००.

**तयार करा : रोखीकरण खाते, भागीदारांचे चालू खाते, भागीदारांचे भांडवल खाते व बँक खाते**

उत्तर : रोखीकरणावरील तोटा – ₹ ६,४००, बँक खाते – ₹ ३६,०००, शैलेशचे भांडवल – ₹ ११,७६०, शंशाकचे भांडवल – ₹ ५,४४०

४. **आशा, उषा आणि निशा हे भागीदार असून २:२:१ या प्रमाणात नफा–तोटा वाटून घेतात. त्यांच्या भागीदारीचा ३१ मार्च २०१९ रोजीचा ताळेबंद खालील प्रमाणे आहे.**

**ताळेबंद ३१ मार्च २०१९ रोजीचा**

| देयता | रक्कम ₹ | रक्कम ₹ | संपत्ती | रक्कम ₹ | रक्कम ₹ |
|---|---|---|---|---|---|
| भांडवल खाते : | | | यंत्र | | १,००,००० |
| आशा | | १,२०,००० | गुंतवणूक | | ४८,००० |
| उषा | | ४०,००० | ऋणको | १,१०,००० | |
| निशा | | ४०,००० | (–) बुडीत कर्ज निधी | ६,००० | १,०४,००० |
| सामान्य निधी / संचिती | | १२,००० | स्कंध | | ४०,००० |
| धनको | | ८०,००० | नफा–तोटा खाते | | ३६,००० |
| आशाचे कर्ज खाते | | १६,००० | बँक | | ८,००० |
| देयविपत्र | | २८,००० | | | |
| | | ३,३६,००० | | | ३,३६,००० |

**वरील तारखेला भागीदारांनी संस्था विसर्जित करण्याचे ठरविले.**

१. संपत्तीचे रोखीकरण यंत्र ₹ ९०,०००, स्कंध ₹ ३६,०००, गुंतवणूक ₹ ४२,००० आणि ऋणको ₹ ९०,०००.

२. विसर्जन खर्च ₹ ६,०००.

३. संस्थेच्या ख्यातीचे रोखीकरण ₹ ४८,०००.

**रोजकीर्द नोंदी देऊन संस्थेचे खाते बंद करा.**

**उत्तर :** रोखीकरणावरील नफा – ₹ ८,०००, आशाचे भांडवल – ₹ १,१३,६००, उषा – ₹ ३३,६०० निशा – ₹ ३६,८००

५. **सीता आणि गीता हे एका भागीदारी संस्थेचे भागीदार असून ते ४:१ या प्रमाणात नफा–तोटा वाटून घेतात. त्यांनी ३१ मार्च २०२० रोजी भागीदारी विसर्जित करण्याचे ठरविले. त्यांच्या भागीदारीचा त्याच दिवशीचा ताळेबंद खालील प्रमाणे होता.**

**ताळेबंद ३१ मार्च २०२० रोजीचा**

| देयता | रक्कम ₹ | रक्कम ₹ | संपत्ती | रक्कम ₹ | रक्कम ₹ |
|---|---|---|---|---|---|
| भांडवल खाते : | | | फर्निचर | | १४,००० |
| सीता | | ९०,००० | सयंत्र | | ६५,००० |
| गीता | | ४०,००० | बोधचिन्ह | | ८,००० |
| विविध धनको | | ३५,००० | विविध ऋणको | ४८,००० | |
| बँक कर्ज | | १५,००० | – बुडीत कर्ज निधी | ३,००० | ४५,००० |
| | | | मालसाठा (स्कंध) | | ३०,००० |
| | | | हस्तस्थ रोख | | १०,००० |
| | | | निलंबन जाहिरात | | ८,००० |
| | | **१,८०,०००** | | | **१,८०,०००** |

**रोखीकरणाचे परिणाम पुढीलप्रमाणे दिसून आले.**

१. सीताने सयंत्र आणि मालसाठा अनुक्रमे ₹ ७८,०००, आणि ₹ २२,००० ला स्वत: ठेऊन घेतला.

२. ऋणको पुस्तकी मूल्याच्या ९० % रोखीकृत झाले आणि बोधचिन्ह ₹ ५,००० आणि ख्यातीचे ₹ ७,००० ला रोखीकरण झाले.

३. नोंद न केलेली संपत्तीची अनुमानित मूल्य ₹ ४,५०० होती पण ती फक्त ₹ १,५०० ला विकण्यात आली.

४. जेव्हा धनकोचे शोधन केले जाईल तेव्हा ₹ १,००० कपात करण्याची परवानगी धनकोकडून मिळालेली आहे.

५. रोखीकरण खर्च ₹ ३,५०० झाला.

**तयार करा : रोखीकरण खाते, रोकड खाते आणि भागीदारांचे भांडवल खाते.**

**उत्तर :** रोखीकरणावरील तोटा – ₹ ७,८००, रोकड खाते – ₹ ८९,३४०, सीताकडून रक्कम मिळाली – ₹ २२,६४०
गीताला रक्कम दिली – ₹ ३६,८४०

६. **संगीता, अनिता आणि स्मिता हे २:२:१ या प्रमाणात नफा–तोटा वाटून घेणारे भागीदार आहेत. त्यांच्या भागीदारीचा ३१ मार्च २०१९ रोजीचा ताळेबंद खालीलप्रमाणे होता.**

**ताळेबंद ३१ मार्च २०१९ रोजीचा**

| देयता | रक्कम ₹ | संपत्ती | रक्कम ₹ |
|---|---|---|---|
| भांडवल खाते : | | जमीन | २,१०,००० |
| संगीता | ६०,००० | सयंत्र | २०,००० |
| अनिता | ४०,००० | ख्याती | १५,००० |
| स्मिता | ३०,००० | ऋणको | १,२५,००० |
| संध्याचे कर्ज खाते | १,२०,००० | कर्ज आणि अग्रीम | १५,००० |
| विविध धनको | १,२०,००० | बँक | ५,००० |
| देयविपत्र | २०,००० | | |
| | **३,९०,०००** | | **३,९०,०००** |

**त्यांनी भागीदारी संस्था विसर्जित करण्याचे ठरविले.**

१. संपत्तीचे रोखीकरण जमीन ₹ १,८०,०००; ख्याती ₹ ७५,०००. कर्ज आणि अग्रीम मधून ₹ १२,००० वसूल झाले तर ऋणकोपैकी १०% ऋणको बुडीत निघाले.

२. संगीताने पुस्तकी मूल्याला सयंत्र ठेऊन घेतले.

३. धनको आणि देयविपत्राचे शोधन ५% कसरीवर करण्यात आले.

४. संध्याचे कर्ज ₹ ६,००० व्याजासहित फेडण्यात आले.

५. विपत्रातून निर्माण झालेली आकस्मित देयता कसरी सहित ₹ १,००,००० होती. यापैकी एक विपत्रधारक ₹ २०,००० चे विपत्र असलेला नादार झाला.

**वरील माहितीच्या आधारे रोखीकरण खाते, भागीदारांचे भांडवल खाते आणि बँक खाते तयार करा.**

**उत्तर :** रोखीकरण खाते – ₹ ४,५००, बँक खाते – ₹ ३,८४,५००, रक्कम दिली संगीता – ₹ ३८,२००, अनिता – ₹ ३८,२००, स्मिता – ₹ २९,१००

७. **साईश, सुमित आणि हेमंत एका भागीदारी संस्थेचे भागीदार असून २:२:१ या प्रमाणात नफा–तोटा वाटून घेतात. त्यांनी ३१ मार्च २०१९ रोजी भागीदारी संस्था विसर्जित करण्याचे ठरविले. त्यांच्या भागीदारीचा वरील तारखेचा ताळेबंद खालीलप्रमाणे आहे.**

**ताळेबंद ३१ मार्च २०१९.**

| देयता | रक्कम ₹ | रक्कम ₹ | संपत्ती | रक्कम ₹ | रक्कम ₹ |
|---|---|---|---|---|---|
| भांडवल खाते : | | | सयंत्र | | १,२०,००० |
| साईश | ९०,००० | | ऋणको | | ४५,००० |
| सुमित | ६०,००० | | मालसाठा (स्कंध) | | ७५,००० |
| हेमंत | ३०,००० | १,८०,००० | | | |
| कर्ज | | १२,००० | | | |
| विविध धनको | | ९,००० | | | |
| अधिकोष अधिविकर्ष | | ३९,००० | | | |
| | | **२,४०,०००** | | | **२,४०,०००** |

**त्यांनी खालील गोष्टी कबूल केल्या.**

१. साईशने कर्जाचे शोधन करून पुस्तकी मूल्यास ऋणको ठेऊन घेतले.

२. सयंत्र ₹ १,३५,००० ला रोखीकृत झाले.

३. मालसाठा (स्कंध) ₹ ७२,००० ला रोखीकृत झाले.

४. धनकोंचे शोधन ₹ ४५ कसरीने केले.

**रोखीकरण खाते, भागीदारांचे भांडवल खाते आणि बँक खाते तयार करा.**

उत्तर : रोखीकरणावरील नफा – ₹ १२,०४५, बँक खाते एकूण बेरीज – ₹ २,०७,०००, रक्कम दिली साईश – ₹ ६१,८१८, सुमीत – ' ६४,८१८, हेमंत – ₹ ३२,४०९

**जेव्हां एक भागीदार नादार झाल्यास**

८. **सीताराम, गंगाराम आणि राजाराम हे ४:२:३ या प्रमाणात नफा–तोटा वाटून घेणारे भागीदार आहेत. १ एप्रिल २०१९ रोजी त्यांनी भागीदारीचे विसर्जन करण्याचे ठरविले. त्यांच्या भागीदारीचा ताळेबंद खालीलप्रमाणे होता. :**

**ताळेबंद ३१ मार्च २०१९ रोजीचा**

| देयता | रक्कम ₹ | संपत्ती | रक्कम ₹ |
|---|---|---|---|
| भांडवल खाते : | | इमारत | ५५,००० |
| सीताराम | ६५,००० | यंत्र | २५,००० |
| गंगाराम | ४५,००० | फर्निचर | १२,००० |
| राजाराम | ७,००० | गुंतवणूक | १५,००० |
| संचित निधी | १८,००० | प्राप्त विपत्र | ३,५०० |
| नफा–तोटा खाते | ५,४०० | विविध ऋणको | २१,००० |
| तुकारामचे कर्ज खाते | १०,००० | स्कंध | २८,००० |
| विविध धनको | १२,००० | हस्तस्थ रोख | ५,५०० |
| देयविपत्र | ४,६०० | बँकेतील रोख शिल्लक | २,००० |
| | **१,६७,,०००** | | **१,६७,०००** |

संपत्तीचे रोखीकरण पुढीलप्रमाणे इमारत ₹ ४६,७५० यंत्र ₹ १८,५५० फर्निचर ₹ ९,६००; गुंतवणूक ₹ १०,६५० प्राप्तविपत्र आणि ऋणको एकत्रितपणे ₹ २०,७५० सर्व देयतांचे शोधन करण्यात आले तसेच रोखीकरण खर्च ₹ ८०० झाला. राजाराम नादार झाला आणि त्यांच्या संपत्तीतून सर्व मिळून ₹ ११०० वसूल झाले. शेवटी भागीदारांच्या खात्यावरील शिलकांचे शोधन करण्यात आले.

**रोखीकरण खाते, बँक खाते आणि सर्व भागीदारांचे भांडवल खाते तयार करा.**

उत्तर : रोखीकरणावरील तोटा – ₹ ५४,०००, बँक खाते – ₹ १,१४,९००, सीताराम भांडवल खाते – ₹ ५०,०००, गंगाराम भांडवल खाते – ₹ ३७,५००

९. **खाली दिलेला ताळेबंद हा वैभव, संजय आणि संतोष यांच्या भागीदारीचा आहे.**

**ताळेबंद ३१ मार्च, २०१९ रोजीचा**

| देयता | रक्कम ₹ | संपत्ती | रक्कम ₹ |
|---|---|---|---|
| भांडवल खाते : | | यंत्र | ६,००० |
| वैभव | ३६,००० | ख्याती | ९,००० |
| संजय | २७,००० | मालसाठा आणि ऋणको | ५७,००० |
| धनको | १२,००० | नफा–तोटा खाते | १८,००० |
| अधिकोष अधिविकर्ष | १८,००० | संतोषचे भांडवल | ३,००० |
| | **९३,०००** | | **९३,०००** |

**संतोष दिवाळखोर झाल्यामुळे भागीदारी संस्था विसर्जित झाली आणि संपत्तीचे रोखीकरण पुढीलप्रमाणे झाले.**

१. मालसाठा आणि ऋणको ₹ ५४,०००, ख्याती ₹ निरंक, यंत्र पुस्तकी मूल्याने रोखीकृत झाले.

२. धनकोवर १० % कसरीची परवानगी आहे.

३. संतोषकडून बाकी असलेल्या रकमेपैकी रुपयात २५ पैसे एवढीच रक्कम वसूल झाली.

४. नफा-तोटा विभाजनाचे प्रमाण ८:४:३.

५. संस्थेच्या विरोधात निर्माण झालेली आकस्मित देयतेचे शोधन ₹ ९,००० ला करण्यात आले.

**संस्थेचे हिशोबाची पुस्तके बंद करण्यासाठी आवश्यक खाती तयार करा.**

उत्तर : रोखीकरणावरील तोटा – ₹ १९,८००, बँक खाते एकूण बेरीज – ₹ ६२,६४०,
रक्कम दिली वैभव – ₹ १०,५६०, संजय – ₹ १४,२८०

**जेव्हा दोन भागीदार दिवाळखोर होतात (When Two Partner Become Insolvent)**

**१०. श्वेता, नूपुर आणि सानिका हे ३:२:१. या प्रमाणात नफा-तोटा वाटून घेणारे भागीदार आहेत. त्यांच्या भागीदारीचा ३१ मार्च २०१९ रोजीचा ताळेबंद खालीलप्रमाणे होता. :**

**ताळेबंद ३१ मार्च २०१९ रोजीचा**

| देयता | रक्कम ₹ | संपत्ती | रक्कम ₹ |
|---|---|---|---|
| भांडवल खाते : | | विविध संपत्ती | १,६०,००० |
| श्वेता | ६५,००० | बँकेतील रोख | ५,००० |
| नूपुर | १५,००० | भांडवल खाते : सानिका | १०,००० |
| विविध धनको | ९५,००० | | |
| | १,७५,००० | | १,७५,००० |

दि. ३१ मार्च २०१९ रोजी भागीदारी संस्था विसर्जित झाली. विविध संपत्तीचे रोखीकरण पुस्तकी मूल्याच्या ६०% झाले. श्वेताने रोखीकरण खर्च ₹ १,००० दिला, नूपुर आणि सानिका दिवाळखोर झाले.

नूपुरच्या खाजगी संपत्तीतून ₹ ३,००० आणि सानिकाच्या खाजगी संपत्तीतून ₹ ८,००० प्राप्त झाले.

**वरील माहितीच्या आधारे संस्थेची वहीखाते बंद करण्याकरीता आवश्यक खाती तयार करा.**

उत्तर : रोखीकरणावरील तोटा – ₹ ६६,०००, बँक खाते एकूण बेरीज – ₹ १,१२,०००,
श्वेताला रक्कम दिली – ₹ १७,०००, नूपुरची तूट – ₹ ४,००० सानिकाची तूट – ₹ १३,०००

**सर्व भागीदार दिवाळखोर / नादार झाल्यास (When all Partner Become Insolvent)**

**११. प्रीती, प्रिया आणि प्राची यांच्या भागीदारीचा ३१ मार्च २०१९ रोजीचा ताळेबंद खालीलप्रमाणे असून ते समप्रमाणात नफा-तोटा वाटून घेणारे भागीदार आहेत.**

**ताळेबंद ३१ मार्च २०१९ रोजीचा**

| देयता | रक्कम ₹ | संपत्ती | रक्कम ₹ |
|---|---|---|---|
| भांडवल खाते : | | यंत्र | २३,००० |
| प्रीती | ४०,००० | फर्निचर (उपस्कर) | १६,००० |
| प्रिया | ३५,००० | मालसाठा (स्कंध) | ४७,००० |
| प्राची | २५,००० | बँकेतील रोख | १०,००० |
| व्यापारी धनको | ५०,००० | नफा-तोटा खाते | ८४,००० |
| कर्ज (यंत्राद्वारे सुरक्षित) | ३०,००० | | |
| | **१,८०,०००** | | **१,८०,०००** |

सर्व भागीदारांच्या दिवाळखोरी / नादारीमुळे संस्था विसर्जित झाली. यंत्र ₹ १८,०००, ला विकण्यात आले. फर्निचरबद्दल ₹ १४,००० प्राप्त झाले. मालसाठ्याचे रोखीकरण ₹ ३५,०००. झाले. विसर्जन खर्च ₹ २,००० आला. प्रिया आणि प्राची यांच्याकडून काहीही प्राप्त झाले नाही. परंतु प्रीतीच्या खाजगी संपत्तीतून ₹ ३,४०० प्राप्त झाले.

**वरील माहितीच्या आधारे संस्थेचे हिशेब पुस्तके बंद करा.**

**उत्तर :** रोखीकरणावरील तोटा – ₹ २१,०००, बँक खाते – ₹ ८०,४००, भांडवलातील तूट प्रीती – ₹ ८,४००,
प्राची – ₹ १०,०००

**१२. शाश्वत आणि शिव हे समप्रमाणात नफा–तोटा वाटून घेणारे भागीदार आहेत. त्यांच्या भागीदारीचा ताळेबंद खालीलप्रमाणे आहे.:**

**ताळेबंद ३१ मार्च २०१९ रोजीचा**

| देयता | रक्कम ₹ | संपत्ती | रक्कम ₹ |
|---|---|---|---|
| शाश्वतचे भांडवल खाते | ६,००० | यंत्र आणि सयंत्र | १४,७५० |
| धनको | ३९,००० | फर्निचर (उपस्कर) | ४,००० |
| | | ऋणको | ५,००० |
| | | मालसाठा (स्कंध) | ६,२५० |
| | | बँकेतील रोख | ३,००० |
| | | शिवचे भांडवल खाते | १२,००० |
| | **४५,०००** | | **४५,०००** |

सर्व भागीदारांच्या कमजोर आर्थिक स्थितीमुळे ते दिवाळखोर घोषित झाले.

संपत्तीचे रोखीकरण खालीलप्रमाणे झाले :

मालसाठा (स्कंध) ₹ ३,५००, फर्निचर ₹ २,०००, ऋणको ₹ ५,००० यंत्र ₹ ७,०००

संपत्तीच्या रोखीकरणाचा व वसुलीचा खर्च ₹ १,५०० आला. शाश्वतला त्याच्या खाजगी देयतेची परतफेड करण्यासाठी संपत्ती अपुरी पडली तसेच शिवच्या खाजगी देयतेची परतफेड केल्यानंतर ₹ ५०० शिल्लक राहिले.

**संस्थेची लेखापुस्तके बंद करण्यासाठी आवश्यक खाती तयार करा.**

**उत्तर :** रोखीकरणावरील तोटा – ₹ १४,०००, बँक खाते – ₹ २१,०००, भांडवलाची तूट, शाश्वत – ₹ १०००
शिव – ₹ १८,५००

**विद्यार्थी कृती :**

१) कोणत्याही सनदी लेखापालाच्या (C.A.) कार्यालयास भेट देऊन विसर्जित भागीदारी संस्थेच्या प्रक्रियेची माहिती जमा करा.

२) सनदी लेखापालाच्या (C.A.) कार्यालयास भेट देऊन भागीदारी संस्थेच्या विसर्जनाची प्रत्यक्ष कारणे माहीत करून घेऊन त्याचा लेखांकनावरील परीणाम अभ्यासा.

३) भागीदारी संस्थेच्या विसर्जनाच्या वेळी भागीदारीच्या देयतेच्या शोधन क्रमाचा अहवाल तयार करा.

# ७. विनिमय विपत्र किंवा हुंडी (Bills of Exchange)

**अभ्यास घटक**

*७.१ विपत्राचा परिचय, अर्थ, व्याख्या आणि गरज*

*७.२ विपत्राचा मसुदा किंवा नमुना, हुंडीचे पक्ष, विपत्राची तिथी, देयदिनांक व हुंड्याचे प्रकार*

*७.३ विपत्राचा उपयोग कसा करावा, विपत्राचा अनादर, विपत्राची नोंदणी विपत्राचे प्रमाणन, नोंदणी अधिकारी व नोंदणी शुल्क*

*७.४ खालील परिस्थिती आहर्ता/विपत्रधारी, आहार्यी यांच्याकडून विपत्राची लेखांकीय हाताळणी.*

- *अ. देयतिथी पर्यंत विपत्र स्वतः जवळ असलेल्या विपत्राचे आहार्यीने/स्वीकर्त्याने शोधन केल्यास, अनादरण केल्यास किंवा नादार झाल्यास.*
- *ब. विपत्राचे पृष्ठांकन केल्यास आणि आहार्यी किंवा स्वीकर्त्याने शोधन केल्यास अनादरण झाल्यास किंवा दिवाळखोर ठरल्यास.*
- *क. विपत्राचे बँकेत वटविणे. विपत्राचा आदर, अनादर आणि आहारार्यी/स्वीकर्ता नादार झाल्यास.*
- *ड. विपत्र राशी संग्रहणाकरिता बँकेत पाठविणे व स्वीकर्त्याने किंवा आहार्यीने आदर, अनादरण केल्यास किंवा स्वीकर्ता दिवाळखोर झाल्यास*
- *इ. विपत्राचे नूतनिकरण – नूतनिकरणाची कारणे, व व्याजाची आकारणी.*
- *फ. अंशतः रकमेचे शोधन : मूळ रक्कम अधिक व्याज अधिक नोंदणी खर्च व नवीन विपत्र काढणे.*
- *ग. नवीन विपत्राचा आदर/अनादर.*
- *ह. स्वीकर्त्याची नादारी व त्याच्या खात्याची पूर्तता.(Insolvency of the acceptor & settlement of his account)*
- *व. विपत्राचे निवर्तन.*
- *ज. रोजकीर्द व खातेवही (फक्त आदेशकाचे खाते, आदेशितीचे खाते.)*

**क्षमता विधाने**

❑ *या प्रकरणाचा अभ्यास केल्यानंतर विद्यार्थी सक्षम होतील :*

- *विद्यार्थी विनिमय विपत्राचा अर्थ समजण्यास पात्र ठरतील.*
- *विद्यार्थ्यांना विनिमय विपत्राच्या संकल्पना समजल्यामुळे प्रत्यक्ष ते त्याचा उपयोग करतील.*
- *विद्यार्थी विनिमय विपत्राचा मसुदा तयार करतील आणि त्याचे प्रकार समजून घेतील.*
- *देयदिनांक पर्यन्त विपत्र स्वतःजवळ ठेवणे, राशीसंग्रहणाकरिता बँकेत पाठविणे, नूतनीकरण व विपत्राचे निवर्तन इ. बाबी समजून घेतील.*
- *विनमय विपत्राची विविध परिस्थित लेखांकीय हाताळणी शिकतील.*

### ७.१ प्रस्तावना :

शोधनापूर्वी वस्तू व सेवा प्राप्त करणे हे ग्राहकाच्या योग्यतेवर आणि विश्वासावर अवलंबून असते ज्या व्यवहारांचे शोधन भविष्यामध्ये करण्यात येते त्यांना उधारीचे व्यवहार म्हणतात किंवा ते उधारीचे व्यवहार म्हणून ओळखले जातात. उधारीच्या व्यवहाराची व्यवसाय जगतामध्ये महत्त्वाची भूमिका आहे. उधारीमुळे ग्राहकांना त्यांच्या खर्चाच्या रकमेत वाढ करण्याची प्रेरणा मिळते. व्यावसायिक संस्था बाजारातील स्पर्धेच्या परिस्थित उधारीचा लाभ घेतात. संभाव्य विक्री वाढविण्याच्या उद्देशाने रोख रकमेचे प्रमाण कमी करून मोठे कर्ज उभारल्याची विक्रेत्यांचा प्रयत्न असतो. भविष्यामध्ये तो विशिष्ट तारखेला, त्याला देय (Due) असणारी रक्कम किंवा त्याने घेतलेल्या मालाच्या पैशाचे शोधन करेल या वचनावर आणि जबाबदारीवर विक्रेते माल विकतात. रक्कम शोधनाच्या बाबतीत कोणताही वाद किंवा गैरसमज होऊ नये, म्हणून विनियम विपत्रे, वचनचिठ्ठ्या अशा पतसाधनांचा उपयोग केला जातो. भारतात बऱ्याच काळापासून लोकप्रिय अशा पतसाधनांचा उपयोग केला जातो, त्यालाच हुंडी (Hundi) असे म्हणतात.

### ७.१ अ. गरज – (Necessity) :

व्यावसायिक व्यवहारांची भरभराट करण्यासाठी आणि उधारीची (Credit) व्याप्ती वाढविण्यासाठी विनिमय विपत्रे व वचन चिठ्या मौल्यवान पतसाधने आहेत. विहित नमुन्यातील स्टँप पेपर वर लिखित स्वरूपात वचन चिठ्ठी लिहिलेली असल्यास ग्राहक त्याच्या कर्जाची (Debt) परतफेड करेल आणि विक्रेत्याला त्याचे पैसेसुद्धा मिळतील. हे लेखी वचन चिठ्ठ्या बँका स्वीकारतात आणि त्याच्या बदली आगाऊ रकमा देतात. शिवाय ही पतसाधने चलनक्षम दस्तऐवज आहेत. म्हणून ती एका व्यक्तीकडून दुसऱ्या व्यक्तीकडे हस्तांतरित करता येतात.

### ७.१ ब. अर्थ :

भारतीय पराक्राम्य विलेख अधिनियम १८८१ नुसार चलनक्षम दस्तऐवज म्हणजे वचन चिठ्ठी, विनिमय विपत्र किंवा धनादेश हे धारक अथवा वाहकाला देय असतात. विनिमय विपत्र हे कर्जाची लेखी स्वरूपाची पावती आहे आणि विपत्राची रक्कम ठरावीक मुदतीनंतर देण्याचे वचन सुद्धा आहे. सामान्यता धनको त्याच्या ऋणकोवर विपत्र काढतो आणि ऋणकोकडून त्यास स्वीकृती मिळते.

वचनचिठ्ठी म्हणजे ठरावीक रक्कम, ठरावीक व्यक्तीला किंवा त्याच्या आदेशानुसार विशिष्ट मुदतीनंतर देण्याचे बिनशर्त स्वरूपाचे लेखी वचन असते. वचन चिठ्ठीला स्वीकृती गरज (आवश्यकता) नसते कारण वचन चिठ्ठी लिहिणाराच शोधनाचे वचन देतो.

### ७.१ क. विनिमय विपत्र व वचन चिठ्ठीची व्याख्या (Definition of Bill of Exchange and Promissory Note) :

१८८१ च्या चलनक्षम दस्तऐवज कायद्यानुसार कलम ५मध्ये हुंडीची व्याख्या पुढीलप्रमाणे दिली आहे.

“विनिमय विपत्र (हुंडी) म्हणजे अशा प्रकारचा लेखी दस्तऐवज की, ज्यावर विपत्र लिहिणाऱ्याने आपली सही करून विशिष्ट व्यक्तीला विनाअट आज्ञा दिलेली असते की त्या व्यक्तीने, त्या दस्तऐवजात निर्देशित व्यक्तीला किंवा तो दस्तऐवज घेऊन येणाऱ्या व्यक्तीला (वाहकाला), दस्तऐवजात लिहिलेली रक्कम, तिने मागणी केल्यावर किंवा ठरावीक मुदतीनंतर द्यावी.”

विनिमय विपत्राची वैशिष्ट्ये (Features of Bill Exchange)

१. विपत्र हे लेखी स्वरूपात असले पाहिजे.
२. १८९९च्या मुद्रांक कर कायद्याप्रमाणे त्यावर योग्य मूल्याचे तिकिट (stamp)असले पाहिजे.
३. हुंडीवर दिनांक असावी.
४. हुंडीत निश्चित रक्कम देण्यासंबंधीची स्पष्ट आज्ञा असावी.
५. हुंडी ही बिनशर्त स्वरूपाची आज्ञा आहे.
६. हुंडी निर्देशित केलेल्या व्यक्तीला किंवा त्याच्या आदेशानुसार किंवा वाहकाला रक्कम दिली जाते.
७. हुंडीवर, हुंडी काढणाऱ्याची/निर्मात्याची स्वाक्षरी असावी.

**वचनपत्र/वचन चिठ्ठी (Promissory Note)**

भारतीय चलनक्षम दस्तऐवज अधिनियम १८८१ कलम ४ प्रमाणे व्याख्या –

“ज्या लेखी दस्तऐवजावर त्याच्या निर्मात्याने सही करून निश्चित रक्कम, निश्चित व्यक्तीला किंवा त्याच्या आदेशाप्रमाणे इतर व्यक्तीला किंवा दस्तऐवज घेऊन येणाऱ्याला देण्याचे वचन, कोणतीही अट न घालता दिलेले असते त्या दस्तऐवजाला “वचन चिठ्ठी” असे म्हणतात. वचन चिठ्ठी हे बँकपत्र किंवा चलनपत्र नाही.”

## ७.२ हुंडीचे पक्ष (Parties to a Bill Exchange) :

१. **आहर्ता/आदेशक (Drawer) :** विपत्र काढणाऱ्या किंवा लिहिणाऱ्या व्यक्तीस आहर्ता असे म्हणतात आहर्ता हा धनको असतो. तो ऋणकोकडून रक्कम प्राप्त करतो तो विपत्राची रक्कम प्राप्त करतो, म्हणून त्याच्यासाठी हे विपत्र “प्राप्त विपत्र”, असते.

२. **आहार्यी/आदेशिती (Drawee) :** ज्याच्यावर विपत्र काढले जाते, त्याला आहार्यी किंवा आदेशिती असे म्हणतात. आदेशिती विपत्र स्वीकारतो तो ऋणको असतो आणि धनकोला रक्कम देतो. त्याला विपत्राची रक्कम द्यावयाची असते म्हणून त्याच्यासाठी विपत्र ‘देयविपत्र’ असते.

३. **आदाता (Payee) :** ज्याला हुंडीतील/विपत्रातील पैसे प्राप्त करण्याचा अधिकार असतो, त्याला आदाता असे म्हणतात. विपत्रातील राशी ज्या व्यक्तीला किंवा त्याच्या आदेशाप्रमाणे अन्य व्यक्तीला मिळण्याचा अधिकार असतो.

### वचन चिठ्ठीचे पक्ष :

१. **आहर्ता/निर्माता (Drawer or Maker) :** जो वचनचिठ्ठी लिहितो त्याला आहर्ता असे म्हणतात. त्याला वचनपत्र लिहिणारा असे देखील म्हणतात. हा असा व्यक्ती आहे की, जो वचन चिठ्ठीमधील ठरावीक रक्कम देण्याचे वचन (Promis) देतो. म्हणून त्याला वचनदाता असेदेखील म्हणतात.

२. **आहार्यी/आदाता (Drawee of Payee) :** ज्या व्यक्तीकरिता वचनचिठ्ठी लिहिली किंवा काढली जाते तिला आहार्यी किंवा आदाता असे म्हणतात.

**अतिरिक्त माहिती:**

आपल्या देशात विपत्राचे असंख्य प्रकार उपयोगात आणले जातात. उदा. शहजोग हुंडी, दर्शनी हुंडी, मुदती हुंडी, नामजोग हुंडी, धनीजोग हुंडी, जवाबी हुंडी इ.

### विपत्राच्या नमुन्यातील घटक (Contents of format of Bill of Exchange) :

१. **दिनांक (Date) :** विपत्राच्या वरच्या उजव्या बाजूला आदेशकाच्या पत्याखाली विपत्राची दिनांक लिहिणे आवश्यक असते. परिपक्वता दिनांक काढण्यासाठी विपत्रावर दिनांक लिहिणे आवश्यक आहे. दिनांकाशिवाय लिहिलेल्या विपत्राला काही अर्थ नसतो.

२. **मुदत (Term) :** दिवस किंवा महिन्यामध्ये विपत्राची मुदत दर्शविणे आवश्यक आहे.

३. **राशी (Amount) :** विपत्राची राशी अंकामध्ये तिकिटाच्या खाली लिहावी आणि शब्दामध्ये विपत्राच्या मजकुरात दर्शवावी.

४. **मुद्रांक (Stamp) :** १८८९च्या भारतीय मुद्रांक शुल्क अधिनियमानुसार विपत्रावर योग्य मूल्याचे मुद्रांक असणे आवश्यक आहे.

५. **पक्ष (Parties) :** आहर्ता, आहार्यी व आदाता यांची नांवे व पत्ते विपत्रात असणे आवश्यक आहे.

६. **मूल्यप्राप्तीसाठी (For value received) :** कायद्यानुसार मोबदल्याशिवाय कोणताही करार होऊ शकत नाही. व्यापारी विपत्राच्या संदर्भात मोबदल्यात विशेष स्थान (महत्व) आहे. याचा अर्थ विशिष्ट मोबदल्याच्या बदली विपत्राला स्वीकृती दिली जाते.

७. **स्वीकृती (Acceptance) :** आदेशकाकडून विशिष्ट मुदतीचे विपत्र काढले जाते. स्वीकृतीकरिता ते आहार्यीकडे सादर केले जाते. जेव्हा आदेशिती विपत्राच्या दर्शनी भागावर “स्वीकृत'' असे शब्द लिहून दिनांक टाकतो तेव्हा त्या क्रियेला विपत्राची स्वीकृती असे म्हणतात. विपत्राच्या स्वीकृतीपूर्वी आहार्यी विपत्राच्या शोधनासाठी बाध्य नसतो. स्वीकृती नंतरच मसुद्याचे रूपांतर विपत्रात होते.

**अतिरिक्त माहिती –**

भारतीय मुद्रांक कर अधिनियम १८९९च्या कायद्याप्रमाणे नोंदीत व्यवहारासाठी किती प्रकारची मुद्रांक कर (stamp Duty) लावली जाते.

### विनिमय विपत्राचा नमुना – Specimen of a bill of exchange :

**– विपत्राचा नमुना –**

| मुद्रांक शुल्क |

(आदेशकाचे नाव)
______________
(आदेशकाचा पत्ता)
______________
(विपत्र लिहिण्याची तारीख)
______________

| (अंकामध्ये राशी) ............ ₹ |

______________ **या तारखेनंतर, श्री.** ______________________________

***(आदात्याचे नाव व पत्ता) किंवा त्याच्या आदेशानुसार रु*** ______________

**राशी शब्दात** ______________ **फक्त देणे, ज्याचा मोबदला मिळाला आहे.**

**सही/–**

______________

***(आदेशकाचे नाव)***

***प्रति,***

(आदेशितीचे नाव व पत्ता)
______________
______________
______________

"स्वीकृती''.
(आदेशतीचे नाव)
______________
दिनांक ______________

### स्वीकृतीचे प्रकार – (Types of Acceptance) :

अ. **सामान्य स्वीकृती/साधारण स्वीकृती (General Acceptance) :** जेव्हा आहार्यी कोणतीही अट व बदल न करता आहर्त्याने लिहिलेले विपत्र स्वीकारतो तेव्हा त्यास सामान्य स्वीकृती असे म्हणतात. याला बिनशर्त स्वीकृती असे देखील म्हणतात.

ब. **सशर्त स्वीकृती (Qualified Acceptance) :** जेव्हां आहर्त्याने लिहिलेल्या विपत्रास, आहार्यी काही अटींवर स्वीकृती अथवा विशेष स्वीकृती देतो त्यास सशर्त स्वीकृती असे म्हणतात.

### सशर्त स्वीकृतीचे खालील प्रकार आहेत:

i) **मुदतीशी संबंधित अट – (Qualified as to time) :** जेव्हां आहार्यी विपत्र स्वीकारतो, परंतु विपत्रात आहर्त्याने लिहिलेल्या मुदतीस बदल करतो तेव्हां अशा अटीला मुदतीशी संबंधित अट असे म्हणतात.

ii) **स्थळाशी संबंधित अट –(Qualified as to Place) :** जेव्हां विपत्राचे शोधन केवळ एका निश्चित ठिकाणी करण्याचे मान्य केले जाते, तेव्हा त्यास स्थळाशी संबंधित अट असे म्हणतात.

iii) **रकमेशी संबंधित अट –(Qualified as to amount) :** विपत्रात लिहिलेल्या रकमेच्या काही भागाकरिता आहार्यी स्वाकृती देतो, तेव्हा त्यास रकमेशी संबंधित स्वीकृत असे म्हणतात.

iv) **पक्षाशी संबंधित अट –(Qualified as to parties) :** जेव्हां आहार्यी हा विपत्रात नाव असलेल्या व्यक्तीस विपत्राचे शोधन करण्याचे अमान्य करतो, त्यास पक्षाशी संबंधित अट असे म्हणतात.

v) **अटींशी संबंधित स्वीकृती –(Qualified as to condition) :** आहार्यी विपत्राचे शोधन करण्यास काही अटींच्या पूर्ततेवर तयार असतो त्यास विशेष अटींशी संबंधित स्वीकृती असे म्हणतात.

## ७.२. विनिमय विपत्राचा नमुना :

**उदाहरण –१ सामान्य स्वीकृती – (General Acceptance)**

खालील माहितीवरून विनिमय विपत्र तयार करा:–

१. आदेशक : श्री. प्रकाशराव, ६४८, अ कोरल प्लाझा, एस. बी. रोड, पुणे.

२. आदेशिती : श्री. राहुलदेव, २३६, राजापुर रोड, जळगांव

३. राशी : ₹ ४४,५००.

४. मुदत : ३ महिने

५. विपत्राची तारीख : ३ जून, २०१९.

६. स्वीकृतीची तारीख : ७ जून, २०१९.

**विनिमय विपत्राचा नमुना**

मुद्रांक

श्री. प्रकाश राव,
६४८, अ कोरल प्लाझा
एस्. बी. रोड, पुणे
दि. ३ जून, २०१९.

₹ ४४,५००

तीन महिन्यानंतर मला किंवा माझ्या आदेशानुसार ₹ चव्वेचाळीस हजार पाचशे फक्त देणे, ज्याचा मोबदला मिळाला आहे.

सही/–
(प्रकाश राव)

प्रति,
श्री. राहुल देव,
२३६, राजापूर रोड, जळगांव.

"स्वीकृती"
सही/–
(राहुल देव)
दि. ७ जून २०१९.

**उदाहरण – २. आदात्याच्या नावासह विपत्राचा नमुना व सामान्य स्वीकृती (General Acceptance with Payee's name)**

१. आहार्ता : मुकुंद देसाई, नं. १४, हेरीटेज हाईटस्, नागपूर.

२. आहार्यी : योगेन्द्र टिळक, नारायण पेठ, अमरावती.

३. आदाताः श्रवण देव, पनवेल.

४. राशीः ₹ ३०,०००.

५. मुदत : ९० दिवस

६. विपत्राची तारीख : १६ जुलै, २०१९

७. विपत्राची स्वीकृतीः २० जुलै, २०१९.

**विनिमय विपत्राचा नमुना**

मुद्रांक

मुकुंद देसाई,
१४ हेरीटेज नं हाईटस,
नागपूर
दि. १६ जुलै, २०१९.

₹ ३०,०००/-

नव्वद दिवसानंतर श्री. श्रवणदेव, पनवेल, यांना अथवा त्यांच्या आदेशानुसार ₹ तीस हजार फक्त देणे, ज्याचा मोबदला मिळाला आहे.

सही/-
(मुकुन्द देसाई)

प्रति,
योगेन्द्र तिलक,
नारायण पेठ,
अमरावती.

"स्वीकृती"
सही/-
(योगेन्द्र टिळक)
दि. २० जुलै २०१९.

**उदाहरण - ३. दर्शनी विपत्र - (After Sight Bill) -**

अनुराधा पाटील, ३७ - A LCC टॉवर्स, गोरेगांव, मुंबई यांनी २३ जानेवारी, २०२० रोजी रु. ५७,४५०चे दोन महिने मुदतीचे विपत्र, शांती विश्वकर्मा, No. 43 भोसलेनगर, सोलापूर यांच्यावर काढले. त्यांनी त्याचे शोधन शामला काटे, नाशिक यांना करावे. विपत्र २७ जाने, २०२०, रोजी स्वीकारण्यात आले. वरील माहितीवरुन विनिमय विपत्राचा नमुना तयार करा.

**- विनिमय विपत्र -**

मुद्रांक

अनुराधा पाटील,
३७ - A LCC टावर्स,
गोरेगांव, मुंबई.
दि. २३ जानेवारी, २०२०

₹ ५७,४५०/-

दर्शनोत्तर दोन महिन्यांनी शामला काटे, नाशिक यांना किंवा त्यांच्या आदेशानुसार ₹ सत्तावन हजार चारशे पन्नास फक्त देणे, ज्याचा मोबदला मिळाला आहे.

सही/-
(अनुराधा पाटील)

प्रति,
शांती विश्वकर्मा,
न. ४३, भोसलेनगर,
सोलापूर.

"स्वीकृती"
सही/-
(शांती विश्वकर्मा)
दि. २७ जाने. २०२०.

**उदाहरण – ४ राशीच्या अटींसह सशर्त स्वीकृती – (Qualified Acceptance as to Amount) –**

**खालील माहितीवरून विनिमय विपत्राचा नमुना तयार करा.**

१ मार्च, २०२०, रोजी श्री. अमोल काजे ४२, गांधी ग्राम, एम्. जी. रोड, रत्नागिरी यांनी श्रीमती, सागरीका माने, ३४५, कुमठेकर रोड, पुणे यांच्यावर ४५ दिवस मुदतीचे ₹ १८,७५० चे विपत्र काढले. ४ मार्च, २०२० रोजी श्रीमती सागरिका माने यांनी ₹ १५,००० साठी त्याला स्वीकृती दिली.

**– विनिमय विपत्र –**

मुद्रांक

श्री. अमोल काजे,
४२, गांधीग्राम,
एम. जी. रोड, रत्नागिरी,
दि. १ मार्च, २०२०

₹ १८,७५०/-

पंचेचाळीस दिवसानंतर मला अथवा माझ्या आदेशानुसार ₹ अठरा हजार सातशे पन्नास फक्त देणे, ज्याचा मोबदला मिळाला आहे.

सही/-
(अमोल काजे)

प्रति,
श्रीमती सागरिका माने,
३४५ – कुमठेकर रोड,
पुणे.

"फक्त ₹ १५,००० करिता स्वीकृत"
सही/-
(सागरिका माने)
दि. ४ मार्च, २०२०.

**उदाहरण – ५. मुदतीशी संबंधित सशर्त स्वीकृती (Qualified Acceptance as to time)**

९ फेब्रुवारी २०२० रोजी, निरजा पब्लिशिंग हाऊस, नरिमन पॉईन्ट, मुंबईचे भागीदार समिर गुप्ता, यांनी १ महिना मुदतीचे ₹ ६२,०००चे विपत्र श्रीमती नम्रता कोकील, पनवेल रोड, खारघर यांच्यावर काढले. ज्याचे शोधन मे. विद्या ट्रेडर्स लोणावला यांना करावयाचे आहे. दोन महिन्याच्या अटीवर स्वीकृती मिळाली.

वरील माहितीवरुन विनिमय विपत्राचा नमुना तयार करा.

**– विनिमय विपत्र –**

मुद्रांक

निरजा पब्लिशिंग हाऊस,
नरिमन पॉईन्ट,
मुंबई.
दि. ९ फेब्रुवारी, २०२०

₹ ६२,०००/-

वरील तारखेपासून एक महिन्यानंतर मे. विद्या ट्रेडर्स, लोणावळा यांना किंवा त्यांच्या आदेशानुसार ₹ बासष्ठ हजार फक्त देणे, ज्याचा मोबदला मिळाला आहे.

सही/-
(समीर गुप्ता)
निरजा पब्लिशिंग हाऊस,
चे भागीदार.

प्रति,
श्रीमती नम्रता कोकील,
पनवेल रोड,
खारघर

"दोन महिन्याकरिता स्वीकृत"
सही/-
नम्रता कोकील
दि. ९ फेब्रुवारी, २०२०.

## उदाहरण – ६. मागणी/दर्शनी विपत्र – (Demand Bill)

**खालील माहितीवरून विनिमय विपत्र तयार करा.**

१. आहर्ता : केदार पंडीत, २२-अ-कल्पतरु इस्टेट, पिरंगुट पुणे.

२. आहार्यी : गौरी मुळे, वाशी, नवी मुंबई.

३. विपत्राची तारीख : १४ ऑगस्ट, २०१९

४. स्वीकृतीची तारीखः १७ ऑगस्ट, २०१९

५. विपत्राची राशीः ₹ ३८,७४०

**– विनिमय विपत्र –**

| मुद्रांक |
|---|

केदार पंडीत,
२२/अ कल्पतर इस्टेट,
पिरंगुट, पुणे.
दि. १४ ऑगस्ट, २०१९

| ₹ ३८,७४०/- |
|---|

सादरकर्ती ऋणी मला किंवा माझ्या आदेशानुसार ₹ अडतीस हजार सातशे चाळीस फक्त देणे, ज्याचा मोबदला मिळाला आहे.

सही/-
(केदार पंडीत)

प्रति,
गौरी मुळे,
वाशी,
मुंबई.

"स्वीकृत"
सही/-
गौरी मुळे
दि. १७ ऑगस्ट, २०१९.

**सूचना – मागणी विपत्रात विपत्राची मुदत दिली नाही. आदेशकाकडून विपत्र सादर झाल्याबरोबर स्वीकर्त्याने शोधत करावयाचे असते.**

वचन चिट्ठीचा नमुना :

– वचन चिट्ठी –

| मुद्रांक |
|---|

ममता सामंत,
१३/अ – बिझीनेस सेंटर,
L.B.S. रोड, मुलुंड, मुंबई.
दि. १० जानेवारी, २०१९

| ₹ २०,०००/– |
|---|

तीन महिन्यानंतर बीना शर्मा यांना किंवा त्यांच्या आदेशानुसार ₹ वीस हजार फक्त देईन असे वचन देते, ज्याचा मोबदला मिळाला आहे.

सही/–
(ममता सामंत)

प्रति,
सुनीता कर्वे,
एम. जी. रोड,
सुरत

विनिमय विपत्राच्या बाबतीत महत्त्वाच्या बाबी – (Important trems of Bill of Exchange) :

१. **विपत्राची मुदत – (Tenor or Tenure of bill) :** विपत्रात लिहिलेली रक्कम जितक्या कालावधीनंतर घ्यावी लागते तीस विपत्राची मुदत असे म्हणतात. विपत्राची मुदत दिवसात किंवा महिन्यात असते.

२. **मसुदा/नमुना हुंडी – (Draft) :** विपत्राला स्वीकृती मिळेपर्यंत विपत्र केवल 'मसुदा' असतो. त्याला नमुना हुंडी (Proforma Bill) असे देखील म्हणतात.

३. **सवलतीचे दिवस/अनुग्रह दिवस – (Days of grace) :** कायद्यानुसार विपत्राच्या शोधनासाठी विपत्राच्या मुदतीनंतर ३ दिवस जे जास्तीचे दिले जातात ते म्हणजे सवलतीचे दिवस होय.

   मागणी विपत्र किंवा दर्शनीविपत्र यांना सवलतीचे ३ दिवस दिले जात नाही.

४. **परिपक्वता तिथी/दातव्य दिनांक – (Date of maturity or Due date of bill) :** ज्या दिवशी विपत्राची मुदत संपते, त्या तारखेला परिपक्वता तिथी किंवा देयतिथी असे म्हणतात.

   जर विपत्राचा देयदिनांक सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी येत असेल उदा. २६ जानेवारी किंवा १५ ऑगस्ट हे सार्वजनिक सुटीचे दिवस आहे. अशा परिस्थितीत अगोदरचा दिवस देयदिनांक (Due Date) राहिल. जसे २५ जानेवारी किंवा १४ ऑगस्ट.

   एखाद्यावेळी देयदिनांकला आकस्मिक सुट्टी (Emergency Holiday) येत असल्यास, विपत्राचे शोधन लगतच्या दुसऱ्या दिवशी करावे लागेल.

दातव्य तिथीचे प्रकार – (Types of due date) :

अ. **नाममात्र देयदिनांक – (Nominal Due Date) :** सवलतीचे दिवस मिळविल्याशिवाय येणाऱ्या देय दिनांकाला नाममात्र देयदिनांक असे म्हणतात.

**ब. कायदेशीर देयदिनांक – (Legal Due Date) :** नाममात्र देयदिनांकामध्ये सवलतीचे ३ दिवस मिळविल्यानंतर येणाऱ्या तिथीला कायदेशीर देयतिथी असे म्हणतात.

**देयतिथीची गणना – (Calculation of due date) :**

**अ) जर विपत्र तारखेपासून देय असेल (After Date of Bill)**

**i) विपत्राची मुदत महिन्यात असल्यास – उदा. १२ जून, २०१९ला लिहिलेले २ महिने मुदतीचे विपत्र देयदिनांक काढून दाखवा.**

| | दिवस | महिना | वर्ष |
|---|---|---|---|
| विपत्राचा दिनांक | १२ | ६वा | २०१९ |
| विपत्राची मुदत | – | २ (महिने) | – |
| नाममात्र देयदिनांक | १२ | ८वा | २०१९ |
| + सवलतीचे दिवस | ३ | – | – |
| कायदेशीर देयदिनांक | १५ | ८वा | २०१९ |

उत्तर – १५ ऑगस्ट, २०१९

परंतु – १५ ऑगस्ट, २०१९ स्वातंत्र्य दिनाची सार्वजनिक सुट्टी येत असल्यामुळे १४ ऑगस्ट, २०१९हा देयदिनांक समजून शोधन करावे लागेल.

**ii) विपत्राचा कालावधी हा दिवसांमध्ये दिलेला असल्यास – (Tenure of bill given in days) :**

१४ डिसेंबर, २०१९ रोजी लिहिलेल्या, ९० दिवस मुदत असलेल्या विपत्राचा देय दिनांक काढा –

| महिना | प्रत्यक्ष दिवस | अनवसित दिवस |
|---|---|---|
| डिसेंबर २०१९ | ३१ | (३१–१४) १७ |
| जानेवारी २०२० | ३१ | ३१ |
| फेब्रुवारी २०२० | २९ | २९ |
| मार्च २०२० | ३१ | १३ |
| | | एकूण ९० दिवस |

म्हणून नाममात्र देयदिनांक = १३ मार्च, २०२०
(+) सवलतीचे ३ दिवस = ०३
कायदेशीर देयदिनांक = १६ मार्च, २०२०

**ब) जर विपत्र दर्शनौत्तर तारखेपासून देय असल्यास – (In case of Bills Payable 'After Sight') :**

विपत्र लिहिण्याच्या तारखेपासून देयदिनांक काढली जाते. फरक फक्त एवढाच विपत्राचा कालावधी हा विपत्राच्या स्वीकृतीच्या तारखेपासून नाही.

अ) २७ डिसेंबर, २०१९ रोजी दोन महिने मुदतीचे दर्शनी विपत्र काढले. (Sight Bill) ते विपत्र ३१ डिसेंबर, २०१९ रोजी स्वीकारले. विपत्राचा दिनांक – ३१ डिसेंबर, २०१९.

म्हणून ३१ डिसेंबर, २०१९ ते ३१ जानेवारी, २०२० = १ महिना

नाममात्र देयदिनांक = २९ फेब्रुवारी, २०२० + सवलतीचे ३ दिवस = मार्चचे ३ दिवस

∴ कायदेशीर देयदिनांक = ३ मार्च २०२०.

५. **धारक – (Holder):** विनिमय विपत्राचा धारक म्हणजे अशी व्यक्ती ज्याच्या नावाने विपत्र आहे, आणि मालकी देखील आहे. त्याला यावरील रक्कम मिळू शकेल.

६. **यथाविधीधारक (Holder in due course) :** यथाविधीधारक म्हणजे अशी व्यक्ती की ज्याच्या जवळ विपत्राचा हक्क आहे. तो खालील कारणामुळे येतो.

i) मोबदला किंवा किंमत/प्रतिफल

ii) विश्वासहर्ता

iii) मुदत पुर्व

७. **विनिमय विपत्राचे प्रकार – (Types of Bill of Exchange) :**

i) **व्यापारी विपत्र/हुंडी – (Trade Bill) :** व्यावसायिक देवाण-घेवाणीतून धनकोने, ऋणकोवर काढलेल्या विपत्राला व्यापारी विपत्र असे म्हणतात. असे विपत्र फक्त व्यवसायिक व्यवहारातून लिहिण्यात व स्वीकारण्यात, येते.

ii) **सोयहुंडी किंवा अनुग्रह विपत्र – (Accommodation Bill) :** एकमेकांची आर्थिक गरज भागविण्याच्या उद्देशाने लिहिलेल्या विपत्रात अनुग्रह विपत्र असे म्हणतात कोणत्याही मोबदल्या शिवाय हे विपत्र लिहिण्यात व स्वीकारण्यात येते. आपल्या मित्रांना मदत करण्याच्या उद्देशाने विपत्रे लिहिली जातात.

iii) **देशी विपत्र – (Inland Bill) :** जेव्हा विपत्र लिहिणारा व विपत्र स्वीकारणारा हे दोन्ही पक्ष एकाच देशातील राहणारे असतात, तेव्हा त्या विपत्रात देशी विपत्र असे म्हणतात. अशा विपत्राचे शोधन हे त्याच देशात केले जाते.

iv) **विदेशी विपत्र – (Foreign Bill) :** विदेशी विपत्र म्हणजे असे विपत्र होय की, जे एका देशात काढले जाते आणि त्याचे शोधन दुसऱ्या देशात करण्यात येते. विपत्र भारतात काढले व त्याचे शोधन ऑस्ट्रेलियामध्ये करण्यात आले.

v) **लेखन तिथीनुसार विपत्र – (After Date Bill) :** ठरावीक मुदतीनंतर हे विपत्र देय होते. विपत्र काढल्याच्या तारखेपासून या विपत्राचा देयदिनांक काढण्यात येतो. या विपत्रासाठी सवलतीचे तीन दिवस ग्राह्य धरले जातात.

vi) **दर्शनोत्तर विपत्र – (After Sight Bill) :** विपत्राच्या स्वीकृतीच्या तारखेपासून या विपत्राचा देयदिनांक काढला जातो. या विपत्रासाठी सुद्धा३ दिवस सवलतीचे ग्राह्य धरले जातात.

vii) **मागणी/दर्शनी विपत्र – (Bill payable on Demand or At sight) :** विपत्र सादर करताक्षणीच आदेशीतील विपत्राची रक्कम देय होते. विपत्रासाठी कोणतीही मुदत नसते. सवलतीचे तीन दिवसही दिले जात नाहीत.

७.३ **विनिमय विपत्राचा आदर – (Honouring of Bill of Exchange) :** विनिमय विपत्र विशिष्ट कालावधीकरिता काढले जाते व दातव्यतिथीला त्याचे शोधन करावे लागते. दांतव्यतिथीला आदेशितीने किंवा स्वीकर्त्याने त्याची रक्कम दिल्यास विपत्राचे आदर झाले असे म्हणतात. विपत्राच्या दांतव्यतिथीपूर्वी शोधनासाठी विपत्रधारी स्वीकर्त्याकडे विपत्र सादर करतो. स्वीकर्त्याने याबाबतीत असमर्थता दर्शविल्यास विपत्राच्या शोधनाबाबत स्वीकर्ता आणि प्रत्येक पृष्ठांकक (Endorser) जबाबदार राहील.

**विनमय विपत्राचे अनादरण – (Dishonouring of Bill of Exchange) :** विपत्राच्या दातव्यतिथीला जर स्वीकर्त्याने विपत्र धारकाला, विपत्राची रक्कम देण्यास नकार दिला असेल किंवा असमर्थता दर्शविल्यास विपत्राचे अनादरण झाले असे म्हणतात. विपत्राचे अनादरण दोन प्रकारे होऊ शकते.

i) **विपत्राची स्वीकृती नाकारल्यास – (Dishonour by non-acceptance) :** आदेशिती जेव्हां विपत्र स्वीकारत नाही.

ii) **विपत्राचे शोधन न झाल्यास – (Dishonour by non-payment) :** दातव्यतिथीला आदेशिती/ऋणको विपत्राचे शोधन करण्यास असमर्थ असतो.

विपत्राच्या अनादरण प्रसंगी विपत्रधारी कडून काही कायदेशीर खर्च होत असल्यास असा खर्च देण्याची जबाबदारी स्वीकर्त्याची असते.

**अनादरणाची नोंदणी – (Noting of dishonour) :** विपत्र किंवा वचनचिठ्ठी अनादरीत झाल्याची खरी नोंद नोंदणी अधिकाऱ्याकडे करण्याच्या क्रियेला अनादरणाची नोंदणी असे म्हणतात. जेव्हा विपत्राचे अनादरण होते तेव्हा आदेशितीवर कायदेशीर कारवाई (Sue) करण्यासाठी सूचना देणे आवश्यक असते. परंतु अशी कायदेशीर करवाई (suit) करण्यापूर्वी विपत्रधाराकडे कायदेशीर पुरावा असणे आवश्यक आहे. न्यायालयात जाण्यापूर्वी विपत्राचे खरोखरच अनादरण झाले आहे त्यापूर्वी हा पुरावा मिळवावा लागतो. विपत्रधारी नोंदणी अधिकाऱ्याकडे विपत्र सादर करतो नोंदणी अधिकारी स्वीकर्त्याकडे किंवा आहार्यीकडे शोधनासाठी पुन्हा विपत्र सादर करतो. जेव्हां तो शोधनास नकार देतो तेव्हां विपत्राच्या अनादरणाची नोंदणी योग्य वेळेत करतो.

**प्रमाणन – (Protesting) :** विपत्राचे अनादरण झाल्यानंतर नोंदणी अधिकारी त्याची अधिकृतपणे वरील नोंद करतो या क्रियेलाच प्रमाणन असे म्हणतात. प्रमाणन म्हणजे विपत्र अनादरित झाल्याची लेखी सूचना विपत्राच्या संबंधित पक्षांना दिली जाते.

**नोंदणी अधिकारी – (Notary Public) :** नोंदणी कायदा १९५२च्या कलम ३ नुसार नोंदणी अधिकारी केन्द्र सरकार अथवा राज्य सरकारकडून नियुक्त केलेला कायदेशीर सल्लागार किंवा सरकारी अधिकारी असतो. काही विदेशी कागदपत्रांची सत्यता पडताळणे आणि विनिमय विपत्राच्या अनादरणाची व वचनचिठ्ठीचे प्रमाणन (Protesting) करण्याचे अधिकार नोंदणी अधिकाऱ्याला देण्यात येतात.

**नोंदणी खर्च – (Noting Charges) :** विपत्रधारक विपत्राचे अनादरण झाल्याची नोंद करण्यासाठी विपत्र नोंदणी अधिकाऱ्याकडे घेऊन जातो. विपत्र अनादरण झाल्याच्या कारणांची व तारखेची व इतर काही बाबींची नोंद नोंदणी अधिकारी करतो. अशा प्रकारचे कार्य करण्यासाठी नोंदणी अधिकारी काही फी घेतो त्यास नोंदणी खर्च असे म्हणतात. हा खर्च तात्पुरता विपत्रधारी कडून वसूल केला जातो. किंवा जो व्यक्ती अनादरणाची नोंद करण्यासाठी विपत्र घेऊन नोंदणी अधिकाऱ्याकडे घेऊन जातो त्याच्याकडून वसूल केला जातो. परंतु कायदेशीररित्या हा खर्च देण्याची जबाबदारी आहार्यी (विपत्र स्वीकारणारा) ची असते म्हणून खर्च तात्पुरता विपत्रधारी देतो परंतु शेवटी तो आहार्यीला द्यावा लागतो.

**जमाखर्चानुसार विपत्राचे वर्गीकरण – (Classification of Bills for Accounting) :**

**प्राप्त विपत्र/हुंडी – (Bills Receivable) :** जो व्यक्ती विपत्र लिहितो किंवा काढतो, ते विपत्र त्याच्यासाठी प्राप्त विपत्र असते. आहर्त्यासाठी प्राप्त विपत्र संपत्ती असते.

**देयविपत्र/हुंडी – (Bills Payable) :** ज्या व्यक्तीवर विपत्र लिहिले किंवा काढले जाते आणि तो स्वीकारतो त्याच्याकरिता ते विपत्र देयविपत्र असते. आहार्यीसाठी देयविपत्र देयता असते. प्राप्त विपत्र पुस्तकाचा नमुना (Specimen of Bills Receivable Book)

| विपत्र क्र. | प्राप्त दिनांक | विपत्र दि. | कोणाकडून प्राप्त | आहर्ता | स्वीकर्ता | कोठे देय | मुदत | देय दिनांक | पृष्ठ खा. पा | रक्कम ₹ | रोख पु खा. पा. | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | | | |

**देयविपत्र पुस्तकाचा नमुना** – Specimen of Bills Payable Book

| विपत्र क्र. | विपत्राचा दिनांक | कोणाला देय | आहर्ता | आदाता | कोठे देय | मुदत | देय दिनांक | खा. पा. | रक्कम ₹ दिली | रोख पु. खा. पा. | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | | |


## विनिमय विपत्राची लेखांकीय हाताळणी – (Accounting treatment of Bill of Exchange):

प्राप्त विपत्र ही आहर्त्याची संपत्ती असल्याने तो तिचा खालीलप्रमाणे वापर करू शकतो यालाच विपत्राची विल्हेवाट किंवा उपयोग असेदेखील म्हणतात.




**नकाशा ७.३ (अ)**

१. **विपत्र देय तिथीपर्यन्त स्वत: जवळ ठेवणे – (Retaining the bill till the due date) :** आहर्ता विपत्र देयतिथी पर्यन्त स्वत: जवळ ठेवतो देयतिथीला आहर्ता विपत्र आहार्यीकडे शोधनाकरिता सादर करतो अशावेळी आहार्यीकडून ते विपत्र आदरीत किंवा अनादरित होऊ शकते.



**आहर्ता व आहार्यीच्या पुस्तकात लेखांकीय हाताळणी :**

| | व्यवहार | आहर्त्याचे/धनकोचे पुस्तक | आहार्यी/ऋणकोचे पुस्तक |
|---|---|---|---|
| १ | धनकोने वस्तूंची उधार विक्री केल्यास | ऋणकोचे खाते ........................ नावे<br>विक्री खात्याला<br>(वस्तूंची उधार विक्री केल्याबद्दल) | खरेदी खाते ...............नावे<br>धनकोच्या खात्याला<br>(वस्तूंची उधार खरेदी केल्याबद्दल) |
| २ | धनको/आहर्त्याने विपत्र काढले व त्याला स्वीकृती मिळाली. | प्राप्त विपत्रखाते ....................... नावे<br>आहार्यीच्या खात्याला (विपत्र काढले व त्याला स्वीकृती मिळाल्याबद्दल) | आहर्त्याचे खाते ............नावे<br>देयविपत्र खात्याला<br>(विपत्राला स्वीकृती दिल्याबद्दल) |
| ३ | दातव्यतिथीला विपत्राचे शोधन झाल्यास | रोकड/बँक खाते ...................... नावे<br>प्राप्त विपत्र खात्याला<br>(देयतिथीला विपत्राचे शोधन झाल्याबद्दल) | देयविपत्र खाते..............नावे<br>रोकड/बँक खाते<br>(देयतिथीला विपत्राचे शोधन केल्याबद्दल) |
| ४ | दातव्यतिथीला विपत्राचे अनादरण झाल्यास | आहार्यीचे खाते....................... .नावे<br>प्राप्त विपत्र खात्याला<br>(दातव्यतिथीला विपत्राचे अनादरण झाल्याबद्दल) | देय विपत्र खाते ............नावे<br>आहर्त्याचे खात्याला<br>(देय दिनांकाला विपत्राचे अनादरण झाल्याबद्दल) |
| ५ | देय दिनांकाला विपत्राचे अनादरण झाले व आहर्त्याने नोंदणी खर्च केल्यास | आहार्यीचे खाते........................ नावे<br>प्राप्त विपत्र खात्याला<br>रोकड खात्याला<br>(देय दिनांकाला विपत्राचे अनादरण होऊन नोंदणी खर्च दिल्याबद्दल) | देय विपत्र खाते ...........नावे<br>नोंदणी खर्च खाते ......... नावे<br>आहर्त्याचे खाते<br>(विपत्राचे अनादरण होऊन नोंदणी खर्च देय झाल्याबद्दल) |

जेव्हा विपत्राचे अनादरण होते, तेव्हा आहर्त्याचे कर्तव्य आहे की त्याने ते विपत्र आहार्यीकडे शोधनासाठी सादर करावे. आहर्ता नोंदणीखर्चाचे शोधन करतो नंतर तो आहार्यी कडून वसूल केला जातो.

**विपत्र देयतिथीपर्यन्त स्वत:जवळ ठेवणे उदाहरण:**

१ जून २०१९ रोजी प्रतापने सुजीतला ₹ ८२,०००चा माल विकला. सुजीतने, प्रतापने काढलेले २ महिने मुदतीचे ₹ ८२,०००चे विपत्र स्वीकारले. **प्रताप आणि सुजितच्या पुस्तकात खालील परिस्थितीत किर्द नोंदी सांगा:**

अ) देयतिथीला विपत्र शोधन झाले

ब) देयतिथीला विपत्राचे अनादरण झाले.

क) देयतिथीला विपत्राचे अनादरण झाले व प्रतापने नोंदणी खर्च ₹ २५० दिला.


### प्रतापच्या पुस्तकात किर्द नोंदी

| दिनांक | विवरण | खा.पा. | नावे रक्कम ₹ | जमा रक्कम ₹ |
|---|---|---|---|---|
| २०१९ | सुजितचे खाते ............................................नावे | | ८२,००० | |
| जुन १ | विक्री खात्याला | | | ८२,००० |
| | (मालाची उधार विक्री केल्याबद्दल) | | | |
| जुन १ | प्राप्त विपत्र खाते ........................................नावे | | ८२,००० | |
| | सुजितच्या खात्याला | | | ८२,००० |
| | (विपत्राला स्वीकृती मिळाल्याबद्दल) | | | |
| ऑगस्ट ४ | रोकड खाते... ............................................नावे | | ८२,००० | |
| (अ) | प्राप्त विपत्र खाते | | | ८२,००० |
| | (विपत्राचे शोधन झाल्याबद्दल) | | | |
| ऑगस्ट ४ | सुजितचे खाते ............................................नावे | | ८२,००० | |
| (ब) | प्राप्त विपत्र खात्यात | | | ८२,००० |
| | (देयतिथीला विपत्राचे अनादरण झाल्याबद्दल) | | | |
| ऑगस्ट ४ | सुजितचे खाते ............................................नावे | | ८२,२५० | |
| (क) | प्राप्त विपत्र खात्यात | | | ८२,००० |
| | रोकड खाते | | | २५० |
| | (विपत्राचे अनादरण होऊन नोंदणी खर्च झाल्याबद्दल) | | | |

### सुजितच्या पुस्तकात किर्द नोंदी

| दिनांक | विवरण | खा.पा. | नावे रक्कम ₹ | जमा रक्कम ₹ |
|---|---|---|---|---|
| २०१९ | खरेदी खाते..................................................नावे | | ८२,००० | |
| जून १ | प्रतापच्या खात्यात | | | ८२,००० |
| | (वस्तूची उधार खरेदी केल्याबद्दल) | | | |
| जून १ | प्रतापच्या खात्यात ........................................नावे | | ८२,००० | |
| | देयविपत्र खात्याला | | | ८२,००० |
| | (विपत्राला स्वीकृती दिल्याबद्दल) | | | |
| ऑगस्ट ४ | देयविपत्र खाते..............................................नावे | | ८२,००० | |
| | रोकड/बँक खात्याला | | | ८२,००० |
| | (विपत्राचे शोधन केल्याबद्दल) | | | |
| ऑगस्ट ४ | देयविपत्र खाते...............................................नावे | | ८२,००० | |
| | प्रतापच्या खात्यात | | | ८२,००० |
| | (देयदिनांकाला विपत्राचे अनादरण झाल्याबद्दल) | | | |
| ऑगस्ट ४ | देयविपत्र खाते...............................................नावे | | ८२,००० | |
| | नोंदणी खर्च खाते ........................................नावे | | २५० | |
| | प्रतापच्या खात्याला | | | ८२,२५० |
| | (विपत्राचे अनादरण होऊन नोंदणी खर्च देय झाल्याबद्दल) | | | |

२.  **विनिमय विपत्र (हुंडी) वटविणे (पूर्व प्रापण) – (Discounting the Bill of Exchange) :** ठरावीक मुदतीकरिता विपत्र काढले जाते आणि स्वीकर्ता देयदिनांकला रक्कम शोधन करतो. दातव्यतिथीपूर्वी आहर्ता किंवा विपत्रधारक बँकेतून विपत्र वटवून रक्कम प्राप्त करू शकतो. विपत्र वटविणे म्हणजे सध्याच्या किंमतीला रोख रकमेत रूपांतरण करणे. साधारणतः बँका हुंड्या/विपत्रे वटवू शकतात, त्यासाठी आहर्त्याचे बँकेत खाते असणे आवश्यक आहे. या सेवेसाठी बँका ठरावीक रक्कम कापून घेतात त्यास हुंडी वटविल्याची कसर असे म्हणतात. कसर आहर्त्याचा खर्च समजून लेखा पुस्तकात नावे केला जातो.




**कसरीची गणना – (Calculation of Discount):**

**उदाहरण १ :** १ एप्रिल २०२० रोजी राहुल ने अतुलवर ४ महिने मुदतीचे ₹ १५,०००चे विपत्र काढले. खालील परिस्थितीत कसरीची राशी काढून दाखवा.

i)  १ एप्रिल २०२० रोजी विपत्र वार्षिक १०% कसरीवर वटविण्यात आले.

ii)  १ जुन २०२० रोजी विपत्र वार्षिक १०% कसरीवर वटविण्यात आले.

**उत्तर :**

i) कसर $= \text{विपत्राची राशी} \times \frac{\text{दर}}{१००} \times \frac{\text{मुदतीचे महिने}}{१२}$

$= १५,००० \times \frac{१०}{१००} \times \frac{४}{१२}$

$=$ ₹ ५००

ii) कसर $= \text{विपत्राची राशी} \times \frac{\text{दर}}{१००} \times \frac{\text{मुदतीचे महिने}}{१२}$

$= १५,००० \times \frac{१०}{१००} \times \frac{२}{१२}$

$=$ ₹ २५०

(सूचना : विपत्र बँकेत फक्त दोन महिने होते)

**उदाहरण २ :**

१५ मे, २०१९ रोजी शिवमने, गणेश वर ६० दिवस मुदतीचे ₹ २१,९००चे विपत्र काढले. त्याच दिवशी त्याने ते विपत्र त्याच्या बँकेत वार्षिक ८% कसरीवर वटविले. **कसरीची राशी काढून दाखवा.**

**उत्तर :**

$$\text{कसर} = \text{विपत्राची राशी} \times \frac{\text{दर}}{१००} \times \frac{\text{एकूण दिवस}}{३६५}$$

$$= ₹\ २१,९०० \times \frac{८}{१००} \times \frac{६०}{३६५}$$

$$= ₹\ २८८$$

**उदाहरण ३ :**

१ मार्च, २०२० रोजी पंकज ने संजयवर ९० दिवस मुदतीचे ₹ २५,६२०चे विपत्र काढले. त्यात दिवस ते विपत्र त्याच्या बँकेत त्याने वार्षिक १०% कसरीवर वटविले. **कसरीची राशी काढून दाखवा.**

**उत्तर:**

$$\text{कसर} = \text{विपत्राची राशी} \times \frac{\text{दर}}{१००} \times \frac{\text{विपत्राची मुदत}}{३६६}$$

$$= ₹\ २५,६२० \times \frac{१०}{१००} \times \frac{९०}{३६६}$$

$$= ₹\ ६३०$$

(सूचनाः २०२०हे लिपवर्ष आहे, म्हणून ३६६ दिवस घेतले.)

**आहर्ता व आहार्यीच्या पुस्तकात लेखांकीय हाताळणी–(Accounting Treatment in the Books of Drawer and Drawee):**

| | व्यवहार | आहर्त्याच्या पुस्तकात | आहार्यीच्या पुस्तकात |
|---|---|---|---|
| १ | आहर्त्याने विपत्र बँकेत वटविल्यास | बँक खाते ............................ नावे<br>कसर खाते ........................... नावे<br>प्राप्त विपत्र खात्याला<br>(कसरीवर विपत्र बँकेत वटविल्याबद्दल) | कोणतीही नोंद होणार नाही कारण आहार्यीच्या या व्यवहाराशी काही संबंध नाही |
| २ | दातव्यतिथीला विपत्राचे शोधन झाल्यास | कोणतीही नोंद होणार नाही कारण आहर्त्याने रोख रक्कम प्राप्त केली आहे. | देय विपत्र खाते ............. नावे<br>रोकड/बँक खात्याला<br>(आपल्या स्वीकृतीचे शोधन केल्याबद्दल) |
| ३ | देय दिनांकला वटवलेल्या विपत्राचे अनादरण झाल्यास | आहार्यीचे खाते....................... नावे<br>बँक खात्याला<br>(देयदिनांकाला वटवलेल्या विपत्राचे अनादरण झाल्याबद्दल) | देय विपत्र खाते ............. नावे<br>आहर्त्याच्या खात्यात<br>(आपल्या स्वीकृतीचे अनादरण झाल्याबद्दल) |
| ४ | वटवलेल्या विपत्राचे अनादरण होऊन बँकेने नोंदणी खर्च दिल्याबद्दल) | आहार्यीचे खाते....................... नावे<br>बँक खात्याला<br>(देयदिनांकला विपत्राचे अनादरण होऊन नोंदणी बँकेने दिल्याबद्दल) | देय विपत्र खाते ............. नावे<br>नोंदणी खर्च खाते ........... नावे<br>आहर्त्याचे खात्याला<br>(स्वीकृतीचे अनादरण होऊन नोंदणी खर्च देय झाल्याबद्दल) |

**अतिरिक्त माहिती –** अशा विपत्राचा दलाल जो घरी किंवा संस्थेत ठरावीक शुल्क (Fees) घेऊन विपत्राची कसरीवर खरेदी विक्री करतो.

**उदाहरण – विपत्र कसरीवर बँकेत वटविणे –(Discounting the bill with the bank) :**

अजिंक्यला, अश्विनचे रु. ४५,००० देणे होते. १२ जुलै, २०१९ रोजी अश्विनला ₹ १५,०००चा रेखांकित धनादेश व बाकी रकमेची ₹ ३०,०००चे ३ महिने मुदतीचे विपत्र मिळाले त्याच अश्विनने ते विपत्र त्याच्या बँकेत वार्षिक १५% कसरीवर वटविले.

**खालील परिस्थितीत अश्विन व अजिंक्यच्या पुस्तकात किर्द नोंदी घ्या:**

अ) देय दिनांकला विपत्राचे शोधन झाले.

ब) देय दिनांकला विपत्राचे अनादरण झाले

क) देय दिनांकला विपत्राचे अनादरण झाले व बँकेने ₹ ३०० नोंदणी खर्च दिला.

**अश्विनच्या पुस्तकात किर्द नोंदी**

| दिनांक | विवरण | खा. पा. | नावे रक्कम ₹ | जमा रक्कम ₹ |
|---|---|---|---|---|
| २०१९ | प्राप्त विपत्र खाते.............................................. नावे | | ३०,००० | |
| जुलै १२ | बँक खाते ..............................................नावे | | १५,००० | |
| | अजिंक्यच्या खात्याला | | | ४५,००० |
| | (धनादेश व विपत्राला स्वीकृती मिळाल्याबद्दल) | | | |
| जुलै १२ | बँक खाते ..............................................नावे | | २८,८७५ | |
| | कसर खाते ..............................................नावे | | १,१२५ | |
| | प्राप्त विपत्र खात्याला | | | ३०,००० |
| | (१५% वार्षिक कसरीवर विपत्र बँकेत वटविल्याबद्दल) | | | |
| अ) ऑक्टो. १५ | नोंद होणार नाही | | | |
| ब) ऑक्टो. १५ | अजिंक्यचे खाते ..............................................नावे | | ३०,००० | |
| | बँक खात्याला | | | ३०,००० |
| | (वटविलेल्या विपत्राचे अनादरण झाल्याबद्दल) | | | |
| क) ऑक्टो. १५ | अजिंक्यचे खाते ..............................................नावे | | ३०,३०० | |
| | बँक खात्याला.............................................. | | | ३०,३०० |
| | (वटविलेल्या विपत्राचे अनादरण होऊन नोंदणी खर्च आल्याबद्दल | | | |


**सूचना :–** बँकेने केलेला नोंदणी खर्च एकूण रकमेत समाविष्ट करण्यात आला.

**अश्विनच्या पुस्तकात किर्द नोंदी**

| दिनांक | विवरण | खा. पा. | नावे रक्कम ₹ | जमा रक्कम ₹ |
|---|---|---|---|---|
| २०१९ | अश्विनचे खाते..........................................नावे | | ४५,००० | |
| जुलै १२ | बँक खात्याला | | | १५,००० |
| | देयविपत्र खात्याला | | | ३०,००० |
| | (अश्विनला धनादेश व देयवित्राला स्वीकृती दिल्याबद्दल) | | | |
| अ) ऑक्टो. | देयविपत्र खाते..........................................नावे | | ३०,००० | |
| १५ | रोकड/बँक खात्याला | | | ३०,००० |
| | (देयदिनांकाला विपत्राचे शोधन केल्याबद्दल) | | | |
| ब) ऑक्टो. | देयविपत्र खाते..........................................नावे | | ३०,००० | |
| १५ | अश्विनच्या खात्याला.................. | | | ३०,००० |
| | (देयदिनांकाला विपत्राचे अनादरण झाल्याबद्दल) | | | |
| क) ऑक्टो. | देयविपत्र खाते..........................................नावे | | ३०,००० | |
| १५ | नोंदणी खर्च खाते..........................................नावे | | ३०० | |
| | अश्विनच्या खात्याला | | | ३०,३०० |
| | (विपत्राचे अनादरण होऊन नोंदणी खर्च देय झाल्याबद्दल | | | |

### ३. विनिमय विपत्राचे (हुंडी) पृष्ठांकन – (Endorsement of Bill of Exchange) :

विपत्रधारक किंवा आहर्ता त्याच्या सावकाराकडे आपली देणी फेडण्यासाठी विपत्राचा उपयोग करू शकतो. विपत्राचे पृष्ठांकन विपत्राच्या (हुंडीच्या) मागच्या बाजूला स्वतःची सही करून केले जाते. त्यालाच विपत्राचे पृष्ठांकन झाले असे म्हणतात. विपत्र हे पराक्रम्य विलेख आहे म्हणून विपत्र कुणालाही एका व्यक्तीकडून दुसऱ्याकडे हस्तांतरित करता येते. जी व्यक्ती विपत्राचे पृष्ठांकन करते त्यास पृष्ठांकक (Endorser) असे म्हणतात आणि ज्या व्यक्तीच्या नावे पृष्ठांकन केले जाते त्या व्यक्तीला पृष्ठांकिती (Endorsee) असे म्हणतात. देयतिथीपर्यन्त असे पृष्ठांकन कितीही वेळा होऊ शकते.




**आहर्ता, आहार्यीच्या व पृष्ठांकितीच्या पुस्तकात लेखांकीय हाताळणी – (Accounting Treatment in the Books of**

Drawer, Drawee and Endorsee) :

| अहर्त्याने पृष्ठांकितीला विपत्राचे पृष्ठांकन केल्यास | | | |
|---|---|---|---|
| १. | अहर्त्याचे / पृष्ठांककाचे पुस्तक | आहार्यीचे पुस्तक | पृष्ठांकितीचे पुस्तक |
| | पृष्ठांकितीचे खाते ........नांवे<br>प्राप्त विपत्र खात्याला<br>(धनकोला विपत्राचे पृष्ठांकन केल्याबद्दल | नोंद होणार नाही कारण आहार्यीचा या व्यवहाराशी संबंध नाही | प्राप्त विपत्र खाते ............नावे<br>पृष्ठांककाचे खात्याला<br>(ऋणकोकडून प्राप्त विपत्र मिळाल्याबद्दल) |
| देयदिनांकला विपत्राचा आदर/शोधन झाल्यास | | | |
| २. | आहर्ता/पृष्ठांककाच्या पुस्तकात | आहार्यीच्या पुस्तकात | पृष्ठांकितीच्या पुस्तकात |
| | आहर्त्याच्या पुस्तकात नोंद होणार नाही कारण त्याचा या व्यवहाराशी संबंध नाही | देयविपत्र खाते......................... नावे<br>रोकड/बँक खात्याला<br>(विपत्राचे शोधन केल्याबद्दल) | रोकड बँक खाते .............नावे<br>प्राप्तविपत्र खात्याला<br>(प्राप्त विपत्राची रक्कम मिळाल्याबद्दल) |
| देयदिनांकला पृष्ठांकित विपत्राचे अनादरण झाल्यास | | | |
| ३. | आहर्ता/पृष्ठांककाच्या पुस्तकात | आहार्यीच्या पुस्तकात | पृष्ठांकितीच्या पुस्तकात |
| | आहार्यीचे खाते...........नावे<br>पृष्ठांकितीचे खात्याला<br>(देयदिनांकला पृष्ठांकित विपत्राचे अनादरण झाल्याबद्दल) | देयविपत्र खाते......................... नावे<br>आहर्त्याच्या खात्याला<br>(आपल्या स्वीकृतीचे अनादरण झाल्याबद्दल) | पृष्ठांककाचे खाते ...........नावे<br>प्राप्तविपत्र खात्याला<br>(प्राप्त विपत्राचे अनादरण झाल्याबद्दल) |
| पृष्ठांकित विपत्राचे अनादरण होऊन पृष्ठांकितीने नोंदणी खर्च दिल्याबद्दल | | | |
| ४. | आहर्ता/पृष्ठांककाच्या पुस्तकात | आहार्यीच्या पुस्तकात | पृष्ठांकितीच्या पुस्तकात |
| | आहार्यीचे खाते...........नावे<br>पृष्ठांकिती खात्याला<br>(पृष्ठांकित विपत्राचे अनादरण होऊन नोंदणी झाल्याबद्दल<br>(विपत्राची राशी + नोंदणी खर्च) | देयविपत्र खाते......................... नावे<br>नोंदणी खर्च खाते ...................... नावे<br>आहर्त्याच्या खात्याला<br>(आपल्या स्वीकृतीचे अनादरण होऊन नोंदणी खर्च देय झाल्याबद्दल | पृष्ठांककाचे खाते ...........नावे<br>प्राप्त विपत्र खात्याला<br>रोकड खात्याला<br>(प्राप्त विपत्राचे अनादर होऊन नोंदणी खर्च दिल्याबद्दल |

### उदाहरण – विपत्राचे पृष्ठांकन (Endorsement of Bill)

१६ फेब्रुवारी, २०१९ रोजी पल्लवी ने वंदनाला ₹ २५,००० चा १०% व्यापारी कसरीवर  माल विकला. त्याच दिवशी पल्लवी ने काढलेले ३ महिने मुदतीचे विपत्र तिने स्वीकारले. १८ फेब्रुवारी, २०१९ रोजी पल्लवीने विपत्र तिची धनको पूर्वाला पृष्ठांकीत केले. **खालील परिस्थितीत पल्लवी, वदंना आणि पूर्वाच्या पुस्तकात किर्द नोंदी घ्या.**

अ) देयदिनांकला विपत्राचे शोधन झाले.

ब) देयदिनांकला विपत्राचे अनादरण झाले.

क) देयदिनांकला विपत्राचे अनादरण झाले व पूर्वाला ₹ १७५ नोंदणी खर्च आला.

### पल्लवीच्या पुस्तकात किर्द नोंदी –

| दिनांक | विवरण | खा. पा. | नावे रक्कम ₹ | जमा रक्कम ₹ |
|---|---|---|---|---|
| २०१९ | वंदनाचे खाते ..................................................नावे | | २२,५०० | |
| फेब्रु. १६ | विक्री खात्याला | | | २२,५०० |
| | (मालाची उधार विक्री केल्याबद्दल) | | | |
| अ) फेब्रु. | प्राप्त विपत्र खाते ..................................................नावे | | २२,५०० | |
| १६ | वंदनाचे खात्याला | | | २२,५०० |
| | (विपत्र काढण्यात आले व त्याला स्वीकृती मिळाल्याबद्दल) | | | |
| ब) फेब्रु. १८ | पूर्वाचे खाते ..................................................नावे | | २२,५०० | |
| | प्राप्तविपत्र खात्याला | | | २२,५०० |
| | (विपत्राचे पृष्ठांकन केल्याबद्दल) | | | |
| अ) मे १९ | नोंद होणार नाही | | | |
| ब) मे १९ | वंदनाचे खाते ..................................................नावे | | २२,५०० | |
| | पूर्वाच्या खात्याला | | | २२,५०० |
| | (वंदनाचे स्वीकृत पृष्ठांकीत विपत्राचे अनादरण झाल्याबद्दल) | | | |
| क) मे १९ | वदंनाचे खाते ..................................................नावे | | २२,६७५ | |
| | पूर्वाच्या खात्याला | | | २२,६७५ |
| | (विपत्राचे अनादरण होऊन नोंदणी खर्च झाल्याबद्दल) | | | |

### वंदनाच्या पुस्तकात किर्द नोंदी –


| दिनांक | विवरण | खा.पा. | नावे रक्कम ₹ | जमा रक्कम ₹ |
|---|---|---|---|---|
| २०१९ | खरेदी खाते ..................................................नावे | | २२,५०० | |
| फेब्रु. १६ | पल्लवीचे खात्याला | | | २२,५०० |
| | (मालाची उधार खरेदी केल्याबद्दल) | | | |
| फेब्रु. १८ | पल्लवीचे खाते ..................................................नावे | | २२,५०० | |
| | देय विपत्र खात्याला | | | २२,५०० |
| | (विपत्राला स्वीकृती दिल्याबद्दल) | | | |
| अ) मे १९ | देयविपत्र खाते ..................................................नावे | | २२,५०० | |
| | रोकड/बँक खात्याला | | | २२,५०० |
| | (देयदिनांकला विपत्राचे शोधन झाल्याबद्दल) | | | |
| ब) मे १९ | देयविपत्र खाते ..................................................नावे | | २२,५०० | |
| | पल्लवीच्या खात्याला | | | २२,५०० |
| | (देयदिनांकाला विपत्राचे अनादरण झाल्याबद्दल) | | | |
| क) मे १९ | देयविपत्र खाते ..................................................नावे | | २२,५०० | |
| | नोंदणी खर्च खाते..............................................नावे | | १७५ | |
| | पल्लवीच्या खात्याला | | | २२,६७५ |
| | (विपत्राचे अनादरण होऊन नोंदणी खर्च झाल्याबद्दल) | | | |

**पूर्वाच्या पुस्तकात किर्दनोंदी**

| दिनांक | विवरण | खा. पा. | नावे रक्कम ₹ | जमा रक्कम ₹ |
|---|---|---|---|---|
| २०१९ | प्राप्त विपत्रखाते ............................................नावे | | २२,५०० | |
| फेब्रु. १८ | पल्लवीच्या खात्याला | | | २२,५०० |
| | (पल्लवीकडून विपत्र मिळाल्याबद्दल) | | | |
| अ) मे १९ | रोकड/बँक खाते ..........................................नावे | | २२,५०० | |
| | प्राप्त विपत्र खात्याला | | | २२,५०० |
| | (देयदिनांकला विपत्राचे शोधन झाल्याबद्दल) | | | |
| ब) मे १९ | पल्लवीचे खाते ............................................नावे | | २२,५०० | |
| | प्राप्त विपत्र खात्याला | | | २२,५०० |
| | (विपत्राचे अनादरण झाल्याबद्दल) | | | |
| क) मे १९ | पल्लवीचे खाते ............................................नावे | | २२,६७५ | |
| | प्राप्त विपत्र खात्याला | | | २२,५०० |
| | रोकड खात्याला | | | १७५ |
| | (विपत्राचे अनादरण होऊन नोंदणी खर्च देय झाल्याबद्दल) | | | |

## ४. राशी संग्रहणासाठी विपत्र बँकेत पाठविणे – (Bill sent to Bank for Collection):

विपत्रधारक रक्कम गोळा करण्याकरिता विपत्र बँकेत पाठवू शकतो. व्यवसायात मोठ्या प्रमाणावर नियमितपणे प्राप्त विपत्रे (हुंड्या) प्राप्त होतात. अशा परिस्थितीत त्या विपत्राचे विविध आहार्यी (ऋणको) आणि त्याच्या देयतारखा लक्षात ठेवणे कठीण असते, म्हणून आहर्ता विपत्र त्याच्या बँकेत पाठवितो. देय दिनांकला आहर्त्याच्या सूचनेनुसार बँक विपत्राची राशी गोळा करते या सेवेसाठी बँक शुल्काची (Bank charges) आकारणी करते. आहर्ता जमा खर्चाच्या पुस्तकात या करिता तात्पुरते खाते उघडतो, त्या खात्याला "राशी संग्रहणासाठी बँक खाते" असे म्हणतात. या विपत्राच्या देय दिनांकाला हे खाते बंद करण्यात येते.



**आहर्ता व आहार्यीच्या पुस्तकात लेखांकीय हाताळणी(Accounting Treatment in the Books of Drawer and Drawee) :**

| | व्यवहार | आहात्यीच्या पुस्तकात | आहार्यीच्या पुस्तकात |
|---|---|---|---|
| १ | विपत्र राशी संग्रहणासाठी बँकेत पाठविले. | राशी संग्रहणासाठी बँक खाते ........... नावे<br>प्राप्त विपत्र खात्याला<br>(विपत्र राशी संग्रहणासाठी बँकेत पाठविल्याबद्दल) | नोंद होणार नाही कारण या व्यवहाराशी आहार्यीचा काहीही संबंध नाही. |
| २ | देय दिनांकला विपत्राचे शोधन झाल्यास आणि बँकेने सेवा शुल्क नावे टाकल्यास | बँक खाते ............................ नावे<br>बँक शुल्क खाते ...................... नावे<br>राशी संग्रहणासाठी बँकखात्याला<br>(विपत्राचे शोधन झाल्याबद्दल) | देय विपत्र खाते ............नावे<br>रोकड/बँक खात्याला<br>(आपल्या स्वीकृतीचे शोधन केल्याबद्दल) |
| ३ | देय दिनांकला राशी संग्रहणासाठी पाठविलेल्या विपत्राचे अनादरण होणे. | आहार्यीचे खाते....................... नावे<br>राशी संग्रहणासाठी बँक खात्याला<br>(राशी संग्रहणासाठी पाठविलेल्या विपत्राचे अनादरण झाल्याबद्दल) | देय विपत्र खाते .............नावे<br>आहात्यीच्या खात्याला<br>(आपल्या स्वीकृतीचे अनादरण झाल्याबद्दल) |
| ४ | देय दिनांकला राशी संग्रहणासाठी पाठविलेले विपत्र अनादरित होणे व बँकेने नोंदणी खर्च देणे | आहार्यीचे खाते....................... नावे<br>राशीसंग्रहणासाठी बँक खात्याला<br>बँक खात्याला<br>(राशी संग्रहणासाठी पाठविलेले विपत्राचे अनादरण होऊन नोंदणी खर्चाचे शोधन झाल्याबद्दल) | देय विपत्र खाते ............नावे<br>नोंदणी खर्च खाते ...........नावे<br>आहात्यीच्या खात्याला<br>(आपल्या स्वीकृतीचे अनादरण होऊन नोंदणी खर्च देय झाल्याबद्दल) |

**उदाहरण – राशी संग्रहणासाठी विपत्र बँकेत पाठविणे. (Bill sent to the Bank for collection) :**

८ मार्च, २०१९ रोजी अनिताने, नीताला ₹ ३३,५००चा माल विकला त्याच दिवशी अनिताने, नीतावर ४ महिने मुदतीचे ₹ २२,५०० चे विपत्र काढले ४ एप्रिल, २०१९ला अनिताने ते विपत्र राशी संग्रहणासाठी बँकेत पाठविले.

**खालील परिस्थितीत अनिता आणि नीताच्या पुस्तकात किर्द नोंदी करा –**

अ) देय दिनांकला विपत्राचे शोधन झाले अनिताला ₹ २०० बँक सेवाशुल्क द्यावे लागले.

ब) देय दिनांकला विपत्राचे अनादरण झाले

क) देय दिनांकला विपत्राचे अनादरण झाले व नोंदणी खर्च ₹ १५० आला

**अनिताच्या पुस्तकात किर्द नोंदी**

| दिनांक | विवरण | खा. पा. | नावे रक्कम ₹ | जमा रक्कम ₹ |
|---|---|---|---|---|
| २०१९ मार्च, ८ | नीताचे खाते........................................नावे<br>विक्री खात्याला..........................<br>(मालाची उधार विक्री केल्याबद्दल) | | ३३,५०० | <br>३३,५०० |
| मार्च, ८ | प्राप्त विपत्र खाते ........................................नावे<br>नीताच्या खात्याला<br>(विपत्राला स्वीकृती मिळाल्याबद्दल) | | २२,५०० | <br>२२,५०० |
| एप्रिल ४ | राशी संग्रहणासाठी बँक खाते.....................................नावे<br>प्राप्त विपत्र खात्याला<br>(राशी संग्रहणासाठी विपत्र बँकेत पाठविल्याबद्दल) | | २२,५०० | <br>२२,५०० |
| जुलै ११ अ) | बँक खाते ........................................नावे<br>बँक शुल्क खाते ........................................नावे<br>राशी संग्रहणासाठी बँक खात्याला<br>(देय दिनांकला विपत्राचे शोधन झाले बँक शुल्काचे दिल्याबद्दल) | | २२,३००<br>२०० | <br>२२,५०० |
| जुलै ११ ब) | नीताचे खाते........................................नावे<br>राशीसंग्रहणासाठी बँक खात्याला<br>(देय दिनांकला विपत्राचे अनादरण झाल्याबद्दल) | | २२,५०० | <br>२२,५०० |
| जुलै ११ क) | नीताचे खाते........................................नावे<br>राशीसंग्रहणासाठी बँक खात्याला<br>बँक खात्याला<br>(विपत्राचे अनादरण होऊन नोंदणी खर्च देय झाल्याबद्दल) | | २२,६५० | <br>२२,५००<br>१५० |

**नीताच्या पुस्तकात किर्द नोंदी**

| दिनांक | विवरण | खा. पा. | नावे रक्कम ₹ | जमा रक्कम ₹ |
|---|---|---|---|---|
| २०१९ मार्च, ८ | खरेदी खाते........................................नावे<br>अनिताच्या खात्याला<br>(मालाची उधार खरेदी केल्याबद्दल) | | ३३,५०० | <br>३३,५०० |
| मार्च, ८ | अनिताचे खाते ........................................नावे<br>देय विपत्र खात्याला<br>(विपत्राला स्वीकृती दिल्याबद्दल) | | २२,५०० | <br>२२,५०० |
| जुलै ११ अ) | देय विपत्र खाते........................................नावे<br>रोकड/बँक खात्याला<br>(देय दिनांकला विपत्राचे शोधन झाल्याबद्दल) | | २२,५०० | <br>२२,५०० |
| जुलै, ११ ब) | देय विपत्र खाते........................................नावे<br>अनिताच्या खात्याला<br>(विपत्राचे अनादरण झाल्याबद्दल) | | २२,५०० | <br>२२,५०० |
| जुलै ११ क) | देय विपत्र खाते........................................नावे<br>नोंदणी खर्च खाते........................................नावे<br>अनिताच्या खात्याला<br>(विपत्राला अनादरण होऊन नोंदणी खर्च देय झाल्याबद्दल) | | २२,५००<br>१५० | <br><br>२२,६५० |

### विनिमय विपत्राचे नूतनीकरण किंवा नवकरण – (Renewal of Bill of Exchange) :

देयतिथीपूर्वी विपत्र रद्द करणे व वाढीव मुदतीचे नवीन विपत्र करण्याच्या क्रियेला विपत्राचे नूतनीकरण असे म्हणतात. विपत्राच्या देयतिथीला विपत्राचे शोधन करू शकत नाही असे आहार्यीला लक्षात आल्यास तो आहार्त्याला जुने विपत्र रद्द करून त्या ऐवजी नवीन विपत्र वाढीव मुदतीचे काढण्याची विनंती करतो. जर आहर्त्याने त्याची ही विनंती मान्य केली व रक्कम (उधारी) शोधनासाठी जास्तीचा वेळ दिल्यास, आहार्यीला व्याज द्यावे लागते. व्याजाची रक्कम अंशतः रकमेसोबत अथवा नवीन विपत्रासोबत द्यावी लागते.

### विपत्राच्या नूतनीकरणाचे टप्पे – (Steps in Renewal of Bill) :

i. जुने विपत्र रद्द (Cancellation) करणे.
ii. शिल्लक रकमेवर व्याज देय (Due) होणे.
iii. अंशतः रकमेची प्राप्ती/शोधन
iv. नवीन विपत्र काढणे आणि स्वीकारणे.

### आहर्ता व आहार्यीच्या पुस्तकात लेखांकीय हाताळणी – (Accounting Treatment in the Books of Drawer and Drawee) :

| | व्यवहार | आहर्त्याच्या पुस्तकात | आहार्यीच्या पुस्तकात |
|---|---|---|---|
| १ | जुने विपत्र रद्द होणे | आहार्यीचे खाते........................ नावे<br>प्राप्त विपत्र खात्याला किंवा<br>बँक खात्याला किंवा<br>राशी संग्रहणासाठी बँक खात्याला किंवा<br>पृष्ठांकितीच्या खात्याला<br>(नूतनीकरणासाठी जुने विपत्र रद्द केल्याबद्दल) | देय विपत्र खाते ..............नावे<br>आहर्त्याच्या खात्यात<br>(नूतनीकरणासाठी आपली स्वीकृती रद्द केल्याबद्दल) |
| २ | शेष रकमेवर व्याज देय झाल्यास | आहार्यीचे खाते........................ नावे<br>व्याज खात्याला<br>(व्याज येणे झाल्याबद्दल) | व्याज खाते..................नावे<br>आहर्त्याच्या खात्याला<br>(व्याज देणे झाल्याबद्दल) |
| ३ | अंशतः रक्कम मिळाल्यास | रोकड खाते / बँक खाते ............... नावे<br>आहार्यीच्या खात्याला<br>(अंशतः रोख रक्कम मिळाल्याबद्दल)<br>(अंशतः रक्कमेत व्याजाची रक्कम समाविष्ट असल्यास रोकड खात्यात सामाविष्ट करावी.) | आहर्त्याचे खाते .............नावे<br>रोकड/बँक खात्याला<br>(अंशतः रक्कम व व्याजाचे शोधन केल्याबद्दल) |
| ४ | नवीन विपत्र काढणे व स्वीकारणे | प्राप्त विपत्र खाते ...................... नावे<br>आहार्यीच्या खात्याला<br>(नवीन विपत्राला स्वीकृती मिळाल्याबद्दल)<br>(व्याजाची रक्कम येणे असल्यास नवीन विपत्रात समाविष्ट करावी.) | आहर्त्याचे खाते .............नावे<br>देयविपत्र खात्याला<br>(शेष रक्कमेसाठी विपत्र स्वीकारल्याबद्दल) |

**सूचना :** जेव्हा विपत्राचे अनादरण होते, तेव्हा आहार्यीचे खाते नावे होते. आणि

* देय दिनांक पर्यन्त विपत्र स्वतः जवळ असल्यास प्राप्त विपत्र खाते जमा होईल.
* वटवलेले विपत्र असल्यास बँक खाते जमा होईल.
* राशी संग्रहणाकरिता विपत्र बँकेत पाठविल्यास राशी संग्रहणाकरिता बँक खाते जमा होईल.

ड. पृष्ठांकित विपत्र असल्यास पृष्ठांकितीचे खाते जमा करण्यात येईल.

**व्याज, अंशतः रकमेचे शोधन आणि नवीन विपत्राला स्वीकृती देण्याच्या पद्धती.**

(Different ways to pay interest, Part Payment and acceptance of new bill)

अ. व्याजाचे रोख शोधन करणे आणि पूर्ण रकमेसाठी नवीन विपत्र काढणे आणि स्वीकारणे.

ब. अंशतः रकमेचे व्याजासह शोधन करणे आणि शेष रकमेचे नवीन विपत्र काढणे व स्वीकारणे.

क. व्याजाशिवाय अंशतः रकमेचे शोधन करणे आणि शेष रकमेसाठी व्याजासह नवीन विपत्र काढणे व स्वीकारणे.

**पर्यायी लेखांकीय हाताळणी (जेव्हा व्याज ताबडतोब रोख दिले जाते)** Alternate Accounting Treatment (When interest paid in cash immediately)

| | व्यवहार | आहर्त्याच्या पुस्तकात | आहार्यीच्या पुस्तकात |
|---|---|---|---|
| १ | जुने विपत्र रद्द करणे. | आहार्यीचे खाते........................ नावे<br>प्राप्त विपत्र खात्याला किंवा<br>बँक खात्याला किंवा<br>राशीसंग्रहणाकरिता बँक खात्याला किंवा<br>पृष्ठांकितीच्या खात्याला<br>(नूतनीकरणासाठी जूने विपत्र रद्द केल्याबद्दल) | देय विपत्र खाते ..............नावे<br>आहर्त्याच्या खात्यात<br>(नूतनीकरणाकरिता आपली स्वीकृती रद्द केल्याबद्दल) |
| २ | अंशतः रकमे सोबत व्याज देणे. | रोकड/बँक खाते ...................... नावे<br>आहार्यीच्या खात्याला<br>व्याज खात्याला<br>(अंशतः रक्कम व व्याज रोख मिळाल्याबद्दल) | आहर्त्याचे खाते ............नावे<br>व्याज खाते..................नावे<br>रोकड/बँक खात्याला<br>(व्याज व काही रक्कम रोख दिल्याबद्दल) |
| ३ | शेष रकमेसाठी नवीन विपत्र काढणे आणि स्वीकारणे– | प्राप्त विपत्र खाते ...................... नावे<br>आहार्यीच्या खात्याला<br>(नवीन विपत्राला स्वीकृती मिळाल्याबद्दल) | आहर्त्याचे खाते ............नावे<br>देयविपत्र खात्याला<br>(नवीन विपत्राला स्वीकृती दिल्याबद्दल) |

**करसरीवर विपत्राचे निवर्तन – (Retirment of Bill under Rebate) :**

विपत्राचे निवर्तन म्हणजे देयतिथीपूर्वीच विपत्राचे शोधन करणे होय. जेव्हा आहार्यी देयतिर्थीपूर्वीच विपत्रधारकाला विपत्राचे शोधन करण्यास तयार असतो, तेव्हा त्यास विपत्राचे निवर्तन असे म्हणतात. अशा परिस्थितीत आहर्ता, आहार्यीस काही सूट/कसर देतो. ही सूट/कसर आहर्त्यासाठी खर्च असते तर आहार्यीसाठी उत्पन्न असते.

**आहर्ता व आहार्यीच्या पुस्तकात लेखांकीय हाताळणी (Accounting Teratment in the Books of Drawe rand Drawee) :**

| आहर्त्याच्या पुस्तकात | आहार्यीच्या पुस्तकात |
|---|---|
| रोकड खाते......................................नावे<br>कसर खाते.......................................नावे<br>प्राप्त विपत्र खात्याला<br>(कसरीवर विपत्राचे निवर्तन झाल्याबद्दल) | देयविपत्र खाते....................................नावे<br>रोकड/बँक खात्याला<br>कसर खात्याला<br>(आपल्या स्वीकृतीचे निवर्तने होऊन कसर मिळाल्याबद्दल) |

**आहार्यीची दिवाळखोरी/नादारी – (Insolvency of Drawee) :**

असा व्यक्ती ज्याची देयता ही त्याच्या संपत्तीपेक्षा जास्त आहे आणि तो आपल्याकडील देयतेची/कर्जाची परतफेड करू शकत नाही त्यास नादार व्यक्ती असे म्हणतात. जेव्हा स्वीकृती किंवा आहार्यी न्यायालयाकडून नादार म्हणून घोषीत केला जातो. तेव्हा त्याच्याकडील स्वीकृती अनादरित समजली जाते अशा परिस्थितीत आहर्ता व आहार्यीच्या पुस्तकात विपत्र रद्द करण्याची नोंद करावी लागते. त्यावेळी आहर्त्याला, आहार्यीच्या संपत्तीतून काही रक्कम मिळते त्याला अंतिम लाभ असे म्हणतात. आहर्त्यास जी रक्कम प्राप्त होणारी नसते त्यास बुडीत कर्ज (Bad Debts) असे म्हणतात तीच राशी आहार्यीच्या पुस्तकात न्युनता (Deffiency) समजली जाते.

**आहर्ता व आहार्यीच्या पुस्तकात लेखांकीय हाताळणी – (Accounting Treatment in the Books of Drawer and Drawee) :**

| | व्यवहार | आहर्त्याच्या पुस्तकात | आहार्यीच्या पुस्तकात |
|---|---|---|---|
| १ | जुने विपत्र रद्द करणे. | आहार्यीचे खाते........................ नावे<br>प्राप्त विपत्र खात्याला किंवा<br>बँक खात्याला किंवा<br>राशीसंग्रहणाकरिता बँक खात्याला किंवा<br>पृष्ठांकितीचे खात्याला<br>(नादारीमुळे विपत्र रद्द केल्याबद्दल) | देय विपत्र खाते .............नावे<br>आहर्त्याच्या खात्याला<br>(नादारीमुळे विपत्र रद्द केल्याबद्दल) |
| २ | अंतिम लाभ मिळाला व बुडीत कर्ज झाल्याबद्दल | रोकड/बँक खाते ...................... नावे<br>बुडीत कर्ज खाते...................... नावे<br>आहार्यीच्या खात्याला<br>(अंतिम लाभ मिळाला व बुडीत कर्ज झाल्याबद्दल) | आहर्त्याचे खाते ............नावे<br>रोकड खात्याला<br>न्यूनता खात्याला<br>(अंतिम शोधन कर्ज व शेषरक्कम न्यूनता खात्याला स्थानांतरित केल्याबद्दल) |

**कृती करा – (Activity)**

१. किरकोळ विक्रेत्याला भेट द्या जो तुमच्या कॉलेजच्या किंवा महाविद्यालयाच्या जवळ राहतो, आणि शोध लावा तो विनिमय विपत्राचा किती वापर करतो.

२. कोणत्याही बँकेला भेट द्या आणि शोधून काढा ते किती प्रमाणात विनिमय विपत्र वटवतात.

३. बँकेला भेट द्या आणि शोध लावा, ते विनिमय विपत्र वटविण्यासाठी कसर कोणत्या प्रमाणात (दर) आकारतात.

४. विनिमय विपत्राचे भारतीय नांव शोधून काढा.

५. वचनचिठ्ठी आणि विनिमय विपत्राचे नमुने शोधून काढा.

## उदाहरणे

**१. (विविध परिस्थितीत विपत्राचा आदर/शोधन) (Honour of bill under different circumstances):**

२३ डिसेंबर २०१९ रोजी आकाशने दीपकवर ३ महिने मुदतीचे ₹ २५००० चे विपत्र काढले. त्याच दिवशी दीपकने स्वीकृती देऊन आकाशकडे परत पाठविले. देयतिथीला दीपकने विपत्राचे शोधन केले.

**खालील परिस्थितीत आकाश आणि दीपकच्या पुस्तकात किर्द नोंदी करा.**

अ) जर देयतिथीपर्यंत विपत्र आकाशजवळ असल्यास

ब) त्याच दिवशी आकाशने ते विपत्र वार्षिक ६% कसरीवर बँकेत वटविल्यास.

क) २३ डिसेंबर २०१९ रोजी आकाशने ते विपत्र राशी संग्रहणासाठी बँकेत पाठविल्यास

ड) जर आकाशने ते विपत्र त्याचा धनको विरेनला पृष्ठांकित केल्यास

**आकाशची रोजकीर्द**

| दिनांक | विवरण | खा. पा. | नावे रक्कम ₹ | जमा रक्कम ₹ |
|---|---|---|---|---|
| २०१९ | प्राप्त विपत्र खाते ..........नावे | | २५,००० | |
| डिसेंबर २३ | दीपकच्या खात्याला | | | २५,००० |
| | (दीपक तीन महिने मुदतीचे विपत्र काढले व स्वीकृती मिळाल्या) | | | |
| अ) २०२० | रोकड/बँक खाते ..........नावे | | २५,००० | |
| मार्च, २६ | प्राप्त विपत्र खात्याला | | | २५,००० |
| | (देयदिनांकला दीपकने विपत्राचे शोधन केल्याबद्दल) | | | |
| ब) २०१९ | रोकड खाते..........नावे | | २४,६२५ | |
| डिसेंबर २३ | कसर खाते ..........नावे | | ३७५ | |
| | प्राप्त विपत्र खात्याला | | | २५,००० |
| | (६% कसरीवर विपत्र बँकेत वटविल्याबद्दल) | | | |
| क) २०१९ | राशीसंग्रहणासाठी बँक खाते ..........नावे | | २५,००० | |
| डिसेंबर २३ | प्राप्त विपत्र खात्याला | | | २५,००० |
| | (दीपककडून मिळालेले विपत्र राशीसंग्रहणाकरिता बँकेत पाठविल्याबद्दल) | | | |
| २०१९ | बँक खाते ..........नावे | | २५,००० | |
| मार्च, २६ | राशीसंग्रहणाकरिता बँक खात्याला | | | २५,००० |
| | (राशीसंग्रहणासाठी पाठविलेल्या विपत्राचे देयदिनांकला शोधन झाल्याबद्दल) | | | |
| ड) २०१९ | विरेनचे खाते ..........नावे | | २५,००० | |
| डिसेंबर २३ | प्राप्त विपत्र खात्याला | | | २५,००० |
| | (दीपकची स्वीकृती विरेनला पृष्ठांकित केल्याबद्दल) | | | |

**दीपकच्या (आहार्थी) पुस्तकात किर्द नोंदी**

| दिनांक | विवरण | खा. पा. | नावे रक्कम ₹ | जमा रक्कम ₹ |
|---|---|---|---|---|
| २०१९ | आकाशचे खाते ..........नावे | | २५,००० | |
| डीसें. २३ | देय विपत्र खात्याला | | | २५,००० |
| | (विपत्राला स्वीकृती) | | | |
| २०२० | देयविपत्र खाते..........नावे | | २५,००० | |
| मार्च, २६ | रोकड/बँक खात्याला | | | २५,००० |
| | (देय दिनांकला विपत्राचे शोधन केल्याबद्दल) | | | |

**टिप : विपत्र कोठेही असल्यास आहार्यीच्या पुस्तकात शोधनाची एकच नोंद होईल.**

२. **विविध परिस्थितीत विपत्राच्या अनादरणाची नोंद – (Dishonour of bill under different circumstances) :**

१ मे २०१९ रोजी गौतमने हर्षला ₹ ४०,०००चा माल विकला व त्यावर दोन महिने मुदतीचे विपत्र काढले. त्याच दिवशी हर्षने ते स्वीकारून गौतमकडे परत पाठविले. देयतिथीला हर्षने विपत्राचे अनादरण केले.

**खालील परिस्थितीत गौतम आणि हर्षच्या पुस्तकात किर्दनोंदी करा :**

अ) देयतिथीपर्यंत गौतमने विपत्र स्वत: जवळ ठेवल्यास

ब) १ जुन २०१९ रोजी गौतमने विपत्र वार्षिक १२% कसरी वर बँकेत वटविल्यास.

क) १५ मे २०१९ रोजी गौतमने विपत्र राशीसंग्रहणाकरिता बँकेत पाठविल्यास.

ड) गौतमने ते विपत्र त्याचा धनको अर्णवला पृष्ठांकित केल्यास

**गौतमच्या पुस्तकात किर्द नोंदी**

| दिनांक | विवरण | खा. पा. | नावे रक्कम ₹ | जमा रक्कम ₹ |
|---|---|---|---|---|
| २०१९<br>मे १ | हर्ष खाते ....................नावे<br>विक्री खात्याला<br>(मालाची उधार विक्री केल्याबद्दल) | | ४०,००० | <br>४०,००० |
| मे १ | प्राप्त विपत्र खाते ....................नावे<br>हर्षच्या खात्याला<br>(हर्षवर विपत्र काढले व स्वीकृती मिळाल्याबद्दल ) | | ४०,००० | <br>४०,००० |
| अ) जुलै. ४ | हर्षचे खाते ....................नावे<br>प्राप्त विपत्र खात्याला<br>(देय दिनांकला हर्षने विपत्राचे अनादरण केल्याबद्दल) | | ४०,००० | <br>४०,००० |
| ब) i)<br>मे १ | बँक खाते ....................नावे<br>कसर खाते ....................नावे<br>प्राप्त विपत्र खात्याला<br>(दोन महिने मुदतीचे विपत्र १२% कसरीवर बँकेत वटविल्याबद्दल) | | ३९,६००<br>४०० | <br><br>४०,००० |
| ब) ii)<br>जुलै ४ | हर्षचे खाते ....................नावे<br>बँक खात्याला<br>(हर्षने वटविलेल्या विपत्राचे अनादरण केल्याबद्दल) | | ४०,००० | <br>४०,००० |
| क) i)<br>मे १५ | राशीसंग्रहणासाठी विपत्र खाते ....................नावे<br>प्राप्त विपत्र खात्याला<br>(हर्षचे विपत्र राशी संग्रहणासाठी बँकेत पाठविल्याबद्दल) | | ४०,००० | <br>४०,००० |
| क) ii)<br>जुलै ४ | हर्षचे खाते ....................नावे<br>राशी संग्रहणाकरिता बँक खात्याला<br>(हर्षचे विपत्र राशीसंग्रहणासाठी पाठविलेल्या विपत्राचे अनादरण झाल्याबद्दल) | | ४०,००० | <br>४०,००० |
| ड) i)<br>मे १ | अर्णवचे खाते ....................नावे<br>प्राप्त विपत्र खात्याला<br>(हर्षची स्वीकृती अर्णवला पृष्ठांकित केल्याबद्दल) | | ४०,००० | <br>४०,००० |
| ड) ii)<br>जुलै ४ | हर्षचे खाते ....................नावे<br>अर्णवच्या खात्याला<br>(पृष्ठांकित केलेल्या हर्षच्या स्वीकृतीचे अनादरण झाल्याबद्दल ) | | ४०,००० | <br>४०,००० |

**हर्षच्या (आहार्यी) पुस्तकात किर्द नोंदी**

| दिनांक | विवरण | खा. पा. | नावे रक्कम | जमा रक्कम |
|---|---|---|---|---|
| २०१९ मे १ | खरेदी खाते ....................नावे<br>गौतमच्या खात्याला<br>(मालाची उधार खरेदी केल्याबद्दल) | | ४०,००० | ४०,००० |
| २०१९ मे १ | गौतमचे खाते ....................नावे<br>देयविपत्र खात्याला<br>(विपत्र स्वीकारल्याबद्दल) | | ४०,००० | ४०,००० |
| २०१९ जुलै ४ | देय विपत्र खाते ....................नावे<br>गौतमच्या खात्याला<br>(देय तिथीला विपत्राचे अनादरण झाल्यास) | | ४०,००० | ४०,००० |

**टिप :** आहार्यीच्या पुस्तकात विपत्र अनादरणाच्या प्रसंगी ते कोठेही असो नोंद एकच राहील.

३. **कबीर हा राहुलचा ₹ ३७,००० ने ऋणी (थकीत) होता. म्हणून १ डिसेंबर २०१९ रोजी कबीरने त्याचे पूर्ण लेखा शोधनार्थ ₹ ३५,५०० चे ३ महिने मुदतीचे विपत्र काढले. देय दिनांकला कबीरने विपत्राचे अनादरण केले आणि राहुल ला ₹ ५०० नोंदणी खर्च द्यावा लागला.**

**कबीर आणि राहुलच्या पुस्तकात किर्द नोंदी द्या तसेच राहुलच्या पुस्तकात कबीरचे खाते आणि कबीरच्या पुस्तकात राहुलचे खाते तयार करा.**

**राहुलच्या पुस्तकात (धनको) किर्द नोंदी**

| दिनांक | विवरण | खा. पा. | नावे रक्कम ₹ | जमा रक्कम ₹ |
|---|---|---|---|---|
| २०१९ डिसें. १ | प्राप्त विपत्र खाते ....................नावे<br>कसर खाते ....................नावे<br>कबीरच्या खात्याला<br>(पूर्ण खाते शोधनार्थ कबीरकडून विपत्राला स्वीकृती मिळाल्याबद्दल) | | ३५,५००<br>१,५०० | ३७,००० |
| २०२० मार्च, ४ | कबीरचे खाते ....................नावे<br>प्राप्त विपत्र खात्याला<br>कसर खात्याला<br>रोकड खात्याला<br>(कबीरचे विपत्र अनादरित झाले व नोंदणी खर्च दिल्याबद्दल) | | ३७,५०० | ३५,५००<br>१,५००<br>५०० |

## राहुलच्या पुस्तकात कबीरचे खाते

नावे | जमा

| दिनांक | विवरण | रो. पा. | रक्कम ₹ | दिनांक | विवरण | रो. पा. | रक्कम ₹ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २०१९ | | | | २०१९ | | | |
| डिसें.१ | शि/खा/आणली | | ३७,००० | डिसें. १ | प्राप्त विपत्र खाते | | ३५,५०० |
| २०२० | | | | डिसें. १ | कसर खाते | | १,५०० |
| मार्च ४ | प्राप्त विपत्र खाते | | ३५,५०० | २०२० | | | |
| मार्च ४ | कसर खाते | | १,५०० | मार्च ४ | शि/खा/नेली | | ३७,५०० |
| मार्च ४ | रोकड खाते | | ५०० | | | | |
| | | | ७४,५०० | | | | ७४,५०० |
| २०२० | | | | | | | |
| मार्च ४ | शि/खा/आणली | | ३७,५०० | | | | |

## कबीरच्या पुस्तकात राहुलचे खाते

| दिनांक | विवरण | रो. पा. | रक्कम ₹ | दिनांक | विवरण | रो. पा. | रक्कम ₹ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २०१९ | | | | २०१९ | शि/खा/आणली | | ३७,००० |
| डिसें.१ | देय विपत्र खाते | | ३५,५०० | डिसें. १ | | | |
| २०२० | कसर खाते | | १,५०० | २०२० | | | |
| मार्च ४ | शि/खा/नेली | | ३७,५०० | मार्च ४ | प्राप्त विपत्र खाते | | ३५,५०० |
| | | | | मार्च ४ | कसर खाते | | १,५०० |
| | | | | मार्च ४ | नोंदणी खर्च | | ५०० |
| | | | ७४,५०० | | | | ७४,५०० |
| | | | | २०२० | शि/खा/आणली | | ३७,५०० |
| | | | | मार्च ४ | | | |

**कबीरच्या पुस्तकात किर्द नोंदी**

| दिनांक | विवरण | खा. पा. | नावे रक्कम | जमा रक्कम |
|---|---|---|---|---|
| २०१९ | राहुलचे खाते ................................................नावे | | ३७,००० | |
| डिसें. १ | देय विपत्र खात्याला | | | ३५,००० |
| | कसर खात्याला | | | १,५०० |
| | (पूर्ण लेखाशोधनार्थ विपत्राला स्वीकृती दिल्याबद्दल) | | | |
| २०२० | देय विपत्र खाते ................................................नावे | | ३५,५०० | |
| मार्च ४ | कसर खाते ................................................नावे | | १,५०० | |
| | नोंदणीखर्च खाते ................................................नावे | | ५०० | |
| | राहुलच्या खात्याला | | | ३७,५०० |
| | (विपत्राचे अनादरण होऊन नोंदणी खर्च देय झाल्याबद्दल) | | | |

४. **स्नेहाचे ₹ १५,०००चे विपत्र मेघाने स्वीकारले. विपत्राच्या देयतिथीपूर्वी मेघाने स्नेहाशी संपर्क साधून ₹ ५,००० रोख घ्यावे आणि शेष रक्कमेसाठी ३ महिने मुदतीचे ८% व्याजासह नवीन विपत्र काढावे. स्नेहाने तिची विनंती मान्य केली आणि नवीन विपत्र काढले जे मेघाने स्वीकारले देय दिनांकाला मेघाने विपत्राचे शोधन केले.**

**स्नेहाच्या पुस्तकात किर्द नोंदी द्या आणि मेघाच्या पुस्तकात स्नेहाचे खाते लिहून दाखवा.**

**स्नेहाच्या पुस्तकात किर्द नोंदी**

| दिनांक | विवरण | खा. पा. | नावे रक्कम ₹ | जमा रक्कम ₹ |
|---|---|---|---|---|
| १ | प्राप्त विपत्र खाते ................................................नावे | | १५,००० | |
| | मेघाच्या खात्याला | | | १५,००० |
| | (विपत्राला स्वीकृती मिळाल्याबद्दल) | | | |
| २ | मेघाचे खाते ................................................नावे | | १५,००० | |
| | प्राप्त विपत्र खात्याला | | | १५,००० |
| | (नूतनीकरणासाठी मेघाचे विपत्र अनादरित झाल्याबद्दल) | | | |
| ३ | मेघाचे खाते ................................................नावे | | २०० | |
| | व्याज खात्याला | | | २०० |
| | (शेष रकमेवर व्याज देय झाल्याबद्दल) | | | |
| ४ | रोकड खाते / बँक खाते ........................................नावे | | ५००० | |
| | मेघाच्या खात्याला | | | ५००० |
| | (अंशतः रक्कम मिळाल्याबद्दल) | | | |
| ५ | प्राप्त विपत्र खाते ................................................नावे | | १०,२०० | |
| | मेघाच्या खात्याला | | | १०,२०० |
| | (व्याजासह नवीन विपत्राला स्वीकृती मिळाल्याबद्दल) | | | |
| ६ | रोकड खाते / बँक खाते ........................................नावे | | १०,२०० | |
| | प्राप्त विपत्र खात्याला | | | १०,२०० |
| | (देयदिनांकाला विपत्राचे शोधन झाल्याबद्दल) | | | |

**मेघाच्या पुस्तकात**

**स्नेहाचे खाते**

**नावे** **जमा**

| दिनांक | विवरण | रो. पा. | रक्कम ₹ | दिनांक | विवरण | रो. पा. | रक्कम ₹ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | देय विपत्र खाते | | १५,००० | | शि/खा/आणली | | १५,००० |
| | रोकड खाते | | ५,००० | | देय विपत्र खाते | | १५,००० |
| | देय विपत्र खाते | | १०,२०० | | व्याज खाते | | २०० |
| | | | ३०,२०० | | | | ३०,२०० |

**कार्य टिप :– Working Note –**

**नवीन विपत्राची रक्कम आणि व्याजाची गणना जुन्या विपत्राची राशी ₹ १५,०००**

| अंशतः शोधन | नवीन विपत्राची शेष राशी |
|---|---|
| ₹ ५,००० | १०,००० |
| | (+) २०० |
| | ₹ १०,२०० |

शेष राशीवरील व्याज $= १०,००० \times \frac{८}{१००} \times \frac{३}{१२}$

$= ₹ २००$ नवीन विपत्रात समाविष्ट

५. **अमोलने अतुलवर ३ महिने मुदतीचे ₹ २४,००० चे विपत्र दि. ६ ऑक्टोबर, २०१९ रोजी काढले. विपत्र त्याच दिवशी स्वीकारले गेले. २० ऑक्टोबर २०१९ रोजी अमोलने ते विपत्र राशीसंग्रहणासाठी बँकेत पाठविले. दातव्य तिथीपूर्वी आपण, विपत्राचे शोधन करण्यास असमर्थ आहो असे वाटत असल्याने अमोलला विपत्राच्या नूतनिकरणाची विनंती केली. अतुलने ₹ १०,००० रोख व ₹ ८०० व्याज इ. रक्कम रोख द्यावी आणि शेष राशीचे दोन महिने मुदतीचे नवीन विपत्र स्वीकारावे या शर्तीवर त्याची विनंती मान्य केली. १२ जानेवारी, २०२० रोजी अतुलने ₹ १३,५०० देऊन विपत्राचे निवर्तन केले. अमोलच्या पुस्तकात किर्द नोंदी द्या.**

**अमोलच्या पुस्तकात किर्द नोंदी**

| दिनांक | विवरण | खा. पा. | नावे रक्कम ₹ | जमा रक्कम ₹ |
|---|---|---|---|---|
| २०१९ | प्राप्त विपत्र खाते ..........नावे | | २४,००० | |
| ऑक्टो. ६ | अतुलच्या खात्याला | | | २४,००० |
| | (प्राप्त विपत्राला स्वीकृती मिळाल्याबद्दल) | | | |
| ऑक्टो, २० | राशी संग्रहणासाठी बँक खाते ..........नावे | | २४,००० | |
| | प्राप्त विपत्र खात्याला | | | २४,००० |
| | (राशी संग्रहणाकरिता विपत्र बँकेत पाठविल्याबद्दल) | | | |
| २०२० | अतुलचे खाते ..........नावे | | २४,००० | |
| जाने. ९ | राशीसंग्रहणासाठी बँक खात्याला | | | २४,००० |
| | (नूतनीकरणासाठी विपत्र रद्द केल्याबद्दल) | | | |
| जाने. ९ | अतुलचे खाते ..........नावे | | ८०० | |
| | व्याज खात्याला | | | ८०० |
| | (अतुलवर व्याज देय झाल्याबद्दल) | | | |
| जाने. ९ | रोकड खाते / बँक खाते ..........नावे | | १०,८०० | |
| | अतुलचे खात्याला | | | १०,८०० |
| | (व्याजासह काही रक्कम मिळाल्याबद्दल) | | | |
| जाने. ९ | प्राप्त विपत्र खाते ..........नावे | | १४,००० | |
| | अतुलच्या खात्याला | | | १४,००० |
| | (नवीन विपत्राला स्वीकृती मिळाल्याबद्दल) | | | |
| मार्च १२ | रोकड खाते / बँक खाते ..........नावे | | १३,५०० | |
| | कसर खाते ..........नावे | | ५०० | |
| | प्राप्त विपत्र खात्याला | | | १४,००० |
| | (कसरीवर विपत्राचे निवर्तन झाल्याबद्दल) | | | |

**नूतनीकरणाच्या नोंदीसाठी पर्यायी पद्धत – (Alternate entry for Renewal)**

| दिनांक | विवरण | खा. पा. | नावे रक्कम ₹ | जमा रक्कम ₹ |
|---|---|---|---|---|
| २०१९ | प्राप्त विपत्र खाते ............................................नावे | | २४,००० | |
| ऑक्टो. ६ | अतुलच्या खात्याला | | | २४,००० |
| | (प्राप्त विपत्राला स्वीकृती मिळाल्याबद्दल) | | | |
| ऑक्टो, २० | राशीसंग्रहणासाठी बँक खाते....................................नावे | | २४,००० | |
| | प्राप्त विपत्र खात्याला | | | २४,००० |
| | (राशीसंग्रहणाकरिता विपत्र बँकेत पाठविल्याबद्दल) | | | |
| | अतुलचे खाते ................................................नावे | | २४,००० | |
| जाने. ९ | राशीसंग्रहणासाठी बँक खात्याला | | | २४,००० |
| | (नूतनीकरणाकरिता विपत्र रद्द केल्याबद्दल) | | | |
| जाने. ९ | रोकड खाते / बँक खाते .......................................नावे | | १०,८०० | |
| | अतुलचे खात्याला | | | १०,००० |
| | व्याज खात्याला | | | ८०० |
| | (व्याजासह काही रक्कम मिळाल्याबद्दल) | | | |
| जाने. ९ | प्राप्त विपत्र खाते ............................................नावे | | १४,००० | |
| | अतुलच्या खात्याला | | | १४,००० |
| | (नवीन विपत्राला स्वीकृती मिळाल्याबद्दल) | | | |
| मार्च १२ | रोकड खाते / बँक खाते .......................................नावे | | १३,५०० | |
| | कसर खाते ....................................................नावे | | ५०० | |
| | प्राप्त विपत्र खात्याला | | | १४,००० |
| | (कसरीवर विपत्राचे निवर्तन झाल्याबद्दल) | | | |

६. **निशाने ₹ ३४,००० च्या वस्तू आशाला विकल्या. आशाने लगेच ₹ १०,००० नगदी दिले आणि ₹ २४,०००चे दोन महिने मुदतीचे विपत्र स्वीकारले. निशाने ते विपत्र १ महिन्यानंतर बँक ऑफ महाराष्ट्रमध्ये वार्षिक १५% कसरीवर वटविले. देय दिनांक ला विपत्र अनादरण झाले. आशाने, निशाला विनंती केली की, तिने ₹ ४,००० व शेष रकमेवर वार्षिक ११% प्रमाणे ३ महिन्याचे व्याज रोख द्यावे व उरलेल्या रकमेचे ३ महिन्याचे विपत्र काढावे. निशाने तिची विनंती मान्य केली. परंतु आशा नादार झाली आणि तिच्या खाजगी संपत्तीतून ४०% रक्कम प्राप्त झाली.**

**निशाची रोजकीर्द तयार करा.**

**निशाच्या पुस्तकात किर्द नोंदी**

| दिनांक | विवरण | खा. पा. | नावे रक्कम ₹ | जमा रक्कम ₹ |
|---|---|---|---|---|
| १ | आशाचे खाते ..........नावे | | ३४,००० | |
| | विक्री खात्याला | | | ३४,००० |
| | (मालाची उधार विक्री केल्याबद्दल) | | | |
| २ | रोकड खाते ..........नावे | | १०,००० | |
| | प्राप्त विपत्र खाते ..........नावे | | २४,००० | |
| | आशाच्या खात्याला | | | ३४,००० |
| | (काही रक्कम रोख मिळाली व शेष रक्कमेसाठी विपत्र काढल्याबद्दल) | | | |
| ३ | बँक ऑफ महाराष्ट्र खाते..........नावे | | २३,७०० | |
| | कसर खाते ..........नावे | | ३०० | |
| | प्राप्त विपत्र खात्याला | | | २४,००० |
| | (एक महिन्याच्या कसरीवर विपत्र बँकेत वटविल्याबद्दल) | | | |
| ४ | आशाचे खाते ..........नावे | | २४,००० | |
| | बँक ऑफ महाराष्ट्रच्या खात्याला | | | २४,००० |
| | (विपत्राचे अनादरण झाल्याबद्दल) | | | |
| ५ | आशाचे खाते ..........नावे | | ५५० | |
| | व्याज खात्याला | | | ५५० |
| | (आशाकडून व्याज देय झाल्याबद्दल) | | | |
| ६ | रोकड खाते ..........नावे | | ४,५५० | |
| | आशाच्या खात्याला | | | ४,५५० |
| | (व्याजासह काही रक्कम मिळाल्याबद्दल) | | | |
| ७ | प्राप्त विपत्र खाते ..........नावे | | २०,००० | |
| | आशाच्या खात्याला | | | २०,००० |
| | (शेष रकमेसाठी विपत्राला स्वीकृती मिळाल्याबद्दल) | | | |
| ८ | आशाचे खाते ..........नावे | | २०,००० | |
| | प्राप्त विपत्र खात्याला | | | २०,००० |
| | (नादारीमुळे विपत्राचे अनादरण झाल्याबद्दल) | | | |
| ९ | रोकड खाते / बँक खाते ..........नावे | | ८,००० | |
| | बुडीत कर्ज खाते..........नावे | | १२,००० | |
| | आशाच्या खात्याला | | | २०,००० |
| | (आशाकडून ४०% राशी मिळाली व बाकीची बुडीत झाल्याबद्दल) | | | |

**कार्य टिपणी –**

व्याज व नवीन विपत्राच्या राशीची गणना –

विपत्राची राशी = ₹ २४,०००

| अंशतः शोधन | नवीन विपत्राची रक्कम |
|---|---|
| ₹ ४,००० | ₹ २०,००० |
| (+) ५५० व्याज | |
| ४,५५० | |

शेष रकमेवर व्याज = ₹ २०,००० × $\frac{११}{१००}$ × $\frac{३}{१२}$ = ₹ ५५०

₹ ५५० अंशतः रकमेत समाविष्ट –

**७. १५ सप्टेंबर २०१९ रोजी कुणालने किशोरीलाल कडून ₹ ३८,०००च्या वस्तू खरेदी केल्या आणि १८ सप्टें. २०१९ रोजी ६० दिवस मुदतीचे दर्शनोत्तर विपत्र स्वीकारले. त्याच दिवशी किशोरीलालने ते विपत्र राशीसंग्रहणासाठी बँकेत जमा केले. कुणालने देय दिनांकला विपत्राचे शोधन केले. बँकेने ₹ १५० बँक सेवाशुल्क आकारले.**

**किशोरीलाल व कुणालच्या पुस्तकात किर्द नोंदी करा.**

**किशोरीलालच्या पुस्तकात किर्द नोंदी**

| दिनांक | विवरण | खा. पा. | नावे रक्कम ₹ | जमा रक्कम ₹ |
|---|---|---|---|---|
| २०१९ सप्टें. १५ | कुणालचे खाते ........................................नावे<br>विक्री खात्याला<br>(वस्तूंची उधार विक्री केल्याबद्दल) | | ३८,००० | ३८,००० |
| सप्टें. १८ | प्राप्त विपत्र खाते ........................................नावे<br>कुणालच्या खात्याला<br>(दर्शनोत्तर विपत्राला स्वीकृती मिळाल्याबद्दल) | | ३८,००० | ३८,००० |
| सप्टें. १८ | राशीसंग्रहणासाठी बँक खाते ..............................नावे<br>प्राप्त विपत्र खात्याला<br>(राशीसंग्रहणासाठी विपत्र बँकेत पाठविल्याबद्दल) | | ३८,००० | ३८,००० |
| नोव्हें. २० | बँक खाते ........................................नावे<br>बँक सेवा शुल्क खाते ..................................नावे<br>राशीसंग्रहणासाठी बँक खात्याला<br>(राशीसंग्रहणासाठी पाठविलेल्या विपत्राचे शोधन झाल्याबद्दल) | | ३७,८५०<br>१५० | ३८,००० |

**कुणालच्या पुस्तकात किर्द नोंदी**

| दिनांक | विवरण | खा. पा. | नावे रक्कम ₹ | जमा रक्कम ₹ |
|---|---|---|---|---|
| २०१९ सप्टें. १५ | खरेदी खाते ........................................नावे<br>किशोरीलाल च्या खात्याला<br>(मालाची उधार खरेदी केल्याबद्दल) | | ३८,००० | ३८,००० |
| सप्टें. १८ | किशोरीलालचे खाते ....................................नावे<br>देयविपत्र खात्याला<br>(विपत्रात स्वीकृती दिल्याबद्दल) | | ३८,००० | ३८,००० |
| नोव्हें. २० | देय विपत्र खाते ........................................नावे<br>रोकड/बँक खात्याला<br>(विपत्राचे शोधन केल्याबद्दल) | | ३८,००० | ३८,००० |

८. शालिनीला आनंदचे ₹ २६,००० देणे होते. आनंदने शालिनीवर ३ मुदतीचे ₹ २१,००० चे विपत्र काढले आणि शेष रकमेचा रेखांकित धनादेश मिळाला. विपत्र स्वीकारून आनंदकडे परत पाठविले. त्याच दिवशी आनंदने ते विपत्र विक्रमला पृष्ठांकित केले. देय दिनांकला विक्रमने आनंदला कळविले की, शालिनीने विपत्राचे अनादरण केले व त्याला ₹ २८० नोंदणी खर्च आला. नंतर आनंदने शालीनीवर १ महिना मुदतीचे नवीन विपत्र ज्यात नोंदणी खर्च व व्याज ₹ ६५० समाविष्ट करून काढले. देय दिनांकला धनादेशाद्वारे शालीनीने विपत्राचे शोधन केले.

आनंदच्या पुस्तकात किर्द नोंदी देऊन शालीनीच्या पुस्तकात आनंदचे खाते लिहा.

**आनंदच्या पुस्तकात किर्द नोंदी**

| दिनांक | विवरण | खा. पा. | नावे रक्कम ₹ | जमा रक्कम ₹ |
|---|---|---|---|---|
| १ | प्राप्त विपत्र खाते ........................................नावे | | २१,००० | |
| | बँक खाते................................................नावे | | ५,००० | |
| | शालीनीच्या खात्याला | | | २६,००० |
| | (शालीनी कडून धनादेश व विपत्राला स्वीकृती मिळाल्याबद्दल) | | | |
| २ | विक्रमचे खाते............................................नावे | | २१,००० | |
| | प्राप्त विपत्र खात्याला | | | २१,००० |
| | (शालीनीचे विपत्र विक्रमला पृष्ठांकित केल्याबद्दल) | | | |
| ३ | शालीनीचे खाते ..........................................नावे | | २१,२८० | |
| | विक्रमच्या खात्याला | | | २१,२८० |
| | (विपत्राचे अनादरण होऊन नोंदणी खर्च झाल्याबद्दल) | | | |
| ४ | शालीनीचे खाते ..........................................नावे | | ६५० | |
| | व्याज खात्याला | | | ६५० |
| | (व्याज देय झाल्याबद्दल) | | | |
| ५ | प्राप्त विपत्र खाते ........................................नावे | | २१,९३० | |
| | शालीनीच्या खात्याला | | | २१,९३० |
| | (नोंदणी खर्च, व्याजासह नवीन विपत्राला स्वीकृती मिळाल्याबद्दल) | | | |
| ६ | बँक खाते ...............................................नावे | | २१,९३० | |
| | प्राप्त विपत्र खात्याला | | | २१,९३० |
| | (देय दिनांकला विपत्राचे शोधन झाल्याबद्दल) | | | |

**शालिनीच्या पुस्तकात,**

**आनंदचे खाते**

**नावे** **जमा**

| दिनांक | विवरण | रो. पा. | रक्कम ₹ | दिनांक | विवरण | रो. पा. | रक्कम ₹ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | बँक खाते | | ५,००० | | शि/खा/नेली | | २६,००० |
| | देय विपत्र खाते | | २१,००० | | देय विपत्र खाते | | २१,००० |
| | देय विपत्र खाते | | २१,९३० | | नोंदणी खर्च खाते | | २८० |
| | | | | | व्याज खाते | | ६५० |
| | | | ४७,९३० | | | | ४७,९३० |

९. ३ जुलै, २०१९ रोजी रवी ने ₹ १२,०००चे विपत्र ध्रुव वर काढले, जे त्याच्या स्वीकृती नंतर ९० दिवसांनी देय होईल. ९ जुलै, २०१९ रोजी रवीने ते विपत्र हरीषला ₹ १२,७५० च्या पूर्ण लेखाशोधनार्थ पृष्ठांकित केले. त्याच दिवशी हरीषने ते विपत्र ₹ ११,७५०ला बँकेत वटविले. देय दिनांकला सरकारकडून आकस्मिक सुट्‌टी जाहीर करण्यात आली. ध्रुव ने देयतिथीला विपत्राचे शोधन केले.

रवी, ध्रुव आणि हरिषच्या पुस्तकात किर्द नोंदी करा.

**रवीच्या पुस्तकात किर्द नोंदी**

| दिनांक | विवरण | खा. पा. | नावे रक्कम ₹ | जमा रक्कम ₹ |
|---|---|---|---|---|
| २०१९ | प्राप्त विपत्र खाते ..........नावे | | १२,००० | |
| जुलै ३ | ध्रुवच्या खात्याला | | | १२,००० |
| | (विपत्राला स्वीकृती मिळाल्याबद्‌दल) | | | |
| जुलै ९ | हरीषचे खाते ..........नावे | | १२,७५० | |
| | प्राप्त विपत्र खात्याला | | | १२,००० |
| | कसर खात्याला | | | ७५० |
| | (पूर्णलेखा शोधनार्थ विपत्राचे शोधन केल्याबद्‌दल) | | | |

**ध्रुवच्या पुस्तकात किर्द नोंदी**

| दिनांक | विवरण | खा. पा. | नावे रक्कम ₹ | जमा रक्कम ₹ |
|---|---|---|---|---|
| २०१९ | रवीचे खाते ..........नावे | | १२,००० | |
| जुलै, ३ | देय विपत्र खात्याला | | | १२,००० |
| | (विपत्राला स्वीकृती दिल्याबद्‌दल) | | | |
| ऑक्टो. ५ | देय विपत्र खाते..........नावे | | १२,००० | |
| | रोकड/बँक खात्याला | | | १२,००० |
| | (विपत्राचे शोधन केल्याबद्‌दल) | | | |

**हरीषच्या पुस्तकात किर्द नोंदी**

| दिनांक | विवरण | खा. पा. | नावे रक्कम ₹ | जमा रक्कम ₹ |
|---|---|---|---|---|
| २०१९ | प्राप्त विपत्र खाते ..........नावे | | १२,००० | |
| जुलै, ०९ | कसर खाते ..........नावे | | ७५० | |
| | रवीच्या खात्याला | | | १२,७५० |
| | (पूर्णलेखा शोधनार्थ विपत्राला स्वीकृती मिळाल्याबद्‌दल) | | | |
| जुलै, ९ | बँक खाते ..........नावे | | ११,७५० | |
| | कसर खाते ..........नावे | | २५० | |
| | प्राप्त विपत्र खात्याला | | | १२,००० |
| | (कसरीवर विपत्र बँकेत वटविल्याबद्‌दल) | | | |

**देय दिनांक चे आगनत – (Calculation of due date) :**

विपत्र लिहिल्याच्या दिनांकापासून ९० दिवस –

| | | |
|---|---|---|
| २०१९ जुलै | = २८ | दिवस |
| २०१९ ऑगस्ट | = ३१ | दिवस |
| २०१९ सप्टेंबर | = ३० | दिवस |
| २०१९ ऑक्टोबर | = ०१ | दिवस |
| | ९० | दिवस |

१ ऑक्टोबर, २०१९ + सवलतीचे तीन दिवस (१ + ३ = ४) ४ ऑक्टोबर २०१९ परंतु या तारखेला आकस्मिक सूट्टी जाहिर करण्यात आली म्हणून त्यानंतरचा दिवस देय दिनांक राहिल. ५ ऑक्टोबर, २०१९.

**१०. १८ जून, २०१९ रोजी रोहनने ₹ ४०,०००च्या वस्तू नवीनला विकल्या. त्याच दिवशी रोहनेने त्याच्यावर ३ महिने मुदतीचे विपत्र काढले. नवीनने स्वीकारले आणि परत पाठविले. १९ जून, २०१९ ला रोहनने ते विपत्र आपल्या बँकेत वार्षिक १५% कसरीवर वटविले.**

देय दिनांकला नवीनने विपत्राचे अनादरण केले आणि बँकेला ₹ ३५० नोंदणी खर्च आला. नंतर नवीनने विपत्राच्या नूतनीकरणाची विनंती केली. रोहनने या शर्तीवर विनंती मान्य केली की, नवीनने नोंदणी खर्च व शिल्लक रकमेवर १२% दराने व्याज धनादेशाने द्यावे व २ महिने मुदतीचे शिल्लक रकमेसाठी विपत्र स्वीकारावे.

या प्रमाणे व्यवस्था करण्यात आली. परंतु देय दिनांकापूर्वी नवीन नादार म्हणून घोषित झाला. २३ डिसेंबर, २०१९ रोजी त्यांच्या खाजगी संपत्तीतून रोहनला रुपयाला ६० पैसे प्रमाणे प्रथम व अंतिम लाभांश मिळाला.

**नवीनच्या पुस्तकात किर्द नोंदी द्या.**

**नवीनची रोज किर्द**

| दिनांक | विवरण | खा. पा. | नावे रक्कम ₹ | जमा रक्कम ₹ |
|---|---|---|---|---|
| २०१९ | खरेदी खाते ....................नावे | | ४०,००० | |
| जून, १८ | रोहनच्या खात्याला | | | ४०,००० |
| | (वस्तूंची उधार खरेदी केल्याबद्दल) | | | |
| जून, १८ | रोहनचे खाते....................नावे | | ४०,००० | |
| | देय विपत्र खात्याला | | | ४०,००० |
| | (विपत्राला स्वीकृती दिल्याबद्दल) | | | |
| सप्टें. २१ | देय विपत्रे खाते ....................नावे | | ४०,००० | |
| | नोंदणी खर्च खाते ....................नावे | | ३५० | |
| | रोहनच्या खात्याला | | | ४०,३५० |
| | (विपत्राचे अनादरण होऊन नोंदणी खर्च देय झाल्याबद्दल) | | | |
| सप्टें. २१ | व्याज खाते....................नावे | | ८०० | |
| | रोहनच्या खात्याला | | | ८०० |
| | (व्याज देय झाल्याबद्दल) | | | |
| सप्टें. २१ | रोहनचे खाते....................नावे | | १,१५० | |
| | बँक खात्याला | | | १,१५० |
| | (नोंदणी खर्च व व्याज दिल्याबद्दल) | | | |
| सप्टें. २१ | रोहनचे खाते....................नावे | | ४०,००० | |
| | देय विपत्र खाते | | | ४०,००० |
| | (नवीन विपत्राला स्वीकृती दिल्याबद्दल) | | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| नोव्हें. २४ | देय विपत्र खाते ....................................................नावे | | ४०,००० | |
| | रोहनच्या खात्याला | | | ४०,००० |
| | (नादारीमुळे विपत्राचे अनादरण झाल्याबद्दल) | | | |
| डिसें. २३ | रोहनचे खाते....................................................नावे | | ४०,००० | |
| | रोकड खात्याला | | | २४,००० |
| | बुडीत कर्ज खात्याला | | | १६.००० |
| | (रुपयाला ६० पैसे प्रमाणे शोधन केल्याबद्दल) | | | |

**११. निशांतने १७ जुलै २०१९ रोजी ₹ २५,००० चे तीन महिने मुदतीचे विपत्र अभिनववर काढले. निशांतने ते विपत्र आपल्या बँकेत वार्षिक १२.५% दराने वटविले.**

विपत्राच्या देय तारखेला अभिनव ने विनंती केली की, निशांतने ₹ ५,८००चा रेखांकित धनादेश ज्यात ₹ १,८०० व्याजाचे समाविष्ट आहेत, घ्यावे, आणि शेष रकमेसाठी तीन महिने मुदतीचे विपत्र काढावे. निशांतने प्रस्ताव मान्य केला. नवीन विपत्राच्या देयतिथीपूर्वी १ महिना अगोदर अभिनवने ₹ २०,२५० ला विपत्राचे निवर्तन केले.

**निशांतच्या पुस्तकात आवश्यक किर्द नोंदी द्या.**

**निशांतच्या पुस्तकात किर्द नोंदी**

| दिनांक | विवरण | खा. पा. | नावे रक्कम ₹ | जमा रक्कम ₹ |
|---|---|---|---|---|
| २०१९ | प्राप्त विपत्र खाते ..............................................नावे | | २५,००० | |
| जुलै १७ | अभिनवच्या खात्याला | | | २५,००० |
| | (विपत्राला स्वीकृती मिळाल्याबद्दल) | | | |
| जुलै १७ | रोकड खाते / बँक खाते ........................................नावे | | २४,२१९ | |
| | कसर खाते ....................................................नावे | | ७८१ | |
| | प्राप्त विपत्र खात्याला | | | २५,००० |
| | (वार्षिक १२.५% कसरीवर विपत्र बँकेत वटविल्याबद्दल) | | | |
| ऑक्टो.२० | अभिनवचे खाते ................................................नावे | | २५,००० | |
| | बँक खात्याला | | | २५,००० |
| | (वटविलेल्या विपत्राचे अनादरण झाल्याबद्दल) | | | |
| ऑक्टो.२० | अभिनवचे खाते ................................................नावे | | १,८०० | |
| | व्याज खात्याला | | | १,८०० |
| | (व्याज देय झाल्याबद्दल) | | | |
| ऑक्टो.२० | बँक खाते .......................................................नावे | | ५,८०० | |
| | अभिनवचे खात्याला | | | ५,८०० |
| | (धनादेश मिळाल्याबद्दल) | | | |
| ऑक्टो.२० | प्राप्त विपत्र खाते ..............................................नावे | | २१,००० | |
| | अभिनवच्या खात्याला | | | २१,००० |
| | (शेष रकमेसाठी विपत्र स्वीकृत मिळाल्याबद्दल) | | | |
| डिसें. २० | रोकड खाते / बँक खाते ........................................नावे | | २०,२५० | |
| | कसर खाते ....................................................नावे | | ७५० | |
| | प्राप्त विपत्र खात्याला | | | २१,००० |
| | (एक महिना अगोदर विपत्राचे निवर्तन झाल्याबद्दल) | | | |

**१२. संजय ने गोविंदला ₹ ४५,००० च्या वस्तू १०% व्यापारी कसरीवर विकल्या. गोविंदने १/३ राशी लगेच दिली व त्याला ₹ १,००० रोख कसर देऊन शेष रकमेसाठी ३ महिने मुदतीचे विपत्र स्वीकारले त्याच दिवशी संजयने ते विपत्र आदेशला ₹ २७,५०० च्या पूर्ण लेखा शोधनार्थ पृष्ठांकित केले.**

देय दिनांकला गोविंदकडून विपत्राचे अनादरण झाले आणि आदेशला ₹ ४५० नोंदणी खर्च आला. गोविंदने संजयला नवीन विपत्र काढण्याची विनंती केली. संजयने या अटीवर विनंती मान्य केली की, गोविंदने ताबडतोब ₹ ५,२५० रोख व नोंदणी खर्च द्यावे. व शेष रकमेचे २ महिने मुदतीचे ₹ १,५०० व्याज समाविष्ट करून नवीन विपत्र काढावे. याप्रमाणे व्यवस्था करण्यात आली. संजयने, आदेशला त्याचे देणे देऊन टाकले. नवीन विपत्राच्या देय दिनांकाला गोविंदने विपत्राचे अनादरण केले.

**संजयच्या पुस्तकात किर्द नोंदी देऊन, गोविंदच्या पुस्तकात संजयचे खाते लिहा.**

**संजयच्या पुस्तकात किर्द नोंदी**

| दिनांक | विवरण | खा. पा. | नावे रक्कम ₹ | जमा रक्कम ₹ |
|---|---|---|---|---|
| १. | गोविंदचे खाते ....................नावे | | २७,००० | |
| | रोकड खाते ....................नावे | | १२,५०० | |
| | कसर खाते ....................नावे | | १,००० | |
| | विक्री खात्याला | | | ४०,५०० |
| | (वस्तूंची उधार विक्री केली रोख कसर देऊन १/३ राशी मिळाल्याबद्दल) | | | |
| २. | प्राप्त विपत्र खाते ....................नावे | | २७,००० | |
| | गोविन्दच्या खात्याला | | | २७,००० |
| | (विपत्राला स्वीकृती मिळाल्याबद्दल) | | | |
| ३. | आदेशचे खाते ....................नावे | | २७,५०० | |
| | प्राप्त विपत्र खात्याला | | | २७,००० |
| | कसर खात्याला | | | ५०० |
| | (पूर्णलेखा शोधनार्थ विपत्राचे पृष्ठांकन केल्याबद्दल) | | | |
| ४. | गोविंदचे खाते ....................नावे | | २७,४५० | |
| | कसर खाते ....................नावे | | ५०० | |
| | आदेशच्या खात्याला | | | २७,९५० |
| | (विपत्राचे अनादरण होऊन नोंदणी खर्च आल्याबद्दल) | | | |
| ५. | गोविंदचे खाते ....................नावे | | १,५०० | |
| | व्याज खात्याला | | | १,५०० |
| | (व्याज देय झाल्याबद्दल) | | | |
| ६. | रोकड खाते ....................नावे | | ५,७०० | |
| | गोविंदच्या खात्याला | | | ५,७०० |
| | (नोंदणी खर्चासह रोख राशी मिळाल्याबद्दल) | | | |
| ७. | प्राप्त विपत्र खाते ....................नावे | | २३,२५० | |
| | गोविंदच्या खात्याला | | | |
| | (व्याजासहीत नवीन विपत्राला स्वीकृती मिळाल्याबद्दल) | | | २३,२५० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ८. | आदेशचे खाते ..............................................नावे | | २७,९५० | |
| | रोकड/बँक खात्याला | | | २७,९५० |
| | (आदेशला रोख दिल्याबद्दल) | | | |
| ९. | गोविंदचे खाते ..............................................नावे | | २३,२५० | |
| | प्राप्त विपत्र खात्याला | | | २३,२५० |
| | (विपत्राचे आनादरण झाल्याबद्दल) | | | |

**गोविन्दच्या पुस्तकात**

**संजयचे खाते**

**नावे** **जमा**

| दिनांक | विवरण | रो. पा. | रक्कम ₹ | दिनांक | विवरण | रो. पा. | रक्कम ₹ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | देय विपत्र खाते | | २७,००० | | खरेदी खाते | | २७,००० |
| | रोकड खाते | | ५,७०० | | देय विपत्र खाते | | २७,००० |
| | देय विपत्र खाते | | २३,२५० | | नोंदणी खर्च खाते | | ४५० |
| | शि/खा/ने | | २३,२५० | | व्याज खाते | | १,५०० |
| | | | | | देय विपत्र खाते | | २३,२५० |
| | | | ७९,२०० | | | | ७९,२०० |
| | | | | | शि/खा/आ | | २३,२५० |

**एकच आदेशक व अनेक आदेशिती – (Problems on single Drawer and multiple Drawees)**

**१३. बिपीनच्या पुस्तकात खालील व्यवहारांच्या किर्द नोंदी करा –**

१. सोनलने स्वीकारलेले ₹ २०,००० चे ३ महिने मुदतीचे विपत्र, बँक ऑफ इंडियामध्ये ₹ १९,७५० ला वटविले.

२. बिन्द्रा ने स्वीकारलेले ₹ १४,४०० चे विपत्र देय दिनांकच्या १ महिना आधी वार्षिक १२% कसरीवर निवर्तन झाले.

३. रेखाने स्वीकारलेले ₹ ८,५०० चे विपत्र, गायत्रीला ₹ ८,६५०च्या पूर्ण लेखा शोधनार्थ पृष्ठांकित केले.

४. विनयाला ८% व्यापारी कसरीवर ₹ २०,०००च्या वस्तू विकल्या. अर्धी रक्कम लगेच मिळाली त्यावर १०% रोख कसर दिली. शेष रकमेसाठी तिच्यावर विपत्र काढण्यात आले, तिने स्वीकृती दिली.

### बिपीनच्या पुस्तकात किर्द नोंदी

| दिनांक | विवरण | खा. पा. | नावे रक्कम ₹ | जमा रक्कम ₹ |
|---|---|---|---|---|
| १. | बँक ऑफ इंडिया खाते....................................नावे | | १९,७५० | |
| | कसर खाते ....................................................नावे | | २५० | |
| | प्राप्त विपत्र खात्याला | | | २०,००० |
| | (कसरीवर विपत्र बँकेत वटविल्याबद्दल) | | | |
| २. | रोकड खाते ..................................................नावे | | १४,२५६ | |
| | कसर खाते ....................................................नावे | | १४४ | |
| | प्राप्त विपत्र खात्याला | | | १४,४०० |
| | (वार्षिक १२% कसरीवर विपत्राचे निवर्तन झाल्याबद्दल) | | | |
| ३. | गायत्रीचे खाते ..............................................नावे | | ८,६५० | |
| | प्राप्त विपत्र खात्याला | | | ८,५०० |
| | कसर खात्याला | | | १५० |
| | (रेखाचे विपत्र पूर्ण लेखा शोधनार्थ पृष्ठांकित केल्याबद्दल) | | | |
| ४. (अ) | विजयाचे खाते...............................................नावे | | ९,२०० | |
| | कसर खाते ....................................................नावे | | ९२० | |
| | रोकड खाते ..................................................नावे | | ८,२८० | |
| | विक्री खात्याला | | | १८,४०० |
| | (व्यापारी व रोख कसरीवर वस्तूंची विक्री केल्याबद्दल) | | | |
| ४.(ब) | प्राप्त विपत्र खाते ...........................................नावे | | ९,२०० | |
| | विनयाच्या खात्याला | | | ९,२०० |
| | (शेष रकमेसाठी विपत्राला स्वीकृती मिळाल्याबद्दल) | | | |

**व्यवहार क्रमांक ४ चे स्पष्टीकरण –**

| | ₹ |
|---|---|
| मूळ किंमत ₹ = | २०,००० |
| (–)८% व्यापारी कसर = | १,६०० |
| | १८,४०० |

| | (५०%) रोख | उधार (५०%) |
|---|---|---|
| | ₹ ९,२०० | ₹ ९,२०० |
| (–) रोख कसर १०% | ₹ ९२० | विपत्राची रक्कम |
| रोख प्राप्त | ₹ ८,२८० | |

**१४ . मयूरच्या पुस्तकात खालील व्यवहारांच्या किर्द नोंदी करा –**

१. विश्वासने स्वीकृत करून दिलेल्या ₹ २२,०००च्या विपत्राचे ₹ १२,००० रोख व शेष राशीवर वार्षिक १२% प्रमाणे २ महिन्याचे व्याजासह नवीन विपत्र काढून नूतनीकरण करून घेतले.

२. अश्विनने काढलेल्या ₹ १७,७५० च्या विपत्राच्या पूर्ण शोधनार्थ हरीकडून मिळालेल्या ₹ १७,५०० च्या विपत्राचे पृष्ठांकन केले.

३. मयूरने काढलेले व प्रकाशने स्वीकारलेले ₹ २१,००० चे विपत्राचे नादारीमुळे त्याच्या संपत्तीतून २५% रक्कम वसूल झाली.

४. शैलजा ने स्वीकालेले ₹ ३२,००० चे विपत्र जे राशी संग्रहणासाठी बँकेत पाठविले होते, अनादरीत झाले आणि बँकेला ₹ २७५ नोंदणीखर्च आला असे बँकेने कळविले.

**मयूरच्या पुस्तकात किर्द नोंदी**

| दिनांक | विवरण | खा. पा. | नावे रक्कम ₹ | जमा रक्कम ₹ |
|---|---|---|---|---|
| १. (अ) | विश्वासचे खाते ....................नावे | | २२,००० | |
| | प्राप्त विपत्र खात्याला | | | २२,००० |
| | (नूतनीकरणासाठी विपत्र रद्द केल्याबद्दल) | | | |
| (ब) | विश्वासचे खाते ....................नावे | | २०० | |
| | व्याज खाते | | | २०० |
| | (व्याज देय झाल्याबद्दल) | | | |
| (क) | बँक खाते ....................नावे | | १२,००० | |
| | विश्वासच्या खात्याला | | | १२,००० |
| | (काही रक्कम मिळाल्याबद्दल) | | | |
| (ड) | प्राप्त विपत्र खाते ....................नावे | | १०,२०० | |
| | विश्वासच्या खात्याला | | | १०,२०० |
| | (नवीन विपत्राला व्याज रकमेसह स्वीकृतीबद्दल) | | | |
| २ | देय विपत्र खाते....................नावे | | १७,७५० | |
| | प्राप्त विपत्र खात्याला | | | १७,५०० |
| | कसर खात्याला | | | २५० |
| | (हरीकडून मिळालेल्या विपत्रातून देय विपत्राचे शोधन केल्याबद्दल) | | | |
| ३(अ) | प्रकाशचे खाते....................नावे | | २१,००० | |
| | प्राप्त विपत्र खात्याला | | | २१,००० |
| | (नादारीमुळे विपत्राचे अनादरण झाल्याबद्दल) | | | |
| (ब) | बँक खाते ....................नावे | | ५,२५० | |
| | बुडीत कर्ज खाते....................नावे | | १५,७५० | |
| | प्रकाशच्या खात्याला | | | २१,००० |
| | (प्रकाशकडून २५% रक्कम वसूल झाल्याबद्दल) | | | |
| ४. | शैलजाचे खाते....................नावे | | ३२,२७५ | |
| | राशीसंग्रहणासाठी बँक खात्याला | | | ३२,००० |
| | बँक खात्याला | | | २७५ |
| | (राशीसंग्रहणासाठी पाठविलेल्या विपत्राचे अनादरण होऊन नोंदणी खर्च झाल्याबद्दल) | | | |

**१५. आदित्यच्या पुस्तकात खालील व्यवहारांच्या किर्द नोंदी करा –**

अ) सूर्याने स्वीकारलेल्या व बँकेत राशीसंग्रहणासाठी पाठविलेल्या ₹ १५,७५० च्या विपत्राचे शोधन झाल्याचे व बँकेने ₹ १५० नोंदणी खर्च केल्याची सूचना बँकेकडून मिळाली.

ब) आशाने आदित्याला कळविले की, निशाने स्वीकारलेले व आशाला पृष्ठांकित केलेले ₹ २३,०००चे विपत्र अनादरित झाले व आशाला ₹ २३० नोंदणी खर्च आला.

क) जयदीपने स्वीकारलेले ₹ ३२,४००चे विपत्र अनादरित झाल्याचे व नोंदणी खर्च ₹ ४६० केल्याचे सूचना बँकेकडून प्राप्त झाली.

ड) राशीसंग्रहणाकरिता बँकेत जमा केलेले श्रीकांतच्या विपत्राची राशी ₹ १९,८०० बँकेत जमा झाली.

**आदित्याच्या पुस्तकात किर्द नोंदी**

| दिनांक | विवरण | खा. पा. | नावे रक्कम ₹ | जमा रक्कम ₹ |
|---|---|---|---|---|
| अ) | बँक खाते ....................नावे<br>नोंदणी खर्च खाते....................नावे<br>राशीसंग्रहणासाठी बँक खात्याला<br>(राशीसंग्रहणाकरिता पाठविलेल्या विपत्राचे शोधन होऊन नोंदणी खर्च आल्याबद्दल) | | १५,६००<br>१५० | १५,७५० |
| ब) | निशाचे खाते ....................नावे<br>आशाच्या खात्याला<br>(पृष्ठांकित केलेल्या विपत्राचे अनादरण होऊन नोंदणी खर्च झाल्याबद्दल) | | २३,२३० | २३,२३० |
| क) | जयदीपचे खाते ....................नावे<br>बँक खात्याला<br>(वटविलेल्या विपत्राचे अनादरण होऊन नोंदणी खर्च आल्याबद्दल) | | ३२,८६० | ३२,८६० |
| ड) | बँक खाते ....................नावे<br>राशीसंग्रहणासाठी बँक खात्याला<br>(देय दिनांकला राशीसंग्रहणाकरिता पाठविलेल्या विपत्राचे शोधन झाल्याबद्दल) | | १९,८०० | १९,८०० |

**१६. अरविंदच्या पुस्तकात २४ ऑक्टोबर २०१९ रोजी खालील व्यवहारांच्या किर्द नोंदी करा.**

अ) साईनाथने स्वीकारलेल्या ₹ १८,००० च्या विपत्राचे दोन महिन्याच्या ₹ ३८० व्याजासह नूतनीकरण केले.

ब) साहिलने अरविंदला कळविले की, मिनलने स्वीकारलेल्या व साहिलला पृष्ठांकित केलेल्या ₹ १३,०००च्या विपत्राचे अनादरण झाले व नोंदणी खर्च ₹ १९५ झाला.

क) चांद ॲन्ड सन्सला देय असलेल्या ₹ १९,००० बद्दल ₹ १६,४००चे दोन महिने मुदतीचे विपत्र स्वीकारले व बाकी रकमेचे रोख शोधन केले.

ड) विद्याकडून मिळालेल्या व बँकेत वटविलेल्या ₹ १४,०००च्या विपत्राचे विद्याने अनादरण केले व नोंदणी ₹ १०५ बँकेने केला. असे बँकेने कळविले. विद्याच्या विनंतीवरून ₹ २९५ व्याज आकारून दोन महिने मुदतीच्या विपत्राचे नूतनीकरण करण्यात आले.

इ) नंदिताने ₹ १३,५५० च्या विपत्राचे अरविंदला ₹ १३,००० रोख देऊन निवर्तन केले.

**अरविंदच्या पुस्तकात किर्द नोंदी**

| दिनांक | विवरण | खा. पा. | नावे रक्कम ₹ | जमा रक्कम ₹ |
|---|---|---|---|---|
| अ) २०१९ i) ऑक्टो. २४ | साईनाथचे खाते ..........नावे<br>प्राप्त विपत्र खात्याला<br>(नूतनीकरणासाठी विपत्र रद्द केल्याबद्दल) | | १८,००० | <br>१८,००० |
| ii) ऑक्टो. २४ | साईनाथचे खाते ..........नावे<br>व्याज खात्याला<br>(व्याज देय झाल्याबद्दल) | | ३८० | <br>३८० |
| iii) ऑक्टो. २४ | प्राप्त विपत्र खाते ..........नावे<br>साईनाथचे खात्याला<br>(व्याजासह नवीन विपत्राला स्वीकृती मिळाल्याबद्दल) | | १८,३८० | <br>१८,३८० |
| ब) ऑक्टो. २४ | मिनलचे खाते ..........नावे<br>साहिलच्या खात्याला<br>(पृष्ठांकित केलेल्या विपत्राचे अनादरण होऊन नोंदणी खर्च केल्याबद्दल) | | १३,१९५ | <br>१३,१९५ |
| क) | चांद ॲन्ड सन्स खाते ..........नावे<br>देय विपत्र खात्याला<br>रोकड खात्याला<br>(विपत्राला स्वीकृती दिली व काही रक्कम रोख दिल्याबद्दल) | | १९,००० | <br>१६,४००<br>२,६०० |
| ड) i) | विद्याचे खाते..........नावे<br>बँक खात्याला<br>(वटविलेल्या विपत्राचे अनादरण होऊन नोंदणी खर्च केल्याबद्दल) | | १४,१०५ | <br>१४,१०५ |
| ii) | विद्याचे खाते..........नावे<br>व्याज खात्याला<br>(व्याज देय झाल्याबद्दल) | | २९५ | <br>२९५ |
| iii) | प्राप्त विपत्र खाते ..........नावे<br>विद्याच्या खात्याला<br>(व्याजासह नवीन विपत्राला स्वीकृती मिळाल्याबद्दल) | | १४,४०० | <br>१४,४०० |
| ई) | रोकड खाते ..........नावे<br>कसर खाते ..........नावे<br>प्राप्त विपत्र खात्याला<br>(कसरीवर विपत्राचे निवर्तन झाल्याबद्दल) | | १३,०००<br>५५० | <br><br>१३,५५० |

**१७. अपूर्वाच्या पुस्तकात खालील व्यवहारांच्या किर्द नोंदी करा.**

अ) प्रशांतने स्वीकारलेले ६० दिवस मुदतीचे विपत्र राशीसंग्रहणासाठी बँकेत जमा केले.

ब) अपूर्वाने, कीर्तीला ₹ २०,०००चा माल (वस्तू) विकला आणि तिने तेवढ्याच राशीचे दोन महिने मुदतीचे विपत्र स्वीकारले. ते विपत्र रेखाला पृष्ठांकित केले.

क) नादार म्हणून घोषित झालेल्या मुक्ताकडून तिच्या खाजगी संपत्तीमधून ३०% राशी प्राप्त झाली. मुक्ताने ₹२३,८५० चे विपत्र अनादरित केले होते व नोंदणी खर्च ₹ १५० झाला होता.

ड) अपूर्वाने अनुराधाला स्वीकारून दिलेल्या ₹ ३६,०००च्या विपत्राचे ₹ ६,००० चा धनादेश व शेष रकमेसाठी १४.५% वार्षिक दोन महिन्याचे व्याजसह नवीन विपत्र स्वीकारून नूतनीकरण करून दिले.

**अपूर्वाच्या पुस्तकात किर्द नोंदी**

| दिनांक | विवरण | खा. पा. | नावे रक्कम | जमा रक्कम |
|---|---|---|---|---|
| अ) | राशीसंग्रहासाठी विपत्र खाते ....................................नावे | | १२,७५० | |
| | प्राप्त विपत्र खात्याला | | | १२,७५० |
| | (राशीसंग्रहासाठी विपत्र बँकेत पाठविल्याबद्दल) | | | |
| ब) | किर्तीचे खाते ...............................................नावे | | २०,००० | |
| i) | विक्री खात्याला | | | २०,००० |
| | (वस्तूंची उधार विक्री केल्याबद्दल) | | | |
| ii) | प्राप्त विपत्र खाते ..........................................नावे | | २०,००० | |
| | कीर्तीच्या खात्याला | | | २०,००० |
| | (विपत्राला स्वीकृती मिळाल्याबद्दल) | | | |
| ii) | रेखाचे खाते ................................................नावे | | २०,००० | |
| | प्राप्त विपत्र खात्याला | | | २०,००० |
| | (नियमांचे पृष्ठांकन केल्याबद्दल) | | | |
| क) | मुक्ता खाते ...............................................नावे | | २४,००० | |
| i) | प्राप्त विपत्र खात्याला | | | २३,८५० |
| | रोकड खात्याला | | | १५० |
| | (मुक्ताच्या स्वीकृत विपत्राचा अनादर झाला व नोंदणी शुल्क दिले) | | | |
| ii) | रोकड खाते ...............................................नावे | | ७,२०० | |
| | बुडीत कर्ज खाते............................................नावे | | १६,८०० | |
| | मुक्ताच्या खात्याला | | | २४,००० |
| | (मुक्ताकडून ३०% राशी वसूल झाली बाकी बुडीत कर्ज झाल्याबद्दल) | | | |
| ड) | देयविपत्र खाते.............................................नावे | | ३६,००० | |
| i) | अनुराधाच्या खात्याला | | | ३६,००० |
| | (नूतनीकरणासाठी विपत्र रद्द केल्याबद्दल) | | | |
| ii) | अनुराधाचे खाते ..........................................नावे | | ६,००० | |
| | बँक खात्याला | | | ६,००० |
| | (काही रकमेचा चेक दिल्याबद्दल) | | | |
| iii) | व्याज खाते.................................................नावे | | ७२५ | |
| | अनुराधाच्या खात्याला | | | ७२५ |
| | (व्याजाची आकारणी केल्याबद्दल) | | | |
| iv) | अनुराधाचे खाते ..........................................नावे | | ३०,७२५ | |
| | देयविपत्र खात्याला | | | ३०,७२५ |
| | (व्याजासह नवीन विपत्राला स्वीकृती दिल्याबद्दल) | | | |

## वस्तुनिष्ठ प्रश्न – (Objective Questions)

### अ) योग्य पर्याय निवडून वाक्य पुन्हा लिहा.

१) ज्या व्यक्तीवर विपत्र काढले जाते तिला .................... म्हणतात.
अ) आहार्यी ब) आदाता क) आहर्ता ड) स्वीकर्ता

२) विपत्राला स्वीकृती मिळण्यापूर्वी विपत्र .................... असते.
अ) आदेश ब) विनंती क) मसुदा ड) साधन

३) जेव्हा विपत्राच्या देयदिनांकास सार्वजनिक सूट्टी असते, तेव्हा विपत्राचे शोधन .................... दिवशी करण्यात येते.
अ) त्यादिवशी ब) पूर्वीच्या क) नंतरच्या ड) कोणत्याही

४) २३ नोव्हेंबर, २०१९ रोजी काढलेल्या दोन महिने मुदतीच्या विपत्राचा देयदिनांक .................... राहील.
अ) २३ जाने. २०२० ब) २५ जाने. २०१९ क) २६ जाने. २०१९ ड) २५ जाने. २०२०.

५) नोंदणी खर्चाची आकारणी करतो .....................
अ) नोंदणी अधीकारी ब) आहार्यी क) आहर्ता ड) पृष्ठांकिती

६) विनिमय विपत्रात .................... पक्ष असतात.
अ) पाच ब) चार क) तीन ड) दोन.

७) ३ जानेवारी, २०२० रोजी काढलेल्या दोन महिने मुदतीच्या विपत्राचा देय दिनांक .................... राहील.
अ) ३ जाने. २०२० ब) ३ मार्च. २०२० क) ५ मार्च. २०२० ड) ६ मार्च. २०२०.

८) नोंदणी अधिकारी (Notary Public) हा .................... असतो.
अ) सरकारी अधिकारी ब) आहर्ता क) आदाता ड) पृष्ठांकिती

९) विपत्रधारकाला जेव्हा स्वीकर्ता किंवा आहार्यी विपत्राचे शोधन करीत नाही तेंव्हा त्यास विपत्राचे .................... झाले असे म्हणतात.
अ) परत करणे (Returning) ब) वटविणे क) आदर करणे ड) अनादरण

१०) जो व्यक्ती विपत्र स्वीकारतो त्याच्यासाठी ते विपत्र .................... असते
अ) देयविपत्र ब) वचन चिठ्ठी क) मसुदा ड) प्राप्त विपत्र

### ब) खालील विधानासाठी एक शब्द, शब्दसमूह किंवा संज्ञा सूचना.

१) विपत्राच्या मुदतीनंतर दिले जाणारे जास्तीचे तीन दिवस –
२) विपत्राच्या अनादरण प्रसंगी नोंदणी अधिकाऱ्याकडून आकारले जाणारे शुल्क
३) विपत्राची रक्कम प्राप्त करणारी व्यक्ती
४) ज्या व्यक्तीच्या नावे विपत्राचे पृष्ठांकन करण्यात येते.
५) विपत्राच्या अनादरणाची नोंद करण्यासाठी शासनाकडून नियुक्त केलेला अधिकारी
६) वाढीव मुदतीचे नवीन विपत्र काढण्यासाठी देयदिनांकच्या वेळी विपत्र रद्द करून नवीन विपत्र तयार करणे.
७) कोणत्याही मोबदल्याशिवाय काढलेले व स्वीकारलेले विपत्र
८) ज्या व्यक्तीच्या ताब्यात (Possession) विनिमय विपत्र असते.
९) सध्याच्या किंमतीला विनिमय विपत्राचे रोखीत रूपांतर (Conversion) करणे.
१०) दिवाळखोर परिस्थितीत आहार्यीकडून वसूल न होणारी रक्कम –

## क) चुक की बरोबर सांगा.

१) देशी विपत्र एका देशात काढले जाते आणि दुसऱ्या देशात त्याचे शोधन जाते.

२) देयदिनांकापूर्वी विपत्राचे शोधन करणे म्हणजे विपत्राचे निवर्तन होय.

३) आहार्यी विपत्राचा मालकी हक्क हस्तांतरित करू शकतो.

४) विपत्राच्या मुदतीत कोणताही बदल न करता विपत्र स्वीकृत केल्यास त्यास सशर्त स्वीकृती असे म्हणतात.

५) सध्याच्या किमतीला विपत्राचे रोखीत रूपांतर करणे म्हणजे विपत्र वटविणे होय.

६) देयदिनांकला विनिमय विपत्र स्वीकर्त्याकडे सादर केले पाहिजे.

७) विपत्रधारकांकडून विपत्र वटविलेले असल्यास, देयदिनांकला त्याच्या पुस्तकात विपत्राच्या शोधनाची नोंद होणार नाही.

८) आहर्त्याकडून नोंदणी खर्च आकारला जातो.

९) दर्शनी विपत्राला (On Demand) सवलतीचे दिवस दिले जात नाहीत.

१०) वचन चिट्ठीला तीन पक्ष असतात.

## ड) गटात न बसणारा शब्द ओळखा.

१) अ) विपत्र स्वतः जवळ ठेवणे ब) नोंदणी क) वटविणे ड) पृष्ठांकन

२) अ) व्यापारी विपत्र ब) सोयविपत्र क) लेखन तिथीनुसार विपत्र ड) दर्शनी विपत्र

३) अ) नोंदणी अधकारी ब) आहर्ता क) आहार्यी ड) आदाता

४) अ) वटणावळीचा खर्च (Discounting Charges) ब) सूट (Rebate) क) बँके सेवाशुल्क ड) नोंदणी खर्च

५) अ) मुद्रांक ब) स्वीकृती क) मसुदा ड) रक्कम

## इ) खालील विधाने पूर्ण करा.

१) विपत्राच्या देयतिथीपूर्वी विपत्राचे शोधन करणे म्हणजे..................होय.

२) अशी व्यक्ती ज्याची देयता (कर्ज) त्याच्या संपत्तीपेक्षा जास्त असते आणि तो आपल्याकडील कर्ज/देयता देण्यास असमर्थ असतो...........................

३) दिवाळखोर परिस्थितीत स्वीकर्ता आपल्याकडील जी रक्कम देऊ शकत नाही, ती राशी म्हणजे...................होय.

४) ठरावीक कालावधीनंतर ज्या विपत्राची रक्कम देय होते त्यास ................... म्हणतात.

५) मोबदल्यासह काढलेले आणि स्वीकारलेले ................... विपत्र होय.

६) जो व्यक्ती विपत्र काढतो त्यास ................... म्हणतात.

७) विपत्राच्या स्वीकृतीनंतर ज्या विपत्राची देय दिनांक काढली जाते त्यास .................... विपत्र असे म्हणतात.

८) विपत्राच्या अनादरणाची सत्यता नोंदविणे म्हणजे ................... होय.

९) जेव्हां आहार्यी ठरावीक ठिकाणीच विपत्राचे शोधन करण्यात येईल या अटीवर विपत्राला स्वीकृती देतो तेव्हा त्यास...................असे म्हणतात.

१०) विपत्रधारकाच्या वतीने विपत्राची रक्कम बँक गोळा (Collection) करते, तेव्हा बँक जी फी आकारते त्यास ................... म्हणतात.

## फ) एका वाक्यात उत्तरे द्या–

१) विनिमय विपत्र म्हणजे काय?

२) सवलतीचे दिवस म्हणजे काय?

३) विनिमय विपत्र वटविणे म्हणजे काय?

४) विपत्राची नोंदणी कशाला म्हणतात?

५) नोंदणी खर्च म्हणजे काय?

६) आहर्ता व आहार्थी यांच्यामधील नातेसंबध सांगा?

७) विपत्राचा आदाता कोण असतो?

८) सूट/कसर (Rebate) म्हणजे काय?

९) कायदेशीर देयदिनांक म्हणजे काय?

१०) दर्शनी विपत्र म्हणजे काय?

## ग) खालील विधानाशी तुम्ही सहमत आहात का असहमत ते सांगा.

१) विनिमय विपत्र म्हणजे सशर्त आज्ञा होय.

२) जो पक्ष रक्कम देण्याचे आदेश देतो त्यास आदाता म्हणतात

३) ज्या व्यक्तीच्या नावे विपत्राचे पृष्ठांकन करण्यात येते त्यास पृष्ठांकिती असे म्हणतात.

४) विपत्राच्या निवर्तना प्रसंगी दिलेली सूट/कसर आहार्यीचे उत्पन्न असते.

५) ऋणकोच्या दृष्टीकोनातून विपत्र त्याच्यासाठी देयविपत्र असते.

६) दर्शनी विपत्र काढल्यास (on Demand) सवलतीचे दिवस दिले जात नाहीत.

७) विपत्र आहर्त्याकडून स्वीकारले गेले पाहिजे, अशी अपेक्षा असते.

८) विनिमय विपत्रावर दिनांकाची गरज नाही.

९) विपत्राला स्वीकृती मिळण्यापूर्वी ती वचनचिठ्ठी असते.

१०) विपत्राचे नूतनीकरण म्हणजे विपत्राच्या शोधनासाठी विपत्राची मुदत वाढविणे होय.

## ह) सोडवा. (Calculations)

१) १५ जाने. २०२० रोजी गणेशने ५० दिवस मुदतीचे ₹ ४०२६चे विपत्र काढले. त्याच दिवशी त्याने बँक ऑफ इंडियामध्ये ते विपत्र वार्षिक १५% कसरीवर वटविले. **कसर काढून दाखवा.**

२) शेफाली ट्रेडर्सने मायावर १ ऑक्टोबर २०१९ रोजी ३ महिने मुदतीचे ₹ ३०,००० चे विपत्र काढले. **खालील परिस्थितीत विपत्राची कसर काढून दाखवा.**

i) त्याच दिवशी शेफाली ट्रेडर्सने ते विपत्र वार्षिक १२% कसरीवर वटविल्यास.

ii) शेफाली ट्रेडर्स नेते विपत्र १ नोव्हेंबर २०१९ रोजी वार्षिक १२% कसरीवर वटविल्यास.

iii) शेफाली ट्रेडर्सने १ डिसेंबर, २०१९ रोजी वार्षिक १२% कसरीवर ते विपत्र वटविल्यास–

३) विणाने, सुधाचे ₹ २५,००० चे विपत्र स्वीकारले होते ती नादार (Bankrupt) म्हणून घोषित झाली तिच्या खाजगी संपत्तीतून रुपयाला ३५ पैसे प्रमाणे रक्कम वसूल झाली. **बुडीत कर्जाची रक्कम शोधून काढा.**

४) नितीनने ₹ २२,००० रोख व शेष रकमेवर वार्षिक १८% ४ महिन्याच्या व्याजासह नवीन विपत्र स्वीकारून ₹ ७,२०० च्या विपत्राचे नूतनीकरण करून घेतले. **नवीन विपत्राची रक्कम काढा.**

५) निशाचे विपत्र ₹ १६,८५०चे राशीसंग्रहणासाठी बँकेत पाठविले होते. बँकेने त्याचे पैसे गोळा केले आणि बँक सेवाशुल्क ₹ १२५ नावे टाकले. **प्रत्यक्षात आपल्याला किती रक्कम मिळाली?**

६) १२ जून, २०१९ रोजी केशवने दोन महिने मुदतीचे ₹ १६,००० चे विपत्र गोपालवर काढले होते. विपत्राचा देयदिनांक काय राहील? समजा त्याचदिवशी आकस्मिक सूट्टी जाहीर झाल्यास कायदेशीर देयदिनांक कोणता राहील?

ज) **खालील नमुने तयार करा.**

१) **खालील माहितीवरून विनिमय विपत्र तयार करा –**

आर्हता : शंकर, वडोदरा, गुजरात

आहार्यी : विनायक, सोमवार पेठ, पुणे

राशी : ₹ १६,०००

मुदत : ३ महिने

विपत्राची तारीख : ६ सप्टेंबर, २०१९.

स्वीकृतीची तारीख : ११ सप्टेंबर, २०१९.

२) **खालील माहितीचे आधारे विनिमय विपत्र तयार करा.**

आर्हता : दिनेश, पी. आर. रोड, अंधेरी (प.)

आहार्यी : महेश, एल. बी. एस. रोड, मुलुंड

आदाता : अमित, ठाणे (प.)

राशी : ₹ ९,५००

विपत्राची मुदत : ४ महिने (दर्शनोत्तर).

विपत्राची तिथी : २६ नोव्हेंबर २०१९.

विपत्राची स्वीकृती : २९ नोव्हेंबर २०१९.

३) १० ऑक्टोबर, २०१९ रोजी कांतीलाल, ३४३/डी/पालम हाईटस, जोगेश्वरी यांनी ₹ ६३,४९०चे ४५ दिवस मुदतीचे दर्शनोत्तर विपत्र (After Date) शांतीलाल, B2, हिमालया टावर्स बारामती यांच्यावर काढले. विपत्राची रक्कम प्रियंका सातारा यांना होणे आहे. १३ ऑक्टोबर, २०१९ रोजी ६० दिवसांकरिता विपत्राला स्वीकृती मिळाली.
**वरील माहितीवरून विनिमय विपत्राचा नमुना तयार करा.**

४) राहुल साने ८६ डी रविवार पेठ नागपूर यांनी ३० जुलै २०१९ रोजी पृथ्वीराम सोमानी, हाईटस वर्धा ह्यांनी काढलेले ₹ ८७०००चे विपत्र स्वीकारले. हे ९० दिवस मुदतीचे दर्शनोत्तर विपत्र रु. १००००० २६ जुलै, २०१९ला काढण्यात आले होते.
**वरील माहितीवरुन विनिमय विपत्र तयार करा.**

५) **पुढील माहितीचे आधारे विनिमय विपत्र तयार करा.**

आहर्ता : कश्मिरा शहा, भागीदार मे. शहा ॲन्ड शहा २-८ मातृछाया बिल्डींग, अकोला.

आहार्यी : धनश्री ट्रेडर्स, बँगलोर रोड, (जयश्रीकडून स्वीकृत भागीदार) बेलगाम.

राशी : ₹ ६४,५००

मुदत : ३ महिने

विपत्राची तारीख : १२ सप्टेंबर, २०१९

स्वीकृतीची तारीख : १५ सप्टेंबर, २०१९

६) **काल्पिनक आहर्ता, आहार्यी, त्यांचे पत्ते राशी आणि तारखा विचारात घेऊन दर्शनी विपत्र तयार करा.**

ज) खालील कोष्टक पूर्ण करा.

१)

| | विपत्राची तारीख | स्वीकृतीची तारीख | मुदत | देय दिनांक |
|---|---|---|---|---|
| i) | ३०.०९.२०१९ | ०१.०२.२०१९ | ६० दिवस (दर्शनोत्तर) | |
| ii) | १७.०८.२०१९ | २१.०८.२०१९ | ३ महिने लेखनतिथी | |
| iii) | २३.१२.२०१९ | २६.१२.२०१९ | १ महिना लेखनतिथी | |
| iv) | २८.०१.२०२० | २८.०१.२०२० | १ महिना (लेखनतिथी) | |
| v) | ३०.०६.२०१९ | २.०७.२०१९ | ४५ दिवस (लेखनतिथी) | |

२)

| | विपत्राची तारीख | स्वीकृतीची तारीख | मुदत | प्रकार | परिपक्वतातिथी नामधारी देयदिनांक | कायदेशीर देयदिनांक |
|---|---|---|---|---|---|---|
| i) | ०३.०१.२०२० | ०५.०१.२०२० | ४५ दिवस | लेखनतिथी | ? | ? |
| ii) | ०९.०४.२०१९ | १२.०४.२०१९ | ४ महिने | दर्शनोत्तर | ? | ? |
| iii) | २३.११.२०१९ | २३.११.२०१९ | २ महिने | लेखनतिथी | ? | ? |
| iv) | १६.०८.२०१९ | २०.०८.२०१९ | ४ महिने | दर्शनोत्तर | ? | ? |
| v) | २३.१२.२०१८ | २४.१२.२०१८ | ६० दिवस | लेखनतिथी | | ? |

## प्रात्यक्षिक उदाहरणे

१) १ जानेवारी, २०२० हेमंतने ₹ १८,५००च्या वस्तू नितीनला विकल्या त्याच दिवशी हेमंतने त्याच्यावर ₹ १८,५००चे दोन महिने मुदतीचे विपत्र काढले. देयदिनांकाला विपत्राचे शोधन झाले.

**हेमंत आणि नितीनच्या पुस्तकात किर्द नोंदणी घ्या. हेमंतच्या पुस्तकात नितीनचे खाते तयार करा.**

२) ६ सप्टेंबर, २०१९ रोजी नेहाने ₹ ४२,०००च्या वस्तू रोहनला विकल्या नेहाने त्याच्यावर तीन महिने मुदतीचे विपत्र लिहिले, जे रोहनने स्वीकारले. नेहाने ते विपत्र आपल्या बँकेत ₹ ४१,४००ला वटविले विपत्राच्या देय दिनांकला रोहनने विपत्राचे अनादरण केले आणि बँकेला ₹ ३०० नोंदणी खर्च आला

**नेहाच्या पुस्तकात किर्द नोंदी घ्या.**

३) ज्योतीला स्वातीचे ₹ ३१,००० देणे होते म्हणून स्वातीने ज्योतीवर २ महिने मुदतीचे विपत्र काढले जे ज्योतीने स्वीकारले स्वातीने ते विपत्र राशीसंग्रहणासाठी बँकेत पाठविले. देय दिनांकला ज्योतीने विपत्राचे शोधन केले. बँकेने सेवाशुल्कचे ₹ ४७५ नावे टाकले.

**स्वातीच्या पुस्तकात किर्द नोंदी देऊन ज्योतीच्या पुस्तकात स्वातीचे खाते उघडा.**

४) १५ एप्रिल, २०१९ रोजी पंकजने ओमप्रकाशकडून ₹ २०,०००च्या वस्तू उधार खरेदी केल्या, पंकजकडून येणे असलेल्या रकमेकरिता ओमप्रकाशने त्याच्यावर ३ महिने मुदतीचे दर्शनोत्तर विपत्र काढले, जे पंकजने १८ एप्रिल २०१९ ला स्वीकारले. ओमप्रकाशने हे विपत्र २० एप्रिल, २०१९ आपला धनको जगदीश याला ₹ २१,००० च्या पूर्वशोधनार्थ पृष्ठांकीत केले.
देय तारखेला पंकजने विपत्राचे अनादरण केले.

**ओमप्रकाश, पंकज आणि जगदीश यांचे पुस्तकात किर्द नोंदी द्या.**

५) १८ मार्च, २०१९ रोजी सिद्धार्थने ₹ ४३,८०० च्या वस्तू सुधीरला विकल्या व सुधीरवर ३ महिने मुदतीचे विपत्र ₹ ४३,८००चे काढले. सुधीरने ते स्वीकारले. सिद्धार्थने ते विपत्र वार्षिक ८% दराने बँकेत वटविले. देयदिनांकाला विपत्राचे अनादरण झाले. सुधीरने सिद्धार्थला विनंती केली की, ₹ १३,८०० व शेष रक्कमेवरील वार्षिक १२% दोन महिन्याचे व्याज रोख द्यावे आणि उरलेल्या रकमेसाठी दोन महिने मुदतीचे विपत्र काढावे. या विपत्राच्या देयदिनांकापूर्वी सुधीरने ₹ २९,७०० देऊन विपत्राचे निवर्तन केले.

**सिद्धार्थच्या पुस्तकात आवश्यक किर्द नोंदी द्या.**

६) गीताने काढलेले ३ महिने मुदतीचे ₹ १८,०००चे विपत्र संगीताने स्वीकारले. गीताने ते विपत्र ₹ १७,४०० ला बँकेत वटविले. देयदिनांकापूर्वी संगीताने गीताशी संपर्क साधून विपत्राच्या नूतनीकरणाची विनंती केली. गीताने या अटीवर विनंती मान्य केली की, तिने ₹ ६,००० ताबडतोब रोख द्यावे व शेष रकमेकरीता ४ महिने मुदतीचे ₹ ५५० व्याजासहित नवीन विपत्र स्वीकारावे. या प्रमाणे व्यवस्था करण्यात आली. परंतु नवीन विपत्राच्या देय दिनांकापूर्वी संगीता नादार झाली आणि तिच्या संपत्तीतून रुपयाला ३५पैसे प्रमाणे रक्कम मिळाली.

**संगीताच्या पुस्तकात किर्द नोंदी देऊन गीताच्या पुस्तकात संगीताचे खाते लिहा.**

७) प्रियंकाला, मिनाचे ₹ १८,००० देणे होते. मिनाने काढलेल्या ४ महिने मुदतीच्या विपत्राला स्वीकृती दिली ते विपत्र मिनाने सागरला पृष्ठांकित केले. देय दिनांका पूर्वी प्रियंकाने मीनाशी संपर्क साधून विपत्राच्या नूतनीकरणाची विनंती केली मीनाने या शर्तीवर मान्यता दिली की, तिने ₹ ६,००० रोख, शेष रकमेवर वार्षिक ८% व्याज ३ महिन्याचे ताबडतोब द्यावे. आणि बाकी रकमेचे नवीन विपत्र स्वीकारावे. याप्रमाणे व्यवस्था करण्यात आली. देयतिथीपूर्वी प्रियंका नादार म्हणून घोषित झाली. आणि तिच्या संपत्तीतून ५०% राशी प्राप्त झाली.

**मिनाच्या पुस्तकात किर्द नोंदी द्या.**

८) १ ऑगस्ट, २०१९ रोजी सीमाने रोमाकडून ₹ ३७,०००च्या वस्तू उधार खरेदी केल्या. त्याच दिवशी तेवढ्याच रकमेचे रोमाने काढलेले २ महिने मुदतीचे विपत्र सीमाने स्वीकारले. ३ ऑगस्ट, २०१९ रोजी सीमाने ते विपत्र बँकेत ₹ ३६,२००ला वटविले. देय दिनांकला विपत्राचे अनादरण झाले व बँकेला ₹ १६० नोंदणीखर्च आला. सीमाने ₹ १९,००० व नोंदणीखर्च व इतर रक्कम ताबडतोब रोख दिली. रोमाने शिल्लक रकमेवर ₹ ६५० व्याज आकारून दोन महिने मुदतीचे विपत्र काढले, जे सीमाने स्वीकारले. नवीन विपत्राचे देयदिनांकाच्या एक महिना अगोदर ₹ ३०० कसरीवर निवर्तन झाले.

**सीमाच्या पुस्तकात किर्द नोंदी देऊन रोमाच्या पुस्तकात सीमाचे खाते लिहा.**

९) उदयने, शंकर कडून ₹ ३५,००० च्या वस्तू १०% व्यापारी कसरीवर उधार खरेदी केल्या. उदयने ₹ १,५०० ताबडतोब रोख दिले आणि रोख रकमेसाठी ३ महिने मुदतीचे विपत्र स्वीकारले. देयतिथीपूर्वी उदयने, शंकरशी संपर्क साधून विपत्राच्या नूतनीकरणाची विनंती केली. उदयने या अटीवर मान्यता दिली की, नवीन विपत्र वार्षिक १२% व्याजासह तीन मुदतीचे स्वाकारावे.

**शंकरच्या पुस्तकात किर्द नोंदी घ्या.**

१०) २१ नोव्हेंबर, २०१९ रोजी सागरने प्रसादवर तीन महिने मुदतीचे ₹ २१,००० दर्शनी विपत्र काढले. सागरने ते विपत्र त्याच्या बँकेत वार्षिक ८% कसरीवर वटविले. देय तिथीपूर्वी आपण विपत्राचे शोधन करू शकत नाही, असे प्रसादला वाटत असल्यामुळे त्याने सागरला नवीन विपत्र काढण्याची विनंती केली. सागरने त्याची विनंती मान्य करून १ महिना मुदतीवर ₹ २१,७५० व्याजासह विपत्र काढले. प्रसादने ते स्वीकारले सागरने ते विपत्र राशीसंग्रहणासाठी बँकेत जमा केले देयदिनांकला प्रसादने विपत्राचे शोधन केले बँकेने सेवा शुल्क म्हणून ₹ २५०नावे टाकले.

**सागरच्या पुस्तकात किर्द नोदी द्या आणि प्रसादच्या पुस्तकात सागरचे खाते तयार करा.**

**११) अभिषेकच्या पुस्तकात खालील व्यवहारांच्या किर्द नोंदी करा.**

अ) सिद्धांतने अभिषेकला कळविले की, त्याला (सिद्धांतने पृष्ठांकित केलेल्या) विनीतच्या ₹ २३,०००च्या विपत्रांचे अनादरण झाले व नोंदणी खर्च ₹ ४३० आला.

ब) काजलने स्वीकारलेल्या ₹ ३९,०००च्या विपत्राचे ₹ ३,००० रोख देऊन, शेष रकमेवर वार्षिक ११.५% प्रमाणे ३ महिन्याच्या व्याजासह नवीन विपत्र स्वीकारून नूतनीकरण करून घेतले.

क) राधिकाने ₹ २३,०००च्या विपत्राचे ₹ २२,२५०धनादेशाद्वारे देऊन निवर्तन केले.

ड) सुबोधने काढलेले ₹ ९,०००चे विपत्र राशीसंग्रहणासाठी बँकेत पाठविले होते. सुबोधने विपत्राचे अनादरण केल्याचे बँकेने कळविले.

**१२) नरेन्द्रच्या पुस्तकात खालील व्यवहारांच्या किर्द नोंदी करा.**

अ) उपेन्द्रने काढलेल्या विपत्राचे रोख ₹ ४,००० आणि रामलाल ने स्वीकृत केलेले ₹ ५,००० चे विपत्र उपेन्द्रला पृष्ठांकित करून विपत्राचे निवर्तन केले.

ब) विक्रमने आपल्या ₹ ६,०००च्या विपत्राचे देयतिथीपूर्वी १ महिना अगोदर वार्षिक १२% कसरीवर नरेन्द्रला निवर्तन केले.

क) दिलीपने नरेन्द्रला ₹ १२,०००च्या विपत्राचे ₹ ४,००० रोख व शेष रकमेवर तीन महिन्याचे वार्षिक १२% व्याजासह नवीन विपत्र स्वीकारून नूतनीकरण केले.

ड) कार्तिकवर काढलेल्या व बँकेत वटविलेल्या ₹ १३,०००च्या विपत्राचे अनादरण झाल्याचे व नोंदणी खर्च ₹ १४० आल्याचे बँकेने नरेन्द्रला कळविले.

**१३) भारतीच्या पुस्तकात खालील व्यवहारांच्या किर्द नोंदी करा –**

अ) अमीतचे ₹ १५,७५०च्या विपत्राचे जे राशीसंग्रहणासाठी बँकेत जमा होते. त्याचे शोधन झाल्याचे व बँकेने त्याबद्दल सेवाशुल्क म्हणून ₹ १५० नावे टाकल्याचे बँकेने कळविले.

ब) नितीनने आपल्या ₹ २२,२००च्या विपत्राचे ₹ २,२०० रोख देऊन आणि शेष रकमेवर वार्षिक १०% प्रमाणे तीन महिन्याच्या व्याजासह नवीन विपत्र स्वीकारून नूतनीकरण करून घेतले.

क) धनश्रीने, भारतीचे ₹ १७,५००चे विपत्र स्वीकारले होते. ती नादार म्हणून घोषित झाली. तिच्या संपत्तीतून ४०% रक्कम वसूल होऊ शकते.

ड) सविताकडून स्वीकारलेल्या ₹ ९,४५० च्या देय विपत्राचे शोधन, प्रवीणकडून मिळालेल्या ₹ ९,०००च्या प्राप्त विपत्राचे पृष्ठांकन करून केले.

**१४) सुधाच्या पुस्तकात खालील व्यवहारांच्या किर्द नोंदी करा.**

अ) ऊर्मिलाच्या ₹ १०,००० देय रकमेसाठी तिला रोख ₹ ३,५०० आणि सोनालीकडून मिळालेले दोन महिने मुदतीचे ₹ ६,०००च्या विपत्राचे पृष्ठांकन करून पूर्ण शोधन केले.

ब) सूर्याकडून मिळालेल्या दोन महिने मुदतीचे ₹ ७,०००चे विपत्र वार्षिक १०% कसरीवर बँकेत वटविले.

क) अनुराधाने स्वीकारलेले व बँकेत वटविलेले ₹ ४८०चे विपत्र अनादरित झाल्याचे व नोंदणीखर्च ₹ १२५ झाल्याचे बँकेने कळविले.

ड) राशीसंग्रहणासाठी ₹ १६,४००चे बँकेत जमा असलेल्या विपत्राचे पूजाने शोधन केले.

**१५) खालील व्यवहारांच्या किर्द नोंदी मृणालच्या पुस्तकात करा.**

अ) ऐश्वर्याने स्वीकारलेल्या व बँकेत वटविलेल्या ₹ २४,००० च्या विपत्राचे अनादरण झाल्याचे व नोंदणी खर्च ₹ २२० आल्याचे बँकेने कळविले. ऐश्वर्याच्या विनंतीवरून ₹ ४८० व्याज आकारून एकूण रकमेचे २ महिने मुदतीचे नवीन विपत्र काढण्यात आले.

ब) अंकुरच्या संपत्तीतून ₹ ४,६३० मिळाले. अंकुरने ₹ ६,०००चे विपत्र स्वीकारलेले होते तो नादार म्हणून घोषित झाला.

क) अनुष्काला देय असलेल्या ₹ २०,००० रकमेसाठी तिने काढलेल्या ३ महिने मुदतीच्या ₹ १५,००० या विपत्राला स्वीकृती देऊन आणि शेष रकमेचा धनादेश देऊन शोधन केले.

ड) विवेकने काढलेल्या ₹ २७,०००च्या विपत्राचे अनादरण झाले आणि ₹ ७०० नोंदणीखर्च विवेकने दिला.

# ८. प्रमंडळ खाती (Company Accounts)
## भागांचे लेखांकन (Issue of Shares)

अभ्यास घटक

**अभ्यास घटक (Contents):**

**८.१ भाग आणि भांडवल**

- ८.१.१ अर्थ आणि व्याख्या
- ८.१.२ भागांचे प्रकार
- ८.१.३ कंपनीच्या ताळेबंदातील भाग भांडवलाची हाताळणी (आडवा नमुना)

**८.२ भाग भांडवलाचे लेखांकन**

- ८.२.१ समभागांचे निर्गमन आणि वाटप (Issue and allotment of equity shares)
- ८.२.२ भागांचे खाजगीरित्या निर्गमन (विक्री) (Private Placement of shares)
- ८.२.३ भागांचे सार्वजनिक अभिदान (Public Subscription of shares)
- ८.२.४ भागांचे अधिक आणि कमी अभिदान (Oversubscription and Undersubscription of shares)
- ८.२.५ सममूल्यावर, अधिमूल्यावर आणि कसरीवर भागांचे निर्गमन
- ८.२.६ पूर्वप्राप्त याचना आणि अप्राप्त याचना (हप्ता मागणी) (Calls in advance and calls in arrears)
- ८.२.७ रोख प्रतिफलाशिवाय भागांचे निर्गमन

**८.३ भागांची जप्ती (Forfeiture of Shares)**

- ८.३.१ भागांची जप्तीची लेखांकीय हाताळणी
- ८.३.२ जप्ती भागांची पुनःविक्री

८.४ प्रमंडळाचे ताळेबंदात भाग भांडवल दर्शविणे [क्षैतीज / आडव्या स्वरूपात (Horizental form)]

**क्षमता विधाने (Competency Statement)**

❑ *या प्रकरणाचा अभ्यास केल्यानंतर विद्यार्थी सक्षम होतील :*

- *भागांचे प्रकार आणि भाग भांडवलाची माहिती होईल.*
- *भागांचे सार्वजनिक अभिदान आणि खाजगीरित्या वितरण समजतो.*
- *भागांचे अधिक किंवा कमी भागांसाठी प्राप्त अभिदान आणि सममूल्यावर अधिमूल्यावर व कसरीवर भागांचे निर्गमन ह्या संकल्पनांशी परिचित होतील.*
- *कमी किंवा जास्त भागांसाठी प्राप्त अभिदान, तसेच अप्राप्त आणि पूर्वप्राप्त याचना (मागणी) संबंधीची विभिन्न लेखांकन हाताळणीशी परिचित होतील.*

# प्रमंडळ खाती – भागांचे निर्गमन (अंशाची विक्री)

## (Issue of Shares)

**प्रस्तावना –**

भांडवल हे कोणत्याही व्यवसाय संस्थेचे जीवन रक्त वाहिनीचे कार्य करते. एकल व्यवसायि हा स्वतःच्या संसाधनांपासून भांडवलची उभारणी करतो. तसेच भागीदारी संस्थेमध्ये भागीदारांद्वारे करण्यात येणाऱ्या स्वतःच्या योगदानाच्या माध्यमातून भांडवलाची उभारणी होते. परंतु प्रमंडळ (कंपनी) या व्यवसाय संस्थेचे भांडवल हे भागांच्या निर्गमनाचे (विक्रीचे) माध्यमातून उभारले जाते.

औद्योगिक क्रांती नंतर व्यवसायाचा आकार, प्रकार, रचना यामधे आमूलाग्र बदल झाला. संयुक्त स्कंध प्रमंडळ (joint stock company) हा व्यवसायाचा आधुनिक प्रकार होय. या माध्यमाने मोठ्या आकाराच्या व्यवसायाकरिता लागणाऱ्या अत्याधिक भांडवलाची उभारणी करणे सहज शक्य होते आणि भागीदारी संस्थेचे मुख्य दोष देखील नाहिसे होतात. जसे – अमर्यादित जबाबदारी आणि भांडवलाचा तुटवडा, म्हणून सामान्य जनतेकडून मोठ्या प्रमाणात भांडवल गोळा करणे आणि त्याकरिता जनतेला प्रोत्साहित करणे हा विचार आवश्यक वाटला आणि त्या करिता मर्यादित दायित्व हे तत्त्व अवलंबिले गेले.

### ८.१ भाग आणि भाग भांडवल

कंपनी अधिनियम (कायदा) २०१३च्या कलम २(८४) प्रमाणे 'भागाची'(share) व्याख्या पुढील प्रमाणे करण्यात आली आहे. 'भाग'(share) म्हणजे प्रमंडळाच्या भांडवलातील एक हिस्सा होय, आणि त्यात भाग साठ्याचा (stock)देखील समावेश होतो.

भाग भांडवल म्हणजे कंपनीने भागाच्या निर्गमनापासून (विक्रीपासून) उभारलेले भांडवल होय. प्रमंडळाचे भांडवल आणि भाग भांडवल ह्या दोन्ही एकच संकल्पना आहेत प्रमंडळाचे भांडवल हे भागांमध्ये विभागलेले असते त्यालाच भाग भांडवल असे समजले जाते.

### ८.२ भागांचे प्रकार (Types of shares):

प्रमंडळ अधिनियमानुसार प्रमंडळ दोन प्रकारचे भाग निर्गमित करू शकतात. एक म्हणजे समभाग (Equity Share) आणि दुसरे पूर्वाधिकार भाग (Preference share).

#### i) समभाग/साधारण/सामान्य भाग (Equity Shares) :

जो भाग पूर्वाधिकार भाग नाही तो 'समभाग' होय. याचाच अर्थ ज्या भागधारकाला आपल्या भागांवर एक निश्चित दराने लाभांश प्राप्त करण्याचा हक्क नाही किंवा भांडवल परतफेडीचे वेळेस कोणताही पूर्वाधिकार प्राप्त नसतो अशा भागाला 'समभाग' असे म्हणतात. कंपनीच्या लाभामधून सर्व प्राधान्य अधिकार संपल्यानंतर प्रमंडळाच्या शिल्लक राहिलेल्या लाभामधे समभागधारक हा सहभागी होतो. समभागधारक हेच जोखीम वहन करणारे असल्याने खऱ्या अर्थाने तेच कंपनीचे स्वामी (मालक) असतात. प्रमंडळाच्या सर्व खर्चांचे शोधन झाल्यानंतर तसेच पूर्वाधिकार भागधारकांना लाभांशाचे वाटप केल्यानंतरच समभागधारकांना लाभांश वितरीत करण्यात येतो.

#### ii) पूर्वाधिकार भाग / अग्रहक्क भाग (Preference Shares) :

पूर्वाधिकार भाग म्हणजे असे भाग ज्यांना एक निश्चित दराने सामान्य भागधारकांचे आधी लाभांशामध्ये हिस्सा प्राप्त करण्याचा अधिकार असतो. तसेच प्रमंडळ समापनाचे वेळेस किंवा भांडवल परफेडीचे वेळेसही यांना प्रथम प्राधान्यक्रम देण्यात येतो.

पूर्वाधिकार भागधारकांना सामान्य भागधारकांपेक्षा मिळणारे अतिरिक्त अधिकार आणि फायद्यांचे आधारे त्यांचे पुढील प्रमाणे वर्गिकरण करण्यात येते.

अ) संचयी आणि असंचयी पूर्वाधिकार भाग (Cumulative & Non-cumulative preference shares)

ब) विमोचनिय (परतफेडीचे) आणि अविमोचनीय (परतफेड न करावयाचे) पूर्वाधिकार भाग (Redeemable and Irredeemable Preference Shares)

क) सहभागी आणि असहभागी पूर्वाधिकार भाग (Participating and Non Participating perference shares)

ड) परिवर्तनीय आणि अपरिवर्तनीय पूर्वाधिकार भाग (Convertible and Non-convertible Preference shares)

लेखांकनाचे दृष्टिकोनातून वर वर्गीकृत करण्यात आलेल्या पूर्वाधिकार भागांवर कोणताही अन्य प्रभाव होत नसल्या कारणाने त्यांची या ठिकाणी सविस्तर माहिती देण्यात आलेली नाही.

### ८.१.३ भाग भांडवलाचे प्रकार (Types of Share Capital) भाग भांडवलाचे विविध प्रकार खालील प्रमाणे आहेत.

#### १) अधिकृत भांडवल (Authorised Capital):

प्रमंडळाची नोंदणी करतांना प्रमंडळ निबंधकाकडे सादर करण्यात आलेल्या घटनापत्रकामध्ये जेवढे भांडवल उभारण्याचा उल्लेख केलेला असतो त्यास अधिकृत भाग भांडवल असे म्हणतात. अधिकृत भाग भांडवलाची रक्कम ही प्रमंडळाची भविष्य कालीन आवश्यकता लक्षात घेऊन निश्चित केलेली असते. या भांडवलाला नाममात्र भांडवल (Nominal Capital) किंवा नोंदणीकृत भांडवल Registered Capital असे देखील समजले जाते. भांडवल उभारणीची प्रमंडळाची ही कमाल मर्यादा आहे. एका निश्चित कायदेशीर कार्यवाहीद्वारे अधिकृत भांडवलामध्ये वाढ किंवा घट करता येते.

#### २) निर्गमित/विक्रीस काढलेले भांडवल (Issued Capital):

निर्गमित भांडवल हा अधिकृत भांडवलाचा असा भाग होय की जो जनतेला अभिदानाकरिता (Subcription) निर्गमित (विक्रीसाठी उपलब्ध) केलेला असतो. जर कंपनीने त्यांना अधिकार असलेले सर्व भाग विक्रीस काढले तर निर्गमित आणि अधिकृत भांडवल हे समान (equal) होईल. सामान्यतः भांडवल निर्गमनाचे वेळेस प्रमंडळाची आवश्यकता पूर्ण करण्यासाठी जेवढ्या भांडवलाची आवश्यकता असेल तेवढ्याच संख्येचे भाग निर्गमित करण्यात येतात. (विक्रीस काढण्यात येतात). अधिकृत भांडवलाचा जो भाग जनतेला निर्गमित करण्यात येत नाही त्यास अनिर्गमित भांडवल (unissued capital) असे समजले जाते.

#### ३) अभिदत्त/विक्री झालेले/खपलेले भांडवल (Subscribed Capital) –

निर्गमित केलेल्या (विक्रीस काढलेल्या) भाग भांडवलापैकी जनतेकडून जेवढ्या भाग भांडवलाची प्रत्यक्षात खरेदी केली जाते ते भांडवल म्हणजे अभिदत्त (विक्री झालेले) भांडवल होय. विक्रीस काढलेल्या संपूर्ण भांडवलाची विक्री झाल्यास ते निर्गमित भांडवला इतकेच होते. निर्गमित भांडवलाचा असा भाग जो विकला गेला नाही त्यास अविक्रीत भांडवल (unsubscribed capital) असे समजले जाते.

#### ४) मागणी केलेले भांडवल (Called up Capital) –

मागणी केलेले भांडवल म्हणजे विक्री झालेल्या भांडवलाचा असा भाग ज्याची प्रत्यक्षात प्रमंडळाद्वारे भागधारकांकडून मागणी करण्यात आलेली असते. प्रमंडळाद्वारे विक्रीत भागमूल्याच्या तेवढ्याच हिश्याची मागणी करण्यात येते, जेवढी त्या वेळेस त्यांना आवश्यक असेल. एक गोष्ट लक्षात ठेवण्यासारखी आहे की, मागणी केलेले भांडवल हे विक्री झालेल्या भांडवला इतके असू शकते किंवा कमीदेखील असू शकते, मात्र विक्री झालेल्या भांडवलापेक्षा जास्त असणार नाही. विक्रीत भाग भांडवलाच्या ज्या भागाची मागणी करण्यात आलेली नाही त्यास मागणी न केलेले भांडवल (uncalled capital) असे समजले जाते.

#### ५) प्रदत्त/भरणा झालेले/वसूल झालेले भांडवल (Paid up Capital) –

हा मागणी केलेल्या भाग भांडवलाचा असा भाग होय ज्याचा भागधारकाकडून प्रत्यक्षात भरणा (वसूल) झालेला आहे. कांही वेळेस अशी शक्यता असते की काही भागधारक हे त्यांच्याकडे असलेल्या भागांच्या मूल्यांवरील मागितलेल्या सर्व देय रकमेचा भरणा करीत नाहीत. वसूल झालेले भांडवल हे मागणी केलेल्या भांडवलाइतके किंवा त्यापेक्षा कमी असू शकते मात्र मागणी

केलेल्या भांडवलापेक्षा जास्त असणार नाही. मागणी केलेले भांडवल आणि वसूल झालेले भांडवल यामधील फरकाला 'मागणीची थकबाकी' (Calls in arrears) असे समजले जाते.

### ६) राखीव भांडवल (Reserve Capital) –

राखीव भांडवल म्हणजे अभिदत्त (विक्री झालेल्या) भांडवलाचा (Subscribed capital) असा भाग ज्याची मागणी करण्यात आलेली नाही आणि प्रमंडळाच्या विशेष प्रस्तावाद्वारे असे निश्चित करण्यात आलेले असेल की, भविष्यात कंपनीच्या समापनाची घटना सोडून अन्य कोणत्याही प्रसंगी त्याची मागणी करण्यात येणार नाही.

## ८.१.४ ताळेबंदामधे भाग भांडवलाची हाताळणी:

**उदाहरण:** प्रत्येकी ₹ १०० च्या १०,००० साधारण भागात विभागलेल्या ₹ १०,०००चे अधिकृत भांडवल असलेल्या प्रमंडळाची स्थापना झाली. सार्वजनिक निर्गमनादवारे ७५०० भाग विक्रीस काढण्यात आले. ज्यावर अर्जासोबत प्रति भाग ₹ ३०, वाटपावर ₹ ३० आणि उरलेली रक्कम अंतिम हप्ता मागणीवर द्यावयाची आहे.

६००० भागांसाठी अर्ज प्राप्त झालेत. ज्याचेकडे ५०० समभाग आहेत असा एक भागधारक सोडून अन्य सर्वांकडून योग्य वेळी आवंटन राशी प्राप्त झाली. प्रमंडळाने अंतिम मागणी केलेली नाही.

ताळेबंदात आपण भाग भांडवलाचे वर्गीकरण कशाप्रकारे दर्शवाल.

**उत्तर:**

**प्रमंडळाचा ताळेबंद ............रोजीचा**

| देयता | रक्कम ₹ | संपत्ती | रक्कम ₹ |
|---|---|---|---|
| **अधिकृत भांडवल :**<br>१०,००० समभाग प्रत्येकी ₹ १०० | १०,००,००० | बँकेत शिल्लक | ३,४५,००० |
| **निर्गमीत भांडवल:**<br>७,५०० समभाग प्रत्येकी ₹ १०० | ७,५०,००० | | |
| **विक्री झालेले भांडवल :**<br>६,००० समभाग प्रत्येकी ₹ १०० | ६,००,००० | | |
| **मागणी केलेले भांडवल**<br>६,००० समभाग प्रत्येकी ₹ १०० त्यापैकी ₹ ६० प्रमाणे मागणी केलेले | ३,६०,००० | | |
| **वसूल झालेले भांडवल** : ६,००० समभाग प्रत्येक ₹ १०० पैकी ₹ ६० ची मागणी केली ३,६०,०००<br>वजा – अप्राप्त मागणी<br>(५०० x ३०) १५,००० | ३,४५,००० | | |
| | **३,४५,०००** | | **३,४५,०००** |

### भाग भांडवल विक्रीच्या पद्धती (निर्गमनाचे) प्रकार (Types/Methods of Issue of Share Capital) –

१. समभाग धारकांना हक्क भागांचे निर्गमन (विक्री) (Right Issue) [Sec. ६२]

२. कर्मचाऱ्यां करिता कर्मचारी स्कंध (Stock) विकल्प योजना [(कलम ६२(१) (क)]

३. कोणत्याही व्यक्तीला [कलम ६२(१) (क)]

अ) i) खाजगीरित्या भागांची विक्री करणे (कलम ४२ आर १४)

ii) केवळ भागधारकांना पूर्वाधिकार भागांचे वाटप (आवंटन)

ब) सार्वजनिकरित्या भागांची विक्री (निर्गमन)

क) संचालक किंवा कर्मचाऱ्यांना विशेष श्रम समभागांची विक्री (कलम ५४) (sweat equity shares issue to directors of employees)

४. सभासदांना/भागधारकांना बोनस (बक्षिस) भागांचे निर्गमन (विक्री) [कलम ६३ (१)]

प्रामुख्याने **१२ वी अभ्यासक्रमामध्ये 'सार्वजनिकरित्या भाग विक्री'चा समावेश असल्याने याच पद्धतीशी संबंधित सविस्तर माहिती या ठिकाणी देण्यात येत आहे.**

**भाग भांडवल विक्री/निर्गमन**

| अ.क्र | प्रतिभूती/भाग प्रकार | खाजगी प्रमंडळ | **सार्वजनिक प्रमंडळ** | **अर्थ** | लेखांकन नोंद |
|---|---|---|---|---|---|
| १. | हक्क भाग | ✓ | ✓ | सामान्यतः हक्क भागांचे निर्गमन विद्यमान भागधारकांना कसर देऊन केले जाते. हे भाग खरेदी करण्यासाठी विद्यमान भागधारकांना प्राधान्यक्रमाने किंवा हक्क म्हणून दिले जातात. | हक्क भागांच्या लेखांकन नोंदी सार्वजनिकरित्या भाग विक्री निर्गमनानुसार केल्या जातात. |
| २. | कर्मचारी स्कंध विकल्प योजना | ✓ | ✓ | अशा भागांचे निर्गमन कर्मचाऱ्यांना बाजार मूल्यापेक्षा कमी किंमतीला केले जाते. ही योजना कर्मचाऱ्यांना प्रमंडळाच्या भागांच्या माध्यमातून मालकी मिळविण्यास प्रेरणा देते. | लेखांकन मूल्य हे योग्य मूल्य किंवा अंतर्गत मूल्य किंवा अंतर्गत मूल्य विकल्प कर्मचारी नुकसान भरपाई खर्च खाते. अस्थागित नुकसान भरपाई खर्च खाते इ. नवीन खाते उघडले जाते. |
| ३. | (अ) खाजगीरित्या भाग विक्री/ निर्गमन | ✓ | ✓ | अशा भागांचे निर्गमन काही व्यक्तींना किंवा व्यक्तींच्या समूहाला केले जाते. | सेबीच्या माध्यमातून नोंद करून भाग विक्री करण्याच्या वेळखाऊ प्रक्रियेतून सुटका होते. |
| | (ब) सार्वजनिकरित्या भाग विक्री | × | ✓ | भाग बाजारामध्ये भागांची नोंद करून सार्वजनिकरित्या भागविक्री करणे. | सामान्यतः प्रमंडळ भागांची विक्री प्रारंभिक सार्वजनिक मागणी (IPO) प्रमाणे करते. जमा झालेले भांडवल भाग भांडवल म्हणून ताळेबंदात दाखविले जाते. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | (क) विशेषश्रम भाग विक्री | ✓ | ✓ | कंपनी कायदा २०१३ कलम २(८८) नुसार विशेषश्रम भागांची विक्री प्रमंडळाच्या संचालक किंवा कर्मचाऱ्यांना कसर देऊन रोख रक्कमेच्या प्रतिफला शिवाय केली जाते. प्रमंडळाला त्यांनी दिलेल्या सल्ल्याबद्दल किंवा त्यांनी प्रमंडळाला बौद्धिक संपदा हक्क दिल्याबद्दल किंवा मूल्यवर्धित कार्यवाहीसाठी असे भाग त्यांना दिले जातात. | लेखांकन मानकाप्रमाणे याची नोंद ताळेबंदामधे केली जाते जर रोख रकमेच्या प्रतिफला शिवाय असेल तर. |
| ४. | बक्षिस भाग | ✓ | ✓ | असे भाग विद्यमान भागधारकांना पूर्ण वसूल स्वरूपात बक्षिस म्हणून दिले जातात. | बक्षिस भाग हे कवळ निधीचे स्वरूप बदलल्यासारखे आहे. यामधे निधी कमी होतो व एकीकडे त्या कारणामुळे भाग भांडवलामध्ये वाढ होते. हे एक प्रकारे प्रतिभूती वाढावा भांडवलनिधी इ. भांडवलामध्ये वर्ग करण्यात आल्यासारखे आहे. |

### ८.२.१ भागांचे सार्वजनिक निर्गमन (विक्री) (Public Issue of Shares) :

प्राथमिक बाजारात भागांची विक्री करून भांडवलाची उभारणी करणे ही सार्वजनिक मर्यादित प्रमंडळाची सर्वसामान्य आणि लोकप्रिय अशी पद्धत आहे. प्रमंडळ आपल्या भागांची सार्वजनिक विक्री करण्याकरिता खालील कार्य पद्धतीचा अवलंब करते.

**१. माहिती पत्रकाचे निर्गमन (प्रसिद्ध) करणे (Issue of Prospectus) –**

प्रमंडळामधील संभाव्य गुंतवणूकदाराला आपल्या प्रमंडळाबद्दलची संपूर्ण माहिती व्हावी याकरिता प्रमंडळ एक माहिती पत्रक निर्गमित (प्रसिद्ध) करते. यामध्ये जनतेला निर्गमित करण्यात येणाऱ्या भागांची संख्या, भागांचे दर्शनीमूल्य (Face value) आणि अर्जासोबत, वाटपाचेवेळी, (अर्थात आवंटनाचे वेळी) आणि मागणीचे वेळी देय असलेल्या रकमेची माहिती दिलेली असते.

**२. अर्जाची प्राप्ती (Receipt of Applications) –**

प्रमंडळाचे भाग खरेदी करण्यासाठी इच्छुक असलेल्यांनी एका निश्चित तारखेपर्यंत भाग अर्जाच्या रकमेवर प्रमंडळाकडे अर्ज जमा करणे आवश्यक असते. प्रमंडळाद्वारे भाग खरेदीचे अर्ज हे स्कंध दलाल आणि बँकाच्या माध्यमातून जनतेला उपलब्ध करून दिले जातात. कंपनी कायदा २०१३च्या कलम ३९(२) प्रमाणे अर्जाबरोबर देय असणारी राशी ही प्रत्येक भागाच्या दर्शनी मूल्याच्या ५% पेक्षा कमी असता कामा नये किंवा भारतीय प्रतिभूती आणि विनिमय मंडळ (SEBI) या संस्थेने ठरवून दिलेल्या नियमानुसार अन्य प्रतिशत प्रमाण निश्चित केले जाते.

**३. भागांचे वाटप/आवंटन (Allotment of Shares) –**

कंपनी कायदा २०१३च्या कल ३९(१) प्रमाणे कंपनीच्या माहिती पत्रकामधे कमीत कमी किती भागांच्या अर्जाकरिता मागणी आल्यास आवंट (वाटप) केले जाईल या संबंधीचा जो उल्लेख असेल, कमीत कमी तेवढ्याच रकमेची जनतेकडून मागणी आल्याशिवाय तसेच अर्जासोबतची प्रार्थना रक्कम ही योग्य प्रकारे धनादेशाद्वारे किंवा अन्य योग्य दस्तऐवजाद्वारे

(Instrument)प्राप्त झाल्याशिवाय भागांचे वाटप करता येणार नाही. तसेच संचालकांनी भाग वाटपा संबंधीची सर्व कायदेशीर बाबींची पूर्तता केल्यानंतरच भागांचे वाटप केले जाईल.

ज्या भागधारकांना भागांचे वाटप करण्याचे निश्चित करण्यात आले असेल त्यांना एक निश्चित भागाचे आवंटन केल्या संबंधिचे पत्र पाठविले जाते. तसेच ज्यांना भागांचे आवंटन (वाटप) झालेले नसेल त्यांना दिलगिरीच्या पत्रासह त्यांनी अर्जासोबत जमा केलेली रक्कमदेखील परत करण्यात यावी. ज्यांना भागांचे आवंटन करण्यात आले, त्यांचेकडून प्रत्येक भागाच्या दर्शनी मूल्याच्या उरलेल्या रकमेपैकी काही रकमेची लगेच मागणी करण्यात येते. या मागणी रकमेला आवंटन राशी असे म्हणतात.

४. **भाग हप्ता मागणी/ याचना राशी (Calls on Shares) –**

भाग आवंटन राशी प्राप्त झाल्यानंतर अर्जासोबतची आणि आवंटनावर प्राप्त झालेली राशी सोडून शिल्लक राहिलेल्या रकमेकरिता भागधारकांकडून केलेली मागणी म्हणजे हप्ता मागणी होय. जर एका पेक्षा जास्त हप्त्यांमध्ये मागणी करण्यात येत असेल तर त्याला क्रमशः प्रथम हप्ता, द्‌वितीय हप्ता मागणी या प्रमाणे संबोधिले जाते आणि शेवटच्या हप्त्याला अंतिम हप्ता मागणी असे म्हटले जाते. भागधारकांना हप्ता मागणीच्या राशीच्या शोधनासाठी कमीत कमी १४ दिवसांची पूर्वसूचना देणे आवश्यक आहे.

**भाग निर्गमन संबंधीच्या (विक्री संबंधीच्या) मूलभूत लेखांकन नोंदी (Basic Accounting enteries for Issue of shares):**

समभाग (Equity shares) आणि पूर्वाधिकार भाग (Preference shares) निर्गमन संबंधीची कार्यपद्‌धती ही सारखीच असते. तरीही भागांवर राशीची मागणीकरतांना दोन्ही प्रकारच्या भागांमधील लेखांकीय नोंदी मधील फरक लक्षात यावा यासाठी लेखांकन नोंद करतांना संबंधित प्रकारच्या भागाच्या मागे 'समभाग' किंवा 'पूर्वाधिकार' भाग हा शब्द लिहिण्यात यावा.

**लेखांकन नोंदी (Accounting Entries): –**

१. **भाग अर्जाची राशी (प्रार्थना राशी) प्राप्त झाल्यास**

बँक खाते.................................................. नावे

भाग अर्ज (प्रार्थना) खात्याला

(.............भागांवर प्रतिभाग ₹ प्रमाणे प्रार्थना राशी प्राप्त झाल्याबद्‌दल)

भागांच्या अर्जावरील प्राप्त राशी ही प्रमंडळाच्या भाग भांडवलाच्या रकमेचा भाग असल्याकारणे ती राशी भाग भांडवल खात्याला स्थानांतरित करण्यात येते.

२. **भाग अर्जाची राशी (प्रार्थना राशी) भाग भांडवल खात्यास स्थानांतरित केल्यास**

भाग अर्ज (प्रार्थना) खाते.................................... नावे

भाग भांडवल खात्याला

(भाग प्रार्थना राशी भाग भांडवल खात्याला स्थानांतरित केल्याबद्‌दल)

३. **भाग वाटप (आवंटन) राशी देय झाल्यास/मागविल्यास**

भाग वाटप (आवंटन) खाते ................................ नावे

भाग भांडवल खात्याला

(...........भागांवर प्रतिभाग ₹ ..........प्रमाणे आवंटन राशीची मागणी केल्याबद्‌दल)

४. **भाग आवंटन (भाग वाटप) राशी प्राप्त झाल्याबद्‌दल**

बँक खाते.................................................. नावे

भाग वाटप (आवंटन) खात्याला

(...........भागांवर प्रतिभाग ₹ ..........प्रमाणे आवंटन राशी प्राप्त झाल्याबद्‌दल)

**५. प्रथम हप्त्याची मागणी (याचना) केल्यास**

भाग प्रथम याचना (हप्ता मागणी) खाते ...................... नावे

भाग भांडवल खात्याला

(......भागांवर प्रती भाग ₹ ........... प्रमाणे प्रथम हप्ता मागविल्याबद्‌दल)

**६. प्रथम हप्ता मागणीची (याचना) राशी मिळाल्याबद्‌दल:**

बँक खाते................................................. नावे

भाग प्रथम हप्ता मागणी (याचना) खात्याला

(......भागांवर प्रतिभाग ₹ .........प्रमाणे प्रथम हप्त्याची राशी मिळाल्याबद्‌दल)

**७. दुसऱ्या हप्त्याची मागणी (याचना) केल्यास**

भाग दुसरा हप्ता मागणी (याचना) खाते ...................... नावे

भाग भांडवल खात्याला

(........भागांवर @ भाग ₹.....प्रमाणे दुसऱ्या हप्त्याची मागणी (याचना) केल्याबद्‌दल)

**८. भागांच्या दुसरा हप्ता मागणीची (याचनेची) राशी मिळाल्यास**

बँक खाते................................................. नावे

दुसरा हप्ता मागणी (याचना) खात्याला

(.......भागांवर प्रतिभाग ₹......... प्रमाणे दुसरा हप्ता मागणीची (याचनेची) राशी मिळाल्याबद्‌दल)

**९. भागांवरील तिसरा आणि अंतिम हप्ता (याचना) मागविल्यास**

भाग तिसरा आणि अंतिम हप्ता मागणी (याचना) खाते........ नावे

भाग भांडवल खात्याला

(.......भागांवर प्रतिभाग ₹. .........प्रमाणे तिसऱ्या आणि अंतिम हप्त्याची मागणी (याचना) केल्याबद्‌दल)

**१०. भागांवरील तिसऱ्या आणि अंतिम हप्त्याची (याचना) राशी मिळाल्याबद्‌दल**

बँक खाते................................................. नावे

भाग तिसरा आणि अंतिम हप्ता मागणी (याचना) खात्याला

(....भागांवर प्रत्येकी ₹ ...........प्रमाणे तिसऱ्या आणि अंतिम हप्त्याची (याचना) राशी मिळाल्याबद्‌दल)

## उदाहरणे

**१. गजानन लि. ने प्रतिभाग ` १० प्रमाणे ६०,००० समभाग निर्गमित केले (विक्रीस काढले) या भागांवर खालीलप्रमाणे राशी देय आहे.**

प्रार्थना (आवेदन) सोबत प्रतिभाग ₹ २

भाग आवंटना वर (वाटपावर) प्रतिभाग ₹ ३

प्रथम याचना (हप्ता मागणी) प्रतिभाग ₹ ३

अंतिम याचना (हप्ता मागणी) प्रतिभाग ₹ २

निर्गमीत सर्व भागांकरीता मागणी अर्ज प्राप्त झाले आणि त्यांचे संबंधित सर्व देय राशी योग्य वेळी मिळाली.

**गजानन लि. चे पुस्तकात आवश्यक रोजकीर्द नोंदी द्या.**

**गजानन लि. चे पुस्तकात**
**रोजकीर्द नोंदी**

| दिनांक | तपशील | खा. पा. | नावे रक्कम ₹ | जमा रक्कम ₹ |
|---|---|---|---|---|
| १. | बँक खाते ..................................................नावे | | १,२०,००० | |
| | समभाग अर्ज (प्रार्थना) खात्याला | | | १,२०,००० |
| | (६०,००० समभागांवर प्रतिभाग ₹ २ प्रमाणे प्रार्थना राशी मिळाल्याबद्दल) | | | |
| २. | समभाग अर्ज (प्रार्थना) खाते..................................नावे | | १,२०,००० | |
| | समभाग भांडवल खात्याला | | | १,२०,००० |
| | (प्रतिभाग ₹ २ प्रमाणे ६०,००० समभागांची राशी समभाग भांडवल खात्याला स्थानांतरित केल्याबद्दल) | | | |
| ३. | समभाग वाटप (आवंटन) खाते.................................नावे | | १,८०,००० | |
| | समभाग भांडवल खात्याला | | | १,८०,००० |
| | (प्रतिभाग ₹ ३ प्रमाणे ६०,००० समभागांवर आवंटन (वाटप)राशीची मागणी केल्याबद्दल) | | | |
| ४. | बँक खाते. ..................................................नावे | | १,८०,००० | |
| | समभाग आवंटन (वाटप) खात्याला | | | १,८०,००० |
| | (प्रतिभाग ₹ ३ प्रमाणे ६०,००० समभागांवर आवंटन राशी प्राप्त झाल्याबद्दल) | | | |
| ५. | समभाग प्रथम याचना (प्रथम हप्ता मागणी) खाते ................नावे | | १,८०,००० | |
| | समभाग भांडवल खात्याला | | | १,८०,००० |
| | (प्रतिभाग ₹ ३ प्रमाणे ६०,००० समभागांवर प्रथम याचना (हप्ता) मागविल्याबद्दल) | | | |
| ६. | बँक खाते. ..................................................नावे | | १,८०,००० | |
| | समभाग प्रथम याचना (प्रथम हप्ता मागणी) खात्याला | | | १,८०,००० |
| | (प्रतिभाग ₹ ३ प्रमाणे ६०,००० समभागांवर प्रथम याचना राशी मिळाल्याबद्दल) | | | |
| ७. | समभाग अंतिम याचना (हप्ता मागणी) खाते .................... नावे | | १,२०,००० | |
| | समभाग भांडवल खात्याला | | | १,२०,००० |
| | (प्रतिभाग ₹ २ प्रमाणे ६०,००० समभागांवर अंतिम याचना (हप्ता मागणी) केल्याबद्दल) | | | |
| ८. | बँक खाते ..................................................नावे | | १,२०,००० | |
| | समभाग अंतिम याचना (हप्ता मागणी) खात्याला | | | १,२०,००० |
| | (प्रतिभाग ₹ २ प्रमाणे ६०,००० समभागांवर अंतिम याचना राशी मिळाल्याबद्दल) | | | |

२. **ऑनेस्टी लि. ने २०,००० पूर्वाधिकार भाग प्रतिभाग ` १० प्रमाणे देय असलेले निर्गमित केले (विक्रीस काढले). त्यांचेवर खालील प्रमाणे रक्कम देय आहे.**

अर्जासोबत प्रतिभाग ₹ ४

भाग वाटपावर ₹ २

प्रथम आणि अंतिम हप्ता मागणीवर ₹ ४

सर्व भागांकरिता प्रार्थना पत्र (अर्ज) प्राप्त झाले आणि येणे असलेली संपूर्ण रक्कम प्राप्त झाली.

ऑनेस्टी लि. चे पुस्तकात आवश्यक रोजकीर्द नोंद घ्या.

उत्तर – २ : **ऑनेस्टी लि. चे पुस्तकात रोजकीर्द नोंदी**

| दिनांक | तपशील | खा. पा. | नावे रक्कम ₹ | जमा रक्कम ₹ |
|---|---|---|---|---|
| १. | बँक खाते ....................................................नावे | | ८०,००० | |
| | पूर्वाधिकार भाग प्रार्थना (अर्ज) खात्याला | | | ८०,००० |
| | (प्रतिभाग ₹ ४ प्रमाणे २०,००० पूर्वाधिकारी भागांवर प्रार्थना राशी प्राप्त झाल्याबद्दल) | | | |
| २. | पूर्वाधिकार भाग प्रार्थना खाते...................................नावे | | ८०,००० | |
| | पूर्वाधिकार भाग भांडवल खात्याला | | | ८०,००० |
| | (प्रतिभाग ₹ ४ प्रमाणे २०,००० पूर्वाधिकारी भागांची राशी पूर्वाधिकार भाग भांडवल खात्याला स्थानांतरित केल्याबद्दल) | | | |
| ३. | पूर्वाधिकार भाग आवंटन खाते..................................नावे | | ४०,००० | |
| | पूर्वाधिकार भाग भांडवल खात्याला | | | ४०,००० |
| | (प्रतिभाग ₹ २ प्रमाणे २०,००० पूर्वाधिकार भागांवर आवंटन राशीची मागणी केल्याबद्दल) | | | |
| ४. | बँक खाते ....................................................नावे | | ४०,००० | |
| | पूर्वाधिकार भाग आवंटन खात्याला | | | ४०,००० |
| | (प्रतिभाग ₹ २ प्रमाणे २०,००० पूर्वाधिकार भागांवरील आवंटन राशी मिळाल्याबद्दल) | | | |
| ५. | पूर्वाधिकार भाग प्रथम आणि अंतिम याचना खाते................नावे | | ८०,००० | |
| | पूर्वाधिकार भाग भांडवल खात्याला | | | ८०,००० |
| | (प्रतिभाग ₹ ४ प्रमाणे २०,००० पूर्वाधिकार भागांवर प्रथम आणि अंतिम याचना राशी मागविल्याबद्दल) | | | |
| ६. | बँक खाते ....................................................नावे | | ८०,००० | |
| | पूर्वाधिकार भाग प्रथम आणि अंतिम याचना खात्याला | | | ८०,००० |
| | (प्रतिभाग ₹ ४ प्रमाणे २०,००० पूर्वाधिकार भागांवर प्रथम आणि अंतिम याचना राशी मिळाल्या) | | | |

## भागांचे अधिमूल्यावर (प्रव्याजीवर) निर्गमन (विक्री) (Issue of a share at Premium)

प्रमंडळ आपले भाग त्याच्या दर्शनीमूल्यापेक्षा (Face value) जास्त किंमतीने निर्गमीत (विक्री) करू शकते. भागाच्या दर्शनी मूल्यापेक्षा जास्त असणाऱ्या निर्गमीत मूल्याला भाग अधिमूल्य (प्रव्याजी) असे म्हणतात. जर ₹ १० चा भाग हा ₹ १३ला निर्गमित (विक्री) करण्यात येत असेल तर हे जास्तीचे ₹ ३ म्हणजे भाग अधिमूल्य होय. अधिमूल्यापासून प्राप्त रक्कम ही एका स्वतंत्र खात्यामध्ये जमा केली त्यास भाग अधिमूल्य (प्रव्याजी) खाते किंवा प्रतिभूती प्रव्याजीखाते म्हणून ओळखले जाते. या खात्याची जमा बाकी ही ताळेबंदाचे देयता बाजूला स्वतंत्रपणे दर्शविली जाते.

कोणतीही स्पष्ट सूचना नसल्यास भाग अधिमूल्याची हाताळणी ही भाग आवंटन प्रसंगी करण्यात यावी. आवंटनाची राशी देय होते किंवा प्राप्त होईल यापैकी कोणत्याही एका वेळेस भाग अधिमूल्य खाते हे जमा करण्यात यावे.

**रोजकीर्द नोंद –**

भाग आवंटन खाते .............................. नावे

भाग भांडवल खात्याला

भाग प्रव्याजी /प्रतिभूती प्रव्याजी खात्याला

३. **अंकीता लि. ने प्रत्येकी ` १०चा भाग ` २ प्रव्याजी वर या प्रमाणे १०,००० समभाग विक्रीचा प्रस्ताव जनतेसमोर ठेवला भागांवर खालील प्रमाणे रकमा देय होत्या.**

अर्जासोबत ₹ ४, आवंटनावर ₹ ४ (प्रव्याजी सह) प्रथम आणि अंतिम हप्ता मागणी (याचना) – शिल्लक राहिलेली रक्कम. जनतेद्वारे सर्व भागांची खरेदी करण्यात आली आणि येणे असलेली सर्व रक्कम मिळाली.

**वरील व्यवहारांच्या रोजकीर्द नोंदी द्या तसेच ताळेबंद दर्शवा.**

उत्तर :

**अंकिता लि. चे पुस्तकात रोजकीर्द नोंदी**

| दिनांक | विवरण | खा. पा. | नावे रक्कम रु. | जमा रक्कम रु. |
|---|---|---|---|---|
| १. | बँक खाते ....................................................नावे | | ४०,००० | |
| | समभाग प्रार्थना खात्याला | | | ४०,००० |
| | (प्रतिभाग ₹ ४ प्रमाणे १०,००० समभागांवर प्रार्थना राशी (अर्ज राशी) मिळाल्याबद्दल | | | |
| २. | समभाग प्रार्थना खाते.........................................नावे | | ४०,००० | |
| | समभाग भांडवल खात्याला | | | ४०,००० |
| | (प्रतिभाग ₹ ४ प्रमाणे १०,००० समभागांची प्रार्थना राशी समभाग भांडवल खात्याला स्थानांतरित केल्याबद्दल | | | |
| ३. | समभाग आवंटन खाते ........................................नावे | | ४०,००० | |
| | समभाग भांडवल खात्याला | | | २०,००० |
| | भाग प्रव्याजी खात्याला | | | २०,००० |
| | (प्रव्याजी सह प्रतिभाग ₹ ४ प्रमाणे १०,००० समभागांवर आवंटन राशीची मागणी केल्याबद्दल | | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ४. | बँक खाते .....................................................नावे<br>समभाग आवंटन खात्याला<br>(प्रतिभाग ₹ ४ प्रमाणे १०,००० समभागांवर आवंटन राशी प्राप्त झाल्याबद्दल) | | ४०,००० | ४०,००० |
| ५. | प्रथम आणि अंतिम याचना राशी खाते ............................नावे<br>समभाग भांडवल खात्याला<br>(प्रतिभाग ₹ ४ प्रमाणे १०,००० समभागांवर प्रथम आणि अंतिम याचना राशीची मागणी केल्याबद्दल) | | ४०,००० | ४०,००० |
| ६. | बँक खाते .....................................................नावे<br>समभाग प्रथम आणि अंतिम याचना खात्याला<br>(प्रतिभाग ₹ ४ प्रमाणे १०,००० समभागांवरील प्रथम आणि अंतिम याचना राशी मिळाल्याबद्दल) | | ४०,००० | ४०,००० |

**अंकिता लि. चा ताळेबंद**

| देयता | रक्कम ₹ | संपत्ती | रक्कम ₹ |
|---|---|---|---|
| भाग भांडवल<br>१०,००० समभाग प्रत्येकी ₹ १० भाग | १,००,००० | बँक | १,२०,००० |
| प्रव्याजी/प्रतिभूती भाग प्रव्याजी खाते | २०,००० | | |
| | १,२०,००० | | १,२०,००० |

## भागांचे कसरीवर (सूट) निर्गमन (विक्री) (Issue of shares at Discount)

जेव्हा प्रमंडळ आपल्या भागांची विक्री ही त्यांच्या दर्शनी मूल्यापेक्षा कमी मूल्याने करते त्यावेळेस भागांचे कसरीवर निर्गमन (विक्री) करण्यात आले असे समजले जाते. सामान्यतः प्रमंडळाद्वारे भागांचे कसरीवर निर्गमन करण्यात येत नाही. कारण देण्यात येणारी कसर हे प्रमंडळाचे नुकसान (Loss) आहे म्हणून कोणतीही कंपनी या संबंधी इच्छुक नसते.

भागांच्या निर्गमनामुळे होणारे नुकसान भाग निर्गमन कसर खात्याला नावे केले जाते, आणि कसरीची ही रक्कम ताळेबंदाचे संपत्ती बाजूवर जोपर्यंत तिचे पूर्णपणे अपलेखन (written off) होत नाही तेथपर्यंत दर्शविली जाते. कसर संबंधीची नोंद ही भाग आवंटन नोंदीचे वेळीसच स्थानांतरण नोंदी सह करण्यात यावी, कारण भागांचे आवंटन होताच प्रमंडळाला ते देत असलेल्या भाग कसर संबंधीचे नुकसान होते.

**रोजकीर्द नोंद –**

भाग आवंटन खाते .................................. नावे
भाग कसर निर्गमन खाते ............................. नावे
भाग भांडवल खात्याला

**सूचना : कंपनी कायदा २०१३ चे तरतूदी नुसार भागांचे सार्वजनिक निर्गमन हे कसरीवर करता येत नाही.**

४. **अश्विनी लि. ने प्रतिभाग '₹ १५चा ' १ कसरीवर या प्रमाणे १०,००० समभागांच्या भरणाकरिता (विक्री करिता) जनतेकडून अर्ज आमंत्रित केले. त्यावर खालील प्रमाणे राशी देय आहे.**

अर्जासोबत ₹ ५ आवंटनावर ₹ ९

निर्गमित सर्व भागांकरिता अर्ज प्राप्त झालेत आणि आवंटन ही करण्यात आले. आवंटनावर येणे रक्कम प्राप्त झाली.

**अश्विनी लि. चे पुस्तकात रोजकीर्द नोंद द्या आण ताळेबंदावर होणारा प्रभाव दर्शवा.**

उत्तर:

**अश्विनी लि. चे पुस्तकात रोजकीर्द नोंदी**

| दिनांक | विवरण | खा. पा. | नावे रक्कम ₹ | जमा रक्कम ₹ |
|---|---|---|---|---|
| १. | बँक खाते ..................................................नावे | | ५०,००० | |
| | समभाग प्रार्थना खात्याला | | | ५०,००० |
| | (प्रतिभाग ₹ ५ प्रमाणे १०,००० समभागांवर प्रार्थना राशी मिळाल्याबद्दल) | | | |
| २. | समभाग प्रार्थना खाते.........................................नावे | | ५०,००० | |
| | समभाग भांडवल खात्याला | | | ५०,००० |
| | (प्रतिभाग ₹ ५ प्रमाणे १०,००० समभागांवरची प्राप्त प्रार्थना राशी समभाग भांडवल खात्याला स्थानांतरत केल्याबद्दल) | | | |
| ३. | समभाग आवंटन खाते .........................................नावे | | ९०,००० | |
| | भाग निर्गमन कसर खाते.......................................नावे | | १०,००० | |
| | समभाग भांडवल खात्याला | | | १,००,००० |
| | (प्रतिभाग ₹ १ कसर दिल्यानंतर प्रतिभाग ₹ ९ प्रमाणे १०,००० समभागांवर आवंटन राशीची मागणी केल्याबद्दल) | | | |
| ४. | बँक खाते. ..................................................नावे | | ९०,००० | |
| | समभाग आवंटन खात्याला | | | ९०,००० |
| | (प्रतिभाग ₹ ९ प्रमाणे १०,००० समभागांवर आवंटन राशी प्राप्त झाल्याबद्दल) | | | |

**अश्विनी लि. चा ताळेबंद**

| देयता | रक्कम ₹ | संपत्ती | रक्कम ₹ |
|---|---|---|---|
| भाग भांडवल | | बँक खाते | १,४०,००० |
| १०,००० समभाग प्रत्येकी रु. १५ प्रमाणे | १,५०,००० | भाग निर्गमन कसर खाते | १०,००० |
| | १,५०,००० | | १,५०,००० |

### ८.२.४ भागांच्या प्रत्यक्ष निर्गमनापेक्षा जास्त भागांकरिता मागणी येणे/अत्याधिक भागांकरिता मागणी

**अ) अभिदान (Over Subscription of shares)**

प्रमंडळाने निर्गमित (विक्रीस काढलेल्या) केलेल्या भागांपेक्षा जास्तीच्या भागांच्या मागणीचे अर्ज जनतेकडून प्राप्त झाल्यास त्याला अत्याधिक अभिदान असे समजले जाते. अत्याधिक अभिदान प्रसंगी तीन शक्यता असू शकतात.

१) काही अर्जदारांना त्यांनी जेवढ्या भागांकरिता अर्ज केले असतील तेवढ्या सर्व भागांचे आवंटन करण्यात येते. यालाच पूर्ण आवंटन असे मानले जाते. अशा प्रकरणांमध्ये अर्जासोबत कोणतीही जास्त रक्कम मिळालेली नसते.

२) काही अर्जदारांना भागांचे कसलेही आवंटन करण्यात येत नाही. अर्थात त्यांचे अर्ज अस्वीकृत करण्यात आले (नाकारण्यात आले.) अशा वेळी अस्वीकृत अर्जदारांना त्यांना अर्जासोबत प्रमंडळाकडे जमा केलेली संपूर्ण रक्कम परत करण्यात येते.

**रोजकीर्द नोंद**

भाग अर्ज खाते .................................. नावे

बँक खात्याला

३) काही अर्जदारांना त्यांनी जेवढ्या भागांसाठी अर्ज केला असेल त्यापेक्षा कमी भागांचे आवंटन करण्यात आले असल्यास त्याला आंशिक आवंटन (Partial allotment) म्हणून ओळखले जाते अशा वेळी जास्तीच्या अर्जासोबत मिळालेल्या प्रार्थना राशीचा उपयोग संबंधितांच्या आवंटनाचे वेळी येणे राशीमध्ये समयोजित करण्यात येतो. त्या करिता भाग अर्ज खात्यामधून (भाग प्रार्थना खात्यामधून) जास्तीची असलेली रक्कम ही भाग आवंटन खात्याला स्थानांतरित करण्यात येते.

**उदाहरण :**

वैशाली लि. ने सममूल्यावर (at par) प्रतिभाग ₹ १० प्रमाणे १०,००० समभाग निर्गमित केले (विक्रीस काढले) या भागांवर देय असलेली राशी पुढीलप्रमाणे

अर्जासोबत ₹ ३

आवंटनावर ₹ ४

प्रथम आणि अंतिम हप्ता मागणीवर ₹ ३

प्रमंडळाकडे १५००० भागांसाठी अर्ज प्राप्त झाले. संचालक मंडळाने ५००० भागांचे अर्ज नाकारले आणि त्यांचे कडून अर्जासोबत मिळालेली राशी त्यांना परत करण्यात आली. सर्व येणे राशी योग्य वेळी मिळाली.

**वैशाली लि. चे पुस्तकात रोजकीर्द नोंदी दर्शवा.**

**उत्तर:**

**वैशाली लि. चे पुस्तकात रोजकीर्द नोंदी**

| दिनांक | तपशील | खा. पा. | नावे राशी रु. | जमा राशी रु. |
|---|---|---|---|---|
| १. | बँक खाते ....................................................नावे<br>समभाग प्रार्थना खात्याला<br>(प्रतिभाग ₹ ३ प्रमाणे १५,००० समभागांकरिता प्रार्थना राशी प्राप्त झाल्याबद्दल) | | ४५,००० | ४५,००० |
| २. | समभाग प्रार्थना खाते..........................................नावे<br>समभाग भांडवल खात्याला<br>(प्रतिभाग ₹ ३ प्रमाणे १०,००० समभागांवरील प्रार्थना राशी समभाग भांडवल खात्याला स्थानांतरित केल्याबद्दल) | | ३०,००० | ३०,००० |
| ३. | समभाग प्रार्थना खाते..........................................नावे<br>बँक खात्याला<br>(प्रतिभाग ₹ ३ प्रमाणे ५,००० भागांची प्रार्थना राशी परत केल्याबद्दल) | | १५,००० | १५,००० |
| ४. | समभाग आवंटन खाते ........................................नावे<br>समभाग भांडवल खात्याला<br>(प्रतिभाग ₹ ४ प्रमाणे १०,००० समभागांवर आवंटन राशी मागविल्याबद्दल) | | ४०,००० | ४०,००० |
| ५. | बँक खाते ....................................................नावे<br>समभाग आवंटन खात्याला<br>(प्रतिभाग ₹ ४ प्रमाणे १०,००० भागांवर आवंटन राशी प्राप्त झाल्याबद्दल) | | ४०,००० | ४०,००० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ६. | समभाग प्रथम व अंतिम याचना खाते .............................नावे<br>समभाग भांडवल खात्याला<br>(प्रतिभाग ₹ ३ प्रमाणे १०,००० समभागांवर प्रथम व अंतिम याचना राशीची मागणी केल्याबद्दल) | | ३०,००० | ३०,००० |
| ७. | बँक खाते .....................................................नावे<br>समभाग प्रथम व अंतिम याचना खात्याला<br>(प्रतिभाग ₹ ३ प्रमाणे १०,००० समभागांवर प्रथम व अंतिम याचना राशी प्राप्त झाल्याबद्दल) | | ३०,००० | ३०,००० |

**अनुपातिक/प्रमाणशीर/सप्रमाण आवंटन (वाटप) (Pro-rata/Properationate allotment) :**

जेव्हा भागांना येणारी मागणी ही निर्गमित भागांपेक्षा जास्त असेल तेव्हा प्रमंडळ संचालक एकूण भागांसाठी आलेली मागणी आणि निर्गमित करण्यात आलेल्या भागांच्या संख्येच्या आधारावर आनुपातिक स्वरूपात अर्जदारांची मागणी कमी करू शकतात. अशा प्रकरणांमध्ये प्रत्येक अर्जदाराला त्यांनी मागणी केल्यापेक्षा कमी भाग मिळतील.

वैकल्पिकरित्या काही अर्जदारांचे काही अर्ज नाकारून त्यांचेकडून अतिरिक्त अर्जासोबतची राशी परत केली जाते आणि उरलेल्या भागांचे पूर्णपणे आवंट केले जाते, आणि अन्य अर्जदारांना आनुपातिक प्रमाणात वाटप केले जाते.

भागांचे आनुपानिक प्रमाणात आवंटन करण्यात आलेले असल्यास अतिरिक्त प्राप्त झालेली राशी ही भागधारकांकडून आवंटन रकमेच्या मागणीमध्ये समयोजित करण्यात यावी.

त्या संबंधीची रोजकीर्द नोंद

अ) भाग अर्ज खाते.....................नावे

भाग आवंटन खात्याला

किंवा

ब) भाग अर्ज खाते....................नावे

भाग भांडवल खात्याला

भाग आवंटन खात्याला

**६. सानिका कंपनी लि. ने प्रति भाग ₹ १० प्रमाणे १०,००० समभागांचे निर्गमन केले. त्यावर पुढीलप्रमाणे राशी देय होती.**

अर्जासोबत ₹ २ आवंटनावर ₹ ५

प्रथम आणि अंतिम हप्ता मागणी ₹ ३

प्रमंडळाकडे २०,००० भागांकरिता अर्ज आले. संचालकांनी सर्व अर्जदारांना आनुपानित प्रमाणात समभागांचे वाटप करण्याचे ठरविले.

भागांवरील सर्व मागण्या (याचना) करण्यात आल्या आणि त्यांचेशी संबंधित रकमा मिळाल्या.

**सानिका कं. लि. चे पुस्तकात रोजकीर्द नोंदी घ्या.**

उत्तर :

**सानिका लि. चे पुस्तकात रोजकीर्द नोंदी**

| दिनांक | तपशील | खा. पा. | नावे रक्कम ₹ | जमा रक्कम ₹ |
|---|---|---|---|---|
| १. | बँक खाते ....................................................नावे | | ४०,००० | |
| | समभाग प्रार्थना खात्याला | | | ४०,००० |
| | (प्रतिभाग ₹ २ प्रमाणे २०,००० समभागांकरिता प्रार्थना राशी मिळाल्याबद्दल) | | | |
| २. | समभाग प्रार्थना खाते........................................नावे | | ४०,००० | |
| | समभाग भांडवल खात्याला | | | २०,००० |
| | समभाग आवंटन खात्याला | | | २०,००० |
| | (प्राप्त समभाग प्रार्थना पैकी १०,००० भागांची राशी @ ₹ २ प्रमाणे भांडवल खात्याला स्थानांतरित केली आणि जास्तीच्या १०,००० समभागांवरील राशी @ भाग ₹ २ प्रमाणेची भाग आवंटन खात्याला समायोजित करण्यात आली.) | | | |
| ३. | समभाग आवंटन खाते ........................................नावे | | ५०,००० | |
| | समभाग भांडवल खात्याला | | | ५०,००० |
| | (प्रतिभाग ₹ ५ प्रमाणे १०,००० समभागांवर आवंटन राशी मागविल्याबद्दल) | | | |
| ४. | बँक खाते ....................................................नावे | | ३०,००० | |
| | समभाग आवंटन खात्याला | | | ३०,००० |
| | (जास्तीच्या प्रार्थना राशीचे समायोजन केल्यानंतर आवंटनावर प्राप्त झालेल्या राशीबद्दल) | | | |
| ५. | समभाग प्रथम व अंतिम याचना खाते ............................नावे | | ३०,००० | |
| | समभाग भांडवल खात्याला | | | ३०,००० |
| | (प्रतिभाग ₹ ३ प्रमाणे १०,००० भागांवर प्रथम व अंतिम याचनेची मागणी केल्याबद्दल) | | | |
| ६. | बँक खाते ....................................................नावे | | ३०,००० | |
| | समभाग प्रथम व अंतिम याचना खात्याला | | | ३०,००० |
| | (प्रतिभाग ₹ ३ प्रमाणे १०,००० भागांवर प्रथम व अंतिम याचना राशी प्राप्त झाल्याबद्दल) | | | |

**टिप १ :** प्रमंडळाने १०,००० भागाचे जनतेकरिता निर्गमन केले (विक्रीस काढले) परंतु जनतेकडून २०,००० भागांकरिता अर्ज प्राप्त झाले. म्हणजे अतिरिक्त १०,००० भागांकरिता अर्ज प्राप्त झाले.

अर्जासोबत मिळालेली एकूण राशी/प्रार्थना राशी

२०,००० भागांवर प्रतिभाग ₹ २ प्रमाणे = ४०,०००

वज – प्रतीभाग ₹ २ प्रमाणे १०,००० भागांच्या निर्गमनावरील रक्कम = २०,०००

अर्जासोबत जास्तीची मिळालेली रक्कम/जास्तीची प्रार्थना राशी = २०,०००

म्हणून अतिरिक्त १०००० समभागांवर प्रतीभाग ₹ २ प्रमाणे मिळालेली जास्तीची राशी ₹ २०,०००चे आवंटन राशीमध्ये समायोजन करण्यात यावे.

**टिप २ :** आवंटन राशी/रक्कम प्राप्त = मागणी केलेली आवंटन राशी वजा अर्जासोबत जास्तीची मिळालेली रक्कम

= ५०,००० – २०,००० = ₹ ३०,०००

**ब) प्रत्यक्ष निर्गमनापेक्षा कमी भागांकरिता मागणी येणे/ भागांचे कमी अभिदान (Under Subscription of shares)**

जेव्हां निर्गमित करण्यात आलेल्या (विक्री करिता काढण्यात आलेल्या) भागांपेक्षा कमी भागांसाठी मागणी करणारे अर्ज जनतेकडून आल्यास त्याला भागांचे कमी अभिदान (Under Subscription of shares) असे म्हणतात. या प्रसंगी जेवढ्या भागांकरिता मागणी आली आणि आवंटन करण्यात आले त्यानुसार रोजकीर्द नोंदी करण्यात याव्यात.

७. xyz **कंपनी लि. ने प्रतिभाग ₹ १०० प्रमाणे ४,००० भाग विक्रीस काढले. त्यावर खालीलप्रमाणे प्रतिभाग रक्कम देय आहे.**

**अर्जासोबत ₹ २५ आवंटनावर ₹ ६०**

प्रथम आणि अंतिम हप्ता मागणी ₹ १५

जनतेकडून ३,००० भागांकरिता अर्ज आले. सर्व अर्जदारांना भागांचे वाटप करण्यात आले. आवंटन आणि मागणीची सर्व रक्कम मिळाली. xyz **कंपनी लि. चे पुस्तकात रोजकीर्द नोंद करा.**

**उत्तर:**

**xyz कंपनी लि. चे पुस्तकात रोजकीर्द नोंदी**

| दिनांक | तपशील | खा. पा. | नावे रक्कम ₹ | जमा रक्कम ₹ |
|---|---|---|---|---|
| १. | बँक खाते ....................नावे | | ७५,००० | |
| | भाग प्रार्थना खात्याला | | | ७५,००० |
| | (प्रतिभाग ₹ २५ प्रमाणे ३,००० भागांवर प्रार्थना (अर्ज) राशी प्राप्त झाल्याबद्दल) | | | |
| २. | भाग प्रार्थना खाते ....................नावे | | ७५,००० | |
| | भाग भांडवल खात्याला | | | ७५,००० |
| | (प्रतिभाग ₹ २५ प्रमाणे ३,००० भागांवरील प्रार्थना राशी भांडवल खात्याला स्थानांतरित केल्याबद्दल) | | | |
| ३. | भाग आवंटन खाते....................नावे | | १,८०,००० | |
| | भाग भांडवल खात्याला | | | १,८०,००० |
| | (प्रतिभाग ₹ ६० प्रमाणे ३,००० भागांवर आवंटन राशीची मागणी केल्याबद्दल) | | | |
| ४. | बँक खाते ....................नावे | | १,८०,००० | |
| | भाग आवंटन खात्याला | | | १,८०,००० |
| | (प्रतिभाग ₹ ६० प्रमाणे ३,००० भागांवरील आवंटन राशी प्राप्त झाल्याबद्दल) | | | |
| ५. | भाग प्रथम आणि अंतिम याचना खाते....................नावे | | ४५,००० | |
| | भाग भांडवल खात्याला | | | ४५,००० |
| | (प्रतिभाग ₹ १५ प्रमाणे ३,००० भागांवर प्रथम आणि अंतिम राशीची मागणी केल्याबद्दल) | | | |
| ६. | बँक खाते ....................नावे | | ४५,००० | |
| | भाग प्रथम आणि अंतिम याचना खात्याला | | | ४५,००० |
| | (प्रतिभाग ₹ १५ प्रमाणे ३,००० भागांवर प्रथम आणि अंतिम याचना राशी मिळाल्याबद्दल) | | | |

## ८.२.५ थकीत मागणी आणि अग्रिम याचना

### अ) थकीत मागणी/अप्राप्त याचना (Calls in Arrears)

जेव्हां एखादी व्यक्ती प्रमंडळाच्या भागांचे खरेदी करिता अर्ज करतो तेव्हा तो एक प्रस्ताव देतो की, जर कंपनीने एखाद्या व्यक्तीचा भाग विनंती अर्ज स्वीकारला आणि त्याला भागांचे वाटप केले तर तो कंपनीचा भागधारक होतो. अशा प्रकारे भागधारक त्याने धारण केलेल्या भागांवरील संपूर्ण रक्कम देण्यास जबाबदार ठरतो. जर तो त्या भागांवरील आवंटन आणि याचना (मागणी) राशी भरण्यास अपयशी ठरला तर अशी येणे बाकी राशी ही थकीत मागणी (Calls in Arrears) म्हणून ओळखली जाते.

अप्राप्त आवंटन आणि मागणीची रक्कम ही त्या त्या संबंधित खात्यात येणे बाकी म्हणून ठेवली जाते किंवा थकीत मागणी खाते या नवीन खात्यामध्ये स्थानांतरित केली जाते. थकीत मागणी खात्यामधील दिसून येणारी नावे शिल्लक ही ताळेबंदाचे देयता बाजूवरील मागणी केलेल्या भांडवलाच्या रकमेतून वजा केली जाते. अन्य शब्दात थकीत मागणी ही अशी रक्कम आहे. की जी भागधारकांकडून येणे बाकी आहे. परंतु त्यांनी दिली नाही म्हणून ती मागणी केलेल्या भांडवलातून वजा केली जाते..

८. **गिरीश कंपनी लि. ने प्रत्येकी ₹ १० चे २५००० समभागात विक्रीस काढून त्या करिता अर्ज आमंत्रीत केले. त्यावर पुढील प्रमाणे प्रतिभाग रक्कम देय आहे.**

| | |
|---|---|
| प्रार्थना राशी (अर्जासोबत) | ₹ २.५० |
| आवंटनावर (allotment) | ₹ ५.०० |
| प्रथम आणि अंतिम याचना | ₹ २.५० |

३०,००० समभागांकरिता अर्ज आले त्या सर्वांना आनुपातिक प्रमाणामध्ये (Pro-rata) वाटप करण्यात आले. २५०० समभागांवरील प्रथम आणि अंतिम हप्ता मागणी सोडून अन्य सर्व भागांवरील येणे असलेली संपूर्ण रक्कम मिळाली.

**वरील व्यवहारांच्या रोजकीर्द नोंदी द्या आणि ताळेबंदात दर्शवा.**

उत्तर :

**गिरीश कंपनी लि. चे पुस्तकात रोजकीर्द नोंदी**

| दिनांक | तपशील | खा. पा. | नावे रक्कम ₹ | जमा रक्कम ₹ |
|---|---|---|---|---|
| १. | बँक खाते ....................................................नावे | | ७५,००० | |
| | समभाग प्रार्थना खात्याला | | | ७५,००० |
| | (प्रतिभाग ₹ २.५० प्रमाणे ३०,००० समभागांवर प्रार्थना राशी मिळाल्याबद्दल) | | | |
| २. | समभाग प्रार्थना खाते..........................................नावे | | ७५,००० | |
| | समभाग भांडवल खात्याला | | | ६२,५०० |
| | समभाग आवंटन खात्याला | | | १२,५०० |
| | (प्रतिभाग ₹ २.५० प्रमाणे २५००० भागांच्या अर्जा सोबत प्राप्त राशी भांडवल खात्याला स्थानांतरित केल्याबद्दल तसेच ५००० अतिरिक्त भागांवर प्रतिभाग ₹ २.५० प्रमाणे प्राप्त रक्कम आवंटन खात्याला स्थानांतरित केल्याबद्दल) | | | |
| ३. | समभाग आवंटन खाते ........................................नावे | | १,२५,००० | |
| | समभाग भांडवल खात्याला | | | १,२५,००० |
| | (२५००० समभागांवर प्रतीभाग ₹ ५ प्रमाणे आवंटन राशीची मागणी केल्याबद्दल) | | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ४. | बँक खाते ......................................................नावे | | १,१२,५०० | |
| | समभाग आवंटन खात्याला | | | १,१२,५०० |
| | (आवंटनावर रक्कम प्राप्त झाल्याबद्दल) | | | |
| ५. | समभाग प्रथम आणि अंतिम याचना खाते .........................नावे | | ६२,५०० | |
| | समभाग भांडवल खात्याला | | | ६२,५०० |
| | (२५००० समभागांवर प्रत्येकी भाग ₹ २.५० प्रमाणे प्रथम आणि अंतिम याचना राशी मागविल्याबद्दल) | | | |
| ६. | बँक खाते ......................................................नावे | | ५६,२५० | |
| | थकीत मागणी (अप्राप्त याचना) खाते ...........................नावे | | ६,२५० | |
| | समभाग प्रथम आणि अंतिम याचना खात्याला | | | ६२,५०० |
| | (२२,५०० भागांवर प्रत्येकी ₹ २.५० प्रमाणे समभाग प्रथम आणि अंतिम याचनेशी राशी मिळाल्याबद्दल) | | | |

**गिरीश कंपनी लि. चा ताळेबंद**

| देयता | रक्कम ₹ | रक्कम ₹ | संपत्ती | रक्कम ₹ | रक्कम ₹ |
|---|---|---|---|---|---|
| भाग भांडवल | २,५०,००० | | बँक खाते | | २,४३,७५० |
| (–) थकीत मागणी | ६,२५० | २,४३,७५० | | | |
| | | २,४३,७५० | | | २,४३,७५० |

**टिप:** नोंद क्रमांक ६ प्रथम आणि अंतिम याचना राशी मिळाल्याबद्दलची नोंद पुढीलप्रमाणे देखील करता येईल.

बँक खाते............................................... नावे ₹ ५६,२५०

समभाग प्रथम आणि अंतिम याचना खात्याला ₹ ५६,२५०

**ब) अग्रीम याचना/पूर्वप्राप्त हप्ता (Calls in advance) :**

प्रमंडळ अग्रीम याचना राशी प्राप्त करू शकतो. भागांवर विशिष्ट याचना राशीची मागणी करण्यापूर्वीच एखाद्या भागधारकाने एका विशिष्ट योजनेच्या (मागणीच्या) राशीचे प्रमंडळाकडे शोधन केले असेल तर अशा अगाऊ प्राप्त याचना राशीला 'अग्रीम याचना' असे समजले जाते. ही प्रमंडळाची देयता असल्याने ती राशी अग्रीम याचना खात्याला स्थानांतरित केली जाते. या राशीचे भविष्यात करण्यांत येणाऱ्या संबंधित मागणीचे वेळी त्यामध्ये समायोजन केले जाते. तो पर्यंत या खात्याची शिल्लक ही ताळेबंदाचे देयता बाजूवर दर्शविली जाते.

**रोजकिर्द नोंद**

i) बँक खाते......................................... नावे

अग्रीम याचना / पूर्वप्राप्त हप्ता खात्याला

ii) अग्रीम याचना / पूर्वप्राप्त हप्ता खाते.............. नावे

संबंधित हप्ता मागणी खात्याला

९. **अर्चना लि. ने प्रत्येकी ₹ १० चे १०,००० भाग प्रती भाग ' १२ प्रमाणे निर्गमीत केले त्यावर खालील प्रमाणे प्रतिभाग रक्कम देय आहे.**

अर्जासोबत ₹ ३

आवंटनावर ₹ ५ (प्रव्याजी सह)

प्रथम आणि अंतिम याचनेवर ₹ ४

८००० भागांकरिता अर्ज मिळाले. केतन या भागधारकने त्याने धारण केलेल्या (त्याचेकडे असलेल्या) ४०० भागांवर आवंटनाचे वेळेसच भागांवर द्यावयाच्या संपूर्ण रकमेचा भरणा केला.

**अर्चना लि. चे पुस्तकात वरील व्यवहारांच्या रोजकीर्द नोंदी द्या.**

उत्तर:

**अर्चना लि. चे पुस्तकात रोजकीर्द नोंदी**

| दिनांक | तपशील | खा. पा. | नावे रक्कम ₹ | जमा रक्कम ₹ |
|---|---|---|---|---|
| १. | बँक खाते ....................नावे | | २४,००० | |
| | भाग प्रार्थना खात्याला | | | २४,००० |
| | (प्रतिभाग ₹ ३ प्रमाणे ८,००० भागांवर प्रार्थना राशी प्राप्त झाल्याबद्दल) | | | |
| २. | भाग प्रार्थना खाते ....................नावे | | २४,००० | |
| | भाग भांडवल खात्याला | | | २४,००० |
| | (प्रतिभाग ₹ ३ प्रमाणे ८००० भागांची प्रार्थना राशी भाग भांडवल खात्याला स्थानांतरित केल्याबद्दल) | | | |
| ३. | भाग आवंटन खाते....................नावे | | ४०,००० | |
| | भाग भांडवल खात्याला | | | २४,००० |
| | भाग प्रव्याजी खात्याला | | | १६,००० |
| | (₹ २ प्रव्याजी सह प्रतिभाग ₹ ५ प्रमाणे ८,००० भागांवर आवंटन राशी मागविल्याबद्दल) | | | |
| ४. | बँक खाते ....................नावे | | ४१,६०० | |
| | भाग आवंटन खात्याला | | | ४०,००० |
| | अग्रीम याचना (पूर्व प्राप्त हप्ता) खात्याला | | | १,६०० |
| | (८००० भागांवर प्रतिभाग ₹ ५ प्रमाणे आवंटन राशी आणि ४०० भागांवर प्रतिभाग ₹ ४ प्रमाणे प्रथम व अंतिम हप्ता याचनेची (मागणीची) रक्कम अगाऊ मिळाल्याबद्दल) | | | |
| ५. | भाग प्रथम व अंतिम याचना खाते....................नावे | | ३२,००० | |
| | भाग भांडवल खात्याला | | | ३२,००० |
| | (८००० भागांवर प्रतिभाग ₹ ४ प्रमाणे प्रथम व अंतिम याचना (हप्ता) राशीची मागणी केल्याबद्दल) | | | |
| ६. | बँक खाते ....................नावे | | ३०,४०० | |
| | अग्रीम याचना खाते (पूर्व प्राप्त हप्ता) ....................नावे | | १,६०० | |
| | भाग प्रथम व अंतिम याचना खात्याला | | | ३२,००० |
| | (७६०० भागांवर प्रती भाग ₹ ४ प्रमाणे राशी प्राप्त झाली आणि ४०० भागांच्या प्राप्त अग्रीम हप्ता राशीचे समायोजना केल्याबद्दल) | | | |

### ८.२.६ रोख रकमेच्या प्रतिफलाशिवाय भागांचे निर्गमन (विक्री)

**(Issue of shares for consideration other than cash)**

प्रमंडळ आपल्या भागांचे रोखीने निर्गमन करू शकते किंवा रोख प्रतिफलाशिवायदेखील भागांचे निर्गमन करू शकते. जसे जमीन, इमारत, यंत्र सामग्री इ. खरेदीचे वेळी रोख रक्कम देण्याऐवजी भागांच्या स्वरूपात शोधन करण्यात येते. प्रमंडळ एखादया विक्रेत्याकडून (पुरवठादाराकडून) विशिष्ट संपत्ती उधारीवर खरेदी करते आणि विक्रेत्याला रोख रकमेऐवजी एक निश्चित संख्येचे भाग एका निश्चित दराने संपत्ती खरेदीच्या प्रतिफलाचे स्वरूपात निर्गमीत केले जातात (दिले जातात) अशा स्थितीत पुढील प्रमाणे रोजकीर्द नोंदी करण्यात येतात.

१) संपत्ती खाते........................................नावे

विक्रेता खात्याला

(विक्रेत्याकडून संपत्ती खरेदी केल्याबद्‌दल)

२) विक्रेता खाते........................................नावे

भाग भांडवल खात्याला

(विक्रेत्याला प्रत्येकी रु. ....चे ...पूर्णदत्त भाग आवंटित केल्याबद्‌दल)

काही वेळा प्रमंडळ त्यांच्या प्रवर्तकांना त्यांचे सेवांचे मोबदल्यात रोख शोधन न करता त्यांना भागांचे निर्गमन करून पुरस्कृत करते. प्रवर्तकांना त्यांच्या सेवांचे मोबदल्यात भागाच्या स्वरूपात दिलेली संपूर्ण रक्कम ही ख्याती मूल्य म्हणून मानले जाते, आणि त्याची नोंद ही संपत्ती खरेदीच्या नोंदी सारखीच केली जाते यासंबंधीची नोंद पुढील प्रमाणे –

ख्याती खाते ........................................नावे

भाग भांडवल खात्याला

(प्रत्येकी ₹ ... चे ...........पूर्णदत्त भाग प्रवर्तकांना आवंटीत केल्याबद्‌दल)

### ८.३.१ भागांची जप्ती (Forfeiture of shares):

जर भागधारक हा भाग वाटप, किंवा याचनेची (हप्ता मागणीची) किंवा दोन्हीची रक्कम देण्यास अपयशी ठरला तर प्रमंडळ भागधारकाला थकीत रकमेचा भरणा करण्यासंबंधीचे स्मरपत्र पाठविते. अशा स्मरणपत्रांना भागधारकाने अनुकूल प्रतिसाद दिला नाही तर संचालक कंपनीच्या अंतर्गत नियमावलीतील (Article of association of company) तरतुदीनुसार अशा भागांची जप्ती करू शकतात.

जेव्हा भाग जप्त केले जातात तेव्हा अशा भागांच्या संदर्भात जप्त करण्याच्या तारखेपर्यंतच्या मागणी रकमेसह भाग भांडवल खात नावे केले जाते आणि या भागांवर आधी मिळालेल्या राशीने 'भाग जप्त खाते' जमा केले जाते तसेच संबंधित थकीत मागण्यांचे खाते देखील जमा केले जाते. या ठिकाणी हे लक्षात ठेवले पाहिजे की भाग भांडवल खाते हे त्या राशीनेच नावे केले जाते. जप्तीच्या तारखेपर्यंत जेवढी रक्कम मिळाली असेल किंवा मागणी केली असेल. भागाच्या दर्शनी मूल्याने नव्हे. जर भाग मूल्याची संपूर्ण राशीची मागणी झाली असेल तरच भाग दर्शनी मूल्याच्या संपूर्ण रकमेने भाग भांडवल खाते नावे केले जाईल रोजकीर्द नोंद

भाग भांडवल खाते..................................नावे

भाग जप्त/जप्त भाग खात्याला

थकीत मागणी/अप्राप्त याचना खात्याला

**i) जेव्हां भागांचे प्रव्याजी (premium) वर निर्गमन करण्यात आले असेल –**

जेव्हां जप्त भाग हे मुळातच प्रव्याजीवर निर्गमित करण्यात आले असतील आणि या भागांवरील प्रव्याजीची रक्कम आधीच मिळालेली असेल तर अशावेळी भाग प्रव्याजी खाते नावे करता कामा नये, कारण एकदा का प्रव्याजीची रक्कम मिळाली की कायद्यानुसार ती परत करणे किंवा रद्द करण्याची अनुमती नाही. परंतु जर भाग प्रव्याजीची रक्कम मिळाली नसेल आणि ती

ज्या हप्त्यांची (याचनेची) राशी बाकी असेल त्या मधे समाविष्ट असेल तर भाग प्रव्याजी खाते नावे केले जाईल. अशा प्रसंगी भाग जप्ती संबंधीची रोजकिर्द नोंद –

भाग भांडवल खाते.........................................नावे

भाग प्रव्याजी खाते / प्रतिभूती प्रव्याजी खाते ................नावे

थकीत मागणी खात्याला

भाग जप्त/जप्त भाग खात्याला

**१०. सुमन लि. ने प्रत्येकी ₹ १० चा ₹ ३ प्रव्याजीवर समभाग निर्गमीत केले. त्यावर प्रतिभाग देय राशी पुढील प्रमाणे आहे.**

| | |
|---|---|
| अर्जासोबत | ₹ ३ |
| आवंटनावर | ₹ ५ (प्रव्याजीसह) |
| प्रथम हप्ता मागणी | ₹ २.५० |
| अंतिम हप्ता मागणी | ₹ २.५० |

अशोक हा एक भागधारक त्याचेकडे असलेल्या २०० भागांवरील आवंटन आणि प्रथम हप्ता मागणी राशी देण्यास अपयशी ठरल्यामुळे प्रथम हप्ता मागणीनंतर संचालकांनी ते भाग जप्त केले. तसेच १०० भाग धारणकरणारा भागधारक अतुल हा त्याचेकडे असलेल्या भागांवर प्रथम आणि अंतिम हप्ता मागणी भरण्यास अपयशी ठरल्यामुळे अंतिम हप्ता मागणीनंतर हे भाग देखील जप्त करण्यात आले.

**अशोक आणि अतुल यांच्या भाग जप्ती संबंधीच्या रोजकीर्द नोंदी दर्शवा.**

उत्तर:

१) समभाग भांडवल खाते ................................नावे ₹ १,५००

भाग प्रव्याजी खाते....................................नावे ₹ ६००

भाग आवंटन खात्याला ₹ १०००

भाग प्रथम याचना खात्याला ₹ ५००

भाग जप्ती खात्याला ₹ ६००

(२०० समभागांवर आवंटन आणि प्रथम याचना राशी न मिळाल्याने भाग जप्त करण्यात आल्याबद्दल)

२) समभाग भांडवल खाते ................................नावे ₹ १,०००

समभाग प्रथम याचना खात्याला ₹ २५०

समभाग अंतिम याचना खात्याला ₹ २५०

भाग जप्त खात्याला ₹ ५००

(१०० समभागांवर प्रथम व अंतिम याचना राशी न मिळाल्याने भाग जप्त करण्यात आल्याबद्दल)

**टिप : १ भाग प्रव्याजी न मिळालेल्या भागांची जप्ती**

भाग भांडवल = जप्त केलेल्या भागांची संख्या × मागणी केलेली रक्कम (प्रव्याजी वगळता)

जप्त केलेले भाग = २००

याचना/मागणी केलेली रक्कम = २ + ३ + २.५० = ₹ ७.५०

२०० × ७.५० = ₹ १५००

भाग/प्रतिभूती प्रव्याजी = २०० × ३ = ₹ ६०० (भागांची संख्या × प्रव्याजी रक्कम)

भाग आवंटन = २००० × ५ = ₹ १००० (भागांची संख्या × आवंटन मूल्य)

प्रथम याचना = २०० × २.५० = ₹ ५०० (भागांची संख्या × प्रथम याचना रक्कम)

भाग जप्ती = शिल्लक रक्कम = ₹ ६००

**टिप : २ भाग प्रव्याजी मिळालेल्या भागांची जप्ती**

भागभांडवल = एकूण भाग × याचना केलेली हप्ता रक्कम (प्रव्याजी वगळता)

= १०० × १०

= ₹ १००

प्रथम याचना रक्कम = भागांची संख्या × याचना रक्कम

= १०० × २.५०

= ₹ २५०

अंतिम याचना = भागांची संख्या × याचना रक्कम

= १०० × २.५०

= ₹ २५०

भाग जप्ती = शिल्लक रक्कम = ₹ ५००

**११. श्रद्धा लि. ने १,००,००० समभाग प्रत्येकी ₹ १०चा ₹ २ अधिमूल्याने (प्रव्याजी वर at a premium) विक्रीस काढले. भागांवर देय राशी पुढील प्रमाणे होती.**

| | | |
|---|---|---|
| अर्जासोबत (प्रार्थना राशी) | ₹ ३ | |
| आवंटनावर (वाटपावर) | ₹ ५ | (प्रव्याजीसह) |

प्रथम आणि अंतिम हप्ता मागणी वर (याचनेवर) ₹ ४

१,२०,००० समभागांकरिता अर्ज मिळाले आणि सर्व अर्जदारांना अनुपातीक प्रमाणात (pro-rata) आवंटन (वाटप) करण्यात आले. अतिरिक्त अर्जासोबत मिळालेली रक्कम आवंटना मध्ये समायोजित करण्यात आली.

विनिताला २०० भागांचे आवंटन करण्यात आले होते ती प्रथम आणि अंतिम हप्ता मागणीची राशी देण्यास अपयशी ठरली आणि त्यामुळे तिचेकडील भाग जप्त करण्यात आले.

**श्रद्धा लि. चे पुस्तकात रोजकीर्द नोंदी द्या आणि ताळेबंद दर्शवा.**

उत्तर:

**श्रद्धा लि.चे पुस्तकात रोजकीर्द नोंदी**

| दिनांक | तपशील | खा. पा. | नावे रक्कम ₹ | जमा रक्कम ₹ |
|---|---|---|---|---|
| १. | बँक खाते..........................................नावे<br>समभाग प्रार्थना खात्याला<br>(१,२०,००० समभागांवर प्रत्येकी ₹ ३ प्रमाणे भाग अर्जा सोबत राशी (प्रार्थना राशी) मिळाल्याबद्दल) | | ३,६०,००० | <br>३,६०,००० |
| २. | समभाग प्रार्थना खाते..........................................नावे<br>समभाग भांडवल खात्याला<br>समभाग आवंटन खात्याला<br>(१,००,००० भागांवरील प्रतिभाग ₹ ३ प्रमाणे प्राप्त प्रार्थना राशी समभाग भांडवल खात्याला स्थानांतरित केली आणि उरलेली रक्कम समभाग आवंटन खात्याला समायोजित करण्यात आल्याबद्दल) | | ३,६०,००० | <br>३,००,०००<br>६०,००० |
| ३. | समभाग आवंटन खाते ..........................................नावे<br>समभाग भांडवल खात्याला<br>भाग प्रव्याजी खात्याला<br>(१,००,००० भागांवर प्रतिभाग ₹ ५ प्रव्याजीसह या प्रमाणे आवंटन राशीची मागणी केल्याबद्दल) | | ५,००,००० | <br>३,००,०००<br>२,००,००० |
| ४. | बँक खाते ..........................................नावे<br>समभाग आवंटन खात्याला<br>(अतिरिक्त अर्जावरील प्राप्त राशीचे समायोजन केल्यानंतर आवंटनाची राशी प्राप्त झाल्याबद्दल ) | | ४,४०,००० | <br>४,४०,००० |
| ५. | समभाग प्रथम व अंतिम याचना खाते ............................नावे<br>समभाग भांडवल खात्याला<br>(१,००,००० भागांवर प्रतिभाग ₹ ४ प्रमाणे प्रथम आणि अंतिम याचना राशीची मागणी केल्याबद्दल) | | ४,००,००० | <br>४,००,००० |
| ६. | बँक खाते ..........................................नावे<br>समभाग प्रथम आणि अंतिम याचना खात्याला<br>(९९,८०० भागांवर प्रती भाग ₹ ४ प्रमाणे प्रथम आणि अंतिम याचना राशी मिळाल्याबद्दल) | | ३,९९,२०० | <br>३,९९,२०० |
| ७. | समभाग भांडवल खाते..........................................नावे<br>समभाग प्रथम आणि अंतिम याचना खात्याला<br>भाग जप्त खात्याला<br>(प्रथम आणि अंतिम याचनेची राशीचे शोधन न केल्यामुळे २०० भाग जप्त करण्यात आल्याबद्दल) | | २,००० | <br>८००<br>१,२०० |

**श्रद्धा लि. चा ताळेबंद**

| देयता | रक्कम ₹ | संपत्ती | रक्कम ₹ |
|---|---|---|---|
| भाग भांडवल | ९,९८,००० | बँक | ११,९९,२०० |
| भाग भांडवल | २,००,००० | | |
| जप्त भाग खाते | १,२०० | | |
| | ११,९९,२०० | | ११,९९,२०० |

ii) **जेव्हा भागांचे कसरीवर निर्गमन केले जाते. (When Share were issued at discount)**

जेव्हां जप्त करण्यात येणारे भाग हे मुळातच कसरीवर निर्गमीत करण्यात आले असतील तर भाग निर्गमन (विक्री) कसर खाते जमा केले पाहिजे.

**रोजकीर्द नोंद –**

भाग भांडवल खाते..............................नावे

थकीत मागणी (अप्राप्त याचना) खात्याला

भाग निर्गमन कसर खात्याला (कसरीवर भागविक्री खात्याला)

भाग जप्त खात्याला

**१२. सुभाष लि. ने प्रत्येकी ₹ १० चा समभाग १०% दराने कसरीवर जनतेला निर्गमीत केले. त्यावर खालील प्रमाणे राशी देय होती.**

| | |
|---|---|
| अर्जासोबत | ₹ ३ |
| आवंटनावर | ₹ २ |
| प्रथम याचना | ₹ २ |
| अंतिम याचना | ₹ २ |

एक भागधारक 'नीता' जिला ३०० भागांचे आवंटन (वाटप) करण्यात आले होते, तिने केवळ अर्जासोबतची राशी (प्रार्थना राशी) (Application money) भरली. प्रथम याचनेनंतर तिचे कडील भाग जप्त करण्यात आले.

दुसरा भागधारक संजय ज्याला ४०० भागांचे वाटप करण्यात आले होते त्याने केवळ प्रार्थनाराशी आणि आवंटन राशी भरली. अंतिम याचेच नंतर त्याचेकडील भाग जप्त करण्यात आले.

**प्रमंडळाचे पुस्तकात निता आणि संजय यांचे भाग जप्तीशी संबंधित रोजकीर्द नोंदी दर्शवा.**

उत्तर:

**सुभाष लि. च्या पुस्तकात रोजकीर्द नोंदी**

| दिनांक | तपशील | खा. पा. | नावे रक्कम ₹ | जमा रक्कम ₹ |
|---|---|---|---|---|
| १. | समभाग भांडवल खाते. ........................................नावे | | २,४०० | |
| | समभाग आवंटन खात्याला | | | ६०० |
| | समभाग प्रथम याचना खात्याला | | | ६०० |
| | भाग निर्गमन कसर खात्याला | | | ३०० |
| | भाग जप्त खात्याला | | | ९०० |
| | (नीता कडील ३०० भागांवर तिने आवंटन व प्रथम याचनेवरील देय राशी न भरल्यामुळे ते भाग जप्त केल्याबद्दल) | | | |
| २. | समभाग भांडवल खाते. ........................................नावे | | ४००० | |
| | समभाग प्रथम याचना खात्याला | | | ८०० |
| | समभाग अंतिम याचना खात्याला | | | ८०० |
| | भाग निर्गमन कसर खात्याला | | | ४०० |
| | भाग जप्त खात्याला | | | २००० |
| | (संजय या भागधारकाने त्याचेकडील ४०० भागांवर प्रथम व अंतिम याचना राशीचे शोधन न केल्यामुळे ते भाग जप्त करण्यात आले.) | | | |

**जप्त भागांचे पुनः निर्गमन/विक्री/पुनर्वितरण (Reissue of Forfeited Shares)**

संचालक जप्त केलेल्या भागांचे सममूल्यावर, (At Par), अधिमूल्यावर (प्रव्याजीवर Premium) किंवा कसरीवर (At Discount) निर्गमन (विक्री/पुनर्वितरण) करू शकतात. सामान्यतः पुनःनिर्गमन हे पूर्णदत्त (Fully paid) अशा स्वरूपात आणि कसरीवर करण्यात येते.

तथापि पुनःनिर्गमीत करण्यात येणाऱ्या भागांवर देण्यात येणारी सूट ही मूळात त्या भागांची विक्री केल्यानंतर त्यांचेवर प्राप्त झालेल्या राशीपेक्षा म्हणजेच भाग जप्तीचे वेळेस जप्त केलेल्या रकमेपेक्षा जास्त नसावी. पुनः निर्गमनावर सूट म्हणून देण्यात आलेली रक्कम ही भाग जप्त खात्याला नावे करण्यात यावी.

जप्त केलेल्या संपूर्ण भागांचे पुनःनिर्गमन करण्यात आले असेल तर भाग जप्त खात्यामध्ये दिसून येणाऱ्या शिलकेला भांडवल निधी खात्यामध्ये स्थानांतरित करण्यात यावे.

**१३. एका कंपनीने प्रतिभाग ₹ १० चा एक अशा १,००० भागांवर प्रतिभाग ₹ २ प्रमाणे अंतिम याचना राशी (अंतिम हप्ता मागणीची रक्कम) न मिळाल्यामुळे ते जप्त केले आणि असे हे जप्त केलेले सर्व भाग प्रतिभाग ₹ ६ प्रमाणे पूर्णदत्त भाग म्हणूनच पुनःनिर्गमित (विक्री) करण्यात आले.**

**कंपनीचे पुस्तकात भाग जप्तीशी आणि त्यांचे पुनःनिर्गमन संबंधीच्या रोजकीर्द नोंदी करा.**

**कंपनीचे पुस्तकात रोजकीर्द नोंदी**

| दिनांक | तपशील | खा. पा. | नावे रक्कम ₹ | जमा रक्कम ₹ |
|---|---|---|---|---|
| १. | भाग भांडवल खाते. ..........................................नावे | | १०,००० | |
| | भाग जप्त खात्याला | | | ८,००० |
| | थकीत मागणी खात्याला | | | २,००० |
| | (प्रत्येकी ₹ १०च्या १०००भागांवर अंतिम याचना राशी प्रतिभाग ₹ २ प्रमाणे प्राप्त न झाल्यामुळे ते भाग जप्त केल्याबद्दल) | | | |
| २. | बँक खाते.................................................नावे | | ६,००० | |
| | भाग जप्त खाते ............................................नावे | | ४,००० | |
| | भाग भांडवल खात्याला | | | १०,००० |
| | (१००० जप्त भागांचे प्रतिभाग ₹ ६ प्रमाणे पुनः निर्गमन केल्याबद्दल) | | | |
| ३. | भाग जप्त खाते ...............................................नावे | | ४,००० | |
| | भांडवल निधी खात्याला | | | ४,००० |
| | (जप्त भाग खात्याची शिल्लक भांडवल निधी खात्याला स्थानांतरित केल्याबद्दल) | | | |

**१४. प्रीती कंपनी लि.ने प्रत्येकी ₹ १०० सम मूल्य (at par) असणाऱ्या ५०००० सामान्य भागांच्या निर्गमनाकरिता अर्ज आमंत्रित केले. त्यावर खालीलप्रमाणे प्रतिभाग रकमा देय होत्या.**

अर्जासोबत ₹ ३०

आवंटनावर ₹ ४०

प्रथम आणि अंतिम याचनेवर ₹ ३०

जनतेने ३५,००० भागांकरीता अर्ज केले त्या सर्वांना भागांचे वाटप करण्यात आले. सर्व येणे रकमा प्राप्त झाल्या. केवळ भाग ४०००धारण करणाऱ्या एका भागधारकाने प्रथम व अंतिम याचनेची राशी न भरल्यामुळे त्याचेकडील सर्व भाग जप्त करण्यात आले.

संचालकांनी जप्त केलेले सर्व भाग प्रतिभाग ₹ ८० पूर्णदत्त (fully Paid) भाग म्हणून पुनः निर्गमीत केले.

**प्रीती कंपनी लि. चे पुस्तकात रोजकीर्द नोंदी द्या.**

उत्तर:

**प्रिती कंपनी लि. चे पुस्तकात रोजकीर्द नोंदी**

| दिनांक | तपशील | खा. पा. | नावे रक्कम ₹ | जमा रक्कम ₹ |
|---|---|---|---|---|
| १. | बँक खाते. ....................................................नावे<br>समभाग प्रार्थना (अर्ज) खात्याला<br>(३५,००० भागांवर प्रतिभाग ₹ ३० प्रमाणे प्रार्थना राशी (भाग अर्जासोबत) मिळाल्याबद्दल) | | १०,५०,००० | १०,५०,००० |
| २. | समभाग प्रार्थना खाते...........................................नावे<br>समभाग भांडवल खात्याला<br>(३५००० भागांवर प्रतिभाग ₹ ३० प्रमाणे मिळालेली प्रार्थना राशी भांडवल खात्याला स्थानांतरित केल्याबद्दल) | | १०,५०,००० | १०,५०,००० |
| ३. | समभाग आवंटन खाते ........................................नावे<br>समभाग भांडवल खात्याला<br>(३५००० भागांवर प्रतिभाग ₹ ४० प्रमाणे आवंटन राशीची मागणी केल्याबद्दल) | | १४,००,००० | १४,००,००० |
| ४. | बँक खाते. ....................................................नावे<br>समभाग आवंटन खात्याला<br>(३५००० भागांवर प्रतिभाग ₹ ४० प्रमाणे आवंटनाची मिळाल्याबद्दल) | | १४,००,००० | १४,००,००० |
| ५. | समभाग प्रथम आणि अंतिम याचना खाते ........................नावे<br>समभाग भांडवल खात्याला<br>(३५००० भागांवर ₹ ३० प्रमाणे प्रथम आण अंतिम याचना केल्याबद्दल) | | १०,५०,००० | १०,५०,००० |
| ६. | बँक खाते ....................................................नावे<br>समभाग प्रथम आणि अंतिम याचना खाते<br>(३१००० भागावर प्रतिभाग ₹ ३० प्रमाणे प्रथम आणि अंतिम याचना राशी मिळाल्याबद्दल) | | ९,३०,००० | ९,३०,००० |
| ७. | समभाग भांडवल खाते. ..........................................नावे<br>समभाग प्रथम आणि अंतिम याचना खात्याला<br>भाग जप्त खात्याला<br>(४००० भागांवर प्रथम आणि अंतिम याचना (मागणी) राशी न मिळाल्यामुळे ते भाग जप्त केल्याबद्दल) | | ४,००,००० | १,२०,०००<br>२,८०,००० |
| ८. | बँक खाते. ....................................................नावे<br>भाग जप्त खाते..... ...........................................नावे<br>समभाग भांडवल खात्याला<br>(जप्त करण्यात आलेले ४००० भागांचे पुन: निर्गमन प्रतिभाग ₹८० पूर्णदत्त म्हणून केल्याबद्दल) | | ३,२०,०००<br>८०,००० | ४,००,००० |
| ९. | भाग जप्त खाते.... ............................................नावे<br>भांडवल निधी खात्याला<br>(भाग जप्त खात्याची शिल्लक भांडवल निधीला स्थानांतरित केल्याबद्दल) | | २,००,००० | २,००,००० |

१५. **पराग कंपनी लि. चे विक्री झालेले भांडवल (अभिदत्त भांडवल Subcribed Capital) हे ३०,००० समभाग (Equity Shares) प्रतिभाग ₹ १०० आण ५०,००० पूर्वाधिकार भाग (Preference shares) प्रतिभाग ₹ १०० या प्रमाणे आहे. दोन्ही प्रकारच्या भागांवर ₹ ८० प्रतिभाग प्रमाणे मागणी करण्यात आलेली होती.**

आशिष या भागधारकानी प्रथम आणि द्‌वितीय याचना (हप्ता मागणी) राशी प्रति याचना प्रतिभाग ₹ २० प्रमाणे देणे असलेल्या राशीचे शोधन न केल्यामुळे संचालकांनी त्यांचेकडील ५०० समभाग (Equity shares)जप्त केले.

तसेच अशोक या भागधारकांनी आवंटनावर प्रतिभाग ₹ २०, प्रथम याचनेवर प्रतिभाग ₹ २० आणि अंतिम याचनेवर प्रतिभाग ₹ २० या राशींचा भरणा न केल्यामुळे त्याचे कडील ५०० पूर्वाधिकार भाग जप्त केले.

संचालकांनी आशिष या भागधारकांचे जप्त भाग प्रतिभाग ₹ ६०, ₹ ८० ला प्रतिभाग मागणी प्रमाणे आणि अशोकचे जप्त भाग प्रतिभाग ₹ ७२, ₹ ८० ला प्रतिभाग मागणी प्रमाणे पुनः निर्गमित केले (विकले) पुनः निर्गमित करण्यात आलेले सर्व भाग अंकिताने खरेदी केले. **पराग कंपनी लि.चे पुस्तकात भाग जप्त आणि पुनः निर्गमन संबंधीच्या कीर्द नोंदी द्या.**

**पराग कंपनी लि. चे पुस्तकात रोजकीर्द नोंदी**

| दिनांक | तपशील | खा. पा. | नावे रक्कम ₹ | जमा रक्कम ₹ |
|---|---|---|---|---|
| १. | समभाग भांडवल खाते. ........................................नावे | | ४०,००० | १०,००० |
| | समभाग प्रथम याचना खात्याला | | | १०,००० |
| | समभाग द्‌वितीय याचना खात्याला | | | २०,००० |
| | समभाग जप्त खात्याला | | | |
| | (५०० समभागांवर प्रथम आणि द्‌वितीय याचनेची राशी न मिळाल्यामुळे ते जप्त केल्याबद्‌दल) | | | |
| २. | पूर्वाधिकार भाग भांडवल खाते ..................................नावे | | ४०,००० | |
| | पूर्वाधिकार भाग आवंटन खात्याला | | | १०,००० |
| | पूर्वाधिकार भाग प्रथम याचना खात्याला | | | १०,००० |
| | पूर्वाधिकार भाग द्‌वितीय याचना खात्याला | | | १०,००० |
| | पूर्वाधिकार भाग जप्त खात्याला | | | १०,००० |
| | (५०० पूर्वाधिकार भागांवर आवंटन राशी प्रथम आणि द्‌वितीय याचना राशी न भरल्यामुळे ते जप्त करण्यात आल्याबद्‌दल) | | | |
| ३. | बँक खाते. ....................................................नावे | | ३०,००० | |
| | समभाग जप्त खाते............................................नावे | | १०,००० | |
| | समभाग भांडवल खात्याला | | | ४०,००० |
| | (प्रती भाग ₹ ६० प्रमाणे जप्त केलेल्या समभागांचे पुनः निर्गमन केल्यामुळे) | | | |
| ४. | बँक खाते.. ....................................................नावे | | ३६,००० | |
| | पूर्वाधिकार भाग जप्त खाते.....................................नावे | | ४,००० | |
| | पूर्वाधिकार भाग भांडवल खात्याला | | | ४०,००० |
| | (प्रतिभाग ₹ ७२ प्रमाणे ५०० पूर्वाधिकार जप्त भागांचे पुनःनिर्गमन केल्याबद्‌दल) | | | |
| ५. | समभाग जप्त खाते.............................................नावे | | १०,००० | |
| | पूर्वाधिकार भाग जप्त खाते.....................................नावे | | ६,००० | |
| | भांडवल निधी खात्याला | | | १६,००० |
| | (भाग जप्त खात्याची शिल्लक भांडवल निधीला स्थानांतरित केल्याबद्‌दल) | | | |

**१६. राकेश लि. ने २,००० भाग प्रतिभाग ₹ १०० प्रमाणे प्रतिभाग ₹ २० प्रव्याजीवर निर्गमित केले. त्यावर खालीलप्रमाणे प्रतिभाग रकमा देय होत्या.**

| | | |
|---|---|---|
| अर्जासोबत (प्रार्थना राशी) | ₹ | २० |
| आवंटनावर (वाटपावर) | ₹ | ५० (प्रव्याजी सह) |
| प्रथम याचना (प्रथम हप्ता मागणी) | ₹ | २० |
| अंतिम याचना (अंतिम हप्ता मागणी) | ₹ | ३० |

३००० भागांकरीता अर्ज प्राप्त झाले. त्यापैकी २४०० भागांसाठी अर्ज करणाऱ्यांना २००० भागांचे आवंटन (वाटप) करण्यात आले. उरलेल्या ६०० भागांचे अर्ज अस्वीकृत करण्यात आले आणि अर्जदारांना त्यांनी अर्जासोबत जमा केलेली राशी परत करण्यात आली.

अर्जासोबत प्राप्त अतिरिक्त राशीचे समायोजना आवंटनामध्ये करण्यात आले. सर्व येणे रकमा योग्य वेळी मिळाल्या. केवळ श्री. मंदार यांना ८० भागांचे आवंटन करण्यात आले होते, ते प्रथम याचना आणि अंतिम याचना राशी देण्यास अपयशी ठरले. त्यामुळे त्यांचेकडील भाग जप्त करण्यात आले आणि ते सर्व श्री. केतन यांना प्रतिभाग ₹ ८० पूर्वदत्त (Fully Paid) म्हणून पुनः निर्गमित करण्यात आले.

**राकेश कंपनी लि. चे पुस्तकात रोजकीर्द नोंदी द्या.**

उत्तर:

**राकेश लि. च्या पुस्तकात रोजकीर्द नोंदी**

| दिनांक | तपशील | खा. पा. | नावे रक्कम ₹ | जमा रक्कम ₹ |
|---|---|---|---|---|
| १. | बँक खाते.. ........................................नावे | | ६०,००० | |
| | समभाग प्रार्थना खात्याला | | | ६०,००० |
| | (३,००० भागांवर प्रतिभाग ₹ २० प्रमाणे प्रार्थना राशी मिळाल्याबद्दल) | | | |
| २. | समभाग प्रार्थना खाते........................................नावे | | ४०,००० | |
| | समभाग भांडवल खात्याला | | | ४०,००० |
| | (२,००० समभागांची प्रतिभाग ₹ २० प्रमाणे मिळालेली प्रार्थना राशी भांडवल खात्याला स्थानांतरित केल्याबद्दल) | | | |
| ३. | समभाग प्रार्थना खाते........................................नावे | | २०,००० | |
| | समभाग आवंटन खात्याला | | | ८,००० |
| | बँक खात्याला | | | १२,००० |
| | (४०० अतिरिक्त भागांवरील अर्ज राशी (प्रार्थना राशी)आवंटन खात्याला स्थानांतरित आणि ६०० भागांवरील अर्ज राशी परत केल्याबद्दल) | | | |
| ४. | समभाग आवंटन खाते. ........................................नावे | | १,००,००० | |
| | समभाग भांडवल खात्याला | | | ६०,००० |
| | भाग प्रव्याजी खात्याला | | | ४०,००० |
| | (२००० भागांवर प्रव्याजीसह ₹ ५० प्रमाणे आवंटन राशीची मागणी केल्याबद्दल) | | | |
| ५. | बँक खाते. ........................................नावे | | ९२,००० | |
| | समभाग आवंटन खात्याला | | | ९२,००० |
| | (समभाग आवंटन राशी प्राप्त झाल्याबद्दल) | | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ६. | समभाग प्रथम याचना खाते......................................नावे | | ४०,००० | |
| | समभाग भांडवल खात्याला | | | ४०,००० |
| | (२००० भागांवर प्रतिभाग ₹ २० प्रमाणे प्रथम याचना राशीची मागणी केल्याबद्दल) | | | |
| ७. | बँक खाते. ...................................................नावे | | ३८,४०० | |
| | समभाग प्रथम याचना खात्याला | | | ३८,४०० |
| | (१९२० भागांवर प्रतिभाग ₹ २० प्रमाणे प्रथम याचना राशी मिळाल्याबद्दल) | | | |
| ८. | समभाग अंतिम याजना खाते ...................................नावे | | ६०,००० | |
| | समभाग भांडवल खात्याला | | | ६०,००० |
| | (२००० समभागांवर प्रतिभाग ₹ ३० प्रमाणे अंतिम याचना केल्याबद्दल) | | | |
| ९. | बँक खाते. ...................................................नावे | | ५७,६०० | |
| | समभाग अंतिम याचना खात्याला | | | ५७,६०० |
| | (१९२० समभागांवर प्रतिभाग ₹ ३० प्रमाणे अंतिम याचना राशी मिळाल्याबद्दल) | | | |
| १०. | समभाग भांडवल खाते........................................नावे | | ८,००० | |
| | समभाग प्रथम याचना खात्याला | | | १,६०० |
| | समभाग अंतिम याचना खात्याला | | | २,४०० |
| | भाग जप्त खात्याला | | | ४,००० |
| | (८० भागांवर प्रथम आणि अंतिम याचना राशी प्राप्त न झाल्यामुळे भाग जप्त करण्यात आल्याबद्दल) | | | |
| ११. | बँक खाते. ...................................................नावे | | ६,४०० | |
| | समभाग जप्त खाते.............................................नावे | | १६०० | |
| | समभाग भांडवल खात्याला | | | ८,००० |
| | (जप्त केलेले ८० भाग प्रतिभाग ₹ ८० प्रमाणे पुनः निर्गमित केल्याबद्दल) | | | |
| १२. | भाग जप्त खाते. ...............................................नावे | | २,४०० | |
| | भांडवल निधी खात्याला | | | २,४०० |
| | (भाग जप्त खात्याची शिल्लक भाग भांडवल खात्याला स्थानांतरित केल्याबद्दल) | | | |

**१७. खालील व्यवहाराच्या रोजकीर्द नोंदी दर्शवा.**

अ) प्रतिभाग १०० ₹ मूल्य असलेल्या १०० निर्गमीत समभागांवर प्रतिभाग ₹ ३० प्रमाणे अंतिम हप्ता मागणी (अंतिम याचना) राशी न मिळाल्यामुळे प्रशांत ट्रेडींग कंपनी लि. ने ते सर्व भाग जप्त आणि ते ₹ ५० प्रतिभाग या प्रमाणे पूर्वदत्त भाग म्हणून पुनः निर्गमीत केले.

ब) स्वानंद कंपनी लि. ने १००० समभाग प्रतिभाग १० ₹ मूल्य असलेले ज्यांचे वरील प्रार्थना आणि आवंटन राशी क्रमशः प्रतिभाग ₹ २ आणि ₹ ४ प्रमाणे प्राप्त झाली. मात्र प्रथम हप्ता मागणीचे प्रती भाग ₹ २ प्रमाणे येणे बाकी असल्याने कंपनीने ते सर्व भाग जप्त केले आणि प्रतिभाग ₹ ५ याप्रमाणे ₹ ८ परिदत्त (Paid up) म्हणून पुनः निर्गमीत (Reissue) केले.

उत्तर:

रोजकीर्द नोंदी

| दिनांक | तपशील | खा. पा. | नावे राशी ₹ | जमा राशी ₹ |
|---|---|---|---|---|
| अ) | i) समभाग भांडवल खाते ......................................नावे | | १०,००० | |
| | समभाग अंतिम याचना खात्याला | | | ३,००० |
| | समभाग जप्त खात्याला | | | ७,००० |
| | (प्रतीभाग ₹ ३० प्रमाणे १०० समभागांवर अंतिम हप्ता मागणीची रक्कम न मिळाल्यामुळे ते भाग जप्त केल्याबद्दल) | | | |
| | ii) बँक खाते................................................नावे | | ५,००० | |
| | समभाग जप्त खाते............................................नावे | | ५,००० | |
| | समभाग भांडवल खात्याला | | | १०,००० |
| | (जप्त भाग प्रतीभाग ₹ ५० प्रमाणे पूर्णदत्त भाग म्हणून पुनः निर्गमित केल्याबद्दल) | | | |
| | iii) समभाग जप्त खाते ......................................नावे | | २,००० | |
| | भांडवल निधी खात्याला | | | २,००० |
| | (भाग जप्त खात्याची शिल्लक भांडवल निधीला स्थानांतरित केल्याबद्दल) | | | |
| ब) | i) समभाग भांडवल खाते ......................................नावे | | ८,००० | |
| | भाग जप्त खात्याला | | | ६,००० |
| | समभाग प्रथम याचना खात्याला | | | २,००० |
| | (प्रतिभाग ₹ २ प्रमाणे प्रथम याचनेची राशी न मिळालेमुळे १००० समभाग जप्त केल्याबद्दल) | | | |
| | ii) बँक खाते................................................नावे | | ५,००० | |
| | भाग जप्त खाते ............................................नावे | | ३,००० | |
| | समभाग भांडवल खात्याला | | | ८,००० |
| | (प्रतिभाग ₹ ५ प्रमाणे जप्त १००० भागांचे प्रतिभाग ₹ ८ परिदत्त भाग (Paid up share) म्हणून पुनःनिर्गमन केल्याबद्दल) | | | |
| | iii) भाग जप्त खाते..........................................नावे | | ३,००० | |
| | भांडवल निधी खात्याला | | | ३,००० |
| | (भाग जप्त खात्याची शिल्लक भांडवल निधी खात्याला स्थानांतरित केल्याबद्दल) | | | |

**१८. धनंजय इलेक्ट्रॉनिक कंपनी लि. ने प्रती भाग ₹ १० चे असे ५०० समभाग जप्त केले. ज्यांचे वर प्रतिभाग ₹ ६ प्रमाणे रक्कम मिळालेले होती. या सर्व भागांच्या पुनः निर्गमना संबंधीच्या रोजकीर्द नोंदी द्या, जर–**

**अ)** ते भाग पूर्णदत्त (fully paid up) म्हणून प्रतिभाग ₹ ८ प्रमाणे पुनः निर्गमीत केले.

ब) प्रतिभाग ₹ ८ प्रमाणे मागणी करण्यात आलेले/याचना केलेले भाग (called up shares) प्रतिभाग ₹ ७ प्रमाणे पुनः निर्गमीत केले.

क) ज्या भागांवर प्रतिभाग ₹ ७ प्रमाणे मागणी करण्यात आलेली होती, ते प्रतिभाग ₹ ५.५० प्रमाणे पुनः निर्गमीत करण्यात आले.

उत्तर:

**धनंजय इलेक्ट्रॉनिक कंपनी लि. चे पुस्तकात रोजकीर्द नोंदी**

| दिनांक | तपशील | खा. पा. | नावे रक्कम ₹ | जमा रक्कम ₹ |
|---|---|---|---|---|
| १. | समभाग भांडवल खाते ..........नावे | | ५,००० | |
| | थकीत हप्ता मागणी खात्याला/थकीत याचना खात्याला | | | २,००० |
| | भाग जप्त खात्याला | | | ३,००० |
| | (प्रतिभाग ₹ ४ प्रमाणे मागणी करण्यात आलेली राशी न मिळाल्यामुळे ५०० समभाग जप्त केल्याबद्दल) | | | |
| अ | i) बँक खाते..........नावे | | ४,००० | |
| | भाग जप्त खाते ..........नावे | | १,००० | |
| | समभाग भांडवल खात्याला | | | ५,००० |
| | (पूर्णदत्त भाग म्हणून प्रतिभाग ₹ ८ प्रमाणे ५०० भागांचे पुनः निर्गमन (विक्री) केल्याबद्दल) | | | |
| | ii) भाग जप्त खाते ..........नावे | | २,००० | |
| | भांडवल निधी खात्याला | | | २,००० |
| | (जप्त भाग खात्याची शिल्लक भांडवल निधी खात्याला स्थानांतरित केल्याबद्दल) | | | |
| ब) | i) बँक खाते..........नावे | | ३,५०० | |
| | भाग जप्त खाते ..........नावे | | ५०० | |
| | भाग भांडवल खात्याला | | | ४,००० |
| | (प्रतिभाग ₹ ७ प्रमाणे ५०० जप्त केलेले असे भाग ज्यांचे कडून प्रती भाग ₹ ८ प्रमाणे मागणी करण्यात आली होती ते पुनः निर्गमीत करण्यात आल्याबद्दल) | | | |
| | ii) भाग जप्त खाते ..........नावे | | २,५०० | |
| | भांडवल निधी खात्याला | | | २,५०० |
| | (भाग जप्त खात्याची शिल्लक भांडवल निधीला स्थानांतरित केल्याबद्दल) | | | |
| क) | i) बँक खाते..........नावे | | २,७५० | |
| | भाग जप्त खाते ..........नावे | | ७५० | |
| | भाग भांडवल खात्याला | | | ३,५०० |
| | (प्रतिभाग ₹ ५.५० प्रमाणे ५०० जप्त भागांची पुनः विक्री (निर्गमन) करण्यात आली. ज्यांचेकडे प्रतिभाग ₹ ७ या प्रमाणे याचना करण्यात आलेली होती.) | | | |
| | ii) भाग जप्त खाते ..........नावे | | २,२५० | |
| | भांडवल निधी खात्याला | | | २,२५० |
| | (भाग जप्त खात्याची शिल्लक भांडवल निधीला स्थानांतरित केल्याबद्दल) | | | |

## स्वाध्याय : ८

**प्रश्न: १ वस्तुनिष्ठ प्रश्न**

**अ) खालील दिलेल्या पर्यायामधून योग्य पर्यायाची निवड करा आणि विधाने पुन्हा लिहा.**

१) भागांचे पुनः निर्गमन (Reissue of shares) केल्यानंतर जप्त भाग खात्याची शिल्लक .......................... खात्याला स्थानांतरित केली जाते.

अ) राखीव भांडवल  ब) भांडवल निधी  क) नफा-तोटा  ड) भाग भांडवल

२) भाग निर्गमनावरील प्राप्त प्रव्याजी (Premium) ही.................दर्शवली जाते.

अ) ताळेबंदाचे देयता बाजूवर  ब) ताळेबंदाचे संपत्ती बाजूवर

क) नफो-तोटा खाते नावे बाजूवर  ड) नफा तोटा खाते जमा बाजूवर

३) भाग धारकांना भागांवर (on shares)..................प्राप्त होतो.

अ) व्याज  ब) वर्तन (Commission)

क) भाडे  ड) लाभांश

४) .................ह्या दस्तऐवजा द्वारे जनतेला भागांची (Shares) खरेदी करण्याचे निमंत्रण दिले जाते.

अ) माहिती पत्रक  ब) घटना पत्रक

क) अंतर्गत नियमावली  ड) भाग प्रमाणपत्र

५) भारतीय सुरक्षा विनिमय मंडळ (SEBI) चे मार्गदर्शक तत्त्वानुसार भाग अर्जासोबत कमीत कमी त्याच्या नाममात्र मूल्याच्या................ एवढी राशी देय असावी.

अ) १०%  ब) १५%  क) २%  ड) ५%

६) जेव्हा भाग जप्त करण्यात येतात तेव्हां भाग भांडवल खाते ...............केले जाते.

अ) जमा  ब) नावे

क) जमा आणि नावे दोन्ही देखील केले जात नाही  ड) वरील पैकी काहीही नाही.

७) संयुक्त स्कंध प्रमंडळामध्ये भागधारकांची जबाबदारी (दायित्व) ही ..................असते.

अ) संयुक्त आणि अनेकांची (Joint Sevral)  ब) मर्यादित

क) अमर्यादित  ड) खूप जास्त (Huge)

८) प्रमंडळाचे घटनापत्रकानुसार निर्गमनाकरिता अधिकृत करण्यात आलेले भांडवल म्हणजे..........होय.

अ) नाममात्र भांडवल (Nomina capital/अधिकृत भांडवल

ब) निर्गमित (विक्रीस काढलेले) भांडवल (Issued Capital)

क) परिदत्त (वसूल झालेले) भांडवल (Paid up Capital)

ड) राखीव भांडवल (Reserve Capital)

९) आवंटन आणि याचने वर न भरण्यात आलेली राशी.....................खात्याला स्थानांतरित केली जाते.

अ) पूर्व प्राप्त याचना (Call in Advance)  ब) याचना (Call)

क) थकीत याचना (Call in Arrears)  ड) आवंटन

१०) भाग जप्ती संबंधीची तरतूद ही ................मध्ये असणे आवश्यक आहे.

अ) अंतर्गत नियमावली (Articles of association) ब) घटना पत्रक

क) माहिती पत्रक ड) ताळेबंद

**ब) खालील प्रत्येक विधानांकरिता एक शब्द/संज्ञा किंवा शब्द समूह द्या.**

१) भागांची (shares) अशी रक्कम जिची मागणी करण्यात आली परंतु प्राप्त झाली नाही.

२) भागांचे (shares) दर्शनी मूल्यांवर निर्गमन

३) प्रमंडळाचे भाग (shares) खरेदी करणारी व्यक्ती

४) व्यवसाय संघटनेचे असे स्वरूप जिथे मोठ्या प्रमाणात भांडवल उभारणे शक्य होते.

५) असे भांडवल जे जनतेकडून खरेदी केले गेले.

६) कंपनी समापन प्रसंगी प्रथमाधिकार प्राप्त करणारे भाग

७) असे भाग ज्यांचेवर लाभांशाची रक्कम निश्चित नसते.

८) अभिदत्त (विक्रीत Subscribed capital) भांडवलाचा असा भाग ज्याची कंपनी द्वारे मागणी करण्यात आलेली नाही.

**क) खालील विधाने बरोबर की चूक सकारण सांगा.**

१) संचालक कोणत्याही कारणासाठी भाग जप्त करू शकतात.

२) एकदा का भाग अर्जाची रक्कम प्राप्त झाली की संचालक ताबडतोब भाग वाटपाची प्रक्रिया सुरू करू शकतात.

३) औद्योगिक क्रांतीनंतर संयुक्त स्कंध प्रमंडळ हा व्यवसाय प्रारूप अस्तित्वात आला.

४) समभाग धारकांना दरवर्षी एका निश्चित दराने लाभांश मिळतो.

५) भागांचे बाजार मूल्य आणि दर्शनी मूल्य (Face Value) नेहमीच सारखे असते.

६) अतिरिक्त श्रम भाग (Sweat shares) जनतेला निर्गमित केले जातात.

**ड) खालील विधानांशी आपण सहमत आहात किंवा असहमत आहात ते सांगा.**

१) भागांचे आनुपातीक प्रमाणात आवंटन (Pro-rata allotmet) करण्यात आले असेल तर अतिरिक्त भाग अर्जासोबत प्राप्त रक्कम ही परत केली जाते.

२) पूर्व-प्राप्त याचना खाते (call in advance) हे ताळेबंदाचे संपत्ती बाजूवर दर्शविले जाते.

३) अधिकृत भाग भांडवल हे नाम मात्र भाग भांडवल म्हणून देखील ओळखले जाते.

४) परिदत्त (वसूल) भांडवल (Paid up captial) हे याचीत (मागणी केलेल्या) भांडवला पेक्षा (Called up capital) जास्त असू शकते.

५) संयुक्त स्कंध प्रमंडळ मोठ्या प्रमाणात भांडवल उभारणी करू शकते.

६) जेव्हां भाग जप्त केले जातात तेव्हां भाग भांडवल खाते जमा केले जाते.

७) संचालक जप्त केलेले भाग पुनः निर्गमित करू शकतात.

८) भागाचे दर्शनी मूल्य १० असतांना ते भाग रु. १२ प्रमाणे निर्गमित करण्यात येत असतील तर भागांचे प्रव्याजीवर निर्गमन असे म्हटले जाते.

९) सार्वजनिक लि. कंपनी माहिती पत्रका शिवायदेखील भागांचे निर्गमन करू शकते.

१०) रोख प्रतिफलाशिवायदेखील भागांचे निर्गमन केले जाऊ शकते.

## इ) केवळ एका वाक्यात उत्तर द्या.

१) पूर्वाधिकार भाग म्हणजे काय?

२) नोंदणीकृत भांडवल (Registered capial) म्हणजे काय?

3) भांडवल निधी म्हणजे काय?

४) भागांचे अत्याधिक अंशदान (over subscription of shares) म्हणजे काय?

५) भागांवरील (shares) प्रथम हप्ता मागणीची (याचनेची) राशी प्राप्त झाली असता कोणते खाते नावे केले जाते?

६) आनुपातीक प्रमाणाचे (सप्रमाण Pro-rata) आधारे भागांचे वाटप (आवंटन) केव्हा केले जाते?

७) भाग जप्ती म्हणजे काय?

८) अप्राप्त याचना (Call in arrears/थकीत हप्ता मागणी) म्हणजे काय?

९) भागांचे प्रव्याजीवर (Premium अधिमूल्यावर) निर्गमन यापासून आपणाला काय अर्थ बोध होतो.

१०) परिदत्त(Paid - up/वसूल) भांडवल म्हणजे काय?

## फ) खालील विधाने पूर्ण करा.

१) ₹ १०० दर्शनी मूल्याच्या भागाचे ₹ १२० या मूल्यावर निर्गमन केले असता त्याला................भागांचे निर्गमन असे म्हणतात.

२) ...............भांडवल म्हणजे असे भांडवल जे घटनापत्रकाद्वारे निर्गमीत करण्याकरिता अधिकृत केलेले असते.

३) मागणी केलेले भांडवल आणि वसूल झालेले भांडवल यामधील फरकाला.................असे म्हणतात.

४) ................भागधारक हे एका निश्‍चित दराने लाभांश प्राप्त करतात.

५) ................ भागधारक हेच प्रमंडळाचे खरे मालक असतात.

६) ....................हे व्यवसायाचे असे स्वरूप होय ज्यामध्ये भागांचे (Shares) माध्यमाने भांडवलाची उभारणी करता येते.

७) ........................निर्गमीत भाग भांडवलाचा असा भाग जो जनतेने प्रत्यक्षात खरेदी केलेला असतो.

८) अधिकृत भांडवलाचा असा भाग जो जनतेस निर्गमीत केला जात नाही त्यास.............. भांडवल असे समजले जाते.

## ग) खालील संबंधीची गणना करा. (Calculate the following)

१) ५०० भाग धारण करणाऱ्या एका भागधारकान भाग अर्जावर प्रतिभाग ₹ ३ आवंटनावर प्रतिभाग ₹ ४ या प्रमाणे भरणा केला, मात्र प्रतिभाग ₹ ३ प्रमाणे अंतिम याचना राशी भरण्यास अपयशी ठरल्यामुळे त्याचे कडील भाग जप्त करण्यात आले. **भाग जप्तीच्या रकमेची गणना करा.**

२) प्रतिभाग ₹ १० मूल्य असलेल्या १०,००० समभागांचे १०% प्रव्याजीवर निर्गमन करण्यात आले.

एकूण **भाग प्रव्याजीच्या रकमेची गणना करा –**

३) प्रमंडळाला ५००० अतिरिक्त भागांकरिता प्रतिभाग ₹ ४ प्रमाणे अर्ज प्राप्त झाले. त्यापैकी १००० भागांचे अर्ज अस्वीकृत करण्यात आले व आनुपातीक प्रमाणात आवंटन करण्यात आले.

**आवंटनामध्ये समायोजित करण्यात येणाऱ्या भाग अर्जाच्या राशीची गणना करा.**

४) ८०,००० समभाग प्रत्येकी ₹ १० सममूल्य असलेले २०% प्रव्याजीवर निर्गमीत करण्यात आले. त्यांचे वरील येणे असलेली सर्व राशी प्राप्त झाली.

**समभाग भांडवलाच्या राशीची गणना करा.**

५) प्रतिभाग ₹ १०० सममूल्य असलेले २०,००० समभाग संचालकांनी निर्गमित केले. निर्गमीत सर्व भागांसाठी अर्ज प्राप्त झाले. आणि सर्व याचनादेखील करण्यात आल्या.

१०० भाग धारण करणारा एक भागधारक जो अंतिम याचना प्रतिभाग ₹ २० प्रमाणे असलेली भरण्यास अपयशी ठरला तो सोडून अन्य सर्व रकमा मिळाल्या.

प्रमंडळाकडे वसूल झालेल्या भांडवलाची (Paid up capital) गणना करा.

६) कंपनीने १०० भागांकरिता खेद पत्र (Regret letter) आणि २५००० भागांकरिताचे आवंटन पत्र भागधारकांना पाठविले.

अर्जासोबत प्रती भाग ₹ २० देय होते.

कंपनी द्वारे परत पाठविण्यात येणाऱ्या अर्ज राशीची गणना करा.

## प्रात्यक्षिक उदाहरणे

१. **विजय लि. ने १५,००,००० रुपयाचे अधिकृत भांडवल प्रतिभाग ₹. १० प्रमाणे १,५०,००० समभागांमध्ये विभाजीत करून कंपनीची नोंदणी केली. कंपनीने प्रतिभाग ₹ १० चा ₹ २ प्रव्याजीसह १,००,००० भागांचे निर्गमन केले. कंपनीला ८०,००० भागांसाठी अर्ज आलेत आणि त्या सर्व भागांचे आवंटन करण्यात आले. कंपनीला खालील प्रमाणे प्रतिभाग राशी प्राप्त होणार आहे.**

| | | |
|---|---|---|
| अर्जासोबत | रु. ३ | |
| आवंटनावर | रु. ४ | (प्रव्याजी सह) |
| प्रथम याचनेवर | रु. ३ | |

संचालकांनी अंतिम भाग याचना केली नाही.

५०० भाग धारण करणारा एक भाग धारक ज्यांनी प्रथम याचनेची राशी भरली नाही तो सोडून सर्व येणे राशी प्राप्त झाली.

**कंपनीचे ताळेबंदामध्ये अधिकृत भांडवल, निर्गमीत भांडवल, अभिदत्त भांडवल (Subcribed capital), याचित (मागणीकेलेले) भांडवल, परिदत्त (वसूल झालेले Paid-up capital) भांडवल, थकीत मागणी आणि भाग प्रव्याजी संबंधी रकमेच्या नोंदी दर्शवा.**

**उत्तर :** थकीत मागणी – ₹ १,५००, भाग प्रव्याजी – ₹ १,६०,००० वसूल भांडवल – ₹ ६,३८,५००,
ताळेबंद बेरीज – ₹ ७,९८,५००

२. **आनंद कंपनी लि. ने प्रतिभाग ₹ १० प्रमाणे देय असलेले १,००,००० पूर्वाधिकार भागांचे निर्गमन केले. त्यावर खालील प्रमाणे प्रतिभाग रक्कम देय आहे.**

| | |
|---|---|
| अर्जासोबत | ₹ ४ |
| आवंटनावर | ₹ ३ |
| प्रथम याचना | ₹ २ |
| द्वितीय आणि अंतिम याचना | ₹ १ |

कंपनी ला सर्व भागांकरिता अर्ज प्राप्त झाले आणि येणे असलेल्या सर्व रकमा मिळाल्या.

**आनंद कंपनी लि. चे पुस्तकात आवश्यक रोजकिर्द नोंदी द्या.**

३. **रोहिणी कंपनी लि. ने प्रत्येकी ₹ १००चे २५,००० समभाग विक्रीस काढले (निर्गमित केले) त्यावर खालील प्रमाणे प्रतिभाग रक्कम देय आहे.**

| | |
|---|---|
| अर्जासोबत | ₹ २० |
| आवंटनावर | ₹ ३० |
| प्रथम याचनेवर | ₹ २० |
| द्वितीय आणि अंतिम याचनेवर | ₹ ३० |

२२,००० समभागांकरीता अर्ज आले, आणि त्यांना आवंटन करण्यात आले. कंपनीला येणे असलेल्या सर्व रकमा मिळाल्या. **रोहीणी कंपनी लि. चे पुस्तकात रोजकीर्द नोंदी करा.**

**उत्तर :** अर्जासोबत – ₹ ४,४०,०००, आवंटन – ₹ ६,६०,०००, प्रथम याचना – ₹ ४,४०,०००, अंतिम याचना – ₹ ६,६०,०००

४. **दीपक मॅन्युफॅक्चरींग कंपनी लि. ने आपले माहिती पत्रकाचे निर्गमन करून प्रत्येकी ₹ १०च्या १,००,००० भागांचे खरेदी करीता जनतेला निमंत्रित केले. भागांवर प्रतिभाग देय राशी पुढीलप्रमाणे होती.**

| | |
|---|---|
| अर्जासोबत | ₹ २ |
| आवंटनावर | ₹ ४ |
| प्रथम हप्ता मागणीवर (याचनेवर) | ₹ २ |
| अंतिम हप्ता मागणीवर (याचनेवर) | ₹ २ |

१,२०,००० भागांकरिता अर्ज प्राप्त झाले. संचालकांनी जास्तीचे आलेले अर्ज नाकारून त्यांची अर्जासोबत मिळालेली राशी परत केली. कंपनीला येणे असलेल्या सर्व रकमा मिळाल्या. **कंपनीच्या पुस्तकात आवश्यक रोजकिर्द नोंदी द्या.**

**उत्तर :** परत करण्यात आलेली राशी – ₹ ४०,०००

५. **सुचेता कंपनी लि. ने ₹ २०,००,००० चे नवीन भाग भांडवल जे प्रत्येकी ₹ १००च्या प्रतिभागात विभाजित असलेले प्रतिभाग ₹ २० प्रव्याजीवर निर्गमित केले (विक्रीस काढले) भागांवर देय राशी पुढील प्रमाणे –**

| | |
|---|---|
| अर्जासोबत (प्रार्थनेवर) | ₹ १० |
| आवंटनावर (वाटपावर) | ₹ ४० आणि ₹ १० प्रव्याजीचे |
| अंतिम याचना (अंतिम हप्ता मागणी) | ₹ ५० आणि ₹ १० प्रव्याजीचे |

निर्गमित भागांपेक्षा जास्त म्हणजे २६००० भागांकरिता अर्ज प्राप्त झाले. २००० भागांकरिता आवेदनकर्त्यांना खेद पत्रासह त्यांचेकडून अर्जासोबतची प्राप्त राशी परत करण्यात आली.

राहिलेल्या अर्जदारांना अनुपातीक प्रमाणात (Pro-rata basis) भागांचे आवंटन करण्यात आले.

आवंटनावरील आणि अंतिम याचनेची संपूर्ण राशी योग्य वेळी मिळाली.

**सुचेता कंपनी लि. चे पुस्तकात आवश्यक रोजकिर्द नोंदी करा.**

**उत्तर :** परत करण्यात आलेली अर्ज राशी – ₹ २०,०००, आवंटनामध्ये समयोजित – ₹ ४०,०००

६. **सुहास लि. ने १०,००० समभाग प्रत्येकी ₹ १० चा प्रतिभाग ₹ २ प्रव्याजीवर निर्गमित केले. भागांवर देय राशी पुढीलप्रमाणे**

| | |
|---|---|
| **अर्जासोबत** | ₹ ३ |
| आवंटनावर | ₹ ५ (प्रव्याजी सह) आणि उरलेली राशी दोन समान हप्त्यामध्ये मागविली. |

११,००० समभागांकरिता अर्ज मिळाले. त्या सर्वांना आनुपातीक प्रमाणामध्ये (Pro-rata basis) आवंटन करण्यात आले. जास्तीच्या अर्जासोबत प्राप्त झालेल्या राशीचे समायोजन आवंटन राशीमध्ये करण्यात आले.

श्रीमती शोभाला २०० भागांचे आवंटन करण्यात आले होते ती प्रथम आणि अंतिम याचना राशी भरण्यास अपयशी ठरल्यामुळे अंतिम याचनेनंतर तिचे कडील भाग जप्त करण्यात आले.

**सुहास लि. चे पुस्तकात रोजकीर्द नोंदी द्या आणि ताळेबंदामध्येदेखील प्रस्तुतीकरण दर्शवा.**

**उत्तर :** जप्त राशी – ₹ १,२००, ताळेबंदाची बेरीज – ₹ १,१९,२००

७. **सुभाष कंपनी लि. ने प्रत्येकी ₹ १००चा असे २००० समभाग विक्रीस काढले त्यावरील देय राशी प्रतिभाग पुढीलप्रमाणे आहे.**

| | |
|---|---|
| प्रार्थनेवर (on Application) | ₹ ३० |
| आवंटनावर | ₹ ३० |
| प्रथम आणि अंतिम याचनेवर | ₹ ४० |

सर्व भागांकरिता अर्ज प्राप्त झाले आणि त्यांचे आवंटनदेखील करण्यात आले. योग्य वेळी सर्व हप्त्यांच्या राशीची मागणी केली गेली.

१०० भागांवरील प्रथम आणि अंतिम याचनेची राशी सोडून सर्व राशी योग्य वेळी मिळाली. ज्या भागांवर अंतिम याचना राशी मिळाली नाही ते भाग जप्त करण्यात आले आणि तदनंतर ते रु. ७५ प्रतिभाग प्रमाणे पूर्णदत्त भाग म्हणून पुनः निर्गमित करण्यात आले.

**सुहास कंपनी लि. चे पुस्तकात रोजकीर्द नोंदी द्या.**

**उत्तर :** जप्त राशी – ₹ ६,०००, भांडवल निधी – ₹ ३,५००

८. **खालील प्रकरणांमध्ये भाग जप्त आणि भाग पुनःनिर्गमन संबंधीच्या रोजकीर्द नोंद द्या –**

अ) आशा लि. ने प्रतिसमभाग ₹ २०चे १०० भाग ज्यांचेवर सर्व याचना करण्यात आल्या होत्या. या भागांवर प्रथम याचना प्रतिभाग ₹ ३ आणि अंतिम याचना प्रतिभाग ₹ ५ प्रमाणे न मिळाल्यामुळे ते जप्त केले यापैकी ८० भाग प्रतिभाग ₹ १५ प्रमाणे पूर्णदत्त भाग म्हणून पुनः निर्गमन करण्यात आले.

ब) भक्ती लि. ने प्रतिभाग ₹ १० मूल्याचे १०० समभाग जप्त केले. ज्यावर प्रतिभाग ₹ ६ प्रमाणेची मागणी करण्यात आलेली होती. या भागधारकाने अर्ज राशी आणि आवंटन राशी प्रतिभाग ₹ ५ प्रमाणेचा भरणा केलेला होता. या भागांपैकी ८० भाग प्रतिभाग ₹ ६ प्रमाणे पूर्णदत्त म्हणून पुनःनिर्गमित करण्यात आले.

क) कोणार्क लि. ने प्रतिभाग ₹ १० मूल्याचे ५० भाग जप्त केले. ज्याचेवर ₹ ८/– प्रतिभाग प्रमाणे मागणी करण्यात आलेली होती. हा भागधारक प्रथम याचना प्रती भाग ₹ ३ प्रमाणे देण्यास अपयशी ठरला होता.
जप्त भागांपैकी ३० भागांचे प्रतिभाग ₹ ७ प्रमाणे पुनःनिर्गमन करण्यात आले.

**उत्तर :** अ) जप्त रक्कम – ₹ १२००, भांडवल निधी – ₹ ५६० ब) जप्त रक्कम – ₹ ५००, भांडवल निधी – ₹ ४००
क) जप्त रक्कम – ₹ २५०, भांडवल निधी – ₹ १२०

**विद्यार्थी कृती :**

१) भाग विक्री करिता निर्गमित करण्यात आलेल्या कोणत्याही कंपनीचे माहिती पत्रक (Prospectus) मिळवा आणि त्या माहिती पत्रकामधे उल्लेखीत कार्यपद्धती संबंधीचा अहवाल लिहा.

२) कोणत्याही स्कंध दलालाचे कार्यालयाला भेट द्या आणि डीमॅट खात्याद्वारे भागांच्या खरेदी-विक्रीच्या कार्यपद्धतीची माहिती जाणून घ्या.

# ९. वित्तीय विवरणांचे विश्लेषण
## (Analysis of Financial Statement)

**अभ्यास घटक**

९.१ वित्तीय विवरणांचा अर्थ, उद्देश आणि मर्यादा.

९.२ वित्तीय विवरण विश्लेषणांची साधने.

९.२.१ (अ) तुलनात्मक विवरणे

९.२.२ (ब) सामान्य आकाराची विवरणे

९.२.३ (क) रोख प्रवाह विश्लेषण

९.३ लेखांकीय अनुपातांचा अर्थ, उद्देश आणि वर्गीकरण.

**अनुपाताचे वर्गीकरण :**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| (अ) | ताळेबंद अनुपात (Balance Sheet Ratio) | : | (१) | चल अनुपात (Current Ratio) |
| | | | (२) | तरल अनुपात (Liquid Ratio) |
| (ब) | उत्पन्न विवरण अनुपात (Income Statement Ratio) | : | (१) | सकल लाभ अनुपात (Gross Profit Ratio) |
| | | | (२) | परिचालन लाभ अनुपात (Operating Profit Ratio) |
| | | | (३) | शुद्‌ध लाभ अनुपात (Net Profit Ratio) |
| | | | (४) | परिचालन अनुपात (Operating Ratio) |
| (क) | संयुक्त अनुपात (Combined Mixed Ratio) | : | (१) | गुंतविलेल्या भांडवलावर प्राप्ती (Return On Capital Employed (ROCE)) |
| | | | (२) | गुंतवणुकीवर प्राप्ती (Return on Investment) (ROI) |

**क्षमता विधाने :**

❑ *या प्रकरणाचा अभ्यास केल्यानंतर विद्यार्थी सक्षम होतील :*

- *वित्तीय विवरण विश्लेषणांचा अर्थ,उद्देश आणि मर्यादा जाणून घेण्यास समर्थ होतील.*
- *वित्तीय विवरण विश्लेषणांची साधने समजतो.*
- *सामान्य आकाराची तुलनात्मक विवरणे आणि रोख प्रवाह विवरणे विद्यार्थ्यांना तयार करता येतील.*
- *लेखांकीय आणि विश्लेषणात्मक अनुपातांचा अर्थ,उद्देश आणि वर्गीकरणाची माहिती विद्यार्थ्यांना मिळेल.*

### ९.१ अर्थ(Meaning)

वित्तीय विवरणे नियमितपणे तयार करावेच लागतात. सामान्यतः व्यवहारांची संपूर्ण माहिती आर्थिक वर्षाच्या शेवटी खातेवहीत लिहून त्यांचे वित्तीय विवरणात विश्लेषण केले जाते.

“व्यावसायिकाकडून व्यवसायाची नफ्याची क्षमता, शोधन क्षमता प्रगतीचा अदांज बांधण्यासाठी आणि वित्तीय शक्ती व स्तर शोधण्यासाठी जी विवरणे तयार केली जातात त्यांना वित्तीय विवरणे म्हणतात.”

अशी विवरणे व्यवसायाची वित्तीय स्थिती व प्रबंधकीय कामगिरीचे पूर्ण चित्र स्पष्टपणे दर्शवितात.

वित्तीय विवरणे ही नफा उद्देश असलेल्या संस्था तसेच नफ्याचा उद्देश नसलेल्या संस्थासुद्धा तयार करतात.

**दोन महत्त्वाची विवरणे :**

(१) ताळेबंद/ स्थिती विवरण (Balance Sheet / Position Statement).

(२) नफा तोटा खाते / उत्पन्नाचे विवरण (Profit & Loss Account/Income Statement))

वित्तीय विवरणांचे विश्लेषणात दोन पैलू असतात.

(अ) विश्लेषणात्मक माहिती : वित्तीय विवरणांच्या माहितीचे वर्गीकरण पद्धतशीरपणे सादर केली जाते.

(ब) माहितीचे पृथ:करण म्हणजे अर्थ आणि महत्त्वाचे स्पष्टीकरण होय.

वरील दोन्ही पैलू एक दुसऱ्याला पूरक असतात.

**वित्तीय विवरणांचे उद्देश (Objectives of Financial Statement Analysis):**

वित्तीय विवरण हे वित्तीय माहितीचे स्रोत असून या माहितीचा भागधारक, गुंतवणूकदार, कामगार पुरवठा करणारे मक्तेदार आणि कर अधिकारी इ. लोकांना उपयोग होतो. :

(१) नियोजन करण्यासाठी मदत होते.

(२) व्यवसायाला उत्पन्नाचा अंदाज लावण्यास सहाय्य करते.

(३) गुंतवणुकीबाबत निर्णय घेण्यासाठी सहाय्य करते.

(४) व्यवस्थापनाला आपल्या व्यवसायाची कार्यक्षमता वाढविण्यास मदत होते.

(५) वित्तीय विवरणामुळे आर्थिक संसाधनाची माहिती प्रदान होते.

(६) व्यवसायिक कृती शिवाय निव्वळ संसाधनामध्ये बदल करण्यासाठी महत्त्वाची माहिती पुरविणे.

(७) वित्तीय विवरणांचा वापर करणाऱ्या पक्षांना व्यवसायाशी संबंधित माहिती उघड करता येते.

वित्तीय विवरणामुळे व्यवसायाची वित्तीय कामगिरी व वित्तीय स्थितीत होणारे बदल हे वित्तीय विवरणांचा वापर करणाऱ्या पक्षांना आर्थिक निर्णय घेण्यासाठी उपयुक्त ठरते.

**वित्तीय विवरणांच्या मर्यादा (Limitations of Financial Statement Analysis ):**

व्यवसायाच्या वित्तीय स्थितीची शक्ती, कमतरता आणि कृतीची पडताळणी करण्यासाठी वित्तीय विवरणे ही एक सक्षम यंत्रणा आहे.

व्यवसायाच्या वित्तीय विवरणाचे विश्लेषण हे व्यवसायाच्या वित्तीय विवरणात व्यवसायाचे आर्थिक निर्णय आणि वित्तीय परिस्थितीच्या माहितीवर अवलंबून असते.

**वित्तीय विवरण विश्लेषणाला खालील मुख्य मर्यादा पडतात.**

(१) **अपूर्ण आणि अचूक माहिती :** वित्तीय विवरणे फक्त अंतरिम अहवाल दाखविते. अचूक नफा-तोटा आणि वित्तीय स्थिती ही विवरणे बंद केल्यानंतरच व्यवसायिकाला माहिती होते. म्हणून वित्तीय विवरणातून मिळणारी माहिती ही परिपूर्ण आणि अचूक असतेच असे नाही.

(२) **ऐतिहासिक माहिती :** वित्तीय विवरणाकडून पुरविली गेलेली माहिती ही ऐतिहासिक स्वरूपाची असते. कारण ही माहीती ऐतिहासिक किंमती आणि संपत्तीच्या पुस्तकी मूल्याच्या आधारावर तयार केलेली असते. ही माहिती किंमत पातळीत झालेले बदल लक्षात घेत नाही.

(३) **लेखांकीय संकल्पना आणि परंपरेवर आधारित :** वित्तीय विवरणे ही लेखांकीय संकल्पना आणि परंपरेच्या आधारावर तयार केली जातात. त्यामुळे याचा अर्थ असा की, ही विवरणे सत्यतेपासून खूप दूर असून विवरणांचे विश्लेषणाचा जास्त उपयोग केला जात नाही.

**(४) वैयक्तिक निर्णयाचा प्रभाव :** व्यवसायाचे वैयक्तिक निर्णय हे वित्तीय विवरणांच्या निष्कर्षांना प्रभावित करतात अशा अनेक बाबी असतात की जे लेखापाल ठरवित असतो जसे, **उदा.** घसारा पद्धती, स्कंधाचे मूल्यांकन, अस्थागत खर्च ठरविणे इ.

**(५) अतुलनीय अस्तित्व :** वित्तीय विवरण अतुलनीय तयार करण्यासाठी विवरण तयार करण्याच्या तारखेत केलेला बदल, व्यवसायाचे स्वरूप आणि लेखांकनाची पद्धती यामुळे वित्तीय विवरण अतुलनीय करण्यासाठी मर्यादा पडतात.

**(६) स्थिर विवरण :** वित्तीय विवरणाचे स्वरूप स्थिर असते. ते व्यवसायाची परिपूर्ण आकडेवारी दर्शवितात. तसेच ही विवरणे ही आकडेवारी कोठून आलेली आहे याची प्रक्रिया सादर करीत नाही.

**(७) आकर्षक मांडणीचा परिणाम :** काही वेळेला व्यवस्थापन वित्तीय विवरणातून दिखाऊ चित्र प्रदर्शित करतात यामुळे व्यवसायाचा उत्तम नफा दाखविण्यासाठी विक्रीमध्ये वाढ, सवंरण स्कंधाचे अधिमूल्यन आणि वर्षअखेरची खरेदी दाखविली जात नाही यालाच आकर्षक मांडणीचा परिणाम असे म्हणतात. वरील सर्व मर्यादामुळे वित्तीय विवरण विश्लेषणावरून व्यवसायाची खरी आर्थिक शक्ती किंवा दुर्बलता मिळविता येत नाही. या सर्व मर्यादांचा विचार करून व्यवसायाचा वित्तीय विवरण विश्लेषणाच्या आधारे व्यवसाया बाबतचे निर्णय घ्यावेत.

**उभ्या ताळेबंदाचा नमूना**

| तपशील | रक्कम (₹) | रक्कम (₹) |
|---|---|---|
| १) **निधीचे स्रोत** | | |
| १) **मालकीचा निधी / भागधारकांचा निधी.** | | |
| अ) **भाग भांडवल** | | |
| सम/सामान्य भाग भांडवल | XXX | |
| अग्रहक्क भाग भांडवल | XXX | |
| | XXXX | |
| ब) **संचिती व वाढावा** | | |
| नफा आणि तोटा | XXX | |
| राखीव निधी | XXX | |
| प्रतिभूती वाढावा | XXX | |
| | XXXX | |
| क) **(–) काल्पनिक संपत्ती** | XXX | XXX |
| स्वनिधी/एकूण उपलब्ध निधी | | |
| २) **कर्जाऊ निधी** | | |
| बँक कर्ज | XXX | |
| कर्ज रोखे | XXX | XXXX |
| एकूण उपलब्ध निधी | | XXXX |
| **निधीचा उपयोग :** | | |
| १) **स्थिर संपत्ती** | | |
| भूमी व इमारत | | XXXX |
| यंत्र आणि सयंत्र | | XXXX |
| फर्निचर | | XXXX |
| मोटार वाहन | | XXXX |

| | | |
|---|---|---|
| २) **गुंतवणूक** | | XXXX |
| ३) **खेळते भांडवल** | | |
| चल संपत्ती | XXX | |
| तरल संपत्ती | XXX | |
| रोकड | XXX | |
| बँक | XXX | |
| ऋणको | XXX | |
| प्राप्य विपत्र | XXX | |
| एकूण तरल संपत्ती | XXXX | |
| **अतरल संपत्ती** | | |
| माल साठा (स्कंध) | XXX | |
| पूर्वदत्त खर्च | XXX | |
| अग्रीम | XXX | |
| एकूण अतरल संपत्ती | XXXX | |
| एकूण चल संपत्ती | XXXX | |
| **(–) चल देयता** | | |
| तरल देयता | XXX | |
| धनको | XXX | |
| देयविपत्र | XXX | |
| एकूण चल देयता | XXX | |
| अतरल देयता | | |
| अधिकोष अधिविकर्ष | XXXX | |
| खेळते भांडवल (चल संपत्ती – चल देयता) | | XXXX |
| **एकूण निधीचा उपयोग / वापर** | | |

## उदाहरणे

**१. खालील दिलेल्या ताळेबंदाचे रूपांतरण उभ्या ताळेबंदात करा.**

**ताळेबंद ३१ मार्च २०१९ रोजीचा**

| देयता | रक्कम (₹) | संपत्ती | रक्कम (₹) |
|---|---|---|---|
| भांडवल | ५०,००० | स्थिर संपत्ती | ६०,००० |
| राखीव | १५,००० | गुंतवणूक | १०,००० |
| १२% कर्ज | ३०,००० | चल संपत्ती | ५५,००० |
| चल देयता | ३०,००० | | |
| | १,२५,००० | | १,२५,००० |

उत्तर :

**उभे ताळेबंद ३१ मार्च २०१९ रोजीचे**

| तपशील | रक्कम (₹) | रक्कम (₹) |
|---|---|---|
| **I) निधीचे स्रोत** | | |
| १) मालकीचा निधी | | |
| भांडवल | ५०,००० | |
| (+) राखीव | १५,००० | |
| (−) काल्पनिक संपत्ती | Nil | |
| शुद्ध मूल्य | | ६५००० |
| २) कर्जाऊ निधी | | |
| १२% कर्ज | | ३०,००० |
| एकूण निधीचा उपयोग / नियोजित भांडवल | | ९५,००० |
| **II) निधीचा उपयोग** | | |
| ३) स्थिर संपत्ती | | ६०,००० |
| ४) गुंतवणूक | | १०,००० |
| ५) खेळते भांडवल : | | |
| अ) चल संपत्ती | ५५,००० | |
| ब) (−) चल देयता | ३०,००० | २५,००० |
| एकूण निधीचा उपयोग / नियोजित भांडवल | | **९५,०००** |

२. **खालील दिलेल्या ताळेबंदाचे रूपांतरण उभ्या ताळेबंदात करा.**

**ताळेबंद ३१ मार्च २०२० रोजीचा**

| देयता | रक्कम (₹) | संपत्ती | रक्कम (₹) |
|---|---|---|---|
| भांडवल | ८०,००० | स्थिर संपत्ती | ७५,००० |
| राखीव आणि वाढावा | २०,००० | गुंतवणूक | २०,००० |
| १२% कर्ज | २४,००० | चल संपत्ती | ४४,००० |
| चल देयता | १५,००० | | |
| | **१,३९,०००** | | **१,३९,०००** |

उत्तर :

**उभे ताळेबंद ३१ मार्च २०२० रोजीचे**

| तपशील | रक्कम (₹) | रक्कम (₹) |
|---|---|---|
| **I) निधीचे स्रोत** | | |
| १) मालकीचा निधी | | |
| भांडवल | ८०,००० | |
| (+) राखीव आणि वाढावा | २०,००० | |
| शुद्ध मूल्य | | १,००,००० |
| २) कर्जाऊ निधी | | |
| १२% कर्ज | | २४,००० |
| एकूण उपयोजित निधी / नियोजित भांडवल | | १,२४,००० |
| **II) निधीचा उपयोग** | | |
| ३) स्थिर संपत्ती | | ७५,००० |
| ४) गुंतवणूक | | २०,००० |
| ५) खेळते भांडवल | | |
| (+)चल संपत्ती | ४४,००० | |
| (–) चल देयता | –१५,००० | २९,००० |
| एकूण उपयोजित निधी/ नियोजित भांडवल | | १,२४,००० |

**उभे उत्पन्न विवरण.**

| तपशील | रक्कम (₹) | रक्कम (₹) |
|---|---|---|
| **उत्पन्न** | | |
| विक्री | XXX | |
| (–) विक्री परत | XXX | |
| निव्वळ विक्री | | XXXX |
| (–) **विक्री केलेल्या मालाचे मूल्य** | | |
| प्रारंभण स्कंध | XXX | |
| (+) खरेदी | XXX | |
| (+) मजूरी | XXX | |
| (+) आगत वाहन व्यय | XXX | |
| (+) प्रत्यक्ष खर्च | XXX | |
| (–) संवरण स्कंध | XXX | XXXX |
| | | XXXX |
| **ढोबळ नफा / सकल लाभ** | | |
| (–) परिचालन खर्च : | | |
| प्रशासकीय खर्च | XXX | |
| विक्री खर्च | XXX | XXXX |
| एकूण परिचालन खर्च | | XXXX |

| | | |
|---|---|---|
| **परिचालन नफा** | | XXXX |
| (+) अपरिचालन उत्पन्न | | XXXX |
| (+) अपरिचालन खर्च | | XXXX |
| **करपूर्व शुद्ध नफा / निव्वळ नफा** | | XXXX |
| (–) कर (शुद्ध/निव्वळ नफ्यावर आकारणी) | | |
| शुद्ध नफा / निव्वळ नफा (कर पश्चात) | | XXX |
| | | XXX |

**३. खाली दिलेल्या व्यापार खाते, नफा तोटा खात्यावरून उभे उत्पन्न विवरण तयार करा.**

**व्यापार आणि नफा – तोटा खाते ३१ मार्च२०१९ रोजी संपणाऱ्या वर्षाकरिता**

**नावे** **जमा**

| तपशील | रक्कम (₹) | तपशील | रक्कम (₹) |
|---|---|---|---|
| प्रारंभण स्कंध | ३,५०,००० | विक्री | ११,००,००० |
| खरेदी | ७,००,००० | सवंरण स्कंध | २,००,००० |
| मजुरी | ५०,००० | | |
| ढोबळ नफा खाली नेला | २,००,००० | | |
| | १३,००,००० | | १३,००,००० |
| कार्यालय खर्च | १,००,००० | ढोबळ नफा खाली आणला | २,००,००० |
| विक्री खर्च | ५०,००० | | |
| वित्तीय खर्च | २०,००० | | |
| शुद्ध नफा (स्थानांतरित केला) | ३०,००० | | |
| | २,००,००० | | २,००,००० |

**उत्तर :** **उभे उत्पन्न विवरण ३१ मार्च २०१९**

| अ.क्र. | तपशील | रक्कम (₹) | रक्कम (₹) |
|---|---|---|---|
| १. | विक्री | | ११,००,००० |
| २. | (–) मालाची विक्री किंमत / मूल्य | | |
| | प्रारंभण स्कंध | ३,५०,००० | |
| | (+) खरेदी | ७,००,००० | |
| | (+) मजुरी | ५०,००० | |
| | | ११,००,००० | |
| | (–) संवरण स्कंध | २,००,००० | ९,००,००० |
| ३. | ढोबळ नफा | | २,००,००० |
| ४. | (–) परिचालन खर्च : | | |
| | प्रशासकीय खर्च | १,००,००० | |
| | विक्री खर्च | ५०,००० | |
| | वित्तीय खर्च | २०,००० | |
| ५. | एकूण परिचालन खर्च | | १,७०,००० |
| ६. | शुद्ध नफा / निव्वळ नफा | | ३०,००० |

४. खाली दिलेल्या व्यापार आणि नफा तोटा खात्याचे उभे उत्पन्न विवरण तयार करा.

**व्यापार आणि नफा – तोटा खाते**

**३१ मार्च२०२० रोजी बंद होणाऱ्या वर्षाकरिता**

**नावे** **जमा**

| तपशील | रक्कम (₹) | तपशील | रक्कम (₹) |
|---|---|---|---|
| प्रारभंण स्कंध | २,००,००० | विक्री | १२,००,००० |
| खरेदी | ९,००,००० | सवंरण स्कंध | ३,००,००० |
| मजुरी | १,००,००० | | |
| ढोबळ नफा खाली नेला | ३,००,००० | | |
| | १५,००,००० | | १५,००,००० |
| कार्यालय खर्च | १,२५,००० | ढोबळ नफा खाली आणला | ३,००,००० |
| विक्री खर्च | १,००,००० | | |
| वित्तीय खर्च | ३०,००० | | |
| शुद्ध नफा स्थानांतरित | ४५,००० | | |
| | ३,००,००० | | ३,००,००० |

**उत्तर :**

**उभे उत्पन्न विवरण**

| तपशील | रक्कम (₹) | रक्कम (₹) |
|---|---|---|
| १) विक्री | | १२,००,००० |
| २) (वजा) : मालाची विक्री किंमत / मूल्य : | | |
| प्रारभंण स्कंध | २,००,००० | |
| खरेदी | ९,००,००० | |
| मजुरी | १,००,००० | |
| | १२,००,००० | |
| (वजा) : संवरण स्कंध | ३,००,००० | ९,००,००० |
| ३) ढोबळ नफा | | ३,००,००० |
| ४) (वजा) परिचालन खर्च : | | |
| कार्यालय खर्च | १,२५,००० | |
| विक्री खर्च | १,००,००० | |
| वित्तीय खर्च | ३०,००० | २,५५,००० |
| ५) एकूण परिचालन खर्च | | |
| ६) शुद्ध नफा | | ४५,००० |

## ९.२ वित्तीय विवरण विश्लेषणाची साधने (Tools for Financial Statement Analysis) :

वित्तीय विवरणे आपणांस संपत्ती, देयता, महसुली खर्च, नफा आणि तोटा यांचे आकडे देतात परंतु व्यवसायाची नफा कमविण्याची क्षमता, तरलता आणि वित्तीय सुबद्धता दिसून येण्यास मर्यादा पडतात.

वित्तीय विवरणांची मुख्य साधने खालील प्रमाणे आहेत.

(अ) तुलनात्मक विवरण विवरण

(ब) सामान्य आकारचे विवरण

(क) रोख प्रवाह विश्लेषण

### ९.२.१ तुलनात्मक वित्तीय विवरण (Comparative Financial Statement) :

दोन कालावधी मधील वित्तीय विवरण आणि परिचालन नफा यातील तुलना करून अर्थ आणि निष्कर्ष काढले जातात त्यास तुलनात्मक वित्तीय विवरण असे म्हणतात.

**अर्थ :** ज्या विवरणामध्ये दोन किंवा दोन पेक्षा अधिक वर्षाचे वित्तीय स्थिती दर्शविण्याची सुविधा असते त्या विवरणाला तुलनात्मक वित्तीय विवरण संबोधले जाते.

**तुलनात्मक वित्तीय विवरणांची साधने :**

(१) तुलनात्मक ताळेबंद

(२) तुलनात्मक उत्पन्नाचे विवरण.

(१) **तुलनात्मक ताळेबंद :** ज्या विवरणात दोन किंवा दोन पेक्षा अधिक तारखांची संपत्ती आणि देयता आणि त्यांच्या मूल्यात होणारी वाढ आणि घट यांची माहिती प्राप्त होऊ शकते अशा विवरणाला तुलनात्मक ताळेबंद म्हटले जाते.

**श्री. फालके यांच्या मते, "असे विवरण ज्यामध्ये एकाच व्यवसायिक संस्थेचे दोन वेगवेगळ्या वर्षाचे ताळेबंद ज्यामध्ये संपत्ती व देयताच्या रक्कमांची तुलना केली जाते अशा विवरणाला तुलनात्मक ताळेबंद असे म्हणतात."** अशा तुलनेमुळे संपत्ती व देयतेमध्ये असणाऱ्या फरकावर प्रकाश टाकून अशा संपत्ती व देयतामध्ये प्रगती करता येते किंवा सुधारणा करता येते.

तुलनात्मक ताळेबंदाचा मुख्य उद्देश म्हणजे व्यवसायाची अल्प आणि दीर्घ मुदतीची शोधन क्षमतेची गणना करणे होय.

**तुलनात्मक ताळेबंद तयार करण्याच्या पायऱ्या (Methods of preparing comparative Balance Sheet) :**

ताळेबंदात समाविष्ट असणाऱ्या संपत्ती व देयतेमधील विविध घटकांच्या मूल्यात झालेल्या वाढ आणि घटीची टक्केवारी पूर्णपणे विचारात घेऊन तुलनात्मक ताळेबंद तयार केला जातो.

**तुलनात्मक ताळेबंद तयार करतांना खालील पायऱ्या विचारात घ्याव्यात :**

**पायरी १ :** विवरणाच्या पहिल्या रकान्यात संपत्ती व देयतेची रक्कम लिहावी.

**पायरी २ :** विवरणाच्या दुसऱ्या रकान्यात मागील वर्षाची रक्कम लिहावी.

**पायरी ३ :** विवरणाच्या तिसऱ्या रकान्यात चालू वर्षाची रक्कम लिहावी.

**पायरी ४ :** चौथ्या रकान्यात (चालू रकान्यात आणि मागील वर्षाचा रकान्यातील फरक) दोन्ही रकान्यातील फरक लिहावा.

**पायरी ५ :** पाचव्या रकान्यात फरकाची टक्केवारी लिहावी. (मागील वर्षाच्या आकडेवारीतील बदलाची टक्केवारी पूर्णपणे व्यक्त करावी).

$$\text{टक्केवीरीतील \% बदलाचे सूत्र} = \frac{\text{अंतिम बदल}}{\text{मागील वर्ष}} \times १००$$

५. **खाली वरूण ट्रेडर्सचे ३१.३.२०१९ आणि ३१.३.२०२० रोजी संपणाऱ्या वर्षाचे ताळेबंद दिलेले आहेत.**

| देयता | ३१-३-२०१९ (₹) | ३१-३-२०२० (₹) | संपत्ती | ३१-३-२०१९ (₹) | ३१-३-२०२० (₹) |
|---|---|---|---|---|---|
| भाग भांडवल | २,५०,००० | ३,७०,००० | स्थिर संपत्ती | ३,५०,००० | ५,७०,००० |
| राखीव व वाढवा | ६०,००० | १,००,००० | चल गुंतवणूक | १,२०,००० | १,७०,००० |
| सुरक्षित कर्ज | १,००,००० | १,६०,००० | संपत्ती | १,३०,००० | १,२०,००० |
| असुरक्षित कर्ज | ९०,००० | १,४०,००० | | | |
| चल देयता | १,००,००० | ९०,००० | | | |
| | ६,००,००० | ८,६०,००० | | ६,००,००० | ८,६०,००० |

**वरूण ट्रेडर्सचे ३१.३.१९ आणि ३१.३.२० रोजीचे तुलनात्मक ताळेबंद तयार करा.**

**उत्तर :** वरूण ट्रेडर्सचे ३१.३.२०१९ आणि ३१.३.२०२० रोजीचे तुलनात्मक ताळेबंद खालीलप्रमाणे आहेत.

| तपशील | १<br>३१.३.१९ (₹) | २<br>३१.३.२० (₹) | ३ (२-१)<br>अंतिम बदल (₹) | ४ ( $\frac{३}{७}$ × १००)<br>टक्केवारीतील बदल |
|---|---|---|---|---|
| **I) निधीचे स्रोत** | | | | |
| **अ) मालकिची निधी** | | | | |
| i) भाग भांडवल | २,५०,००० | ३,७०,००० | १,२०,००० | ४८% वाढ |
| ii) राखीव निधी व वाढवा | ६०,००० | १,००,००० | ४०,००० | ६६.६७% वाढ |
| **एकूण उपलब्ध निधी** | ३,१०,००० | ४,७०,००० | १,६०,००० | ५१.६१% वाढ |
| **ब) कर्जाऊ भांडवल** | | | | |
| i) सुरक्षित कर्ज | १,००,००० | १,६०,००० | ६०,००० | ६०% वाढ |
| ii) असुरक्षित कर्ज | ९०,००० | १,४०,००० | ५०,००० | ५५.५५% वाढ |
| एकूण कर्जाऊ निधी | १,९०,००० | ३,००,००० | १,१०,००० | ५७.८९% वाढ |
| एकूण उपलब्ध निधी (अ + ब) | ५,००,००० | ७,७०,००० | २,७०,००० | ५४% वाढ |
| **II) निधीचा उपयोग** | | | | |
| अ) स्थिर संपत्ती | **३,५०,०००** | **५,७०,०००** | **२,२०,०००** | ६२.८६% वाढ |
| ब) गुंतवणूक | **१,२०,०००** | **१,७०,०००** | **५०,०००** | ४१.६७% वाढ |
| क) खेळते भांडवल | | | | |
| १) चल संपत्ती | १,३०,००० | १,२०,००० | १०,००० | (७.६९%) घट |
| २) (-) चल देयता | १,००,००० | ९०,००० | १०,००० | (१०%) घट |
| खेळते भांडवल (चल संपत्ती-चल देयता) | **३०,०००** | **३०,०००** | - | - |
| **एकूण निधीचा उपयोग (अ + ब + क)** | ५,००,००० | ७,७०,००० | २,७०,००० | **५४% वाढ** |

**भागभांडवलातील सरासरी बदल**

$$\text{टक्केवारी बदल} = \frac{\text{अंतिम बदलाची रक्कम}}{\text{मागील वर्षाची रक्कम}} \times १००$$

$$= \frac{१,२०,०००}{२,५०,०००} \times १०० = ४८\ \%$$

## उत्पन्नाचे तुलनात्मक विवरण (Comparative Income Statement)

**तुलनात्मक विवरण :** उत्पन्न विवरण हे परिचालन शुद्ध नफा आणि तोटा दर्शवितो. तुलनात्मक उत्पन्न विवरणात दोन किंवा दोन पेक्षा जास्त कालावधीची परिपूर्ण आकडेवारी दर्शविली जाते. एक किंवा दोन कालावधीत पूर्णपणे बदल दिसून येतो. एक ठरावीक कालावधीची दोन किंवा त्यापेक्षा अधिकची आकडेवारी आजूबाजूला दाखवितात. वाचक विक्रीत झालेली वाढ किंवा घट ताबडतोब पडताळणी करू शकतो. जसे, विक्री मूल्यात झालेली वाढ किंवा घट इत्यादी.

**तुलनात्मक उत्पन्न विवरण तयार करण्याची पद्धती :** वेगळ्या व्यापार आणि नफा तोटा खात्यात होणारी वाढ आणि घट तुलनात्मक उत्पन्न विवरणात दर्शविली जाते.

तुलनात्मक उत्पन्न विवरण तयार करतांना खालील पायऱ्या विचारात घ्याव्यात.

**पायरी १ :** पहिल्या रकान्यात खर्च व उत्पन्न खात्याची रक्कम लिहावी.

**पायरी २ :** उत्पन्न विवरणाच्या दुसऱ्या रकान्यात मागील वर्षाची आकडेवारी लिहावी.

**पायरी ३ :** उत्पन्न विवरणाच्या तिसऱ्या रकान्यात चालू वर्षाची आकडेवारी लिहावी.

**पायरी ४ :** चौथ्या रकान्यात (जसे चालू वर्षीच्या आकडेवारी आणि मागील वर्षाची आकडेवारीतील फरक) दोन्ही रकान्यातील परिपूर्ण फरक लिहावा.

**पायरी ५ :** पाचव्या रकान्यात (मागील वर्षाच्या आकडेवारीतील टक्केवारी फरक) बदललेली टक्केवारी लिहावी.

$$\text{बदलातील सरासरी फरक} = \frac{\text{अंतिम बदलाची रक्कम}}{\text{मागील वर्षाची रक्कम}} \times १००$$

६. **अबक मर्यादित कंपनीच्या ३१.३.२०१९ आणि ३१.३.२०२० च्या उत्पन्न विवरणाच्या आधारे तुलनात्मक उत्पन्न विवरण तयार करा.**

| तपशील | ३१.३.२०१८ (₹) | ३१.३.२०१९ (₹) |
|---|---|---|
| विक्री | ४,००,००० | ६,००,००० |
| वजा : मालाची मूळ किंमत | २,२०,००० | ३,६०,००० |
| ढोबळ नफा | १,८०,००० | २,४०,००० |
| वजा : अप्रत्यक्ष खर्च | ८०,००० | १,००,००० |
| कर पूर्व शुद्ध नफा | १,००,००० | १,४०,००० |
| वजा : आयकर ५०% | ५०,००० | ७०,००० |
| **कर आकारणी नंतरचा शुद्ध नफा** | **५०,०००** | **७०,०००** |

**उत्तर :** अबक मर्यादित कंपनीचे ३१.३.२०१८ आणि ३१.३.२०१९ रोजीचे तुलनात्मक उत्पन्न विवरण खालील प्रमाणे आहे.

| तपशील | ३१.३.२०१८ (₹) | ३१.९.२०१९ (₹) | अंतिम बदल (₹) | टक्केवारीत बदल |
|---|---|---|---|---|
| विक्री | ४,००,००० | ६,००,००० | २,००,००० | ५०% वाढ |
| वजा : मालाची मूळ किंमत | २,२०,००० | ३,६०,००० | १,४०,००० | ६३.६४% वाढ |
| ढोबळ नफा | १,८०,००० | २,४०,००० | ६०,००० | ३३.३३% वाढ |
| वजा : अप्रत्यक्ष खर्च | ८०,००० | १,००,००० | २०,००० | २५.००% वाढ |
| कर पूर्व शुद्ध नफा | १,००,००० | १,४०,००० | ४०,००० | ४०.००% वाढ |
| वजा : आयकर ५०% | ५०,००० | ७०,००० | २०,००० | ४०.००% वाढ |
| **कर आकारणी नंतरचा शुद्ध नफा** | **५०,०००** | **७०,०००** | **२०,०००** | **४०.००% वाढ** |

**गुण फायदे :**

$$\% \text{ बदल} = \frac{\text{अंतिम बदलाची रक्कम}}{\text{मागील वर्षाची रक्कम}} \times १००$$

$$= \frac{२,००,०००}{४,००,०००} \times १००$$

$$= ५० \%$$

### ९.२.२ सामान्य आकाराचे विवरण (Common Size Statement)

अर्थ – सर्वसामान्य आकाराची विवरणे ही अशी विवरणे होय की, ज्यात वित्तीय विवरणांचे व्यक्तीगत आकडे काही सामान्य आधार (सरासरी) घेऊन शेकडा प्रमाणामध्ये परावर्तीत केले जातात. उत्पन्न विवरणात विक्रीची आकडेवारी १०० गृहीत धरून ही आकडेवारी शुद्ध विक्रीची टक्केवारी काढते जसे ताळेबंदाची बेरीज, एकूण शुद्ध विक्री इ.

उदाहरणार्थ : समजा एकूण निधीचे उपयोजन ₹ १६,००,००० आणि इमारत ₹ ४,००,०००आहे

$$\text{सूत्र} = \frac{\text{घटकाची रक्कम}}{\text{एकूण उपयोजित निधी}} \times १००$$

$$\text{नंतरची टक्केवारी} = \frac{\text{इमारतीची रक्कम}}{\text{एकूण उपलब्ध निधी}} \times १००$$

$$= \frac{४०००००}{१६०००००} \times १००$$

$$= २५\%$$

**सामान्य आकाराच्या ताळेबंद तयार करण्याच्या पायऱ्या :**

१) पहिल्या रकान्यामध्ये ताळेबंदातील एकूण पदे लिहावीत.

२) दुसऱ्या रकान्यामध्ये संपत्ती व देयतेच्या मागील वर्षातील अंतिम रकमा लिहाव्यात.

३) संपत्ती व देयतेचे चालू वर्षातील अंतिम रकमा लिहा.

४) मागील वर्षाच्या ताळेबंदातील विविध संपत्ती/देयतांचे, एकूण संपत्ती/देयतांशी सरासरी दर्शवा.

५) चालू वर्षाच्या ताळेबंदातील विविध संपत्ती/देयतांचे, एकूण संपत्ती/देयतांशी सरासरी दर्शवा.

**७.** X. Y.Z. यांच्या खालील ताळेबंदा आधारे ३१ मार्च २०२० रोजीचे सामान्य आकाराचे विवरण तयार करा.

**ताळेबंद ३१ मार्च २०२० रोजीचा**

| देयता | रक्कम ₹ | संपत्ती | रक्कम ₹ |
|---|---|---|---|
| सामान्य भाग भांडवल | ९,००,००० | स्थिर संपत्ती | ९,००,००० |
| अग्रहक्क भाग भांडवल | ८०,००० | गुंतवणूक | १,५०,००० |
| राखीव आणि वाढवा | १,५०,००० | चल संपत्ती | ७,३०,००० |
| सुरक्षित कर्ज | ३,००,००० | | |
| असुरक्षित कर्ज | २,००,००० | | |
| चल देयता | १,५०,००० | | |
| | **१७,८०,०००** | | **१७,८०,०००** |

उत्तर :

सामान्य आकाराचे ३१ मार्च २०२० रोजीचे विवरण

| तपशील | | रक्कम ₹ | टक्केवारी |
|---|---|---|---|
| **I] निधीचे स्रोत** | | | |
| १) मालकीचा निधी | | | |
| अ) सामान्य भाग भांडवल | | ९,००,००० | ५५.२२% |
| ब) अग्रहक्क भाग भांडवल | | ८०,००० | ४.९१% |
| क) राखीव | | १,५०,००० | ९.२०% |
| | | ११,३०,००० | ६९.३३% |
| (–) काल्पनिक संपत्ती | | Nil | |
| एकूण मालकीचा निधी | | ११३०,००० | ६९.३३% |
| २) कर्जाऊ निधी | | | |
| सुरक्षित कर्ज | | ३,००,००० | १८.४०% |
| असुरक्षित कर्ज | | २,००,००० | १२.२७% |
| एकूण कर्जाऊ निधी | | ५,००,००० | ३०.६७% |
| **एकूण उपयोजित निधी** | | **१६,३०,०००** | **१००%** |
| **II] निधीचा उपयोग** | | | |
| १) स्थिर संपत्ती | | ९,००,००० | ५५.२१% |
| २) गुंतवणूक | | १,५०,००० | ९.२०% |
| खेळते भांडवल | | | |
| चल संपत्ती | ₹ ७,३०,००० | | |
| (–) चल देयता | ₹ १,५०,००० | | |
| शुद्ध निव्वळ खेळते भांडवल | | ५,८०,००० | ३५.५९% |
| **एकूण उपयोजित निधी** | | **१६,३०,०००** | **१००%** |

**उदाहरण क्र. ८ :** खालील माहितीच्या आधारे दि.३१.३.२०१९ आणि ३१.३.२०२० रोजी संपणाऱ्या वर्षाचे सर्व सामान्य आकाराचे उत्पन्न विवरण तयार करा.

| तपशील | ३१.१.२०१९ (₹) | ३१.३.२०२० (₹) |
|---|---|---|
| निव्वळ विक्री | ५,००,००० | ६,००,००० |
| वजा : विक्री केलेल्या मालाची मूळ किंमत | ३,००,००० | ३,६०,००० |
| ढोबळ नफा | २,००,००० | २,४०,००० |
| वजा : कार्यालय व प्रशासकीय खर्च | ५५,००० | ७२,००० |
| वजा : विक्री आणि वितरण खर्च | ५२,५०० | ६६,००० |
| शुद्ध नफा | ९२,५०० | १,०२,००० |

उत्तर : दि. ३१.३.२०१९ आणि ३१.३.२०२० रोजी संपणाऱ्या वर्षाचे सर्व सामान्य आकाराचे उत्पन्न विवरण.

| तपशील | रक्कम (₹) | टक्केवारी % | रक्कम (₹) | टक्केवारी % |
|---|---|---|---|---|
| निव्वळ विक्री | ५,००,००० | १००% | ६,००,००० | १००% |
| वजा : मालाची मूळ किंमत | ३,००,००० | ६०% | ३,६०,००० | ६०% |
| ढोबळ नफा | २,००,००० | ४०% | २,४०,००० | ४०% |
| वजा : कार्यालय व प्रशासकीय खर्च | ५५,००० | ११% | ७२,००० | १२% |
| वजा : विक्री आणि वितरण खर्च | ५२,५०० | १०.५% | ६६,००० | ११% |
| शुद्ध नफा | ९२,५०० | १८.५% | १,०२,००० | १७% |

या ठिकाणी निव्वळ विक्री हा आधार आहे. दि.३१.३.२०१९ वर्षअखेर निव्वळ विक्री ₹ ५,०,००० असून आधार १००% आहे. तसेच दि.३१.३.२०२० च्या वर्षअखेर निव्वळ विक्री ₹ ६,००,००० आहे आणि याचा आधार १००% आहे.

विक्री केलेल्या मालाची मूळ किंमत दि.३१.३.२०१९ ची %

$$= \frac{\text{विक्री केलेल्या मालाची मूळ किंमत}}{\text{शुद्ध विक्री}} \times १००$$

$$= \frac{३,००,०००}{५,००,०००} \times १००$$

$$= ६०\%$$

विक्री केलेल्या मालाची मूळ किंमत दि.३१.३.२०२० ची %

$$= \frac{\text{विक्री केलेल्या मालाची मूळ किंमत}}{\text{शुद्ध विक्री}} \times १००$$

$$= \frac{३,००,०००}{६,००,०००} \times १००$$

$$= ६०\%$$

### सामान्य आकाराच्या विवरणाचे फायदे (Advantages of Common Size Statement)

(१) सर्व सामान्य आकाराची विवरणे ताळेबंद आणि उत्पन्नच्या विविध घटकातील प्रवृत्ती किंवा कल दर्शविते म्हणून अशी विवरणे लाभ क्षमतेची तुलना करण्यास फार उपयोगी आहे. तसेच दोन व्यवसाय संस्थांमधील वित्तिय परीस्थिती समजण्यास उपयुक्त ठरते.

(२) हे दोन संस्थेतील तुलना करण्यास सुद्धा उपयोगी आहे. कारण विविध संस्थाचे वित्तिय विवरणे एका समान पदांमधे दर्शविणे शक्य होते.

(३) नफा तोटा लेखातील विविध पदांचे सहसंबंध प्रस्थापित करणे शक्य होते. उदा. उत्पन्न विवरण व विक्री किंवा ताळेबंदातील विविध पदांचे संपत्ती/देयतांशी असणारे सहसंबंध अभ्यासता येते.

### ९.२.३ रोख प्रवाह विश्लेषण (Cash Flow Statement) :

वित्तीय विश्लेषण करण्याची रोख प्रवाह विश्लेषण हे एक अत्यंत महत्वाचे तंत्र आहे. रोख प्रवाह विश्लेषणात रोख प्रवाह विवरण तयार करून त्यात रोख रकमेचे स्रोत आणि क्षमता दाखविली जाते. एका विशिष्ट कालावधीत येणारा रोख प्रवाह आणि जाणारा रोख प्रवाह विविध माध्यमाद्वारे होणारे परिणाम रोख प्रवाह विवरणात दाखविता येतात. दोन ताळेबंदातील रोख शिल्लकेत होणाऱ्या बदलाचे विश्लेषण करता येते. कमी कालावधीच्या नियोजनाकरिता रोख प्रवाह विश्लेषण अधिक उपयोगी आहे.

एका विशिष्ट कालावधीतील रोख रक्कमेचा येणारा प्रवाह आणि जाणारा प्रवाहाचे स्रोत आणि परिणाम विश्लेषण करणारे विवरण म्हणजे रोख प्रवाह विवरण होय.

## रोख प्रवाह विवरणाचे महत्त्व (Importance of Cash Flow Statement) :

(१) **अल्पकालीन आर्थिक नियोजन व निर्णय घेण्यासाठी उपयुक्त :** विशिष्ट कालावधीतील रोख व ततसंबंधीचा उपयोग रोख प्रवाह विवरणामुळे समजतो व त्यामुळे व्यवसायाच्या वित्तीय परिचलनाच्या आणि गुंतवणुकीच्या गरजांचे नियोजन करता येते.

(२) **तरल स्थितीच्या विश्लेषणास उपयुक्त :** रोख प्रवाह विवरण हे मासिक किंवा त्रैमासिक कालावधीसाठी तयार केले जाते. त्यामुळे तरलता शोधण्यास उपयुक्त ठरते. तरलेतेचे विश्लेषण बँकांना व वित्तीय संस्थांना व्यवसायाच्या चल देयता क्षमता समजण्यास उपयुक्त ठरते.

(३) **कार्यक्षम रोख व्यवस्थापनासाठी उपयुक्त :** रोख प्रवाह विवरणामुळे व्यवसायाची वाढावा आणि तुटीची माहिती मिळते व्यवसायाला वाढावा असल्यास अल्पकालीन गुंतवणूक व तूट असल्यास अल्प काळासाठी कर्ज घेण्याची व्यवस्था करणे शक्य होते.

(४) **तुलनात्मक अभ्यासासाठी उपयुक्त :** रोख प्रवाह विवरणाची तुलना रोख अदांज पत्रकाशी केल्यास व्यवसायाच्या रोखीची साधने कशी निर्माण झाली आहे आणि रोख अदांजपत्रकाप्रमाणे त्याचा उपयोग कसा केला आहे हे समजले तसेच रोख प्रवाह विवरण व रोख अदांजपत्रकातील फरकाची कारणे शोधून आवश्यक उपाययोजन करणे शक्य होते.

(५) **प्राप्ती आणि शोधनाचा अभ्यास करण्यास उपयुक्त :** रोख प्रवाह विवरणामुळे ऋणको, स्कंध आणि चल संपत्तीच्या माध्यमातून किती जलद गतीने रोख रक्कम निर्माण केली तसेच चल देयतेचे किती जलद गतीने शोधन केले हे समजते, यावरून व्यवस्थापनला भविष्यातील रोखीचे खरे चित्र स्पष्ट होते.

(६) **लाभांश जाहीर करण्यास उपयुक्त :** लाभांश जाहीर करण्यापूर्वी व्यवस्थापन रोख प्रवाह विवरणाचा आधार घेते त्यावरून व्यवसायाच्या परिचालन कृतीतून रोखीची निर्मिती लक्षात येते व त्यानुसार लाभाशांचे शोधन करणे शक्य होते.

(७) **नियोजनाचे साधन :** व्यवस्थापनाला व्यवसायाच्या भविष्य कालीन गुंतवणूक व वित्तीय नियोजन करणे रोख प्रवाह विवरणामुळे शक्य होते.

## रोख प्रवाह विवरणाचे उपयोग (Uses of cash Flow Statement) :

खालील माहितीचे उत्तर देण्यासाठी रोख प्रवाह विवरण हे एक उपयुक्त ऐतिहासिक साधन होय.

(१) व्यवसायाची तरल स्थिती कशी आहे?

(२) शुद्ध नफा वाढण्याचे कारण?

(३) व्यवसायाला शुद्ध तोटा असतांना रोख शिल्लक का वाढली?

(४) चालू कृतीतून निधी उभारण्यासाठी खेळत्या भांडवलाची गरज का आहे?

(५) संस्थेला असलेली निधीचा गरज बहिर्गत/बाह्य वित्तीय स्रोतामधून कशी पूर्ण होते?

(६) संस्थेची चल संपत्ती ऐवजी इतर संपत्ती का विकली गेली?

## रोख प्रवाह विवरणाचे सादरीकरण (Presentation of Cash Flow Statement) :

लेखांकीय AS – ३ नुसार एका विशिष्ट कालावधीतील व्यवसायिक व्यवहारांचे वर्गीकरण करतांना योणारी रोख आणि जाणारी रोखीचा अहवाल ज्या विवरणात तीन श्रेणीमध्ये सादर केला जातो त्याला रोख प्रवाह विवरण असे म्हणतात.

### रोख प्रवाह विवरणाचा नमुना

| तपशील | रक्कम (₹) | रक्कम (₹) |
|---|---|---|
| I] परिचालन कार्यामुळे होणारे रोख प्रवाह | | |
| शुद्ध नफा | XXXX | |
| अनार्थिक / अपरिचालन खर्चाचे समायोजन | | |
| (+) घसारा /अवक्षयन | XXXX | |
| (+) व्याज दिले | XXXX | |
| (+) संपत्ती विक्रीवरील तोटा | XXXX | |
| (–) प्राप्त व्याज / प्राप्त लाभांश | XXXX | |
| (–) संपत्ती विक्रीवरील नफा | XXXX | |
| खेळते भांडवलातील बदलाचे समायोजन | | |
| (अधिक) – चल देयतेत होणारी वाढ | XXXX | |
| (अधिक) – चल संपत्तीत होणारी घट | XXXX | |
| (वजा) – चल संपत्तीत होणारी वाढ | XXXX | |
| (वजा) – चल देयतेत होणारी घट | XXXX | |
| कार्य संचालन कार्यातून मिळणारी रोख | | XXXX |
| II] गुंतवणूक कार्यामुळे रोख प्रवाह | | |
| (अधिक) :– १) प्राप्त व्याज / प्राप्त लाभांश | XXXX | |
| २) संपत्ती व गुंतवणुकीची विक्री | XXXX | |
| (वजा) :– १) स्थिर संपत्ती आणि गुंतवणूक खरेदी | XXXX | |
| गुंतवणूक कार्यातून मिळणारी रोख | | XXXX |
| III] आर्थिक / वित्तीय कार्यातून रोख प्रवाह | | |
| (अधिक):– १) भाग आणि कर्ज रोखे विक्री | XXXX | |
| २) घेतलेले कर्ज | XXXX | |
| (वजा) :– १) भाग आणि कर्ज रोखे परतफेड | XXXX | |
| २) कर्जाची परतफेड | XXXX | |
| ३) व्याज / लाभांश दिले | XXXX | |
| वित्तीय कार्यातून मिळणारी रोख | | XXXX |
| शुद्ध / निव्वळ रोख रकमेत होणारी वाढ / घट | | XXX |
| (अधिक) :– रोख खाते सुरुवातीची (शिल्लक + बँक शिल्लक) | | XXXX |
| अखेरची रोख (रोख खाते अखेरची शिल्लक + बँक शिल्लक) | | XXXX |

## रोख प्रवाह विवरण उदाहरणे

**उदाहरण क्र.१ :** खालील माहितीवरून रोख प्रवाह विवरण तयार करा. ३१ मार्च २०१९

| तपशील | रक्कम (₹) |
|---|---|
| प्रारंभिक रोख शिल्लक | ३०,००० |
| अंतिम रोख शिल्लक | ३४,००० |
| मालसाठ्यातील घट | १६,००० |
| देय्य विपत्रातील वाढ | २४,००० |
| स्थिर संपत्तीची विक्री | ६०,००० |
| दीर्घ मुदतीच्या कर्जाचे शोधन | १,००,००० |
| वर्षभरातील शुद्ध नफा | ४,००० |

**उत्तर :**

**रोख प्रवाह विवरण**

| तपशील | रक्कम (₹) | रक्कम (₹) |
|---|---|---|
| अ) कार्य संचालनापासून रोख कर आकारणी पूर्वीचा शुद्ध नफा | | ४,००० |
| (+) चल संपत्तीत घट | | |
| मालसाठा | १६,००० | |
| (+) चल देयतेत वाढ | | |
| देय्य विपत्र | २४,००० | ४०,००० |
| अ) कार्य संचालनापासून रोख | | ४४,००० |
| ब) गुंतवणूक उपक्रमापासून रोख | | |
| स्थिर संपत्ती विक्री | ६०,००० | ६०,००० |
| क) वित्तीय उपक्रमापासून रोख | | |
| दीर्घ मुदतीच्या कर्जाचे शोधन | १,००,००० | |
| क) वित्तीय उपक्रमापासून रोख | | १,००,००० |
| रोख मधील शुद्ध वाढ आणि रोख (अ + ब + क) | | ४,००० |
| प्रारंभिक रोख शिल्लक | | ३०,००० |
| अंतिम रोख शिल्लक | | ३४,००० |

**उदाहरण क्र. २ :** रोख प्रवाह विवरण

खालील स्थिती विवरण श्री. आनंद यांचे असून १ एप्रिल २०१८ आणि ३१ मार्च २०१९ करीता रोख प्रवाह विवरण तयार करा.

| देयता | १ एप्रिल २०१८ रक्कम ₹ | ३१ मार्च २०१९ रक्कम ₹ | संपत्ती | १ एप्रिल २०१८ रक्कम ₹ | ३१ मार्च २०१९ रक्कम ₹ |
|---|---|---|---|---|---|
| भांडवल | १,४८,००० | १,४९,००० | मालसाठा | २५,००० | २२,००० |
| विविध धनको | ३६,००० | ४१,००० | ऋणको | ३५,००० | ३८,४०० |
| दीर्घ मुदती कर्ज | ३०,००० | ४५,००० | रोख | ४,००० | ३,६०० |
| | | | इमारत | ५०,००० | ५५,००० |
| | | | यंत्र | ८०,००० | ८६,००० |
| | | | जमीन | २०,००० | ३०,००० |
| | **२,१४,०००** | **२,३५,०००** | | **२,१४,०००** | **२,३५,०००** |

**उत्तर :**

**रोख प्रवाह विवरण**
**१ एप्रिल, २०१८ आणि ३१ मार्च, २०१९ रोजी संपणाऱ्या वर्षाकरिता**

| तपशील | रक्कम (₹) | रक्कम (₹) |
|---|---|---|
| अ) कार्य संचालनापासून रोख | | |
| वर्षभरातील नफा (१,४९,००० – १,४८,०००) | १,००० | |
| (+) : चल संपत्तीतील घट | | |
| मालसाठा (२५,००० – २२,०००) | ३,००० | |
| (+) : चल देयतेतील वाढ | | |
| विविध धनको (४१,००० – ३६,०००) | ५,००० | |
| | ९,००० | |
| (–) : चल संपत्तीतील वाढ | (३,४००) | |
| ऋणको (३५,००० – ३८,४००) | | |
| अ) कार्य संचालनापासून रोख | | ५,६०० |
| ब) गुंतवणूक उपक्रमापासून रोख | | |
| जमीन खरेदी (३०,००० – २०,०००) | १०,००० | |
| यंत्र खरेदी (८६,००० – ८०,०००) | ६,००० | |
| इमारत खरेदी (५५,०००–५०,०००) | ५,००० | |
| ब) गुंतवणूक उपक्रमापासून रोख | | २१,००० |
| क) वित्तीय उपक्रमापासून रोख | | |
| दीर्घ मुदतीच्या कर्जाचे शोधन (४५,०००–३०,०००) | १५,००० | |
| क) वित्तीय उपक्रमापासून रोख | | १५,००० |
| रोख मधील शुद्ध घट आणि रोख (अ + ब + क) | | (४००) |
| प्रारंभिक रोख शिल्लक (१ एप्रिल, २०१८) | | ४,००० |
| अंतिम रोख शिल्लक (३१ मार्च, २०१९) | | ३,६०० |

## ९.३ अनुपाताचे विश्लेषण : अर्थ, उद्‌देश आणि वर्गीकरण.

**अर्थ :** अनुपात हे दोन लेखांकीय आकडेवारीचा संबंध दर्शविणारे गणितीय संख्याचे आगणन होय. म्हणून याला “आर्थिक अनुपात” असेही म्हणतात. आर्थिक अनुपात, दोन लेखांकीय आकड्यामध्ये अनुपात, प्रमाण आणि शेकडेवारी मध्ये व्यक्त केले जातात.

व्यवसायाच्या आर्थिक परिणामाचे मूल्यांकन करतांना विविध प्रकारचे लेखांकीय अनुपाताचा उपयोग केला जातो यालाच अनुपाताचे विश्लेषण असे म्हणतात.

**उदाहरण :** जर सकल लाभ ₹ ३०,००० असून विक्री ₹ १,२०,००० आहे. सकल लाभ अनुपात प्रमाण काढा. / ठरवा.

**उत्तर :** सकल लाभ अनुपात $= \frac{\text{सकल लाभ}}{\text{शुद्ध विक्री}} \times १००$

$= \frac{३०,०००}{१,२०,०००} \times १००$

$= २५\%$

अशारितीने आर्थिक अनुपात हे दोन घटकातील किंवा घटकांच्या समूहामधील गुणात्मक संबंध दर्शविते.

**अनुपाताचे उद्‌देश :** अनुपात विश्लेषण आर्थिक माहिती पुरविते आणि गुंतागुंतीचे अंकगणितीय संबंध सोपे करण्यासाठी ज्याकडे अधिक लक्ष देणे आवश्यक असते अशी जटिल माहिती सोपी करून दर्शविते.

अनुपाताचे उद्‌देश पुढीलप्रमाणे आहेत.

(१) व्यवसायाची लाभ क्षमता, तरल शोधन क्षमता यांचे तुलनात्मक विश्लेषण करण्यासाठी सहाय्य करणे.

(२) व्यवसायात होणारे बदल माहीत करून घेणे.


(३) लेखांकीय अनुपात व्यवसाय संस्थेने केलेली कृती, गुंतवणूक आणि घेतलेले आर्थिक निर्णय बरोबर आहे किंवा नाही हे समजवून देण्यात मदत करतात. एक अर्थाने लेखांकीय अनुपात हे कार्य कुशलता वाढविण्यास कसे सहाय्यभूत ठरतात हे दर्शविते.

(४) अनुपात, विविध तुलनेकरिता उपयोगी आहे.

**(अ) संस्थेमधील तुलना :** संस्थेच्याच अनेक वर्षामध्ये तुलना.

**(ब) संस्थामधील तुलना :** संस्थांचा दर्जा ठरवितांना किंवा प्रकल्पाची उभारणी करतांना दोन संस्थांमध्ये केलेली तुलना.

**अनुपाताचे वर्गीकरण :** अनुपाताचे ज्या उद्‌देशाने आगणित केले जाते त्या अनुसार अनुपाताचे विविध गटात वर्गीकरण केले जाते.



## (अ) ताळेबंद अनुपात:

**(१) चल अनुपात :** हा असा अनुपात आहे की, जो चल संपत्ती आणि चल देयता यामध्ये संबंध प्रस्तापित करतो. आदर्श चल अनुपात २:१ समजला जातो यावरून असे दिसते की चल संपत्ती ही चल देयते पेक्षा दुप्पट आहे.

$$\text{चल अनुपात :} \quad \frac{\text{चल संपत्ती}}{\text{चल देयता}}$$

| चल संपत्ती | चल देयता |
|---|---|
| (१) विविध ऋणको | (१) विविध धनको |
| (२) सुटे साहित्य | २) देय विपत्र |
| (३) प्राप्य विपत्र | (३) अधिकोष अधिविकर्ष |
| (४) रोख आणि बँक शिल्लक | (४) पूर्व प्राप्त उत्पन्न |
| (५) गुंतवणूक | (५) अल्प मुदती कर्ज |
| (६) दिलेले अग्रीम व अल्प मुदती कर्ज | (६) कर आकारणीवरील तरतूद |
| (७) मालसाठा / स्कंध | (७) अदत्त खर्च |
| (८) पूर्वदत्त खर्च इत्यादी | (८) दावा न केलेले लाभांश इत्यादी |

**(२) तरल अनुपात / जलद अनुपात / आम्ल चाचणी अनुपात :** हा अनुपात म्हणजे जलद संपत्ती आणि चल देयता यांच्यातील सहसंबंध होय.

जलद संपत्ती म्हणजे अशा चल संपत्ती होय की ज्या ताबडतोब किंवा अलप मुदतीच्या सूचनेवर कोणत्याही प्रकारचे मूल्य कमी न होता रोखीमध्ये रूपांतरीत होतात. चल संपत्ती मधून मालसाठा आणि पूर्वदत्त खर्च वजा केल्यास राहिलेल्या संपत्तीला जलद संपत्ती समजतात.

व्यवसाय संस्थेची तरल स्थिती मूल्यांकनात १:१. हा आदर्श जलद अनुपात आहे.

$$\text{तरल अनुपात} = \frac{\text{तरल संपत्ती/ जलद संपत्ती}}{\text{चल देयता}}$$

तरल संपत्ती = चल संपत्ती – (स्कंध + पूर्वदत्त खर्च)

जलद संपत्ती = रोख शिल्लक + बँक शिल्लक + ऋणको + प्राप्यविपत्र + विपणन प्रतिभूती (Marketable securities)

तरल देयता = चल देयता – ( बँक अधिकर्ण आणि अग्रीम रक्कम)

## (ब) उत्पन्न विवरण अनुपात / लाभ क्षमता अनुपात :

**(१) सकल लाभ अनुपात :** हा अनुपात शुद्ध विक्री आणि सकल लाभ यांच्यातील संबंध दर्शविते असे अनुपात, कोणते उत्पादन किंवा कोणत्या वस्तूंची विक्री आणि प्रक्रीया चालू ठेवण्यास सक्षम आहे. हे निश्चित करण्यासाठी मार्गदर्शक ठरतात.

सकल लाभ = शुद्ध विक्री – विक्री योग्य मालाची किंमत

विक्री योग्य मालाची किंमत = प्रारंभन स्कंध + खरेदी + प्रत्यक्ष खर्च – संवरण स्कंध

शुद्ध विक्री = विक्री – विक्री परत

$$\text{सकल लाभ अनुपात} = \frac{\text{सकल भाग}}{\text{शुद्ध विक्री}} \times १००$$

**आपल्याला खर्चाची दोन गटात विभागणी करता येईल.**

**(अ) परिचालन खर्च (Operating Expenses):** व्यवसायाच्या दैनंदिन प्रक्रिया पार पाडतांना खर्च केले जातात. त्या सर्व खर्चांचा अंतर्भाव परिचालन खर्चात होतो. उदा. कार्यालय व प्रशासन खर्च, विक्री व वितरण खर्च इ.

परिचालन लाभ = सकल लाभ – परिचालन खर्च

**(ब) अपरिचालन खर्च (Non Operating Expenses):** अपरिचालन खर्चात खालील खर्चाचा समावेश होतो. जसे स्थिर संपत्तीवरील घसारा, स्थिर संपत्ती विक्रीवरील तोटा, अग्नीपासून झालेले नुकसान, ख्यातीचे अपलेखन, भाग आणि कर्ज रोख्यावरील कसर, प्रास्तावित खर्च इत्यादी. परिचालन लाभ अनुपात व्यवसायाची परिचालन क्षमता दर्शविते.

**शुद्ध लाभ अनुपात :** हा अनुपात शुद्ध लाभ आणि शुद्ध विक्री यांच्यातील संबंध दर्शविते. हा अनुपात व्यवसायाच्या सर्वच क्षमतेवर प्रकाश टाकतो.

$$\text{शुद्ध लाभ अनुपात} = \frac{\text{शुद्ध लाभ}}{\text{शुद्ध विक्री}} \times १००$$

शुद्ध लाभ = परिचालन नफा + अपरिचालन उत्पन्न – अपरिचालन खर्च

**अपरिचालन उत्पन्न (Non Operating Income) :**

**अपरिचालन उत्पन्न :** अपरिचालन उत्पन्नात अव्यवसायिक कृत्यापासून झालेल्या उत्पन्नाचा समावेश असतो. जसे प्राप्त व्याज, प्राप्त लाभांश, प्राप्त नुकसानभरपाई, प्राप्त परतावा, स्थिर संपत्ती किंवा गुंतवणूक विक्रीवर मिळालेला नफा. असा शुद्ध लाभ, आयकर कपात करण्याआधी किंवा आयकर कपात केल्यानंतर ही घेता येतो.

या अनुपाताचा मुख्य उद्देश म्हणजे गुंतवणुकीवरील परतावा जाणून घेणे होय.

**परिचालन अनुपात (Operating Ratio) :** परिचालन नफा अनुपातामुळे परिचालन नफा आणि विक्री यांच्यातील संबंध दर्शविला जातो. सामान्यतः तो टक्केवारी स्वरूपात दर्शवितात. यालाच शुद्ध परिचालन नफा अनुपात असे म्हटले जाते.

**सूत्र :**

$$\text{परिचालन नफा अनुपात} = \frac{\text{परिचालन नफा}}{\text{शुद्ध विक्री}} \times १००$$

परिचालन नफा = ढोबळ नफा – परिचालन खर्च.

निव्वळ विक्री = विक्री – विक्री परत – विक्री खर्च

**परिचालन अनुपात (Operating Ratio) :**

परिचालन नफा अनुपातामुळे परिचालन नफा आणि विक्री यांच्यातील संबंध दर्शविला जातो. सामान्यतः तो टक्केवारी स्वरूपात दर्शवितात. यालाच शुद्ध परिचालन नफा अनुपात असे म्हटले जाते.

**सूत्र :**

$$\text{परिचालन अनुपात} = \frac{\text{विक्रीत मालाचे मूल्य + परिचालन खर्च}}{\text{निव्वळ विक्री}} \times १००$$

विक्रीत मालाचे मूल्य = प्रारंभण स्कंध + खरेदी + मजूरी – संवरण स्कंध

परिचालन खर्च = १) कार्यालय व प्रशासकीय खर्च
२) विक्री आणि वितरण खर्च
३) वित्त खर्च (कर्ज व कर्ज रोखेवरील व्याज वगळता)

निव्वळ विक्री = विक्री – विक्री परत – विक्री खर्च

**(क) संयुक्त अनुपात (Combined Ratio) :**

**(अ) गुंतवणुकीवर परतावा (Returned on Investment ROI):** हा अनुपात आयकरापूर्वीचा शुद्‌ध लाभ आणि विनियोजित भांडवलावरील व्याज यांच्यातील संबंध स्पष्ट करतो. हा अनुपात व्यवसायाची कार्यक्षमता व लाभ क्षमता याची एकूणच गणना आणि मूल्यमापन करतो.

**गुंतवणुकीवर परतावा :**

$$= \frac{\text{आयकरपूर्वीचा लाभ, व्याज, लाभांश}}{\text{विनियोजित भांडवल}} \times १००$$

बारावीच्या अभ्यासक्रमात कंपनी कायदा तपशीलात नसल्यामुळे गुंतवणूकीवरील परतावा

$$= \frac{\text{शुद्‌ध नफा}}{\text{विनियोजित भांडवल}} \times १००$$

**विनियोजित भांडवल** = समभाग भांडवल + अग्र हक्क भाग भांडवल + संचित आणि निधी + कर्ज रोख्यांपासूनचे भांडवल व इतर दीर्घ मुदती कर्ज

**विनियोजित भांडवल** = स्थिर संपत्ती + चल संपत्ती – चल देयता.

या अनुपाताद्‌वारे कंपनीच्या विनियोजित भांडवलसंबंधी प्रति रुपयात नफा निर्मितीची क्षमता दर्शविली जाते.

**(ब) विनियोजित भांडवलावर परतावा अनुपात (Returned on Capital Employed ROCE):** हा अनुपात व्याज, कर आणि भागधारकांचे भांडवल आणि शुद्‌ध लाभ यांच्यातील संबंधीची गणना करतो. हा भांडवल सम आणि अग्रहक्क भागधारकाकडून पुरविला जातो.

विनियोजित भांडवलावर : $\frac{\text{करपूर्वीचा लाभ}}{\text{शुद्‌ध विनियोजित भांडवल}}$

शुद्‌ध विनियोजित भांडवल = एकूण संपत्ती – चल देयता

= स्थिर संपत्ती + चल संपत्ती – चल देयता

या अनुपाताद्‌वारे भागधारकांनी गुंतविलेल्या निधीचा उपयोग होतो किंवा नाही हे दर्शविले जाते.

हा अनुपात गुंतवणूक परताव्यापेक्षा अधिक असावयास पाहिजे.

## प्रात्यक्षिक उदाहरणे

**ताळेबंद अणुपात**

**उदाहरण १ : एका कंपनीची चल संपत्ती आणि चल देयता खालील प्रमाणे होती.**

ऋणको – ₹ ६०,०००, धनको – ₹ ३०,०००, देयविपत्र – ₹ २०,०००, स्कंध – ₹ ३०,०००, सुटे साहित्य – ₹ १०,०००, अधिकोष अधिविकर्ष = ₹ १०,००० चल अनुपाताची गणना करा.

(१) **चल संपत्ती** = ऋणको + स्कंध + सुटे साहित्य
= ६०,००० + ३०,००० + १०,०००
= ₹ १,००,०००

(२) **चल देयता** = धनको + देयविपत्र+ अधिकोष अधिविकर्ष
= ३०,००० + २०,००० + १०,०००
= ६०,०००

**चल अनुपात** $= \frac{\text{चल संपत्ती}}{\text{चल देयता}} = \frac{१,००,०००}{६०,०००} = \frac{१०}{६} = \frac{५}{३} = ५:३$

**कृतीकार्य : १** कंपनीकडे चलसंपत्ती आणि चलदेयता आहे. ऋणको ₹ ९०,०००, धनको – ₹ ४५,०००, देयविपत्र ₹ १०,०००, स्कंध ₹ ४०,०००, सुटी अवजारे ₹२०,०००, बँक ओव्हर ड्राफ्ट ₹ २०,०००.चल अनुपाताची गणना करा. (उत्तर = २:१)

**उदाहरण २ :** एका कंपनीची चल देयता ₹ १,५०,००० होती आणि त्या कंपनीचा चल अनुपात ३:१ असा आहे. चल संपत्ती शोधा.

$$\textbf{चल अनुपात} = \frac{\text{चल संपत्ती}}{\text{चल देयता}}$$

$$\frac{३}{१} = \frac{\text{चल संपत्ती}}{१,५०,०००}$$

$$\text{चल संपत्ती} = ३ \times १,५०,०००$$

$$= ₹\ ४,५०,०००$$

**कृताकार्य : २** एका कंपनीची चल संपत्ती ₹ ६,००,००० होती आणि त्या कंपनीचा चल अनुपात २: १ असा आहे. चल देयता शोधा. (उत्तर = ₹ ३,००,०००)

**उदाहरण ३ :**

एकूण संपत्ती = ₹ २,२०,०००
स्थिर संपत्ती = ₹ १,००,०००
विनियोजित भांडवल = ₹ २,००,०००

या ठिकाणी कोणतीही दीर्घ मुदतीची गुंतवणूक नाही. **चल अनुपाताची गणना करा.**

**उत्तर :** चल अनुपाताची गणना

$$\textbf{चल अनुपात} = \frac{\text{चल संपत्ती}}{\text{चल देयता}}$$

**चल संपत्ती** = एकूण संपत्ती – स्थिर संपत्ती
= २,२०,००० – १,००,०००
= ₹ १,२०,०००

**चल देयता** = एकूण संपत्ती – नियोजित भांडवल
= २,२०,००० – २,००,०००
= २०,०००

$$\textbf{चल अनुपात} = \frac{\text{चल संपत्ती}}{\text{चल देयता}}$$

$$= \frac{१,२०,०००}{२०,०००} = ६:१$$

**उदाहरण ४ : खालील माहितीच्या आधारे जलद अनुपाताची गणना करा.**

खेळते भांडवल ₹ ५०,०००, चल संपत्ती ₹ ६०,०००, स्कंध – ₹ १०,०००, पूर्वदत्त खर्च – ₹ ४,०००

**उत्तर :** **जलद संपत्ती** = चल संपत्ती – स्कंध – पूर्वदत्त खर्च
= ६०,००० – १०,००० – ४,०००
= ₹ ४६,०००

∴ **जलद देयता** = चल संपत्ती – खेळते भांडवल

= ६०,००० – ५०,०००

= ₹ १०,०००

**जलद अनुपात** = $\frac{\text{जलद संपत्ती}}{\text{जलद देयता}}$

= $\frac{४६,०००}{१०,०००}$ = $\frac{४६}{१०}$ = ४.६ : १

**उदाहरण ५ (जलद अनुपात) :**

चल देयता – ₹ १,५०,०००, धनको – ₹ ३०,०००, खेळते/कार्यकारी भांडवल – ₹ ४,००,००० आणि इनवेंटरी – ₹ १,००,०००. **जलद अनुपाताची गणना करा.**

**उत्तर : चल अनुपात** = चल देयता + खेळते भांडवल

= १,५०,००० + ४,००,०००

= ₹ ५,५०,०००

**जलद संपत्ती** = चल संपत्ती – इनवेंटरी (सामग्री)

= ५,५०,००० – १,००,०००

= ₹ ४,५०,०००

जलद देयता = चलदेयता – बँक ओव्हर ड्राफ्ट

= १,५०,००० – ५०,०००

∴ = ₹ १,००,०००

**जलद अनुपात** = $\frac{\text{जलद संपत्ती}}{\text{जलद देयता}}$

= $\frac{४,५०,०००}{१,००,०००}$

= ४.५:१

**उदाहरण क्र.१ :** X Y Z कंपनीचा चल अनुपात २:१ आणि जलद अनुपात १.५:१ असा आहे. त्यांची चल देयता ₹ १,००,००० असून **स्कंधाच्या मूल्याची गणना करा.**

**उत्तर : चल संपत्ती** = $\frac{\text{चल संपत्ती}}{\text{चल देयता}}$

२ = $\frac{\text{चल संपत्ती}}{१,००,०००}$

**चल संपत्ती** = ₹ २,००,०००

**जलद अनुपात** = $\frac{\text{जलद संपत्ती}}{\text{जलद देयता}}$

१.५ = $\frac{\text{जलद संपत्ती}}{१,००,०००}$

**जलद संपत्ती** = १.५ × १,००,००० = ₹ १,५०,०००

**स्कंध** = चल संपत्ती – जलद संपत्ती

= २,००,००० – १,५०,०००

= ₹ ५०,०००

**(B) उत्पन्न विवरण अनुपात (Income Statement Ratio) :**

**उदाहरण : (सकल लाभ अनुपात)**

**सकल लाभ अनुपाताची गणना करा.**

विक्री – ₹ ५,४०,०००, शुद्ध खरेदी – ₹ ३,००,०००

विक्री परत – ₹ ४०,००० सवंरण स्कंध – ₹ ५०,०००

प्रारभंन स्कंध – ₹ ९०,०००

**उत्तर :**

**विक्री योग्य मालाचे मूल्य** = प्रारंभन स्कंध + खरेदी – सवंरण स्कंध

= ९०,००० + ३,००,००० – ५०,०००

= ₹ ३,४०,०००

**शुद्ध विक्री** = विक्री – विक्री परत

= ५,४०,००० – ४०,०००

= ₹ ५,००,०००

**सकल लाभ** = शुद्ध विक्री – विक्री योग्य मालाचे मूल्य

= ५,००,००० – ३,४०,०००

= ₹ १,६०,०००

**सकल लाभ अनुपात** $= \frac{\text{सकल लाभ}}{\text{शुद्ध विक्री}} \times १००$

$= \frac{१,६०,०००}{५,००,०००} \times १००$

= ३२%

**उदाहरण ७ : सकल लाभ अनुपात (Gross Profit Ratio)**

खाली दिलेल्या अनुपाताच्या आधारे सकल लाभ अनुपाताची गणना करा. विक्री –₹ ५,००,०००, सकल लाभ अनुपात २५%, विक्री मूल्यावर .

**उत्तर :** विक्री योग्य मूल्यावर २५% सकल लाभ

त्याकरीता स्कंधाचे मूल्य ₹ १०० असले आणि हा स्कंध ₹ १२५ विकला म्हणून विक्री ₹ १२५. असेल तर सकल लाभ ₹ २५ येईल.

जर विक्री मूल्य ₹ ५,००,०००,तर सकल लाभ खालील प्रमाणे राहील :

सकल लाभ = ५,००,००० $\times \frac{२५}{१२५}$ = ₹ १,००,०००

सकल लाभ अनुपात $= \dfrac{\text{सकल लाभ}}{\text{शुद्ध विक्री}} \times १००$

$= \dfrac{१,००,०००}{५,००,०००} \times १००$

$= २०\%$

**उदाहरण ८ : शुद्ध लाभ अनुपात (Net Profit Ratio)**

**खालील माहितीच्या आधारे शुद्ध लाभ अनुपाताची गणना करा.**

विक्री = ₹ ७,६०,०००

विक्री योग्य स्कंधाचे मूल्य = ₹ ५,२०,०००

अप्रत्यक्ष खर्च = ₹ १,२०,०००

**उत्तर :**

| | | |
|---|---|---|
| विक्री | = | ₹ ७,६०,००० |
| वजा – विक्री योग्य स्कंधाचे मूल्य | = | ₹ ५,२०,००० |
| सकल लाभ | = | ₹ २,४०,००० |
| वजा – अप्रत्यक्ष खर्च | = | ₹ १,२०,००० |
| शुद्ध लाभ | = | ₹ १,२०,००० |

शुद्ध लाभ अनुपात $= \dfrac{\text{शुद्ध लाभ}}{\text{विक्री}} \times १००$

$= \dfrac{१,२०,०००}{७,६०,०००} \times १००$

$= १५.७९\ \%$

**उदाहरण ९ : शुद्ध लाभ अनुपात**

कोमल कंपनीचा आर्थिक वर्ष २०१९-२० चा सकल लाभ ₹ ५,६०,००० आहे. **खालील माहितीच्या आधारे शुद्ध लाभ अनुपाताची गणना करा.**

| | | |
|---|---|---|
| प्रशासकीय खर्च | = | ₹ १,६०,००० |
| विक्री आणि वितरण खर्च | = | ₹ १,२०,००० |
| कर्ज रोखेवरील व्याज | = | ₹ ६०,००० |
| विक्री | = | ₹ २०,००,००० |

शुद्ध लाभाची गणना

| **सकल लाभ** | ₹ | ५,६०,००० (₹) |
|---|---|---|
| वजा : प्रशासकीय खर्च | १,६०,००० | |
| विक्री आणि वितरण खर्च | १,२०,००० | |
| कर्ज रोखेवरील व्याज | ८०,००० | ३,६०,००० |
| शुद्ध लाभ | | २,००,००० |

शुद्ध लाभ अनुपात $= \dfrac{\text{शुद्ध लाभ}}{\text{विक्री}} \times १००$

$= \dfrac{२,००,०००}{२०,००,०००} \times १००$

$= १०\%$

**उदाहरण १० : परिचालन अनुपात (Operating Ratio)**

**परिचालन अनुपाताची गणना करा.**

विक्री योग्य स्कंधाचे मूल्य = ₹ ७,००,०००

परिचालन खर्च = ₹ ६०,०००

विक्री = ₹ १०,००,०००

विक्री परत = ₹ ६०,०००

परिचालन अनुपात $= \dfrac{\text{विक्री योग्य स्कंधाचे मूल्य – परिचालन खर्च}}{\text{शुद्ध विक्री}} \times १००$

शुद्ध विक्री = विक्री – विक्री परत

= १०,००,००० – ६०,०००

= ₹ ९,४०,०००

$= \dfrac{७,००,००० + ६०,०००}{९,४०,०००} \times १००$

=८०.८५%

**उदाहरण ११ : खालील माहितीच्या आधारे परिचालन अनुपाताची गणना करा.**

| | |
|---|---|
| विक्री | ₹ ५,००,००० |
| विक्री परत | ₹ ५०,००० |
| प्रारंभण स्कंध | ₹ ६०,००० |
| खरेदी | ₹ २,२०,००० |
| सवंरण स्कंध | ₹ ४०,००० |
| कार्यालय व प्रशासकीय खर्च | ₹ ३४,००० |
| विक्री व विवरण खर्च | ₹ ३६,००० |

परिचालन अनुपात $= \dfrac{\text{विक्री योग्य स्कंधाचे मूल्य + परिचालन खर्च}}{\text{शुद्ध विक्री}} \times १००$

विक्री योग्य स्कंधाचे मूल्य = प्रारंभण स्कंध + खरेदी – सवंरण स्कंध

= ६०,००० + २,२०,००० – ४०,०००

= ₹ २,४०,०००

शुद्ध विक्री = विक्री – विक्री परत

= ५,००,००० – ५०,०००

= ₹ ४,५०,०००

परिचालन खर्च = कार्यालय व प्रशासकीय खर्च + विक्री व विवरण खर्च

= ३४,००० + ३६,०००

= ₹ ७०,०००

परिचालन अनुपात $= \dfrac{२,४०,००० – ७०,०००}{४,५०,०००} \times १००$

= ६८.८९ %

**उदाहरण १२ : परिचालन अनुपात (Operating Ratio)**

नोहा संस्थेचे दि. ३१ मार्च, २०२० चे व्यापार आणि नफा तोटा खाते खालील प्रमाणे आहे.

**व्यापार आणि नफा तोटा खाते**

**नावे** **जमा**

| तपशील | रक्कम (₹) | तपशील | रक्कम (₹) |
|---|---|---|---|
| प्रारंभण स्कंध | ४०,००० | विक्री | ४,२०,००० |
| खरेदी | २,३०,००० | सवंरण स्कंध | ६०,००० |
| मजुरी | ८,००० | | |
| सकल लाभ | २,०२,००० | | |
| | ४,८०,००० | | ४,८०,००० |
| प्रशासकीय खर्च | १२,००० | सकल लाभ | २,०२,००० |
| विक्री व वितरण खर्च | १४,००० | | |
| सयंत्र विक्रीवरील तोटा | ४०,००० | | |
| शुद्ध लाभ | १,३६,००० | | |
| | २,०२,००० | | २,०२,००० |

**परिचालन अनुपात गणना करा.**

**उत्तर :** परिचालन अनुपात = $\frac{\text{विक्री योग्य स्कंधाचे मूल्य + परिचालन खर्च}}{\text{शुद्ध विक्री}} \times १००$

विक्री योग्य स्कंधाचे मूल्य = विक्री – सकल लाभ

= ४,२०,००० – २,०२,०००

= ₹ २,१८,०००

= $\frac{२,१८,००० + (१२,००० + १४,०००)}{४,२०,०००} \times १००$

= $\frac{२,४४,०००}{४,२०,०००} \times १००$

= ५८.०९ %

**उदाहरण १३ : संयुक्त अनुपात / मिश्र अनुपात (Combine Ratio / Mix Ratio)**

**खालील माहितीवरून गुंतवणुकीवरील परतावा काढा.**

प्राप्त नफा – ₹ ५०,०००

भांडवल – ₹ २,००,०००

राखीव – ₹ १,००,०००

कर्ज – ₹ २,००,०००

गुंतवणुकीवरील परतावा = $\frac{\text{निव्वळ नफा}}{\text{विनियोजित भांडवल}} \times १००$

विनियोजित भांडवल = २,००,००० + १,००,००० + २,००,०००

$= ₹ ५,००,०००$

$= \frac{५०,०००}{५,००,०००} \times १००$

$= १०\%$

**उदाहरण १४ : खालील माहितीवरून भांडवल गुंतवणुकीवरील परतावा शोधून काढा.**

| | |
|---|---|
| विक्री – | ₹ १०,००,००० |
| विक्रीत मालाचे मूल्य – | ₹ ५,००,००० |
| परिचालन खर्च– | ₹ ३,००,००० |
| विनियोजित भांडवल | ₹ ५,००,००० |

भांडवल गुंतवणुकीवरील परतावा $= \frac{\text{निव्वळ नफा}}{\text{विनियोजित भांडवल}} \times १००$

निव्वळ नफा $= १०,००,००० - ५,००,००० - ३,००,०००$

$= ₹ २,००,०००$

$= \frac{२,००,०००}{१,००,०००} \times १००$

$= ४०\%$

**तुलनात्मक ताळेबंद**

**खालील दिलेला ताळेबंद नोहा टेक्सटाईल लिमिटेड कंपनीचा आहे. त्या आधारे तुलनात्मक ताळेबंद तयार करून होणाऱ्या बदलावर भाष्य करा.**

**ताळेबंद (३१/०३/२०१८ आणि ३१/०३/२०१९ रोजीचा)**

| भांडवल व देयता | ३१.३.२०१८ (₹) | ३१.३.२०१९ (₹) | संपत्ती | ३१.३.२०१८ (₹) | ३१.३.२०१९ (₹) |
|---|---|---|---|---|---|
| चल देयता | २,००,००० | ४,००,००० | स्थिर संपत्ती | १२,००,००० | १८,००,००० |
| राखीव निधी | ३,००,००० | २,००,००० | वजा – घसारा अवितरित | २,००,००० | ३,००,००० |
| १२% बँक कर्ज | ५,००,००० | ८,००,००० | | १०,००,००० | १५,००,००० |
| भाग भांडवल | ५,००,००० | १०,००,००० | चल संपत्ती | ५,००,००० | ९,००,००० |
| | १५,००,००० | २४,००,००० | | १५,००,००० | २४,००,००० |

**उत्तर :** **नोहा टेक्सटाईल्स लि. चे ३१.०३.२०१८ आणि ३१. ०३.२०१९ रोजीची तुलनात्मक ताळेबंद**

| तपशील | ३१/३/२०१८ (₹) | ३१/३/२०१९ (₹) | अंतिम वाढ/घट (₹) | टक्केवारीत वाढ/घट(₹) |
|---|---|---|---|---|
| १) स्थिर सपंत्ती | १२,००,००० | १८,००,००० | ६,००,००० | ५०% |
| (–) संचित घसारा | २,००,००० | ३,००,००० | १,००,००० | ५०% |
| (अ) निव्वळ स्थिर संपत्ती | १०,००,००० | १५,००,००० | ५,००,००० | ५०% |
| चल संपत्ती | ५,००,००० | ९,००,००० | ४,००,००० | ८०% |
| (–) चार देयता | २,००,००० | ४,००,००० | २,००,००० | १००% |
| (ब) खेळते भांडवल | ३,००,००० | ५,००,००० | २,००,००० | ६६.६७% |
| (क) विनियोजित भांडवल | १३,००,००० | २०,००,००० | ७,००,००० | ५३.८४% |
| (ड) वजा-१२% बँक कर्ज | ५,००,००० | ८,००,००० | ३,००,००० | ६०% |
| (ई) भागधारकांचा निधी (क-ड) | ८,००,००० | १२,००,००० | ४,००,००० | ५०% |
| भाग भांडवल | ५,००,००० | १०,००,००० | ५,००,००० | १००% |
| राखीव निधी | ३,००,००० | २,००,००० | १,००,००० | ३३.३३% |
| भागधारकांची निधी | ८,००,००० | १२,००,००० | ४,००,००० | ५०% |

**कार्य टिपा : ताळेबंदात होणाऱ्या घट आणि वाढीची टक्केवारीची गणना.**

**२०१९ मध्ये पूर्णबदल**

**२०१९ मधील पूर्ण आकडेवारी**

**(१)** $= \frac{६,००,०००}{१२,००,०००} \times १००$

= ५०% वाढ

**(२)** $= \frac{१,००,०००}{२,००,०००} \times १००$

= ५०% वाढ

**टीपणी :** तुलनात्मक ताळेबंदाचे विश्लेषण करतांना खालील निष्कर्ष दिसून आले.

१) एकूण स्थिर संपत्तीमध्ये ₹ ६,००,००० वाढ झाली म्हणजे स्थिर संपत्तीत ५०% वाढ झाली.

२) स्थिर संपत्ती अंशतः कर्ज घेऊन खर्दी केली आणि ₹ ५,००,००० चे भाग विक्रीसाठी काढले आणि त्यामुळे कर्जामध्ये वाढ झाल्याचे दिसून आले.

३) भाग भांडवलात ₹ ५,००,००० ची वाढ झाली ही वाढ १००% आहे. यामुळे कंपनीची आर्थिक परिस्थिती मजबूत झाल्याचे दिसून येते.

४) राखीव निधी / संचितीमध्ये ₹ १,००,००० घट झालेली दिसून येते ही घट ३३.३३% इतकी आहे. यावरून असे प्रतिबिंबीत होते की चालू वर्षात व्यवसायाला नुकसान झालेला आहे.

५) चल देयतेमध्ये ₹ २,००,००० ची वाढ दिसून येते. ही वाढ १००% आहे. परंतु चल संपत्ती सुद्धा ₹ ४,००,००० वाढल्याचे दिसते ही वाढ १०% इतकी आहे. याचे परिणाम खेळते भांडवलात ₹ २,००,००० वाढ झालेली दिसते. यामुळे कर्ज घेण्याच्या वित्तीय स्थितीत वाढ होते.

**उदाहरण १५ :**

**तुलनात्मक उत्पन्न विवरण**

**शालीनी कंपनी लि. च्या खालील माहितीच्या आधारे तुलनात्मक उत्पन्न विवरण तयार करा.**

| तपशील | २०१८ (₹) | २०१९ (₹) |
|---|---|---|
| विक्री | ६,००,००० | ४,५०,००० |
| विक्री परत | १,००,००० | ५०,००० |
| सकल लाभ अनुपात | ४०% | ५०% |
| कार्यालय व प्रशासकीय खर्च | ५०,००० | ४०,००० |
| विक्री आणि वितरण खर्च | ५०,००० | ४०,००० |
| इतर उत्पन्न | २५,००० | १५,००० |
| इतर खर्च | ५,००० | ५,००० |
| कर आकारण्याचा दर | ५०% | ५०% |

**उत्तर :** शालीनी कंपनी लि.

**तुलनात्मक उत्पन्न विवरण**

| तपशील | २०१८ (₹) | २०१९ (₹) | पूर्णपणे बदल (₹) | टक्केवारीत बदल वाढ/घट |
|---|---|---|---|---|
| सकल विक्री | ६,००,००० | ४,५०,००० | (१,५०,०००) | २५%घट |
| वजा : विक्री परत | १,००,००० | ५०,००० | (५०,०००) | २०%घट |
| वजा : विक्री योग्य मूल्य किंमत<br>(अ) सकल लाभ | ३,००,०००<br>२,००,००० | २,००,०००<br>२,००,००० | (१,००,०००)<br>– | ३३.३३%<br>– |
| वजा : परिचालन खर्च | – | – | – | – |
| कार्यालय व प्रशासकीय खर्च | ५०,००० | ४०,००० | १०,००० | २०%वाढ |
| विक्री आणि वितरण खर्च | ५०,००० | ४०,००० | १०,००० | २०%वाढ |
| (ब) | १,००,००० | ८०,००० | २०,००० | २०%वाढ |
| परिचालन लाभ / नफा | १,००,००० | १,२०,००० | २०,००० | २०%वाढ |
| अधिक : परिचालन उत्पन्न | २५,००० | १५,००० | (१०,०००) | ४०%घट |
| वजा : अपरिचालन उत्पन्न | ५,००० | ५,००० | – | – |
| खर्च | १,२०,००० | १,३०,००० | १०,००० | ८.३३%घट |
| वजा : ५०% कर | ६०,००० | ६५,००० | ५,००० | ८.३३%घट |
| कर नंतरचा शुद्ध लाभ | ६०,००० | ६५,००० | ५,००० | ८.३३%घट |

**टीपणी :** वरील आर्थिक आकडेवारी विक्रीशी संबंधित आहे. कंपनीचा खर्च आणि उत्पन्न हे उत्साहवर्धक नसल्यामुळे शुद्ध लाभामध्ये फक्त ८.३३% वाढ दिसून येते.

## सूत्र एका दृष्टीक्षेपात

**(At a Glance of Formulas)**

I) तुलनात्मक विवरण (Comparative Statement)

१) परिपूर्ण बदल = चालू वर्ष – मागील वर्ष

२) $\% \text{ बदल} = \dfrac{\text{परिपूर्ण बदल}}{\text{मागील वर्ष}} \times १००$

II) सामान्य आकाराचे विवरण (Common Size Statement)

१) ताळेबंद

$\text{सूत्र} = \dfrac{\text{वैयक्तिक घटकांची रक्कम}}{\text{एकूण उपलब्ध निधी}} \times १००$

२) उत्पन्न विवरण (Income Statement)

$\text{सूत्र} = \dfrac{\text{वैयक्तिक घटकांची रक्कम}}{\text{निव्वळ विक्री}} \times १००$

III) अनुपात विश्लेषण (Ratio Analysis)

१) ताळेबंद अनुपात

अ) $\text{चल अनुपात} = \dfrac{\text{चल संपत्ती}}{\text{चल देयता}} \times १००$

ब) $\text{जलद अनुपात} = \dfrac{\text{जलद संपत्ती}}{\text{जलद देयता}} \times १००$

२) उत्पन्न विवरण अनुपात (Income Statement Ratio)

अ) $\text{सकल लाभ अनुपात} = \dfrac{\text{सकल लाभ}}{\text{निव्वळ विक्री}} \times १००$

ब) $\text{परिचालन नफा अनुपात} = \dfrac{\text{परिचालन नफा}}{\text{निव्वळ विक्री}} \times १००$

क) $\text{शुद्ध नफा अनुपात} = \dfrac{\text{करपूर्वीचा शुद्ध नफा}}{\text{निव्वळ विक्री}} \times १००$

पर्यायी सूत्र

ड) $\text{परिचालन अनुपात} = \dfrac{\text{विक्रीत मालाचे मूल्य} + \text{परिचालन खर्च}}{\text{निव्वळ विक्री}} \times १००$

३) संयुक्त अनुपात / मिश्र अनुपात : (Mixed / Combined Ratio)

अ) $\text{भांडवल गुंतवणुकीवरील परतावा} = \dfrac{\text{व्याज आणि करपूर्वीचा शुद्ध नफा}}{\text{गुंतविलेले निव्वळ भांडवल}} \times १००$

ब) $\text{गुंतवणुकीवरील परतावा} = \dfrac{\text{करपूर्वीचा शुद्ध नफा}}{\text{विनियोजित भांडवल}} \times १००$

### वस्तूनिष्ठ स्वरूपाचे प्रश्न

### अ) खालील दिलेल्या पर्यायामधून योग्य पर्याय निवडून वाक्य पुन्हा लिहा.

१) सकल लाभ अनुपात हा सकल लाभ आणि ..................मधील सबंध दर्शवितो.
अ) शुद्ध रक्कम ब) शुद्ध विक्री
क) शुद्ध खरेदी ड) सकल विक्री

२) चल अनुपात = ................................ / चल देयता
अ) जलद संपत्ती ब) जलद देयता
क) चल संपत्ती ड) वरील पैकी एकही नाही

३) तरल संपत्ती = .....................
अ) चल संपत्ती + स्कंध ब) चल संपत्ती – स्कंध
क) चल संपत्ती – स्कंध + पूर्वदत्त खर्च ड) वरील पैकी एकही नाही

४) स्कंधाची विक्री योग्य मूल्य / किंमत ...................
अ) विक्री – सकल लाभ ब) विक्री – शुद्ध लाभ
क) विक्री ड) वरील पैकी एकही नाही

५) १०० % शुद्ध लाभ अनुपात हा .................. ला समान आहे.
अ) परिचालन अनुपात ब) परिचालन शुद्ध लाभ अनुपात
क) सकल लाभ अनुपात ड) चल अनुपात

६) सामान्य आकाराच्या विवरणला ..................आवश्यक आहे.
अ) सामान्य आधाराची ब) रोजकीर्द नोंदी
क) रोख प्रवाह ड) चल अनुपात

७) देय विपत्र हे ..................होय.
अ) दीर्घ मुदती कर्ज ब) चल देयता
क) तरल संपत्ती ड) शुद्ध हानी

८) साधारणतः चल अनुपात ..................असतो.
अ) २:१ ब) १:१ क) १:२ ड) ३:१

९) आर्थिक विवरण विश्लेषणावरून धनको ................जाणून घेण्यास उत्सुक असतात.
अ) तरलता ब) लाभ / नफा
क) विक्री ड) भाग भांडवल

### ब) पुढील विधानासाठी एक शब्द, संज्ञा किंवा शब्द समूह द्या.

१) दोन वेगवेगळ्या कालावधीचे लाभ क्षमता दर्शविणारे विवरण.

२) शुद्ध विक्री आणि सकल लाभ यांच्यातील संबंध स्पष्ट करणारा अनुपात.

३) लाभ क्षमता मापनाचे आर्थिक विवरणाचे निर्णायक मूल्यांकन.

४) दोन लेखांकीय आकड्यामध्ये संबंध दर्शविणारी विशिष्ट गणितीय संख्या.

५) रोख रकमेत ताबडतोब परावर्तीत करता येऊ शकणारी संपत्ती.

६) व्यवसाय चालकाने गुंतविलेले भांडवल आणि शुद्ध लाभ यांच्यातील संबंध स्पष्ट करणारा अनुपात.

७) व्यवसायाच्या वेगवेगळ्या कालावधीचे किंवा मागील वर्ष व चालू वर्षाच्या वित्तीय स्थितीची माहिती दर्शविणारे विवरण.

८) एका विशिष्ट कालावधीचे रोख आणि रोख प्रवाहात होणारे बदल दर्शविणारे विवरण.

९) दीर्घ मुदतीत संपत्ती आणि गुंतवणूक संपादन करण्यासाठी केलेले संबंधित कार्य.

१०) जलद संपत्ती आणि चल देयता यांच्यातील संबंध स्थापन करणारा अनुपात.

### क) खालील विधाने चूक कि बरोबर सकारण ते लिहा.

१) वित्तीय विवरणात केवळ ताळेबंदाचा समावेश होतो.

२) वित्तीय विवरणाचे विश्लेषण हे साधन आहे तोडगा नव्हे.

३) स्थिर संपत्तीची खरेदी परिचालन रोख प्रवाह आहे.

४) दिलेला लाभांश हा निधीचा स्रोत नाही.

५) सकल लाभ हा शुद्ध विक्रीवर अवलंबून असतो.

६) प्रभूतीची रोखीने खरेदी हा निधीचा वापर समजला जातो.

७) अनुपात विश्लेषण दोन संस्थामधील तुलनेकरिता उपयोगी आहे.

८) अलप मुदतीच्या ठेवी रोकड समतुलय किंवा समान असतात.

९) क्रियाशील अनुपात आणि उलाढाल अनुपात हे एकसमान आहे.

१०) चल अनुपात हा फक्त व्यवसायाच्या तरलतेची आगणन करतो.

११) अनुपात विश्लेषणात व्यवसायाची वित्तीय सुबोधता आणि लाभ क्षमतेची मापना / आगणन होते.

१२) चल अनुपात सामान्यपणे ३:१ असते.

### ड) एका वाक्यात उत्तरे लिहा.

१) तुलनात्मक विवरणाचे दोन उद्देशांचा उल्लेख करा.

२) येणाऱ्या रोख प्रवाहाचे तीन उदाहरण लिहा.

३) जाणाऱ्या रोख प्रवाहाचे तीन उदाहरण लिहा.

४) अनुपात विश्लेषणाचा अर्थ स्पष्ट करा.

५) सकल लाभ अनुपाताचे सूत्र लिहा.

६) सकल लाभाचे सूत्र लिहा.

७) चल संपत्तीचे कोणतेही तीन उदाहरणे द्या.

८) चल अनुपाताचे सूत्र लिहा.

९) जलद संपत्तीचा सूत्र स्पष्ट करा.

१०) विक्री योग्य मालाचे सूत्र लिहा.

११) सरासरी स्कंधाचा सूत्र स्पष्ट करा.

**१. अमर ट्रेडर्स यांच्या ३१ मार्च २०१८ आणि ३१ मार्च २०१९ च्या ताळेबंदाच्या आधारे तुलनात्मक ताळेबंद तयार करा.**

**ताळेबंद (३१/०३/२०१८ आणि ३१/०३/२०१९ रोजीचा)**

| देयता | ३१.३.२०१८ (₹) | ३१.३.२०१९ (₹) | संपत्ती | ३१.३.२०१८ (₹) | ३१.३.२०१९ (₹) |
|---|---|---|---|---|---|
| भांडवल | ६०,००० | ७२,००० | स्थिर संपत्ती | १,२०,००० | १,५०,००० |
| निधी आणि वाढवा | २४,००० | ३०,००० | चल संपत्ती | २८,००० | २७,००० |
| कर्ज | ३४,००० | ५१,००० | | | |
| धनको | ३०,००० | २४,००० | | | |
| | १,४८,००० | १,७७,००० | | १,४८,००० | १,७७,००० |

**२. अल्फा लिमिटेड यांच्या खालील ताळेबंदावरून ३१/०३/२०१८ आणि ३१ मार्च २०१९ रोजीचे तुलनात्मक ताळेबंद तयार करा.**

**ताळेबंद (३१/०३/२०१८ आणि ३१/०३/२०१९ रोजीचा)**

| देयता | ३१.३.२०१८ (₹) | ३१.३.२०१९ (₹) | संपत्ती | ३१.३.२०१८ (₹) | ३१.३.२०१९ (₹) |
|---|---|---|---|---|---|
| सम हक्क भाग भांडवल | २,००,००० | २,५०,००० | जमीन | ८०,००० | १,००,००० |
| १२% अग्रहक्क भाग | ८०,००० | ८०,००० | इमारत | ६०,००० | ९०,००० |
| निधी आणि वाढवा | १,००,००० | १,४०,००० | यंत्र व सयंत्र | ७३,००० | १,७३,००० |
| १५% कर्ज रोखे | ६०,००० | ५१,००० | मालसाठा | १,५०,००० | १,१०,००० |
| धनको | ५०,००० | ८०,००० | ऋणको | १,२८,००० | १,४०,००० |
| देयविपत्र | १०,००० | ६,००० | बँक | ३४,००० | ३७,००० |
| करासाठी तरतूद | २५,००० | ४३,००० | | | |
| | ५,२५,००० | ६,५०,००० | | ५,२५,००० | ६,५०,००० |

**३. ३१/०३/२०१८ आणि ३१/०३/२०१९ रोजी संपणाऱ्या वर्षाकरिता तुलनात्मक ताळेबंद तयार करा.**

सपंत्ती व देयता खालील प्रमाणे

| तपशील | ३१/०३/२०१८ (₹) | ३१/०३/२०१९ (₹) |
|---|---|---|
| १) स्थिर संपत्ती | १,२०,००० | १,५०,००० |
| २) भाग भांडवल | ६०,००० | ७२,००० |
| ३) चल संपत्ती | २८,००० | २७,००० |
| ४) निधी आणि वाढवा | २४,००० | ३०,००० |
| ५) कर्ज | ३४,००० | ५७,००० |
| ६) चल देयता | ३०,००० | २४,००० |

४. ३१/०३/२०१७ आणि ३१/०३/२०१८ रोजी संपणाऱ्या वर्षाकरिता तुलनात्मक ताळेबंद तयार करा.

| तपशील | ३१/०३/२०१७ (₹) | ३१/०३/२०१८ (₹) |
|---|---|---|
| १) चल देयता | ६०,००० | ४८,००० |
| २) स्थिर संपत्ती | २,४०,००० | ३,००,००० |
| ३) कर्ज | ६८,००० | १,०२,००० |
| ४) भाग भांडवल | १,२०,००० | १,४४,००० |
| ५) निधी आणि वाढवा | ४८,००० | ६०,००० |
| ६) चल संपत्ती | ५६,००० | ५४,००० |

५. खालील माहितीवरून नोहा लिमीटेडचे ३१/०३/२०१७ आणि ३१/०३/२०१८ रोजी संपणाऱ्या वर्षाकरिता तुलनात्मक उत्पन्न विवरण तयार करा.

| तपशील | ३१/०३/२०१७ (₹) | ३१/०३/२०१८ (₹) |
|---|---|---|
| विक्री | २,००,००० | ३,००,००० |
| आयकर | ५०% | ५०% |
| विक्रीत मालाची किंमत | १,२०,००० | ८०,००० |
| अप्रत्यक्ष खर्च | ८,००० | १२,००० |

६. खालील माहितीवरून सौरभ लिमीटेडचे ३१/०३/२०१७ आणि ३१/०३/२०१८ रोजी संपणाऱ्या वर्षाकरिता उत्पन्न विवरण तयार करा.

| तपशील | ३१/०३/२०१७ (₹) | ३१/०३/२०१८ (₹) |
|---|---|---|
| विक्री | ४,००,००० | ६,००,००० |
| अप्रत्यक्ष खर्च | १६,००० | २४,००० |
| विक्रीत मालाची किंमत | २४,००० | ५६,००० |
| आयकर | ५०% | ५०% |

७. साक्षी ट्रेडर्स यांचे ३१/०३/२०१७ आणि ३१/०३/२०१८ रोजी संपणाऱ्या वर्षाचे ताळेबंद खालीलप्रमाणे आहे. त्यावरून सामान्य आकाराचे ३१/०३/२०१७ आणि ३१/०३/२०१८ चे ताळेबंद तयार

ताळेबंद (३१/०३/२०१८ आणि ३१/०३/२०१९ रोजीचा)

| देयता | ३१.३.२०१८ (₹) | ३१.३.२०१९ (₹) | संपत्ती | ३१.३.२०१८ (₹) | ३१.३.२०१९ (₹) |
|---|---|---|---|---|---|
| सम हक्क भाग भांडवल | ८०,००० | ८०,००० | स्थिर संपत्ती | १,२०,००० | १,४४,००० |
| अग्रहक्क भाग भांडवल | २०,००० | २०,००० | गुंतवणूक | २०,००० | २०,००० |
| राखीव निधी | २०,००० | २४,००० | चल संपत्ती | ६०,००० | ४८,००० |
| सुरक्षित कर्ज | ४०,००० | १६,००० | | | |
| असुरक्षित कर्ज | २०,००० | ३६,००० | | | |
| चल देयता | २०,००० | ३६,००० | | | |
| | २,००,००० | २,१२,००० | | २,००,००० | २,१२,००० |

८. ३१/०३/२०१७ आणि ३१/०३/२०१८ या संपणाऱ्या वर्षाकरिता सामान्य आकाराचे उत्पन्न विवरण तयार करा.

| तपशील | ३१/०३/२०१७ (₹) | ३१/०३/२०१८ (₹) |
|---|---|---|
| विक्री | २,००,००० | २,५०,००० |
| विक्रीत मालाचे मूल्य | १,५०,००० | १,७०,००० |
| कार्यालय आणि प्रशासकीय खर्च | ४,००० | ६,००० |
| विक्री आणि वितरण खर्च | ६,००० | १,००० |

९. **साक्षी लिमिटेडच्या खालील ताळेबंदावरुन रोख प्रवाह विवरण तयार करा.**

| देयता | ३१.३.२०१७ (₹) | ३१.३.२०१८ (₹) | संपत्ती | ३१.३.२०१७ (₹) | ३१.३.२०१८ (₹) |
|---|---|---|---|---|---|
| भाग भांडवल | २,००,००० | ३,००,००० | रोकड | २०,००० | ३०,००० |
| धनको | ६०,००० | ९०,००० | ऋणको | १,४०,००० | २,५०,००० |
| नफा तोटा खाते | ४०,००० | ७०,००० | मालसाठा | ८०,००० | ७०,००० |
| | | | जमीन | ६०,००० | १,१०,००० |
| | ३,००,००० | ४,६०,००० | | ३,००,००० | ४,६०,००० |

**उत्तर :** १) कृती कार्यामुळे रोख प्रवाह ₹ ४०,००० २) गुंतवणूक कार्यामुळे रोख प्रवाह ₹ ५०,०००
३) आर्थिक कार्यामुळे रोख प्रवाह ₹ १,००,०००

१०. **कुणाल ट्रेडर्सच्या खलील ताळेबंदावरुन रोख प्रवाह विवरण तयार करा.**

| देयता | ३१.३.२०१७ (₹) | ३१.३.२०१८ (₹) | संपत्ती | ३१.३.२०१७ (₹) | ३१.३.२०१८ (₹) |
|---|---|---|---|---|---|
| भाग भांडवल | २,००,००० | २,५०,,००० | रोकड | ३०,००० | ४७,००० |
| धनको | ७०,००० | ४५,००० | ऋणको | १,२०,००० | १,१५,००० |
| नफा तोटा खाते | १०,००० | २३,००० | मालसाठा | ८०,००० | ९०,००० |
| | | | जमीन | ५०,००० | ६६,००० |
| | २,८०,,००० | ३,१८,००० | | २,८०,,००० | ३,१८,००० |

**उत्तर :** १) कृती कार्यामुळे रोख प्रवाह ₹ १७,००० (१३,००० + ५,००० – १,०००)
२) गुंतवणूक कार्यामुळे रोख प्रवाह ₹ ६,००० ३) आर्थिक कार्यामुळे रोख प्रवाह ₹ १,००,०००

११. **कंपनीकडे खालील चल संपत्ती आणि चल देयता आहे.**

ऋणको – ₹ १,२०,०००, धनको – ₹ ६०,०००
देयविपत्र – ₹ ४०,००० मालसाठा – ₹ ६०,०००
सुटी अवजारे – ₹ २०,००० बँक ओव्हर ड्राफ्ट – ₹ २०,०००

**चल अनुपात काढा.**

**उत्तर :** चल अनुपात = ५ : ३

**१२) कंपनीची चल संपत्ती ₹ ६,००,०००, आणि तिचे चल अनुपात २:१ आहे तेव्हा चल देयता शोधून काढा?**

**उत्तर :** चल देयता = ₹ ३,००,०००

**१३)** चल देयता – ₹ ३,००,०००,

खेळते भांडवल – ₹ ८,००,०००

सामग्री– ₹ २,००,०००

**जलद अनुपात काढा.**

**उत्तर :** जलद अनुपात = ३ : १

**१४) सकल लाभ अनुपात काढा.**

विक्री – ₹ २,७०,०००,

निव्वळ खरेदी – ₹ १,५०,०००

विक्री अनुपात – ₹ २०,०००

संवरण स्कंध – ₹ २५,०००

प्रारंभग स्कंध – ₹ ४५,०००

**उत्तर :** सकल लाभ अनुपात = ३२%

**१५) खालील माहितीवरून शुद्ध नफा अनुपात काढा.**

विक्री – ₹ ३,८०,०००

विक्रीत मालाचे मूल्य – ₹ २,६०,०००

अप्रत्यक्ष खर्च– ₹ ६०,०००

**उत्तर :** शुध्द नफा अनुपात १५.७९%

**१६) खालील माहितीवरून शुद्ध नफा अनुपात काढा.**

विक्रीत मालाचे मूल्य – ₹ ३,५०,०००,

परिचालन खर्च – ₹ ३०,०००

विक्री – ₹ ५,००,०००

विक्री परत – ₹ ३०,०००

**उत्तर :** परिचालन अनुपात = ८०.८५%

**१७) आगणन करा?**

१) चल संपत्ती – ₹ ३,००,०००,

२) चल देयता – ₹ १,००,०००,

**चल अनुपात काढा.**

**उत्तर :** चल अनुपात = ३ : १

**कृती कार्य :**

१) वर्तमान पत्रात / वार्षिक अहवाल प्रसिद्ध झालेले कंपनीचे ताळेबंद मिळवा आणि त्यावरून तुलनात्मक ताळेबंद तयार करा.

२) वर्तमान पत्रात / वार्षिक अहवाल प्रसिद्ध झालेले कंपनीचे नफा तोटा खाते आणि ताळेबंद मिळवा आणि त्यावरून कंपनीचा वार्षिक आहवाल आणि विविध अनुपात शोधून काढा.

# १०. लेखांकनात संगणकाचा उपयोग
## (Computer in Accounting)

**अभ्यास घटक**

१०.१ संगणकीय लेखांकन प्रणालीची संकल्पना.

१०.२ संगणकीय लेखांकन प्रणालीची वैशिष्ट्ये.

१०.३ संगणकीय लेखांकन प्रणालीचे महत्त्व.

१०.४ संगणकीय लेखांकन प्रणालीचे घटक.

१०.५ हस्तलिखीत लेखांकन व संगणकीय लेखांकन कार्यप्रणालीची तुलना.

१०.६ संगणकीय लेखांकन आज्ञावलीचे स्रोत.

१०.७ कायदेशीर विरुद्ध बनावट (Pirated) लेखांकन आज्ञावली.(Software)

**क्षमता विधाने :**

❑ *या प्रकरणाचा अभ्यास केल्यानंतर विद्यार्थी :*

- *संगणकीय लेखांकन व त्याचे घटक समजतो.*
- *संगणकीय लेखांकनाची वैशिष्ट्ये, महत्त्व आणि मर्यादा समजतो.*
- *लेखांकनाची विविध विवरणे संगणकाद्वारे समजून घेऊ शकतो.*
- *विविध संगणकीय पॅकेजेस वापरण्यास सक्षम होतो.*

### १०.१ संगणकीय लेखांकन प्रणालीची संकल्पना :

वर्तमानकाळात प्रत्येक जण संगणकाचा मोठ्या प्रमाणात वापर करतात. संगणकीय व माहिती तंत्रज्ञानाच्या क्रांतीमुळे आधुनिक व्यावसायिक संकल्पना बदलल्या ज्यामुळे निर्णय प्रक्रिया,जलद, अचूक व सोप्या झाल्या. संगणकीय लेखांकन प्रणाली ही लेखांकन प्रक्रिया सोपी करते, तसेच जास्त उपयुक्त व स्वयंचलित करते.

संगणकीय लेखांकन प्रणाली म्हणजेच अश्याप्रकारची आज्ञावली ज्यामुळे आपण विविध उपयुक्त माहिती ही लेखांकन प्रणालीमध्ये साठवू शकतो. ही प्रणाली संगणक, संगणक महाजाल तसेच अनेक दूरस्थ संगणकीय उपकरणे यांच्याद्वारे जोडलेली असते. संगणकीय लेखांकन प्रणालीद्वारे व्यवसायात विविध प्रकारचे उपयुक्त अहवाल व विवरणपत्रे बनवली जातात.

अतिशय महत्त्वाची गोष्ट म्हणजे हे अहवाल बनविताना सर्वमान्य लेखांकन तत्त्वांचा (Generally Accepted Accounting Principles – GAAP) विचार केला जातो.

### १०.२ संगणकीय लेखांकन प्रणालीची वैशिष्ट्ये :

१) **एकात्मिक संकलित माहिती :** संगणकीय लेखांकन प्रणालीची रचना अश्याप्रकारे केलेली असते की ज्याद्वारे खरेदी, विक्री, आर्थिक नोंदी, पगार नोंदी, उत्पादन नोंदी अश्या अनेक व्यावसायिक प्रक्रिया ह्या सोप्या व स्वयंचलित होतात. संगणकीय लेखांकनामुळे अचूक, अद्ययावत व्यावसायिक माहितीही तत्काळ उपलब्ध होते. संगणकीय लेखांकन हे व्यवस्थापन सूचना प्रणाली MIS (Management Information System) बरोबर एकत्रित काम करून हे प्रमंडळांना व्यावसायिक प्रक्रिया सहज सोप्या आणि मूल्यवर्धित करण्यासाठी मदत करते.

२) **अचूकता व गतीमानता :** संगणकीय लेखांकनात उपभोक्त्याला समजतील असे अनेक आराखडे असतात जे ताबडतोब अचूकपणे व्यवहारांच्या माहितीची नोंद पुरवितात. त्यामुळे व्यवहाराची नोंद होताच विविध माहिती व अहवाल स्वयंचलितरित्या तयार होतात.

३) **त्वरित निर्णयप्रक्रिया :** संगणकीय लेखांकन प्रणालीद्वारे ताबडतोब माहिती उपलब्ध होते ज्यामुळे त्वरित निर्णय घेणे सोपे होते. त्यामुळेच प्रमंडळास नियोजन, ग्राहक आधार वाढवणे, विस्तृत व्यवस्थापन सूचना प्रणाली (MIS) अहवाल तयार करणे, तसेच अत्यंत महत्त्वाची व संपूर्ण माहिती त्वरित उपलब्ध होते.

४) **मर्यादित व एकात्मिक :** हस्तलिखित लेखांकनाशी तुलना करता अतिशय कमी वेळात म्हणजेच अनेक वित्तिय लेखे आपणास काही सेकंदातच उपलब्ध होऊ शकतात.

५) **हिशोब पुस्तकांची त्वरित उपलब्धता :** संगणकीय लेखांकन प्रणालीद्वारे अनेक खात्यांचा तक्ता, अहवाल, खाते वह्या ह्या काही बटणे दाबून त्वरित उपलब्ध होतात. महसूल प्रकारातील तेरीज पत्रक, नफा – तोटा व ताळेबंद तसेच अनेक खातेपुस्तके जसे की रोखपुस्तिका, बँकेची नोंद पुस्तिका, खरेदी पुस्तिका, विक्री पुस्तिका हे सर्व कोणत्याही वेळी तयार स्वरूपात मिळतात.

६) **सुरक्षितता :** संगणकीय लेखांकन प्रणाली ही हस्तलिखीत लेखांकनापेक्षा सुरक्षित व गोपनीय असते. त्याच्या सुरक्षा प्रणालीमुळे अनेक उपभोक्त्यांना वेगवेगळ्या स्तरावरची सुरक्षा उपलब्ध करून देता येते.

७) **पारदर्शकता :** संगणकीय लेखांकन प्रणालीमुळे रोजच्या व्यावसायिक प्रक्रियांमध्ये प्रचंड पारदर्शकता प्राप्त होण्यास मदत होते.

८) **खात्यांचे वर्गीकरण :** संगणकीय लेखांकनासाठी एकसारख्या स्वरूपाच्या खात्यांचा गट करणे गरजेचे असते. साधारणपणे खात्यांची विभागणी संपत्ती, देयता, उत्पन्न, खर्च या प्रकारात केली जाते. आवश्यकतेनुसार या गटांची आणखीन छोट्या गटात विभागणी करता येते.

## १०.३ संगणकीय लेखांकन प्रणालीचे महत्त्व :

संगणकीय लेखांकन प्रणाली ही अनेक व्यवसाय संस्था व कंपन्यांसाठी महत्वाची असते.

१) **स्वयंचलित :** लेखांकन आज्ञावलीद्वारे सर्व प्रकारची आकडेमोड ही स्वयंचलित पद्धतीने अतिशय कमी वेळात होते.

२) **अनेक उपभोक्ता :** लेखांकन माहितीचा उपयोग निरनिराळ्या ठिकाणांहून सुरक्षितपणे केला जाऊ शकतो. व्यवसायातील लेखांकनाची माहिती ऑनलाईन किंवा ऑफलाईन पद्धतीने कार्यालयात किंवा कार्यालयाबाहेर ही उपलब्ध होते. मोठ्या व्यवसायात अनेक उपभोत्यांना यात एकाचवेळी विविध नोंदी करणे सहज शक्य होते.

३) **अचूकता :** संगणकीय लेखांकन प्रणाली ही हस्तलिखीत प्रणालीपेक्षा जास्त अचूक काम करते. अनेक प्रकारच्या बेरीज, वजाबाकी, आकडेवारी संगणकीय आज्ञावलीने आपोआप होतात.

४) **गतीमानता :** संगणकीय लेखांकन प्रणाली ही हस्तलिखीत प्रणाली पेक्षा जास्त गतीने काम करते. कोणतेही अहवाल हे उपभोक्त्याला ताबडतोब उपलब्ध होतात.

५) **मूल्य कपात :** अनेक आर्थिक व्यवहाराची नोंद ही संगणकीय लेखांकन प्रणालीत एकदाच करावी लागते. त्यामुळे कमी मनुष्यबळात हे काम शक्य होते, त्यामुळे पैशाची बचत होते.

६) **पद्धतशीर व वेळेत नोंद :** संगणकीय लेखांकन प्रणालीत व्यवहारांची नोंद ही वेळेत व अचूक पद्धतीने होते.

७) **मोठ्या प्रमाणात संग्रहण क्षमता :** हस्तलिखित लेखांकनात प्रत्येक आर्थिक वर्षासाठी स्वतंत्र हिशेबपुस्तके बाळगावी लागतात. पण संगणकीय लेखांकन प्रणालीमध्ये मात्र अनेक आर्थिक वर्षांची माहिती एकत्रित साठवता येते.

८) **संक्षिप्त स्वरूप :** मोठ्या प्रमाणात असलेल्या आर्थिक नोंदी संगणकीय लेखांकन प्रणालीत अतिशय कमी जागेत साठवून ठेवता येतात. संगणकाच्या हार्डडिस्कवर ही माहिती साठवून दुसऱ्या एखाद्या उपकरणावर पण ही माहिती सुरक्षितपणे साठवता येते.

९) **माहितीचे हस्तांतरण व सामायिकरण :** ज्या लोकांना या लेखांकन नोदींमध्ये स्वारस्य आहे अशा लोकांशी माहितीचे सामायिकरण संगणकीय लेखांकन प्रणालीचे सोपे होते. ही माहिती प्रिंट आऊटच्या स्वरूपात अथवा एका संगणकातून दुसरीकडे इंटरनेटद्‌वारे व पेनड्राईव्हद्‌वारे देऊ शकतो.

### १०.४ संगणकीय लेखांकन प्रणालीचे घटक :

(अ) हार्डवेअर

(ब) आज्ञावली (Software)

(क) व्यवसायातील कर्मचारी

अ) **हार्डवेअर (Hardware) :** संगणकातील हार्डवेअर हे असे इलेक्ट्रॉनिक साधन आहे ज्याद्‌वारे डिस्क ड्राईव्ह, मॉनिटर, प्रिंटर अश्या सर्व गोष्टी एकमेकांना जोडल्या जातात. अद्ययावत लेखांकन प्रणालीमध्ये या संगणकीय जाळ्यांची माहितीच्या सामायिकिकरणासाठी गरज असते. या जाळ्याद्‌वारे ज्या संगणकात सर्व माहिती साठवलेली आहे, तो मुख्य संगणक इतर संगणकांना जोडलेला असतो. हार्डवेअर व सॉफ्टवेअर याचा एकमेकांशी योग्य जो समन्वय साधून अंकेक्षक (Auditor) एका जागी बसून भारतातील कोणत्याही राज्यातील जसे की महाराष्ट्र, कर्नाटक इ. राज्यातील ग्राहकांच्या आर्थिक व्यवहारांच्या नोंदी पाहू शकतो. त्यामुळे अंकेक्षणाचे काम हे कमी खर्चात व जास्त गतीने होऊ शकते.


ब) **आज्ञावली (Software) :** संगणकाने ज्याप्रकारे काम करणे अपेक्षित आहे त्या सर्व आज्ञांचा संच म्हणजेच आज्ञावली (Software) ज्यामध्ये माहिती साठवली जाते व व्यवसायास उपयुक्त अहवाल तयार होतात. अनेक लेखांकन आज्ञावली या इतर संगणकीय प्रक्रियेपेक्षा स्वतंत्रपणे काम करतात.

### १०.४.१ लेखांकनासाठी आवश्यक कागदपत्रांची निर्मिती :

लेखांकनाच्या आज्ञावलीत (Software) खालील घटकांचा उपयोग होतो.

अ) **लेखांकनासाठी आवश्यक कागदपत्रांची निर्मिती :** संगणकीय आज्ञावलीद्‌वारे व्यवसायातील अनेक नोंदीसाठी आवश्यक कागदपत्र तयार करतात जसे की रोख पावती, चलन इ.


ब) **व्यवहारांची नोंद :** सध्याच्या काळात संगणकीय लेखांकन आज्ञावलीद्‌वारे रोजच्या व्यवहारांची नोंद होते ज्यामुळे कागदांची बचत होते.



क) **तेरीजपत्रक व आर्थिक आराखडा तयार करणे :** आर्थिक व्यवहाराची नोंद झाल्यानंतर पुढे आपोआपच आवश्यक त्या खात्यात त्याची नोंद होते. लेखांकन प्रमाणकांच्या मदतीने व्यापारी खाते, नफा – तोटा खाते व ताळेबंद तयार करणे इ. साठी संगणक सूचना कार्यक्रम तयार करू शकतो.

### १०.४.२ मनुष्यबळ :

कोणतीही प्रणाली यशस्वी होणे ही त्या प्रणालीवर काम करणाऱ्या मनुष्यबळावर अवलंबून असते. अद्ययावत लेखांकन प्रणाली ही लेखांकनाचे ज्ञान नसलेल्या व्यक्तीचा पण सहभाग काही प्रमाणात त्यात करते.




व्यवहारांचा स्रोत असलेल्या कागदपत्रांद्वारे जसे की विक्रीची पावती, बँक डिपॉझिटची पावती, खरेदी आदेश इ. उपयुक्त माहिती ही संगणकीय लेखांकनात नोंद करण्यासाठी वापरली जाते.

संगणकीय लेखांकन प्रणालीत ती माहिती ही एका विशिष्ट आराखड्यात व विशिष्ट क्रमाने लागते. असे व्यवहार ज्यामध्ये अपूर्ण माहिती दिलेली आहे जसे की तारीख उपलब्ध नसणे, खाते क्रमांक नसणे इ. महत्वाची माहिती दिलेली नसणे अशा स्वरूपांच्या व्यवहारांची नोंद संगणकात होत नाही.

निर्णयप्रक्रियेसाठी आवश्यक अहवाल म्हणजेच निष्कर्ष, त्याचे स्वरूप हे ऋणकोचे पत्रक, धनकोचे पत्रक, साठ्याची नोंद, तेरीज पत्रक, मिळकतीचे पत्रक, ताळेबंद इ. असते.

### १०.५ हस्तलिखीत लेखांकन प्रक्रिया व संगणकीय लेखांकन प्रक्रिया यातील तुलना :

| तुलनेचे मुद्दे | हस्तलिखित लेखांकन | संगणकीय लेखांकन |
|---|---|---|
| १. व्याख्या | हस्तलिखित लेखांकन ही अशी प्रक्रिया आहे की ज्याद्वारे आपल्याला व्यवसायातील प्रत्येक व्यवहाराच्या रोजकिर्द व खातेवही स्वरूपातल्या नोंदी ठेवाव्या लागतात. | ह्या प्रक्रियेमध्ये आपण विविध संगणकीय आज्ञावलीचा उपयोग व्यवहारांच्या संगणकीय नोंदणी करता करतो. |
| २. आकडेमोड | हस्तलिखीत लेखांकनामध्ये बेरीज, वजाबाकी इ. आकडेमोड प्रत्यक्ष लिहून केली जाते. उदा. एखाद्या खात्यातील शिल्लक शोधण्याकरता आपण जमा व नावे ह्यातील आवश्यक आकडेमोड करत फरक शोधून काढतो. | संगणकीय लेखांकन प्रक्रियेत व्यवहारांची नोंद ही प्रत्यक्षरित्या करावी लागते. पण प्रत्येक खात्याची शिल्लक ही प्रत्यक्षपणे आकडेमोड करता संगणकीय आज्ञावलीद्वारे आपोआप मिळते. |
| ३. खातेनिहाय नोद | हस्तलिखीत लेखांकन प्रक्रियेत आपण रोजकिर्द तपासून तेथील रकमा जमा व नावे ह्या बाजूला विविध खात्यांमध्ये लिहीतो. सदर रक्कम खात्यांमध्ये वळती करताना त्यामध्ये मानवी चुका होऊ शकतात. | संगणकीय लेखांकन प्रणालीत विविध खात्यांमधील नोंद ही स्वयंचलित पद्धतीने होऊन मानवी चुका टाळता येतात. |

| | | |
|---|---|---|
| **४. तेरीज पत्रक (परीक्षा सूची)** | ह्या लेखांकन प्रणाली मध्ये आपल्याला सर्व खात्यातील शिल्लक ही तेरीजपत्रकात घ्यावी लागते. | संगणकीय लेखांकन प्रणालीत तेरीजपत्रक हे आपोआप तयार होते. |
| **५. समायोजन नोंदी** | समायोजनाच्या किर्द नोंदी व त्यांच्या खातेवहीतील नोंदी अशा दोनही नोंदी एका मागे एक पद्धतीने केल्या जातात. | संगणकीय लेखांकनामध्ये केवळ समायोजनाच्या किर्द नोंदी केल्या जातात, तर खातेवहीच्या नोंदी संगणक आपोआप करीत असतो. |
| **६. आर्थिक नोंदी व पत्रके** | अनेक व्यवहारातील अहवाल व पत्रके काळजीपूर्वक प्रत्यक्ष बनवावे बागतात. तेरीज पत्रकातील रकमा मिळकत पत्रकात व ताळेबंदात स्थानांतरित केल्या जातात. | संगणकीय लेखांकन प्रणालीत आर्थिक अहवाल आपोआप तयार होतात. तसेच प्रत्येक नवीन व्यवहाराच्या नोंदीनंतरचे बदल होत जातात. |
| **७. वार्षिक हिशेबपुस्तकात नोंदी** | वर्षाअखेरीला लेखनिक पुढील आर्थिक वर्षासाठी अनेक आर्थिक अहवालांची पूर्तता करत असतो. प्रत्येक खात्याची शिल्लक रक्कम पुढील आर्थिक वर्षासाठी स्थानांतरित केली जाते. | संगणकीय लेखांकन आज्ञावलीत पुढील आर्थिक वर्षासाठी आवश्यक अहवाल हे आपोआप तयार होतात. खात्यातील शिल्लक रकमा ही आपोआप स्थानांतरित होतात. |

### १०.६ संगणकीय लेखांकन आज्ञावलीचे स्रोत :

लेखांकन आज्ञावली हा संगणकीय लेखांकन प्रणालीचा आवश्यक भाग आहे. अतिशय महत्त्वाची बाब म्हणजे कोणतीही लेखांकन आज्ञावली विकत घेण्यापूर्वी व्यवसायातील लेखांकनाचे काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांची लेखांकनातील कार्यनिपुणता बघणे फायदेशीर ठरेल. संगणकावर काम करणाऱ्या व्यक्ती लेखांकनाच्या कामास जबाबदार असतात. संगणक नाही.

खालील दोन परिस्थितीत लेखांकन आज्ञावलीची गरज पडते.

(अ) जेव्हा हस्तलिखित लेखांकन प्रणाली बदलून संगणकीय लेखांकन प्रणाली अवलंबली जाते.

(ब) गरजेनुसार चालू संगणकीय लेखांकन प्रणालीची जागा नवीन प्रणाली घेते.

### १०.६.१ लेखांकन आज्ञावलीचे संच :

प्रत्येक लेखांकन आज्ञावली संच हा लेखांकनाची क्रिया करून उपभोक्त्याच्या गरजेनुसार वेगवेगळे अहवाल तयार करतो. लेखांकन आज्ञावली संचाचे वर्गीकरण आपण खालीलप्रकारे करू शकतो.

(अ) वापरण्यास तयार

(ब) सानुकूलित

(क) तयार करून घेतलेले

(ड) खुल्या स्रोतांमधून उपलब्ध

वरील प्रत्येक गटाची स्वत:ची वैशिष्ठ्ये आहेत.

लेखांकन आज्ञावलीची निवड ही ज्या त्या व्यवसायातील लेखांकन व महसुलाच्या गरजेनुसार केली जाते.

### १०.६.२ (अ) वापरण्यास तयार :

अशा प्रकारची लेखांकन प्रणाली ही साधारण लघुउद्योजकांना ज्यांचे रोजचे आर्थिक व्यवहार हे कमी असतात त्यांना उपयोगी पडते. कारण या प्रणालीची किंमत कमी असून वापर करणाऱ्या उपभोक्त्यांची संख्या ही मर्यादित असते. या प्रणाली शिकण्यास सोप्या असतात. त्यामुळेच माहितीची गोपनीयता फारशी राहू शकत नाही व संगणक प्रणालीमध्ये घोटाळे होण्याची शक्यता वाढते.

प्रणालीचे प्रशिक्षण सोपे असे जे की बरेच वेळा प्रणालीचा पुरवठादार मुफ्तरित्या देतो. पण बऱ्याचवेळा अशा प्रणाली इतर माहितीच्या प्रणालीबरोबर सहजपणे जोडता येत नाहीत.

### १०.६.२ (ब) सानुकूलित :

उपभोक्त्याच्या गरजेनुसार या प्रकारच्या प्रणाली आज्ञावली मध्ये बदल करतात. बाजारात मिळणारी तयार प्रणाली ही सर्वांनाच उपयुक्त असते असे नाही.

उदा. तयार प्रणाली मध्ये मालाचा साठा व विक्रीची नोंद ही स्वतंत्रपणे होत असते पण उपभोक्त्याला मात्र विक्री झाल्यानंतर त्याचा मालाच्या साठ्यावर होणारा परिणाम स्वयंचलित पद्धतीने होणे अपेक्षित असेल जे सानुकूलित प्रणालीत शक्य आहे.

मोठ्या व मध्यम स्वरूपाच्या व्यवसायासाठी सानुकूलित प्रणाली उपयुक्त ठरते कारण ही प्रणाली इतर माहिती प्रणालीशी जोडता येते. या प्रणालीची किंमत व वापरासाठीचा खर्च हा साधारण प्रणालीपेक्षा जास्त असतो. उपभोक्त्यासाठी ही प्रणाली सानुकूल करताना प्रणालीमध्ये आवश्यक ते बदल व सोयी केल्या जातात. माहिती व प्रणालीची गोपनीयता ही सानुकूलित प्रणालीत राखली जाते. परंतु ही प्रणाली वापरण्यासाठी उपभोक्त्याला प्रशिक्षणाची गरज असते व प्रशिक्षणाचा खर्च हा जास्त असतो.

### १०.६.२ (क) तयार करून घेतलेले :

मोठ्या व्यवसायांमध्ये लेखांकन प्रणाली ह्या गरजेप्रमाणे तयार केल्या जातात. त्यामध्ये अनेक कर्मचारी वेगवेगळ्या भौगोलिक स्थानाहून त्यावर काम करू शकतात. या प्रणालीच्या वापरासाठी विशेष प्रशिक्षणाची गरज असते. अशा प्रकारच्या प्रणाली उपभोक्त्याच्या विशेष गरजांची काळजी घेतात व व्यवस्थापन सूचना प्रणालीचा MIS (Management information System) महत्वाचा भाग बनतात. या प्रणाली गोपनियता व सत्यता पाळून एकावेळी अनेक उपभोक्त्याना या प्रणालीचा वापर करू देतात.

### १०.६.२ (ड) खुल्या स्रोतांमधून उपलब्ध :

लघुउद्योगांची लेखांकन प्रणालीची गरज कमी किंमतीत उपलब्ध संगणकीय प्रणाली वापरून शक्य होते. त्यामुळे खुल्या स्रोतांमधून इंटरनेटद्वारे उपलब्ध प्रणालींचा ते शोध घेतात. या प्रकारच्या प्रणाली इंटरनेटद्वारे डाऊनलोड करून ते त्याचा वापर करतात.

उदा. **GNU Khata** ही संगणकीय लेखांकन प्रणाली लघुउद्योगांसाठी तसेच वैयक्तिक वापरासाठी खुल्या स्रोतांद्वारे उपलब्ध आहे.

### १०.७ कायदेशीर (Legal) विरूद्ध बनावट (Pirated) लेखांकन आज्ञावली :

बाजारात विविध प्रकारच्या संगणकीय लेखांकन प्रणाली उपलब्ध आहेत. उपभोक्ता त्यांच्या गरजेनुसार कायदेशीर व खुल्या स्रोतात उपलब्ध प्रणालीची निवड करू शकतो. कायदेशीर लेखांकन आज्ञावलीचा वापर हा सर्रासपणे करतो येतो पण बनावट (Pirated) लेखांकन आज्ञावलीत माहिती नाहिशी होऊ शकते.

कायम कायदेशीर लेखांकन आज्ञावलीचा वापर केला पाहिजे कारण या प्रकारच्या प्रणालीमध्ये कालानुरूप बदल करणे हे सोपे जाते. उदा. VAT, GST इ.

- **कायदेशीर आज्ञावली –** कोणत्याही बंधनाशिवाय, या आज्ञावली वापरू शकतो.
- **प्रात्यक्षिक आज्ञावली –** या प्रकारची आज्ञावली ही फक्त प्रात्यक्षिकासाठी वापरली जाते.
- बनावट **(Pirated) आज्ञावली –** ही एक भेदन केलेली प्रणाली असून ती पूर्ण कार्यान्वित करता येते. काही प्रमाणात तिचे नुकसान झालेले असते.

योग्य संगणकीय लेखांकन प्रणालीच्या निवडीसाठी प्रथम व्यक्तीला लेखांकनाविषयीच्या कंपनीच्या गरजा जाणून घ्याव्या लागतात. काही लहान प्रमाणात उपलब्ध असलेल्या संगणकीय लेखांकन प्रणाली वेगवेगळ्या प्रकारे काम करतात व व्यवसायाला सहाय्य करण्यास कारणीभूत ठरतात.

उदा. Tally ERP9, Miracle, Busy, Focus, & Wings


**Tally संगणक प्रणालीमध्ये खाते निर्माण करणे व त्याच्या पायऱ्या**

**मार्ग – Gateway of Tally – Accounts Info – Ledgers – Single Ledger – Choose Create**

**Step १:** Tally च्या Gateway च्या स्क्रीनवरून Accounts infor ला जावे.

| Company Information |
|---|
| Select Company |
| Login as Remote User |
| Backup |
| Restore |
| Quit |


**Step २ :** Company Creation ची Window खालील चित्रानुसार स्क्रीनवर दिसते. सर्व सविस्तर माहिती या स्क्रीनवर भरली जाते.





## १०.८.१ खातेगटांची निर्मिती व पायऱ्या :

लेखांकन प्रक्रियेसाठी हस्तलिखित लेखांकन प्रणालीतील काही सांकेतिक भाषेचा उपयोग होतो. परंतु संगणकीय लेखांकनाच्या प्रक्रियेत हे सांकेतांक अंतर्भूत असतात ज्यामुळे विविध खाती, त्यांचे गट, अहवाल हे अचूकपणे आपोआप तयार होतात.

उपभोक्त्याच्या गरजेनुसार विविध संगणकीय प्रणाली उपलब्ध आहेत. काही संगणक प्रणाली या वापरास अतिशय सोप्या असून लेखांकनाच्या मानकांना अनुसरून तयार केलेल्या असतात.





## How to create voucher account in Tally Software

उदा. :

१) श्री. अमोल शर्मा यांच्याकडून उधारीने मालाची खरेदी खेली. ₹ २५,०००



Tally मधील प्रमाणकांचे (Voucher) चे प्रकार

| प्रमाणक प्रकार Voucher Types | त्याचे उपयोग |
|---|---|
| F4 (Contra) | • बँकेत रोख भरती<br>• बँकेतून रोख काढली<br>• रोख खात्यातून रोख खात्यात स्थानांतरण<br>• बँकेतून दुसऱ्या बँक खात्यात स्थानांतरण |
| F5 (Payment) | • सगळ्या प्रकारची देयके (रोख अथवा बँक) या प्रमाणकात दाखवतात.<br>• नावे लिहीलेला रोख किंवा बँक रक्कम.<br>• दोन प्रकारे लेखांकन असू शकते, Single Entry Mode किंवा Double Entry Mode. |
| F6 (Receipt) | • फक्त दोन प्रकारच्या जमा रकमा असतात.<br>• रोख पावती आणि बँकेची पावती.<br>• दोन्ही पावत्यांची नोंद होते.<br>• जमा पावत्या रोख किंवा बँक असू शकते.<br>• दोन प्रकारे लेखांकन असू शकते, Single Entry Mode किंवा Double Entry Mode. |
| F7 (Journal) | • रोखी व्यतिरिक्त सर्व व्यवहारांसाठी याचा वापर होतो.<br>• उदा. Depreciation, provisions, transfer entries, purchase of fixed assets on credit.<br>• या प्रमाणकाचा उपयोग उधारी खरेदी व विक्रीसाठी होत नाही. |
| F8 (Sales) | • याचा वापर रोख व उधारीच्या विक्री नोंदीसाठी होतो.<br>• दोन प्रकारे दाखवता येतात **"पावती"** व **"प्रमाणक"**.<br>• खात्यामध्ये रोख व ग्राहक यांचा दोन्ही खात्यात नोंद होते. |
| F9 (Purchase) | • याचा वापर रोख व उधारीच्या खरेदीच्या नोंदीसाठी होतो.<br>• दोन प्रकारे दाखवता येतात **"पावती"** व **"प्रमाणक"**.<br>• खात्यामध्ये पुरवठादार व रोख या दोन्ही खात्यात नोंद होते. |

## स्वाध्याय : १०

### प्र.१ वस्तुनिष्ठ प्रश्न

**अ) खाली दिलेल्या पर्यायांमधून योग्य पर्यायाची निवड करून विधाने पुन्हा लिहा.**

१) ............. या प्राथमिक कागदपत्राद्वारे Tally मध्ये कोणत्याही आर्थिक व्यवहाराची नोंद होते.

अ) रोजकिर्द   ब) तेरीज पत्रक   क) प्रमाणक   ड) फाईल

२) ............. मध्ये प्रत्येक दिवसाची शिल्लक निवडलेल्या प्रमाणकाप्रमाणे दिसते.

अ) नोंद वही   ब) खाते वही   क) रोजकिर्द   ड) दैंनदिन नोंद वही

३) कायम ठेव खाते ............. या गटात मोडते.

अ) गुंतवणूक   ब) चल देयता   क) बँक   ड) चल संपत्ती

**ब) पुढील विधानासाठी एक शब्द, संज्ञा किंवा शब्दसमूह द्या.**

१) (Bills Receivable) येणे रक्कम याची माहिती यात नोंदवतात.

२) Tally ही संगणक प्रणाली या प्रकारात मोडते.

३) एखादी माहिती संगणकात नोंदवण्यासाठी व स्वीकारण्यासाटी ही कळ दाबतात. (Short key)

४) भेदन केलेली प्रणाली जी थोड्या प्रमाणात खराब झालेली आहे.

५) संगणकीय प्रणालीत सर्व आकडेमोड ही ज्यामुळे आपोआप केली जाते.

**क) विधाने चूक की बरोबर ते सांगा.**

१) Alt + D ही संक्षिप्त कळ प्रमाणकाची नोंद रद्द करते.

२) Tally मध्ये F ६ कार्य कळ ही खर्च प्रमाणकाकरिता आहे.

३) कायदेशीर संगणक प्रणाली ही सुरक्षित व पूर्णपणे कार्यान्वित प्रणाली असते.

४) पगार खाते हे अप्रत्यक्ष खर्च या प्रकारात मोडते.

५) संगणक प्रणाली ही उपभोक्त्याच्या गरजेनुसार सानुकुलित करता येऊ शकत नाही.

**ड) एका वाक्यात उत्तरे लिहा :**

१) संगणकीय लेखांकन प्रणाली (CAS) म्हणजे काय ?

२) Tally संगणक प्रणालीत खात्यांची निर्मिती करायच्या पायऱ्या स्पष्ट करा.

३) Tally मध्ये अहवाल कसे पाहता येतील ?

४) वेगवेगळी प्रमाणके कोणती ?

५) प्रणालीत नवीन कंपनी निर्माण करणाऱ्या पायऱ्या स्पष्ट करा.

**प्र.५ थोडक्यात उत्तरे द्या.**

१) हस्तलिखीत लेखांकन व संगणकीय लेखांकनाचा फरक स्पष्ट करा.

२) कायदेशीर व बनावट (Pirated) प्रणालीमधला फरक सांगा.

३) लेखांक, प्रणाली म्हणजे काय ?

४) संगणकीय लेखांकन प्रणालीचे महत्त्व स्पष्ट करा.

५) संगणकीय लेखांकन प्रणालीचे घटक विशद करा.

# उत्तरसूची (Answer Key)

## १. भागीदारीची ओळख व भागीदारीची अंतिम खाती
## (Introduction of Partnership and Partnership Final Accounts)

प्र. अ) खालील दिलेल्या पर्यायामधून योग्य पर्याय निवडून संपूर्ण वाक्य पुन्हा लिहा.

उत्तरे : १) अ  २) ड  ३) अ  ४) ब  ५) ब  ६) अ  ७) ड

प्र. ब) खालील विधानांसाठी एक शब्द / शब्द समूह / संज्ञा लिहा.

उत्तरे : १) भागीदार  २) उचल  ३) भागीदारी संस्था  ४) भारतीय भागीदारी कायदा
५) नोंदणी  ६) भागीदारी करार  ७) स्थिर भांडवल पद्‌धती  ८) नफा विभाजन अनुपात
९) अस्थिर भांडवल पद्‌धती  १०) चालू खाते  ११) पूर्वदत्त खर्च
१२) वार्षिक खाती  १३) चलसंपत्ती  १४) तरलतेच्या आधारे(order of liquidation)
१५) नफातोटा खाते  १६) सकल तोटा  १७) शुद्‌ध नफा

प्र. क) खालील विधाने 'बरोबर' किंवा 'चूक ते लिहा.

उत्तरे : १) चूक  २) चूक  ३) बरोबर  ४) बरोबर  ५) चूक  ६) चूक  ७) चूक
८) चूक  ९) बरोबर  १०) चूक  ११) बरोबर  १२) बरोबर  १३) चूक  १४) चूक
१५) चूक

प्र. ड) गटात न बसणारा शब्द ओळखा (Find odd one)

उत्तरे : १) वेतन  २) खरेदी  ३) प्राप्य विपत्र  ४) देय विपत्र  ५) घसारा

प्र. इ) विधाने पूर्ण करा.

उत्तरे : १) समान  २) वैकल्पिक  ३) कायदेशीर उत्पन्न  ४) अमर्यादित
५) चालू  ६) नफा तोटा  ७) संयुक्त व प्रत्येकाची  ८) भागीदारी करार/नियमावली
९) नावे  १०) नावे  ११) चालू  १२) जमाशिल्लक
१३) व्यापार खर्च  १४) महसुली प्राप्ती (आगमप्राप्ती)  १५) खरेदी  १६) पूर्वदत्त खर्च
१७) स्थिर संपत्ती  १८) प्रत्यक्ष  १९) खर्च  २०) जाहिरात

प्र. ग) खालील विधानांशी तुम्ही सहमत आहात की असहमत ते लिहा.

उत्तरे : सहमत– ४, ५, ६, ८, ११, २  असहमत–१, २, ३, ७, ९, १०, १२, १३, १४, १५, १६

प्र. ट) गणणा करा.

उत्तरे : १) ₹ ३३,३३३  २) ₹ ६२५  ३) ₹ ६२५  ४) ₹ ९,६००  ५) ₹ १५,०००

## २. नफा न कमविणाऱ्या संस्थांची खाती
## (Accounts of Not for Profit Concerns)

प्र. अ) खाली दिलेल्या पर्यायांमधून योग्य पर्यायाची निवड करा.

उत्तरे : १) सामाजिक २) भांडवली प्राप्ती ३) नामधारी खाते ४) संपत्ती ५) देयता
६) वाढावा ७) उत्पन्न – खर्च खाते ८) रोख व बँक शिल्लक ९) सेवा १०) भांडवली

प्र. ब) पुढील विधानाकरिता एक शब्द / संज्ञा किंवा शब्द समूह द्या.

उत्तरे : १) नफा न कमविणारी संस्था २) उत्पन्न – खर्च खाते ३) विशिष्ट देणगी ४) भांडवल प्राप्ती
५) उत्पन्न – खर्च खाते ६) प्राप्ती – शोधन खाते ७) अप्राप्त (येणे बाकी) उत्पन्न
८) वाढावा ९) भांडवल निधी १०) भांडवल प्राप्ती

प्र. क) पुढील विधाने बरोबर की चूक ते सकारण सांगा.

उत्तरे : बरोबर – १,४,७,१० चूक – २,३,५,६,८,९

प्र. ड) रिकाम्या जागा भरा.

उत्तरे : १) व्यापारिक, २) सेवा ३) वास्तविक ४) रोख, ५) नफा–तोटा,
६) शोधन ७) नामधारी ८) उत्पन्न–खर्च ९) महसूली १०) चालू

प्र. फ) तक्ता पूर्ण करा (Complete the Table).

१)

उत्तरे : १) ₹ १५,००० (खर्च) २) ₹ ४,००० (खर्च) ३) ₹ २३,००० (उत्पन्न) ४) ₹ १,५०० (तूट)
५) ₹ ३,७०० (वाढावा)

२)

उत्तरे : १) ₹ १,००० २) ₹ ७०० ३) ₹ १,६०० ४) ₹ १,४०० ५) ₹ ४,५०० ६) ₹ ४००

३)

उत्तरे : १) ₹ १,१०० २) ₹ १,८०० ३) ₹ ६५० ४) ₹ २,९०० ५) ₹ ४५० ६) ₹ ३,१००

प्र. ग) खालील बाबींची गणना करा.

उत्तरे : १) घसारा – ₹ १,२५०, २) व्याज – ₹ ९,६००, ३) लेखन सामग्री वापरली – ₹ २३,०००
४) उत्पन्न खर्चाच्या नावे ₹ १५,००० ५) ग्रंथालय पुस्तके ₹ ५०,०००.

प्र. ह) गटात न बसणारा शब्द ओळखा (Find odd one).

उत्तरे : १) प्राप्ती शोधन खाते   २) पगार   ३) लेखन सामग्री   ४) रिलायन्स उद्योग   ५) शुद्ध नफा

## ३. भागीदारीची पुनर्रचना (Reconstitution of Partnership)
## भागीदाराचा प्रवेश (Admission of a Partner)

प्र. अ) योग्य पर्याय निवडा.

उत्तरे : १) १२:८:५   २) कमी भांडवल   ३) पुनर्मूल्यांकन खाते   ४) रोकड / बँक
५) भांडवल

प्र. ब) खालील विधानासाठी एक शब्द, शब्दसमूह किंवा संज्ञा सूचवा.

उत्तरे : १) अतिरिक्त नफा पद्धत   २) पुनर्मूल्यांकन खाते /नफा तोटा समायोजन खाते   ३) ख्याती
४) जुने प्रमाण   ५) अधिमूल्य पद्धत   ६) त्यागाचे प्रमाण   ७) सामान्य / साधारण नफा
८) भागीदारांचे भांडवल / चालू खाते   ९) अवितरीत नफा   १०) त्यागाचे प्रमाण.

प्र. क) चूक की बरोबर सकारण सांगा.

उत्तरे : बरोबर : १, २, ५, ९, १०   चूक : ३, ४, ६, ७,८

प्र. ड) गटात न बसणारा शब्द ओळखा.

उत्तरे : १) यंत्रसामग्री   २) संशयित कर्जनिधीचे अपलेखन   ३) अस्थिर भांडवल पद्धत

प्र. इ) उदाहरणे सोडवा.

उत्तरे : १) नवीन प्रमाण – १५:१६:९   २) त्यागाचे प्रमाण – ५:१   ३) त्यागाचे प्रमाण – ७:३

प्र. ग) कोष्टक पुर्ण करा.

उत्तरे : १) सरासरी नफा   २) विनियोजित भांडवल   ३) कमी केलेले मूल्य ₹ ४०,०००, स्कंधाचे मूल्य ₹ २,००,०००

## ४. भागीदारीची पुनर्रचना (Reconstitution of Pertnership)
## भागीदाराची निवृत्ती (Retirement of Partner)

प्र. अ) खालील दिलेल्या पर्यायामधून योग्य उत्तर निवडा.

उत्तरे : १) सर्व भागीदारांमध्ये   २) नावे   ३) कर्ज   ४) नवीन   ५) लाभाचे   ६) ३:२

प्र. ब) खालील दिलेल्या पर्यायामधून योग्य उत्तर निवडा.

उत्तरे : १) पुनर्मूल्यांकनावरील नफा २) लाभाचे प्रमाण ३) पुनर्मूल्यांकनावरील तोटा
४) लाभाचे प्रमाण ५) ख्याती ६) भांडवल / चालू खाते

प्र. क) खालील विधाने बरोबर की चूक ते सकारण लिहा.

उत्तरे : बरोबर : १, २, ४ चूक : ३, ५, ६

प्र. ड) रिकाम्या जागी योग्य शब्द लिहून वाक्य पुन्हा लिहा.

उत्तरे : १) जुने प्रमाण २) नावे ३) नफातोटा समायोजन खाते ४) भांडवल ५) लाभाचे

## ५. भागीदारीची पुनर्रचना (Reconstitution of Partnership) भागीदारांचा मृत्यू (Death of Partner)

प्र. अ) खालील दिलेल्या पर्यायामधून योग्य पर्याय निवडून वाक्य पुन्हा लिहा.

उत्तरे : १) भागीदाराची निवृत्ती / मृत्यूचा फायदा उरलेल्या भागीदारांना होतो. २) लाभाचे प्रमाण
३) संपत्ती ४) निवृत्ती ५) वारसदाराचे कर्ज खाते

प्र. ब) पुढील विधानासाठी एक शब्द / संज्ञा / शब्दसमूह द्या.

उत्तरे : १) नफा २) वारसदार ३) सामान्य निधी / संचिती ४) मृत भागीदार ५) लाभाचे प्रमाण

प्र. क) खालील विधाने चूक की बरोबर ते सकारण लिहा.

उत्तरे : बरोबर : २, ४ चूक : १, ३, ५

प्र. ड) रिकाम्या जागी योग्य शब्द भरून वाक्य पुन्हा लिहा..

उत्तरे : १) देयता २) लाभ ३) संपत्ती ४) जुने प्रमाण ५) ख्याती

## ६. भागीदारीचे विसर्जन (प्रविलयन किंवा समाप्ती) (Dissolution of Partnership)

प्र. अ) खालील दिलेल्या पर्यायामधून योग्य पर्यायाची निवड करा व विधाने पूर्ण लिहा.

उत्तरे : १) रोखीकरण खाते २) रोख/ बँक खाते ३) नफा वाटप प्रमाण ४) नावे ५) रोखीकरण खाते
६) नादार/ दिवाळखोर ७) पुस्तकी मूल्य ८) विसर्जित ९) जमा १०) विसर्जन

प्र. ब) खालील विधानासाठी एक शब्द/ संज्ञा/ शब्दसमूह लिहा.

उत्तरे : १) रोखीकरण तोटा २) विसर्जन ३) रोखीकरण खाते ४) भांडवली तूट ५) रोखीकरण नफा
६) संपत्तीचे रोखीकरण ७) आकस्मिक देयता ८) अनोंदीत संपत्ती ९) रोखीकरण खाते
१०) विसर्जन / रोखीकरण खर्च

प्र. क) खालील विधाने चूक की बरोबर ते सकारण लिहा.

उत्तरे : बरोबर – २, ३, ६, ८, ९ चूक – १, ४, ५, ७, १०

प्र. फ) तक्ता पूर्ण करा.

उत्तरे : १) ₹ १६,००० २) ₹ २८,००० ३) ₹ ५,००० ४) ₹ ३४,००० ५) ₹ २८,०००

## ७. विनिमय विपत्र किंवा हुंडी (Bills of Exchange)

प्र. अ) योग्य पर्याय निवडून वाक्य पुन्हा लिहा.

उत्तरे : १) आहार्यी २) मसुदा ३) पूर्वीच्या ४) २५ जाने. २०२० ५) आहार्यी
६) तीन ७) ६ मार्च, २०२० ८) सरकारी अधिकारी ९) अनादरण १०) देय–विपत्र

प्र. ब) खालील विधानासाठी एक शब्द, शब्दसमूह किंवा संज्ञा सूचना.

उत्तरे : १) सवलतीचे दिवस २) नोंदणी खर्च ३) आदाता ४) पृष्ठांकिती ५) नोंदणी अधिकारी
६) विपत्राचे नूतनीकरण ७) अनुग्रह विपत्र (सोयहुंडी) ८) विपत्रधारक ९) विपत्र वटविणे १०) बुडीत कर्ज

प्र. क) चूक की बरोबर सांगा.

उत्तरे : चूक – १, ३, ४, ८, १० बरोबर – २, ५, ६, ७, ९

प्र. ड) गटात न बसणारा शब्द ओळखा.

उत्तरे : १) नोंदणी २) दर्शनी विपत्र ३) नोंदणी अधिकारी ४) नोंदणी खर्च ५) मसुदा

प्र. इ) खालील विधाने पूर्ण करा.

उत्तरे : १) विपत्राचे निवर्तन २) दिवाळखोर व्यक्ती ३) तूट/न्यूनता ४) लेखन तिथीनुसार विपत्र (After date bill)
५) व्यापारी हुंडी ६) आहर्ता ७) दर्शनोत्तर विपत्र
८) नोंदणी ९) स्थळाबाबत सशर्त १०) बँक सेवाशुल्क

प्र. ग) खालील विधानाशी तुम्ही सहमत आहात का असहमत ते सांगा.

उत्तरे : सहमत – ३, ४, ५, ६, १० असहमत – १, २, ७, ८, ९

प्र. ह) सोडवा. (Calculate the following)

उत्तरे : १) ₹ ८२५ २) i) ₹ ९०० ii) ₹ ६०० iii) ₹ ३०० ३) ₹ १८,२००
४) ₹ ५३,००० ५) ₹ १६,७२५ ६) १६ ऑगस्ट, २०१९

प्र. ज) कोष्टक पूर्ण करा.

उत्तरे : १) i) ३ एप्रिल, २०१९ ii) २४ नोव्हें, २०१९ iii) २५ जाने, २०२० iv) २ मार्च, २०२०
v) १७ ऑगस्ट, २०१९.

२) i) परिपक्वता तिथी – १७ फेब्रुवारी २०२० – कायदेशीर देय दिनांक २० फेब्रुवारी, २०२०
ii) परिपक्वता तिथी – १२ ऑगस्ट २०२० – कायदेशीर देय दिनांक १४ ऑगस्ट, २०२०
iii) परिपक्वता तिथी – २३ जानेवारी २०२० – कायदेशीर देय दिनांक २५ जानेवारी, २०२०
iv) परिपक्वता तिथी – २० डिसेंबर २०१९ – कायदेशीर देय दिनांक २३ डिसेंबर, २०१९
v) परिपक्वता तिथी – २१ फेब्रुवारी २०१९ – कायदेशीर देय दिनांक २४ फेब्रुवारी, २०१९

## ८. प्रमंडळ खाती (Company Accounts)
## भागांचे लेखांकन (Issue of Shares)

प्र. अ) खालील दिलेल्या पर्यायामधून योग्य पर्यायाची निवड करा आणि विधान पुन्हा लिहा.

उत्तरे : १) भांडवल निधी २) ताळेबंदाची देयता बाजू ३) लाभांश ४) माहिती पत्रक ५) ५%
६) नावे ७) मर्यादित ८) नाममात्र/अधिकृत भांडवल ९) थकीत याचना १०) अंतर्गत नियमावली

प्र. ब) खालील प्रत्येक विधानांकरिता एक शब्द/संज्ञा किंवा शब्द समूह द्या.

उत्तरे : १) अप्राप्त याचना/थकीत मागणी २) सम मूल्यावर निर्गमन ३) भागधारक ४) संयुक्त स्कंध प्रमंडळ/कंपनी
५) अभिदत्त/विक्री झालेले भांडवल ६) पूर्वाधिकार भाग ७) समभाग ८) मागणी न केलेले भांडवल

प्र. क) खालील विधाने बरोबर की चूक सकारण सांगा.

उत्तरे : बरोबर – ३, चूक – १,२,४,५,६

प्र. ड) खालील विधानांशी आपण सहमत आहात किंवा असहमत आहात ते सांगा.

उत्तरे : सहमत – ३,५,७, ८,१० असहमत – १,२,४, ६, ९

प्र. फ) खालील विधाने पूर्ण करा.

उत्तरे : १) प्रव्याजीवर/अधिमूल्यावर २) अधिकृत ३) थकीत मागणी/अप्राप्त याचना ४) पूर्वाधिकार
५) सम (Equity) ६) संयुक्त स्कंध प्रमंडळ/कंपनी ७) अभिदत्त/विक्रीत भांडवल ८) अनिर्गमित

प्र. ग) खालील संबंधीची गणना करा.

उत्तरे : १) ₹ ३,५०० २) ₹ १०,००० ३) ₹ १६,००० ४) ₹ ८,००,००० ५) ₹ १९,९८,००० ६) ₹ २,०००

## ९. वित्तीय विवरणांचे विश्लेषण (Analysis of Financial Statement)

प्र. अ) खालील दिलेल्या पर्यायामधून योग्य पर्याय निवडून वाक्य पुन्हा लिहा.

उत्तरे : १) शुद्ध विक्री २) चल संपत्ती ३) चल संपत्ती – स्कंध ४) विक्री – सकल लाभ
५) परिचालन अनुपात ६) सामान्य आधार ७) चल देयता ८) २:१
९) तरलता

प्र. ब) पुढील विधानासाठी एक शब्द, संज्ञा किंवा शब्द समूह द्या.

उत्तरे : १) तुलनात्मक उत्पन्न विवरण २) सकल लाभ अनुपात ३) वित्तीय विवरणांचे विश्लेषण ४) अनुपात
५) तरल संपत्ती ६) नियोजित भांडवलावर परतावा ७) तुलनात्मक ताळेबंद
८) रोख प्रवाह विवरण ९) वित्तीय १०) तरल अनुपात

प्र. क) खालील विधाने चूक की बरोबर सकारण ते लिहा.

उत्तरे : बरोबर – २, ४, ५, ६, ७, ८, ९, १०, ११ चूक – १, ३, १२

## १०. लेखांकनात संगणकाचा उपयोग (Computer in Accounting)

प्र. अ) खाली दिलेल्या पर्यायांमधून योग्य पर्यायाची निवड करून विधाने पुन्हा लिहा.

उत्तरे : १) प्रमाणक २) दैंनदिन नोंद वही ३) गुंतवणूक

प्र. ब) खाली दिलेल्या पर्यायांमधून योग्य पर्यायाची निवड करून विधान पुन्हा लिहा.

उत्तरे : १) ऋणको २) व्यापारी ३) Ctrl + A ४) बनावट (Pirated) प्रणाली ५) स्वयंचलित

प्र. क) विधाने चूक की बरोबर ते सांगा.


उत्तरे : बरोबर : १, ३, ४ चूक : २, ५

# Notes



































- पाठ्यपुस्तक मंडळाची वैशिष्ट्यपूर्ण पाठ्येत्तर प्रकाशने.
- नामवंत लेखक, कवी, विचारवंत यांच्या साहित्याचा समावेश.
- शालेय स्तरावर पूरक वाचनासाठी उपयुक्त.

पुस्तक मागणीसाठी www.ebalbharati.in, www.balbharati.in संकेत स्थळावर भेट द्या.

**साहित्य पाठ्यपुस्तक मंडळाच्या विभागीय भांडारांमध्ये विक्रीसाठी उपलब्ध आहे.**

ebalbharati

विभागीय भांडारे संपर्क क्रमांक : पुणे - ☎ २५६५९४६५, कोल्हापूर- ☎ २४६८५७६, मुंबई (गोरेगाव) - ☎ २८७७१८४२, पनवेल - ☎ २७४६२६४६५, नाशिक - ☎ २३९१५११, औरंगाबाद - ☎ २३३२१७१, नागपूर - ☎ २५४७७१६/२५२३०७८, लातूर - ☎ २२०९३०, अमरावती - ☎ २५३०९६५

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व
अभ्यासक्रम संशोधन मंडळ,
पुणे–४११००४.

मराठी पुस्तपालन आणि लेखाकर्म इ.१२वी ₹212.00